मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(जिल्हा वाचनालय)

सं. ठाणें ०१-१९८२

सन १८७९

मासिकाचे नांव — नाट्यकथार्णव

संपादक — १८

मासिक क्रमांक —   सन — १८०१

अंक —

(महिने)

नाट्य कथार्णव



...ग्रंथ संग्रहालय, ठाणें. जुनी मासिके (संदर्भ)

3 Works स-भा-९५१

Waman Ramchandra Or
Pleader District Court
Thana

९५१
२५१९८६



# उपाद्‌ ... न्मथ नाटक.

आलीकडे बरींच वर्षें मराठी भाषेचा उत्कर्ष करण्याकडे पुष्कळ विद्वान् सद्गृहस्थांचें लक्ष लागलें असून निरनिराळ्या विषयावर सांप्रत बरींच मासिकं व इतर पुस्तकें निघत आहेत, परंतु त्या सर्वांत बहुशः गूढ व गहन असेच विषय येत असल्यामुळें पुष्कळ लोकांस त्यांचा तादृश उपयोग होत नाहीं व याचें मुख्य कारण सांप्रत विद्येचा चोहोंकडे जसा व्हावा तसा अद्यापि प्रसार झाला नाहीं हें होय. यामुळें शास्त्रीय किंवा राजकारणी इत्यादि विषयांवर लिहिलेलीं पुस्तकें किंवा निबंध हीं वाचावयाकडे कोणाचेंही फारसें लक्ष लागत नाहीं. व याशिवाय इतर पुस्तकें साधारण शिकलेल्या मनुष्यासही वाचण्याजोगीं फारशीं नसल्यामुळें अशा लोकांची वाचनेच्छा अवश्य कुंठित होऊन जाते; व तेणेंकरून त्या लोकांस एकादें कांहीं वाचावयास सांगितलें असतां त्यांत कांहीं कर्मणूक नाहीं या समजुतीनें त्यांचें वाचणें अजी बंदच पडतें. यासाठीं कर्मणुकीच्या नांवानें कां होईना; प्रथमतः लोकांस वाचनाची गोडी लावणें हें जरूर आहे, व हें काम इतर पुस्तकांच्या योगानें जितकें होऊं शकेल, त्यापेक्षां नाटकाचीं आणि गोष्टींचीं पुस्तकें यांचे योगानें अधिक होण्याचा संभव आहे हें उघडच आहे.

"प्रथमालीढमधुराः पिबंति कटु भेषजं"

असें एक संस्कृतांत वाक्य आहे व त्याचा अर्थ प्रथमतः गोड गोड औषध घेण्याची संवय झाली ह्मणजे हळूहळू मनुष्य कडू औषधही घेऊं लागतो. या न्यायानें पाहतां मनुष्यास एकदा वाचावयाची गोडी लागली ह्मणजे त्याचें

नटी—प्राणप्रिया, ह्यांत विचार कसला करावयाचा? सर्व लोकांच्या हृदयांस आनंदविणारीं अशीं अनेक नाटकें आहेत, त्यांपैकींच कशाचा तरी प्रयोग करावा ह्मणजे झालें. आहे काय त्यांत?

सूत्र०—प्रिये, असें नव्हे.

श्लोक.

[अवडं]बर आवडे कितिऐकां; चित्रार्थ कोणांप्रती
[को]णी नाट्यकथाच पाहुनि मनीं हर्षाप्रती मानिती;
[हे] तों वाक्पटु मात्र, दुष्कर नसे याचें मनोरंजन;
[मो]ठें दुष्कर सद्रसज्ञ परि जे त्यांचें समाराधन.

कारण कीं, रसिकजनांस ह्मटलें ह्मणजे,

आर्या.

[शृ]ंगारादिक जे रस त्यांहीं परिपूर्ण असुनिही, सकळ.
[का]व्याचे गुण जेथें तेंचि प्रिय नाट्य होतसे विमल

आणखी असें आहे.

आर्या.

[र]सिकहि असुनि नूतनकृत्यवलोकनचि, आवडे रसिकां
[र]म्य पहा कामिजनां युवति नवी हर्षदायि होय न कां?

नटी—(चिंतायुक्त होऊन) असें नाटक कोठून आणावें बाई?

सूत्र०—(आठवण झालीसें दाखवून आनंदानें) वाहवा वाहवा! प्रत्यक्ष आपल्या नाभींतच कस्तूरीसुगंध भरला असूनही कस्तूरिका मृग कस्तूरीचा शोध करीत फिरत असतो, त्याप्रमाणेंच माझीही स्थिति झाली, तेव्हां मी केवढा शाहाणा! पहा कीं, आपल्या गळ्यांत सुवर्णाचा अलंकार असावा त्याप्रमाणें सुवर्ण-

---

१. मोठमोठे शब्द. २ कित्येकांस. ३. चमत्कारिक अर्थ. ४ बोलण्याविषयीं कुशल, बडबडणारे. ५. संतोष, [तृ]प्ति. ६ नवीन कृति—अर्थात नाटक—त्याचें अवलोकन [म्ह]० पहाणें. ७. सुवर्ण ('सोनें', पक्षीं 'चांगलीं अक्षरें')

N. R. C

त्यांत

आरंभीं सुख, मध्यंतरीं विपत्ति, व अंतीं पुनरोःसुखप्राप्ति हाच प्रकार सर्वत्र भरला आहे. त्यांमध्यें काळाचें किंवा स्थळाचें ऐक्य मुळींच नसून त्यांतील पात्रांच्या रीतीभातीही प्रसंगास किंवा काळास अनुसरून नसतात, तसेंच अकालवर्तित्वदोषही त्यांत पदोपदीं ओतप्रोत भरलेले आढळतात. **कांचनपुरी** किंवा **विश्वपुरी**सारख्या नगरांत ८ व्या किंवा १० व्या शतकांतही चहाकाफी पिण्याकरितां कांचेच्या वशा, पत्र लिहिण्यासाठीं खुर्च्या मेजांची समृद्धि, खुशाल मौजेनें आडवें पडण्यासाठीं 'ईझि चेअर्स', इत्यादि प्रकारच्या गोष्टी या कादंबरीग्रंथांत सांपडावयाच्या नाहींत असें सहसा होणें नाहीं. तसेंच पात्रांचें स्वभाववैचित्र्य, व त्या वैचित्र्यामुळें या संसारांतील व्यवहारांवर होणारे अनेकविध परिणाम, ह्यांचें तर अशा ग्रंथांत नांव सुद्धां घ्यावयास नको. असो. या व अशाच प्रकारच्या इतर गोष्टी मनांत आणल्या ह्मणजे आमच्या नाट्यादिक ग्रंथांची प्रस्तुत किती शोचनीय स्थिति झाली आहे हें कोणासही सहज समजेल. आतां या स्थितीचें निरसन होणें अवश्य आहे, यास्तव तें होईल तितकें करण्यास झटावें हाच आमचा हें पुस्तक काढण्याचा मुख्य उद्देश आहे. याशिवाय धर्म, नीति इत्यादि गोष्टींचीही सुधारणा नाटकादिकांपासून होऊं शकते व तशा तऱ्हेची सुधारणा हळूहळू होत जाणें या देशास अत्यावश्यक आहे यासाठीं ती सुधारणाही होईल तितकी करावयास झटावें हाही आमचा हें पुस्तक काढण्याचे कामीं उद्देश आहे. आतां हे उद्देश आमचे हातून कितपत सिद्ध होतील हें पहाणें वाचकांकडे सोंपवितों.

# पंडितरायकृत रतिमन्मथ नाटक.

अंक १.

पद.

कटाक्ष ऐसे अंबेचे, होउत शिवंद जनां साचे (ध्रु०)
चंद्रशेखराकडे पहातां साभिप्रायेंचि होती;
परि गंगेतें बघतां तच्छिरिं अनादरा दावीती;
भृंगिरिटीतें अवलोकुनियां मंद हास्य करितातीं;
दीन आलिया शरण, दयेनें स्निग्धत्व दिसे ज्यांचें १
धनुष्य ज्याचें सदा पुष्पमय, जो सुरकार्यासक्त;
त्यासि पहातां वात्सल्यभरें होती जे अनुरक्त;
तशीच त्याची पत्नी साध्वी रत्यभिधानें युक्त;
तीस पहातां प्रसन्न होउनि अभीष्ट पुरविति तींचें २

( असें मंगलाचरण झाल्यानंतर )

**सूत्रधार**—( पडद्याकडे पाहून ) प्राणप्रिये, अंमळ इकडे ये वरें अशी. (**नटी** प्रवेश करिते.)

**नटी**—प्राणप्रिया, ही मी आलें. आपली काय आज्ञा आहे ?

**सूत्र०**—प्रिये, पहा. या तंजापुरवासी जनांकडे निरंतर प्रेमदृष्टीनें पहाणारी, तशीच भाविक जनांचें कल्याण करण्याविषयीं जणुं कल्पलताच, अशी जी त्रैलोक्यमाता **आनंदवल्ली**, तिचा प्रस्तुत वसंतोत्सव चालू आहे, त्याकरितां अनेक देशांहून हे रसिक विद्वज्जन येथें स्वसंतोषेंकरून प्राप्त झाले आहेत. त्यांचें मनोरंजन करण्याकरितां कोणत्या नाटकाचा प्रयोग करावा ह्मणून मी पुष्कळ वेळ विचार करीत आहें, परंतु अद्यापि मला कांहीं सुचत नाहीं.

**नटी**—प्राणप्रिया, यांत विचार कसला करावयाचा ? सर्व लोकांच्या ह्रदयांस आनंदविणारीं अशीं अनेक नाटकें आहेत, त्यांपैकींच कशाचा तरी प्रयोग करावा, ह्मणजे झालें. आहे काय त्यांत ?

**सूत्र०**—प्रिये, असें नव्हे.

श्लोक.

शब्दांडबर आवडे कतिपयां; चित्रार्थ कोणांप्रती
कोणी नाट्यकथाच पाहुनि मनीं हर्षाप्रती मानिती;
हे तों वाक्पटु मात्र, दुष्कर नसे यांचें मनोरंजन;
वाटे दुष्कर सद्रसज्ञ परि जे त्यांचें समाराधन.

कारण कीं, रसिकजनांस ह्मटलें ह्मणजे,

आर्या.

शृंगारादिक जे रस त्यांहीं परिपूर्ण असुनिही, सकल.
काव्याचे गुण जेथें तेंचि प्रिय नाट्य होतसे विमल

आणखी असें आहे.

आर्या.

रसिकहि असूनि नूतनकृत्यवलोकनचि, आवडे रसिकां
नित्य पहा कामिजनां युवति नवी हर्षदायि होय न का ?

**नटी**—( चिंतायुक्त होऊन ) असें नाटक कोठून आणावें बाई ?

**सूत्र०**—( आठवण झालीसें दाखवून आनंदानें ) वाहवा वाहवा ! प्रत्यक्ष आपल्या नाभींतच कस्तूरीसुगंध भरला असूनही कस्तूरिका मृग कस्तूरीचा शोध करीत फिरत असतो, त्याप्रमाणेंच माझीही स्थिति झाली, तेव्हां मी केवढा शहाणा ! पहा कीं, आपल्या गळ्यांत सुवर्णाचा अलंकार असावा त्याप्रमाणें सुवर्ण-

---

१. कल्याण दायक. २. सांबाकडे. ३. अभिलाषसूचक. ४. कोणी सांबाचे गण. ५. प्रेम, वत्सलता. ६. मदनास. ७. इच्छित. ८. तंजावर येथें रहाणाऱ्या. ९. तंजावर येथील देवीचें नांव.

१. मोठमोठे शब्द. २ कित्येकांस. ३. चमत्कारिक अर्थ. ४. बोलण्याविषयीं कुशल, बडबडणारे. ५. संतोष, तृप्ति. ६ नवीन कृति—अर्थात नाटक—त्याचें अवलोकन ह्म० पहाणें. ७.सुवर्ण ( 'सोनें', पक्षीं 'चांगलीं अक्षरें' )

प्रचुर आणि सकलगुणांहीं परिपूर्ण असें रतिमन्मथ नाटक मजजवळ असूनही मी उगीच वेड्यासारखा दुसऱ्या नाटकाचा शोध करीत होतों!

**नटी**—(कौतुकानें) प्राणनाथ, असा हा कोण्या वरें कवीचा वाग्विलास?

**सूत्र०**—प्रिये, सांगतों इकडे अवधान असूं दे.

श्लोक.

निर्मूं अन्या सुरेंद्रा, मुळिंच न अथवा इंद्र ठेवूं जगांत,
ऐशा गोष्टी कराया क्षमें सतत,अशा जो कुळीं जन्म घेत,
वाटे जो बाळकृष्णाभिध सचिव दुजें रूप घेऊनि आला
लक्ष्म्यंबेच्या मनातें,शशिजलनिधितें तेंवि,जो दे मुदाळा

आर्या.

जो लोकीं श्रेष्ठ असे, जो स्वगुणांहीं बुधामधें श्रेष्ट,
ऐसा सत्कवि, त्याचें नाम जगन्नाथ पंडितवरिष्ठ.

**नटी**—एकून हा कवि मोठाच कुलीन आहे, नाहीं वरें?

**सूत्र०**—होय, यांत काय संशय?

**नटी**—प्राणनाथ, ह्या कवीचे *गुरुही महात्मेच असतील असें मला वाटतें.

**सूत्र०**—(मान डोलवून) प्रिये, महात्मे ह्मणून काय विचारावें! प्रख्यात कामेश्वर ते ह्या कवीचा गुरु. हा गुरु कसा होता ह्मणशील तर सांगतों ऐक.

साक्या.

नखप्रहारें सुस्वर वीणा—नाद तियेचा, आणी
जिव्हारंगस्थळीं विराजे सततहि ऐशी वाणी
याच्या भेदें सततहि भाषण होई मृदुमधु ज्याचें;
दृग्लीलाजित कमला हस्तीं कमळ धरी जें साचें,
त्याच्या मधुशीं यद्वाणीच्या समता माधुर्याची;
सदासर्वदा भक्ति करी जो त्रिपुरांतक सांबाची;
मंदाराचें पुष्प असे जें त्या सांबाच्या हातीं
त्याच्या सौरभ्याची उपमा पावे ज्याची उक्ति.

**नटी**—(मान डोलवून) प्राणनाथ, हा कवि कोण्या राजाच्या वरें पदरीं असतो?

**सूत्र०**—(बहुमानबुद्धीनें)

दिंड्या.

दीन कोणीही जरी शरण आला
सत्वरी त्या देताति आश्रयाला;
अहा! ज्यांची नीरंध्रता सदाही
भेद पावे नचि मधुपसंहतींहीं;
सदा ज्यांच्या आश्रया गुणी लोक
धरुनि आनंदें राहती अनेक;
कीर्तिरूपी जे विमल मौक्तिकाचा
हार धरिताती चोलदेशिं साचा
असे राजे बहु असोसूलवंशीं
स्ववीर्यानें चिर रक्षिती प्रजेशीं.

त्यांमध्यें,

श्लोक.

संग्रामीं दृढबाहुनें रगडुनी मौर्वीगुणां ओढिता
ज्यातें वंदिति शत्रुही भिउनियां युद्धांगणीं तत्वतां;
दारिद्र्यें अतिमात्र पीडित असे जे दीन त्यांचा ज्वर
दानीकांमृतसेचनेंचि करितो जो शांत राजेश्वर;

---

१. गुण ('दोरा, पक्षीं 'काव्यगुण') २. वाणीचा विलास, अर्थात् चमत्कार. ३. समर्थ. ४. बाळकृष्ण नांवाचा. ५. लक्ष्मी नामक आईच्या. ६. आनंदाला

* मूळांत टीकाकारांनीं 'देशिकैः' असा शब्द आहे. त्याचा रूढ अर्थ जरी 'तद्देशीय' 'देशबांधव' असा आहे, तरी अर्थसंदर्भानें 'गुरु' असा अर्थ होण्यास अडचण नाहीं. कारण 'दिश्' धातूपासून 'देशिक', 'देशी', 'देष्टा', 'उप-देष्टा' अशीं रूपें होऊं शकतील.

१ नादयुक्त. २. जिव्हारूप रंगभूमीवर. ३. दृष्टीच्या लीलेनें जिंकलेली अशी जी कमला ह्मणजे लक्ष्मी तिच्या हातांत. ४. सुगंध अर्थात् माधुर्य. ५. रंध्ररहितता, पक्षीं ऐकमत्य. ६. मधुप ह्मणजे भ्रमर, पक्षीं मद्यपान करणारे दुष्ट जन. ७. दान हेंच कोणी अमृताचें शिंपडणें.

आर्या.

करिती वास यदंगीं अति विस्मयकर असे समस्त गुण
जो चंद्रापरि देउनि सुख, भूचें सर्वही हरीत शिण.

अशा त्या सकलजगदाधारभूत राजशिरोमणीचाच प्रस्तुत कवि हा आश्रित आहे.

**नटी**—प्राणनाथ, तें मी समजलें, पण मला एक सांगा, ही सकलकलानिपुण अशी पंडितमंडळी येथें जमली आहे तर हिचें मनोरंजन आपणाकडून कसें होईल ?

**सू०**—आर्ये, याविषयीं शंका करणें नलगे. मोठ्यांची गोष्टच कांहीं निराळी. जे मोठे आहेत ते दुसऱ्याच्या गुणपरिमाणुस पर्वताचें महत्व देतात. सामान्य जनांची गोष्ट याहून भिन्न आहे.पहा.

आर्या.

मेघजलाची धारा पडतां धन्व्यावरी घडे विफल;
तीच समुद्रीं पडतां उपजवि मुक्तामणी अती विमल.

**नटी**—(आनंदयुक्त स्वरें) वाहवा वाहवा! प्राणनाथ, इतकी सामग्री तयार असतां मग उगीच या सभाजनांच्या सेवेस उशीर कशाकरितां होत आहे!

**सू०**—उशीर कशाचा ? हा पहा सर्व प्रकारच्या कुसमसंपत्तीनें भरलेला असा वसंतऋतु प्राप्त झाला आहे तर यासच उद्देशून गायनास आरंभ कर. कारण

पद.

पहा सखि संप्रति आला वसंत (ध्रु०)
कलकल करिती कीर[1] मुखांतुनि; पिकेंही[3] पंचम सुस्वर काढुनि, संतत गाति पसंत. १
चंदनगिरिकंदरीं स्पंदती मंद अनिल[5] हे प्रतिध्वनि प्रति काढिति, नाहिं उसंत. २
...अनिलाच्या घर्षणयोगें वृक्ष पहा जणुं पुष्पित झाले, चित्ता देति आनंद. ३
...गांचें ही भाग्य उदेलें; तरुण जनांचे वृद्धि पावले मानें मनोरथ संतें. ४

**नटी०**—फार उत्तम आहे.

(असें म्हणून गायन करिते.)

आर्या.

मदन विभु कुसुमाकर सचिवापरि भार सर्व टाकुनी,
लोकत्रयविजयक्षम रतिपर विजयासि पावतो भुवनीं.

**सूत्रधार**—(आनंदानें) वाहवा वाहवा! प्राणसखे, त्वां फारच सुंदर गायन केलें! कारण, **मदना**च्या सर्व कर्तव्याचा भार त्याचा मंत्री जो **वसंतकाल** त्यानें आपल्या अंगावर घेतल्यामुळें **मदना**चा इतर सर्व प्रकारचा त्रास चुकल्यासारखा होऊन त्यास निरंतर रतितत्पर राहण्यास ठीक पडतें, या उक्तीच्या योगेंकरून तूं आपलें कर्तव्य दुहेरी रीतीनें सूचित केलेंस. वाहवा! वाहवा! तर आतां सर्व तयारी करून आपल्या सर्व शैलूषमंडळींत यथास्थित पात्रयोजना कर. मी आणि **मारिष** असे उभयतां **मदन** आणि त्याचा मस्कऱ्या स्नेही यांचे वेश घेतों. तूंही **रतीचा** वेश धारण कर

—जशी आपली आज्ञा.

(निघून जाते.)

०—हा पहा मी **मन्मथ** झालों.

-(प्रवेश करून) हा मीही **विदूषक** झालों.

(ही प्रस्तावना झाली.)

**थ**—(मागें जाऊन **विदूषका** सहवर्तमान ...ासनावर बसतो आणि उत्कंठायुक्त होऊन ...पणाशीं.) काय चमत्कार आहे पहा!

---

१. कठीण जागेवर. २. राघू. ३ कोकिळा. ४. ...तात. ५. वारे.

...पुष्पित' या शब्दांत श्लेष आहे.त्याचा 'फुललेला' हा अर्थ प्रसिद्धच आहे. ...र्थ घर्षणाच्या योगानें पुष्पित होणें म्हणजे काय, ... वाचकांस सहज समजेल. २. स्थिर. ३. ... वेश घेणारे सांगाडे.

श्लोक.

राजाध्वांन करीत काल असतां संचार कौतूहलें
त्या सौधस्थित सुंदरीस नयनीं म्यां आपुल्या पाहिलें,
तैं वाटे चैंपलाच कीं अचपला हे होउनी बैसली,
तारा सुंदर होउनीच अथवा व्योमीं स्थिरा राहिली
तारुण्यांकुर नत्तनूंतुनि जणों बाहेर यों लागले,
तेणें कांति चढूनि हेमलतिका ही कायसें वाटलें.
तीचे नेत्र सुलोल– ती चहुंकडे फेंकी कटाक्षांप्रती
त्यांतें पाहुनि वाटलें पसरलीं अब्जें असंख्यात तीं.
(कामपीडा झालीसें दाखवितो.)

**विदूषक**–वाहवारे मित्रा ! अगदीं ध्यानांतच गढून गेला आहेस, जणुं काय या वेळीं तूं परमार्थसुखाचाच अनुभव घेत आहेस!!

**मन्मथ**–(तें न ऐकल्यासारखें करून पूर्वोक्त श्लोक द्वय पुनः ह्मणतो.)

**विदू०**–(आपणाशीं) एकून मी ही बहिऱ्याच्य कानाशींच ओरड केली ह्मणावयाची (मोठ्यानें मन्मथास हातानें हालवून) मित्रा, माझें बोलणं अरण्यांत पडलेल्य चांदण्याप्रमाणेंच व्यर्थ काय ?

**मन्मथ**–(तें ऐकून) मित्रा, तुझें काय ह्मणणं आहे ?

**विदू०**–दुसरें कांहीं नाहीं. एवढेंच सांग. असा चिंतायुक्त होऊन कां बसलास ?

**मन्मथ**–मित्रा **सांख्यायना**, तुला सांगूं नये अशी कोणची गोष्ट आहे! (राजाध्वांन इ० पूर्वोक्त श्लोकद्वय पुनः ह्मणतो.)

**विदू०**–(आपणाशीं) याच्या ह्मणण्याप्रमाणे जर मी चाललों तर हा मला असाच त्रा देईल. तर येथें असें उपयोगीं नाहीं. युक्ति लढविली पाहिजे. (मोठ्यानें त्याचा धिक्कार केल्यासारख्या शब्दानें) मित्रा ! तूं ह्मणतो ही गोष्ट तर अगदींच खोटी! कारण बोलू चालून तूंच सकल विश्वास मोह घालणारा, तर तुलारे मोह घालणारी अशी स्त्री जगांत कोठली ?

**मन्मथ**–मित्रा, असं नको ह्मणूं!

श्लोक.

धैर्यांच्या ही मनांत भ्रम उपजवुनी, नेम त्यांचेहि सारे
देी फेंकून ऐशा असति बहु जरी कामिनी या जगींरे,
त्यांची तों भिन्न गोष्टी; परि मज नकळे निर्मिता कोण हीचा
केला या **मन्मथा**च्या मनिं उदयजिनें अन्यही मन्मथाचा

**विदूषक**–मित्रा, जो कामुक असतो कीं नाहीं, तो त्याला जी स्त्री आवडली तीस नेहमीं अप्सराच समजत असतो. त्यांतलीच ही तुझी गोष्ट ! तींत कांहीं अर्थ नाहीं.

**मन्मथ**–मित्रा, एकून मीं तुला खोटें सांगितलें असें तूं समजतोस ॐ!

**विदू०**–छे रे बा ! असें ह्मणेल कोण ! तूं मोठाच सत्यवादी ! अरे, ती स्त्री गच्चीवरून नगर-शोभा पहात वसली होती तेव्हां तिनें तुजकडेच कशावरून पाहिलें? तूं व-ळेंच आपल्या आंगावर काय ह्मणून ओढून घेतोस?

**मन्मथ**–मूर्खा! तूं मला अगदीं गांवढळच समजत असशील नाहीं बरें? सांगतों ऐक.

श्लोक.

अन्यत्र दृष्टी तईंच मजकडे प्रेमदृष्टी तियेची;
संकोचलीला त्वरित तिजकडे पाहतां मी दृशेची;
मी जैं तियेच्या जवळि तईं सख्याआड होऊनि राहे;
मी दूर, चंद्रापरि ललितमुखा दावि सौधावरी हे.

**विदू०**–अरे तिचें तुला नांव ठाऊक नाहीं, कुळ ठाऊक नाहीं, शील ठाऊक नाहीं. तसेंच तिचा विवाह झाला आहे किंवा नाहीं याच्याबद्दलही कांहीं माहिती नाहीं. असतां तिनें नुसतं तुजकडे पाहिलें इतक्यावरचका तुझ्या या सर्व उड्या?

१. राजमार्गांत २. गच्चीवर बसलेल्या ३. वीज ४. स्थिर. ५. नक्षत्र. ६. सुवर्णाची वेल.

म.ग्रा. २८१९

त्याच येथें रहाण्याचा विचार
व.वगी कोणती गोष्ट केली ?
तर, हिंमतराव मी येथें रा-
असबाईकरितांच !
ना ?
अजूनही तुह्मांस माझें ह्मणणें
हीं ! ईश्वरसाक्ष, मी सांगतों
खोटें नाहीं. मी येथें रा-
करितांच, व कुतऱ्यापेक्षांही
ऊन या अधम दौलतरावा-
करीत आहें तो एवढ्या-
श्वर केव्हां सुदिन दाखवील
ला तर आमच्या हतभाग्य
संपून विचारे आमचे
देशाचे स्वामी केव्हां हो-
वस चिंता लागली आहे !
! परंतु करावें काय ?
दौलतरावाच्या नरडीचा
केव्हां येईल ह्मणून
आहें.
अजून नाहीं
नका करूं !
ाली ! अहो,
दि वाहिली !
त्या. परंतु
इतकी चोरी
उघडपणें का
! त्यास धडधडीत
हेस, व मी तुला
हो, माझ्या एक-

ट्याच्यानें, या प्रबळ दौलतरावाविरुद्ध वर्तन करून-कसें बरें चालेल ? उगीच मी आपल्या प्राणांस मात्र मुकेन आणि आपल्या यशवंतरावे महाराजांस किंवा राजसबाई मातोश्रींस त्यापासून कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं तो नाहींच !

**हिं०–मालोजी** ! तुमचें ह्मणणें एवढा वेळ मीं खरें मानिलें नाहीं याची माफी करा. आतां बरीक तुह्मी प्रामाणिक आहां असें मला वाटूं लागलें आहे, व तुमच्या मुखचर्येवरूनच तुह्मी अनृत भाषण करीत नाहीं अशी माझी खातरी होत आहे. तें असो. बोललों याचा राग मानूं नका. इतःपर तुमच्या मसलतीविरुद्ध मी कदापि जाणार नाहीं. मालोजी; खरेंच सांगा, आपण असे स्वस्थ बसून राहिलों आहां हें चांगलें का ? कांहीं उद्योग तर केला पाहिजे कीं नाहीं ? तुह्मींच मला सांगा, आपल्या हातून कांहींच होण्याजोगें नाहीं काय? प्राणांवर येऊन बेतला तरी चिंता नाहीं, पण आपणास साहस केल्यावांचून यश कसें बरें मिळेल ? अहो. हा दुष्ट दौलतराव विचाऱ्या प्रजेवर प्रतिदिवशीं कोटिशः जुलूम करित आहे हें तुह्मींच ना पाहतां? अहो, आजच सकाळीं पहा ते विचारे पांच सहा निरपराधी गृहस्थ त्याच्या तडाक्यांत सांपडले, व त्यांवर आमच्या जुन्या महाराजांस ठार मारल्याचा खोटाच आरोप आणून ह्या दुष्टानें त्यांचे अंगावर शहारा येण्यासारखे हाल करून सरतेशेवटीं विचाऱ्यांस यमसदनास पाठविलें ! हाय ! हाय ! गे माझे देशजननी ! हायहाय! काय ही तुझी अनिवार दुःखावस्था! धिक्कार असो आह्मांस ! असले षंढ पुत्र आह्मी तुझ्या उदरांत उपजावे काय ?

**प्रवेश १.–राजव**
( मालोजी आणि
**मालोजी**–काय ह्मण
ष्य मी कोठें आ
**हुजऱ्या**–होय महार
गांठ घ्यावयाची
**मा०**–त्यानें आपलं
असें कांहीं सांगि
**हु०**–तें कांहीं तो
स्नेहीच आहे, इत
**मा०**–तूं त्याला कोठें स
**हु०**–त्या तिथें. ( बोट
नुकती संध्याकाळ
वेळीं समुद्राच्या का
घरांत तो मला दिसल
**मा०**–याचा काय बरें अर्थ
त्या गृहस्थास मजकडे घेऊन ये
जातो.) हा कोण असावा बरें ?
कोणी चांगला संभावित गृहस्थ
त्या स्थितींत असून हल्लीं वाईट
ह्मणून घरादाराचा त्याग करून
च्या कोंकणांत रहावयास तर आला
( हिंमतराव आंत येतो त्यास पाहून
काय ? हिंमतराव ? आणि या
ओहोहो ! हिंमतराव ! या,
( त्याचा हात धरावयास जातो.
**हिंमतराव**–खबरदार माझ्या
कराल तर ! धिक्कार असो तु
तुमच्या बेअब्रू पर करून मि

(डोळ्यांतून अश्रु ढाळितो. व कांहीं वेळ स्तब्ध राहून मोठा उसासा टाकितो.) असो ! परमेश्वराची इच्छा ! बरें, मालोजीराव, आमच्या राजसबाईचें हल्लीं कसें काय आहे? अरेरे ! विचारांचें स्मरण झालें कीं, काळीज फुटून जातें !

**मा०**—हिंमतराव, *काय सांगूं ? आमच्या मा*तोश्रीसाहेब जिवंत आहेत इतकेंच काय तें; परंतु त्यांचे जे हाल होत आहेत व त्यांस ज्या अपेष्टा काढाव्या लागत आहेत त्यांचें वर्णनही करितां येणें कठीण. जो राजवाडा पूर्वींचे आमचे महाराज गादीवर असतांना केवळ प्रतिकैलासच वाटत असे, त्या ठिकाणीं राजसबाईस एकटी रहावयाची पाळी आली आहे ! हाय ! हाय ! आज सतत सात वर्षे तिनें कशीं कष्टांत काढिलीं असतील तीं तिचीं तिलाच ठाऊक! राजवाड्यांत तर नेहमीं या दुष्टाचें भय आहेच; एकुलता एक पुत्र तोही कोठें विदेशी झाला आहे त्याचा पत्ता नाहीं; तिची प्रिय प्रजा—तिचे हाल कुत्राही खाणार नाहीं. अशी तिची चोहोंकडून अतिशय दुःखद स्थिति झाली आहे. तिच्या प्राणप्रिय पतीचा अंत करणारा हा दुष्ट दौलतराव यानें काटक लोकांवर स्वारी केली होती, तींत त्याचा जय झाला; तेव्हांपासून तर, तिनें आपणास वश व्हावें म्हणून, त्यानें तिची एकसारखी पाठ पुरविली आहे. तूं माझी पट्टराणी होशील तर मी तुझ्या पुत्रास माझ्या मागून गादीचा मालक करीन, अशा अनेक प्रकारच्या गोष्टी सांगून तो तिला वश करूं पहात आहे; परंतु ती पतिव्रता माउली या दुष्टाच्या वाग्जाळांत अद्यापि सांपडली नाहीं; व दौलतराव आपल्या यशवंतरावांचा इतका द्वेष करितो याचें तरी बीज हेंच. नु, तेंच वाटतें आठ दिवस झाले, दौलतरावास आमचे बाळमहाराज अमुक ठिकाणीं आहेत म्हणून कांहींसा सुगावा मात्र लागला, त्याबरोबर त्यानें त्यास मारण्याकरितां दोन मारेकरी पाठविले. ते कदाचित् एव्हांना तेथें पोंचून त्यांनीं आपलें दुष्ट कृत्य पारही पाडिलें असेल !

**हिं०**—मालोजी, धिक्कार असो तुम्हांला ! तुम्हीं आपणास मोठे प्रामाणिक म्हणवितां ते असेंच काय ? अहो, धडधडीत या दुष्टानें आमच्या बाळमहाराजांस मारावयाकरितां मारेकरी पाठविले हें तुम्हांस माहित असतां तुमच्यानें ही गोष्ट मुकाट्यानें पाहवली कशी? तुमच्या हातून कांहीं नाहीं काम होत तर आणा तुमची तरवार इकडे! द्या माझ्या हातांत! आणि ज्या ठिकाणीं तो दुष्ट असेल त्या ठिकाणीं चला मला घेऊन ! म्हणजे पहा त्या दुष्टाला कसा हात दाखवितों— त्याचे शिपाई प्यादे त्याजसभोंवती असले तरी त्याची—

**मा०**—हिंमतराव, अंमळ शांत व्हा, व जरासे हळू बोला. तुम्हीं एवढ्यानें बोलत राहिलां तर वाड्यांत एकदम गोंधळ होऊन त्यापासून इतर कांहीं नफा तर होणार नाहींच, परंतु तुम्हांवर व मजवर मात्र गच्छंतीची पाळी येईल ! यापलीकडे कांहीं गोष्ट होणें नाहीं ! याकरितां तुम्हीं आतां असें करा. आपल्या कैलासवासी महाराजांच्या पक्षाचे जेवढे म्हणून लोक तुम्हांस ठाऊक असतील त्यांच्या घरीं जा. सर्वांची एकवेळ भेट घ्या. नंतर सर्वांचा विचार पडेल त्याप्रमाणें आपण काय गोष्टी करणें त्या करूं.

**हिं०**—ठीक आहे. मी जातों. पण **मालोजी-राव**, या कृतघ्न **दौलतरावाच्या** हातून आपल्या महाराजांचा अंत झाला ही गोष्ट विसरूं नका! ज्या महाराजांच्या मरणाची वार्ता ऐकून सर्व प्रजा खळखळां रडली, ते महाराज राजवाड्यांतील देवघरांत या दुष्टानें निजविले ही गोष्ट पक्की लक्षांत ठेवून याचा पूर्णपणें सूड उगवावयाचाच, या गोष्टीचें मात्र विस्मरण होऊं देऊं नका.

**मा०**—तुह्मीं मजविषयीं यत्किंचितही शंका मनांत नका आणूं! तर आतां जलदी करून आपल्या सर्व स्नेह्यांस भेटा. या शहरच्या पश्चिमवेशीजवळ **मानाजीराव फांकडे** राहतात त्यांजकडे जा. ह्या **मानाजीरावांनीं** आपल्या पक्षास मिळावें ह्मणून **दौलतरावानें** होते तितके प्रयत्न केले; परंतु ते सर्व व्यर्थ! असो. आमच्या **यशवंतराव** महाराजांची हकीकत नेहमी अगोदर त्यांस कळते. यासाठीं ते सुरक्षित आहेत किंवा कसे—देव करो आणि आमचे बाळमहाराज चिरायु होवोत—हें तुह्मांस **मानाजीरावांकडून** कदाचित् कळेल. तें कळलें ह्मणजे त्याप्रमाणें विचार करावयास ठीक पडेल.

**हिं०**—ठीक आहे.—मी जातों तर. कोठें पश्चिमवेशाजवळ तुह्मीं ह्मटलें नव्हे?

**मा०**—होय तेथच! **सिद्धेश्वराचे** देवळापुढें आंत बोळ जातो त्या रस्त्यानें नीट जा ह्मणजे तुह्मीं लवकर जाऊन पोंचाल. (डंका ऐकूं येतो.) हूं: करा जलदी! याउपर येथें राहिलले जर कोणाच्या दृष्टीस पडलां तर न जाणो प्राणांवरही बेतेल.

(डंका मोठ्यानें ऐकूं येतो.)

हूं: चला निसटा आतां! **दौलतराव** शिकारीहून परत आला.

**हिं०**—कुलक्षय होवो त्या दुष्टाचा! बरें असो. मी जातों. **मालोजीराव! राजसबाई, यशवंतराव**, व ही तुमची हतभाग्य देशमाता यांना कोणतीं दुःखें सोसावीं लागत आहेत त्यांचें विस्मरण नका बरें पडूं देऊं! (निघून जातो.)

**मा०**—विस्मरण! यांचें जर मला विस्मरण होईल तर या पापाबद्दल नरककुंडापेक्षांही अघोर शासनच मला योग्य होईल! असो. या तिहींवर माझी अत्यंत प्रीति आहे! परंतु काय करूं? सध्या हात चालत नाहीं तोंपर्यंत **दौलतरावाशीं** वरपांगीं प्रेमभावानें वागणें सोडितां येत नाहीं! **हरहर!** (निघून जातो.)

## प्रवेश २.

**स्थलः—राजवाड्यांतील एक महाल.**

(**दौलतराव** आणि वाड्यांतील रखवालदार येतात.)

**दौलत०**—(आपणाशीं) आज रानांतील शिकार तर फार उत्कृष्ट साधली यांत संशय नाहीं. परंतु, अशीच राजवाड्यांतही जर सांपडेल तर उपयोग आहे! नाहीं तर सर्व व्यर्थ! (रखवालदारास) अरे, **मालोजी** कोठें आहे? त्यास यावयास इतका वेळसा लागला!

(इतक्यांत **मालोजी** येतो.)

**मालो०**—महाराज, हा आपल्या चरणांचा दास आपल्या सेवेंत हजर आहे.

**दौल०—मालोजी**, ते सकाळचे पांच जण हरामखोर सुळावर चढले एकदाचे?

**मालो०**—होय, महाराज.

**दौल०—मालोजी**, त्यांच्या नाकास मिरच्यांची

धुरी द्यावयास सांगितली होती, तसेंच पाठी-वर कोरड्यांचा मार देऊन पाठीचें चांगलें रक्त निघाल्यावर चार घटिकापर्यंत हात पाय बांधून त्यांस मिठांत पुरून ठेवावयास सांगितलें होतें, त्याप्रमाणें सर्व गोष्टी झाल्या?

**मा०**—झाल्या, महाराज!

**दौ०**—बरें, पण त्यांपासून कांहीं उपयोग?

**मा०**—तेवढें मात्र विचारूं नका! त्यांच्या सारखे कठिणहृदयी लोक आपण यापूर्वी कधीं पाहिले नाहींत! आह्मीं त्यांचा इतका छळ केला, पण त्यांनीं शेवटपर्यंत आपलें ह्मणणें कांहीं सोडिलें नाहीं. सरते शेवटीं त्यांना सुळावर चढवावयाचें, तेव्हां आतां तरी आपला गुन्हा कबूल करा ह्मणजे महाराज तुह्मांस देहांत शिक्षा करणार नाहींत ह्मणून अभिवचनही दिलें, परंतु सर्व पालथ्या भांड्यावर पाणी! त्यांनीं ह्मणून गोष्ट कबूल केली नाहीं! हा प्रकार पहावयास लोकांची पण खूप गरदी जमली होती, व ते सर्व लोक ह्यांची स्थिति पाहून खळखळां रडले!

**दौल०**—आः! दुष्टांनो! प्रत्यक्ष माझ्या प्रिय मित्राचा ज्यांनीं निर्दयपणें वध केला, त्यांच्याकरितां तुह्मी रडलां काय? आग लागो तुमच्या रडण्यास! तें असो. पण **मालोजी!** तुह्मीं आज उदाससे दिसतां? अहो, मीं **काटक** लोकांला जिंकिलें त्याजबद्दल १५ दिवसपर्यंत दिवाळीसारखा चोंहीकडे सण करावयाचा असा माझा सर्वांस हुकूम झाला असून राजवाड्यांत चोंहीकडे आनंदीं आनंद भरून राहिला आहे, असें असतां तुह्मींच मात्र उदास दिसतां ह्याचें काय कारण?

**मा०**—तसा कांहीं प्रकार नाहीं. महाराज, कालच्या जागरणानें पित्तक्षोभ होऊन आज माझें किंचित् कपाळ दुखतें आहे. ह्मणून आपणास तसें वाटतें! वस्तुतः आपला निरंतर सर्वत्र जय व्हावा यांतच मला आनंद आहे, तो मुद्रेवरून किंवा तोंडानें बोलूनच दाखवायला पाहिजे असें नाहीं. महाराज! मी उदास दिसतों याची माफी असावी.

**दौ०**—तें असो. **मालोजीराव**, मी हल्लीं जो या **कोंकण** प्रांतांत राज्य करीत आहें तो, फक्त या देशाचे पूर्वींचे आपले महाराज कैलासवासी झाले, त्यामुळें विनाकारण बेबंदपाच्छाई न व्हावी एतदर्थच करीत आहें हें तुह्मास ठाऊक आहेच! वस्तुतः मला या राज्याची बिलकुल जरूर नसून जरी **यशवंतराव** आज येऊन राज्य करूं ह्मणेल तरी तें त्याच्या स्वाधीन करावयास मी राजी आहें. असें असतां **यशवंतराव** माझा इतका द्वेष करीत आहे हें आश्चर्य नव्हे काय? प्रत्यक्ष त्याच्या धुळीस मिळत असलेल्या राज्याचें त्याच्यासाठींच मी रक्षण करीत असतां, तो खुशाल बाहेरदेशीं राहून उलट मजशीं युद्धाच्या तयारीस लागला आहे हें कसें?

(इतक्यांत बहादरशिंग आंत येतो.)

**दौ०**—(त्यास पाहून) कां बहादरशिंग! काय खबर!

**बहा०**—(मिशीस पीळ भरून) महाराज! खबर काय विचारावी? आपणास आनंदीं आनंद होईल, व तसा इतर सर्वांसही होईल अशी कांहीं खबर मला आतांच कळली आहे.

**दौ०**—(घाईनें) ती काय बरें? लवकर लवकर सांगा पाहूं!

**बहा०**—महाराज! **यशवंतराव** मेला!

**मा०**—काय! **यशवंतराव** मेला!

# शिलादित्य.

## प्रकरण १ लें.

शके ७०१ सालीं चोल देशांत पुनमल्ली नामक शहरांत एके दिवशीं सकाळीं दोन जैन जती सुळावर चढवावयाचे ह्मणून बातमी पसरली होती. त्यापूर्वी सुमारें दोन महिने तेथील न्यायसभेपुढें त्यांची चौकशी सुरू असून त्यांवर हिंदुधर्मी लोकांस जैनधर्मांत आणावयाचा यत्न केल्याचा आरोप शाबीत झाल्यावरून त्या सभेकडून त्यांस ही शिक्षा देण्यांत आली होती. याबद्दलची बातमी शहरांत आदले दिवसापासूनच पसरली असल्यामुळें वधस्थानीं लोकांची एकच गर्दी झाली होती. हें वधस्थान शहराच्या दक्षिणद्वारानजीक होतें, व त्या ठिकाणीं एक मोठा प्रचंड शूळ रोविला असून त्यावर सर्वत्र शेंदूर सारिवला होता. तसेंच सुळावर आरक्त पुष्पांच्या मालाही पुष्कळ टांगल्या होत्या. त्याच्या आसपास चार प्रचंड राक्षसरूपी शिपाई रक्षणाकरितां नागव्या तरवारी घेऊन उभे होते. त्यापासून कांहीं अंतरावर आणखी कांहीं शिपाई उभे केले असून त्यांचे हातांत भाले, बरच्या, जंबिये वगैरे शस्त्रें होतीं. तसेंच तेथें जवळच सुळावर चढविण्याचें काम करणारे दोन मांग हातांत नागव्या तलवारी घेऊन इकडे तिकडे चैनींत फिरत होते. व जरी तो भयंकर प्रसंग पहाण्याकरितां जमलेल्या प्रेक्षकांच्या मुखांवरून त्यांस या होणाऱ्या गोष्टीबद्दल आतिशय वाईट वाटत असल्याचें स्पष्ट दिसत होतें तरी या दोघा मांगांच्या मनांत त्याबद्दल तिळप्रायही खेद होत नव्हता. एकादा मनुष्य परसांतली भाजी चिरावयाचे कामीं जसा अगदीं बेफिकीर असतो तसे ते असून मधून मधून खुशाल शीळ घालीत होते तसेंच तेथें एक सरकारी अंमलदार उभा होता त्याचें काम त्या सर्व प्रांतांत जैनांचे ह्मणून जेवढे जती असतील तेवढ्यांचा शोध करून त्यांस न्यायसभेपुढें आणून हजर करावें, तसेंच राज्यांतील कोणीही लोक, ते हिंदुधर्मी असोत किंवा जैन धर्मी असोत, जैनांच्या जतींस व उपदेशकांस आपल्या घरीं जर आश्रय देतील, किंवा त्यांस कोणत्याही प्रकारें मदत करितील तर त्यांचाही शोधकरून त्यांस न्यायासनापुढें आणून उभें करावें हें होतें. प्रस्तुत प्रसंगीं या अंमलदाराच्या हातांत एक लांबलचक कागद असून त्यावर कांहीं नांवें लिहिलीं होतीं. त्यां पैकीं कित्येक जैनधर्मी जतींचीं, व कित्येक त्यांस आश्रय देणाऱ्या इतर लोकांचीं होतीं.

वर वर्णिलेला प्रकार होत होता त्यावेळीं सुमारें दोन घटिकांवर सूर्य आला होता. व जरी तितक्या लवकरही सूर्याच्या किरणांपासून नेत्रांस बराच त्रास होत होता तरी सर्व लोकांचें लक्ष एकसारखें त्या सुळाकडे लागलें होतें. इतक्यांत पूर्व दिशेच्या रस्त्याकडून टिमकी पिटत असलेली ऐकूं आली, तीबरोबर सर्वांचे डोळे सुळावरून निघून त्या रस्त्याकडे वळले. सुमारें पांव घटकेच्या अवकाशांत तिकडून पुढें वध्य चिन्हें घातलेले असे नागवे उघडे दोन जती, त्यांबरोबर त्या दोघांच्याही दंडांस वळकट दोऱ्यांनीं बांधून त्यांचीं शेवटें एका हातांत व दुसऱ्या हातांत नागव्या तरवारी घेतलेले असे दोन धिप्पाड व जवान शिपाई, मागाहून कांहीं घोडे

स्वार, त्यांचे पुढें दोनतीन लष्करी अमलदार, व न्यायसभेचे मुख्य **अधिकरणिक**, इतके लोक मोठ्या थाटानें वाजतगाजत, व मध्येंमध्यें वाद्यें वाजविण्याचें थांबलें ह्मणजे टिमकी वाजवून सर्व लोकांस त्यां दोघा जतींस सुळावर चढविण्याचें कारण कळवीत, येतांना दृष्टीस पडले. हे दोन जती वयानें फार तर २२।२३ वर्षांच्या सुमाराचे होते, परंतु इतक्या अल्पवयांतही त्यांस मृत्यूचें बिलकूल भय वाटत नव्हतेंसें दिसत होतें. त्यांस उघड्या पायींच चालविलें होतें, व पुढें मृत्यूच्या तोंडांत लवकरच पडावयाची वेळ आली होती तरी ते अगदीं शांत व गंभीर रीतीनें चालत होते. ज्या दोन शिपायांनीं त्यांच्या दंडास दोऱ्यांनीं आवळून धरिलें होतें ह्मणून वर सांगितलें आहे त्यांस त्या जतींचें असें वर्तन पाहून वरचेवर त्वेष येई व साधेल त्या ठिकाणीं ते त्यांस मागाहून गचांडीही द्यावयास चुकत नसत, व अशा प्रसंगीं मात्र ते जती आकाशाकडे पाहून मोठ्यानें "**अर्हत्**!" "**अर्हत्**!" असे उद्गार काढीत, परंतु त्या उद्गारांवरून त्यांस आपला प्राण जाणार ह्मणून भय वाटत होतें असें बिलकूल दिसत नसून "**अर्हन्**" किंवा "**जिन**" याच्या सद्धर्माचा प्रसार करण्याचे कामीं आपणास ही विपत्ति भोगावी लागत आहे याविषयीं उलटा उत्साहच वाटत होता असे दिसत होतें. असो. अशा रीतीनें हा सर्व मेळा दिसूं लागल्यापासून सुमारें अर्ध घटिकेच्या आंत वधस्थानाजवळ येऊन पोंचला. त्या सुमारास तेथें जे भाले बरच्या वगैरे शस्त्रें घेतलेले शिपाई उभे होते ते जमलेल्या समाजास मागें हटवून जागा पैस करीत होते. जागा पैस होते आहे इतक्यांत दक्षिणद्वारानजीक एक मठ होता तेथून एक तेजःपुंज ब्राह्मण डोकीवर जटा व तोंडावर मोठ्या दाढी मिशा असलेला पुढें आला, आणि तेथें जमलेल्या समाजास त्या जतींस सुळीं चढविण्याचें कारण चांगलें तिखटमीठ लावून सांगून परत आपल्या मटांत शिरला. हा ब्राह्मण त्या शहरांत जी धर्मसभा होती तिचा अध्यक्ष असे, व न्यायसभेपुढें जती वगैरे अपराधी लोकांची जी चौकशी व्हावयाची, ती होण्याचे कामीं प्रमुखपणानें वागत असे. जती लोकांस सुळावर चढवावयाचें काम असलें ह्मणजे त्यास अतोनात स्फुरण येत असे, या कारणामुळें त्याचें खरें नांव जरी **सौम्यदर्शन** असें होतें, तरी त्याच्या कृतीवरून त्याचें सर्व लोकांत "**अंतकाग्रणी**" असेंच नांव प्रसिद्ध होतें. असो. हा **अंतकाग्रणी** आपल्या मठांत निघून गेल्यावर सर्व शिपाई व स्वार त्या सुळाभोंवतीं रांगेनें उभे राहून त्या हतभाग्य जतींच्या दंडाचे बंध सोडून त्यांस मोकळे केलें व आतां सुळावर चढविणार इतक्यांत एक फाटकें कितीक दिवस न धुतलेलें असें रकटें नेसलेली अशी कोणी वृद्ध बाई त्या शिपायांत घुसून त्या दोन जतींच्या पायां पडून नंतर अतिदीनवाण्या मुद्रेनें त्यांचे तोंडाकडे पाहूं लागली. व तिच्या त्या मुद्रेवरून ते जती प्रत्यक्ष **अर्हताचे** अंशच असून ती त्यांस आपले वरदहस्त माझ्या मस्तकावर ठेवा ह्मणून जणो प्रार्थना करित आहे असें वाटत होतें.

"तूं कांहीं काळजी करूं नको! **अर्हत्** सर्व गोष्टी पाहून घेईल. ही गोष्ट पक्की लक्षांत ठेव! जा, तुझें कल्याण होईल!" असें एका जतीनें तीस ह्मटल्यावर ती त्यास नमस्कार करून दुसऱ्या जतीकडे वळली. व तो तिला त्याच प्रकारचा आशीर्वाद देत आहे इतक्यांत एका दांडग्या शिपायानें तिला ढकलून देऊन "**खबरदार दंगा करशील तर!**" असें ह्मटलें, इतक्यां-

त पहिल्यानें जो जती बोलला होता त्यानें " तूं आतां जा. कांहीं काळजी करूं नको. विहारांत जाशील तेव्हां रत्नाकर जती आपल्या धर्मरक्षणाचे कामीं मेला हें प्रत्यहीं ह्मणावयास चुकूं नको!" असें ह्मणून झटदिशीं आपल्या कंबरेला खोंवलेलें एक मोराचें पीस काढून तीस घे ह्मणून ह्मटलें, व ती तें घेणार इतक्यांत तो शिपाई त्याच्या हातांतून तें पीस हिसकावून घेऊन त्यास दरडावून ह्मणतो " मादरचोद! मरावयाची वेळ आली तरी अद्यापि तुझ्या धर्माची वडवड सुटत नाहीं. थांब तुझ्या मोरपिसाचे तुझ्या समक्ष तुकडे करून टाकितों." असें ह्मणून त्यानें तरवारीला हात घातला आणि ती उसपून आतां त्याचे तुकडे करणार इतक्यांत त्या गर्दीतून एक गृहस्थ झटदिशीं पुढें येऊन " खबरदार त्या पिसास हात लावशील तर " असें ह्मणून त्यानें तें त्याच्या हातून हिसकावून घेऊन एकदम त्या बाईच्या हातांत दिलें, व ती त्या गडबडींत कोणास न समजतां कोणीकडच्या कोणीकडे नाहींशी झाली. तो शिपाई ही एकदम दचकून त्या गृहस्थास तेथल्या तेथें शिक्षा करण्याच्या हेतूनें त्याकडे वळला. परंतु त्याचा पोशाख व ऐट हीं पाहून एकदम त्याचा नूर उतरून गेला. मग त्या ठिकाणीं सुळाचे रक्षणार्थ शिपाई होते ते त्याच्या वर हल्ला करावयास वळले, इतक्यांत तेथें जमलेल्या तमासगिरांतून एकदम 'खबरदार! त्यास हात लावाल तर ' अशीच आरोळी झाली, ती झाल्या वरोबर जरी ते हत्यार बंद होते तरी सर्व लोक आपल्यावर तुटून पडतील या भीतीनें ते जागच्याजागीं स्वस्थ राहिले. तेव्हां आतां दंगा करून उपयोग नाहीं असा विचार करून पहिला शिपाई त्या गृहस्थास "एकून तूं जैन आहेस," इतकेंच बोलून मनांतल्या मनांत चुरमुरे खात राहिला.

" तुझा बाप जैन ! गुलामा ! कोणाला रे जैन म्हणतोस ? खबरदार ! यापुढें फिरून तोंड फार सोडशील तर; जर तूं कांहीं दंगा केलास तर तुझ्या नोकरीवर पाणी पाडण्याचें माझ्या हातांत आहे हें तूं खूब ध्यानांत ठेव! हरामखोरा शिपाई झालास ह्मणून दंगा करतोस काय ? " असें तो गृहस्थ ह्मणाला, त्या बरोबर जमलेल्या लोकांनीं " भले शाबास खाशी फजिती उडविली ह्मणून पुनरपि आरोळी केली. तेव्हां ज्या कामदाराच्या हातांत कांहीं नांवें लिहिलेली याद होती ह्मणून वर सांगितलें आहे त्यानें आपल्या जवळच्या एका शिपायास हा उद्धट जवाब करणारा कोण आहे ह्मणून विचारिलें.

चाकर ह्मणतो " हा या गांवांतील एक मोठा सावकार आहे. याचें नांव **वसुभद्राचार्य** हा मूळचा तिकडचा **वसलुरा** कडचा आहे.

" याचा धर्म ? हा जैन आहे ?

" नाहीं. हा चांगला **ब्राह्मण** आहे. "

" हं ? बरें ती थेरडी आली होती ती कोण?"

मला "तिचें पुरतेंसें नांव ठाऊक नाहीं. पण तिला सर्व लोक **अंमा अंमा** ह्मणतात. तिला पांच सहा वर्षें झालीं असतील येथील **अधिकरणिकांनीं** ती लोकांस खोटीं भविष्यें सांगून फसविते व वेडी आहे ह्मणून गांवांबाहेर घालवून दिलें होतें. ती बाहेरच्या विहारांत कधीं कधीं दृष्टीस पडते, आणि तिला घालवून दिल्यादिवसापासून ती आज पर्यंत कधीं कोणादेखत बोलली नाहीं ह्मणतात !

" हूँ:हं: ! ठीक आहे. मी मी तिला बोलावयाला लावीन! ती रहाते कोठें?"

"ती रहाते, होय? राहते ह्मटलें ह्मणजे राउतेश्वराच्या डोंगरांत एक गुहा आहे तींत; ती कधीं कधीं विहारांतही पडली असते तेव्हां येथें येणारे जाणारे लोक कांहीं कांहीं खिशांतून काढून तिला देतात त्यावर ती निर्वाह करिते. पण ती तोंडानें ह्मणून कोणापाशीं कांहीं मागत नाहीं."

"ठीक आहे. त्या गुहेचा झाडा घेतला पाहिजे. काय नेम सांगावा तेथें एकादा जैनाचा जती कशावरून लपून रहात नसेल? मागें तो **लंबशिरीख** जती नव्हताकां असाच गुहेंत दडून बसलेला सांपडला! खाशी गोष्ट! आज संध्याकाळीं त्या गुहेचा झाडा घ्यावयाचा हें पहिलें काम करावयाचें. लक्षांत ठेव."

"जी. हुकूम."

इतकें झाल्यावर तो कामगार फिरून आपल्या हातांतील कागदाकडेच कांहीं वेळ पहात-राहिला, आणि मग आपल्या मनाशींच बोलूं लागला:—"आज रात्रीं मला गस्तीवर जावयाचें आहे तेव्हां जर तो **जरठकर्ण** जती सांपडेल, आणि माझ्या यादींत नांवें लिहिलीं आहेत त्यांपैकीं दोघें, **भद्रमणि** आणि त्याची कन्या, ह्या उभयतांनीं **जैन** लोकांच्या जतीस आपल्या घरीं आश्रय दिला असें सिद्ध करितां येईल, तर मग मला काय कमी आहे? ह्या दोन गोष्टी मला साधल्या मात्र पाहिजेत! साधल्या तर आमच्या राजाची व दिवाण साहेबांची मर्जी संपादावयास वेळ लागायचा नाहीं!"

तो कामगार ह्याप्रमाणें आपल्या मनाशीं बोलत आहे, इतक्यांत दुसरा एक सरकारी कामगार पुढें येऊन त्यानें त्या दोघां जतींस सुळावर चढावयास हुकूम केला, त्याबरोबर एक तर वर चढून जाऊं लागलाच, परंतु दुसरा जती लागलाच वर न चढतां सर्व लोकांकडे तोंड करून मोठ्या स्वरानें त्यांस उद्देशून बोलला:—"सज्जनहो! आह्मीं तर आतां या मृत्युलोकास सोडून चाललोंच, परंतु तुह्मांस कळवावयाचें तें इतकेंच कीं आज जो माझा अंत होत आहे तो माझ्या स्वतःच्या पापाचरणामुळें नाहीं, तर ज्या सत्प्रभु **बोधिसत्वा**च्या पवित्र धर्माचा मी अनुयायी आहें त्याच्या धर्मसंरक्षणाच्या कामींच हा दंड मला होत आहे. यासाठीं मज पाप्याच्या हातून **अर्हताची** सेवा बरोबर होत नव्हती ती या निमित्तानें तरी घडते आहे हाच मी संतोष मानितों." इतकें बोलून तो स्थिरपणें सुळावर चढून जवळच्या मांगास "हूं लवकर आटप. आतां आपल्या कामास उशीर लावूं नको." असें ह्मणाला; त्यावेळीं प्रेक्षकजन आश्चर्यानें अगदीं स्तब्ध होऊन तोंडांत बोटें घालून चित्रासारखे तटस्थ राहिले. इतक्यांत त्या मांगांनीं आपलें भयंकर काम पार पाडिलें.

याप्रमाणें हें सुळीं देण्याचें काम आटपल्यानंतर प्रेक्षक लोक हळूहळू तेथून निघून जाऊं लागले, व जातांना निरनिराळे लोक नुकताच जो प्रकार पाहिला त्याबद्दल आपआपलीं निरनिराळीं मतें देऊं लागले. बहुतेक लोकांचें मत **हिंदु**धर्मी लोकांकडून **जैन** लोकांचा हा विनाकारण अत्यंत छळ होत आहे असें पडलें. परंतु असें मत उघडपणें देण्याची छाती कोणाचीही नव्हती, ह्मणून बहुशः जे ते याबद्दल फार खबरदारीनें आणि हळू बोलत. तथापि या लोकांत ही कित्येक लोक मात्र मर्यादा सोडून अद्वातद्वा मोठ्यानें बडबडत सुटले. असें बोलणारे बहुशः **जैन**धर्मी लोक होते. त्या प्रेक्षकांत कित्येक **हिंदु** व इतरधर्माचेही लोक होते.त्यांस हा झालेला प्रकार पाहून वाईट वा-

टलें तरी ते त्याबद्दल **हिंदु**धर्मी लोकांचा या कामीं कांहीं दोष नाहीं असें ह्मणत, कारण कीं **हिंदु**धर्मी लोक **जैन**धर्मी लोकांचा छळ करूं लागले त्याच्या अगोदर **जैन**धर्मी लोकांनीं **हिंदु**धर्मी लोकांचा कांहीं कमी छळ केला नव्हता. त्या देशांत साधारणतः पहातां एकंदरींत **हिंदुधर्मी** लोकांचें प्राबल्य विशेष असून सर्व लोक **जैन** लोकांचा बहुशः द्वेषच करीत असत. परंतु **पुनमल्ली** शहरचा प्रकार कांहीं निराळा होता. त्या ठिकाणीं पुष्कळ **जैन** लोक रहात असून त्यांतील बहुतेक चांगले संपत्तिमान होते. त्यामुळें जरी **जैन**लोक **हिंदु**लोकांवर कधीं चालून येत नसत किंवा कोणच्याही प्रकारचा दंगा करित नसत, तरी हे कोणे वेळीं काय करितील याचा तेथील **हिंदु** अंमलदारांस भरंवसा वाटत नसे; व यामुळें जरी [illegible]दुलोक **जैनांस** देववेल तितका त्रास देण्यास चुकत नव्हते, तरी ते या श्रीमंत **जैन** [illegible]च्या सहसा वाटेस जात नसत. त्यावेळीं [illegible]व्यवस्थेच्या कामीं कामदार लोक ह्मटले [illegible]जे सर्व **हिंदुच** असत, तथापि एकादे वेळीं [illegible]ं कर्ज मागावयाची पाळी आली असतां [illegible]ा श्रीमंत **जैन**धर्मी लोकांकडून मिळत-[illegible], यामुळें राज्यकारभारांत फारसा त्यांचा [illegible]शिरकत नव्हता तरी एकाद्या मनुष्यास चा[illegible]वर ठेवावयाचें किंवा काढून टाकावयाचें [illegible]ले तर अशा कामीं त्यांचें आंतून वजन [illegible]त नसे असें नाहीं; व वर वर्णिलेला शू[illegible]रणाचा प्रसंग व्हावयाचे अगोदर रख[illegible]र शिपायांस जें **वसुभद्राचार्यानें** दरडाविलें [illegible]चें मूळ बीज हेंच होतें. असो. एकंद[illegible]ा शहरांत व आसपास कांहीं कोशपर्यंत, [illegible]णें नाहीं, तरी एकंदरीत **जैनांचेंच** प्राव[illegible]प होते व जरी [illegible]

प्रसंगीं **अधिकरणिक** व इतर सरकारी अंमलदारही तेथें असत, तरी ते कर्जाच्या वगैरे संबंधानें या श्रीमंत **जैन** लोकांचे बरेच मिंधे असत त्यासाठीं त्या लोकांनीं अशाप्रसंगीं कांहीं कमी जास्ती प्रकार केला तरी त्यावेळीं मुकाट्यानें त्यांस हवें तसें करूं देत असत, व मागाहून मात्र संधि सांपडली ह्मणजे यथेच्छ सूड घेण्यास चुकत नसत. हा श्रीमंत **जैनांचा** प्रकार झाला. आतां गरीब **जैनांसंबंधानें** विचार करितां त्यांस सरकारी अंमलदारांकडून बराच त्रास पोंचत असे. तथापि त्या लोकांचे जती हे त्यांस विहारांत किंवा इतर ठिकाणीं **हिंदुधर्माविरुद्ध** उपदेश करीत, त्यामुळें एकादे वेळीं **जैन** लोक अगदीं बेताल होऊन जात, तसेंच ह्या जतींचे उपदेश ऐकून एकादे वेळीं **हिंदु**धर्मी लोकही आपला पुरातन धर्म सोडून **नूतन** धर्माचा स्वीकार करीत, यामुळें [illegible] **जैनांपेक्षां** या जतींचाच सरकारी अंमलदारांकडून फार द्वेष होत असे. हा द्वेष अलीकडे ह्मणजे इतका माजला होता कीं कोणीही मनुष्य, तो **जैन** असो किंवा **हिंदु** असो, त्यानें जर एकाद्या जतीस आपल्या घरांत आश्रय दिला किंवा त्यास खाऊं पिऊं घातलें, किंवा इतर कोणत्याही प्रकारें त्यास मदत केली, तर त्यास सरकारांतून जबरदस्त दंड करण्यांत येत असत. तसेंच जती कोठेंही सांपडो, त्याच्यावर धर्माच्या नांवानें कांहीं तरी खरें खोटें बालंट आणून त्यास सुळाचीच शिक्षा देण्यांत येई. एकंदरींत कांहीं कांहीं श्रीमंत **जैन** लोक खेरीजकरून बाकी सर्व **जैन** लोकांस, व त्यांच्या जतींस आश्रय दिलासतां **हिंदु** लोकांस, या वेळीं अतिशयच त्रास होत असे, व त्यामुळें [illegible]

**हिंदूंचा** चांगला सूड घ्यावा एतद्विषयींही विचार करावयास चुकत नसत. तसेंच त्या वेळीं **दक्षिण हिंदुस्थाना**पेक्षां **उत्तर हिंदुस्थानांत** **जैनांचें** प्राबल्य विशेष असे, व तेथून वेळोवेळीं नवीन नवीन उपदेशक येत असत, व त्यांचा प्रत्येकाचा नवीन दम असल्याकारणानें त्यांजपासून **हिंदुधर्मी** सरकारास फार भीति वाटत असे, व यासाठीं या उपदेशकांचा तर सरकारांतून फारच छळ होत असे. प्रस्तुत आमच्या कथेच्या भागांत ज्या जतींस सुळावर चढविल्याचें आह्मीं सांगितलें ते असेच नुकते **गुर्जर** देशाहून उपदेश करण्याकरितां आले होते.

असो. वर लिहिलेला शूळारोपणाचा प्रकार आटपल्यावर लोकांची गर्दी हळूहळू मोडत चालली हें वर सांगितलेंच आहे. हा प्रसंग पहाण्याकरितां केवळ **पुनमल्ली**येथीलच लोक आले होते असें नाहीं, तर इतर आसपासच्या गांवचेही पुष्कळ लोक आले होते. त्यापैकीं कांहीं लोक **पुनमल्ली**पासून दोन अडीच कोशांवर एक गांव होतें तिकडे परत चालले होते. या गांवीं जातांना वाटेंत एक ओढा लागत असे. तो ओढा बहुतेक जरी फार खोल नव्हता तरी कांहीं कांहीं ठिकाणीं बराच खोल असून एका पुरुषापेक्षां ही अधिक खोल अशीं त्यांत डबकीं होतीं. या ठिकाणीं ओढ्याच्या एका अंगच्या दरडीवर वर सांगितलेली **अंमा** त्या जतीनें दिलेल्या मोराच्या पिसाकडे एकसारखी न्याहाळून पहात बसली होती. तीस पाहून तिच्या सभोंवती एकदम पुष्कळ लोक जमले. तथापि त्यांकडे बिलकुल लक्ष न देतां तिचें एकसारखें त्या मोराच्या पिसाचेंच ध्यान चाललें होतें.

... नूं कोणी कांहीं, असें तीस

परंतु दुसरा जती लागलाच वर न चढतां सर्व

हीं. आपल्या प्रश्नांची तिनें अशी हेळसांड केलेली पाहून त्यांतील कित्येक टवाळखोर तिला बारीक बारीक धोंडे मारूं लागले, व कोणी तर तिच्या केसांच्या जुंबाड्यांतील वर्षानवर्षें त्यांस तेलाचा संसर्ग नसल्यामुळें अगदीं चिकट घाण झालेल्या बटा ओढून तिला हलवूं लागले. कांहीं वेळपर्यंत ती हें सर्व मुकाट्यानें सोसून मुळींच बोलली नाहीं, परंतु जेव्हां तिला लोक अधिक अधिक त्रास देऊं लागले तेव्हां ती रागानें एकदम हातांत दगड घेऊन उठली, आणि "आणखी मला त्रास द्याल तर पहा मेल्यांनो! ह्याच दगडांनीं तुमचीं टाळकीं फोडीन" असें ह्मणण्यासारखी कांहीं विलक्षण मुद्रा करून त्या सर्वांकडे टवकारून पाहूं लागली. ती मुद्रा पाहून तीस त्रास देणारे लोक अंमळ मागें सरले, इतक्यांत त्यांतीलच कांहीं पुरुष पुढें येऊन " **अंमा! अंमा**! आम्हांस कांहीं तरी भाकित सांग !' म्हणून म्हणूं लागले.

" होय, मेल्यांनो ! या, मी तुम्हांस एक ... र सांगतें, तें तुम्ही खरें माना अगर ... पण माझें भाकित कधीं खोटें व्हावयाचें ...
असें ती **बाई** बोलली. त्याबरोबर ...
लोकांस एकदम आश्चर्य वाटून त्यांनीं ...
**अंमा** बोलली! रे बोलली! आज कित्ती ...
बोलली नाहींस, होयना **अंमा** ?" असें म्ह...
एकदम आरोळी केली.

" मेल्यांनो! आरडा! आणखी ही ऊर फु...
र्यंत आरडा! या **अंमे**चें वचन कधींही मि...
व्हावयाचें नाहीं. ऐका. या **अंमे**ला ...
रात्रीं एक स्वप्न पडून एक दृष्टांत ...
त्यावेळीं हल्लीं आमच्या सद्गुरु **बोधिस**...
धर्माची जी ह्या दुष्ट **हिंदूंनीं** नासाडी म...
आहे,—ह्या दुष्ट लोकांकडून आमच्या आ...
... त्रास होत आहे ...

होतें. त्यांस हा झालेला प्रकार पाहून वाईट वा-

# मथुरा.

## प्रकरण १ लें.

मी अगदीं लहान होतें, तेव्हांच्या माझ्या स्थितीची मला कांहीं आठवण नाहीं; परंतु जेव्हांपासून मला थोडेंसें स्मरण ह्मणून आहे, तेव्हांची स्थिति मनांत आणिली असतां, माझी आई व बाप हीं मजवर अत्यंत ममता करीत असत इतकें मात्र आठवतें. तीं जरी गरीब होतीं तरीही त्यांनीं आपला संसार मोठ्या अब्रूनें व आवानें चालविला होता असें कांहींसें मला स्मरतें. माझा बाप जातीचा मराठा होता. त्याच्या स्थितिरीतीविषयीं प्रत्यक्ष ह्मणून मला कांहींच सांगतां येत नाहीं; परंतु त्याजविषयीं इतर लोकांकडून ज्या चार गोष्टी कळल्या आहेत, व लहानपणच्या कितीएक गोष्टी ज्या मला स्मरतातसें वाटत आहे, त्यांजवरून तो मोठा स्थिर बुद्धीचा, मितव्ययी, व मेहनती होता असें माझें अनुमान आहे. त्याची माझ्या आईवर फारच ममता असे, आणि लोकांच्या सांगण्यांत तरी आमचें लहानसें कुटुंब साऱ्या वाईंत अत्यंत सुखी होतें. माझी आई सुरेख असून तिचे केश व नेत्र काळे होते. चेहरा कांहींसा फिक्कट होता. व जरी ती अगदीं दुःखी होती असें ह्मणतां येत नाहीं तरी तिच्या चर्येवरून तीस कशाची तरी चिंता होती असें वाटत असे. गरीब अवस्थेंत मनुष्य असलें ह्मणजे त्याची रहाणी साधारणतः घाणेरडीच असते; परंतु माझ्या आईबापांची तशी स्थिति नसून तीं घरीं नेहमीं स्वच्छता राखीत, व मला व माझ्या भावंडांला तीं नेहमीं स्वच्छता राखण्याविषयीं उपदेश करीत. तसेंच आह्मीं सर्वांनीं सन्मार्गानें व नीतीनें वागावें ह्मणून तीं आह्मांस बोध करीत. तसेंच आमच्या शेजारघरणी बायका नेहमी रामजी जाधवाची बायको सीताबाई ही फार सज्जन आहे असें ह्मणत असत याचें मला पक्कें स्मरण आहे.

आमच्या देशांत स्त्रियांकडून विद्याभ्यास करविण्याची बहुशः चाल नाहीं हें जरी खरें आहे, तरी माझ्या आईस थोडें बहुत लिहितां वाचतां येत होतें, व घरीं कांहीं कामधंदा नसला ह्मणजे ती वेड्यावाकड्या अक्षरांनीं लिहिलेली एक तुकारामाच्या अभंगाची चोपडी तिजपाशीं होती ती वाचीत बसे. तसेंच मी आणि माझ्या धाकट्या बहिणी जवळ असलों ह्मणजे ती आह्मांसही थोडें बहुत लिहिण्यावाचण्यास शिकवी. ती आह्मांवर अत्यंत ममता करीत असे, तरी आह्मांस तिचा धाक वाटत असे. याजमुळें ती आह्मांस सांगे त्याप्रमाणें आह्मीं वागत होतों. एकाद्या वेळीं थंडीचे दिवस असले ह्मणजे मध्यें शेकटी पेटवून सभोंवतीं माझा बाप, आई व आह्मीं पांच भावंडें अशीं शेकत बसत असूं; त्या वेळेस माझा बाप मोठ्या रंगांत येऊन कांहीं कवनें गात असे व त्यांचा आह्मांस फारसा अर्थ कळत नसे तरी बाबा व आई हीं आनंदांत पाहिलीं ह्मणजे आह्मांसही आनंद होत असे; परंतु एकादे वेळीं सर्व मनुष्यें आनंदांत असतांही एकाएकीं आमची आई चिंताक्रांत होऊन बसे, व कधीं कधीं तर तिच्या डोळ्यांतून अश्रुधाराही चालत, तेव्हां मात्र आह्मां सर्वांच्या आनंदाचा एकदम

हळूच ह्मटलें " कायरे, दादा, आईनें आपणांस जागेवरून उठूं नका ह्मणून सांगितलें होतें ना? "

" होय. परंतु ताई, तूं कांहीं ह्मण, मला कसेंसेंच वाटतें. काय, ग, बाहेर खिडकीच्या तेथें कोणी एक गृहस्थ उभा होता तो तूं पाहिलास ? "

" होय. तिथें होता खरा एक कुणी धटिंगण उभा ! तो मला ही कसासाच वाटला. बरें पण त्याचं काय ह्मणतोस ? "

" तें कांहीं मलाही समजत नाहीं, परंतु याच गृहस्थास याच खिडकीशीं दोन तीन दिवसांमागेंही उभा असतांना मी पाहिलें होतें! "

" काय ? ह्मणतोस काय ? दादा, त्याला पूर्वी आपल्या घरांत पाहिलें होतेंस ?'

आह्मीं असें बोलत आहों तों दरवाजा उघडून आई आंत आली तें पाहून गोविंदा चटकन् आपल्या जागेवर जाऊन बसला, परंतु ती त्याची कृति आमच्या आईच्या लक्षांत लागलीच येऊन ती त्याजकडे एकसारखी पाहूं लागली. मीही आईकडे पाहूं लागलें, तों पहिल्यानें तिची मुद्रा मला कांहीं विलक्षणच दिसली. ती स्वाभाविकपणें गोरी होती तरी त्यावेळीं तिचें तोंड काळें ठिक्कर पडलें होतें असें मला भासलें. पण इतक्यांत पहातें तों ती एकारकी लाल झाली, व तिचे नेत्र आरक्त झाले. तिची अशी वर्तणूक मीं यपूर्वी कधीं पाहिली नव्हती; त्यायोगानें मी अगदीं घाबरून गेलें, तथापि माझी खरी स्थिति आईस न समजूं देतां मी मुकाट्यानें खालीं मान घालून पाहूं लागलें. तथापि त्यावेळीं माझी आई बाहेरून सद्गुणी दिसते त्याप्रमाणेंच दोन वर्षांचें सावी हा विचार मनांत येऊन वय १३ वर्षांच्याईट वाटलें.

होतें, व सर्वांत आई आपल्या पाटापाशीं बसून पुनरपि तांदुळ निवडूं लागली, व गोविंदा आणि मी दुसरीकडे जाऊं लागलों इतक्यांत आह्मांस " चला या माझ्या पुढें तांदुळ निवडीत बसा " असें ती ह्मणाली. तेव्हां आमचा निरुपाय होऊन आह्मीं तिनें सांगितल्याप्रमाणें तिजपुढें बसलों. वर सांगितलेला विचार माझ्या मनांत एकसारखा घोळत असल्यामुळें माझ्या मनांत नसतांही सहजावृत्या मीं आईच्या तोंडाकडे पाहिलें, इतक्यांत तीही मजकडे कांहीं चमत्कारिक रीतीनें पाहूं लागली; नेहमी ज्याप्रमाणें तिची दृष्टि शांत व ममतेची असे त्याप्रमाणें त्यावेळीं ती दिसली नाहीं, व त्या दृष्टीचा त्यावेळीं जरी मला पुरतासा अर्थ कळला नव्हता, तरी तिची गुप्त गोष्ट आह्मांस कळली असावी असा तिला संशय येऊन ती आमच्या तोंडाकडे निरखून पाहत होती असें मी आतां निश्चयानें सांगूं शकेन. इतकें झाल्यावर कांहीं वेळ स्तब्ध राहून आईनें मी व गोविंदा अशीं दोघें शिवाय करून बाकीच्या मुलांस पुढच्या अंगणांत खेळा ह्मणून सांगितलें, व त्याप्रमाणें तीं गेल्यावर आई आमच्या तोंडाकडे नीट रेखून पाहून ह्मणाली:—

" कायरे मुलांनो ! मी विचारतें खरेंच सांगा, खोटें बोलूं नका. कायरे गोविंदा! मी बाहेर गेल्यावर तूं मथुरेशीं कसल्या गोष्टी करीत होतास ? "

" कसल्या नव्हतों! मी आपला उगीच तिच्या जवळ उभा होतों. " असें गोविंदानें झटकन् उत्तर दिलें. त्याचें तें निर्भिडपणानें दिलेलें उत्तर ऐकून मला फार आश्चर्य वाटलें, व जरी गोविंदा एकादेवेळीं निर्भयपणें आईस उलटून उत्तर देत असे, तरी यावेळीं तरी निदान तो असें बोलेलसें मला वाटलें नव्हतें.

" फार चांगलं अं गोविंदा! चांगलं बोला-

यला शिकलास!" असें आई ह्मणाली, आणि नंतर मजकडे वळून मला ह्मणाली. "**मथुरा**! माझी बये! तूं नको अं अशी **गोविंदा**-सारखी खोटें बोलायला शिकूं. बोल माझी बाई ती. कायग **मथू**! **गोविंदा** तुझ्यापाशीं कसल्या गोष्टी करीत होता?

मी उत्तर देणार इतक्यांत **गोविंदा** माझ्याकडे पाहून मी बोलूंनये ह्मणून मला खुणवूं लागला, परंतु मी त्याकडे लक्ष न देतां ह्मटलें "आई, कोणी गृहस्थ त्या खिडकीपाशीं मघांशी उभा होता त्याच्या बद्दल मला कायसें तो सांगत होता."

हें ऐकल्याबरोबर माझी आई चपापल्यासारखी होऊन घाई घाईनें "कायकाय!" ह्मणून ह्मणाली.

"तो गृहस्थ मागं ही असाच एकदा खिडकीपाशीं उभा होता, आन् आतां जशी तो आल्यावर तूं बाहेर गेली होतीस तशीच तेंव्हांही गेली होतीस ह्मणून दादा मला सांगत होता.-पण आई! तूं दादावर रागावलीस वाटतं!"

"नाहीं" असें आईनें शांतपणें उत्तर केलें. तथापि त्यावेळीं तिच्या मनांत कांहीं तरी काळजी होती व ती झाकावयाचा ती यत्न करीत होती असें मला वाटलें. "नाहीं मी रागावलें नाहीं! पण हें बघा मुलांनो!" असें ह्मणतांना तिला कांहींसा हुंदका आला, व ती तो दाबू पहात होती असें मला वाटलं. "तो गृहस्थ किनई उगीच एक निरोप सांगायला आला होता. अर्थ नाहीं कांहीं त्यामधें! पण हें बघा मुलानो! रात्रीं घरीं येणं होईल तेंव्हां घरीं कोणी आलं होतं ह्मणून सांगूं नका! आणखी हें बघ **गोविंदा**! हें बघ **मथू**! यांत कांहीं अर्थ नाहीं समजलांत? यावद्दल एक चकार शब्द सुद्धां कोणापाशीं बोलूंनका. ऐकलंनारे मुलांनो? कराल ना मी सांगितलं असं?"

"होय" असें मी एकदम म्हटलें. आणि त्यावेळीं काय झालें असेल तें असो. माझ्यानें कांहीं रहावना, मी एकदम आईच्या गळ्याला मिठी मारून रडूं लागलें-

"उगी माझी बया ती! उगी! **मथू**! उगी" असें माझी आई हळूच ह्मणाली, आणि तिनें मला आपल्या पोटाशीं घट्ट आवळून धरलें हा सगळा प्रकार पाहून **गोविंदा**सही फार वाईट वाटलें व तो झटदिशीं आईच्या पायां पडला, तेंव्हां आईनेंही त्याच्या पाठीवर हात फिरवून "ऊठ बाळा **गोविंदा**" असें ह्मटलें. नंतर कांहीं वेळ आह्मीं सगळींजण अगदीं मुकाट्यानें बसलों. नंतर आईनें सरासरी कसेतरी तांदुळ निवडणें आटपून आह्मांस "जा आतां घरांत" ह्मणून सांगितलें. व त्या प्रमाणें आह्मीं निघून जाऊं लागलों, तेंव्हां आमच्या आईनें मोठा दुःखाचा उसासा टाकून "देवारे देवा!" असें ह्मटलेलें आमच्या कानीं पडलें.

असो. ही गोष्ट होऊन सुमारें सहा महिने झाले. तथापि तिचें मला वारंवार स्मरण होई. **गोविंदा** मात्र ती गोष्ट विसरलासें मला दिसूं लागलें. तथापि एवढी गोष्ट झाली कीं **गोविंदा**च्या वृत्तींत मला प्रत्यहीं नवा नवा फरक दिसूं लागला. तो बाबा घरीं असले ह्मणजे मात्र चांगल्या रीतीनें वागत असे, परंतु ते बाहेर गेले ह्मणजे कधीं कधीं आईशीं उर्मटपणाचेंही भाषण करी! अजून त्याचें वय लहान होतें त्यामुळें तो पुरतासा निरढावला नव्हता, तथापि पुढें मागें त्याची स्थिति नीट नाहीं असें वरचेवर मझ्या मनांत येई. एक दोन वेळां मी हें

गोष्ट आईशींही बोलले. परंतु त्यावेळीं ती कपाळास हात लावून " नशीब त्याचें! " इतकें ह्मणूनच स्वस्थ बसे. परंतु " गोविंदा, तूं गोष्ट करितोस ही चांगलें नव्हे" असें एक दिवसही तिच्या तोंडून अक्षर आलेसें मला आठवत नाहीं. गोविंदा ही मी त्याला याबद्दल कांहीं बोलेन ह्मणून माझ्यापासून दूर दूरच असे. परंतु एके दिवशीं गोविंदा खोलींत एकटाच असतां मी सहज आंत गेलें; तों तो मला सोडून बाहेर जाऊं लागला. इतक्यांत मी त्याला " दादा! हें बघ " ह्मणून हाक मारली तेव्हां तो किंचित् संकोचानें परंतु मजजवळ आला आणि " ताई काय?मला कां हाक मारलीस? " ह्मणून त्यानें मला विचारिलें.

मी ह्मटलें. " आतांशीं कनई दादा! तुझी वागणूक मला कांहीं नीटशी वाटत नाहीं! हें काय बरें तूं असें करतोस? प्रत्यक्ष आईला तूं अशीं उलटून उत्तरें देतोस हें चांगलं नाहीं. वाईट बरं हं! आण् हें पहा तूं आलीकडे खोटंही बरंच बोलायला शिकला आहेस! "

माझ्या या बोलण्यापासून गोविंदाच्या मनास यत्किंचितही बोध न होतां तो उलटी माझीच थट्टा करून ह्मणूं लागलाः—" वाहवा ग शहाणी! बरीच मला शिकवितेस! आई आमची मोठी सद्गुणी, आहे मला ठाऊक! तिनंच नाहीं का त्या दिवशीं ती गोष्ट बाबांना नका कळवूं ह्मणून आपल्याला सांगितलं! "

" ह्मणजे? दादा! हें तूं काय बोललास! " असें मी ह्मणत आहें इतक्यांत गोविंदा तेथून झटकन निघून बाहेर गेला. त्याची ही वर्तणूक पाहून मला फार वाईट वाटलें. पूर्वी मला आमच्या आईविषयीं जो कांहीं संशय आला होता तो पुनरपि माझ्या मनांत जागृत झाला. माझ्या आईचें वर्तन नीट नाहीं असें मनांत येऊन मला घळघळां रडूं आलें. त्यावेळीं माझें वय लहानच होतें, त्यामुळें माझ्या मनांत जरी कांहीं भलतासा संशय आला नाहीं; तरी मला कसेंसेंच वाटूं लागलें; आईनें ती गोष्ट बाबांना कळवूं नका ह्मणून सांगितलें यांत कांहीं तरी गूढ आहे असा माझ्या मनानें निश्चय केला. तथापि एकादे वेळीं सहज आई मजकडे पहात नसतां किंवा बाबा घरांत असले ह्मणजे आईची ती सौम्य मुद्रा पाहिली ह्मणजे माझें मलाच वाटूं लागे कीं माझा संशय अगदीं खोटा. आमची आई सद्गुणी आहे. हें वाटणें माझ्या मनांत कायम रहावें ह्मणून मी आपल्याकडून हवी तितकी खटपट करीं, तरी फिरून फिरून माझ्या मनांत तो संशय येऊन उभा राही व तो कांहीं केल्यानेंही पुष्कळ वेळपर्यंत जात नसे.

## प्रकरण २ रें.

मागील प्रकरणांत सांगितलेल्या गोष्टीस सुमारें दीड वर्ष होत आलें, त्यावेळीं माझें वय जवळ जवळ तेरा वर्षांचें होतें. गोविंदाच्या वयासही पधरा वर्षे संपत आलीं होतीं. आमची आई दिसण्यांत पांच पंनास बायकांमध्यें सुरेख अशी होती, व जरी दादाचा तोंडवळा बहुतेक आईसारखाच होता, तरी त्याजकडे लक्ष लावून पाहिलें असतां हा मनुष्य एकंदरींत चांगला नसावा अशीच सर्वांची कल्पना होण्याजोगी होती. त्याच्या तोंडावरून तो लबाड व ठक आहे असेंच लोकांस वाटत असे. आतां आजपर्यंत ह्मटलें ह्मणजे त्याच्या हातून कांहीं ह्मणण्यासारखी वाईट गोष्ट घडली होती असा जरी प्रकार नव्हता, तरी त्याला खोटें बोलणें ह्मणजे कांहीच नाहीं असें वाटत असे. तसेंच त्याच्या व-

**मन्म०**—मित्रा! काय सांगूं! ह्मणूनच तर जिवास संताप होतो!

**विदू०**—तूं आपल्या जिवास संताप करून घेऊं नको. त्या सुंदरीची आणि तुझी भेट व्हावी अशी कांहीं तरी युक्ति मी करितों.

**मन्मथ**—(सस्पृहपणें) ती कशी बरें?

**विदू०**—मित्रा! मी कीं नाहीं आटी ज्योतिष सिद्धांतांत मोठा प्रवीण आहें असें सांगत जाईन, ह्मणजे मला जे ते लोक शकुन विचारीत जातील. मीही सगळ्या लोकांस तुमचें काम फत्ते होणार ह्मणून सांगेन. अशा युक्तीनें तुह्मां दोघांची गांठ मी पाडीन.

**मन्मथ**—(हंसून आपणाशीं) अशा लोकांनीं असंबद्ध गोष्टी बोलाव्या हें त्यांस भूषणच आहे. (मोठ्यानें) मित्रा, तूं मोठा निपुण आहेस हें मी पक्कें जाणतों, तर मला त्या हृदयवल्लभेची गांठ पडण्याला कांहीं उपाय असला तर सांग.

**विदू०**—हूँ: हूँ: ! तुला ठाऊक नाहीं मी मोठा त्रिकालज्ञानी ब्राह्मण आहें तें! अरे, त्रिकालज्ञान्याला कोणचीही गोष्ट माहीत नाहीं असें कधीं घडेल? (असें ह्मणून क्षणभर ध्यानस्थ बसल्यासारखें करितो, आणि) मित्रा! तुझी आणि तुझ्या हृदयवल्लभेची गांठ पडण्याचा एक उपाय मला सुचला आहे!

**मन्मथ**—तो कोणचा बरें?

**विदू०**—हें बघ. मी एकादे दिवशीं दर्भ, समिधा आणावयासाठीं येथून जवळच नंदनवन आहे तेथें जाऊन इकडे तिकडे फिरत असतों, आणि तेथें एकमेकींसारख्या दिसणाऱ्या अशा पुष्कळ नागरिक कन्या क्रीडेकरितां जमलेल्या सहज एकादे वेळीं माझ्या दृष्टीस पडतात, तर कदाचित् त्यांमध्यें तूं ज्या हृदयवल्लभेचें वर्णन करीत आहेस तीही कशावरून येत नसेल?

**मन्मथ**—(उत्कंठित होऊन) मित्रा, काय चमत्कार सांगावा! पहा या तुझ्या भाषणानें नंदनवनांत जाण्याची उत्कंठा मला उत्पन्न झाली! (असें ह्मणून हातावर राघू बसवून आणि बाणानिशीं तयार होऊन विदूषकास ह्मणतो.) मित्रा, चल पुढें.

**विदू०**—(आपणाशीं) कीलोत्पाटी[1] वानराप्रमाणें मीं आपण होऊनच आपणावर हा अनर्थ ओढवून घेतला ह्मणावयाचा! असो, उपाय नाहीं. गेलेंच पाहिजे. (मोठ्यानें) मित्रा, चल ये असा या वाटेनें.

(दोघे एकडे तिकडे फिरतात.)

**मन्मथ**—(पुढें पाहून) मित्रा! या नंदनवनाची शोभा पहा.

श्लोक.

आले कुंदलतांस अंकुर पहा; लोध्रास[2] ही केशर;
शोभती फुलल्या; सुपाटलेतरू पुष्पौघें[3]में निर्भर;
लाले मेदुरवर्ण[4] नीप; फुललीं अब्जें भ्रमद्भृंगकें[6];
संकेतस्थल[7] हें असे जणु अहा! साही ऋतूंचें निकें!

(असें ह्मणून दाजूच्या द्वारानें नंदनवनांत शिरल्यासारखें करून चोंहीकडे पाहून)

अहो! या पारिजातकादिक वृक्षांचें भाग्य किती वर्णावें!

---

१. किल्ला उपटणाऱ्या. या वानराविषयीं पंचतंत्रांत कथा आहे तिचें तात्पर्य असें आहे कीं, एका सुतारानें एक लाकूड अर्धेंच कापून त्यांत पाचर ठोकून ठेविली होती. त्यावर येऊन बसून त्यानें हलवून हलवून ती पाचर उपटून काढिली, इतक्यांत त्या कापलेल्या लाकडामध्यें तो सांपडून सरतेशेवटीं मेला. २. तांबडा लोध्रवृक्ष. ३. पुष्पांनीं भरलेला. ४. नीलवर्ण. ५. कळंबाचें झाड. ६. ज्यांभोंवतीं भ्रमर संचार करीत आहेत अशीं. ७. सर्वांनीं एकत्र मिळण्याची जागा.

साक्या.

सिंधूपासुनि जन्म पावले; वसति सुरेश्वरधामीं;
यांचें अद्भुत रत्नप्रकरीं रूप दिसे हें नामी;
अमृत सदाही फळांत यांच्या वास करूनी राहे;
लक्ष्मी पद्मालया स्वयें ही यांची भगिनी आहे;
तशीच सर्वहि गाती कीर्ती यांच्या दानृवाची;
स्तुती करावी किती अहा या न कळे देवतरूंची !

सर्वांच्या मनांतील इच्छा पूर्ण करणारे वृक्ष माझा मनोरथ पूर्ण करितील काय

**विदू०**–हे वृक्ष मज ब्राह्मणाच्याही प्रमोदक असे मोदक मला देतील का

**मन्मथ**–मित्रा, पहा पहा.

श्लोक.

येथें या आम्रराजी, पिकगणमुखरा, युक्त नूत्नीं र
वावीथीं दाडिमीच्या,दिसतिविस्खुडिलींयत्फलेंहीं
नीपांच्या पंक्ति येथें, बहुविध करिती नृत्य ज्यांमाजि
भंगौघभ्रांतिशोभा बकुलतरु इथें दावितातो सम

**विदू०**–(चोंहीकडे पाहून) अरे ! येथें तर देखील स्त्री दिसत नाहीं ! तूं मात्र पा भुंगे लटकूं लागले असतां मनुष्य तिकडे फिरतो त्याप्रमाणें फिरत आहेस एवढा सुद्धां थांवत नाहींस; पण माझ्या तर पोटांत भुकेनें कल्पांतानल सोडल्यामुळें आपल्याच्यानें एक पाऊल पुढें टाकवत नाहीं! यासाठीं मी आपला या व वृक्षाच्या दाट छायेंत विसाव्याकरितां व (खालीं बसतो आणि ऐकल्यासारखें करून ह मित्रा, या उजव्या हाताकडे वनभोज रितां मिळालेल्या ब्राह्मणांचा मंत्रध्वनि येतोसें वाटतें, तर मला तिकडे जाऊं

**मन्मथ**–तूं तर शर्थ केलीस ! जा !

**विदू०**–तुझें कल्याण असो. (निघून जातो.)

**मन्मथ**–(हांसून) अरे ! हा पोटभरू भट आपला निघून चालता झाला ! असो. (असें ह्मणून नेत्रांस आनंद देणारे नंदनवनप्रदेश चोंहींकडे पाहून कौतुकानें) वाहवा ! वाहवा !

श्लोक.

माकंदावरती इथें पसरली मल्लीलता हीं बरी;
तांबूली चढली विशेष विलसे पूगद्रुमांच्यावरी;
तक्कोलाप्रति ही लवंगलतिका आलिंगना देतसे;
वल्लीवृक्षचरित्र कौतुक मनीं पाहूनि हें होतसे.

काय करावें ? अरे, प्रत्यक्ष या नंदनवनांत ही मी असतांना मला रति मिळत नाहीं !

(उत्कंठित झालासें दाखवितो.)

(नंतर सख्यांसह फुलें तोडीत तोडीत रति येते.)

**रति**–(मनांत) काय चमत्कार पहा, काल बाई काय झालें असेल तें असो, सहज आपलें गच्चीवर वसावेंसें वाटलें, त्याप्रमाणें वसलें इतक्यांत नगरांतील थोरल्या रस्त्यानें घोड्यावर वसून फेरफटका करतांना ती मनोहर मूर्ति अकस्मात दृष्टीस पडली ! वास्तविक ह्मटलें ह्मणजे जसे इतर लोक माझ्या दृष्टीस पडले तशीच तीही पडली; असें असतांही त्या मूर्तीस पाहिल्यावरोवर कुलस्त्रियांस विरुद्ध असा कांहीं एक विलक्षण विकार माझ्या मनांत उत्पन्न झाला, आणि जसा काय तो विकार मला फार दिवसांपासून परिचितच असावा अशी कांहीं त्या वेळीं माझ्या मनाची विलक्षण स्थिति झाली ! हें तर बाई मोठेंच आश्चर्य ! खरेंच बाई, तो पुरुष तेव्हांपासून एकसारखा माझ्या पुढें

१. रत्नसमुदायांनीं. २. कमलांत वास कर ३. देवांच्या वृक्षांची. ४. प्रमोद ह्मणजे आनंद ५. आंब्याच्या झाडांच्या पंक्ति. ६. कोकि समुदायांनीं नादयुक्त. ७. नूत्न ह्म. नवीन. ८. ९. डाळिंबाच्या झाडांच्या. १०. भृंगांचे ओघ समुदाय, त्यांच्या भ्रांतीची ह्म. भ्रमणाची शोभा.

१. आम्रवृक्ष. २. नवमालिकालता. ३. विड्याची वेल. ४. शोभते. ५. पोफळाचें झाड. ६. वृक्षविशेष. ७. नंदननामक वन, पक्षीं आनंददायक वन. ८. गोडी; पक्षीं प्रस्तुत नाटकाची नायिका.

उभाच आहेसें वाटतें. आणि आतां तर,

आर्या.

न सुचे कांहीं मजला, त्यावांचुनि सर्व शून्य जग भासे;
गेलें धैर्य गळोनी; लज्जा नचि लोक मज जरी हांसे;
ताताच्या, जननीच्या, आहें स्वाधीन मी, तरी, त्याचें
ऐकावयास भाषण माझें चित्त त्वरा करी सांचें.

(त्या विचाराच्या नादांत भलत्याच वाटेनें जाऊं लागते.)

**एक सखी**–(थट्टेनें) अग सखी **रती**, तीं तोडलेलीं फुलें माझ्या परडींत घालावयाचें सोडून तिकडे कोणीकडे चाललीस ?

**रति**–(लाजल्यासारखें करून) सखी **कीरवाणी**, तूं माझी थट्टा करितेस हें मी समजलें. परंतु माझें कीं नाहीं लक्ष ह्या आम्रवृक्षाच्या शोभेकडे गेलें होतें. कारण पहा, ह्या वृक्षास नवीन पालवी फुटली आहे ती खाऊन कोकिल मधुरकंठ होत्साते पंचम स्वरांत गायन करीत आहेत, व त्यायोगानें तरुण जनांचें मन प्रियवस्तुसंगमाविषयीं उत्कंठित होत आहे; तसेंच ह्या वृक्षापासून एकसारखा मकरंद गळत आहे, व त्यायोगानें भ्रमरांचे थवे त्यावर जमून त्यांच्या इतस्ततः संचारामुळें साऱ्या दहाही दिशा पण कशा वासानें दणाणून गेल्या आहेत; तसेंच आणखी पहा, ह्याचीं फळें पक्व झालीं असून तीं भक्षण करण्याच्या हेतूनें यावर जे शुक जमले आहेत, त्यांच्या मंजुळ ध्वनीच्या योगानें हा वृक्ष फारच मनोरम वाटत आहे.

**दुसरी सखी**– सखी **रती**, अग उगीच आम्रवृक्षाचा वहाणा कां सांगतेस ? सर्व गुणांनीं मंडित, आणि नगरांतील रस्त्यांत फिरतांना दृष्टीस पडलेला, अशा त्या महाभागाकडे माझें लक्ष गेलें होतें असें नीटपणें कां सांगत नाहींस ?

**रति**–सखी **कोकिलवाणी**, तूं तरी वरीच आहेस ! तूं आणि **कीरवाणी** अशा दोघींनीं माझी थट्टा करण्याची मसलत मांडिली आहे ? तर तुह्मीं भलत्याच शंका मनांत आणितां ह्मणून मी नाहीं तुमच्या जवळ उभी रहावयाची ! (असें ह्मणून रागावल्याचें मिष करून अंमळ दुसरीकडे जाऊन पुनरपि फुलें वेचिते.)

**मन्मथ**–(आपल्या हातांतील राघूकडे पाहून) यानें आपले नेत्र पसरले आहेत, यावरून यास भूक लागली आहे खचित. तर यास अगोदर खावयास घातलें पाहिजे. (बाजूस पाहून) येथून जवळच हा लतांनीं चोंहीकडून वेष्टिलेला असा आम्रवृक्ष आहे त्यास ह्या पिकलेल्या फळांचा झुवका लागला आहे, त्याचा सुगंध माझें हृदय जणुं आपणाकडे ओढून घेत आहे, तर यांतीलच एक फळ खालीं पाडितों. (असें ह्मणून धनुष्यास बाण जोडून त्याचे योगानें एक फळ खालीं पाडितो.)

**रति**–(आनंदयुक्त कौतुकानें) सख्यांनो, हें पाहिलें का, मी आपल्या ओच्यांत हीं फुलें गोळा करितें आहे इतक्यांत एकाएकीं हें पिकलेलें आम्रफळ अकल्पित त्यांत पडलें !

**सख्या**–(त्वरेनें तिजजवळ येऊन) सखे! हें जें तुला फळ मिळालें, तें तुझा मनोरथ सिद्ध होण्यास कांहीं विलंब लागणार नाहीं असें सुचवितें !

**मन्मथ**–(फळ उचलण्याकरितां कांहीं पावलें आम्रवृक्षाकडे येतो इतक्यांत रतीस पाहून आनंदयुक्त त्वरेनें) वाहवा वाहवा !

श्लोक.

मच्चेतश्चंद्रिका[1] जी शशिमुखि[2] नयनीं त्यां पुरा पाहियेली
ती हीच त्रस्त[3] एणीपरि[4] चलनयना दृक्पथीं[5] आजि आली.

१. माझ्या चित्तास आनंद देणारी चंद्रप्रभाच जणुं. २. चंद्रवदना. ३. भ्यालेल्या. ४. हरिणीप्रमाणें. ५. दृष्टीच्या मार्गांत ह्म. समोर.

मीं सांगितलें होतें ? कारटे ! या राजड्यांत चोहींकडे सर्व लोक आनंद बुडून गेले असतां, तूं त्या सदा सर्वक शोक करीत बसणाऱ्या **राजसबाई**व काय ह्मणून जाऊन बसतेस ? कां, रडत कां अशी ?

**गज०**—बाबा ! तुह्मीं काय पाहिजे तें ह्मण मला तुह्मीं हव्या तितक्या शिव्या द्या, प तुमच्या पायांशपथ मी सांगतें, त्या **राज बाई**ची स्थिति माझ्यानें पाहवत नाहीं.

**दौल०**—पोरी ! पण अगोदर तूं तिच्याक जातेस काय ह्मणून? तुला पोरीला एक तिकडे जाऊं नको ह्मटल्यावर फिरून ज ण्याची गरज ?

**गज०**—बाबा ! तें कांहीं मला सांगतां नाहीं. परंतु मी तुमच्या पायां पडतें. बा तुह्मीं त्या **राजसबाई**स असा त्रास नका जाऊं ! मी आतांच ही तिच्याच महाल तून आलें—

**दौल०**—गाढव पोर नाहीं तर! कारटे!—

**गज०**—बाबा ! **राजसबाई**चा आपणास ए निरोप आहे.

**दौल०**—काय? निरोप ? कोणाचा? **राजसब ई**चा ? बोल ! बोल ! तिचा काय निरो आहे ?

**गज०**—निरोप मिळून इतकाच कीं—

**दौल०**—बसबस ! तुझें पाल्हाळ बोलणें म नको ! झटदिशीं बोल काय निरोप आ तो !

**गज०**—होय, पण बाबा! मी सांगतच आहें. !

**दौल०**—फिरून आपलेंच! बोल लवकर !

**गज०**—**राजसबाई**नें तुह्मीं लढाईहून पर आलां ह्मणून ऐकिलें. तेंव्हांपासून त्य

विचारीला तुह्मीं त्रास द्यावयास याल ह्मणून एकसारखें भय वाटतें आहे. बाबा ! आधींच ती विचारी दुःखानें गांजली आहे तर तिला कृपा करून एकांतवासांत स्वस्थपणें राहूं द्या !

**दौल०**—गप बस! पोरी ! तुला ह्या गोष्टींत कांहीं ज्ञान नाहीं ! तूं मुकाट्यानें अस!—बरें पण तिचा निरोप ?

**गज०**—मी सांगितला हाच !

**दौल०**—काय ? एकून **राजसबाई** माझें ह्मणणें ऐकत नाहीं काय ?—आः दुष्टे ! तूं मला वश व्हावेंस ह्मणून मी आज सात वर्षें खटपट करितों आहें त्याचें हेंच फळ? थांब दुष्टे ! तुला अशी मोकळी सोडतां उपयोगी नाहीं! ही मध्यें **काटक** लोकांची लढाई निघाली नसती, तर तुला यापूर्वीं कधींच—

**गज०**—बाबा ! बाबा ! तुह्मीं हें काय बोलतां ? बाबा ! तुह्मीं माझ्याकडे पहा, आणि आपण दोघें त्या बिचाऱ्या हतभाग्य **राजसबाई**चें समाधान करूं या !

**दौल०**—काय ? तुझ्याकडे पहा ? पोरी ! तुझा आणि **राजसबाई**चा काय संबंध ?

**गज०**—बाबा ! तें कांहीं मला विचारूं नका. परंतु तुमच्या गळ्याशपथ मी सांगतें, **राजसबाई**ला हा असा त्रास जोंपर्यंत तुह्मीं द्याल तोंपर्यंत माझ्या ह्मणून मनाला समाधान वाटावयाचें नाहीं !

**दौल०**—पोरी चल निघ ! जीभ आटप ! तूं प्रत्यक्ष माझ्या पोटची असून तुला असल्या गोष्टी बोलण्यास शरम नाहीं वाटत? दुष्टे ! या शहरांत चोहींकडे सर्व लोक आनंदोत्साहांत गुंतले असून तूं आपल्या या वेडगळ वरळण्यानें त्यांच्या आनंदाचा

म. ग्रं. १४१

विरस करणार काय? अगे, या राणीचा पुत्र **यशवंतराव**, जो माझा अत्यंत हाडवैरी, तो मेल्याची वातमी अद्यापि शहरांत पसरली नाहीं, ती एकदांची पसरली ह्मणजे चोहोंकडे एकदम हल्लींपेक्षां शतपटीनें अधिक उत्साह सुरू होतील त्या सर्वांस तूं विरजण घालणार काय?

**गज०**—हाय हाय! रे उदार राजपुत्रा! हाय हाय!

(मूर्च्छित होते.)

**दौल०**—(घाईनें). अरे! कोणरे आहे तिकडे? थोडें पाणी आणा पाहूं! **गजरे! गजरे!** सावध हो सावध हो! (तीस वारा घालितो. गजराबाई हळूहळू सावध होते.) (आपणाशीं) यांत कांहीं तरी काळें बेरें आहे खाचित. (मोठ्यानें) **गजरे!** खरेंच सांग, तुला त्या दुष्ट **यशवंतरावाच्या** मृत्यूचें वर्तमान ऐकून इतकें कां वाईट वाटलें? याचा अर्थ काय?

**गज०**—(रडत रडत) बाबा! **यशवंतराव** तर मेलाच, तेव्हां त्याला आतां तुह्मांपासून कांहीं भय राहिलें नाहीं, याकरितां आतां मागील सर्व हकीकत सांगतें. तुह्मांस आठवत असेलच, सुमारें पांच महिन्यांपूर्वीं आपण **पर्वतेश्वराच्या** जत्रेकरितां निघालों होतों, त्यावेळीं आपले लोक अगदीं गैरसावध असतां वाटेंत मध्यरात्रीं एकाएकीं चोरट्यांनीं आपणावर छापा घातला;—

**दौल०**—होय! मला त्याची पक्की आठवण आहे! आपणावर छापा घातला तेच **काटक** लोक! आणि मी नुकताच ज्या प्रचंड स्वारींत विजयी होऊन आलों ती करण्याचा उद्देश तरी या दुष्ट चोरट्यांस शिक्षा करावी हाच!

**गज०**—तसेंच, तो छापा पडला त्या धांदलींत त्या चोरट्यांनीं मला पकडून बांधून नेलें, आणि **पर्वतेश्वराच्या** पश्चिमेकडल्या अंगच्या एका गुहेंत अन्नपाण्याशिवाय कोंडून ठेविलें. पुढें दुसऱ्या दिवशीं सगळी जत्रा संपून लोक जिकडचे तिकडे जात आहेत इतक्यांत तुह्मीं माझ्या शोधाकरितां चोहोंकडे घोडेस्वार पाठविले, परंतु त्यांस माझा कांहीं शोध न लागतां ते तसेच परतून निघून गेले. त्यानंतर त्या दुष्ट लोकांनीं मला हातपाय दोरखंडांनीं बांधलेली अशी बाहेर काढून दुसरीकडे न्यावयाचा बेत केला.

**दौल०**—पुढें?

**गज०**—त्याप्रमाणें सर्व तयारी होऊन ते चोरटे मला घेऊन दोन तीन कोस गेले. वाटेंत ते लोक माझी हवी तशी थट्टा करीत, व तोंडानें बोलूं नये असे अभद्र शब्दही मजपुढें बोलत. तरी मी त्याकडे लक्ष न देतां एकसारखी रडतच होतें.

**दौल०**—हूं हूं! त्या दुष्टांनीं एकून असा त्रास दिला अं! बरें मग पुढें?

**गज०**—पुढें ते लोक एका जंगलांत वस्तीस राहिले. तेथेंही त्यांनीं माझी पूर्ववत् थट्टा चालविलीच होती. दोन प्रहरच्या सुमारास तेथें एक जवळच ओढा होता त्यांत त्यांनीं मला अंग धुवूं दिल्यावर त्यांतीलच एका चोरट्यानें आठ चार दिवसांची शिळी झालेली चत्कोर दीड चत्कोर भाकरी आणि एक वाळलेला कांदा आणून माझ्यापुढें ठेविला. माझ्या मनांत कांहीं खावयाचें नव्हतें तरी सबंध एक दीड दिवस पोटांत कांहींच अन्न गेलें नसल्यामुळें नाइलाज होऊन मी भाकरीचे एक दोन तुकडे पाण्यांत भिजवून खाल्ले. ते खात आहे इतक्यांत त्या चोरट्यांच्या टोळीचा नाईक त्या ठिकाणीं आला आणि माझी बायको हो

लक्ष एकसारखें त्याच्या मुद्रेकडे लागून राहिलें. इतक्यांत त्या शिपायानें आपल्या खिशांत हात घालून एक दोन पैशासारखींच त्या देशांत त्या वेळीं चालू असलेलीं नाणीं काढून तिच्यापुढें टाकिलीं व आपण चालता झाला. **अंमा**ही तो शिपाई अगदीं दृष्टीआड नाहींसा होईपर्यंत त्याजकडेच पहात राहिली व तो आतां दिसत नाहींसा झाला तेव्हां एकदम आपले रोड झालेले हात पसरून ती मोठ्या आवेशानें ओरडून ह्मणालीः—" कां मेल्यांनो ! मीं सांगितलें तें खरं कां खोटें ? मी नव्हतें का ह्मटलं मी त्याला काल तेथं पाहिलें ह्मणून ? ऐका ! आमच्या या पवित्र धर्माची जुलुमी हिंदूंच्या हातांतून मुक्ति करणारा तो गृहस्थ हाच ! आणि आज तुह्मीं विनाकारण ज्या जतींचा सुळावर घात केला त्यांजबद्दल भयंकर सूडही हाच घेणार !"

हा प्रकार चालला असतां त्या ठिकाणीं मागें जो **यसलुराकडचा वसुभद्रा**चार्य ह्मणून सांगितला होता तोही होता, तो यावेळीं पुढें येऊन तीस ह्मणतोः—" अग ए वेडी ! अजूनही पळून जाशील तर पहा ! नाहीं तर पहा सरकारी कामदार तुझ्या शोधांत आहेत त्यांच्या तडाक्यांत सांपडलीस ह्मणजे तुझी कठिण दशा होईल!"

" होय ? मी वेडी ? मी बरी असेन वेडी ! पण तें राहिलं एका अंगाला! परंतु मी इथून कधीं नाहीं हलायची ! येऊं दे कोण सरकारी कामदार येताहेत ते ! मी त्यांच्या तोंडावर साफ सांगेन कीं, आमच्या महंतांचा तुह्मीं छळ केला, त्याबद्दल सूड घेण्यासाठीं आमच्या **अर्हन्** प्रभूनें ज्या गृहस्थास पाठविलं आहे, तो दोन वेळ माझ्या दृष्टीस पडला. होय—दोन वेळां—एकदा स्वप्नांत आणि एकदा या इथें—इथें—"

" बिचारी गरीब तूं आपणास उगीच संकटांत पाडून घेशील. यांत कांहीं अर्थ नाहीं तर माझं ऐक. तूं येथून मुकाट्यानें निघून जा कशी. पांच सात वर्षांपूर्वी येथील **अधिकरणिकांनीं** तुला फटके मारून तुझी काय स्थिति केली होती तिची आठवण कर, आणि हा असा वेडेपणा करणें सोडून दे !"

" हो हो ! समजलें समजलें ! येऊं दे तो मेला कोण **अधिकरणिक**० कीं **फधिकरणिक** ! पहातें कोण येतो तो ! मीं कुणाच्या सुद्धां बापाला भ्यायची नाहीं ! "

**वसुभद्राचार्य** त्या जमलेल्या लोकांकडे पाहून ह्मणतोः—" अरे ! तुह्मीं तरी कोणी हिला येथून दुसरीकडे घेऊन जा. त्याबद्दल मी तुह्मांस बक्षीस देईन ! "

" खबरदार माझ्या अंगास कोणी हात लावाल तर ! मी नाहींच येथून हलायची ! मी अशी इथंच राहीन, आणि राजा असो कीं महाराजा असो, त्याच्या देखत मी माझं सगळें ह्मणणें बोलून दाखवीन ! "

तिचा हा आग्रह व हट्ट पाहून त्या दयाळू न्यायाऱ्यास वाईट वाटलें, परंतु तिच्यापुढें कांहीं इलाज चालत नाहीं असें पाहून तो बिचारा एका अंगास सरला. इतका प्रकार होतो आहे तों **अंमे**चा शोध करीत सरकारी कामदार तेथें आले. त्यांच्या दृष्टीस ही बाई पडतांच त्यांतील मुख्य अधिकारी आपल्या लोकांस ह्मणालाः—" अरे पाहतां काय ? धरा इला आणि मुसक्या बांधून चला **पुनमल्ली**च्या तुरुंगांत नेऊन हिला गाडा! इतक्यांत न्यायाधीशांस मी त्याबद्दलची वरदी देतों. " इतकें बोलून तो त्या बाईकडे वळला आणि ह्मणालाः—" हें बघ, ए मु-

रदाड ! तूं जर एकादा जैनांचा जती छपवून ठेविल्याचें कबूल करिशील आणि तो ज्या ठिकाणीं असेल तेथें आह्मांस घेऊन जाशील तर आह्मीं तुला मोकळी सोडूं."

ती बाई उत्तर करितेः—"मला दुसरे तिसरे कोणी जती माहित नाहींत! जेवढे तुह्मीं दुष्टांनीं सुळीं चढविले तेवढे मात्र मला माहित आहेत. पण एक गोष्ट मात्र तुह्मांला माहित नसलेली मला ठाऊक आहे तेवढी मात्र मी तुह्मांस सांगतें ! ती हीच कीं, तुमच्या पापाचरणाबद्दल तुमचा सूड उगविणारा येथें आला आहे. मी त्याला दोन वेळ आपल्या दृष्टीनें पाहिलें आहे. येथें जे इतके लोक जमले आहेत त्यांनीं सुद्धां त्याला पाहिलें आहे. तो तुमच्याही दृष्टीस पडेल, परंतु त्या गोष्टीला अद्यापि कांहीं अवकाश लागेल."

"या इच्या वडवडण्याचा अर्थ काय ?" तो कामदार विचारितो.

इतक्यांत वसुभद्राचार्य पुढें होऊन ह्मणतोः—"तुह्मीं तिच्या वडवडण्याकडे लक्ष देऊं नका. तिला लागलें आहे वेड. ती काय पाहिजे तें वडवडते. परंतु तिच्या हातून कांहीं अपाय घडावयाचा नाहीं याबद्दल पाहिजे तर मी जामीन राहीन."

"त्या गोष्टी लांब आहेत, परंतु बच्चंपेरी ! अगोदर तुह्मींच इतःपर चांगल्या रीतीनें वागाल अशाबद्दल जामीन द्या. मला आतांच इतक्यांत खबर समजली कीं काल रात्रीं आपली स्वारी त्या घातकी व दरवडेखोर अर्धशालाच्या घरीं गेली होती. हा प्रत्यक्ष पहा सरकारी हुकूम मजजवळ आहे त्यांत अर्धशालाला 'घातकी' व 'दरवडेखोर' असेंच ह्मटलें आहे. आणखी त्याची पोर त्रिवेणी इच्यावरती झडप घालण्याचा तुमचा विचार आहे ह्मणूनही मला बातमी कळली आहे."

"मादरचोद!" वसुभद्राचार्य रागानें लाल होऊन ह्मणतो—"खबरदार ! बोल तर खरा फिरून, ह्मणजे दाखवितों तुला कसा काय तमाशा आहे तो."

"अरे हो हो ! ठाऊक आहे काय तमाशा दाखविशील तो ! थांब, तूं बाहेरून मात्र मी ब्राह्मण आहें ह्मणून डौल दाखवितोस, परंतु अंतर्यामीं तूं जैन आहेस अशी माझी पक्की खातरी आहे. चला रावजी न्यायसभेंत ! ह्मणजे तुह्मांलाच दाखवितों, कसा काय तमाशा आहे तो !"

ह्याप्रमाणें उभयतांची बोलाचाली होत आहे तों इकडे त्या कामदाराच्या माणसांनीं अंबेला पकडून तिला बांधून तुरुंगांत न्यावयाची तयारी चालविली होती. इतक्यांत अंबा सपाट्यासरशी एक हिसका देऊन त्यांच्या हातांतून सुटली आणि किंकाळ्या ठोकीत अगदीं उंच दरवडीवर जाऊन बसली; आणि तेथून आपण पडूं किंवा काय ह्याविषयीं कांहीं परवा न करितां मोठ्यानें हात वेळून विलक्षण आवेशानें आरडून बोलली:—"ऐका ! मेल्यांनो ! ए दुष्टांनो! ऐका—तुह्मीं आमच्या पवित्र अर्हद्धर्मास अतिशय त्रास दिला—तुह्मीं आमचे जती मारिले—तुह्मीं आमचे विहार सुद्धां कित्येक ठिकाणीं मोडून तोडून फरत केले—तर संभाळा दुष्टांनो ! आतां संभाळा—त्याबद्दल सूड घेणारा तुमचा बाप कर्दनकाळ येथें आला आहे!—त्यानें एका हातानें काळ फिरविली कीं मग तिच्यापुढें राजा असो कीं, प्रधान असो, कीं कोणी असो, ज्यांनीं ह्मणून या आमच्या अर्हद्धर्माला त्रास दिला आहे त्यांचें कांहीं चालणार नाहीं. येथून तेथून सगळ्यांच्या एकदम चक्का-

"आणि तो पलीकडे वाडा दिसतो आहे तोच **अर्धशाला**चा नव्हे काय?"

"होय. परंतु, बावा! चल कसा लौकर. आपल्याला कांहीं फार लांब जावयाचें नाहीं. चल असा त्या कुंपणाच्या बाजूनें चल. मला कांहीं आतां फार वेळ जगेनसें वाटत नाहीं!"

तो शिपाई होय ह्मणून त्या टेंकडीच्या दुसऱ्या बाजूनें खालीं उतरून तिनें सांगितल्या वाटेनें कांहीं वेळ चालल्यावर एका कुंपणाजवळ आला. त्या कुंपणाच्या आंत शेताचीं वगैरे कांहीं चिन्हें दिसत नसून आसपास गवत मात्र माजलें होतें. तसेंच समोरल्या अंगास एक उंच नीट उभा खडक असून त्यावरही झुडपें व गवत माजलें होतें. त्यामध्येंच **अंमे**च्या सांगण्यावरून चांचपतां त्याच्या हातास एका लहान गुहेचें तोंड लागलें. ह्या गुहेवरही गवताची व झुडुपांची गर्दी असल्यामुळें ज्यांस ती गुहा माहित नाहीं त्यांस तेथें गुहा असण्याचा संशय सुद्धां येण्याजोगा नव्हता. त्या गुहेंत तो शिपाई वांकूनच शिरला. आंत ती गुहा पुढें बरीच चांगली पुरुषभर उंच असून वीस पंचवीस हात खोल होती व तिच्या कापलेल्या दोन्हीं बाजूंवर कांहीं जुने कोरींव लेख लिहिलेले होते. व मध्येंमध्यें कांहीं महंतांचीं चित्रें कोरलेलीं असून तीं फार दिवस झाले होते तरी जशाचीं तशींच दिसत होतीं. त्यांचा कोठें भंग वगैरे झालेला दिसत नव्हता. या गुहेंत ती बाई रहात असे. तिची सर्व संपत्ति काय ती एक मळून मळून घाण झालेली फाटकी गोधडी, एक जुनें रकटें, दोन पंत्या, व एक चकमक इतकी होती. त्या पंत्यांपैकीं एकींत थोडें तेल घातलें असून एक बारीकशी वातीची जुळी होती. असो. आंत गेल्यावर त्या शिपायानें तिला त्या गोधडीवर निजवून, अगोदर ती चकमक झाडून दिवा लाविला. गोधडीवर पडल्यावर डोळे मिटून **अंमे**नें पुटपुटत कांहीं प्राचीन जतींचीं नांवें जपलीं, तेव्हा ती अंमळशी शांत झाली. इतक्यांत एकदम दचकल्यासारखी होऊन तिनें आपले डोळे उघडले, व जरी ती अगदीं मरावयास टेंकल्यासारखी दिसत होती, तरी ती आपले दोन्ही हात ताठ पसरून एकदम ओरडून बोलूं लागली.

"होय–होय–तोच!–त्याला बांधताहेत–न्यायाधीश वि–विचारताहेत–अगाई! ते पहा मेले मांग पुढें येऊन त्याला हो कबूल ह्मणताहेत!–आं–तो तो–कांहीं कबूल होत नाहीं–अगाई–ही मिर्च्यांची धुरी त्याच्या नाकाला लावली–आं–आं–तो कबूल झाला–अरे! चढविलें त्याला सुळावर! अरे! तो–पहा–सुळावर दिसतो आहे! तो!"

"कोण? कोण?" त्या शिपायानें आश्चर्यानें ह्मटलें.

"त्याचं तोंड आतां झाकलं आहे. परंतु तो दिसतो आहे तुझ्याचसारखा वाटतं! अरे थांब, तो मांग कायससं नांव घेत आहे–काय? तुझं नांव काय?"

"**शिलादित्य**!"

"होय! तेंच–तेंच नांव मी ऐकलं!"

इतकें बोलून तिनें एकदम मान टाकिली व तिचा जीव गेला.

**शिलादित्यास** तिच्या बोलण्याचें फार आश्चर्य वाटून तो कांहीं वेळ तिच्याकडे पहात स्तब्ध उभा राहिला. सरतेशेवटीं ती मेली अशी खातरी झाल्यावर तो तेथून एकीकडे वळला. आणि आपल्या हनवटीवर हात ठेवून विचारांत गढून गेला.

याच्या मुलांनीं नेहमी उद्योग करावा तितका त्याच्या हातून कधींही होत नसे किंवा एखादें काम हातीं धरलें तर तें अखेरपर्यंत तडीस पोंचवावें, ह्या गोष्टीचें त्यास कांहींच वाटत नसे. आईनें आलीकडे त्यास उपदेश करावयाचें बहुतेक टाकून दिलें होतें ह्मणून मीं मागें सांगितलेंच आहे; बाबा मात्र त्यास केव्हां केव्हां उपदेश करीत, व त्यावेळीं तो बाबांनीं सांगितलेल्या गोष्टी मुकाट्यानें ऐकून घेत असे, परंतु त्याप्रमाणें वर्तन करणें हें त्याचे हातून कधींही घडत नसे. बाबा आलीकडे त्यास कधींकधीं रास्त्यांच्या वाड्यांत घेऊन जात. त्यांनीं एक दोन वेळां त्यास रास्त्यांच्या कारभाऱ्यांसही भेटविलें होतें, व त्यांनींही हा मुलगा आणखी एक दोन वर्षे मोठा झाला ह्मणजे त्याची कोठें तरी हुजऱ्यांत किंवा बारगिरांत नेमणूक करूं ह्मणून आश्वासनही दिलें होतें, तरी गोविंदास मनापासून वाड्यांत जाणें कधींही आवडलें नाहीं, यासाठीं वाड्यांत जावयाची वेळ आली ह्मणजे तो आपल्याकडून होईल तितकी टाळाटाळच करीत असे.

माझा धाकटा भाऊ **कृष्णा**. त्याचें वय या वेळीं सुमारें ११ वर्षांचें होतें. आमच्या आईचें तेवढी एक गुप्त गोष्ट शिवाय करून बाकीचें वर्तन ज्याप्रमाणें नेहमी साधें व प्रामाणिकपणाचें असे, त्याप्रमाणेंच कृष्णाचेंही पण होतें. त्याचें वय जरी अकराच वर्षांचें होतें तरी तो दिसण्यांत चांगला बारा वर्षांचा वाटत असे. त्याचा तोंडवळा थेट आईसारखा असून त्याजकडे कोणीं पाहिलें तरी सहज त्यावर प्रेम बसावें अशा प्रकारचा तो होता. तो स्वभावानें उदार व दयाशील असून त्यास असत्याचा मनापासून कंटाळा असे. बुद्धीच्या मानानें ही तो गोविंदापेक्षां अधिक हुशार असून हा पुढें चांगला यशालाभास आला तर मोठ्या योग्यतेस चढेल असेंच सर्व लोक त्याविषयीं बोलत असत. व जरी आमच्या बाबांची साधारण बारगिरांतच असामी होती तरी कृष्णा हा मोठा भाग्यशाली निपजेल असेंच सर्वांस वाटे.

कृष्णाच्या पाठीवरील बहीण **यमुना**. ती या सुमारास नऊ वर्षांची होती. ती रूपानें आईच्याप्रमाणेंच सुरेख होती, तरी ती लहानपणापासून पहिल्या प्रतीची कज्जेदलाल, अप्पलपोटी आणि गर्विष्ठ अशी होती. ती प्रकृतीनें अंमळशी अशक्त असे, तरी बाबांच्या बरोबरचे बारगीर आमच्या घरीं येत ते ही मुलगी मोठेपणीं मोठी फक्कड बायको निपजेल असें आमच्या बाबांपाशीं बोलत. असो.

आतां राहिली सर्वांत धाकटी बहीण **जनी**. साधारण गरीब स्थितींत आह्मीं रहात होतों तरी बाबा व आई तीस फारच जपत, त्यामुळें ती सात वर्षांची झाली होती तरी तिचें बाळसें अद्यापि ह्मणण्यासारखें मोडलें नव्हतें. ती दिसण्यांत फारशी आईप्रमाणें नसून तिचा तोंडवळा बहुतेक आमच्या बाबांच्या धरणावर गेला होता. तिचे बाबा व आई नेहमी लाडच करीत, तरी, ती सदा आनंदी असून, कधींही कोणच्या गोष्टीविषयीं हट्ट करीत नसे. व तिजकडे पाहिलें ह्मणजे **यमुने**पेक्षां **जनी** सहस्रपटीनें चांगली असें सर्व बारगीर लोक बोलत.

एके दिवशीं आई घरांत डाळ तांदुळ निवडीत बसली होती. **कृष्णा**, मी, **यमुना** आणि **जनी** अशीं चौघेंही कोणी कांहीं कोणी कांहीं अशीं कामें करीत बसलों होतों. त्या वेळीं दिवस सुमारें एक प्रहर इतका आला होता. बाबा

रात्रीं घरीं येणं झालं ह्मणजे मला कोणाचं पत्र आलं आहे ह्मणून बोलूं नको अं? समजलासना **गोविंदा**! करशीलना मी सांगितल्या प्रमाणं?—माझा बाळ तो!" असें ह्मणून तिनें **गोविंदाची** हनवटी कुरवाळली.

तिच्या भाषणापासून **गोविंदास** कांहींच वाईट न वाटतां तो तिला ह्मणाला; "आई! तुझं किनई, जरकांहीं गुपित असेल तर मी कांहीं नाहीं बाबांजवळ बोलणार. परंतु एक—जर कधीं काळीं तूं मला त्या **सडक्या रामोशा** बरोबर हिंडतांना पाहिलंस, तर तूं त्याबद्दल यवढं सुद्धां अवाक्षर बाबांपाशीं बोलतां उपयोगीं नाहीं—आपला विचार कर— माझं नांव तूं घेऊं नको, मी तुझं नांव घेणार नाहीं, परंतु जरकां माझ्याबद्दल तूं बाबांना कांहीं सांगितलंस तर मी हें तुला पत्र आलं होतं व तूं तें चोरून ठेवलं हातंस ह्मणून सांगायला कधीं कमी करायचा नाहीं!"

"फार चांगलं बोलूं लागलास **गोविंदा**! आपल्या आईला असेंच उत्तर द्यावं ह्मणजे लोक तुला फार चांगलं ह्मणतील!" असें आई तोंडावाटे बोलली खरें. परन्तु तिचें चित्त बिलकुल ठिकाणीं नव्हतं. **गोविंदा** आपल्याला अशा प्रकारें उलटून बोलला हें तिला खरें वाटेना, तथापि धडधडीत डोळ्यांनीं व कानांनीं जी गोष्ट पाहिली व ऐकिली ती खोटी असंही तिच्यानें ह्मणवेना, अशी कांहीं ती गोंधळांत पडली. मस्तकास किंचित् भोंवळ येतेसें वाटून तिनें दोन्ही हातांनीं कपाळ दाबून धरिलें, व ती त्या वेळीं भिंतीजवळ टेंकून उभी नसती तर खालीं पडली असती अशी जरी तिची स्थिति झाली होती, तरी तिकडे लक्ष न देतां **गोविंदा** तिचा तिरस्कार करून तिला ह्मणाला, "आई! हें असलं तसलं कांहीं उपयोगीं नाहीं! माणसानं करारांत कसं अगदीं चोख असावं! तुला चोरून पत्रं येतात तें मी बोलणार नाहीं. आन् तूं ही मी त्या **रामोशा**बरोबर हिंडतों हें बोलत जाऊं नको ह्मणजे झालं—कां होतं आहे कीं नाहीं कबूल, कां आपलं—"

"देवा! देवा! **गोविंदा**! तूंच कां बोलतोस हें?" असें आई ह्मणाली, त्या वेळीं तिची मुद्रा अगदीं निराश झालेली मला दिसली.

परंतु **गोविंदानें** तिकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. उलटा तो मुकाट्यानें घरांत शिरला आणि त्याला कायसें एक पाहिजे होतें तें घेऊन बाहेर जावयास ह्मणून अंगणांत आला. इतक्यांत आईनें त्याला थांबवून ह्मटलें, "**गोविंदा**! अरे मी लहानपणापासून तुजवर इतकी ममता केली ती तूं सर्व विसरलास अं?

"तें मी कुठें नाहीं ह्मणतों आहें, परंतु आतां मी कांहीं लहान कुकूबाळ नाहीं, तो दुसऱ्यांनीं सांगितलेलं ऐकेन—तेव्हां मी सांगितल्याप्रमाणं मुकाट्यानं वागत जा, न् बाबांनीं एकादे वेळीं मी कुठं आहें ह्मणून विचारलं तर कामाला पाठविलं ह्मणून सांगत जा. तें जर तुझ्या हातून न होईल तर—ती खिडकी—तो काळा धटिंगण—**रामा** वेडा—हें पत्र—तूं घरांतून त्या धटिंगणाच्या मागोमाग बाहेर पडस—हें चट सारं बाहेर निघेल—संभाळ!"

"**गोविंदा**! पुरे आतां तोंड आटप. हें बोलणं तुला शोभत नाहीं!" असें मी पुढें होऊन बोलत आहें तों आईला घेरी आल्यासारखी झाली. व तिला सावरण्याकरितां मी पुढें हात करितें आहें, तों ती धाडकन जमिनीवर निश्चेष्ट पडली. तेव्हां मग काय विचारावें? घरांत जिकडे

तिकडे धांदल होऊन गेली. आईचें डोकें खालीं फरशीवर धाडदिशीं आपटल्यामुळें तिला दरदराऊन घाम आला. कपाळास दोन ठिकाणीं टेंगळें आलीं, परंतु खालची फरशी गुळगुळीत होती यामुळें कोठें रक्त निघाल्याचें कांहीं समजलें नाहीं. असो. ती खालीं पडल्यावर मी लगेच तिला उचलून बसवूं लागलें, इतक्यांत **गोविंदा**सही आपण बोललों याचा पश्चात्ताप वाटून तोही माझ्या बरोबर तिला उठवूं लागला, परंतु **कृष्णास** तें न आवडून त्यानें **गोविंदास** एका बाजूस लोटून ह्मटलें:— " **गोविंदा!** हा सर्व तुझा अपराध आहे! गप्प! बोलूं नको! " असें बोलत असतां **कृष्णा**च्या डोळ्यांतून खळखळ अश्रुधारा वाहूं लागल्या, तथापि त्यानें आणि मीं जेमतेम आमच्या निश्चेष्ट पडलेल्या आईला घरांत नेऊन आंथरुणावर निजविलें. **यमुना** आणि **जनी** अगदीं गोंधळल्यासारखीं होऊन आमच्या मागून खोलींत आलीं. व **गोविंदा**ही आंत येऊन दाराशीं उभा राहिला. असो, आंथरुणावर निजविल्यावर मीं तिच्या कपाळावर पाण्याच्या पट्या ठेविल्या व तिनें सावध व्हावें ह्मणून तिला वारा वगैरे घालून पुष्कळ खटपट केली. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. तिला **कृष्णा**नें व मीं उचलून आणून आंथरुणावर निजविलें त्या गडबडींत तिच्या ओंच्यांतून तें पत्र पडलें, परंतु आमचें कोणाचेंही तिकडे लक्ष गेलें नाहीं. आमचें सर्वांचें लक्ष आईकडे लागलें होतें तरी पुढें काय करावें हें कोणासच सुचेना. आई आंथरुणावर निश्चेष्ट पडली असतां मध्येंच तिचे ओंठ किंचित् हालत त्यावरून ती अद्यापि जिवंत आहे असें वाटे. मी तिला वारा घालीत बसलें. **कृष्णा** लहान तो विचारा अगदीं गोंधळून गेला. **गोविंदा** जवळ मुकाट्यानें उभा होता, व त्या वेळीं त्याच्या मुद्रेवरून त्याला आपण वाईट गोष्ट केली असें वाटून पश्चात्ताप झाल्याचें दिसत होतें. **जनी**नें आईची ती स्थिति पाहून एकसारखा रडण्याचा टाहो घेतला, व **यमुना** तिला समजावूं लागली तरी तिचें ह्मणून कांहीं रडूं थांबेना. असो. असा आमचा सर्वांचा कांहीं विलक्षण गोंधळ होऊन गेला असतां अकल्पित मला **राधाई मोरी**ची आठवण झाली. ही **राधाई** आमच्या घरापासून बरीच लांब राहत असे. तिच्या नवऱ्यास **रास्त्यां**च्या वाड्यांत बारगिराची असामी असून ती स्वतः कांहीं झाडापाल्यांचीं औषधें देऊन वगैरे घरखर्चाची भर करीत असे. ती स्वभावानें फार सज्जन असून औषध वगैरे देण्यांत कधीं कुचराई करीत नसे ह्मणून तिची प्रसिद्धि होती. तेव्हां तिला तरी बोलावून आणावें ह्मणून मीं **कृष्णा**ला व **गोविंदा**ला सांगितलें, तें ऐकल्याबरोबर ते दोघेही तडाक्यासरसे घराबाहेर पडले. ह्या गोष्टीला सुमारें पाव अर्धी घटका झाली, तरी आमची आई निश्चेष्टच पडली होती. तरी मध्येंच एकादे वेळीं तिची पापणी हललीशी वाटे, व ओंठही हालत होते तेवढ्यावरून, ती अद्यापि जिवंत आहे असें वाटे. मी तिच्या छातीस हात लावून पाहिला, तेथें माझ्या हाताला कांहीं धडधड लागली नाहीं. ओंच्यांतून पत्र पडलें तें तसेंच बिछान्याच्या पायथ्याशीं पडलें होतें, पण तें उचलून ठेवण्याची कोणालाही शुद्ध नाहीं अशी स्थिति होऊन गेली. तथापि तितक्याही गोंधळांत अगदीं स्पष्टपणें नाहीं तरी **गोविंदा** आपल्या ममताळू आईशीं फार निर्दयपणें वागला ही गोष्ट मध्यें मध्यें आठवल्यावांचून रहात नसे. असो.

अर्ध घटिका झाल्यावर **गोविंदा** बावांना घरीं घेऊन आला. त्यांना अगोदर **गोविंदानें** सगळी हकीकत कळविलीच होती, त्यामुळें आईची ही मृतवत् अवस्था झालेली पाहून त्यांना फारच वाईट वाटलें, व त्यांचेंही मन आतां काय इलाज करावा ह्मणून गोंधळांत पडलें.

" **राधाई मोरी** कुठें आहे? ती अजून नाहीं आली? " ह्मणून मी **गोविंदास** विचारलें.

" तिच्याकडे **कृष्णा** गेला, आन् मी जाऊन बावांना घेऊन आलों " असें **गोविंदा** ह्मणाला.

" हाय हायरे देवा! काय संकट हें! आई **कृष्णाबाई**! तूं तरी यावेळीं कांहीं दया कर, नाहीं पेक्षां माझी कांहीं धडगत नाहीं! " असें बोलून बावाही लहान **पोरां**प्रमाणें ओक्साबोक्शीं रडूं लागले.

त्यावेळीं मलाही अतोनात रडूं येऊं लागलें होतें तरी तें मोठ्या जुलुमानें दाबून मी बावांस ह्मटलें:—" बावा ! आपण सारींच जर अशीं रडत बसलों तर आईला सावध कोण करील? तुह्मी त्या **राधाई मोरी**ला किंवा दुसऱ्या कोणाला तरी आणायचं पहा. तों मी आईच्या कपाळावर गार पाण्याच्या पट्या ठेवीत रहातें!—नको पण—ही **राधाई**च आली, पहा! **राधाबाई**! या अशा येथें या ! "

मी असें बोलत आहें तों **कृष्णा राधाईस** घेऊन आंत आला. **राधाई** आईच्या आंथरुणावर बसून, तिनें पहिल्यानें तिची नाडी पाहिली, पुढें छाती दडपून कपाळाच्या दोन्ही बाजूच्या शिरा दाबून पाहिल्या. नंतर थोड्या वेळानें मला थोडेंसें पाणी व सहाण आणावयास सांगितलें. त्याप्रमाणें मी आणून दिल्यावर कसलीशी मात्रा उगाळून आईच्या तोंडांत घातली. व दुसरी कसलीशी एक मुळी तिनें बरोबर आणली होती, ती उगाळून तिचें अंजन डोळ्यांत घातलें. त्याबरोबर आई एकदम दचकल्यासारखी होऊन हळूहळू सावध होऊं लागली. त्यावेळीं **राधाईनें** " भिऊं नका. तुह्मांस कांहीं भ्यायला नको " ह्मणून आमचें समाधान केलें. कांहीं वेळानें आई बरीच शुद्धीवर येऊन तिनें डोळे उघडले, परंतु त्यांत नेहमीं जें कांहीं एक प्रकारचें सौम्यतेचें तेज झकाकत असे त्याचा लेशही दिसत नव्हता. डोळे फार निस्तेज झाले होते, तथापि त्यांवरून ती जिवंत आहे इतकेंच मात्र कायतें वाटण्याजोगें होतें. असो. डोळे उघडून एक दोन क्षण झाले असतील नसतील इतक्यांत तिनें फिरून डोळे मिटले तेव्हां मी घाबरून **राधाई**ला हळूच विचारलें;—"**राधाई**! खरेंच सांगा, तुमच्या पायां पडतें—आईला कांहीं इजा तर पोंचणार नाहींना? "

" नाहीं—बहुतकरून नाहीं—निदान माझ्या मात्रेचा गुण तरी असा आहे हें मी पक्केपणीं सांगूं शकेन. " इतकें बोलणें झाल्यावर कांहीं वेळ **राधाई** एकसारखी आईच्या तोंडाकडे पहात बसली; व शेवटीं तिनें " तुझ्या आईला कांहीं भ्यायला नको " ह्मणून मला हळूंच सांगितलें.

इतका प्रकार होत आहे तों बावांनीं मला एका अंगास बोलावून नेऊन हळूंच विचारिलें:—" **मथुरा** ! हा कसा काय प्रकार झाला हें मला कांहीं नीट समजलें नाहीं. **गोविंदानें** मला वाटेंत कायसेंसें बरेंच सांगितलें, परंतु त्या वेळीं मी अगदीं गोंधळलों होतों ह्मणून पुरतेंसें लक्षांत नाहीं, परंतु तो कसल्याशा एका पत्राबद्दल कायसेंसें ह्मणत होता इतकें मात्र आठवतें. तसेंच तो मला त्याबद्दल आईला

ओळख देऊं नका ह्मणून ह्मणाला हेंही स्मरतें–अरे! पण हें काय हें इथें पडलें आहे? अरे! हेंच तें पत्र वाटतें!" असें ह्मणून त्यांनीं झटदिशीं पुढें होऊन आंथरुणाजवळ पत्र पडलें होतें तें उचललें. व आतां तें फोडून उघडणार इतक्यांत त्यांचा मीं हात धरून त्यांस बाबा! तुह्मीं हें पत्र वाचूं नका" ह्मणून ह्मटलें. माझें हृदय धडधडूं लागून उजवा डोळा लवूं लागला. तेणेंकरून पुढें कांहीं तरी संकट येऊन गुजरणार असें मला पक्केपणीं वाटूं लागलें.

"छत्! वेडी पोर नाहीं तर! मथुरे! तूं मला पत्र कां उघडूं नका ह्मणतेस तें मला समजत नाहीं. ती माझ्यापासून कधीं कोणची गोष्ट चोरून ठेवीत नाहीं. यासाठीं तूं त्याबद्दल विनाकारण काळजी करूं नको. ती सावध झाल्यावर तरी मला पत्र दाखविल्याशिवाय कधीं रहाणार नाहीं!" असें बोलून बाबांनीं खुणेनें आंथरुणाकडे पाहिलें.

बाबा असे बोलले तेव्हां माझा नाइलाज झाला. आई आपण होऊन तें पत्र बाबांना दाखविणार नाहीं ह्याविषयीं माझी खातरी होती, परंतु तसें बोलून दाखविण्याची पंचाईत! तसेंच बाबा इतकें बोलल्यावर त्यांना पत्र उघडूं नका ह्मणावें तर तिकडूनही पंचाईतच! अशी मी अगदीं पेंचाटींत पडल्यासारखी होऊन वेड्यासारखी होऊन गेलें. तशांतूनही धैर्य धरून बोलावयाचें मनांत आणिलें असतें तर तसें करण्यालाही अवकाश नव्हता. कारण बाबांनीं मला वर सांगितल्याप्रमाणें उत्तर देऊन लागलेंच पत्र फोडलें व उघडून मनांतल्या मनांत वाचण्यास आरंभ केला. वाचीत असतां माझें सर्व लक्ष एकसारखें त्यांच्या तोंडाकडे होतें. इतक्यांत पत्र वाचतां वाचतां बाबा कावरेबावरे झाल्यासारखे मला दिसले, तरी तशा स्थितींतच त्यांनीं तें पत्र समग्र वाचिलें, व चांगलें दोन चार वेळ इकडून तिकडे व तिकडून इकडे असें उलटून उलटून पाहिलें. तथापि त्या पत्रांतील मजकूर खरा असावा अशी कांहीं त्यांची खात्री होईना. परंतु इतक्यांत एकाएकीं मनांत कांहीं विलक्षण विचार उत्पन्न होऊन त्यांची मुद्रा अगदीं उदास झाली. फिरून पहातें तों त्यांच्या मनांत कांहीं अतिशय राग व क्रोध आल्याचा मला भास झाला, व सरतेशेवटीं फिरून त्यांच्या चित्तांत उदासीनता उत्पन्न होऊन त्यांचें तोंड एकदम काळेंठिक्कर पडल्यासारखें झालें, त्याबरोबर त्यांस एक मोठा हुंदका येऊन "देवा! देवा!" अशीं अस्पष्ट अक्षरें त्यांच्या तोंडांतून निघालीं. हा सर्व प्रकार वर्णन करण्यास मला इतका वेळ लागला तरी वस्तुत: तो होण्यास पुरती एक दोन पळेंही गेलीं असतील नसतील. भयामुळें माझें तोंड तर अगदीं थिजल्यासारखें होऊन गेलें. तथापि पुनरपि धीर करून मी बाबांपाशीं कांहीं बोलणार इतक्यांत बाबा त्वेषानें आंथरुणाजवळ आले, आणि राधाईला एका अंगास सारून कांहीं वेळपर्यंत मुकाट्यानें आईच्या तोंडाकडे पहात राहिले. त्यावेळीं त्यांच्या तोंडावर क्षणोक्षणीं निरनिराळे विकार स्पष्टपणीं उमटलेले वाटत होते. बाबा आंथरुणाकडे आले त्या वेळीं मीही त्यांच्या मागोमाग आंथरुणापाशीं आलें व एकसारखी बाबाच्या तोंडाकडे टक लावून पाहत होतें, व त्या वेळीं त्यांची ती स्थिति पाहून कांहीं तरी भयंकर गोष्ट जी आजपर्यंत त्यांस ठाऊक नव्हती ती त्यांच्या एकाएकीं लक्षांत येऊन त्यांस अत्यंत आश्चर्य व खेद झाल्याचें त्यांच्या

मुखचर्येवरून स्पष्टपणें दिसत होतें, व त्या विचाराच्या भरांत ते आपल्या मनांत " देवा! देवा! अशी गोष्ट होईल का ? " ह्मणून ह्मणत असल्याचा मला भास झाला.

बावांची एकाएकीं अशी स्थिति झालेली पाहून **राधाई**स फार आश्चर्य वाटून तीही बावांकडे पहात राहिली. **गोविंदा** हा प्रकार पाहून अगदीं गहिंवरून गेला. आज कित्येक वर्षेंपर्यंत त्याची वृत्ति नीट नव्हती तरी त्यावेळीं तिचा त्याला अगदीं विसर पडल्यासारखें होऊन त्याच्याही डोळ्यांस पाणी आलें. **कृष्णा**स हा प्रकार काय आहे याचा कांहींच उमज पडेना. तो वेड्यासारखा होऊन भयानें आह्मां सर्वांच्या तोंडाकडे पाहूं लागला. **यमुना** आणि **जनी** हीं अगदीं भिऊन गांगरल्यासारखीं होऊन मागच्यामागें कोपऱ्यांत अंगाची घडी केल्यासारखीं होऊन उभीं राहिलीं. असो. एकंदरींत जिकडे पहावें तिकडे विस्मय, आश्चर्य, खेद व भीति यांशिवाय कांहींच कोठें दिसेना. इतक्यांत बावांना एकाएकीं आवेश येऊन ते सपाट्यानें एका बाजूस सरले. त्या गडबडींत त्यांस देहभान न राहून त्यांच्या हातांतून तें पत्र खालीं गळून पडलें. स्वप्नांत मनुष्य इकडे तिकडे फिरतो त्याप्रमाणें त्यांची कांहीं विलक्षण स्थिति होऊन ते दोन चार पावलें चालले इतक्यांत काय मनांत विचार आला असेल तो असो, त्यांनीं एकवार आह्मां सर्व मुलांकडे सावकाशपणें न्याहाळून पाहिलें, व सावकाश एक एक पाऊल याप्रमाणें मुकाट्यानें त्या खोलींत चोहोंकडे फिरून सर्वांस कडकडून मिठ्या मारल्या. या वेळीं मात्र त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या असून तोंडावर कांहीं विलक्षण उदासीनता व खेद हीं स्पष्टपणें दिसलीं. असो. याप्रमाणें सर्व मुलांस मिठ्या मारून झाल्यावर त्यांनीं पुनरपि एक वेळ आमच्या निश्चेष्ट पडलेल्या आईकडे वळून पाहिलें, व त्यावरोवर अरण्यांतील सिंह किंवा व्याघ्र जशी भयंकर गर्जना करितो तशी एकदम मोठी किंकाळी टाकून ते तडाक्यासरसे अंगणांत गेले व तसेच घराबाहेर पडून वेड्यासारखे रस्त्यांतून धांवत धांवत कोणीकडे नाहींसे झाले. त्यांच्या मागोमाग धांवत जाण्याच्या विचारानें **कृष्णा** दारापर्यंत गेलाच होता, व मीही त्याचे मागोमाग बावा धांवत गेले तिकडे जाणार, इतक्यांत काय झालें असेल तें असो, आमची आई चटकन आंथरुणांत उठून बसली. मग काय बावा घरांत तिच्याजवळ उभे असतांना त्यांची मनोवृत्ति कोणच्या प्रकारची होती हें तिला अंतर्ज्ञानानें समजलें असो, किंवा बावांच्या जाण्याची आणि तिच्या आंथरुणांत उठून बसण्याची काकतालीयन्यायानें गांठ पडली असो. कांहीं जरी असलें, तरी ती त्या वेळीं उठून बसली हें पाहून आह्मीं सर्वजण अगदीं भ्याल्यासारखीं झालों, व कोणासच कांहीं सुचेनासें झालें. आई उठून बसल्यावर तिनें घाबऱ्या घाबऱ्या चोहींकडे नजर फेंकिली, व त्या वेळीं तिच्या मुद्रेवरून आह्मीं सर्वजण कसकशीं कोठें उभीं आहोंत हें तिला समजलेंसें दिसत होतें, व तिच्या तोंडांत अद्यापि **राधाई**च्या औषधाचा अंश होता यामुळें पूर्वी आपण घेरी येऊन पडलें वगैरे प्रकारही तिला पूर्णपणें स्मरला असें वाटत होतें. हा सर्व प्रकार तिच्या मनांत येतो आहे नाहीं इतक्यांत बावांच्या हातून गळून पडलेलें तें पत्र फुटलेलें तिच्या दृष्टीस पडलें, त्यबरोबर ती एक भयंकर किंकाळी टाकून धाडकन आंथरुणावर पडली, व लागलीच तिचा प्राण गेला!!!

**मन्मथ**—तसेंच,

श्लोक.

कंजाक्षीची सुतनुलतिका हो न नम्रा ह्मणून
वेणीव्याजें सदय विधिनें दीधला हा उपष्टं;
हे ही पीनस्तनभरयुतीं रोमराजीमिषानें
नीला यष्टी सरस उदरीं स्थापिली यौवनानें.

(उघडपणें तिच्या सख्यांस) हे सुंदरीहो, तुमच्या सखीचा कुसुमापचयव्यवसाय सफल झाला?

**सख्या**—(नम्रपणें) होय. हे महाभागा! आतांच झाला.

**मन्मथ**—(आपणाशीं) कायहो प्रौढ हें भाषण! (उघडपणें) सुंदरीहो! ही तुमची सखी आपल्या हातांनीं फुलें तोडीत आहे, त्यामुळें हिच्या कोमल शरीरास फार आयास झालेसें दिसत आहे. कारण पहा.

श्लोक.

होऊनी श्रांत घर्में थबथबलि दिसे; स्रंसला केशभार;
अत्यंतश्वासयोगें कुचयुग धरितें कंप हा दुर्निवार;
सारीं युष्मत्सखीनें विखुडिलिं कुसुमें हीं जरी पांच सात
त्रासातें पावली हे कटि, अंरुणित ही अंगुली दीसतात.

**रति**—(लाजल्याचा भाव दाखविते.)

**सख्या**—हे महाभागा! आपल्या या मधुर भाषणाच्या योगानें आमच्या सखीच्या सर्व श्रमाचा परिहार झाला.

**म०**—(आपणाशीं) वाहवा! वाहवा! यांच्या या भाषणाचा अभिप्राय कांहीं निराळाच आहे! (मोठ्यानें) हे सुंदरीहो! जर मजविषयीं तुमच्या मनांत स्नेहभाव असेल तर या कोमल आम्रवृक्षाखालीं, अतिसुशीं चंद्रकिरणांच्या स्पर्शामुळें स्रवणारें, व चंदनाद्रीवरील वायूच्या संघर्षणामुळें शीतळ झालेलें, असें चंद्रकांत शिळेनें घडलेलें आळें आहे, यावर क्षणभर विश्रांति घ्यावी!

**सख्या**—(नम्रतापूर्वक) अहो महाभाग! हा आपला आह्मांवर अनुग्रहच झाला असें आह्मीं समजतों. (रतीकडे पाहून) सखी रति! पूर्वींचा कांहीं संबंध नसतांही आपणाशीं स्नेहभावानें वागणाऱ्या या महाभागाच्या वचनास अवश्य मान दिला पाहिजे.

(सर्वजण खालीं बसतात.)

**म०**—हे सुंदरीहो! हें तुमचें सौजन्य पाहून किंचित् बोलावें अशी इच्छा उत्पन्न होते आहे!

**सख्या**—महाराज! खुशाल बोलावें! आह्मीं ऐकण्यास तयार आहों!

**मन्मथ**—या सुंदरीच्या जन्मानें कोणचा कुलीन वंश अलंकृत झाला आहे बरें? तसेंच,

साकी.

ईच्या कमलमृदु अंगातें उटणें तैलहि नाहीं
लावियलें, त्यायोगें धूसर कांति हिची दिसते ही.
क्षौमातेंही असे नेसली, तेणेंकरुनी कांहीं
नियमानें ही आचरते कीं सांगा मज लवलाहीं.

**सख्या**—महाभागा! ही आमची सखी **रागमहाराज** व त्यांची भार्या **मुदिता** यांची कन्या होय. हिचें नांव **रति**. हिला आतां तारुण्यावस्था प्राप्त होऊन, सर्व त्रैलोक्यांतही हिच्याप्रमाणें दुसऱ्या कोणाही स्त्रीची लावण्यसंपत्ति नाहीं यास्तव हिला अनुरूप वर प्राप्त व्हावा एतदर्थ हिच्या पित्यानें आणि मातोश्रीनें हिला भगवती **सौभाग्य**-

१. कमलाप्रमाणें जिचे नेत्र आहेत अशी. २. चांगली शरीररूप वेल. ३. होवो. ४ वेणीच्या मिषानें. ५. टेंका. ६. फुलें वेंचण्याचा उद्योग. ७. गळून पडला, सैल झाला. ८. निवारण्यास कठिण. ९. तुमच्या सखीनें. १०. लाल झालेल्या.

१. एक प्रकारचें सोंवळ्याचें रेशमी वस्त्र.

दायिनी अंबेची आराधना करावयास सांगितलें आहे. प्रस्तुत ही नियमस्थ असून देवतापूजनार्थ स्वहस्तानें फुलें तोडिते त्याचें कारण हेंच !

**मन्मथ**–(समाधान पावून आपणाशीं) हिच्यावर जें माझें प्रेम जडलें आहे तें सफल होणें उपायसाध्य आहे यांत संशय नाहीं. (मोठ्यानें) वाहवा वाहवा! अशा उत्कृष्ट कन्यांस देवताप्रसाद संपादन करण्याची इच्छा असणें हें कुलीनता आणि संपन्नता या दोहोंस योग्यच आहे !

**रति**–(आपणाशीं) वाहवा ! काय सुंदर भाषण हें !

**सख्या**–महाराज ! हा आपला स्वाभाविक सरळपणा पाहून आह्मांस आपलें नांव काय आहे हें जाणण्याची इच्छा उत्पन्न झाली आहे.

**रति**–(आपणाशीं) त्हृदया ! असें संताप पावूं नको. कारण ह्या सख्या तुला इष्ट असाच प्रश्न विचारीत आहेत.

**मन्मथ**–हे सुंदरीहो ! पूर्वीं कधीं तुह्मीं **मन्मथाचें** नांव ऐकिलें आहे काय ?

**सख्या**–होय. खरें, पण त्याचें काय ?

**मन्मथ**–तोच मी !

**सख्या**–(एकमेकींशीं) काय भगवान् **लक्ष्मीवल्लभाचा** पुत्र, सौंदर्याची केवळ सीमाच, आणि सकल स्त्रीपुरुषांस विलासित्वाचा उपदेश करणारा असा **मन्मथ मन्मथ** ह्मणतात तोच हा काय ? (मोठ्यानें) हे महाभागा ! आपल्या दर्शनानें आह्मीं कृतार्थ झालों.

**मन्मथ**–हे सुंदरीहो ! ज्यांचें दर्शन अवश्य घ्यावें अशांच्या दर्शनानें माझेही नेत्र कृतार्थ झाले.

**रति**–(मदनावस्था झालीसें दाखविते.)

**मन्मथ**–(मदनावस्थ रतीकडे निरखून पाहून आपणाशीं) वाहवा ! वाहवा !

श्लोक.

रोमांचघर्मयुत शोभत गात्रयष्टी;
झांकी, फिरूनि उघडी, मिटि हे स्वदृष्टी;
तन्वी सुयौवनदशा नव पावली हे–
राहो अशीच विरही मन कांक्षिताहे!

**सख्या**–(रति आणि मन्मथ यांजकडे पाहून एकमेकींशीं) या उभयतांचा जोडपा तर उत्कृष्टच शोभण्यासारखा आहे. यासाठीं या उभयतांचा जर समागम घडून येईल, तरच **ब्रह्मदेवानें** यांस निर्माण करण्यांत इतकें कौशल्य खर्च केलें त्याचा उपयोग होईल.

**रति**–(तें ऐकून उत्कंठित होऊन आपणाशीं) पण बाई ! माझ्या इतकें कोठचें नशिवीं असणार ?

(इतक्यांत एक दासी येते.)

**दासी**–राजकन्ये ! आईसाहेब पूजेची सर्व तयारी करून तुझीच वाट पहात उभ्या आहेत, यास्तव देवालयांत जाण्याची त्वरा कर.

**मन्मथ**–(वाईट वाटून आपणाशीं) अरेरे ! निरंतर अमृतवृष्टि करणाऱ्या मेघमालेकडे चातक एकसारखा पहात रहातो, त्याप्रमाणें मी या सुंदरीकडे पहात असतां, मध्येंच वावटळ यावी तशी ही आली ! काय करावें ?

**रति**–(दुःख पावून आपणाशीं) हाय रे दुष्टा दैवा! क्षणभर कोठें मी नेत्रानें अमृताचा[1] उपभोग घेत होतें, तें देखील तुला सोसलें नाहीं ना !

(असें ह्मणून जाण्याविषयीं सख्यांकडे पाहूं लागते.)

**सख्या**–(मन्मथास उद्देशून) हे महाभागा ! आपलें निरंतर दर्शन होत असावें अशी इच्छा आहे, यासाठीं पुनरपि आपल्या दर्शनसुखाचा लाभ घेण्यास आज्ञा असावी !

१. अमृताची पक्षीं पाण्याची वृष्टि.

**मन्मथ**–( नम्रतेनें ) फार उत्तम आहे ! आपलें इच्छित साधण्याकरितां आतां यावें तुह्मीं. आणि तुमच्या परस्पर हितगुजांच्या गोष्टी चालतील त्यावेळीं मात्र या जनाचें स्मरण होत असावें !

**रति**–( आपणाशीं ) हे महाभागा ! तूं माझें सर्व त्हदयच हरण केलें आहेस. तेव्हां आतां स्मरण करण्याचें माझ्याकडे काय आहे ?

**सख्या**–महाभागा ! आमचीही पण आपणांस अशीच विज्ञापना आहे !

**रति**–( आपणाशीं ) काय करावें बाई माझ्यानें कांहीं येथून जाववत नाहीं ! परंतु आईच्या आज्ञेपुढें माझा निरुपाय आहे !

( मोठ्या संकटानें सख्या आणि दासींसहवर्तमान निघून जाते. )

**मन्मथ**–( दुःख पावून ) अहो ! काय सांगावें ? सुख जेथें आहे, तेथें विघ्नें आहेतच ! हेंच पहा, मी त्या नेत्रांस आनंद देणाऱ्या चंद्रिकेकडे पहात होतों इतक्यांत भलत्याच वेळीं मध्यें ढग येऊन ती दिसनाशी व्हावी त्याप्रमाणें माझें प्रतिकूल दैव मध्यें येऊन ती माझ्या दृष्टीआड गेली ! असो. तर इचें पाणिग्रहण करण्यास काय वरें उपाय योजावा? ( चिंतायुक्त होतो, व कांहीं वेळानें समाधान पावून ) वाहवा ! वाहवा ! भगवती परदेवतेची[1] चतुर्थावरणदेवता[2] **सर्वार्थसाधिका**[3] तिचें मजवर अत्यंत प्रेम आहे, यास्तव तिचीच या कामीं योजना केली असतां ही लावण्यखनि[4] आपणास प्राप्त होईल यांत संशय नाहीं. तर ही योजना करण्याचें काम माझा **मंत्री वसंत** ह्यास सांगितलें पाहिजे.

( आठवण झाल्या . सारखें करून )

अरे! मी प्रियेच्या दर्शनसुखांत निमग्न होऊन या राघूस खाऊं घालावयाचें तसेंच विसरलों!

( असें ह्मणून धनुष्यानें तीर मारून दुसरें एक आम्रफळ खालीं पाडून तें राघूच्या तोंडांत घालितो. )

( इतक्यांत पडद्यांत मंगलकारक शंखाचा ध्वनि-झाल्यानंतर वैतालिकाचा शब्द होतो )

श्लोक.

या उन्नालांबुजांच्या[1] बसुनि अतिसुखें शीतला सावलींत,
चंचूनें एकमेकांप्रति मृदुल बिसें चारितें हर्षयुक्त,
तें ह चक्रांगिकांचें[2] मिथुन रमतसे मध्य-अन्हींहि येथें.

**मन्मथ**–( तें ऐकून उत्कंठित होऊन ) वाहवा ! वाहवा ! हा वैतालिक फार चांगलें बोलला. असेंच आहे, कारण,

श्लोकाचा चवथा चरण

ज्याच्या जेथें मनाची जडलि रतितया सौख्यही नित्य तेथें.

( वरपाहून ) काय ! भगवान् उष्णरश्मि[3] आकाशाच्या मध्यभागीं आला !

श्लोक.

वेगें चालुनि दीर्घ वाट गगनीं हा भास्कर[4]स्यंदन
झाला कुंठित अर्धमार्गिंच पहा पावे नचि स्पंदन[5].
वाटे कीं गरुडाग्रभू[6] अरुण हा भास्वद्रथाच्या[7] हयां
स्वर्गंगाजलिं[8] पाजुनी भुवुनियां विश्रांति देतो तयां.

तर आतां प्रियतमेच्या विरहामुळें माझें अंतःकरण संतप्त झालें आहे यासाठीं मी सर्व प्रकारच्या दुर्वार[9] तापांचेंही हरण करणाऱ्या आणि या **नंदनवनाच्या** बाजूनें वाहणाऱ्या ह्या **मंदाकिनींत**[10] स्नान करून मध्यान्हविधि आटपून घेतों.

( निघून जातो. )

१. प्रधान अथवा मुख्य देवता. २. चवथी निकटवर्ती देवता, उपदेवता किंवा अंग देवता. ३. सर्व मनःकामना पूर्ण करणारी. ४. लावण्याची खाणच अशी रति.

१. ज्याचे देंठ उभे राहिले आहेत अशा कमळांच्या. २. चक्रवाक पक्ष्यांचें. ३. सूर्य. ४. सूर्याचा रथ. ५. हालणें. ६ गरुडाचा वडील भाऊ. ७. सूर्याच्या रथाच्या. ८. स्वर्गंगा ह्म. भागीरथी तिच्या जलांत. भागीरथीची उत्पत्ति स्वर्गांत किंवा आकाश लोकांत असून तिच्या तेथील मानलेल्या प्रवाहास 'आकाशगंगा' ह्मणतात हें सर्व प्रसिद्धच आहे. ९. निवारण करण्यास कठिण १० स्वर्गंगा किंवा भागीरथी.

## अंक २.

( तदनंतर दोन चेटया प्रवेश करितात. )

१ **चेटी**–सखे **मयूरिके** ! काय बाई मोठें आश्चर्य आहे ! ही आपली राजकन्या नुकती नुकती एवढीशी होती ती आतां किती पण मोठी दिसूं लागली आहे !

२ **चेटी**–सखे **शारिके** ! आपल्या राजकन्येस आतां यौवनदशा प्राप्त झाली आहे हें तुला ठाऊक नाहीं वाटतें ! अगे काय चमत्कार आहे पहा !

श्लोक.

लागे गांठ दिसावया; इतुकियामध्येंच पूगाअसे
होती, तोंचि दिसावयास करिती जंबीरेमाळूंसे;
नेणों तत्कुच एक दोन दिवशीं होतील मोठे किती.
कोठें अंतर बाहुचें, स्तनभरोत्क्रांती कुठें ही अती !

**शारिका**–होय खरेंच बाई तूं ह्मणतेस तसेंच! आतांशीं कीं नाहीं, आपली राजकन्या

श्लोक.

चित्रस्थों मिथुनांकडेस रमत्या साकूतही पाहते;
पाचोळीविहतांतही मिथुनसें एकांतिं ही मानिते;
हो उत्कंठित नाटकीं परिसुनी स्त्रीपुंश्चरित्रांप्रती;
त्यावेळीं सखिनीं तियेस पुसतां लज्जा बहू पावती.

आणि ह्मणूनच वाटतें बाई, आलीकडे हिचा बाप आणि आई हीं दोघेही हिच्या योग्य असा जांवई कसा मिळेल या काळजींत असतात !

**मयूरिका**–सखे, कोणाचेंही असो, कन्या आणि पिता हें नातें नेहमी काळजीचें घरच आहे यांत संशय नाहीं.! ( आठवण झालीसें दाखवून ) कोणी अनुभविक पुरुषानें असें ह्मटलें आहे.

श्लोक.

कन्या पहा उपजतांक्षणिं घोर चिंता
तातांप्रती उपजवी सहसा दुरंतां.
मोठी वयें जसजशी मग होत जाते
दुःखाप्रती तसतशी अधिकाचि देते.

**शारिका**–सखे **मयूरिके** ! काल रात्रीं हिचा बाप आणि आई अशीं दोघें वरांच्या गोष्टी बोलत होतीं, त्यावेळीं **मन्मथाची** काय प्रशंसा चालली होती ती तूं ऐकलीसच.

श्लोक.

पिता साक्षात् शार्ङ्गी, तशिच जननी लोकजननी,
विधी ज्येष्ठ भ्राता, जनक मघव्याचा अनुजनी,
उमा आत्या. मातामह जलनिधी, मातुल शशी,
स्वयेंही पुष्पेषू, असुलभ गुणश्री जगिं अशी.

अशी तर प्रशंसा चालली होती, मग कन्येच्या जिवास संताप होत आहे ही गोष्ट कर्णोपकर्णीं बापास कळली असतांही तो परस्परांस योग्य अशा उभयतांचा पाणिग्रहणविधि कां बरें करीत नाहीं ?

**मयूरिका**–सखे, तूं वेडी आहेस. तुला लोकव्यवहार माहित नाहीं असें वाटतें. अगे, वरपक्षाकडूनच वधूविषयीं मागणी आली ह्मणजे चांगलें.

**शारिका**–तर मग ही गोष्ट घडून येणार कशी?

**मयू०**–सखे, त्याविषयीं काळजी करणें नलगे. कारण आपल्या राजकन्येनें **परदेवतेची** आराधना केली, तीमुळें ती संतुष्ट होऊन तिनें स्वतःच **रतीच्या** आईकडे तिचीच लहानपणची मैत्रीण भगवती **सर्वार्थसाधिका** ईस पाठविलें आहे. ती सर्व अर्थ साधील यांत संशय नाहीं.

---

१. पोफळ. २. महाळुंग. ३. बेलफळ. ४. स्तनाचें वर उचलून येणें. ५. चित्रांत काढलेल्या. ६. स्त्रीपुरुषांच्या जोडप्याकडे. ७. साभिप्राय. ८. एकप्रकारची क्रीडा. ९. स्त्रिया आणि पुरुष यांचें चरित्र.

१. शेवट होण्यास कठिण. २. विष्णु. ३. लोकजननी किंवा लोकमाता. हें लक्ष्मीचें नांव. ४. इंद्राचा ५. धाकटा भाऊ. ६. पुष्पाचें केले आहेत इषु ह्मणजे बाण ज्याचे असा मदन. ७. गुणसंपत्ति.

निघ! तोंड आपलें काळें कर! खबरदार! फिरून राजसबाईच्या महालांत जाशील किंवा तिच्याजवळ यशवंतरावाच्या मृत्यूची गोष्ट काढशील तर!—तसेंच खबरदार! राजसबाईला मी त्रास देतों याविषयीं पुनरपि माझ्यापुढें एक चकारशब्द बोलशील तर!—अः—राजसबाईचा मी उपभोग खचित घेणारच जर ती न कबूल करील तर तिचा या—या—हातानें—(त्वेषानें निघून जातो.)

**गजरा०**—हरहर! हतभाग्य विचारी राजसबाई! ती ह्या सर्व कोंकणपट्टीची मालकीण असतांना तिची अशी दुर्धर स्थिति व्हावीना! हरहर! राजसबाई तुझ्याकरितां माझा जीव तिळतिळ तुटतो, परंतु काय करूं! तुझ्यावर कोणते अघोर प्रसंग येऊन गुदरणार कांहीं समजत नाहीं. (स्तब्ध रहाते, व कांहीं वेळ विचार केल्यासारखें दाखविते.) असो. राजसबाईचें ह्मणणें फक्त आपली कशी तरी येथून सुटका होऊन आपल्या बापाच्या गांवीं जाऊन रहाण्यास सांपडावें एवढेंच आहे, कांहीं, चिंता नाहीं अद्यापि मजविषयीं कोणाच्या मनांत कांहीं संशय नाहीं, तोंपर्यंतच इची सुटका करण्याची कांहीं तरी युक्ति करितें. एकदाची हिची येथून सुटका झाल्यावर मागें बाबा रागावून माझें कांहींही करोत. त्याबद्दल मी मुळींच पर्वा करीत नाहीं! मी यामध्यें कोणची ही पापाची गोष्ट करितें असें मला वाटत नाहीं, यासाठीं परमेश्वर माझा सहाकारी होईल! देवा! कसेंही करून माझ्या हातून त्या बिचाऱ्या राजसबाईची सुटका होऊंदे. ती एकदाची झाली ह्मणजे बाबांच्या सर्व पापाचरणा बद्दल मला स्वतः प्रायश्चित भोगावें लागलें, तरी तें मी स्वसंतोषानें भोगीन!

(निघून जाते.)

## अंक २.

**प्रवेश १.**—राजवाड्यांतील राजसबाईचा महाल.

(राजसबाई एकटी बसली आहे.)

**राजस०**—परमेश्वरा! काय ही माझी दुर्धर स्थिति! देवा! नारायणा! कायहा मजवर गहजब! प्राणपतींचा तशा प्रकारें अंत झाला त्या दुःखांत मी चूर आहे, तों माझ्या प्रियपुत्राचीही तीच अवस्था झाली! परमेश्वरा! तूं पूर्ण न्यायी असतां तुझ्या राज्यांत हा असा अन्याय व्हावाना? त्या दुष्ट घातकी दौलतरावानें माझ्या विचाऱ्या निरपराध प्राणपतींचा आणि कोमल बाळकाचा निर्दयपणें घात केला, आणि हल्लीं माझ्या पातिव्रत्याचा भंग करण्याचा त्याचा सदोदित यत्न चालत आहे या गोष्टी तुझ्यानें मुकाट्यानें पहावतातना!!! देवा! कौरवसभेंत द्रौपदीमातेची दुष्टांनीं विटंबना केली त्यावेळीं तिचा धांवा ऐकून तूं त्या साध्वीची लज्जा रक्षण केलीस, त्याप्रमाणें मज अबलेची इतकी विटंबना होत असतां व या संकटांतून मला सोडीव ह्मणून मी तुझा निरंतर धांवा करीत असतां, माझी लज्जा रक्षण करण्याचें तुला संकट वाटलें ना! देवा! भक्तांची दीनवाणी श्रवण करून तुझें अंतःकरण द्रवतें आणि तूं त्यांचें रक्षण करितोस अशी तुझी सनक सनंदनादिक महामुनि ख्याति वर्णन करीत असतात, तिचा अनुभव मज हतभाग्येला कां बरें येत नाहीं? त्या दुष्टानें प्रत्यक्ष तुझ्या देव्हाऱ्या समोर माझ्या प्रिय-

प्राणपतींचा घात करून मी त्यांचे बरोबर सती जात असतां मध्येंच विघ्नही करून मला कारागृहीं ठेविलें, आणि प्रत्यहीं माझा छळ करीत आहे, ह्यांत माझी विटंबना होत नाहीं असें तुला वाटतें काय ? देवा ! प्रत्यहीं हा दुष्ट मजकडे येतो. आणि कुलस्त्रियांनीं ऐकूंही नये अशी बडबड करून मला अनिवार ताप उत्पन्न करितो, ह्याची तुला कांहींच कींव येत नाहीं ? माझ्या निरपराध बाळकाचा मारेकऱ्यांकडून या दुष्टानें घात केला याजबद्दल तुझ्या ह्रदयास कांहींच द्रव येत नाहीं ? असो. तुझ्याकडे तरी काय दोष आहे? मीच चांडाळीण! माझीं पूर्व जन्मींचीं कर्मेंच तशीं अघोर असतील, ह्मणूनच तूं माझ्या दुःखाची उपेक्षा करीत असशील ! असो. तूं पूर्णन्यायी आहेस! तूं ठेवशील तसें आह्मां मानवांस रहाणें प्राप्त आहे ! परंतु देवा! आतां माझी उपेक्षा नको करूं! पहा ! मला हा माझा जीवही नकोसा झाला आहे, याकरितां दया करून एकवार माझा अंत तरी कर ! देवा ! (इतक्यांत मालोजी येतो त्यास न ओळखून.) हा पहा दुष्ट माझा पुनरपि छळ करण्याकरितां येत अहे. देवा ! याचे हातून मला सोडीव ! देवा !देवा ! देवा ! (मूर्छित होते..)

**मालो०**—(आपणाशीं) धिक्कार असो या सेवेला ! हा अधमपणा पत्करून मी दिवस कंठित आहे, तो केव्हां सरेल तो सरो. जो हेतु मनांत धरून मी या दुष्टाची सेवा पत्करिली तो आज सर्वथा विफल होण्याची वेळ आली आहे ! या दुष्टाची पापवासना तृप्त करण्यासाठीं या **राजसबाईचें** मन वळवावें ह्मणून मला इकडे पाठविलें आहे! देवा! या माउलीनें त्या दुष्टास वश व्हावें हे शब्द माझ्यानें बोलवतील तरी कसे ! (स्तब्ध उभा रहातो, व कांहीं वेळ विचार करून) असो. कांहीं चिंता नाहीं. बोलतांच हे शब्द बोलणें ह्मणजे कसें जिवावर येतें. परंतु बोलल्याशिवाय परिणाम नाहीं ! प्रसंगाकडे लक्ष दिलें पाहिजे ! (पुढें येतो इतक्यांत राजसबाई मूर्छित पडली आहेसें पाहून) अरे हें काय ?—आईसाहेब! सावध व्हा सावध व्हा ! (तीस वारा घालितो.)

**राजस०**—(हळू हळू सावध होऊन) अरे दुष्टा तूं अद्यापिही माझा छळ करणें सोडीत नाहींस! दुष्टा ! हो पलीकडे ! खबरदार माझ्या अंगास स्पर्श करिशील तर !—

**मालो०**—आईसाहेब ! आपण मला ओळखिलें नाहीं ! आईसाहेब ! मी **मालोजी** आहे **दौलतराव** नव्हे !

**राजस०**—कोण ! **मालोजी** ! दुष्टा ! तूं खोटें बोलतोस !

**मालोजी०**—नाहीं आईसाहेब ! मजकडे नीट पहा ! मी आपलाच इमानी चाकर **मालोजी** आहे.

**राज०**—(त्यास ओळखून) **मालोजी**! माफ करा ! मी तुह्मांस ओळखिलें नाहीं ! मला वाटलें तो दुष्ट माझा छळ करण्याकरितां आला आहे ! असो. **मालोजी** ! आपण काल बोलत होतां ती गोष्ट झाली हो ! माझा बाळ मला सोडून गेला हो ! (शोक करिते.)

**मालो०**—(डोळ्यांत पाणी आणून आपणाशीं) काय ! एकून हिला **यशवंतरावाच्या** मृत्यूची हकीकत कळली अं! आः—दुष्टा निर्दया!

राज०–(रडत रडत) **मालोजी** ! आतां माझा बाळ मला भेटेल कांहो ! बाळा ! बाळा ! अरे प्राणपतीच्या मागें तूच कायतो माझ्या जिवास आधार होतास तो तूंही मला सोडून गेलास ना !–देवा **वैकुंठाधीशा** ! दैत्यांचा संहार करणारी ती गदा दुष्ट **दौलतरावा**च्या मस्तकावर कां घालीत नाहींस ! देवा ! याच दुष्टानें–

**मालो०**–आईसाहेब ! आतां शोक करून काय उपयोग ? प्राप्तकालास अनुसरून धैर्याचें अवलंबन करणेंच आपणासारख्यांना उचित होय. आपणावर आकाशच कोसळलें, ही गोष्ट खरी, तथापि आपण जर अशा शोक करूं लागलां तर आह्मांसारख्या आपल्या गरीब दासांनीं काय बरें करावें ? आईसाहेब ! मी आपणांस ह्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगाव्या अशी माझी योग्यता नाहीं, तथापि सांगतों. आपण धैर्य धरून आज सतत सात वर्षें जशीं काढिलीं तसेंच आणखीही कांहीं दिवस काढावेत. देव सुदिन दाखवील तर अद्यापिही आपण या सर्व संकटांतून मुक्त व्हाल !–

**राजस०–मालोजी**! तुह्मीं ह्मणतां या सर्व गोष्टी खऱ्या, परंतु माझा बाळ ही मला सोडून परलोकास गेला, आतां मला सुदिन तो कसचा येणार! आणि देव तरी माझी या संकटांतून सुटका कशी करणार ! एक– तो माझ्या अयुष्याचाच अंत करील, तरच मात्र माझी सुटका होईल! एरवीं नाहीं!

**मालो०**– आई साहेब! आपण माझें ह्मणणं समजलां नाहीं! आपणावर अघोर प्रसंग येऊन गुदरले, व आपणास आमचे थोरले महाराज, व बाळ महाराज दोघे ही अंतरले या सर्व गोष्टी खऱ्या. तथापि आह्मीं प्रजा ह्मणजे आपलीं लेंकरेंच आहोंत, यास्तव आह्मां गरीबांकडे पाहून, व आह्मांस हल्लीं जीं अनिवार संकटें भोगावीं लागत आहेत त्यांकडे लक्ष देऊन, पुनरपि आपल्या प्रजांचें समाधान करणें आणि त्यांस सुख देणें ह्या गोष्टी आपणांकडेच आहेत. प्रस्तुत आपणांवर काळचक्र फिरलें आहे ही गोष्ट खरी, तथापि देव करीऊ तर अद्यापि ही या दीन अनाथ प्रजांचें समाधान आपण कराल! आई साहेब! **दौलतरावराजा**–

**राण०–मालोजी** ! तुह्मीं शुद्धीवर आहां काय? **राजा** कोणास ह्मणतां? राजा कोण?

**मालो०**–आईसाहेब ! **दौलतरावानें** आपणास **राजा** हा किताब घेतला आहे !

**राजा०**– सत्यानास होवो त्या मेल्याचा ! आग लागो त्याला न् त्याच्या धाडसास ! काय? **मालोजी** ! त्या नीचानें राजा हा किताब घेतला आहे काय ? हाय हाय! दुष्टा ! नीचा ! कृतघ्ना ! अरे दोन निरपराध प्राण्यांस विश्वास घातानें ठार मारून आपण राजा! राजा ! ह्मणून डांगोरा पिटवून घेतोस यांत पुरुषार्थ तो कोणचा ! मेल्या तुझा सत्यानास होईल ! आणि इतकीं सर्व दुष्कर्में करून जो मोठेपणा तूं आपल्या अंगीं मिरवूं पहात आहेस त्यापासून तुला कदापि सुख होणार नाहीं! मेल्या ! हल्लीं तूं ज्याप्रमाणें मज अबलेची स्थिति केली आहेस, त्याप्रमाणेंच तूं एवढा पुरुषासारखा पुरुष असूनही तुझी स्थिती होईल ! आणि सरते शेवटीं मेल्या ! यम

लोकांत आगीच्या खाईत तुला पडावें लागेल ! मेल्या — पण **मालोजी** ! काय-हो ! माझ्या प्रिय प्रजांची या दुष्टानें अशी स्थिति केली आहे. तींतून त्या केव्हां मुक्त होतील त्या होवोत, परंतु आ-तां प्राणपती आणि माझा **यशवंतराव** यांच्यामागें आतां मज दुबळीला आधार कायतो तुमचाच आहे ! तर मला खरेंच सांगा ! **मालोजी** ! तुमच्या पायां पडतें—

**मालो०**—छे छे ! आईसाहेब—हें काय? मी आपलें लेकरूं आहें. आपण सांगाल त्या-प्रमाणें वागण्यास तयार आहें !

**राज०**— मालोजी! मला कीं नाहीं, इतःपर या राजवाड्यांत रहाण्यापेक्षां प्रत्यक्ष नरकवास ही बरा असें वाटूं लागलें आहे. या करितां तुह्मांस विचारितें, माझी येथून सुटका होण्यास तुह्मास कांहींच उपाय सुचत नाहीं? एकदाची जर माझी यें-थून सुटका होईल, तर मीं खुशाल अनवाणी अन्नपाण्याशिवाय ही आप-ल्या बापाच्या घरापर्यंत चालत जाईन ! तर सांगा—**मालोजी** !

**मालो०**—येथून सुटका होऊन जाण्याची अशा व्यर्थ आहे ! त्या दुष्टास तुह्मीं त्या-चा द्वेष करितां हें पक्कें माहित आहे, व यासाठीं त्यानें आपल्या महालासभोंव-ती रात्रंदिवस सक्त पहारा ठेविला आहे ! ह्मणून मी आपणास एवढीच विनंति करि-तों कीं आपण विनाकारण त्यास चिडवूं नका. आपण त्याच्याशीं निष्ठुर भाषण करा-ल तर हल्लीं आहे त्या पेक्षांही तो आपणा-स अधिक त्रास देईल ! या साठीं त्याच्याशी सौम्य रीतीनें बोला, व तो कांहीं बोलला तरी नुस्तें त्यास हो हो करी-त चला. ह्मणजे अशा युक्तीनें कदाचित् सुटका झाली तर होईल !

**राजस०**— काय ? ज्या नीचानें माझ्या प्राणप्रियाचा आणि बाळकाचा निर्दय-पणें वध केला त्याच्याशीं मी सौम्य रीती-नें बोलूं काय ? आणि त्याच्याशीं गोडी-गुलाबीनें वागून आपली सुटका करून घेऊं काय ? **मालोजी** तुह्मांस खचित सांगतें, या गोष्टी करण्यापेक्षां मी मरा-वयाचें पडलें तरी त्याबद्दल मला कांहीं वाईट वाटावयाचें नाहीं ! हायहाय हे प्राणपती ! हायहायरे माझ्या लाडक्या बाळा ! चला मीही तुह्मां मागून आलेंच !—

**मालो०**—आईसाहेब! असा जर आपला निश्चय आहे, तर आपण **दौलतरावास** भेटावया-च्या नाहीं असें मला वाटतें !

**राज०**—होय. मी त्या दुष्टाचें तोंड काळें कां गोरें कसें तें पहावयाची नाहीं. परंतु जर कदाचित् पहावयाची वेळ आलीच तर त्यास मी अशा शिव्या देईन न् त्याच्या बेचाळीस पिढ्यांचा पण असा उद्धार करीन कीं कधीं देखिली होती कीं नव्हती !

**मालो०**—आईसाहेब! काय ह्मणतां आपण? त्या दुष्टाच्या पापाचरणाबद्दल त्याचा सूड घे-ण्याचें सोडून त्यास आपण नुसत्या बायकां-सारख्या शिव्याच देत बसणार !

**राज०**—काय, काय ह्मणतां, **मालोजी** ? सूड—सूड ! **मालोजी** ! सूड कसा घ्यावा हें मला सांगा तर पाहूं ! मज अबलेच्या हातून होण्यासारखी अशी कांहीं गोष्ट असली तर मला सांगा ह्मणजे मी ती करावयास कबूल आहें !

**मालो०**— दुसरी तिसरी कांहीं गोष्ट नाहीं, तोंड देखलें गोड गोड बोलून कशी तरी त्याजपासून परवानगी घेऊन आपल्या वडिलांकडे जा, आणि त्यांस आजपर्यंत या दुष्टाचे हातून जीं दुःखें सोसावीं लागलीं आहेत तीं कळवा. ह्मणजे ते कांहीं तरी तजवीज करून या राजश्रींचा चांगला समाचार घेतील ह्यांत संशय नाहीं !

**राज०**— होयहोय ! खचित **मालोजी** ! शाबास ! तुमची मसलत मला मान्य आहे, आणि सर्व अंतर्याम पहा कसें या दुष्टाचा सूड केव्हां घ्यावयास सांपडेल ह्मणून अगदीं संतप्त होऊन गेलें आहे ! **मालोजी** ! धन्य धन्य तुमची ! आतां **दौलतराव** आला ह्मणजे त्याच्याशीं मी विशेष नम्रतेनें वागेन ह्मणजे त्याचा डौल उतरल्या सारखा होईल! या युक्तीनें स्वतंत्र होऊन मी आपल्या बापाकडे निघून जाईन, आणि तेथें गेल्यावर त्यास आपलीं दुःखें साद्यंत निवेदन करीन. ह्मणजे त्याचा क्रोधाग्नि प्रदीप्त होऊन तो आपल्या सर्व सैन्यासहवर्तमान या दुष्टा अधमावर एकदम येऊन हल्ला करील ! व या प्रसंगीं जे जे ह्मणून योद्धे वावा बरोबर घेऊन येईल ते सर्व माझ्या आजपर्यंत भोगलेल्या अनंत दुःखांबद्दल सूड घेण्याचकरितां काय जणो आपल्या तरवारीच्या पात्यांस विष सारवून येतील ! अहाहा !

**मालोजी**— आई साहेब ! धन्यधन्य मातोश्री ! असा जर आपला उल्हास कांहीं दिवसपर्यंत टिकेल तर खचित सांगतों आह्मां दीन प्रजांचें नशीब उघडावयास फार दिवस लागणार नाहींत ! परंतु आईसाहेब ! आपणास एक गोष्ट सांगावयाची आहे ती हीच कीं, आपणास स्वातंत्र्य जर पाहिजे असेल, तर आपल्या बालमहाराजांच्या मृत्यूबद्दल चकारशब्द सुद्धां काढूं नका, व जसें कांहीं ते जिवंत आहेत असेंच तुह्मीं समजतां आहां असेंच दाखवा ! तसें जर न कराल आणि त्यांच्या मृत्यूची गोष्ट काढाल तर तुमचा राग तुह्मांसही आवरावयाचा नाहीं अशी स्थिति होईल! ह्मणून आपणास ही विनंती आहे.

**राज०**—**मालोजी** ! तुमचें ह्मणणें मी समजलें. हाय हायरे माझ्या लाडक्या ! आतां तूं कोठचा माझ्या दृष्टीस पडणार ! असो. भगवंताची मर्जी ! बाळा! तुझा त्या दुष्टानें विश्वास घातानें वध केला त्याबद्दल सूड उगविण्यासाठींच मात्र मी त्या दुष्टाशीं गोड गोड बोलण्याचें पत्करितें आहें! हाय हाय! धिक्कार असो त्या गोड बोलण्यास !

**मालो०**—आईसाहेब ! हळू ! तो दुष्ट येण्याची वेळ झाली !—बरें मी विनंती केली तीप्रमाणें वागण्याचें ठरलें ना !

**राज०**—होय ठरलें. तुह्मीं त्याबद्दल बिलकुल धास्ती बाळगूं नका !

**मालोजी**—ठीक आहे. येतों तर मी आतां

**राज०**—यावें. ( मालोजी मुजरा करून निघून जातो.)

( दौलतराव येतो. )

**दौल०**—( गात गात राजसबाईपुढें येतो. )

**पद.**

तें मन निष्ठुर कां केलें, पूर्ण दयेनें जें भरलें. ध्रु.

पूर्णपौर्णिमाविधुसुंदर हा,
प्राणप्रिये, तव मुखचंद्र अहा !
नयनां देतो आल्हाद महा !

पाहुनियां शृंगारसागरीं मन सुंदरि मम मग्नचि झालें. १.

अंगावरती नसति दागिने,
त्यालिस मळकीं हीं तूं वसनें,
तरि तूं शोभशि अधिकाचि तेणें
जाणों असशी प्रियसखि तूं हे शेवाळ्यानें कमळ वेष्टिलें. २.

अस्ताव्यस्तचि हे तव वेणी
लोळतसे प्रियसखये धरणी,
तीच्या संहरणाची करणी
करावयाला द्रुपदसुतेच्या, भीम तसा मि अलों या वेळे. ३.

कुंकुमतिलक नसे तव भाळीं,
ओष्ठरक्तिमा सर्व निमाली,
तरि दिसशी तूं शुभ्र गुलाबकळी,
तीचा सुगंध सेवायाला भ्रमरापरि मन चंचल झालें. ४.

किति तरि प्रियसखि तुज मी विनवूं,
किति तरि तव पदिं मस्तक झिजवूं,
हो वश मज अशि नको गडे फसवूं,
मी तव किंकर, स्वामिणि मम तूं, त्वत्पदिं मस्तक पुनरपि लोळे. ५.

सर्व शत्रु म्यां प्रिये जिंकिले,
या देशींचें राज्य मिळविलें,
तव संगाच्या आशे धरिलें,
दे मज चुंबन आलिंगन आजि, तन मन धनही तुज अर्पियलें. ६.

(पदाचा अभिनय करीत तिच्या पायां पडतो. ती त्यास उत्तर न देतां दुसरीकडे पहात राहते.)

**दौलत०**—(ती कांहींच बोलत नाहींसें पाहून) प्राणप्रिये! हें काय वरें असें? आपल्या सेवकजनांचा कोणी असा अव्हेर करिते काय? प्रिये! बोल बोल! मी नुकताच युद्धांत विजयी होऊन आलों आहें, व आ[ज] सर्व **कोंकण**पट्टीचा मालक मी झालों या उल्हासानें माझें संपूर्ण अंतःकरण भरून गेलें आहे. तर कृपा करून एक वेळ मजकडे प्रेमदृष्टीनें पहा. अंतःकरणांत प्रेमवृद्धि धारण करून मला एकवेळ आलिंगन दे, तसेंच तुझ्या प्रेमरसाचा आस्वाद तुझ्या अधरमधुसेवनाच्या रूपानें एकवेळ या दासास घडूं दे ह्मणजे मी एवढी लढाई मारून विजयी होऊन आलों या गोष्टीचें सार्थक होईल. नाहीं तर सर्व व्यर्थ आहे! प्रिये! हें काय बरें? एकवेळ या दासावर प्रेमाची—

**राज०**—(शांतपणें) **दौलतराव**! मी तुह्मांस यापूर्वी अनेक वेळां सांगितलेंच आहे. त्यापेक्षां मला कांहीं निराळें तुह्मांस सांगतां येत नाहीं! माझे प्रिय प्राणपति काळमुखीं पडले त्यावरोबर, वीर युद्धांत विजयी होऊन आला असतां त्याचें अभिनंदन करावयाचें, ही हौस नाहींशी झाली ती झालीच. ती ह्मणून आतां परत यावयाची नाहीं! आतां तुह्मीं प्रेमाची गोष्ट काढिली, तिच्याबद्दलही माझ्यानें दुसरा जबाब देववत नाहीं! प्राणपतींच्या रक्षेवरोवर एक पुत्रप्रेम खेरीजकरून बाकी सर्व प्रेमाची रक्षा होऊन गेली! यासाठीं तुह्मांस सांगतें, तुह्मीं माझा नाद सोडून दुसऱ्या एकाद्या सुंदरीच्या प्रेमाचा अभिलाष धराल, त्यांतच तुमचें कल्याण होणार आहे! त्या सुंदरीचें प्रेम तुह्मांवर वसेल, तर तुह्मीं आपलें सर्व आयुष्य सुखांत काढाल! यासाठीं पुनरपि एकवार सांगतें तुह्मीं दुसरीकडे नादीं लागा! माझ्या ह्मणून अंतःकरणांत प्रेमरसाचा लेशही उरला नाहीं. तेव्हां माझ्या प्रेमाची तुह्मीं आशा सोडा!

**दौल०**—प्रिये! तूं माझी थट्टा करितेस! प्रेम

कधीं अंतःकरणांतून नाहींसें होत असतें काय ? तें तर उलटें अंतःकरणाचें जीवन आहे. यासाठीं प्रेमाचा वास अंतःकरणांत निरंतर असावयाचाच ! आतां त्या प्रेमाचे विषय निरनिराळ्या वेळीं निरनिराळे असूं शकतील; यासाठीं एक विषय नाहींसा झाला कीं दुसऱ्यावर प्रेम जडावें इतकेंच कायतें !

**राज०**–तुमच्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टींपासून माझ्या अंतःकरणास यत्किंचितूही बोध होण्याची आशाच तुह्मीं सोडा. हा समोर खांब आहे, त्याची आणि माझी स्थिति कांहीं भिन्न नाहीं ! उभयतांस बोध होण्याचा संभव सारखाच ! तथापि माझी तुह्मांस एक विनंती आहे, ती हीच कीं जर तुमचें मजवर खरोखरीच प्रेम असेल, तर तें प्रेम माझ्या अनुभवास आणून द्या ! माझें दुसरें तिसरें कांहीं मागणें नाहीं. एकवेळ कृपा करून मला **कमलगडास** माझ्या बापाकडे पोंचवा ह्मणजे मी त्या ठिकाणीं सुखानें राम ह्मणेन !

**दौल०**–**राजसबाई** ! मी तुला आपली पट्टराणी करण्यास कबूल असतां माझा अव्हेर करून त्या **कमलगड**च्या धनगराच्या घरीं तूं जाऊन रहाणार काय ? **राजसबाई** ! परमेश्वरसाक्ष तुला सांगतों, एकवेळ तूं माझी भोगेच्छा तृप्त कर ह्मणजे तुला कांहीं कमी नाहीं ! या **दौलतरावा**चें तन, मन, धन सर्व तुझें आहे. हें एवढें सर्व अफाट राज्याची मालकीण ही तूंच ! एकवेळ तूं माझी झालीस ह्मणजे मीं पादाक्रांत करून टाकिलेले मोठमोठे राजे व शूर योद्धे हे सर्व तुझ्या चरणाचे निरंतरचे दास होऊन राहतील ! विचार कर, तूं माझी झाल्यावर तुझ्या सुखापुढें प्रत्यक्ष **वैकुंठाधीश नारायणा**च्या **लक्ष्मी**चेंही सुख कांहींच नाहीं असें तुझ्या अनुभवास येईल ! प्रिये ! तुला काय सांगूं ? मजकडे नीट डोळे उघडून एकवेळ पहा तर खरी, ह्मणजे माझें सामर्थ्य व दरारा हीं किती आहेत तीं तुला समजतील ! व तुझें अंतःकरण मजकडे खचित वळेल !

**राज०**–**दौलतराव** ! सामर्थ्य आणि दरारा हीं सर्व बाहेरचीं सोंगें आहेत, त्यांपासून विचारी मनुष्यास कधींही मोठेपणा वाटावयाचा नाहीं ! मनुष्य चांगलें सुखावस्थेंत असतांही त्यास या गोष्टींचा तिटकारा येईल. मग माझी तर गोष्टच विचारावयास नको ! ज्याप्रमाणें एकाद्या देवळांतील देवता उपटून टाकावी, त्याप्रमाणें माझ्या मनाची आज कैक वर्षें स्थिति झाली आहे. त्यामधून सुख आणि शांति या देवता ज्या एकवेळ भ्रष्ट झाल्या त्या झाल्याच ! त्यांची ह्मणून पुनरपि या अंतःकरणांत संस्थापना व्हावयाची नाहीं, यासाठीं तुह्मीं सामर्थ्य आणि दरारा यांच्या किती जरी गोष्टी सांगितल्या तरी त्यांची पालथ्या घागरीवर पाणी यापेक्षां कांहीं निराळी स्थिति व्हावयाची नाहीं ! **दौलतराव** ! माझ्या हृदयमंदिरांत आतां एका शोकावांचून दुसरें कांहीं राहिलें नाहीं ! तर मजवर एवढी दया करा! मला आतां या जगांत कांहीं फार वेळ रहावयाचें नाहीं. याकरितां माझी ही शेवटली विनंती मान्य करून मला माझ्या बापाच्या घरीं सुखानें राम ह्मणूं द्या !

**दौल०**–तुझी विनंती व्यर्थ आहे–

**राज०**–**दौलतराव** ! मी तुमच्या पायां पडतें.

**दौल०**—हा दुष्टे! कृतघ्ने! धिक्कार असो तुझ्या कृतघ्नपणास! आज सतत सात वर्षे तुझ्यावर मीं प्रेम केलें, त्याचें हेंच फळ काय! तुझा नवरा मेल्यावर जर मी या राज्यावर बसलों नसतों, तर शत्रूंनीं कधींच यापूर्वी या नगरीचा आणि या अफाट राज्याचा विध्वंस करून टाकिला असता! दुष्टे! तुझ्याकरितां मीं सर्व शत्रूंचा पाडाव करून या राज्यांत सर्वत्रांच्या, आणि प्रत्यक्ष तुझ्या, अंतःकरणांत सुख समाधान उत्पन्न केलें. त्याचे उपकार कांहींच नाहींत? वस्तुतः मला या राज्याची मुळींच जरूर नाहीं एकवेळ तूं माझी हो कीं लागलीच **यशवंतरावास** परत बोलवून माझ्यामागें सर्व राज्य त्याच्या हवालीं करितों.

**राज०**—(आपणाशीं) देवा! देवा! इतका वेळपर्यंत ह्या दुष्टाचें भाषण मीं ऐकून घेतलें! परंतु आतां नाहीं राहवत! (उघडपणें) दुष्टा! चांडाळा! मेल्या! तुझा सत्यानास होवो! आणि ज्याप्रमाणें तूं आज माझी दैना केली आहेस त्याप्रमाणें तुझी होऊन मेल्या! तुझा कुलक्षय होवो!

**दौ०**—वारे वाः! प्रिये! एवढावेळ पर्यंत तूं नीट बोलत असून तुला आतांच इतका कां बरें झटका आला!

**राज०**—दुष्टा! निर्दया! घातक्या! आपल्याच मनाला विचार! दुष्टा! तुला सर्व प्रकार माहित असून माझ्यापुढें बोलावयास लाज नाहीं वाटत? दुष्टा! प्रत्यक्ष माझ्या बाळाचा घात तूं केला असून जसें कांहीं आपणास कांहींच ठाऊक नाहीं असें दाखवितांना मेल्या! तुझं काळीज कोठं गेलं? बोल! बोल! दुष्टा! माझ्या बाळाचा घात तूं नाहीं केलास?

**दौ०**—(आश्चर्य वाटलेंसें दाखवून) ह्मणजे? याचा काय बरें अर्थ? काय ह्मणतेस? तुझ्या पुत्राचा घात मीं केला? वाः! फार चांगली गोष्ट! बोल! बोल! ही खोटी बातमी तुला कोण्या दुष्टानें सांगितली? बोल! बोल! ह्मणजे त्या दुष्टाची याक्षणीं जिव्हा छेदन करितों! परतु तें असो. तूं ऐकलेली बातमी अगदींच खोटी! **राजसबाई**! तुला ईश्वरसाक्ष सांगतों, तुझा पुत्र अद्यापि जिवंत आहे!

**राज०**—दुष्टा! प्रत्यक्ष आपण त्याचा घात केला असून ईश्वराची साक्ष देतोस, तुला शरम नाहीं वाटत? निर्लज्जा! प्रत्यक्ष परमेश्वराची शपथ घेऊन खोटें बोलतोस? मेल्या! तुझें काळीज कोठें गेलें? तुला या पापाबद्दल मेल्यावर आणि जिवंत असतांही अघोर यमयातना भोगाव्या लागतील त्यांचें कांहींच वाटत नाहीं?

**दौ०**—आतां तर बोवा! तुझ्यापुढें शर्थ झाली! **राजसबाई**! ईश्वर राहिला एकीकडे! परंतु तुला खचित सांगतों, माझ्या गळ्याशपथ, तुझा पुत्र अद्यापि जिवंत आहे, व जर तूं एकवेळ माझी इच्छा पूर्ण करिशील, तर पहा! क्षणमात्र विलंब न लावितां मी तुला माझी पट्टराणी करीन, व माझ्या मागें या अफाट राज्याचा मालक तुझाच पुत्र होईल!

**राज०**—मूर्खा! धिक्कार असो तुला! माझे प्रिय प्राणपति व माझा पुत्र यांचा अंत करणारा तूंच आहेस! यास्तव तुझ्या सहवर्तमान या गादीची मालकीण होण्यापेक्षां प्रत्यक्ष प्राण गेले तरी त्यांची मी नाहीं पर्वा करीत!

मूर्खा! तुझ्या सहवासांत राहण्यापेक्षां मला सर्व जन्म जरीं तुरुंगवासांत अतिशय भयंकर हाल अपेष्टा सोशीत काढावा लागला किंवा अरण्यांत राहून सिंहव्याघ्रादिकांच्या तडाक्यांत सांपडावें लागलें, किंवा अन्नपाण्याशिवाय या पृथ्वीवर भटकत रहावयाचें पडलें, तरी तें मी मोठ्या आनंदानें कबूल करीन, परंतु असल्या अघोर पाप आचरणाऱ्या चांडाळाच्या अपवित्र स्पर्शानें मी आपला देह कदापि विटाळून घेणार नाहीं!

**दौ०**—तुला आजपर्यंत मी शहाणी समजत होतों. परंतु आतां तुजसारखी शतमूर्ख कोणी नाहीं असें मला वाटूं लागलें आहे! मूर्खे! तुला कळत नाहीं काय? या वाड्याचा मालक मी आहें; जरी मीं यावेळीं तुजवर बलात्कार केला, व तूं मजपासून सुटण्यासाठीं मोठ्यानें शंखध्वनि केलीस, तरी तुझ्या ह्मणून मदतीस येण्याची प्राज्ञा एकाची नाहीं! यासाठीं तुला सांगतों, तूं बऱ्या बोलानें माझें ह्मणणें कबूल कर, नाहीं तर पहा! याक्षणीं तुझा बलात्कारानें उपभोग घेण्यास कदापि चुकणार नाहीं नीट विचार कर!

**राज**—दुष्टा! तूं मला भय घालून भ्रष्ट करणार काय? दुष्टा! पाहूंच दे तर मला तुझी छाती! येतर मेल्या पुढें खरा, कीं लागलीच तुझ्या नरडीचा घोट घेतें कीं नाहीं पहा! दुष्टा! अधमा! तुला वाटत असेल कीं हें तुझें दुष्ट वर्तन कोणी पाहत नाहीं, परंतु तुला सांगतें सर्वसाक्षी **नारायणा**चे डोळे कांहीं मिटले नाहींत! तो तुझ्या सर्व दुराचरणांबद्दल तुला अघोर शासन करावयास कधीं चुकणार नाहीं!

**दौल०**—(धिक्कारानें) असे **नारायण** ठेवतों आह्मीं गाशांत गुंडाळून! तें असो. पण बोल, तूं बऱ्या बोलानें माझें ऐकणार कीं नाहीं, कां करूं बलात्कार! बोल!

**राज०**—मेल्या! तूं मजवर बलात्कार करणार काय! ये दुष्टा! कर बलात्कार कसा करतोस तो पहातें! अधमा! तुला खात्रीनें सांगतें, अगोदर या कुडींतला प्राण निघून जाईल, आणि मग या देहाच्या नखाग्रास तुजसारख्या अमंगळ दुष्टाचा विटाळ झाला तर होईल! तोंपर्यंत होणार नाहीं! घे मेल्या! काय करणें असेल तें करून!

**दौल०**—(आपणाशीं) छेः! आज तर कांहीं लाग साधण्याचें चिन्ह नाहीं! असो! तूर्त हिला अशीच राहूं द्यावी! याचा विचार मागें पुढें करितां येईल! (उघडपणें) **राजसबाई**! आजपर्यंत तुझें बोलणें मीं ऐकिलें, परंतु इतःपर मात्र ती गोष्ट होणार नाहीं हें पक्कें ध्यानांत ठेव! सर्व गोष्टी तुझ्या मनाप्रमाणें व्हाव्या ह्मणून मीं आजपर्यंत दम खाल्ला. असो. याबद्दलचा नीटपणें विचार करावयास मी तुला आणखी मध्यरात्रीपर्यंत मुदत देतों, तोंपर्यंत काय विचार करावयाचा असेल तो कर!

**राज०**—मेल्या! काळतोंड्या! तोंड काळें कर एकदाचें! फिरून मला दाखवावयास येऊं नको!

(दौलतराव जातो व पडदा पडतो.)

## प्रवेश २.—दौलतरावाचा महाल.

(दौलतराव सचिंत बसला आहे.)

**दौल०**—(आपणाशीं) काय करावें? **राजसबाई**ला **यशवंतरावा**च्या मृत्यूची हकीकत कळल्यामुळें आजची शिकार साधली नाहीं! असो. कांहीं चिंता नाहीं. पाहून घेतां येईल! परंतु हिला ही बातमी कोणीं बरें सांगितली?

हें काम **मालोजी**चें तर नसेल? असेलही कदाचित्! कारण त्याजवर तिचा विश्वास आहे! असो. याबद्दल चौकशी केली पाहिजे. **मालोजी**! जर हें नीच काम तुह्मीं केलें असें सिद्ध होईल, तर संभाळा, या **दौलतरावा**शीं गांठ आहे! एका क्षणांत तुमच्या नरडीचा घोट घेईन!

(बहादरशिंग येतो.)

**दौल०**—**बहादरशिंग**! या! तुह्मीं वेळेवर आलां! पहा! आज शिकार तर हातून गेली! काय करावें! कांहीं सुचत नाहीं! ती मूर्ख **राजसबाई**—

**बहा०**—काय अद्यापि वश झाली नाहीं?

**दौल०**—नाहीं! तिला **यशवंतरावा**च्या मृत्यूची खवर कळल्यामुळें सगळा बेत फिसकटला! कायहो, पण, **बहादरशिंग**! तिला ही हकीकत कोणी बरें सांगितली असेल? **मालोजीनें** तर नसेल?

**बहा०**—नाहीं. मला ज्यावेळीं ही खवर त्या दूतानें येऊन सांगितली, त्यावेळीं **राजसबाई**च्या जवळची कुळंबीण जवळ होती. तेव्हां कदाचित् तिनें ही खवर ऐकून आपल्या धनिणीस सांगितली असेल असें मला वाटतें.

**दौल०**—हां? तिनें सांगितलें असेल काय? थांव रांडे! याबद्दल तुला फांशींच चढवितां. असो. पण **बहादरशिंग**! काय चमत्कार पहा! मी आपल्याकडून तिला पुष्कळ उपदेश केला, होतें तितकें सांगून पाहिलें, सरते शेवटीं बलात्कार करीन ह्मणून दहशतही घालून पाहिली, परंतु तिनें ह्मणून आपला हट्ट सोडिला नाहीं! मी इतका बलाढ्य, परंतु ती मला एवढीसुद्धां भ्याली नाहीं, व मध्यें मध्यें तर हिच्या अंगांत कोणी वीरानेंच जसा कांहीं संचार केला आहे, अशा प्रकारें मजशीं बोलत होती!

**बहा०**—बोलूं द्या! बोलली तर बोलली! आपोआप कांहीं वेळानें येईल वेतावर! परंतु महाराज! मी आपणास एक बातमी सांगावयास आलों आहें ती ऐकून आपणास आनंद होईल यांत संशय नाहीं!

**दौल०**—काय? मला आनंद होईल ह्मणतां? बोला! बोला! कोणची बातमी? बोला झट झट!

**बहा०**—महाराज! ज्या वीरानें **यशवंतरावा**चा वध केला, तो वीर बाहेर आपल्या आज्ञेची वाट पहात आहे.

**दौल०**—कोण? **अमरशिंग**?

**बहा०**—**अमरशिंग** नव्हे! तो तर महाराज, **यशवंतरावा**च्या हातून मेलाच! परंतु त्याच्या बरोबर त्याचा जो विश्वासुक चाकर गेला होता त्यानें **यशवंतरावा**चा घात केला! तो बाहेर उभा आहे.

**दौल०**—तो चाकर मोठा शूर आहे! शाबास त्याची! असो. पण त्याजवळ खुणेची मुद्रा आहे?

**बहा०**—होय.

**दौल०**—मग कांहीं चिंता नाहीं! **यशवंतराव** मेला खचित! येऊं द्या त्याला आंत!—परंतु कायहो, तो चाकर तुमच्या ओळखीचा आहे. नाहीं?

**बहा०**—नाहीं. परंतु त्याचें नांव मला ठाऊक आहे. त्याला **येमबा** ह्मणतात! महाराज! पण त्यानें पठाणाचा पोशाख केला आहे! व त्यानें आपलें नांव **दुलेखान** ह्मणून मला सांगावयास सांगितलें आहे.

**दौल०**—तें ठीकच आहे. बरें त्याला आंत घे-

ऊन या ! (बहादरशिंग जातो.) ही गोष्ट फार चांगली झाली ! मुद्रा गुप्तपणें परत आल्यामुळें आतां माझा कोणास संशय येणार नाहीं! (बहादरशिंग येसबास घेऊन परत येतो.)

**येस**०–सलाम कर्तो जी ! (दौलतरावास सलाम करितो.) सरकार! ही मुद्रा! **येस्वंतराव** आपला दुस्मान मेल्याची निशानी ! ही घ्येवी सरकार ! (मुद्रा दौलतरावाच्या हवालीं करतो.)

**दौल**०–तुझें नांव काय ? **येसबा** होयना ?

**येस**०–जी सरकार ! (फिरून सलाम करितो.)

**दौल**०–तुझा धनी कोण ? **अमरशिंग** ?

**ये**०–जी सरकार. (पुनरपि सलाम करितो.)

**दौल**०–**यशवंतराव** मेल्याची सर्व हकीकत सांग पाहूं.

**ये**०–जी म्हाराज ! सरकारचा होकम झालान् आमच धनी मसनी बिगिद्यान् होकारल, आन् सम्दी पन अक्शी तैयारी करूनशी आमी निगालो तो वगा त्ये दक्शिनेमंदी **मुसलमानाच** राज हाये, तत ग्येलों. अक्शी तल्लास करतां करतां वगा गावला **येस्वंतराव**, त्येला पायलं, आन् मी न् **अमरशिंगानीं** आप्सांत खोटं भांडन काडूनशी **अमरशिंगानं** मला बडवल्यान् म्यां खोटीच वरड केली रे म्येलोंर म्येलों म्हनून! त्येवक्ती **येस्वंतराव** पडला मंदी, न् लागला अमां दोघास्नी सोडवाया. तवा मी सरलो मागन् त्येची न् **अमरशिंगाची** जुपली लडाई ! त्येवक्ती **अमरशिंग** पडला न् वगा **येस्वंतराव** यऊं लागला म्हप बोलाया, इक्त्यामंदी म्यां हिसकावली **अमरशिंगाची** तरवार, आन् **येस्वंतराव** माझा हात धराया येतोया इक्त्यामंदी त्येच्या पोटांत भोसाक्लीन् काय तर्वार ! त्येबरोवर येकदा क्येलान् अगाई ! आन् म्हटल्याती राम न काय ! पातों तो **अमरशिंग** व्हता जिता, मी जवळ ग्येलोन् त्येला लागलो उटवाया, तवां वगा आमच धनी म्हनाल 'अर, मी तर मरनार, पन येक कर, ही घ्ये अंगुठी अन् जा सरकारपायाप आन् त्येना ही दोउनशी बोल समदा मजकूर! माज कायबी व्हईल.' इक्त बोललन् परान सोडला! मंग म्या दिली त्येला मुठमाती अन् ह्ये **पठानी** स्वांग घ्येऊनशी तडक आलो सरकाराप ! (सलाम करितो.)

**दौल**०–शाबास ! **येसबा** ! शाबास ! तूं विश्वासुकपणानें माझ्या शत्रूचा घात केलास, यामुळें माझ्या चित्तास परम आल्हाद होत आहे, व याबद्दल तुला योग्यबक्षीस मिळेल ! परंतु तुला एक काम मजकरितां अवश्य केलें पाहिजे. काम म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नाहीं. **राजसबाईला यशवंतराव** मेल्याची हकीकत कळली आहे. व यावरून त्याचा वध मीं केला असावा असा तिच्या मनानें संशय घेतला आहे. यासाठीं तूं एवढेंच कर, तिच्याकडे जा आणि तूं आपल्या डोळ्यांनीं त्याला आपोआप मरतांना पाहिलेंस म्हणून सांग. आणखी असेंही सांग कीं, ज्यावेळीं **यशवंतराव** मेला त्यावेळीं तो आपल्या आईची आठवण काढून पुष्कळ रडला आणि सरते शेवटीं त्यानें 'आपल्या आईनें आतां **दौलतरावाच्या** इच्छेस मान देऊन त्याशीं विवाह करावा, आणि त्या योगानें **कोंकण** प्रांतींच्या आपल्या प्रजांस शांति व सुख हीं द्यावीं!' एवढा उद्गार मुखावाटे काढून नंतर देह ठेविला. (इतक्यांत मालोजी आंत येतो त्यास पाहून) या ! **मालोजी**! या तुम्ही ! हा वीर पुरुष पहा ! यानें आपल्या बाहुवीर्यानें मजवर तर काय, परंतु

या आमच्या अफाट राज्यांतील सर्व प्रजेवर मोठा उपकार केला आहे, त्याचें वर्णनही करणें कठिण आहे ! यासाठीं हा जें बक्षीस मागेल, तें यास मी देणार. परंतु तें असो. तुह्मीं यास अगोदर **राजसबाई**कडे नेऊन भेटवा. कारण तिचा पुत्र जो नुकताच मरण पावला, त्यानें स्वतः होऊन **राजसबाई**स सांगण्याकरितां याजपाशीं निरोप सांगितला आहे. तो ऐकिला कीं ती माझी झालीच ह्मणून समजा. (बहादरशिंगाकडे पाहून) चला ! **बहादरशिंग** ! चला ! मेजवानी-ला उशीर होत आहे ! आतां मजसारखा सुखी आहे कोण ? चला आज यथेच्छ सुरापान करून मी **राजसबाई**शीं विवाह लावणार !

(दौलतराव व बहादरशिंग जातात.)

**येसबा**–(मालोजीस) कां ह्ये सर्व्ये राजवाड्या-मंदी समद्यान्ला हरुष झालाया, आन् आज मेजवानी बी चाललिया, आन् तुमीच अस दुख वाटल्यावानी कांजी करतां ? तुमी म्येजवानीला न्हाइ जात ? ह्येचं काय बरं कारन ?

**मालो०**–तुझें नांव मला माहित नाहीं, परंतु तूं **राजसबाईसाहेबां**कडे जाऊन कोणची दुष्टपणाची कामगिरी बजावणार हें मला सांगूं शकशील ?

**येस०**–व्हय ! त्येमंदी हाये काय ! तुमाला मी कोन ह्ये ठावं न्हाई ? बगा असच माज्या तोंडाकड बगा, आन् माज्या डोळ्यांवरन आन् चेऱ्यावरन मला खून चढलाया कां न्हाई ह्यें नीट न्ह्याळूनशी बगा !

**मालो०**–होय ! तुझ्या मुद्रेवरून तूं उग्र पुरुष असावास असें अनुमान होतें खचित ! बोल ! बोल ! तूं कोण आहेस ?

**येस०**–मी ? मी कोन ? तुमच्या **येस्वंतरावा**-ला मारलं तो मी !

**मालो०**–(आश्चर्यानें) काय ? **यशवंतरावास** तूं मारिलेंस ?

**येस०**–कां विचकतांस तुमी अस ? मी काइ इखारी साप न्हाई ! मी येक **येस्वंतरावा**-ला मारलं ह्मनून तुमाला भिन्याचं का कारन? माझा द्वेश फक्त येक राजकुळाचा ! ह्मप दुसऱ्या कुनाला इक्ता बी न्हाइ तरास होयाचा ! अरं ! तुमाला अजूनबी आच्चीर वाटतं न् तुमी अजूनबी ह्मप विचकतां ?

**मालो०**–आश्चर्य? हो–छे ! नाहीं नाहीं ! झाली गोष्ट ती ठीकच झाली ! त्यानें **दौलतरा-वा**शीं वैर केलें त्याबद्दल हीच शिक्षा त्यास-योग्य होती !

**येस०**–कां त्येनं नुसत्या येकट्या **दौलतरावा**-शींच न्हव, समद्या ह्ये **कोंकनां**तल्या पन लोकांशीं वैर क्येलं ? व्हय, असं च न्हव काय ?–अरं ! तुमी थांवतांस ? तुमाला इक्त्यामंदी असं काय झालंजी ?

**मालोजी**–दुष्टा ! नशिबा ! घे करून तुला माझें काय करणें असेल तें ! आजपर्यंत मी आपलें रूप झांकून होतों, पण आतां नाहीं माझ्यानें रहावत ! काय ? प्रत्यक्ष ज्या दुष्टानें माझ्या प्राणांपेक्षांही प्रिय अशा त्या राजपुत्राचा घात केला तो दुष्ट मजपुढें प्रत्यक्ष उभा असतां मी स्वस्थ रहावें काय! धिक्कार असो मला! दुष्टा ! अधमा ! जा जाऊन सांग त्या कृतघ्न क्रूर **दौलतरावा**ला कीं आजपासून मी तुझा त्याग केला ! मी आ-जपर्यंत आपल्या प्राणांस प्रिय मानीत होतों परंतु आतां त्यांचा मला तिटकारा आला ! तुला पाहिजे तर घे माझे प्राण ! मी ते

## प्रकरण ३ रें.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें आमच्या आईचा अंत झाला तरी कांहीं वेळपर्यंत ती मेली ही गोष्ट प्रथमतः मला खरीच वाटेना. आईचें वय ह्मणजे फार झालें होतें असा प्रकार बिलकुल नसून नुकती घटका दोन घटकांपूर्वीं ती चांगली आह्मांशीं बोलत चालत होती ही गोष्ट मनांत येऊन मी अगदीं भांबावून गेलें. इतक्यांत **राधाई** आईच्या आंथरुणावर बसली होती ती मोठ्यानें शोक करूं लागली, त्यावरून आई खचित मेली असें समजून मीही तिच्याबरोबर रडूं लागलें. माझ्याबरोबर **कृष्णा** रडूं लागला; व **यमुना** आणि **जनी** हीं वयानें फारच लहान, त्यांस झालेल्या प्रकाराचा कांहींच उमज पडेना, तथापि तींही आह्मी सर्व रडतों हें पाहून आपणही मोठ्यानें रडूं लागलीं. **गोविंदास** ही रडूं येऊं लागलें, तथापि आह्मां सर्वांपेक्षां तो वयानें वडील असल्यामुळें, व पुरुष जातीस असल्या भयंकर प्रसंगींही शोक आवरण्याची संवय असल्यामुळें, तो आह्मां सर्वांपेक्षां कमीच रडला. मात्र त्याचें अंतःकरण त्या वेळीं अतिशय खवळून जाऊन आईच्या मृत्यूचें कारण आपण असें वाटून त्यास फारच वाईट वाटलें व त्याच्या नेत्रांतून एकसारख्या अश्रुधारा चालल्या. आह्मीं सर्व रडत होतों, ती गडबड ऐकून शेजारच्या घरच्या व समोरल्या घरच्या बायकाही काय झालें ह्मणून पहावयास धांवत आल्या व त्यांस हा झालेला प्रकार समजतांच त्या आणि आह्मीं अशीं सर्वजण मोठ्यानें रडूं लागलों. हा प्रकार सुमारें दोन घटिका चालला, तरी बाबा कोठें आहेत याचा शोध करावा आणि त्यांस बोलावून आणावें ही गोष्ट कोणाचेही लक्षांत नाहीं. सरतेशेवटीं आमच्या समोरल्या घरची **जनाई माळीण** ही तेथें आली होती तिनें मला बाबा कोठें आहेत ह्मणून विचारलें, त्यावेळीं मागील सर्व प्रकाराचें मला स्मरण होऊन मी अधिकच भांबावून गेलें, व **जनाईस** उत्तर द्यावयाचें एका अंगास राहून मला अधिक अधिक मोठ्यानें रडूं येऊं लागलें. तें पाहून **जनाईनें गोविंदास** तोच प्रश्न केला. हा वेळपर्यंत **गोविंदाचें** हळू हळू रडणें चाललें होतेंच. त्यास हा प्रश्न ऐकतांच आईच्या बिछान्यावर पडलेल्या पत्राची आठवण होऊन तो तें पत्र उचलावयास लागला त्याबरोबर मीं **गोविंदास** एका अंगास लोटून तें पत्र आपल्या हातांत घेऊन **राधाईच्या** हवालीं केलें. तें पाहून **गोविंदा** तसल्या दुःखाच्या प्रसंगींही मजकडे रागावून पाहूं लागला. तथापि मीं त्यास न जुमानतां त्यास बाबांचा शोध करावयास सांगितलें. तेव्हां मात्र ता अंमळसा शुद्धीवर येऊन लाजल्यासारखा झाला, आणि **कृष्णास** हळूच एका अंगास बोलावून त्यास बरोबर घेऊन बाबांचा शोध करावयास गेला. त्यास जाऊन सुमारें चार घटिका झाल्या तरी बाबा ह्मणून कांहीं घरीं आले नाहींत. आसपासच्या घरच्या बायका आल्या होत्या, त्यांतूनही कोणी कांहीं कोणी कांहीं अशीं निमित्तें सांगून आपआपल्या घरीं जाऊं लागल्या. सरतेशेवटीं त्यांतांपैकीं एक **राधाई** मात्र शिलक राहिली. बाकीचीं बाहेरचीं सर्व माणसें निघून गेल्यावर **राधाईनें** मला त्या पत्राचें काय करावयाचें ह्मणून विचारिलें. त्यावेळीं मी तिला हलकेंच हें पत्र तुह्मीं आपल्याच पाशीं ठेवा आणि पुनरपि मी तें तुह्मांपाशीं मागें तोंपर्यंत तें कोणास

ह्मणून दाखवूं नका असें सांगितलें, तें त्या माव-लीनें कबूल केलें. तिनें मला आणखी इतकेंही सांगितलें कीं, '**मथुरा**! या पत्रांत मजकूर काय आहे तो तुला माहित नाहीं आणि मला-ही माहित नाहीं, तथापि जोंपर्यंत ही **राधाई** ह्मणून जिवंत आहे, तोंपर्यंत किंवा प्रत्यक्ष तूं परत मागेपर्यंत यांतील एक अक्षरही कोणा-च्या नजरेस पडणार नाहीं, किंवा कोणच्याही रीतीनें यांतिल मजकूर कोणासही कळणार नाहीं. फार कशाला, प्रत्यक्ष मीसुद्धां या पत्रां-तील मजकूर आहे हें समजून घेण्याचा कधीं प्रयत्न करणार नाहीं हें तूं पक्केंपणीं लक्षांत ठेव.' **राधाई** यापूर्वीं आमचे आईकडे पुष्कळ वेळ येत असे, व आईची तिच्यावर मोठी ममता असून तिच्या सांगण्यांत **राधाई** ही मोठी विश्वासुक आणि भली बायको आहे असें अनेक वेळ मी ऐकिलें होतें यासाठीं मीं तिचें ह्मणणें कबूल करून तिचे मोठे उपकार मानिले व **राधाईनें** तें पत्र आपल्या ओंच्यांत ठेविलें, इतका प्रकार झाला तरी बावांचा कोठें ठिकाण नाहीं. **गोविंदा** व **कृष्णा** त्यांचा शोध कराव-यास गेले त्यांचाही कोठें ठिकाण नाहीं. इतका वेळ आमचें मधून मधून रडणें चाललेंच होतं, व **राधाई** खेरीजकरून शेजारच्या बायका बाहेर निघून गेल्या तेव्हां मात्र अंमळसें थांबलें होतें, तें इतका वेळपर्यंत बावा, **गोविंदा** व **कृष्णा** यांपैकीं कोणीच परत येत नाहींत हें पाहून फिरून सुरू झालें. या वेळीं माझ्या मनाची जी कांहीं विलक्षण स्थिति झाली होती ती एका परमेश्वरास मात्र ठाऊक. त्यावेळीं माझ्या मनांत नाना प्रकारचे तरंग येऊं लागले. बावा घरांतून बाहेर पडले त्या वेळची त्यांची ती विलक्षण मुद्रा एकसारखी माझ्या डोळ्यांपुढें दिसूं लागली, व तीवरून बावा घरांतून बाहेर पडले ते पुनः परत न येण्याच्या हेतूनेंच पडले असा माझ्या मनाचा ग्रह होऊं लागला. हा ग्रह खोटा ठरेल व कांहीं वेळानें बावा खचित परत घरीं येतील ह्मणून मी आपल्या मनाची समजूत होण्याविषयीं व्हावी तितकी खटपट केली, परंतु सर्व व्यर्थ. वरचेवर फिरून फिरून ती मुद्रा डोळ्यांपुढें दिसूं लागून, मी अगदीं भांबावलें. डोळे पाण्यानें भरून येऊन पुढें कांहीं दिसेना अशी स्थिति झाली. इत-क्यांत अशी स्थिति होण्याचें मूळ कारण तें आईस आलेलें पत्र होय या गोष्टीचें स्मरण होऊन लागलेंच माझें मन बावांकडून निघून आंथरुणावर निश्चेष्ट पडलेल्या आईकडे वळलें. त्याबरोबर मी आईकडे पाहिलें तों तिच्या तों-डावर ती मृतकळा पसरलेली माझ्या दृष्टीस पडली. मग काय विचारावें? एकदम पोटात उमळल्यासारखें होऊन मला मोठ्यानें रडूं आलें. त्याबरोबर **यमुना** व **जनी** हींही मो-ठ्यानें रडूं लागलीं. **राधाई मोरी** इतका वेळ अंमळशी स्तब्ध बसली होती, तिचेही नेत्र ही स्थिति लक्षांत येऊन पाण्यानें भरून आले, व तिनेंही आज्ञांप्रमाणेंच मोठ्यानें आक्रोश कर-ण्यास आरंभ केला. असा एकंदरींत सर्व घर-भर घोंटाळा होऊन गेला. तों सुमार बारा चौदा घटका दिवस आला. इतक्यांत **राधाई मोरीचा** नवरा **हणमंतराव** घरांत आला. **हण-मंतराव** नेहमीच्या क्रमाप्रमाणें **रास्त्यांच्या** वाड्यांतून नोकरीवरून घरीं परत आला. त्या वेळीं **राधाई** घरांत नाहींसें पाहून त्यानें ती कोठें आहे ह्मणून चौकशी केली, तेव्हां त्यास आ-पली बायको **रामजी जाधवांच्या** घरचें बो-लावणें येऊन तिकडे गेल्याची बातमी कळली,

व तीवरून तो काय मजकूर आहे ह्मणून चौकशी करावयास आमचे घरीं आला. त्यावेळीं आमची सर्वांची रडारड चाललेली पाहून तो चपापल्यासारखा झाला. नंतर अंमळशानें पुढें येऊन त्यानें हळूच आपल्या बायकोस हा काय प्रकार आहे ह्मणून विचारिलें. त्यावेळीं **राधाईनें** त्या पत्राबद्दल त्यास किंचित्ही ओळख न देतां आमच्या आईच्या प्रकृतीस चित्तक्षोभ होऊन त्यामुळें तिचा अंत झाला ह्मणून कळविलें. **हणमंतराव** हा आमच्या बाबांचा स्नेही असून नेहमी आमचे घरीं येत जात असे, त्यामुळें त्यास आमच्या आईच्या मरणामुळें अतिशय वाईट वाटलें. कांहीं वेळ स्तब्ध राहून त्यानें **रामजी** ह्मणजे आमचा बाप कोठें आहे ह्मणून विचारिलें. तें ऐकून मला बाबा आह्मांस सोडून गेले असें मनांत येऊन अतोनात रडूं आलें. **राधाईनें** आमचे बाबा आई जिवंत असतां घरीं आले होते, व **रास्त्यांच्या** वाड्यांतून वैद्यास आणण्याकरितां ह्मणून बाहेर गेले ते अजून पर्यंत परत आले नाहींत ह्मणून सांगितलें. तें सर्व ऐकून **हणमंतराव**ही बाबांचा शोध करावयास निघून गेला. या गोष्टीस सुमारें एक घटका झाली तथापि बाबा किंवा **गोविंदा** व **कृष्णा** यांचा कोणाचाच कांहीं ठिकाण नाहीं. इतक्यांत "**रामावेडा**" किंवा "**राम्याडू**" हा दाराशीं येऊन आंत डोकावूं लागला. त्यावेळीं त्याची मुखचर्या मला कांहीं विलक्षणशीच भासली, व तीवरून तो वेडा झाला हाता तरी त्यास कांहीं मोठी भयंकर गोष्ट कळली असावी किंवा ती त्याच्या नजरेस पडली असावी असें वाटत होतें. त्यावेळीं कदाचित् आमची आई मेल्याची खबर त्यास कळून तो आमचे घरीं आला असावा असें वाटून आह्मीं कोणीच त्याच्याशीं कांहीं बोललों नाहीं, किंवा त्यास 'आंत ये' असें ह्मटलें नाहीं. त्यामुळें कांहीं वेळ तो दारांतच उभा राहून सरतेशेवटीं हळूच आंत आला तों आमची आई मरून पडलेली त्याच्या दृष्टीस पडली. त्याबरोबर तो अधिक अधिकच कावराबावरा होऊन शेवटीं आपणाशीं परंतु मोठ्यानें बोलला—"नशीव! आई–बाप? दोघय हं!–त्ये मला बोलल आई गमावली, आन् बा तर ह्यो डोळ्याशी म्यां पायला!–" असें बोलत बोलत तो मजकडे कांहीं चमत्कारिक मुद्रेनें पाहूं लागला. त्याबरोबर माझ्या पोटांत बाबांची कांहीं तरी वाईट स्थिति झाली असेलसें वाटून माझ्या उरांत धडकी भरली, व अधिक अधिक रडूं लोटूं लागलें. तथापि तशा स्थितींतही मी त्यास ह्मटलें:–"**रामा**! तुझ्या पायां पडतें! बोल झटझट! काय–बाबांबद्दल तुला काय ठाऊक आहे तें सर्व सांग! कांहीं मागें ठेवूं नको!"

"न्हाय बया न्हाय!–नगरबा नगरबा.–त्ये–**रामडोहा**च्या खालच्या अंगाला–म्यां पायलं–अस्सा गळा कापला न् मंगशी पान्यांत डुई दिली!–छये–लई वंगाळ–आपला तर जीव भियाला जसा!"

**रामावेड्या**च्या तोंडचे हे शब्द ऐकून माझ्या मनाची काय स्थिति झाली तिचें वर्णन करणें ही कठिण आहे. असो. **रामा**च्या तोंडचे हे शब्द संपताहेत तों **गोविंदा** आणि **कृष्णा** दोघे उन्हानें अगदीं घामाघूम झालेले घरीं आले व त्या वेळच्या त्यांच्या मुद्रेवरून त्यांस बाबांचा शोध लागला नसावा असा माझ्या मनानें एकदम तर्क केला. इतक्यांत **रामावेडा** त्यांच्याकडे वळून पहिल्याप्रमाणेंच बोलला. तें ऐकून त्यांच्या मनांत बाबांबिषयीं विलक्षण तर्क

येऊन ते दोघेही त्या वेड्यास बरोबर घेऊन त्याच पावलीं बाबांचा फिरून शोध करावयास बाहेर पडले, व आह्मीं बायकामाणसें सर्व घरींच बसून राहिलों. तिसऱ्या प्रहरचा सुमार झाला तेव्हां **हणमंतराव मोरे** परत आला व बाबांचा कोठें शोध लागत नाहीं ह्मणून सांगूं लागला. तें ऐकून माझी तर कंबर खच-ल्यासारखी झाली, व **रामा वेड्यानें** जो कांहीं अस्पष्ट वृत्तांत सांगितला तो सर्व खरा असावा असें मला वाटूं लागलें. आई तर मेलीच, तिचे पाठीमागें आमचें रक्षण करण्यास काय ते बाबा असावयाचे, परंतु तेही आमच्या दुर्दैवानें आह्मांस नाहीसे झाले, व त्यांस त्या पत्रांतील कांहीं तरी काळा बेरा मज-कूर समजून त्यांनीं खास जीव दिला असें वाटून माझ्या नेत्रांवाटे अश्रुधारा चालल्या त्या कांहीं केल्या थांबेनात. **राधाई मोरीस** व तिच्या नवऱ्यास मी रडूं लागलें हें पाहून अनिवार गहिंवर लोटला. तथापि त्या प्रसंगीं त्यांनीं धैर्य धरून होईल तितकें आमचें समाधान करण्याचा यत्न केला. हा प्रकार सुमारें घटिकाभर चा-लला असेल नसेल तों **गोविंदा** आणि **कृष्णा** परत आले. ते उन्हांतून अगदीं धांवत आल्या-मुळें घामाघूम होऊन गेले होते, व त्यांच्यानें एक शब्दही बोलवत नव्हता अशी त्यांची स्थिति झाली होती तरी दोघांचेही डोळे रडून रडून सुजले होते, त्यावरून ते जे परत आले ते बाबांबद्दल कांहीं कुशल वर्तमान सांगावयास आले नसावे असा एकदम माझ्या मनानें तर्क घेतला, तथापि काय तो सोक्षमोक्ष एकदम समजावा ह्मणून ते केव्हां बोलताहेत असें मला झालें. कांहीं वेळानें **गोविंदानें** हकीकत सां-गण्यास आरंभ केला. तिचें तात्पर्य मिळून इतकेंच कीं, तो आणि **कृष्णा** असे दोघे **रामा-वेड्या**बरोबर **राम**डोहाच्या घाटावर गेले. तेथें त्यांस **रामेश्वराचे** देवळासमोर फरशीवर माती-नें भरलेलीं कांहीं पावलें उमटलेलीं दिसलीं. तसेंच त्या ठिकाणीं कांहीं रक्तही सांडलेलें असून जवळ एक रक्तानें भरलेला सुरा सांप-डला, व शिवाय देवळाचे बाजूचे दरडीवर कांहीं रक्ताचे डागही पडलेले दिसले. त्यांवरून कोणी तरी त्या ठिकाणीं आपला गळा कापून घेऊन शेवटीं खालीं गंगेंत उडी टाक-ली असावी असें निश्चयानें अनुमान करावयास कांहीं हरकत नव्हती. खालीं उडी टाकिली त्या जागीं मोठा खोल डोह आहे त्यांत कदाचित प्रेत सांपडेल ह्मणून दोघांनींही जवळच्या एका घरांतून गळ आणून तेही आंत सोडून पाहिले परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां कदा-चित् उडी डोहांत न पडतां बाजूच्या प्रवाहांत पडल्यामुळें प्रेत पाण्याच्या ओघाबरोबर खालीं वाहून गेलें असावें असें वाटून दोघेही खालीं **भीमकुंड** आळीचा घाट व **नलवड्यांचा** घाट येथपर्यंत शोध करीत गेले तथापि त्यांस कोठेंही प्रेताचा सुगावा लागला नाहीं. हे दिवस भाद्रपद मासाचे होते यामुळें **गंगाबाईस** पाणी-ही पुष्कळच होतें त्यामुळें प्रेत खालीं पुष्कळच वाहून जाण्याचा संभव होता यास्तव आतां शोध करीत बसण्यांत फायदा नाहीं अशी मनाची पक्की खातरी झाल्यावर दोघेही रडत व डोळे चोळीत घरीं आले. कसेंही असो. आईच्या त्या पत्रांतील मजकूर बाबांस कळल्या-मुळें त्यांनीं निराश होऊन आत्महत्या केली असावी अशी माझ्या मनाची खातरी झाली. ही खातरी कितपत वाजवी होती हें माझें मलाच समजण्यासारखें नव्हतें, तथापि एकंद-

रींत आई आणि बाबा दोघेंही आह्मां लहान मुलांस जगांत उघडीं टाकून गेलीं असेंच त्या वेळीं मला वाटलें यांत संशय नाहीं. असो. हा जो एकंदरींत प्रकार झाला तो **राधाईलाही** पूर्णपणें समजला यांत संशय नाहीं, तथापि तिनें याबद्दल एवढीसुद्धां आपल्या नवऱ्यास ओळख दिली नाहीं. **हणमंतरावानें गोविंदाच्या** तोंडची हकीकत ऐकिली होती त्यावरून आमच्या आईची ही आकस्मिक स्थिति झालेली पाहून निराश होऊन त्यानें शोकाच्या भरांत आत्महत्या करून घेतली असावी असें त्यास वाटलें व यासाठीं तो या गोष्टीबद्दल एक चकार शब्दसुद्धां बोलला नाहीं. असो. हा प्रकार झाला तेव्हां आमच्या आईच्या दहनाचा विचार निघाला, तेव्हां **हणमंतरावाचें** ह्मणणें असें पडलें कीं, आमची आई ही पूर्वींची कांहीं अजारी होती असा प्रकार नसून तिचा आकस्मिकच अंत झाला, यासाठीं याजबद्दलची **रास्ते** यांच्या वाड्यांत वर्दी देऊन त्यांजकडून पंचनामा झाल्याशिवाय तिचें दहन व्हावयाचें नाहीं. **राधाईचेंही** ह्मणणें असेंच पडलें तेव्हां आमचा सर्वांचा नाइलाज झाला. सरतें शेवटीं **हणमंतराव रास्त्यांचे** वाड्यांत वर्दी पोंचवावयास जाऊन वाड्यांतील एका कारकुनास घेऊन आला व त्यानें आईच्या मरणाबद्दलची फारशी पुस्तपास्त न करितां **राधाईसच** कांहीं प्रश्न केले. त्यांचीं उत्तरें देतांना तिनें पत्राचा वगैरे कांहीं संबंध न दाखवितां आमच्या आईस पित्ताचा विकार होता व त्यामुळेंच तिचा अंत झाला वगैरे मजकूर कळविला. त्या कारकुनाची **राधाई** ही फार भली बायको आहे अशाबद्दल खातरी होती, यामुळें त्यानें तिच्या सांगण्यावर विश्वास ठेवून आपलें सर्व काम आटपून आमच्या आईचें दहन करावें ह्मणून हुकूम दिला व हिला घाटावर नेण्याकरितां वाड्यांतून बारगीर लोक पाठवून देतों असें सांगून निघून गेला. कारकून गेल्यावर **हणमंतराव** दहनाच्या तयारीस लागला. त्यानें बाजारांत जाऊन प्रेत न्यावयास लागणारें सर्व सामान पिंजर, गुलाल, फुलें वगैरे सुद्धां आणिलें. इकडे **हणमंतराव** तयारी करूं लागला त्याबरोबर आमची पुनरपि रडारडी सुरू झाली. इतक्यांत आसपासच्या शेजारणी बायकाही जमल्या व त्यांनीं आणि मीं मिळून आईस न्हाऊं घालून पातळ नेसविलें. कपाळीं कुंकवाचा मळवट भरल्यावर तिरडी तयार केली होती तीवर तीस निजविलें, व प्रेत बांधून झाल्यावर तिच्या अंगावर फुलांच्या माळा घालून तोंडांत पैसा व तुळशीपत्र घातलें. **गोविंदानें** हातांत विस्तवाचें मडकें घेतलें इतक्यांत वाड्यांतून बाबांचे स्नेही पांच सहा बारगीर येऊन ते आईस उचलून घेऊन जाणार इतक्यांत मला रडणें आवरेनासें होऊन मी आई तिरडीवर निजली होती तशीच तिच्या गळ्यास मिठी मारली व मोठ्यानें "आईग! आईग!" ह्मणून रडूं लागलें. आसपास बायका पुष्कळ जमल्या होत्या त्यांचेंही रडणें चाललेंच होतें. इतक्यांत मला मूर्च्छा आली. पुढें काय हकीकत झाली ती मला ठाऊक नाहीं. तथापि फिरून सावध झालें त्यावेळीं रात्र अंधारी असून मी कोपऱ्यांत एका आंथरुणावर पडले होतें. तसेंच आईचें आंथरुण गोळा करून ठेविलेलें असून त्या आंथरुणाचे जागीं एका बुरडीखालीं दिवा झांकून ठेविलेला दृष्टीस पडला. तसेंच दिवेलागणें नित्याच्या ठिकाणीं टांगून ठेविलें असून दिवा मिणमिण जळत होता. **गोविंदा** व **कृष्णा** हे

आईबरोबर स्मशानांत गेले होते ते अद्यापि परत आले नव्हते. माझ्या पाठीशीं यमुना जनी उघडींच पडून झोंपी गेलीं होतीं. सावध होऊन इकडे तिकडे पहातें तों जवळच कांहीं अंतरावर राधाई मोरी बसलेली माझ्या दृष्टीस पडली तीस पहातांच मला मागील सर्व प्रसंगाची आठवण होऊन अतोनात रडूं कोसळून तिच्या गळ्यांत मिठी मारण्याकरितां धांवणार तों तिनें मला हळूच दूर राहण्यास सांगून कांहीं समाधानाच्या गोष्टी सांगितल्या. आई मेली त्या वेळीं सुमारें दहा घटिका दिवस आला होता, तेव्हांपासून तिसरा प्रहर उलटून गेल्यावर तिला नेली तोंपर्यंत माझें बहुतेक एकसारखें रडणें चाललेंच होतें त्यामुळें घसा अगदीं कोरडा पडून आंतून सुजलाही होता व त्या योगानें तोंडांतून एक अक्षरही निघत नव्हतें अशी माझी स्थिति झाली होती. तथापि त्या वेळीं माझ्या मनांत जें कांहीं झालें होतें तें सांगतां पुरवत नाहीं. माझें आतां जगांत कोणी राहिलें नाहीं असें वाटून चित्तास अत्यंत उदासीनता आली होती तथापि तशा स्थितींतही अतिशय गहिंवरून जाऊन माझें आंतल्या आंत स्फुंदणें चाललेंच होतें. असो. रात्र सुमारें १८ घटिका झाली तेव्हां गोविंदा व कृष्णा परत आले. त्यांनीं आईचें दहन केल्यावर गंगेवर स्नानविन आटपलें होतें. ते घरीं परत आल्यावर राधाईनें आडाचें एक दोन घागरी पाणी काढून तापवून मला अंग धुवूं घातलें. मी मूर्च्छागत होऊन पडलें असतांच तिनें यमुना आणि जनी यांस अंग धुवूं घातलें होतें. असो माझें अंग धुणें झाल्यावर राधाईनें मोठ्या ममतेनें आह्मांस "मुलांनो ! कांहीं थोडें खा !" ह्मणून सांगितलें. आह्मांस त्या सगळ्या दिवसाचा उपास पडला होता तरी सगळा दिवसभर येथपर्यंत सांगितलेला प्रकार चालू असल्यामुळें कोणींही त्या रात्रीं कांहीं खाल्लें नाहीं. मात्र यमुना व जनी यांस राधाईनें अंग धुवूं घातलें त्यावेळीं त्यांस भाकरी भाजून खाऊं घातली होती, व त्यामुळें त्यांस स्वस्थ झोंप लागली होती. असो. आह्मीं मात्र बाकीचीं माणसें उपाशींच निजलों. राधाईही त्या दिवशीं आमचे घरींच निजली. सगळ्या दिवसभर एकसारखे रडण्याचे श्रम झाले होते त्यामुळें मला कांहीं वेळपर्यंत गाढ झोंप आली. गोविंदा व कृष्णा ह्यांस सगळ्या दिवसभर अन्नपाण्यावांचून उन्हांतच फिरावें लागलें होतें, यामुळें ते अतिशयच दमून जाऊन त्यांसही गाढ झोंप लागली. कांहीं वेळपर्यंत झोंप झाल्यावर मला एकसारखीं स्वप्नांवर स्वप्नें पडूं लागलीं. परंतु तीं काय व कशीं पडलीं हें कांहीं आतां मला नीटसें आठवत नाहीं. इतकें मात्र खरें कीं त्या स्वप्नांत आई आणि बाबा यांच्या भयंकर स्थितीविषयीं अनेक प्रकारच्या गोष्टी मनांत आल्या बाबा घरांतून निघून गेले त्या वेळची त्यांची ती भयंकर मुद्रा बराच वेळ एकसारखी माझ्या नेत्रासमोर उभी होतीसें मला वाटलें. मध्यें मध्यें रामाबेडा स्वप्नांत दिसूं लागून तो बाबांविषयीं कांहीं भयंकर वर्तमान सांगतो आहे असें वाटे, व त्या वेळीं बाबांची कांहीं एक प्रकारची विलक्षण उदासमुद्रा, रामडोहाचा घाट, रामेश्वराचें देवालय, रक्तानें भरलेला सुरा, तो खोल डोह, याच गोष्टी एकसारख्या डोळ्यांसमोर उभ्या रहात. व त्यावेळीं मात्र मनास कांहीं विलक्षण वाटे. तसेंच एकादे वेळीं आईची ती सौम्य मुद्रा, तिचें बाबांशीं व आह्मां मुलांशीं ममतेचें भाषण, इत्यादि प्रकार दृष्टीस पडत, व त्यावेळीं आह्मीं

सर्वजण फार सुखी आहों असा भास होई, परंतु मध्येंच तें विछान्यापाशीं पडलेलें पत्र तसेंच उघडें पडलेलें नजर पडे, त्या वेळीं पुनरपि अंगाचा एकदम थरकांप होऊन जाई. एकदोन वेळां मला वाटतें मीं स्वप्नांत तें पत्र काय आहे ह्मणून पाहूं लागलें, तों तें पत्र सर्व रक्तानें भरलेलें असून अक्षरें दिसतसुद्धां नव्हतीं, तथापि तें पत्र उचलण्याकरितां हात पुढें केला तों त्यास एकदम विंचू चावल्याचा भास झाला. असो. हा वृत्तांत फार लांवत चालला. अशी एकंदर सर्व रात्र बहुतेक स्वप्नांतच गेली, तथापि आमची आई कांहीं वाईट आचरण करिते आहे किंवा बाबा गंगेच्या कांठीं प्रत्यक्ष आत्महत्या करीत आहेत त्यांपैकीं एकही गोष्ट स्वप्नांत मला दिसली नाहीं. सकाळीं आह्मीं सर्वजण निजून उठलों, त्यावेळीं मला किंचित् घेरी करतेसें वाटलें. तेव्हां **राधाईनें** मला कांहीं औषध देऊन सर्वांच्या आंघोळी वगैरे झाल्यावर आह्मां सर्वांस थोडें थोडें खाऊं घातलें, आणि मग घरीं निघून गेली. असो. आह्मीं घरचीं सर्व माणसें दहा दिवसपर्यंत सुतकीच होतों, त्यामुळें घरांत फारशी शिवाशिव करावयाची नाहीं यासाठीं **राधाई** दररोज एकदोनदां आमचे घरीं येऊन आह्मांस काय व्हावें नको असेल तें देऊन घरीं जात असे. आई जिवंत असतांना मला कधीं कधीं घरचा स्वयंपाक करावा लागत असे यामुळें मला चालीपुरते सर्व जिनस करितां येत होते, तेव्हां **राधाईनें** सर्व सामान काढून दिल्यावर घरचा सर्व सैंपाक मीच करीं. आह्मां सर्वांस आई व बाबा यांची वारंवार आठवण होऊन अतिशय दुःख होत असे. तथापि सर्वांत धाकटी **जनी** तिला बाबांचा व आईचा फारच लळा असे यामुळें तिला फारच चुकल्या चुकल्यासारखें होई. व तीं कोठें दिसत नाहींतसें पाहून ती केंविलवाणें तोंड करून रडूं लागे. तेव्हां तिचें समाधान मलाच करावें लागे. असो. सुतकाच्या दहा दिवसांत कांहीं विशेष ह्मणण्यासारखी गोष्ट घडली नाहीं. **हणमंतराव** एकदोन दिवसांआड आह्मांस भेटावयास येत असे. बाबांच्या बरोबरीचे बारगीरही एकदोन वेळां घरीं येऊन आमचें समाधान करीत. पांचव्या किंवा सहाव्या दिवशीं खुद्द **रास्त्यांचे** कारभारी आमचे घरीं येऊन त्यांनीं **गोविंदास** सुतक फिटल्यावर आपणास येऊन भेटावयास सांगितलें व **गोविंदानें** ही त्याप्रमाणें त्यांस भेटावयाचें कबूल केलें. बारा तेरा दिवस झाले, तोंपर्यंत सर्व क्रिया **गोविंदानेंच** केल्या. त्या संबंधानें सर्व खर्च आजपर्यंत **हणमंतरावानें** आपल्या पदरचाच केला. सरते शेवटीं त्यानें **रास्त्यांच्या** कारकुनाकडून बाबांचा पगार यावयाचा राहिला होता तो सर्व **गोविंदास** देवविला. ते रुपये आणि बाबांची पेटी उघडून तींत जे रुपये सांपडले, ते असे एकत्र करून त्यांतून **हणमंतरावानें** आपले खर्च झालेले पैसे काढून घेऊन बाकीचे पैसे माझ्या स्वाधीन केले. इतका वेळपर्यंत बाबांचा कोणत्याही प्रकारें कांहींच शोध लागला नाहीं. बाबांबद्दलची हकीकत **रास्त्यांच्या** कारभाऱ्यांस कळून त्यांनीं ही शोधाकरितां खालीं **भुइंजे**पर्यंत मुद्दाम मनुष्य पाठविला होता त्यांसही त्यांचा कांहीं पत्ता न लागतां तो परत आला. तेव्हां एके दिवशीं **हणमंतराव** व **राधाई** उभयतां आमचे घरीं येऊन त्यांनीं हळूच आमच्या माणसांची काय तजवीज करावयाची ह्मणून गोष्ट काढिली. इतका वेळपर्यंत ह्या गोष्टीचा विचार

करावा लागेल हें आह्मां कोणाच्याही गांवीं नव्हतें. आजपर्यंत बाबांच्या पगाराचे पैसे जवळ होते, व आमचा सर्व खर्च त्यांतूनच चालत होता. बाबांची पैसे वगैरे ठेवावयाची पेटी होती ती उघडून पहातां तींत सारे सत्तावीस रुपये सांपडले. आमचे बाबा फार मितव्ययी होते. तथापि त्यांचा पगार थोडा व कुटुंबांत माणसें पुष्कळ यामुळें त्यांच्यानें जास्ती रुपये शिलक राहणें मुष्कील होतें. तशांतून आईच्या क्रियेस खर्च बराच लागला यामुळें शेवटीं रहातां रहातां आमच्याजवळ कायते साडेसहा रुपये शिलक होते. त्यावेळीं **माधवराव रास्ते** हे संस्थानचे मालक होते, त्यांचा **पुण्याचे बाजीराव साहेबांशीं** द्वेष पडला होता यामुळें संस्थानाची धांदल होण्याचा प्रसंग होता. यासाठीं **रास्त्यांच्या** कारभाऱ्यांनीं पुढें मागें **गोविंदास** हुजऱ्यांत किंवा बारगिरांत असामी द्यावयाचें जरी कबूल केलें होतें तरी संस्थानाची ही स्थिति झाल्यामुळें ते **गोविंदास** असामी द्यावयाचें कबूल करीनात. यामुळें आह्मीं पेचाटींत पडल्यासारखीं झालों. तें पाहून **राधाईनें** आपली गरीब स्थिति होती तरी कसें तरी करून एक मूल संभाळावें ह्मणून **हणमंतरावास** विचारिलें, व त्यानेंही तें उदारपणें कबूल केलें. **राधाईस** झाडापाल्यांचीं औषधें द्यावीं लागत त्यासंबंधानें तीं आणण्यानेण्यासाठीं तिलाही कोणी हाताखालीं पाहिजे होतेंच, यासाठीं तिनें **कृष्णास** आपल्या घरीं ठेवून घेण्याचें पत्करिलें. **हणमंतरावाच्या** ओळखीची कोणीएक बाई **लिंब** येथें रहात होती, तिच्याकडून त्यानें **यमुना** आणि **जनी** हीं आपलीं पोटें भरावयासारखीं होत तोंपर्यंत त्यांस संभाळावयाचें कबूल करून घेतलें होतें. तसेंच **पांचवड** हें नातूंचें गांव तेथें कोणी **संभाजीराव** ह्मणून गृहस्थ राहत होता, त्यांचीं मुलें संभाळावयास कोणी कुटंबीण पाहिजे होती, यासाठीं **हणमंतरावानें** त्या गांवीं जाऊन त्या ठिकाणीं माझी सोय करावयाचें ठरविलें होतें. ह्या सर्व **गोष्टी हणमंतरावानें** आमच्या घरीं येण्याच्या अगोदरच ठरविल्या होत्या असो. याप्रमाणें आह्मां पांच भावंडांपैकीं चौघांची तर सोय झालीच. तेव्हां रहातांपैकीं काय तो **गोविंदा** राहिला. त्याचीही थोड्याच दिवसांत कोठें सोय करितों ह्मणून **हणमंतरावानें** कबूल केलें. एकंदरींत बाबा आणि आई यांची तशा प्रकारची स्थिति झाल्यामुळें आह्मांस आमचा सर्व संसार सोडून पोटासाठीं घर सोडून जाण्याची पाळी आली तें पाहून मला व **कृष्णाला** फार वाईट वाटलें. **हणमंतरावही** आपण मनांत आणलेली आमच्या घराची व्यवस्था आह्मांस सांगत असतां **गोविंदा** खुशाल चैनीनें ऐकत होता. असो आतां आह्मीं चौघे तर आतां घर सोडून जाणार, व **गोविंदाचाही** घरीं रहाण्याचा कांहीं नेम नव्हता, ह्यासाठीं पुढें मागें **गोविंदाचें बाईस** राहण्याचें **नच** जमलें तर आमचें घर **हणमंतरावाच्या** स्वाधीन करावयाचें आह्मीं कबूल केलें. सरते शेवटीं आमची ताडातोड व्हावयाची वेळ आली त्यावेळीं मी, **कृष्णा** आणि **जनी** यांच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा चालल्या. **जनीस** माझा आलीकडेस फारच लळा लागला होता, यामुळें मी तिला सोडून जाणार ह्मणून तिला समजून ती मोठ्यानें घसा काढून रडूं लागली. सरते शेवटीं तिची कशी तरी समजूत घालून **हणमंतराव** स्वतः तिला आणि **यमुनेला लिंबापर्यंत** पोंचवावयास निघाला त्यावेळीं तरी **यमुनेस** वाईट वाटून रडूं येईल ह्मणून मला वाटलें होतें, परंतु तसा

**शारिका**—अहो, परदेवता फार आयास न पडतां प्रसन्न झाली हा चमत्कारच आहे. पण सखे, मधुरस सेवन केल्यावर घृताचें सेवन केलें असतां ज्या प्रमाणें मनुष्याची स्थिति होते, त्या प्रमाणें रस्त्यांतून मुहूर्तमात्र जातांना पाहिलेला तो महाभाग **मन्मथ** पुनरपि **नंदन**वनांत विशेष पहावयास सांपडल्यामुळें आपल्या राजकन्येची स्थिति झाली आहे. परंतु त्याचें मन इजविषयीं कसें आहे तें कांहीं समजत नाहीं!

**मयूरिका**—सखे, या उभयतांचें परस्परांवर प्रेम वाढावें ह्मणून झटणारी जी **भगवती**ची प्रिय अंतेवासिनी[१], तिनें, **रतीस** पाहिल्यापासून त्या महाभागासही फारच संताप होत आहे ह्मणून सांगितलें.

**शारिका**—वाहवा! वाहवा! एकून हें ऐकून मला फार आनंद होतो!

**मयूरिका**—सखे, आतां तूं कोणीकडे चाललीस?

**शारिका**—आपल्या राजकन्येच्या प्रिय मैत्रिणी **कोकिलवाणी** आणि **कीरवाणी** यांनीं सांगितल्यावरून **रतीस** शीतळ उपचार करण्याची सामग्री आणण्याकरितां जातें.

**मयू०**—ह्यापासून काय उपयोग होणार? उलटी पेटलेल्या अग्नींत तुपाची आहुति टाकावी तशी स्थिति होईल! या पेक्षां त्यांनीं अगोदर मनांत आणिलेला इच्या विरहवेदना कमी करण्याचा उपाय तो बाई मला चांगला वाटतो.

**शारिका**—तो कोणचा बरें ?

**मयूरिका**—( **शारि**केच्या कानांत अमुक ह्मणून सांगते. )

१. शिष्या.

**शारिका**—( मान डोलवून ) वाः ! हें तर फारच चांगलें ! असो. तर आतां उशीर न करितां जा आपलें काम करावयास, मीही आपलें काम करावयास जातें.

( दोघी निघून जातात. )

( हा प्रवेशक झाला. )

( तदनंतर धारागृहांत[१] असलेली व सख्या जिला शीतल उपचार करीत आहेत अशी रति येते. )

**रति**—( आपणाशीं ) हे ह्रदया ! त्या मनोहरास **नंदन**वनामध्यें पुष्कळ वेळ पाहिलें असूनही थोडा वेळ पाहिल्याप्रमाणें असें संतप्त कां बरें होतेस ? अथवा, तुझें मेलें कसेंही बरें वाईट होवो, परंतु प्रत्यक्ष दावाग्नीचा संतापही ज्यापुढें कांहींच नाहीं अशा प्रकारचा तुला संताप झाला आहे, त्यामुळें तुझ्यामध्यें निरंतर वास करणाऱ्या त्या कोमल मूर्तीची काय स्थिति होईल याविषयींच मला फार चिंता लागली आहे.

**दोघी सख्या**—प्रियसखी ! या धारागृहांत अगदीं नुकत्याच तोडलेल्या कोमल पल्लवांच्या शय्येवर तूं निजली असून ताजा उगाळलेला चंदनरस तुझ्या अंगास लाविला आहे, व त्यावर काळ्या वाळ्याच्या पंख्यानें आह्मी वारा घालीत आहों, त्यापासून तुला काहीं बरें वाटतें काय ?

**रति**—( तें न ऐकलेंसें करून आपणाशीं ) अथवा जो क्षणमात्र दृष्टीआड गेला असतां ज्याच्या संतत स्मरणानें ह्रदयास सुखाचा लेशाहि प्राप्त होत नाहीं, त्यास प्रियजन कसें ह्मणावें ?

**सख्या**—( कष्टी होऊन ) प्रियसखी ! हें काय बरें? अगे ! आह्मीं तुला विचारितों आहों त्याचें तूं आह्मांस उत्तर देखील देत नाहींस !

१. कारंड्याची खोली.

**रति**–(ऐकल्यासारखें करून) अं ? सख्यांनो ! काय ह्मणतां ?

**सख्या**–("या धारागृहांत अगदीं" इ. पूर्वोक्त वाक्य पुनः ह्मणतात.)

**रति**–(उसासा टाकून) सख्यांनो ! तापविलेल्या बाणांच्या पिंजऱ्यांत हजारों तीक्ष्ण सुयांच्या अग्रांवर मी पडलें आहे, माझ्या सर्व अंगास वणवा लागला आहे, आणि तशांत हा चवताळलेला विषारी सर्प माझ्या अंगावर फूत्कारांचा वारा घालीत आहे, तर त्यापासून माझ्या जिवास कसें बरें बरें वाटेल ?

**सख्या**–(तिची निंदा केल्यासारख्या शब्दानें) प्रियसखी ! हें ग काय ? आपलीं वडील माणसें च्चट सर्व एका अंगास गुंडाळून ठेवून, व कुलीन कन्यकेचेंही वर्तन एका अंगास झुगारून, एका क्षणांत तुझी अशी अवस्था झाली तेव्हां तुला ह्मणावें तरी काय ?

**रति**–(प्रीतियुक्त रोषानें) सख्यांनो ! आतां उपदेश करणें पुरे ! तुह्मीं आपल्या कामास लागा कशा !

**सख्या**–(घाबरल्यासारख्या होऊन एकमेकींशीं) अगे बाई ! इच्या या शरीरदाहामुळें ही किसलयशय्या[1] पहा कशी करपून गेल्यासारखी झाली आहे, तर ही काढून टाकून हिच्यासाठीं फुलांची सेज करूं या, आणि तीवर हिला निजवून हिच्या सर्व अंगास वाळा वाटून लावूं या. तसेंच, ह्या लता व हीं कमळाचीं देठें नुकतींच काढून आणलीं आहेत, तीं हिच्या अंगावर घालून, गार पाणी शिंपडून दुप्पट गार केलेल्या ह्या कमलिनीच्या पानांनीं हिला वारा घालूं या !

(तसें करितात.)

**रति**–(त्यापासून अतिशय ताप पावून) सख्यांनो, माझा प्राण मेला माझ्या कुडीला कसा वज्रलेपासारखा खिळून राहिला आहे, त्यामुळें तो तुमच्या असल्या प्रयत्नांनींही निघून जात नाहीं !

**कीरवाणी**–सखी **कोकिलवाणी** ! हा पण बाई चमत्कार नव्हे काय ? स्त्रियांचें मन दुसऱ्या तरुण पुरुषांकडे गेलें असतां त्यांस मदन त्रास देतो हें नीटच आहे, परंतु हिचें मन स्वतः **मदना**वरच गुंतलें आहे असें असतां तो हिला त्रास काय ह्मणून बरें देतो ?

**कोकिलवाणी**–सखी **कीरवाणी** ! अगे अभिमत वस्तूचा स्वभावच असा कीं त्याची प्राप्ति न झाली तर संताप व्हावयाचाच !

**रति**–(हर्ष पावून गडबडीनें) अगे सख्यांनो, अगे· लौकर तें रत्नासन येथें आणून मांडा ! माझ्या शरीरास संताप होत आहे ही बातमी कळल्यामुळेंच काय, हा माझा प्रियजन माझ्या समीप आला आहेसें दिसतें !

**सख्या**–(वाईट वाटून) प्रियसखी ! आतां हा भ्रम टाकून दे ! अगे ! या कन्याजनांच्या अंतःपुरामध्यें परक्याचा प्रवेश कसा बरें होईल ?

**रति**–(मत्सरयुक्त होऊन) सख्यांनो ! एकूण मी **रति** देखील तुह्मांस **परकी** वाटतें अं ?

**सख्या**–(आपणाशीं) एकूण प्रियसखीचें त्या महाभागावर प्रेम अतिशयच जडलें आहे !

**रति**–सख्यांनो ! तुह्मीं दोघींनीं कांहीं तरी मसलत केली आहे, त्यामुळें मनुष्य प्रत्यक्ष दिसत असतांही तो नाहीं असेंच तुह्मीं ह्मणत आहां !

**सख्या**–(रागावल्याचें मिष करून) सखे ! एकूण

1. कोंवळ्या पानांची शय्या.

तुला आह्मीं खोटें बोलतों असें वाटतेंना ?

**रति**–( डोळ्यांतून आसवें ढाळिते. ) सख्यांनो ! तर मग तो प्रियजन जवळ नाहीं अं?–हाय हाय ! मज मंदभागिनीचा घात झाला !

( असें ह्मणून मूर्छित होते. )

**सख्या**–( घाबरून कांपत कांपत तिला ताडाच्या पंख्यानें वारा घालितात. ) प्रियसखी ! सावध हो ! सावध हो ! तुजसाठीं क्लेश पावणारा हा जन तुझ्या बाजूस बसला आहे ! तर त्यास तूं आपल्या चंद्रकिरणाप्रमाणें शीतळ अशा दृष्टीनें पाहून आनंद दे !

**रति**–( सावध होते व डोळे उघडून बाजूस पाहून ) सख्यानों ! माझ्या बाजूस हा जन बसला आहे असें सांगून माझी कां बरें प्रतारणा कारितां ? अगे ! तो माझा ह्रदयवल्लभ येथें तर कोठें दिसत नाहीं ! ( असें ह्मणून पुन: मोह पाहून डोळे मिटते. )

**सख्या**–( कष्टी होऊन ) आतां तर शर्थ झाली ! आतां हिचें समाधान तरी कसें करावें, बाई! प्रियसखीनें आपल्या मनास कांहीं कर्मणूक व्हावी ह्मणून आपल्या हातानें चित्रफलकावर त्या प्रियजनाचें सुंदर चित्र काढिलें आहे, पण तें त्या वेड्या शारिकेनें कोठें ठेविलें आहे कांहीं कळत नाहीं ! यासाठीं मयूरिकेनें हा सखीविरहाचा वृत्तांत भगवतीस निवेदन केलाच असेल, तर तीच होऊन जर यावेळीं मन्मथ हिच्या दृष्टीस पाडील तरच धडगत आहे !

( तदनंतर आपल्या वाड्याच्या वरच्या मजल्याच्या खिडकींत बसलेला, व विरहव्यथा पावलेला असा मन्मथ विदूषकासहवर्तमान दृष्टीस पडतो. )

**मन्मथ**–मित्रा सांख्यायना ! काल तूं आंबरस झोडण्याच्या नादानें निघून गेलास त्यामुळें फसलास ! कारण कीं, त्यामुळें जी वस्तु दृष्टीस पडावयास पाहिजे होती ती कांहीं तुझ्या दृष्टीस पडली नाहीं !

**विदू०**–तें सगळें मी समजलों ! पण तूं दोन प्रहर होत तोंपर्यंत या झाडापासून त्या झाडापाशीं, तेथून दुसरीकडे, असा हिंडत होतास, तेव्हां भुकेनें कळकळून जाऊन तुझ्या तोंडांत एक घांस तरी पडला का ?

**म०**–मित्रा ! तुला अजूनही माझ्या बोलण्याचा संशयच वाटतो ! अरे, तुला सांगतों, मीं धनुष्यांतून एक बाण सोडून एक आम्रफळ खालीं पाडिलें, व तें घ्यावयास जातों आहें इतक्यांत,

श्लोक.

लक्ष्मीच मूर्ता[1] जणुं नंदनाची[2],<br>
निरंतरा[3] सिद्धि मनोरथाची,<br>
माकंदपार्श्वस्थ[4] लताच भैली[5]<br>
ऐशी प्रिया दृष्टिपथास आली.

**सख्या**–( पाहून आश्चर्यानें ऐकमेकींशी ) भगवतीनें आपलें भगवतीत्व[6] प्रगट केलें वाटतें.

**रति**–( ऐकल्यासारखें करून व ओळख पटल्याचा भाव दाखवून हळूहळू डोळे उघडते.)

**सख्या**–( समाधान पावून ) प्रियसखी पुन: सावध झाली, वाहवा ! वाहवा ! ( एकीकडे वळून ) हिला पण आपल्या प्रियजनाची ओळखही पटल्यासारखी दिसते. हें कसें काय बरें?

**विदू०**–( आपणाशीं ) ताप आलेल्या मनुष्याच्या अंगावर गार पाणी शिंपडावें, तशांतला हा प्रकार झाला ! ( उघडपणें ) तुझें ह्रदय तन्मय झालें आहे, त्यामुळें तुला कोणचीही स्त्री पाहिली तरी तीच आहेसें वाटतें ! किंवा कोणीं सांगावें ? तुला भ्रांतिही कदाचित् झाली असेल !

---

१. मूर्तिमंत. २. नंदनवनाची. ३. विलंब ( अंतर ) न लागतां होणारी. ४. आम्रवृक्षाच्या जवळ असलेली. ५. नवमालिका लता. ६. भगवतीपण. सामर्थ्य.

**म०**—वेड्या ! मला भ्रांति कोठून बरें होईल ? अरे, पहा. सांगतों त्यावेळीं काय चमत्कार झाला तो !

साक्या.

एकाएकीं दृष्टी पडलों तीच्या मी ज्या कालीं,
सघर्म रोमांचितही ऐशी तत्क्षणिं तत्तनु झाली.
स्तनावरूनी पदर लागला गळोनियां पडण्यास,
कोमळ तीचा एक हस्तही त्यातें सांवरण्यास.
अंगुल्यग्रामध्यें होतें तोडियलें जें कुसुम,
तेंही पडलें खालिं गळोनी, न सुचे कांहीं काम.
लागे चोंहीकडे पहाया तोंचि स्तिमित फिरोनी
दृष्टी होई. प्रियसखि राहे सुचिर उभी स्वस्थानीं.

**रति**—( ऐकून गडबडीनें शय्येवर अर्धी उठल्यासारखें करून वाड्यांत बसलेल्या **मन्मथा**स पाहून आनंदानें आपणाशीं )

दिंडी.

नील कमलापरि तनू श्याम याची.
दिसे शोभा शशिपरी आननाची.
लोचनांतें आनंद बहू देतो.
आणि चित्तीं मम मोह उपजवीतो.

( मोठ्यानें सख्यांप्रत ) सख्यांनो ! आतां हा दिसतो आहे हा देखील भ्रमचना ?

**सख्या**—( एकमेकींशीं ) हिला इतक्यांतचही गोष्ट सांगून उपयोग नाहीं. ह्यासाठीं हिच्याच नादानें अंमळ घेऊंया. ( मोठ्यानें ) प्रियसखी ! होय, तूं ह्मणतेस तसेंच कां होईना ?

**रति**—सख्यांनो ! ह्या स्वभावतःच प्रेमळ महाभागानें आमच्या घराजवळच हें नवीन सौध निर्माण केलेंसें वाटतें !

**सख्या**—होय, सखी ! तसेंच वाटतें खरें !

**विदू०**—मित्रा, चांगल्या कुलांत उत्पन्न झालेली ती स्त्री इतकी परवश झाली होती ह्मणतोस तर मग तूं तिचा हात कां नाहीं धरलास?

**मन्म०**—मित्रा, काय तूं मला अधीर समजतोस?

**विदू०**—छे छे ! तूं तर बाबा अतिधीर ! ह्मणून तर फिरून माझ्या दृष्टीस पडलास !

**मन्म०**—( स्मरण झालेंसें करून आनंदानें ) तिच्या त्या सौंदर्याचें वर्णन करण्यास वाणीही समर्थ नाहीं ! अहाहा !

श्लोक.

आहेत श्रुति, नासिका उभयतां तन्नेत्रसीमाकरा;
वर्धिष्णु स्तन विस्तरासि धरिती पर्यंत बाहूंतरा;
जाई झाकुनि अन्य अंग पृथुला तीच्या नितंबामुळें;
तारूण्याद्भुतशिल्पभूतचि तिची आहे तनूसें कळे.

**विदू०**—त्यांत कांहीं अर्थ नाहीं ! एकाद्या पदार्थावर आपली प्रीति जडली ह्मणजे तोच पदार्थ आपणास सुंदर वाटूं लागतो.

**मन्म०**—असें नव्हे. ती सुंदरी तशीच आहे. आणखी सांगतो ऐक.

श्लोक.

कंजाक्षी सुंदरीच्या अधरमधुरसास्वादना लुब्ध झाली,
वेगें तत्केशभृंगावलितुनि उतरे संहती एक खालीं.
येतां ते भृंग खालीं अवचित बघुनी नासिका भीत झाले,
मानोनी तीस चाफेकळिच परतुनी भ्रूमिषें भिन्न ठेले.

**रति**—( ही सुंदरी कोण हें जाणण्याच्या इच्छेनें सख्यांस ) सख्यांनो ! ही अशी धन्य तरुणी कोण बरें असावी, जिचें हा महाभाग अशा प्रकारचें वर्णन करीत आहे ?

**सख्या**—प्रियसखी ! अंमळशा आपण ऐकूं ह्मणजे पुढें सर्व व्यक्त होईलच !

---

१. स्तब्ध, निश्चल. २. परतंत्र, अस्वाधीन, देहभानरहित.

१. कान. २. तिच्या नेत्रांची मर्यादा करणाऱ्या. तिचे नेत्र नासिकेपासून कानांपर्यंत विस्तृत असा भावार्थ. ३ वाढणारे. ४. बाहूंच्या अंतरापर्यंत. ५. तारूण्याची अद्भुत इमारतच काय अशी. ६. कमलनेत्री, हें ‘ सुंदरी ’चें विशेषण. ७. अधरोष्ठांतील मधुरस सेवन करण्यास. ८. तिचे केश हेंच कोणी भ्रमरांची पंक्ति तींतून. ९. समुदाय.

मोठ्या आनंदानें देईन! जा ! दुष्टा! मांगा ! माझ्यापुढें उभा नको राहूं ! छि ! छि ! आपलें तोंड काळें कर !

**येस०**—( आश्चर्यानें ) काय ? **येस्वंतरावावर** तुमची प्रीत व्हती व्हय ?

**मालो०**—दुष्टा ! माझी एकट्यांचीचशी काय, परंतु या दुनियेंतील एकूनएक मनुष्याची त्याजवर प्रीति होती असें ह्मटलें असतांही चालेल ! अहाहा ! तो तर मेलाच, परंतु त्याचे गुण तुला काय सांगूं? त्याच्या सारखा धर्मात्मा सज्जन असा प्राणी तोच ! त्या प्राण्यास दुष्कर्माचा ह्मणून एवढासुद्धां डाग नव्हता! दुष्टा! अशा त्या सत्पुरुषाचा तूं घात केलास त्यावेळीं तुझे हात गळून कसे नाहीं पडले ? ज्या अधमाधमाचें वचन ऐकून तूं त्या सत्पुरुषाचा घात करावयास प्रवृत्त झालास, त्या अधमाधमाची जिव्हा तात्काळ कशी नाहीं झडली ! हाय हाय ? रे उदार राजपुत्रा ! हाय हाय !

( मूर्छित होऊन पडतो. )

**येस०**—भल्या माणसा ! सावध हो! सावध हो!

( मालोजी कांहीं वेळानें सावध होतो. )

**मालोजी** ! तुह्मीं इस्वासूक माणूस हां आनू तुमची **येस्वंतरावावर** भक्ति व्हती, ह्मनून तुमच्या कानांत येक गोष्ट सांगतों. ह्यो **दौलतराव** लईच दुष्ट हाये, त्येच्याशीं म्यां ह्या खिणतलुक कपट करूनशी त्येला फसावलं ! तुमचा **येस्वंतराव** जिता हाये !

**मालो०**—काय ? **यशवंतराव** जिवंत आहे ह्मणतोस ?

**येस०**—नुसता जिता हाये इतकंच न्हव, तर ह्या येळला ह्या **सुवर्नपुरी**मंदीबी हाये !

**मालो०**—छत् ! भलतंच ! तूं कांहीं तरी सांगून मला फसवूं पहात आहेस !

**येस०**—तुमाला माझं ह्मननं खोटं वाटत असल तर व्हेलं तर त्येलाच ये वाड्यामंदी आनूनशी तुमांला दावूं का ?

**मालो०**—बाबा ! तेवढी मात्र गोष्ट करूं नको ! आमचे **बाळमहाराज** जिवंत आहेत ह्मणून सांगितलेंस एवढ्यानेंच मी खुष आहें. विचाऱ्यास या वाड्यांत आणणें ह्मणजे विचाऱ्या दीन गाईला व्याघ्राच्या जाळींत आणून सोडण्यासारखें आहे! यासाठीं बाहेर राहूनच ते शंभर वर्षें जगोत एवढीच माझी देवाशीं प्रार्थना आहे ! आमचें विचाऱ्यांचें कांहीं झालें ह्मणून चिंता नाहीं, परंतु ते भगवंताच्या दयेनें चिरायु होवोत !

**येस०**—त्येची तुमाला यवढी पंचाइत करन नग ! मी त्येला असा येस पालटूनशी आनीन, कीं त्येला कुनीबी वळकनार न्हाई ! कुनाचबी डोळ अक्शी घारीवानी असल तरी त्येलाबी वळकन्याची मुशाकील पडल ! त्ये समदं न्हायलं ! लई कशाला, परतक्श तुमच्या पुढंच आनूनशी त्येला उभं कयेलं, तर तुमीबी न्हाइ त्येला वळकनार!

**मालो०**—तेवढें मात्र बोलूं नको. आमचे **बाळमहाराज** सप्तपाताळांतही दडून बसले असले, तरी तेथूनही त्यांस मी ओळखून काढीन ! त्यांची ती मनोहर शूर मूर्ति अद्यापि या अंतःकरणांत जागृत वास करित आहे ! यासाठींच तुला सांगतों तूं त्यांला ह्या ठिकाणीं आणण्याच्या भरीस पडूं नको.

**येस०**—तुमी ह्मंगतां त्ये समदं खरं, पन इचार करा, **येस्वंतराव** हितून ग्येल्याला आज सात वरसं झालीं. त्येंची सारीं वरसं वनवास भोगन्यांत ग्येलीं, तवां **यस्वंतराव** तुमाला जसा आटवतो तसाच आतां कशा-

वरून असल? अन् ह्यें पहा तुमी त्येला पायल्ये वक्तीं तो चांगला जवान गडी व्हता ती जवानी आतां ग्येली असल, तवांपक्षा तो आतां मोटावी झाला असल, म्हनून ह्यं गतों तो आतां तुमाला वळकतां बी न्हा येयाचा !

**मालोजी**–तूं ह्मणतोस त्या सगळ्या गोष्टी झाल्या असल्या, किंवा त्यांचें दर्शन घडल्याला मला सातांचे ठिकाणीं शंभर वर्षे झालीं असलीं, तरी आमच्या **बाळमहाराजांची** ती वीरश्रीची ऐट व मुद्रा, व त्यांच्या नेत्रांतील शौर्याची ती चमक, व इतकें असून त्यांच्या मूर्तीची ती मनोरमता, ह्या गोष्टी ज्या अंतःकरणांत ठसल्या आहेत त्या कदापि ह्मणून जावयाच्या नाहींत ! त्यांवरूनच मी **बाळमहाराज** कोणच्याही स्थितींत असले तरी त्यांस ओळखीन ! परंतु ह्या सगळ्या खाणाखुणांशिवाय आणखी त्यांची एक खूण मला ठाऊक आहे. ती हीच कीं मागें ते येथून जावयाचे अगोदर एकदा त्यांच्या मातोश्रींवर एक भयंकर वाघ चालून आला होता तो त्यांनीं ठार मारिला. त्या झटपटींत त्यांच्या मस्तकास वाघानें नखानें ओरबाडलें होतें, ती खूण तर कदापिही बुजावयाची नाहीं !

**येस०**–कसं ह्मणतां ? **येस्वंतरावाला** वाघानं वरवाडलं व्हतं ?

**मालो०**–होय. त्यांच्या मस्तकावर वाघानें अमक्या ठिकाणीं ओरबाडलें होतें, ती खूण–

**येस०**–या खुनसारखीच व्हती न्हव ? (आपलें पागोटें खालीं काढून दाखवितो.)

**मालो०**–(आश्चर्यानें) अरे ! मी झोपेंत तर नाहींना ? काय ? आमचे **बाळमहाराज** महाराज ! आपल्या या चरणांच्या **दर्शनानें** हा दास धन्य व कृतार्थ झाला !

(त्याच्या पायां पडतो.)

**यशवंतराव**–**मालोजी** ! तुह्मीं फार विश्वासूक आहां यासाठीं तुह्मांस कांहीं बक्षीस द्यावें असें मनांत आहे. (त्यास आलिंगन देतो.)

**मालो०**–अहाहा ! आज हा केवढा सुदिन उगवला !–परंतु महाराज !–

**यश०**–**मालोजी** ! तुह्मीं असे थरथर कां कांपतां ? माझा हात बळकट धरून ही केंविलवाणी मुद्रा कशाकारितां ? काय ? मी खरोखरीच **यशवंतराव** आहें किंवा नाहीं याचा तुह्मांस संशय वाटतो ?

**मालो०**–(नम्रतेनें) नाहीं ! सरकार ! आपणांस पाहून आपल्या कैलासवासी तीर्थरूपांची मला आठवण झाली ! दुसरें कांहीं नाहीं !–तें असो. परंतु महाराज ! आज्ञा होईल तर एक विनंती करीन. महाराज ! या दुष्ट **दौलतरावानें** आपला घात करण्याकरितां दोन मारेकरी पाठविले होते, त्यांचे हातून आपली सुटका कशी झाली ?

**यश०**–त्यांपैकीं एकजण तर पहिल्या सपाट्या बरोबरच तोडला. दुसरा मात्र माझ्याशीं कांहीं वेळ लढला, परंतु सरते शेवटीं त्याचीही तरवार मीं हिसकावून घेऊन त्यास यमसदनास पाठविलें. त्याच्या बोटांत या जुलमी **दौलतरावाची** खुणेची आंगठी होती ती त्यानें प्राण जाण्याचे **अगोदर** माझ्या स्वाधीन केली, आणि मला बोलला:–"मी तर आतां मरतोंच. मी प्रत्यक्ष आपल्या प्रभूवरच शस्त्र धरिलें, तेव्हां मजसारखा अधम पातकी या जगांतही कोणी नसेल. या पातकाचें क्षालन कसें होईल तें होवो. परंतु आतां मी एवढेंच करितों कीं, ही आंगठी

तुह्मांस देतों. ही तुह्मीं **दौलतरावास** परत नेऊन द्या, ह्मणजे तुह्मीं मेलां अशाविषयीं त्याची खातरी होईल, व अशा युक्तीनें कोणास-ही न समजतां तुह्मांस खुशाल **सुवर्णपुरींत** फिरावयास सांपडेल !" इतकें बोलून त्यानें प्राण सोडिला.

**मालो०**—तें सगळें बरोबर जमलें, परंतु तुमची येथें कोणाचीही ओळख नसतां वाड्यांत प्रवेश कसा झाला ?

**यश०**—**यशवंतरावा**चा घात करण्यास **अमरशिंगा**स पाठविलें होतें त्याचा मी चाकर, व **यशवंतरावास** मीं मारिलें, अशी गप्प एक झोंकली. शिवाय मीं वेश घेतला आहे पठाणाचा, तेव्हां दरवाज्यावर वरदी पोंचविणारा कोणी उभा होता, त्यास मीं हा वेश घेतला आहे, परंतु वस्तुतः मी **अमरशिंगा**चा चाकर आहें ह्मणून सांगितलें व त्यानेंही विशेष पुस्तपास्त न करितां माझी आंत वरदी पोंचविली. पुढें आंत गेल्यावर ती आंगठी परत दिली, तेव्हां माझ्या बोलण्यांत कांहीं लबाडी आहे असा कोणास अंदेशाही यावयाचें कारण राहिलें नाहीं, आणि शिवाय मी देशांतली कुळंवाऊ भाषा बोलत होतों, त्यामुळें सर्व गोष्टी नीट जमल्या.

**मालो०**—अशी गोष्ट जर आहे तर मग आपण यावयाचे पूर्वी आपण मेलां ह्मणून खबर आली होती हें कसें ?

**यश०**—वाः, ती कंडी तर मुळीं मींच पिकविली. अशाकरितां कीं, एकदाही कंडी चोंहीकडे पिकली, ह्मणजे मी कोण काय याबद्दल कोणी फारशी पुस्तपास करूं नये ! असो. बेताप्रमाणें सर्व गोष्टी तर जमल्या. मला एका गोष्टीचा मात्र संशय होता, तो हाच कीं कदाचित् **अमरशिंगा**चा चाकर **दौलतरावा**च्या ओळखीचा असेल, परंतु तसा कांहीं प्रकार दृष्टीस पडला नाहीं; आणि तशांतून दृष्टीस पडलाच असता तर कांहीं कमजास्ती प्रकार सांगावा लागला असता. असो. आतां त्याची काळजी करावयास नको. परंतु, **मालोजी** ! तुह्मांस एक गोष्ट विचारावयाची आहे—अरेरे ! नुसती ती गोष्ट विचारावयाचें मनांत आणिल्याबरोबर अंगावर शहारे येतात !—**मालोजी**! माझ्या आईची हल्लीं स्थिति कशी काय आहे ? ती पूर्वी सद्गुणी होती तशीच अद्यापि पण आहेना ?

**मालो०**—महाराज ! हें काय विचारावें ? तो दुष्ट आपल्या मातोश्रींनीं वश व्हावें ह्मणून कोटिशः प्रयत्न करितो, एकादे वेळीं मी बळजोरी करीन किंवा जीव घेईन ह्मणून भयही घालितो, परंतु सर्व व्यर्थ ! महाराज! आपण जावयाचे अगोदर **आईसाहेब** जशा सद्गुणी होत्या तशाच अद्यापिही आहेत !

**यश०**—परमेश्वर तिचें कल्याण करो, आणि तिला सद्गुणापासून भ्रष्ट न होऊं देतां त्याबद्दलचें बक्षीस माझ्या हातून तिला मिळेल असें करो एवढेंच त्याजपाशीं माझें सदा सर्वकाळ हात जोडून मागणें आहे !—तें असो. पण **मालोजी** ! माझी आणि आईची केव्हां बरें गांठ पडेल ?

**मालोजी**—महाराज ! आपण येथें आहां यामुळें एकादा अनर्थपातही घडेल याचें मला भय वाटतें आहे !

**यश०**—काय ? भय ? तें कां बरें ? भयाचें काय बरें कारण ? छे ! **मालोजी** तुह्मीं चुकतां ! ज्यानें कधींच कांहीं पाप केलें

नाहीं त्यानें काय ह्मणून भ्यावें बरें? पापी मनुष्यानें मात्र भ्यावें!

**मालो०**—तें कांहीं असो, परंतु महाराज! आपण येथें असतां कांहीं तरी अनर्थापात घडणार असें माझी मनोदेवताच मला सांगते! यासाठीं महाराज! आपण या वाड्यांतून पार निघून जावें अशी माझी आपणांस विनंती आहे!

**यश०**—(आवेशानें) जाईन! परंतु मला एक गोष्ट कर्तव्य आहे, कीं जी ऐकल्याबरोबर प्रत्येक जुलुमी मनुष्याची पण छाती फाटून जाईल, ती केल्यावांचून मी कधीं येथून बाहेर जावयाचा नाहीं!

**मालो०**—(आश्चर्यानें) महाराज! मी आपला भावार्थ समजलों नाहीं!

**यश०**—**मालोजी**! या ठिकाणीं राहून, ज्या दुष्टानें विनाकारण माझ्या पित्याचा कपटानें घात केला, व माझ्या सद्गुणी मातेस क्लेशांत पाडून या राज्यांतील माझ्या प्रिय प्रजांवर कोटिशः जुलूम केले, त्या दुष्टाचा सूड पुरता उगवीन तेव्हांच या राजवाड्याच्या बाहेर माझें पाऊल पडेल! तोंपर्यंत नाहीं!

**मालो०**—तें सर्व खरें. परंतु महाराज! आपणांस कोणाची मदत नाहीं. तर आपल्या एकट्याच्या हातून ही गोष्ट कशी घडूं शकेल? महाराज! ह्या ठिकाणीं आपणाविषयीं जरा एवढा संशय आला, कीं लागलीच त्या दुष्ट **दौलतरावाचे** शतशः सैनिक आपल्या अंगावर तुटून पडतील!

**यश०**—तें सर्व मी समजतों, आणि ह्मणूनच तर हा घातकी पठाणाचा पोशाख घेऊन मी राजवाड्यांत आलों! **मालोजी**! तुह्मांस खात्रीनें सांगतों. आजची ही रात्र उजाडावयाचे अगोदर ही—ही—पहा—ही तरवार त्या दुष्टाच्या उरांत भोसकून त्याचा जीव घेतों!

(तरवार दाखवितो.)

**मालो०**—महाराज! परमेश्वर तुमचें संरक्षण करो! परंतु महाराज! आपण असें उतावीळ होऊं नये, व जी गोष्ट करणें ती दूरवर विचार करून करावी!

**यश०**—**मालोजी**! तुह्मीं असें समजूं नका, कीं, मी केवळ नुसता सूड उगविण्याच्या भरांत मागचा पुढचा विचार न करितां तसाच एकटा इकडे आलों! मी इकडे येण्याचे अगोदर आपल्या पक्षाचे **हिंमतराव, मानाजीराव फांकडे** वगैरे सगळ्या मंडळीस भेटलों आणि मग इकडे आलों!

**मालो०**—वाहवा! असें आहे तर कांहीं चिंता नाहीं! महाराज! तिकडली कशी काय हकीकत आहे? आपल्या पक्षास किती लोक अनुकूळ आहेत? आपण सर्वांनीं मिळून बेत एकंदर कसा काय ठरविला आहे?

**यश०**—**मालोजी**! सांगतों. ऐका! आपल्या पक्षास या शहरांतील सर्व लोक अनुकूळ आहेत! त्यांपैकीं सुमारें दोनशें निवडक असामी आज रात्रीं या वाड्यावर चोंहोंकडून हल्ला करतील! राजवाड्यांत हल्लीं चोहोंकडे तर उत्सवाची गर्दी चालली आहे, यामुळें सर्व लोक यथेच्छ खाण्यांत आणि दारू पिण्यांत मग्न झाले आहेत, तेव्हां ऐन मध्यरात्रीच्या सुमारास जिकडे तिकडे राजवाड्यांत सामसूम झालें कीं, आपल्या जिवाची परवा न करितां जिकडे तिकडे तोडातोड एकदम सुरू होईल! व तोंपर्यंत मी राजवाड्यांतच राहून ते सर्व लोक आंत येण्याची वाट पहात राहीन! तो दुष्ट कदाचित् माझ्या आईस त्रास देऊं लागेल, तर त्याचा समाचार मी एकटाच घेईन!

**मालो०**—परमेश्वर आपलें संरक्षण करो ! परंतु महाराज ! ही बातमी ऐकून माझें काळीज तर थरथर कांपूं लागलें आहे ! पण महाराज ! ही गोष्ट केव्हां करावयाचें ठरलें आहे आपण ह्मटलें ?

**यश०**—ऐन मध्यरात्रीं ही गोष्ट करावयाचें ठरलें आहे ! मी इकडे आलों त्यावेळीं **मानाजीराव फांकड्यां**च्या घरीं सर्व मंडळी गुप्तपणें जमली होती. मध्यरात्र व्हावयाचे अगोदर सर्वांच्या आणा शपथा होऊन **हिंमतराव** सर्व लोकांस घेऊन बाहेर पडेल ! तें असो. **मालोजी** ! चला आतां. मला आईकडे घेऊन चला !

**मालो०**—महाराज ! मला वाटतें आपण आईसाहेबांस एव्हांशीं भेटावयाचें करूं नये. आपण कोण आहां हें जर त्यांस कळलें, तर त्या आनंदाच्या भरांत किंवा आपल्या सुरक्षितपणाबद्दल त्यांस भय वाटेल तर त्या धांदलींत महाराज ! खचित आपण अमुक आहां हें बाहेर लोकांस कळेल, व तसें झालें तर मोठाच अनर्थापात होईल यांत संशय नाहीं ! यासाठीं महाराज ! माझी आपणांस अशी विनंती आहे कीं, त्या दुष्टाचा प्राणनाश झाल्याशिवाय आपण आपल्या मातोश्रींस भेटण्याचें करूं नये !

**यश०**—तें कांहीं व्हावयाचें नाहीं ! मला तिची गांठ तर घेतलीच पाहिजे ! माझें मनच मला तिजकडे जाण्याविषयीं ओढीत आहे. कोणी सांगावें, कदाचित् तिची व माझी हीच शेवटली भेट होईल. त्याचा काय नेम सांगावा ?

**मालो०**—असें आहे, तर महाराज ! मी सांगतों एवढी तरी एक गोष्ट आपण करावी. ती ही कीं आपण अमुक हें त्यांस मुळींच कळवूं नये ! असें केल्यानें सर्व परिणामें नीट होईल ! आपण पठाणी वेश धारण केला आहे खरा. परंतु आपण वास्तविक **यशवंतरावां**चेच कोणी स्नेही आहां असेंच त्यांस भासवा, व त्यांनीं हल्लीं आहेत त्याप्रमाणेंच सद्गुणी रहावें ह्मणून त्यांस सांगण्यास, व **यशवंतराव** अद्यापि जिवंत आहेत ही बातमी कळविण्यास आपणांस त्यांजकडे पाठविलें आहे असेंच त्यांस वाटवा !

**यश०**—ठीक आहे ! कांहीं चिंता नाहीं ! तुमच्या सांगण्याप्रमाणेंच मी वागेन. याविषयीं तुह्मीं आपल्या मनांत किमपिही धास्ती बाळगूं नका. बरें चला आतां ! मला आई कोठें आहे तिकडे चला घेऊन !

**मालो०**—चलावें महाराज ! सर्वशक्तिमान व परम न्यायी ईश्वर आपलें संरक्षण करून आपण ज्या सत्कार्यासाठीं आज येथें आलां आहां त्यांत आपणांस यश देवो, व पूर्वी आपले परम पूज्य वडील या नगरींत राज्य करीत असतां ज्याप्रमाणें राज्यांतील सर्व लोक सदासर्वकाळ बिनघोर आनंदांत रहात असत त्याप्रमाणेंच आतांही एकवेळ आपण त्यांचे धनी होऊन त्यांस आनंद देऊन त्या सुखी नांदोत, एवढेंच परमेश्वरापाशीं माझें हात जोडून मागणें आहे.

**यश०**—अहाहा ! **मालोजी** ! तुमच्या या भाषणानें ती पितृमूर्ति माझ्या अंतःकरणांत पुनरपि एकवार जागृत होऊन आपल्या दर्शनरूप वायुवेगानें या दुष्टाच्या शासनार्थ माझा क्रोधाग्नि अधिकाधिक पेटवित आहे ! हाय ! हाय ! **मालोजी** ! प्रत्यक्ष या—या राजवाड्यांत—देवाच्या देव्हाऱ्यासमोर— माझे

बाबा ध्यानस्थ बसले असतां त्या गळेकापू दुष्टानें विश्वासघातानें त्यांचा अंत केला या गोष्टीचें स्मरण होऊन माझ्या सर्वांगाचा पण कसा तिळपापड होऊन गेला आहे व यांबद्दल त्या दुष्टाचा केव्हां घात करीन असें मला झालें आहे! आः!— हाय हाय! बाबा! अहो बाबा! मरणानंतर आशेस गुंतून जर छायादेहानें तुमचा या तुमच्या प्रिय राज्यांत अद्यापि संचार होत असेल, तर तुमचा घात केल्याबद्दल या दुष्टाचा सूड घेण्यास तुह्मी मला सहाय व्हा! कसें-ही संकट असो, कसाही बिकट प्रसंग असो, प्रत्यक्ष मूर्तिमंत **यम**ही पुढें येऊन उभा राहिला, तरीही कमी न होतां उत्तरोत्तर वाढत जाणारें तें तुमचें लोकोत्तर धैर्य, व धारातीर्थी शत्रूशीं छातीशीं भिडून लढत असतां सदावृद्धिंगत होणारा व शत्रुसैन्याची पण गाळण करून टाकणारा तो तुमचा उत्साह मला द्या. तसेंच मजवर व आपल्या विश्वासुक प्रजा ज्या माझ्या करितां आपले प्राणही द्यावयास तयार झाल्या आहेत त्यांजवर आपला छायारूप वरदहस्त ठेवा!

( दोघे निघून जातात. )

## अंक ३.

### प्र० १.—राजसबाईच्या महालाच्या बाहेरचा दिवाणखाना.

( गजराबाई येते. )

**गज**०—मी स्वप्नांत तर नाहींना? मला भूल तर नाहींना पडली? त्या मनोहर राजपुत्राची मूर्ति माझ्या ह्रदयांत जागृत वास करीत आहे, त्यामुळें तर मला हा भास नसेलना झाला? छे छे! हा खचित भास नव्हे! मला खचित वाटतें, मीं त्याला असें जातांना पाहिलें! मी त्यास पाहिल्याबरोबर ओळखलें! परंतु देवा! त्याच्या पहिल्या मूर्तीत आणि आतांच्या मूर्तीत कितीं फरक झाला आहे! पूर्वीचें त्याचें तें सौम्य सुहास वदन आतां कोणीकडे नाहींसें होऊन आतां नुसतें त्याजकडे पाहिलें कीं भीति वाटून ह्रदयाचा थरकांप व्हावा अशी कांहीं त्याची विलक्षण मुद्रा झाली आहे!

( इतक्यांत कोणी समोर येत आहेसें पाहून )

अग बाई! हें कोण बरें इकडे येत आहे! आं?—होय होय! हाच तो राजपुत्र माझा ह्रदयवल्लभ **यशवंतराव**! आणि हें त्याच्या बरोबर दुसरें कोण बरें येतें आहे? काय **मालोजी**? अग बाई! पण हें काय? **मालोजी** आतां इतक्यांत त्याचे बरोबर होता, तो त्याला इकडे येण्याची वाट दाखवून वाटतें निघून गेला! खचित! खचित! हाच तो राजपुत्र खचित! मला वाटतें हा राजपुत्र वेश पालटून आपल्या मातोश्रीस भेटावयास येत आहे! देवा! देवा! त्याला आपण एकटाच येथें आल्याचें कांहींच वाटत नाहीं, आणि माझे बाबा तर त्याचा घात करावयास सदा टपले आहेत! आई अंबाबाई! दया कर, आणि मज दीन दासीची विनंती मान्य करून माझ्या ह्रदयवल्लभास कशाचीही इजा न होई असें कर! देवा! देवा!—हायरे उदार राजपुत्रा! तूं आपल्या जिवाचीही परवा न करितां या व्याघ्राच्या जाळींत आला आहेस, परंतु तुझी अशी स्थिति पाहून माझ्यानें मुकाट्यानें कसें बरें राहवेल? असा सद्गुणी, असा

धर्मात्मा उदार प्राणी अशा स्थितींत पडला असतां त्यास येथून निघून जा नाहीं तर तुजवर अशीं संकटें गुदरतील ह्मणून न सांगणें माझ्या हातून कसें होईल ? देवा ! ह्या उदार राजपुत्राचे उपकार माझ्या हातूल कसे फिटतील ?

( यशवंतराव येतो. )

**यश०**—( उसासा टाकून ) हाय हाय ! आज सात वर्षें एकसारखीं वनवासांत काढून आतां मी आपल्या प्रियमातेचें **दर्शन** घ्यावयास निघालों असतां माझी काय ही स्थिति झाली आहे ? डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा चालल्या आहेत, त्यामुळें मला धड वाट देखील दिसत नाहीं ! हे अश्रूंहो ! तुह्मीं अंमळ स्थिर व्हा ! हे त्द्दया ! अंमळ धीर धर ! हाय हाय ! त्या दुष्टानें माझ्या मातेची दुर्दशा केलेली प्रत्यक्ष पाहण्यास मनाचा माझ्या कसा धीर होईल तो होवो !

**गज०**—( पुढें येऊन ) आपण कोणी परकी गृहस्थ आहां असें वाटतें ! आपण इकडे कोणीकडे फिरत आहां ?

**यश०**—( तीस पाहून आपणाशीं ) हाय हाय! घात झाला ! अरे, ही इकडे कशाला आली ? ( तिला टाळून दुसरीकडून जाऊं लागतो. )

**गज०**—( त्याच्या वाटेंत येऊन ) आपण मला उत्तर दिल्याशिवायच चाललां ! आपण कोण आहां ? आपणास मी ओळखलेंसें वाटतें ! **पर्वतेश्वराच्या** जंगलांतल्या चोरट्यांचे हातून माझी सुटका केली तेच आपण नव्हे काय? आपलें नांव **यशवंतराव**, नव्हे? बोला ! बोला !

**यश०**—( चपापून मनांत ) अरे ! हिनें मला कसें बरें ओळखिलें ? ( मोठ्यानें ) राजकन्ये! तूं खाचित काहीं तरी भ्रमांत आहेस! तूं ह्मणतेस तो मी नव्हें. मी कोणी दुसराच आहें, व जर कदाचित् तुला **यशवंतराव** मेल्याची हकीकत कळली असेल तर तुला सांगतों **यशवंतरावाचा** घात करणारा तो मीच आहें.

**गज०**—महाराज ! आपण बोलतां हें कदाचित खरें असेल, परंतु आपण बोलत असतां आपलें चित्त बावरल्यासारखें दिसतें, यामुळें आपण मला कांहीं तरी सांगून फसवीत आहां असेंच मला वाटतें ! महाराज ! बोला बोला ! आपण **यशवंतराव** नव्हे काय? माझे प्राणदाते **यशवंतराव** ते आपणच, नव्हे ? हाय हाय ! रे परमेश्वरा ! काय संकट हें ! महाराज ! बोला ! बोला ! आपणाप्रमाणें माझेंही चित्त बावरूं लागलें आहे. यासाठीं तुह्मांस हात जोडितें,—तुमच्या पायां पडतें—खरेंच सांगा ! भलतेंच सांगून मला विनाकारण संशयांत नका पाडूं !—आपण कोणीही असा, परंतु माझा संशय एवढा फेडाच ! सोक्ष कीं मोक्ष तो एकदा कायतो मला कळूं द्या !—माझे प्राणदाते जिवंत असतील तर तसें सांगा ह्मणजे या **गजरेचा** एकदांचा जीव खालीं पडेल ! नाहीं तर प्राणदात्यांची जी हकीकत तीच माझीही होईल !

**यश०**—( आपणाशीं ) अहाहा ! केवढा उदारपणा हा ! वाहवा वाहवा ! धन्य तुझी ! ( मोठ्यानें ) राजकन्ये! त्या यःकश्चित् **यशवंतरावा**करितां असें साहस करणें तुला योग्य नाहीं ! मला **यशवंतरावा**बद्दल सर्व हकीकत माहित आहे, परंतु त्यानें तुझ्यावर उपकार केलेले मला मुळींच स्मरत नाहींत!

आणि जरी कदाचित् तो एकादे वेळीं तुझ्या उपयोगीं पडला असला तरी त्याबद्दल तूं इतका मनांत विचार करण्याची जरूर नाहीं कारण तो बोलून चालून तुझ्या बापाचा वैर करणारा, तेव्हां त्याला या अपराधाबद्दल देहदंडच योग्य आहे! याकरितां तुला सांगतों तूं त्याजबद्दलचा क्षणमात्रही विचार मनांत आणीत जाऊं नको! तसेंच—

**गज०**— देवा! काय संकट हें? महाराज! कृपाकरून आपला उपदेश अंमळ एकीकडे ठेऊन मी विचारितें एवढेंच मला सांगा! आपणास **यशवंतरावा**बद्दल काय माहित आहे? आपण **यशवंत**राव नव्हे हें खचितना?

**यश०**— (गोंधळल्यासारखा होऊन) आं? काय ह्मटलेंस, राजकन्ये? मी तुझें ह्मणणें नीट समजलों नाहीं!

**गज०**— (तो गोंधळला हें पाहून) महाराज! आपण गोंधळलांसे दिसतें!—खचित! खचित! मी आपणांस ओळखिलें! आपण माझी त्या चोरट्याचे हातून सुटका केली, त्यावेळीं मी आपणास आपण कोण ह्मणून विचारिलें, त्यावेळीं मी **दौलतरावा**ची कन्या असें समजून, आपण आतां गोंधळलां तसेच त्यावेळींही गोंधळला होतां, व जरी या वेळीं आपण वेश पालटला आहे, तरी या वेशाच्या आड आपली तेव्हांची आणि आतांची मुद्रा खचित एक आहे असें मी ओळखिलें!—महाराज! बोला! बोला! आपणास कदाचित् असें वाटत असेल कीं ही आपल्या वैऱ्याची कन्या आहे यास्तवही आपला विश्वासघात करील, तर ही कल्पना आपण क्षणरभरही मनांत आणूं नये. माझे प्राण आपण वांचविले त्याअर्थी असा अधमपणा माझ्या हातून कधींही होणार नाही! पाहिजे असेल सर प्रत्यक्ष परमेश्वराचीही मी शपथ वाहीन, परंतु एवढ्यानेंही आपली खात्री होत नसेल तर सरते शेवटीं माझी आपणास एक विनंती आहे, ती हीच कीं आपण एकवेळ स्वमुखानें माझी संशयनिवृत्ति करा. आणि मी विश्वासघात करीन ह्मणून जर आपणास भय वाटत असेल तर विलंब न लावितां माझे प्राणही घ्या, मी ते देण्यास तयार आहें.

**यश०**—राजकन्ये! आजपर्यंत मला वाटत होतें कीं, **सुवर्णपुरी** सोडून गेल्यास मला पुष्कळ वर्षें झालीं, व तेव्हांपासून हा वेळपर्यंत माझें एकसारखें रानोमाळ अनेक प्रसंगीं अन्नपाण्याशिवायही फिरणें चाललें होतेंच यामुळें माझी त्यावेळची ती जवानी आतां राहिली नसेल, आणि यास्तव मी वेश पालटला असतां मला कोणी ओळखूं शकणार नाहींत. परंतु तूं मला ओळखिलेंस खचित! तूं ह्मणतेस तोच **यशवंतराव** मी! परंतु मला एवढें सांग तूं मला कसें ओळखिलेंस? मी अमुक आहें हें तुला कसें समजलें? तसेंच आणखीं एक—मी येथें आहें हें तुझ्याशिवाय आणखीं कोणा कोणास कळलें आहे?

**गज०**—हे राजपुत्रा! स्वतः अनंग असतांही कामिजनसार्थास आपल्या प्रियजनाचें निवासस्थान दाखविणारा जो कामदेव त्यानेंच, आपण मला प्राणदान केलें त्यावेळीं, आपली व माझी ओळख करून दिली, व त्यानेंच मला आपल्या शूर मूर्तीस ह्या हृदयमंदिरांत ठेवावें ह्मणून उपदेश केला,

## प्रकरण ३ रें.

मागील दोन प्रकरणांत सांगितलेली हकीकत ज्या दिवशीं घडली त्या दिवशीं रात्रौ सुमारें प्रहर रात्र झाली असेल नसेल तों **अर्धशाला**च्या वाड्यांतील लोकांची भीतीनें अगदीं धांदल उडून गेली होती. त्या वेळीं **जैन** व **हिंदु** लोकांचे वारंवार तंटे होत, व त्यामध्यें बहुदाः राजसत्तेच्या जोरामुळें हिंदु लोकांचें प्राबल्य विशेष होऊन **जैनांचें** नुकसानच होत असे यामुळें **जैन** लोकांच्या घरांतून सर्व लोक अवशीसच सर्व दारेंबिरें लावून स्वस्थ बसत असत, व जरा कां कोठें बाहेर कोणी आल्याची चाहूल झाली कीं लागलींच त्यांचें अंतःकरण भयानें धडधडूं लागे. त्यावेळीं **जैन** लोक चांगले संपत्तिमान असत यामुळें गरीब **जैनां**पेक्षां श्रीमंत **जैनांस** रात्रौ आपल्या घरांवर दरवडा वगैरे यावयाचें भय विशेष असे, यामुळें जेवढे ह्मणून श्रीमंत लोक, त्यांच्या घरासभोंवती बरेच रुंद व खोल असे खंदक खणण्याची चाल पडली होती. **अर्धशाला**च्या वाड्यासभोंवतीही अशा प्रकारचा खंदक होता व त्याच्या पलीकडल्या अंगास कोणी गृहस्थ असून मोठ्यानें दार उघडा! दार उघडा ! ह्मणून आंतील माणसांस हाका मारीत होता. मध्यें खंदक असल्यामुळें व खंदकावरून इकडून तिकडे जाण्याकरितां दिवसा ज्या फळ्या टाकीत असत त्या रात्रीचे कारणामुळें काढून घेतल्या होत्या यामुळें त्या गृहस्थास एकदम आंत जाण्यास पंचाईत होती. त्यावेळीं रात्र सुमाराची काळोखी असून शिवाय रस्त्यावर झाडांची किंचित् गर्दी होती, त्यामुळें त्या गृहस्थाबद्दल हा कोण काय आहे वगैरे गोष्टी समजण्यास आंतील माणसांस कांहीं साधन नव्हतें. तथापि वाड्याच्या दुसऱ्या मजल्यावरील एका खिडकीचें दार किंचित् किलकिलें उघडून त्याचे आडून आंतील माणसांनीं हा कोणी तरी घोडेस्वार असावा इतकें अनुमान काढिलें. हा गृहस्थ बाहेर येऊन उभा राहिल्यावर त्यानें पहिल्यानें एक दोन हलक्यानेंच हाका मारिल्या, परंतु त्यांकडे कोणीच लक्ष दिलें नाहीं. तेव्हां तो बाहेरील गृहस्थ कावल्यासारखा होऊन मोठ्यामोठ्यानें हाका मारूं लागला. पहिल्या पहिल्यानें त्यांकडेही कोणी लक्ष दिलें नाहीं तेव्हां तो **गृहस्थ** संतापून पुढच्या दारावर बारीक बारीक खडे पण जोरानें मारूं लागला. तें ऐकून कांहीं वेळानें हळूच आंतून कोणी भीत भीत पुढचें दार उघडलें. व एकदोन क्षण गेल्यावर आंतून हातांत लावलेला कंदील घेतलेला असा एक रखवालदार व दुसरे दोघे शिपाई असे तिघे हातांत बरच्या व भाले घेतलेले बाहेर पडले.

" कोण आहे ? तुह्मांला कोण पाहिजे ? " असें रखवालदारानें सावकाशपणें विचारिलें.

" बोल झटकन. आंत **भद्रमणि अर्धशाल** आहे काय ? "

" कोण ? **भद्रमणि अर्धशाल** ? आमचे यजमान? होय ! "

" होय. फार बोलूं नको. बोल बोल **भद्रमणि अर्धशाल** आंत आहे काय ? "

" आमचे यजमान? काय ? आंत आहे काय? तुह्मी कोण ? असें उर्मटपणानेंसें बोलतां ? आहेत काय असें नाहीं बोलतां येत वाटतें ?"

" होय होय ! पाजी माणूस नाहीं तर ! अरे. होय. तुझे यजमान आंत आहेत काय? " तो **गृहस्थ** तापून दांत ओंठ खाऊन विचारितो.

" असें माणसानें कसें नीट बोलावें ! गोड

ड्या गृहस्थांची वाट पहात असतील व याविषयींचा तुह्मां सगळ्यांचा बेत पूर्वींच ठरला होता, यामुळें तुझी यावेळीं इकडेच आलां ह्मणून मला अचंबा वाटत आहे !"

हें भाषण ऐकून **कार्तिकशंभूनें** आपला घोडा अगदीं खंदकाच्या कांठापर्यंत आणिला, व तिकडून तो रखवालदारही त्यास भेटण्याकरितां ह्मणून त्या खंदकापाशीं आला, व त्या वेळीं त्या दोघांमध्यें सारें कायतें दहा बारा हातांचें अंतर राहिलें होतें, असो. ह्याप्रमाणें पुढें आल्यावर **कार्तिकशंभु** त्यास हलक्या स्वरानें उत्तर करितो:—"हें बघ. भल्या **हयदक्षा** ! आतां तूं विचारतोस, आणि तुझी खातरी झाल्याशिवाय तूं कांहीं आंत जाऊन माझें काम करीत नाहींस ह्मणून तुला सांगतों- आज सकाळीं **रत्नाकर** आणि तो दुसरा एक अशा दोघां जतींस सोडविण्याकरितां ह्मणून मी **पुनमल्ली** शहराचे आसपास आलों होतों, परंतु मी गांवांत शिरावयाचे अगोदरच त्या दुष्टांनीं त्या विचाऱ्यांस सुळावर चढविलें ह्मणून मला खबर लागली !"

**कार्तिकशंभूचें** हें भाषण ऐकून **हयदक्षाच्या** आंगावर शहारे येऊन तो ह्मणाला:—"**अर्हत्** त्यांचें कल्याण करोआणि त्यांस निर्वाणास पोंचवो ! तें असो. पण **कार्तिकशंभू** महाराज ! तुमचें येणें निष्फळ झालें पाहून मला फार वाईट वाटतें !"

"**अर्हताची** मर्जी ! तीपुढें कोणाचा इलाज चालणार ? असो. पुढें मी गांवांत आलों तेव्हां अकस्मात् मला एक गृहस्थ भेटला त्यानें मला **भद्रमणि** गांवांतच आहे व त्याची आणि आपली कांहीं वेळापूर्वी गांठ पडली होती ह्मणून सांगितलें. तेव्हां **भद्रमणीनें** **पवित्रदीर्घिकेकडे** जावयाचा बेत रहित केला असेलसें समजून मी रात्रीचे वेळीं कोणाचे दृष्टीस न पडतां इकडे येण्याचा बेत केला. इकडे येण्याविषयीं इतकी चोरी कां तें तुला ठाऊकच आहे. असो. परंतु कदाचित् **भद्रमणीची** गांठ पडेल अगर न पडेल तर त्यांस पोंचविण्याकरितां ह्मणून हें पत्रही लिहून बरोबर घेतलें होतें. बरें, तर आतां तरी तुझे सर्व संशय दूर झाले किंवा नाहींत ? तर हें बघ ! **भद्रमणि** घरांत असेल तर त्याचेकडे मला आतांचे आतां घेऊन 'चल. परंतु जर तो घरांत नसेलच, तर **त्रिवेणीचीही** माझी गांठ पडली तरी चालण्यासारखें आहे. कारण मी ज्या गोष्टीबद्दल बोलावयास आलों आहे, ती गोष्ट **भद्रमणीस** किंवा **त्रिवेणीस** सांगितली तरी एकच !"

**हयदक्ष** उत्तर करितो:—"तें सर्व ठीकच आहे. परंतु मघां मी आपणास सांगितलें त्याप्रमाणें आमचे धनी साहेब **चसतरू** गांवीं गेले असून त्यांचा बेत तेथून **पवित्रदीर्घिकेकडे** जावयाचा आहे व यासाठीं ज्यानें तुह्मांस ते येथें आहेत ह्मणून सांगितलें तो निःसंशय खोटें बोलला. परंतु त्याचा कांहीं फारसा विचार नाहीं. मी तुमचें पत्र आणि निरोप हीं दोन्ही **त्रिवेणी** ताईकडे जाऊन पोंचवितों, आणि त्यानंतर तिनें जर तुह्मांस आंत बोलाविलें तर मी तावडतोब परत येऊन तुह्मांस आंत घेऊन जाईन! महाराज! आपण जाणतांच आहां कीं हल्लीं दिवस फार वाईट आले आहेत ! फारच वाईट ! आणखीं हल्लीं दरवडेखोरांचेंही आसपास फार भय आहे. यामुळें आमच्यासारख्या प्रभु **बोधिसत्वाच्या** सेवकांचा केव्हां घात होईल याचा नेम नाहीं, यामुळें

कोणावरही भरंवसा ठेवणें तो दूरवर विचार करूनच ठेविला पाहिजे !"

**कार्तिकशंभु** रागावून त्यास विचारितो:— "लुच्चा थेरड्या ! हें तूं मलाच उद्देशून बोलतोस काय ?"

**हयदक्ष** नम्रतेनें उत्तर करितो:—"छे छे महाराज ! असें कोठें झालें आहे ? आपल्यासारख्या प्रभु ० **बोधिसत्वा**च्या भक्तशिरोमणि संभावित गृहस्थांस मी असें कसें ह्मणेन ? माझ्या ह्मणण्याचा उद्देश एवढाच कीं, हल्लीं दिवस आले आहेत फार वाईट, कोणच्या वेळेस काय होईल याचा नेम नाहीं, यासाठीं जपून वागावें हें बरें. ह्मणून मी आपणास मी आंतून जाऊन येईं तोंपर्यंत बाहेरच राहण्यास सांगितलें. हे दिवस असे कठिण आले आहेत, ह्मणून सूर्यास्तानंतर हुकुमाशिवाय खंदकावरून फळ्या टाकूं नयेत ह्मणून मला धन्याचा सक्त हुकूम झाला आहे, तो जर मोडिला, तर मज गरीबाचा रोजगार जाईल, ह्मणून मी आपणांस ह्मटलें. फार कशाला ? कालच रात्रीं तो **यसलुराकडचा वसुभद्राचार्य** इकडे आला होता, त्यालाही असेच येथें उभें रहावें लागलें होतें." इतकें बोलून जरा खांकरल्यासारखें करून तो ह्मणतो:—अंह:—रहू हू—ह ! **वसुभद्राचार्या**वर आमच्या **त्रिवेणी** ताईचें मन बसलें आहेसें मला वाटतें. तें सर्व खरें असलें तरी चाकरी ह्मटली ह्मणजे ती इमानानेंच बजावली पाहिजे. तेथें भीडभाड कांहीं उपयोगाची नाहीं. आणि तशांतून आमचे धनीसाहेब येथें नाहींत तेव्हां त्यांचे मागें त्यांच्या घराचा बंदोबस्त मलाच ठेवणें आहे. यासाठीं बोललों याची माफी असावी !"

"होय ! चल ! माफी आहे ! परंतु तुझी ही बडबड पुरे कर ! आतां जास्ती बोलशील तर बरीक माफी नाहीं व्हावयाची ! चल जा कसा एकदम आंत निघून !"

"हा गेलों महाराज !" असें ह्मणून त्यास सलाम करून **हयदक्ष** आपल्या सोबत्यांसकट दार लावून आंत गेला.

इकडे **कार्तिकशंभु**ही घोड्यावरून खालीं उतरला, आणि त्यानें घोड्याचा लगाम हातीं धरून त्यास खंदकापाशीं आणून पाणी पाजलें, आणि तो पहिल्यानें ज्या झाडांखालीं उभा होता, त्या झाडांच्या पायथ्याशीं हिरवळ पुष्कळ होती, तींत चारण्याकरितां घोडा एका झाडास बांधिला. इतका प्रकार आटपल्यावर तो **हयदक्षा**ची वाट पहात त्या इमारतीकडे तोंड करून उभा राहिला. त्यावेळीं रात्र सुमारें प्रहरभर झाली असून चंद्र उगवला नव्हता, व जरी वर आकाशमंडपांत नक्षत्रांचीं लक्षावधि झुंबरें लागून राहिलीं होतीं, तरी तीं फारच अंतरावर असल्यामुळें त्यांचा प्रकाश त्या इमारतीवर फारसा पडण्याचा संभव नव्हता. तथापि उघड्या मैदानांत मनुष्य उभा असतां एकादे वेळीं मोठ्या कष्टानें तरी कांहीं थोडें बहुत त्यास दिसण्याचा संभव होता, परंतु **कार्तिकशंभु** ज्या ठिकाणीं उभा होता, त्या ठिकाणीं उंच उंच वृक्षांची बरीच गर्दी असल्यामुळें त्यांच्या घननील छायेंत ती इमारत दडून गेल्यासारखीच वाटत होती. यामुळें इमारतीकडे पहात राहण्यास त्या इमारतीची बाह्य रचना ही पूर्वी पाहिली असल्याशिवाय अशा अंधाराच्या वेळीं पुरतेशी मनांत येण्यास अडचण होती. दिवसा उजेडीं पाहिलें असतां ही इमारत चौकोर असून तिच्या पश्चिमेच्या अंगास एक मोठा बाग दिसे. ह्या बागास लागूनच दोन पडण्या

होत्या. व त्यांपैकीं एकींत घोडे बांधण्याची जागा होती, व दुसरींत गाई गुरांचा गोठा असून त्याच्या शेजारीं दोन तीन साधारण मोठ्या कोठड्या होत्या. या कोठड्या चाकर माणसें रहाण्याकरितां बांधलेल्या होत्या. ह्या दोन पडव्या व बाग व थोरली इमारत एवढ्या सर्वांचा विस्तार सुमारें दोन बिघे इतका असून त्यांजसभोंवती जंगमाच्या गळ्यांतील फडकें गुंडाळून गुंडाळून केलेल्या जानव्याप्रमाणें खंदक पसरला होता. **अर्धशालाच्या** इमारतीपासून सुमारें दोन तीन हातांच्या अंतरावर एक बराच मोठा ओढा वहात असे, व तो भर उन्हाळ्यांतही कोरडा पडत नसे. त्याचें पाणी आडवून उत्तरेच्या अंगानें तें ह्या खंदकांत आणून सोडिलें होतें, व हा खंदकही बराच खोल आणि रुंद असा खणला असल्यामुळें त्यावरून फळ्या काढिल्या असल्यावर आंत इमारतीकडे सहसा कोणास जातां येण्याजोगें नव्हतें. नुसती इमारत पाहिली असतां ती चौफेर तिमजली अशी बांधलेली असून बाजूच्या भिंतींची रचना बुरुजांप्रमाणें होती, व एकादे वेळीं शत्रूनें घरास गराडा घातला असतां त्याशीं लढतां यावें या हेतूनें त्या बुरुजांत जागोजाग अनेक झरोके ठेविले होते. **कार्तिकशंभु** उभा होता त्या जागेच्या समोर त्या इमारतीचा थोरला दरवाजा होता व इमारतीच्या बाकीच्या बाजूंस लहान पक्षद्वारें असून तींही लहान दिंड्यासारखींच होतीं. दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यांवर खिडक्या ठेविल्या होत्या त्या देखील त्या वेळच्या रिवाजास अनुसरून थोडक्याच ठेविल्या होत्या, व त्याही अगदीं खुल्या नसून दारांच्या बाहेरल्या बाजूंस लोखंडाचे गज ठोकले होते. पूर्वीं या देशांत मारामाऱ्या व तंटे होण्याचें नेहमीं भय असे, यामुळें आपल्या घरावर केव्हां शत्रूचा हल्ला होईल याचा कोणास क्षणभरही भरंवसा वाटत नसे यासाठीं त्या वेळीं लोकांत पेटीसारखीं बहुशः चोहोंकडून बंद केलेलीं अशींच घरें बांधण्याची चाल पडली होती, यामुळें घरांत सहसा बाहेरच्या वाऱ्याचा संचार हीहोऊं शकत नसे. प्रस्तुतचा वाडा अशाच प्रकारचा बांधलेला होता, तथापि तेवढ्यावरून या वाड्यांत रहाणाऱ्या लोकांची अन्यथा वाईट स्थिति होती असें अनुमान करणें बरोबर नाहीं. आतां एवढें खरें कीं, आलीकडे **जैनांचें** व **हिंदु** लोकांचें वैर फारच माजलें असल्याकारणानें व राज्यकर्ते **हिंदु** असल्यामुळें वाड्यास किंचित् पडती कळा लागली होती असें ह्मटलें असतां फारशी चिंता नाहीं. तथापि एकंदरींत पहातां **भद्रमणींची** संपत्ति कमी झाली होती असा कांहीं प्रकार नव्हता. खिडक्यांच्या वरल्या अंगास कमानी राखल्या असून त्यांच्या बाहेरल्या बाजूस बळकट सर बसविले होते, व आंतून चित्रविचित्र रंगांच्या कांचा बसविल्या होत्या. यामुळें बाजूच्या सूर्यप्रकाशामुळें आंतील भागांत दिवसा उजेडीं जिकडे तिकडे इंद्रधनुष्याच्याच छटा पसरल्या आहेत काय असा भास होई. हा वाडा बांधून सुमारें दीडशेंवर वर्षें झालीं होतीं.इतक्या अवकाशांत त्यावर वारा व पाऊस यांचा वारंवार भडिमार होत असे, तरी त्यांच्या योगानें बाहेरील भिंतींचा रंग मात्र काळसर झाला होता. बाकी इमारतीच्या इतर कामास एक केंसाइतकाही भंग झालेला कोठें दृष्टीस पडत नव्हता.आंतून पहातांही ही इमारत उत्कृष्ट टोलेजंग असून तींत नकशी काम उत्कृष्ट तऱ्हेचें केलें होतें. थोरल्या इमारतीच्या

प्रकार कांहींच न होऊन तिला उलटी घोड्यावर बसावयास सांपडलें ह्मणून गंमत ही वाटली. असो. **हणमंतराव** आणि **यमुना** व **जनी** हीं निघून गेलीं त्याच दिवशीं भाड्याचें घोडें करून मी **पांचवडा**त जावयाची तयारी केली. निघावयाची वेळ झाली तेव्हां **गोविंदा** व **कृष्णा** मला **गंगे**च्या पलीकडे **सिद्धसवाडी** ( **सिद्धनाथ वाडी** )पर्यंत पोंचवावयास आले. त्या ठिकाणीं आल्यावर मीं दोघांसही परत जा ह्मणून ह्मटलें. त्यावेळीं **गोविंदा**स कांहीं वाईट वाटलें खरें तथापि त्याजपेक्षां **कृष्णा**स अधिक वाईट वाटलें, व त्याच्या डोळ्यांतून टपटप अश्रूंच्या धारा चालल्या. कांहीं वेळानें त्यांचें समाधान झाल्यावर मीं **गोविंदा**स नमस्कार केला आणि घोड्यावर चढून बसलें, व दोघांस जा ह्मणून सांगितलें त्या वेळीं **कृष्णा** पुनरपि गहिंवरल्यासारखा झाला. तथापि त्यानें तो गहिंवर मोठ्या कष्टानें आवरून मला नमस्कार केला. इतकें झाल्यावर मी भाडेकऱ्यास घोडें हांकण्यास सांगितलें व **गोविंदा** व **कृष्णा** परत **वाई**कडे जाण्यास निघाले. वाटेनें जात असतां एकमेक एकमेकांस दिसेनाशीं होत तोंपर्यंत सर्वजण मागें पहातच होतों. सरतेशेवटीं आतां माझ्या ममतेच्या सर्व माणसांस मी अंतरलें असें वाटून मला डोळ्यांपुढें किंचित् अंधेरी आल्यासारखी झाली, व मी आहें कोठें वगैरे कांहीं गोष्टी मनांत न येतां मला एकाएकीं ओक्साबोक्सीं रडें आलें, व तें बराच वेळ होईपर्यंत आवरलें नाहीं.

## प्रकरण ४ थें.

**पांचवड** हें लहानसें गांव **वाई**पासून सुमारें चारपांच कोस आहे. मी **वाई**हून निघालें त्या वेळीं दोन प्रहर नुकतेच उलटून गेले होते, या कारणानें व भाड्याचें तट्टूंही बरेंच जलद चाललें यामुळें तेथें जाण्यास मला कायतो तिसरा प्रहरच उलटला. मी **वाई**हून निघावयाचे अगोदर **हणमंतरावा**नें मला **संभाजीरावा**च्या घराच्या सर्व खाणाखुणा नीटपणें सांगितल्या होत्या यामुळें गांवांत गेल्यावर मला मुळींच कोणास पुस्तपास्त करण्याची गरज पडली नाहीं. **संभाजीरावा**च्या घरीं पोंचल्यावर मी घोड्यावरून खालीं उतरून भाडेकऱ्याकडून घरांत सामान नेवविलें; व त्याच्या भाड्याचे पैसे चुकते करून त्यास लावून दिलें. त्यावेळीं पुढच्या आंगणांत व सोप्यांत कोणी माणुस नव्हतें. मात्र ओटीवर बैठक घातलेली असून एक गडी तीवरील केर काढीत होता. मला पाहिल्याबरोबर तो गडी पुढें येऊन कावऱ्याबावऱ्या माजघरच्या दाराकडे पाहून हळूच मी कोण आहें ह्मणून विचारूं लागला. त्याची ती मुद्रा पाहून मला फार आश्चर्य वाटलें व मी आतां बोलणार इतक्यांत माजघराचें दार उघडून एक ह्मातारी कुळंबीण व दुसरा एक चाकर अशीं बाहेर पडलीं. ह्मातारीनें बाहेर आल्याबरोबर मला पाहून “ तुझेंच नांव **मथुरा** काय ? ” ह्मणून प्रश्न केला, तेव्हां मी तिला एकदम “ मीच ती ! ” ह्मणून उत्तर दिलें. **हणमंतरावा**नें स्वतः **संभाजीरावा**कडे येऊन मजविषयीं खटपट केली होती ही गोष्ट त्या ह्मातऱ्या कुळंबिणीस ठाऊक होती, व **हणमंतरावा**नें **संभाजीरावा**स मी लवकरच येणार ह्मणून अगोदरच कळविलें होतें, यामुळें मी येणार ही गोष्ट त्या ह्मातारीस अगोदरच कळली होती. मी ह्मातारीच्या प्रश्नास उत्तर दिलें तेव्हां त्या केर काढणाऱ्या गड्यास मी **राजाऊ** कुळंबिणीच्या

ओळखीची असेन असें वाटलें, ह्यास्तव त्यानें मजशीं मुळींच न बोलतां आश्चर्याची मुद्रा करून **राजाऊ**सच हळू हळू कांहीं विचारिलें, व **राजाऊ**नेंही त्याला हळूच जबाब दिला तो काय हें जरी माझ्यानें निश्चयानें सांगवत नाहीं, तरी त्याचा अर्थ घरांतील लहान मुलांची जोपा नीट राखण्याकरितां मला नवीनच ठेविलें आहे एवढाच कायतो होता. इतकें बोलणें त्या चाकर माणसांचें आपआपसांत झाल्यावर ह्मातारी मला मी होतें तेथेंच उभी राहण्यास सांगून आंत निघून गेली. तिच्या बरोबर चाकर होता तोही तिच्या मागोमाग गेला. व तो केर काढणारा गडी कांहीं न बोलतां फिरून आपल्या बैठक झाडण्याच्या कामास लागला. ह्मातारी व तो चाकर दोघें आंत निघून गेलीं त्यावेळीं त्यांचे जमिनीवर पाय सुद्धां वाजले नाहींत इतकीं तीं हळू गडबड न करितां आंत गेलीं, व गडी बिछाईत झाडीत होता, तोही आपलें काम करीत असतां एवढी सुद्धां गडबड किंवा आवाज होऊं देत नव्हता. तो बिछाइतीवरील केर काढीत होता तो देखील इतक्या हलक्या हातानें, कीं त्याची ती काम करण्याची तऱ्हा पाहून मला त्याच्या हातून केर तरी निघावा तसा निघत होता कीं नाहीं याचाच संशय वाटला. एकंदरींत मी घरांत आल्यापासून दहा पांचही क्षण लोटले असतील नसतील इतक्यांत हा प्रकार पाहून मला फार आश्चर्य वाटलें, व हीं सर्व माणसें काम करीत असतां इतकीं स्तब्ध आहेत हें पाहून घरांत कोणी तरी आजारी माणूस असावें असा माझ्या मनानें तर्क घेतला. मी ह्या तर्काच्याच नादांत आहें इतक्यांत **राजाऊ** ह्मातारी बाहेर येऊन तिनें मला आंत चल ह्मणून खुणेनें सांगितलें, तेव्हां मी आपलें ओझें घेऊन तिच्या मागोमाग माजघरांत गेलें. ह्मातारीनें तें ओझें माजघरांतच राहूं दे ह्मणून मला खुणेनें सांगितलें, तेव्हां मी तें तसेंच कोपऱ्यांत ठेविलें. पुढें माजघराचें दार उघडून परसाचे पडवीवर आह्मी गेलों. तों इतक्यांत एका कोपऱ्यांत भाताची कणिंग भरलेली होती तिला टेंकून भुईवर कोणी गृहस्थ बसलेला माझ्या दृष्टीस पडला. हाच गृहस्थ **संभाजीराव** असें मला मागाहून समजलें. **संभाजीरावा**ची मुद्रा कोणीही सहजवृत्त्या पाहिली तरी तो मनाचा फार सरळ परंतु भित्रा मनुष्य असावा असें त्यास वाटल्याखेरीज रहावयाचेंच नाहीं अशा प्रकारचा तो मनुष्य होता. त्याचें वय सुमारें ४० चे जवळ जवळ होतें. तो बसला होता तेथून जवळच एका पाटावर बसून मुरंब्याची कथली पुढें घेऊन तींतून भराभर एकटीच खुशाल हवा तितका मुरंबा खात एक बाई बसली होती. ही बाई **संभाजीरावा**ची बायको. हिचें वय अजमासें ३५ वर्षांचें होतें. तिचें नांव **ताराबाई** होतें. तथापि चाकर माणसें आपआपसांत बोलूं लागलीं असतां तीस **त्राटिकाबाई** असेंच ह्मणत हें मला मागाहून कळलें. ह्या **त्राटिकाबाई**च्या मुद्रेवरून, जरी तिचें नांव किंवा तिच्या बद्दल दुसरा कांहीं प्रकार त्यावेळीं मला ठाऊक नव्हता तरी ती खरोखरीच **त्राटिकाबाई** असावी असा मलाही भास झाला. तिची मुद्रा रागीट असून ती फार तिरसट असावी असें तिचा चेहरा पाहिल्याबरोबरच वाटलें. ती दिसण्यांत शुद्ध हडळीसारखी असून तिचें नाक भिंतीवरील राक्षसांचीं किंवा राक्षसींचीं चित्रें काढितात त्यांसारखेंच वर उलटलेलें होतें. यामुळें ती वर पाहूं लागली असतां नाकाच्या भों-

कांतून आरपार दिसेल अशीही कल्पना मनांत सहज आल्यावांचून रहात नसे. तोंड लांबट असून चपटें, गाल इतक्या थोडक्या वयांतही बसून गेलेले, व डोळे खोल गेलेले असून मांजराच्या डोळ्यांप्रमाणें घारे, व त्यांवरील पापण्यांस खालून वरून अघळपघळ काजळ माखलेलें, अशी तिची मुद्रा त्यावेळीं मला अतिशय भेसूर वाटली. ती उंची लुगडें नेसली होती, व तिनें अंगावर दागिनेही पुष्कळच घातले होते तरी ती हडळ सजली असावी असाच भास होई. असो. ही त्राटिकाबाई माझी धनीन व नुकतेंच सांगितलेले कणगीशीं टेंकून बसलेले ते माझे धनी. मी आंत गेल्याबरोबर त्या उभयतांस मुजरा करून मुकाट्यानें उभी राहिलें. तेव्हां माझी धनीन मी कदाचित तिला भलत्याच गप्पा सांगून फसवीन असेंच तिला वाटूनच काय मजकडे घारीसारखी टवकारून पाहून मला ह्मणालीः--

"**हणमंतरावानें** आह्मांला चांगली कुळंबीण पाठवून द्यावयाचें कबूल केलें होतें तीच तूं?"

मी उत्तर केलें:-"जी बाईसाहेब! मी गरीब आहें व आपण माझी कींव मनांत आणून मला आपल्या पदरीं ठेविलें हे आपले उपकार मी कधीं विसरावयाची नाहीं." इतकें मी बोलतें आहें तों माझ्या आईबापांची मला आठवण होऊन मीं स्फुंदत स्फुंदत रडूं लागलें.

त्याबरोबर किंचित् दटावल्यासारख्या शब्दानें माझी धनीन मला ह्मणालीः-"हं! हे असले पोरकटपणाचे ढंग इथें नाहीं चालायचे! गप्प रहा! आपलें रडणें आटप कशी!"

**ताराबाईचें** हें भाषण ऐकून तिच्या नवऱ्यास फार वाईट वाटलें. आपली बायको विनाकारण अकरताळी आहे हें त्यास ठाऊक असून तो स्वभावतः भित्रा असे, ह्यामुळें त्याच्यानें सहसा बायकोपुढें मोठ्यानें बोलवत नसे, तथापि तिनें कांहीं कारण नसतां मला इतक्यांतच दटाविलेलें पाहून तो भीत भीत ह्मणालाः-"हंः, असें काय बरें करावें? ही मुलगी अद्यापि अल्लड आहे तिला अशी तूं भ्यावडावून नको टाकूं!"

नवऱ्यानें मध्यें तोंड घातलेलें **ताराबाईस** सहन झालें नाहीं. नवऱ्याचें भाषण ऐकल्याबरोबर ती एकदम रागानें लाल झाली, व त्याजकडे अशा कांहीं विलक्षण मुद्रेनें पाहूं लागली कीं, ती पाहून ही आतां नवऱ्यास फाडून टाकिते कीं काय असें मला वाटलें. ती ह्मणालीः-"कां तुमच्यानें बसवतें आहे कीं नाहीं गप्प? तुह्मांला कांहीं बोलायाचें झालें तर त्या ओटीवरील बैठकीवर बसावें आणि खुशाल बडबडावें, परंतु घरांत माझ्या समक्ष एक चकारशब्द सुद्धां बोलतां उपयोगी नाहीं. आणखी त्यांतून आह्मी बायका बायका बोलतों आहों त्यांत तुह्मांला तोंड घालण्याची काय जरूर?"

नवरा काकुळतीस आल्यासारखें करून बोलूं लागलाः-"अग! तसें नव्हे! मी उगीच-"

"कां अजूनही?-पण-बसा असे गप्प!-", इतकें नवऱ्याशीं बोलून ती मजकडे वळून ह्मणालीः-"काय बाई! तुला वर्ष कितवें लागलें आहे?"

"गेल्या आषाढांत चौदावें लागलें!" मी ह्मटलें.

"अंः मग ही बाई कसची, ही अजून लहान मुलगीच आहे!" **संभाजीराव** ह्मणाला.

त्याची बायको रागावून त्यास ह्मणालीः-"फिरून तेंच! तुमचें तोंड लुडबुडायचें राहतें

आहे कीं नाहीं ?–" नंतर मजकडे वळून तिनें मला विचारिलें:–"तुझें नांव काय ? **हणमंतरावांनीं** कायसेंसें सांगितलें होतें, पण तें मी विसरलें !"

"मला **मथुरा** ह्मणतात ! मी **रामजी जाधवाची** मुलगी !" मी नम्रतेनें उत्तर केलें.

"काय ? **मथुरा** ! आलीकडील पोरींचीं नांवेंच कांहीं चमत्कारिक ! जी यहावी तिच्या नांवाच्या शेवटीं आपला 'रा' आहेच ! ती आठ दिवस झाले एक कुळंबीण येथून निघून गेली तिचें नांव **गजरा** होतें ! तशीच ती एक दुसरी पोरगी होती तिचें नांव काय ह्मणे **मोगरा** ! आणखी काय मेलें तें दुसरें एक नांव–माझ्या जिभेशीं घोटाळतें आहे पण बाहेर येत नाहीं!–हो **चंद्रा** ! मोठा चमत्कार आहे!"

तिचें बोलणें ऐकून नवऱ्याच्यानें उगें रहावेना. तो हळूच बोलूं लागला:–'कां ? त्यांत चमत्कार कसला? त्याला आलीकडच्या पोरीच नकोत ! तूं एवढी मागच्या काळची मोठी झाली आहेस, पण तुझें नांव **तारा** ! त्याच्या शेवटीं सुद्धां 'रा' आहेच !"

त्याबरोबर **ताराबाई** दचकल्यासारखी होऊन नवऱ्याकडे पाहून ह्मणाली:–" हें असलें बोलणें माझ्या कामीं पडायचें नाहीं। फिरून तर बोला दांतच पाडितें कीं नाहीं पहा !"

" अगे तसें नव्हे! मी सहज थट्टेनें बोललों!'

"काय ? थट्टेनें बोललों ह्मणतां? ही कां थट्टेची रीत झाली ? चाकर माणसांच्या देखत कधीं थट्टा केलेली माझ्या नाहीं कामास यावयाची ! वतिशीच खालीं आणीन !' इतकें बोलून मजकडे वळून ती ह्मणाली:– "**मथुरे** ! **हणमंतरावाचे** सांगण्यावरून मी तुला ठेवून घेतें आहें, समजलीस ? तुला ठेवलें आहे घरांतील मुलें बाळें संभाळावयाला, यासाठीं तूं नेहमीं वरच्या मागल्या दिवाणखान्यांतच मुलांना घेऊन असत जा ! तूं सैंपाकघरांत किंवा खालीं चाकरमाणसें बसतात तेथें बिलकूल जातां उपयोगी नाहीं ! चाकरमाणसांनीं एक ठिकाणीं जमून बसून गोष्टी बोलत बसण्याची मला आहे फार चिरड ! याकरितां सांगतें तूं त्यांच्याशीं एक शब्द सुद्धां बोलूं नयेस ! तुला कानगोष्टी मुळींच करतां नये ! तसेंच कोणाच्या मनांत तुझी गांठ घ्यावयाची असेल तर तूं त्याला माझ्या घरांत आणतां उपयोगी नाहीं ! तुला एकादे वेळीं आपले भाऊ किंवा बहिणी यांस भेटावेंसें वाटलें तर तूं स्वतः त्यांचेकडे जात जा, परंतु त्यांनीं तुझ्यामागें लागून इकडे येतां कामा नये ! कां समजलीसना नीट ? होय ह्मण ! नाहीं तर चुकशील ! तें कांहीं मला सोसायचें नाहीं ! बोल, माझें ह्मणणें तुला समजलें कां सगळें ?"

हें तिचें बोलणें ऐकून मला तें पुष्कळच फाजिल वाटलें. तथापि तिनें तें सांगितल्याचें मला फारसें आश्चर्य वाटलें नसतें, परंतु ती हें बोलत असतां तिची जी मुद्रा झाली होती, व ती जे हातवारे करीत होती, ते पाहून जसा कांहीं तिनें सांगितल्यापैकीं माझ्या हातून एकादा अपराध घडलाच होता किंवा कदाचित् माझ्या हातून तिनें सांगितलेल्या गोष्टी चुकून होतील ह्मणून तिला कोणी अगोदरच शिकविलें होतें अशा प्रकारें ती बोलत होती हें पाहून मला फार आश्चर्य वाटलें. शिवाय मी ही नोकरी पत्करून इकडे यावयास निघालें, त्या वेळेपासूनच आपण चांगल्या रीतीनें वागावयाचें ह्मणून मीं संकल्प केला होता, त्या अर्थी तिचें भाषण ऐकून मला अतिशय वाईट वाटल्यावां-

चून राहिलें नाहीं, व मीं कांहीं किती जरी जीव लावून केलें तरी या **त्राटिकाबाईचें** ह्मणून समाधान व्हावयाचें नाहीं अशी माझ्या मनाची खातरी झाली. तथापि मोठ्या जुलुमानें ती मीं बाहेर न दाखवितां हळूच नम्रतेनें ह्मटलें:— " होय, समजलें बाईसाहेब ! "

" पाहिलेंसना **मथुरा** कशी भिडस्त आणि मर्यादशीळ बायको आहे ती ! मी खात्रीनें सांगतों, **मथुरेच्या** हातून कधींही वाईट गोष्ट व्हावयाची नाहीं!" **संभाजीराव** हळूच आपल्या बायकोस ह्मणतो.

" फिरून ! कोण मेली ही संवय ? मेलें एकदा सोडून दहादा सांगितलें तरी आपलें आहे तें आहेच ! तुह्माला कुणीं सांगितलें आहे बायकांच्या बोलण्यांत मधें तोंड घालायला ? बायकांत पुरुष लांबोडा, भाजून खातो कोंबोडा— मेली आठवण देखील राहीनाशी पण झाली कशी ? — हें बघा, तुह्मी या कामीं एवढें सुद्धां बोललेलें मला नाहीं खपायचें ! तुह्मांला यांतलें नाहीं कांहीं समजत ! नदीचा एकादा डोह वरून कसा शांत दिसतो, पण त्या वरच्या शांतपणावर जातां उपयोगी नाहीं. त्याच्या आंत काय आहे न् काय नाहीं कोणी सांगावें ? आतां **मथुरा** तशांतलीच आहे असें नाहीं मी ह्मणत, परंतु तिला राहूंद्या कांहीं दिवसपर्यंत, ह्मणजे आपोआप कायतें बाहेर पडेलच! आह्मी कांहीं तिला वाईट रीतीनें वागविणार नाहीं—"

" होय होय. तेवढें मात्र खरें ! असो नशीब बिचारीचें !" असें तिचा नवरा ह्मणाला, व जसें कांहीं बायकोच्या बोलण्याचा त्यास राग येऊन तिला आपलें शौर्य दाखवावयाचेंच अशा बेतानें तो बसल्या बसल्या नेटानें ती भाताची काणिंग मागें लोटूं लागला.

" हं ! अशानें ती काणिंग मोडेल बिडेल एकादी! कां नीट नाहीं वाटतें बसतां येत ?—" हे तिचे शब्द ऐकून नवरा बिचारा भ्याल्यासारखा होऊन नीट बसला, तेव्हां **ताराबाई** बोलूं लागली:—" फिरून रेला तर खरे काणिंगीशीं ह्मणजे समजेल ! मोडली बिडली तर तुह्मांलाच लिंपायला लावीन! असें बोलून ती किंचित् थांबली आणि कांहीं गोष्ट स्मरलीसें करून ह्मणाली:— 'आणखीं तुह्मी काय ह्मटलेंत 'नशीब बिचारीचें ?' —होय,वरी होईल बिचारी ! तिचें उलटें नशीब चांगलेंच ह्मटलें पाहिजे, कारण तिनें पूर्वीं कधीं कोठें चाकरी केली नसतांही तिला आमच्यासारख्या श्रीमंतांच्या घरीं चाकरी मिळाली." इतकें बोलून नंतर फिरून मजकडे रेखून पाहून ह्मणाली:— "**मथुरे** ! मी बोलतें इकडे नीट लक्ष दे. घरांत लहान मुलें आहेत, त्यांची काळजी तुलाच घेतली पाहिजे. सगळ्यांत धाकटा **जनकू** त्याला नीट जपत जा. त्याचा स्वभाव फार मनमिळाऊ, साखरेसारखा आहे तेव्हां —".

" कढीलिंबासारखाआहे एवढें बरीकखरें!" **संभाजीराव** हळूच ह्मणतो.

" कां ? अजूनही जिभली थांबत नाहीं का ? " असें बोलत असतां **ताराबाईनें** एक एक डोळा पण एवढा केला, तेव्हां आतां ही आपल्या नवऱ्यास खाऊन टाकिते कीं काय असें मला वाटलें. परंतु तसा कांहीं प्रकार न करितां ती फिरून मजकडे पाहून मला ह्मणाली:— " **मथुरे** ! तूं त्यांचें ह्मणणें ऐकूं नको. त्यांची अक्कल आलीकडे ह्मातारपणामुळें अगदीं जात चालली आहे ! तूं त्याच्या तोंडाला लागूं नको ! ते काय पाहिजे तसें बडबडतात ! **जनकू** माझा फारच गोड आहे ! ती आपली

माझी चकुली मकुळी आहे ! होयनाग माझ बावी ती ? " असें बोलून तिच्याजवळ मुलग नव्हता तरी तिनें त्यास मिठी घातल्याप्रमाणे आपले हातच आपल्या अंगाशीं तिरपे आव ळून त्या मुलाचा मुका घेतल्याचा प्रकार करून दाखविला. नंतर मजकडे पाहून ह्मणाली– पाहिलेंसना ? समजलींसना ? मथुरे ! — परं त्याची एक खोड आहे ती ही कीं त्याच्या न दानेंच आपण घेतलें पाहिजे ! आपल्याल कडेवर घ्यावें, कुरवाळावें, चक करावें हें त्याल फार आवडतें ! आतां तो लहान बच्चा आहे तेव्हां तो हट्ट करतो हें खरें आहे परंतु अस हट्ट आमची चिमा देखील करते !आमचा म न्याचा देखील हट्टी आहे, पण अशा गोष्ट असावयाच्याच ! कां.मी ह्मटलें तें समजलीस ?

मीं नम्रपणें उत्तर केलें:—" समजलें, बाई साहेब ! मला लहानपणापासून मुलें खेळव यची संवय आहे, तेंव्हां मुलांना चांगलें क वागवावें हें मला सांगायला नको ! यासाठीं मुल विषयीं कांहीं काळजी करणें नको !" असें बोल असतां आईच्या मागें माझ्या धाकट्या बहिण यमुना व जनी यांचें रक्षण मीच करीत हो ही गोष्ट मनांत येऊन माझे डोळे पाण्यानें भ रून आले, व तशाच स्थितींत मी " माझीं आई बापें चांगलीं संभावित अब्रूदार असून त्यां आह्मांस शिक्षाही उत्तम प्रकारची असे यामु उगीच इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत बस किंवा अचावचा बडबडणं, किंवा हातचें का सोडून भलतीच गोष्ट करूं लागून रिकाम्य टवाळक्या करणें, ह्या गोष्टी माझ्या हातून क दापि व्हावयाच्या नाहींत. " ह्मणून ताराबाईस बोललें.

ताराबाईस माझें हें ह्मणणें रुचलें नाहीं तिला या जगांत आपणच कायती श्रीमान आहों, असा गर्व वाटत असे, व यामुळें जगांत उत्तम रीतीभाती, कुटुंबांत उत्तम शिक्षा हीं कायतीं आपल्या एकटीच्या घरीं असा फार अभिमान वाटे, यामुळें माझ्या आईबापांची मला चांगली शिक्षा होती हें ह्मणणें तिला रुचलें नाहीं. तशांतून माझीं आईबापें पडलीं गरीब, तेव्हां गरीब स्थितींत मनुष्य असतां त्याचे हातू-न आपल्या मुलांमाणसांस चांगली शिक्षा लागणें हें तिला अगदींच असंभाव्य वाटलें. तथापि तिच्या वाटण्याकडे लक्ष न देतां, मला आजपर्यंत या जगांत जो निरनिराळ्या लोकांचा व निरनिराळ्या स्थितींचा अनुभव आला आहे त्यावरून माझी अशीच समजूत झाली आहे कीं, जर या जगांत चांगलें वर्तन व चांगली शिक्षा ह्मणून कांहीं असतील, तर तीं श्रीमान व आपणास मोटे ह्मणवून घेणाऱ्या लोकांपेक्षां गरीबींत दिवस घालविणाऱ्या लोकांतच विशेष आहेत. असो. प्रस्तुत हकीकतीस इतकेंच सांगणें बस आहे कीं, ताराबाईची समजूत वर सांगितल्या प्रकारची होती, यास्तव माझें बोलणें तिला न रुचून ती मला रागानेंच ह्मणाली:— "काय ? गरीब भिकारड्या लोकांस न् शिक्षा ? छत् ! ही गोष्ट अगदींच खोटी ! माझ्या घरीं आजपर्यंत फार नाही तरी शंभर कुळंबिणींनीं चाकऱ्या केल्या असतील, व त्या साऱ्या पहिल्यानें चाकरीस राहिल्या तेव्हां आह्मीं प्रामाणिक आह्मीं इमानी, अशाच बाता सांगत होत्या. परंतु पुढें त्या एकूनएक चोर, चहाड, लबाड अशाच निघाल्या ! एक तर तुझ्या इतक्याच वयाची सायगांवची कुळंबीण होती ती तर माझी नवी पैठणीच चोरून घेऊन पळून गेली ! कां आठवण आहे का "नवऱ्याकडे पाहून

**विदू०**—मित्रा ! अतिशय तहान लागलेला मनुष्य गढूळ पाण्यासही जसा नांवाजीतच असतो, तसाच तूंही आपल्या प्रियजनास अतिशय नांवाजीत आहेस. यामुळें तुझी ती सुंदरी आहे तरी कशी तें पहाण्याची मला इच्छा उत्पन्न झाली आहे, यासाठीं तिचें फळीवर चित्र तर काढून दाखीव पाहूं.

**मन्म०**—चित्रांत कां होईना, परंतु त्या चकोरनेत्रीला पुनरपि पहावें अशी मलाही उत्कंठा झाली आहे ! (पडद्याकडे पाहून) कंचुकी ! चित्राची फळी घेऊन ये.

**कंचुकी**—(प्रवेश करून मन्मथास नमस्कार करितो.) महाराज ! ही तयार आहे ! (चित्राची फळी त्याजपुढें ठेवितो.)

**मन्म०**—(चित्राकडे निसुरतें पाहून) मूर्खा ! अरे ! ही चित्र काढलेली फळी कारे मीं तुला आणावयास सांगितली ?

**कंचु०**—(भिऊन) महाराज ! माफी असावी. आपण नुसती चित्राची फळी इतकेंच झटलें यामुळें ही चूक झाली !

**विदू०**—(नम्रपणें) मित्रा ! चुकी करणें हा मनुष्यधर्मच आहे. (असें ह्मणून चित्राची फळी घेऊन तिजकडे निरखून पाहून) काय ? येथें तर वयस्याचेंच चित्र काढिलें आहे, आणि बाजूसही पण दुसरें चित्र काढावयास जागा आहे !

**म०**—कंचुकी ! ही तुला कोठून मिळाली ?

**कंचु०**—महाराज ! ही आपल्या उद्यानपालकानें मला दिली, आणि, राग महाराजांच्या घरची कन्याजनांच्या अंतःपुरांतील कुळंबीण आपल्या बागेंतील तळ्यावरून चांगलीं चांगलीं कमळें, कमळांचे देंठ, व कमलिनींचीं पानें घेऊन गडबडीनें परत जात असतां ती ही चित्राची फळी कांठावरच विसरून गेली ती मला सांपडली, असेंही त्यानें मला सांगितलें.

**विदू०**—मित्रा, मला वाटतें त्या कुळंबिणीच्या यजमानाच्या घरीं आज ब्राह्मणभोजन व्हावयाचें असावें. (असें ह्मणून उठूं लागतो.)

**मन्म०**—(हांसत हांसत त्यास थांबवून) कायरे, वेड्या, ब्राह्मणभोजनाला कमळाचे देंठ लागत असतात कायरे ? (कंचुकीकडे पाहून) भल्या माणसा ! जा तूं आपल्या कामास !

**कंचु०**—महाराजांचा जयजयकार असो. (असें ह्मणून निघून जातो.)

**विदू०**—मित्रा, तूं माझ्या तर्कास पूर्वतर्क ठरवून त्याचें खंडन केलेंस, तर तुझा तरी सिद्धांत काय आहे तो मला कळूं दे पाहूं ?

**मन्म०**—मला तर वाटतें, कोणातरी मनुष्यास विरहताप झाला आहे, त्याची शांति करण्याकरितां ही सर्व खटपट आहे !

**विदू०**—होय. हें जुळतें खरें ! (मदनाच्या चित्राकडे पाहून) अरे ! या नगरींत सर्वच चितारी उत्कृष्ट आहेत असें वाटतें ! आपण तर असें चित्र कधींही पूर्वी काढिलेलें पाहिलें नाहीं, तर असलें हें चित्र कोणीं बरें काढिलें असेल ?

**मन्मथ**—(विदूषकाच्या हातून चित्राची फळी घेऊन नीट न्याहाळून पहातो, व अंगावर रोमांच उभे राहून हर्षानें)

श्लोक.

रोमांचस्वेदयुक्ता[१] तनुहि दिसतसे; वांकडी दृष्टि हेही;
हाही ग्लान क्षुधेनें शुक मम करिंचा काढिला येथ पाहीं;
रेखा[२] ही अंजनाची कुटिलचि; भरल्या अंगुली आळत्यानें;
दावीती सर्व चिन्हें प्रतिकृति[३] मम ही काढियेली प्रियेनें.

---

१. रोमांच आणि घर्म यांहीं युक्त. २. रेघ. ३. चित्र.

आणखी हें चित्र शारिका विसरून गेली यावरून तर मनांत संशयसुद्धां आणावयास नको.

**सख्या**—(एकीकडे) चेटी हें चित्र तेथें विसरून आली ही गोष्ट आह्मांस अनुकूलच झाली. कारण कीं, या योगानें या महाभागाचा आमच्या प्रियसखीविषयीं अनुराग सूचित झाला!

**विदू०**—वाहवा! तुझा तर्क तर बाबा जबर आहे! तुझी बुद्धि मुसळाच्या अग्रा—(इतकें अर्धेंच बोलून) छे छे—चुकलों! तुझी बुद्धि कुशाच्या अग्राप्रमाणें तीक्ष्ण आहे!

**मन्म०**—मित्रा! या वेळीं या **मन्मथाचें** जन्म खरोखरीच सफळ झालें!

**विदू०**—मित्रा! आतां आपली आपणच स्तुति करून घेणें पुरे! तुझ्या प्रियतमेचें चित्र येथें काढ पाहूं. (असें ह्मणून त्यास एक कलम देतो.)

**मन्म०**—मित्रा! त्या कुरंगनयनेचें संपूर्ण सौंदर्य चित्रांत काढतां येण्याजोगी कुशलता माझ्या अंगीं नाहीं, तथापि तुझें ह्मणणें मला मोडतां येत नाहीं. (असें ह्मणून रतीचें चित्र काढूं लागतो.) अहाहा!

श्लोक.

तन्वंगीच्या तनूचा प्रतिकृतिफलकीं[1] काढिला एकदेश[2],
तेथेंची दृष्टि राहे अडखळुनी, तसें चित्तही, सावकाश;
झालें सर्वांग माझें पुलकित बहु हें स्वेदही फार आला;
चाळेना हात; चित्रा करूं मम नुमजे पूर्ण कैंवी मनाला.

(मोठ्या कष्टानें चित्र काढून दाखवितो.)

**विदू०**—(पाहून कौतुकानें आपणाशीं) हा ह्मणतो ही गोष्ट खरी! (उघडपणें) मित्रा! खरेंच सांग ही माझ्या बायकोइतकी फक्कड आहे का?

**मन्मथ**—(किंचित् हांसून) मित्रा! ह्या चित्रांत तिचें स्वरूप काय तें रेखाभरच उतरलें आहे. परंतु तिचें खरें स्वरूप ह्याहून फारच निराळें आहे यांत संशय नाहीं! अहाहा!

साक्या.

पक्ष्मलाक्षिची[1] चक्षुर्लीला[2], तीची मंजुळ वाणी,
मंदस्मित अतिसरस, विलासहि भ्रुकुटीचे ते आणी,
बिंबाधरिंचा मधुर अमृतरस, अवयव सुगंधशाली,
मित्रा! चित्रामधीं न कोणा कधीं दाविता आलीं[3]!

**सख्या**—(उत्कंठापूर्वक* पाहून) प्रियसखी! तूं कांहीं चिंता करूं नको! ह्या तुझ्या प्रियजनानें तुझेंच वर्णन केलें, व चित्रही तुझेंच काढिलें आहे!

**रति**—(लाजून किंचित् हासते) अः, एवढ्याच वेळेपुरत्या ह्या समाधानांत काय अर्थ आहे?

**सख्या**—(एकमेकींशीं) काय? हिला ही सर्व हकीकत समजली काय? का उगीच आमचाच आपला भलता तर्क होतो? (उघडपणें) सखे! अगे! एवढ्याच वेळेपुरतें कां ह्मणतेस? असेंच निरंतरचें देखील समाधान होईल!

**विदू०**—मित्रा! तुझें तिच्यावर प्रेम जडलें आहे, यामुळें तुला ती फक्कड वाटते! परंतु मला तर असें वाटतें कीं, तूंच तिचें चित्र काढिलें आहे ह्मणून ती इतकी मनोहर दिसते!

---

१. चित्राच्या फळीवर. २. एक भाग. ३. रोमांचयुक्त.

१. सुंदर आहेत नेत्र जिचे अशी. २. नेत्रांची लीला ह्म. फिरविणें. ३. ह्याचा संबंध 'हीं' ह्या अध्याहृत शब्दाशीं.

* ह्या ठिकाणीं मूळांत 'सोद्ग्रीवं' असें पद आहे. त्याचा शब्दशः अर्थ 'उंच मान करून.' उंच मान करून पहाणें हें उत्कंठेचें लक्षण आहे.

! आपण खरा तर्क केला !
जो तो आपल्या माणसालाच
ह्मणत असतो, तीच गोष्ट ही आहे.
सखीची प्रतिमा जवळ काढिली
मुळेंच नाहीं का हा महाभाग
विशेष रमणीय दिसणार ?

.! त्यावेळीं परदेवतेची पूजा
रतां तिला आईचें बोलावणें येऊन
नांतून निघून गेली, त्यामुळें
तीची पहावयास सांपडली नाहीं!
( चित्राकडे सस्पृहपणें पाहून )
चमत्कार पहा !

श्लोक.

निरूपमाकार प्रियेचें सदा;
... तसें संप्राप्त हो सर्वदा;
होवो लाभ सदा तदोष्ठमधुचा; या हेतुनें सर्व हीं
माझीं वांछिति इंद्रियें नयनता, त्वक्ता, रसज्ञात्वही.

( उत्कंठित होऊन ) अहाहा !

श्लोक.

पीनोन्नम्र तिच्या कुचाप्रति कधीं एकांतिं आलिंगिन ?
तीच्या मी अधरामृता सुमधुरा ऐशा कधीं पीइन ?
तैशी ती सुरतश्रमें प्रशिथिला मृद्वंगिका कामिनी
अंकीं घेउनि, घालवीन कधिं मी सौख्यें अहा! यामिनी?

**विदू०**—मित्रा ! अरे ! ही स्त्री चित्रगत असतांही उन्माद झालेल्या मनुष्याप्रमाणें तूं हिला प्रत्यक्षच मानतोस हें काय ?

**मन्म०**—मित्रा ! तिला पाहून मला उन्माद होईल हें सांगावयास पाहिजे काय ?

आर्या.

अधरीं मधुरस हीच्या; वचनीं माद्वीकरसें असे भरिला;
तालश्री कुचतटगत; होइल उन्माद मग कसा न मला ?

आणखी पहा ! हिचें दर्शन मला झाल्यापासून माझी काय स्थिति झाली आहे ती !

श्लोक.

नेत्रीं सारविते सुधांजन गमे; कर्णीं मृदू बोलते;
आलिंगूनिहि घट्ट चंदनरसें सर्वांग ही माखिते;
जाणों पाजि मला रसा सुमधुरा बिंबाधरींच्या पहा !
हर्षाब्धींत मदीय मग्न करिते ही अंतरात्मा अहा !

**विदू०**—मित्रा! मी ह्मणतोंना ही स्त्री चित्रगत* आहे ह्मणून ?

**मन्मथ**—(त्याच्या बोलण्याचा निराळा अर्थ समजून दुःखावेगानें ह्मणतो ) काय ? माझी प्रिया चित्तगत आहे ह्मणतोस?एकून ती चित्रगतही नाहीं? हाय हाय ! ( मूर्छित होतो. )

**रति**—( भयानें कांपूं लागते. ) अगे सख्यांनो ! ह्या महाभागास मूर्च्छा देखील आली ! त्याचें रक्षण करा ! ( आपणही मूर्छित होते. )

**सख्या**—( वाईट वाटून ) अग बाई, हें काय झालें? पिशाचबाधा न व्हावी ह्मणून रक्षाबंधन करीत असतां वेताळ यावा तसा हा प्रकार झाला !

---

१.निपीडन, चुरणें. २ डोळेपणा. ३.शरीरपणा, त्वचेची स्थिति. ४. जिव्हापणा. सर्व इंद्रियांस असें वाटतें कीं, आपण आहों तीं नसून जर नेत्रेंद्रिय, त्वगिंद्रिय व रसनेंद्रियच झालों असतों तर ती आपणास पहावयास, आलिंगावयास आणि चुंबावयास मिळाली असती असा भावार्थ. ५. मृदु आहे अंग जिचें अशी.

१. ताडी. मद्य. २. अमृतरूपी अंजन.

* ह्या ठिकाणीं मूळांतील उक्ति प्राकृत ह्मणजे बालभाषेंत 'चित्तगअ' अशी आहे, व हें रूप 'चित्रगत' आणि 'चित्तगत' या दोन्ही शब्दांपासून सारखेंच संभवतें. व ह्मणूनच मन्मथास विदूषकाच्या उक्तीचा अर्थ विपरीत भासला. हा चमत्कार महाराष्ट्र भाषेंत शब्दशः उतरावयाचा नाहीं हें चतुर वाचकांस सहज समजेल.

**विदू०**—मित्रा! सावध हो!

**मन्म०**—( सावध होऊन विरक्तपणें ) धिक्कार असो!

श्लोक.

चंद्राचेपरि आस्य सुंदर; मृगीऐशी दृशा कातर;
विस्तारि स्तनभार; इक्षुसम तें माधुर्ययुक्ताधर;
मोठालीं जघनें; हरीपरि कटी; हंसापरी चालणें;
कामोद्रेकें;—न हीं नरास मिळतां धिक् धिक् तयाचें जिणें!

**सख्या**—प्रियसखी! सावध हो! सावध हो! हा पहा तुझा प्रियजन सावध होऊन कांहीं बोलत आहे!

**रति**—( सावध होऊन पाहून ) आतां बरीक ह्या सकल जीवलोकाची जीवनकळा परत आली असें मला वाटतें!

**सख्या**—( एकमेकींशीं ) वाहवा! वाहवा! केवढें हें भगवतीचें योगमाहात्म्य कीं हा सर्व प्रकार दुसऱ्याच रस्त्यावर होत असतां आह्मांस तो प्रत्यक्ष असल्याप्रमाणें त्याचा अनुभव येत आहे!

**विदू०**—( थट्टेनें ) मित्रा! या स्त्रीचें मुग्धत्वही अद्यापि गेलें नाहीं, असें असतां तिचे हे पोरकट हावभाव पाहून तूं इतका तिच्या विषयीं उत्सुक होतोस याचा अर्थ काय?

**मन्मथ**—( किंचित् हांसून आपणाशीं ) हा ब्राह्मण पक्या गुरूचा चेला नव्हे! यामुळें याला यांतील वर्मच माहित नाहीं! अहाहा!

साक्या.

रदच्छदातें किंचित् किंचित् वरीवरी चावूनीं,
नूतन वक्षःसंभवकोशीं नखक्षतासि करूनी,
'कांते! ललने! मदनसंगरा व्हावें आतां सिद्ध.'
ऐसें वदतां पती, करितसे वारंवार निषेध,
नीवीनिहन व्यक्ताव्यक्तचि ऐसें तें होऊन,
दिसे—झांकुनी जाय पुनरपी-वलग्न तें त्यांतून.
मुग्धा होई साध्य मृदुलही उपाय करितां कांतें
लज्जायोगें नेल कुड्मलेंऐसें तत्क्षणिं होतें.
ऐशा परिचें मुग्धस्त्रीशीं जें रतिसुख तें व्हाया,
पूर्वजन्मिचें पुण्यचि व्हावें, होय इतरथा वाया.

( उघडपणें ) मित्रा! ती पद्मनेत्री ही वशीकरणविद्या कोण्या गुरूपाशीं शिकली कांहीं समजत नाहीं! कारण पहा!

श्लोक.

शीतांशू, मधुमास, षट्पद तसे, हे कीर, हे कोकिल,
हा वायू मलयाद्रिचा, सुकुसुमें, हेंही सरो निर्मळ,
हें संगीत कैल, प्रनृत्तें हि तसें, हेंही पहा नंदर्न,
सारीं हीं असुनी मदीय, उलटीं झालीं मनस्त्रासन.

**रति**—( आपणाशीं ) हा सर्व ह्या महाभागाचाच आत्मीय वर्ग असून त्यास देखील इतका त्रास देणारा झाला, तर मग तो मजसारखीला त्रास देईल यांत नवल नाहीं!

**सख्या**—असल्या प्रमुग्ध कुलकुमारीजनावर असला आरोप करणें हें नीट नव्हे!

**मन्म०**—आणि ह्मणूनच तर,

श्लोक.

दावाग्नीहि बरा सुचंदनरसाहूनी मला वाटतो;
वाटे आतप भानुचा हि बरवा चंद्रप्रभेहूनि तो;
इंद्राचा पविही बरा मलयिच्या वाटेचि वायूहुनी;
कुंताग्रावरती सुमोहुनि बरी निद्रा गमे मन्मनीं.

फार काय सांगावें?

आर्या.

दयितालिंगनजन्मा प्रमोद मजलागुनी मिळे न जरी,
जीवंत राहण्याहुनि मृत्युहि बरवा मला गमोचे तरी.

१ मुख. २. दृष्टि. ३, उंसाप्रमाणें. ४. सिंहाप्रमाणें ५. ( पूर्वी सांगितलेल्या सर्व गोष्टींच्या योगानें ) कामाची वृद्धि. ६. ओष्ट. ७. वरवर. ८. स्तन.

१. लुगड्याची गांठ. २. मध्यभाग. ३. फुलाची कळी. ४. अन्यथा, नाहीं पेक्षां. ५. सरोवर. ६. अस्पष्ट. ७. नृत्य. ८. नंदनवन. ९. मनाला त्रास देणारीं. १०. इंद्राचें वज्र. ११. भाल्याच्या टोंकावर. १२. फुलांपेक्षां. १३. दयितेच्या ह्मणजे प्रियेच्या आलिंगनापासून उत्पन्न होणारा.

तेंव्हांपासून आपण इतके दूर असतांही आपली मूर्ति सदोदित माझ्या नेत्रांसमोर प्रत्यक्ष उभी आहे, याकरितां मीं आपणास वेश पालटला असतांही ओळखिलें यांत नवल तें कोणतें? तें असो! परंतु हे राजपुत्रा! माझी आपणास एक हात जोडून विनंती आहे. ती ही कीं, आपण येथें आलां आहां याबद्दल चकारशब्दही अद्यापि कोणास कळला नाहीं तोंपर्यंतच आपण या वाड्यांतून निघून जावें! महाराज! आपण या ठिकाणीं फार वेळ रहाल तर खचित आपणास कांहीं तरी दगा होईल! आपणास मालोजीनें इकडे आणून पोंचविलें त्याचे अगोदरच मी आपणास पाहिलें, तेंव्हां आपण गैरसावधपणानें या व्याघ्राच्या जाळींत आलां आहां यास्तव आपणास सूचना देऊन आपली येथून सुटका करावी या हेतूनें मी आपल्या मातोश्रींच्या महालाजवळ आपलीच वाट पहात होतें महाराज! मी आपणाकरितां आपले प्राणही खर्च करण्यास कबूल आहे, परंतु आपण कृपा करून आतांच्या आतां येथून निघून जावें! आपला अद्यापि कोणास संशय आला नाहीं तोंपर्यंतच आपण येथून निघून जावें कसें! महाराज! आपण माझे प्राणदाते आहां—एवढेंच नव्हे — तर प्राणांपेक्षांही प्रिय अशा माझ्या पातिव्रत्याचे रक्षकही आपणच आहां —यासाठीं आपणावर एकादें संकट गुदरलेलें माझ्यानें पहावणार नाहीं ह्मणून सांगतें.

**यश०**—अहाहा! प्राणप्रिये! —नाहीं नाहीं चुकलों—हे राजकन्ये! तुझी व माझी त्या **पर्वतेश्वराच्या** रानांत गांठ पडली, त्यावेळीं परस्परांच्या हृदयांत अपरिचितपूर्व असा विकार यदृच्छेनें उत्पन्न झाला, व जरी त्या प्रसंगीं आपण एकमेकांस अनुरागसूचक शब्दांनीं बोललों होतों तरी एकवेळ पुढें जेव्हां वियोग झाला, व तूं आपल्या पित्याच्या मंदिरीं परत आलीस, तेंव्हां मी एकटाच अरण्यांत पुनरपि भटकत फिरूं लागलों असतां आपल्या स्थितीविषयीं विचार करूं लागलों; तेंव्हां ह्या परस्परानुरागापासून कांहीं उपयोग व्हावयाचा संभव नाहीं, कारण तुझ्या पित्याच्या मनांत मजविषयीं पूर्ण द्वेषबुद्धि भरली आहे, व यास्तव तो तुझ्याशीं माझा विवाह होण्यास कधींही अनुमोदन देणार नाहीं, व मीही स्वतःला कितीही त्रास भोगावा लागला तरी भोगीन परंतु तुझ्या पित्याच्या इच्छेविरुद्ध तुजशीं विवाह करून तुला जन्मभर संकटांत घालावयास कबूल व्हावयाचा नाहीं, ही गोष्ट मनांत येऊन मी अगोदरचा सर्व प्रकार विसरून जाण्याविषयीं यत्न करूं लागलों. हे यत्न करितांना, वारंवार तुझी ही प्रशांतगंभीर मूर्ति हृदयांत प्रत्यक्ष उभी राहिलीसें वाटून माझ्या जिवास पश्चाताप झालासें होई, व तशा समयीं पुनरपि अंतःकरणाची वृत्ति बदलून एकवार तुज शुभाननेस वरावें, तुजसमागमें अरण्यांतही वास करावयाचें पडलें तरी तो पत्करून त्याठिकाणींही प्रत्यक्ष नंदनवनांतील उपभोग घ्यावे, इत्यादि विचार मनांत येत, व ते विचार कांहीं केल्या मनांतून जात नसत. परंतु केंव्हां केंव्हां तर असें होई कीं मी त्या विचाराच्या भरांत असतां एकाएकीं एकादी भयंकर किंकाळी कानीं पडल्याचा भास होऊन इकडे तिकडे पाहूं लागावें, व

त्यावेळीं या वाड्याच्या देवघरांत सुवर्णाच्या पाटावर रक्तबंबाळ होऊन पडलेली ती पितृमूर्ति, व तिच्याजवळ हातांत रक्तानें लाल झालेली तलवार घेऊन नेत्र कावरे-बावरे व आरक्त वर्ण झालेला असा तुझा पिता हीं दोन माझ्या दृष्टीसमोर दिसूं लागत, व त्यावेळीं तो भयंकर प्रकार पाहून आश्चर्य, भीति, क्रोध इत्यादि अंतःकरणांच्या निरनिराळ्या वृत्तींनीं सर्व अंतर्याम क्षुब्ध होऊन जाऊन माझा पिता डोळ्यांत आंसवें आणून धिक्कारयुक्तपणें दौलतरावाकडे, व मजकडे काकळूतवाणी, पहात असून, जसें कांहीं आपला निर्दयपणें विश्वासघातानें घात करणाऱ्या अधमाचा मीं सूड उगवावा अशी माझी विनवणीच करीत आहे असा भास होई, व त्या भाससृष्टींत दंग असतां-च एकाएकीं नेत्रांपुढें अंधेरी येई, व कांहीं वेळानें पुनरपि सावध होऊन पहावें तों माझी विचारी दीन माता—तिच्या सती-गमनासही विघ्न करून आपल्या पातकी वि-चारास तिनें कबूल व्हावें एतदर्थ तुझा पि-ता तिला त्रास देत आहे हा प्रकार दिसूं लागे ! राजकन्ये ! हा व असाच दुसरा प्रकार वारंवार डोळ्यांपुढें दिसूं लागून, मा-झ्या मनाची सांप्रत काय स्थिति झाली आहे ती सांगतां सुद्धां येत नाहीं. परंतु तुला एक गोष्ट सांगतों, कीं एकंदर आत सांगितलेले प्रकार मनांत निरंतर घोळत राहून तुझा पिता व मी या दोघांमध्यें दिव-सेंदिवस वैर वृद्धिंगतच होत गेलेंसें वाटून उत्तरोत्तर तुझ्या प्राप्तीची आशा दुरावतच चालली ! यामुळें निराशेच्या आधीन हो-ऊन ब्रह्मदेवानें तुला मजसाठीं व मला तुजसाठीं निर्मिलें नसावें असेच विचार माझ्या मनांत घोळूं लागले ! व तेव्हांपासून ही तुझी मनोहर मूर्ति विसरून जाण्याचाच मी यत्न करीत आहें—तथापि राजकन्ये ! तुला काय चमत्कार सांगूं, तुझी मूर्तिरूप लता अंतःकरणभूमींतून उपटून टाकण्या-चाच यत्न करीत असतां तिचीं प्रेममूळें उलटीं हृदयांत अधिक अधिक खोल जो-रावत आहेत ! हायहाय ! राजकन्ये !—

गज०—हे उदार राजपुत्रा ! आपला हा दुःख-कारक वृत्तांत श्रवण करून माझ्या मनाची काय स्थिति झाली आहे हें मला सांगतां येत नाहीं. माझ्या बाबांच्या आचरणामुळें अनेक निरपराधी प्राण्यांस त्रास व क्लेश भोगावे लागत आहेत, तथापि विधिलिखिता-पुढें कोणाचा उपाय चालतो ? यासाठीं आपण आपल्या परस्परांवरील प्रेमाची सफलता होण्याचा संभव वाटत नाहीं ह्म-णून बोललां ही गोष्ट खरी आहे, तथापि अद्यापिही परमेश्वर कृपा करील तर हीही गोष्ट घडून येणार नाहीं असें माझ्यानें निश्चयानें सांगवत नाहीं ! परमेश्वर करील तर माझ्या बाबांस आपल्या क्रूर आचर-णाबद्दल पश्चात्ताप होऊन सर्व गोष्टी यथा-स्थित जमतील ! परंतु मी त्याबद्दल कांहीं बोलत नाहीं. आपलें परस्परांवरील प्रेम निष्फल होणार हा विचार मनांत येऊन मला अत्यंत दुःख वाटतें आहे, परंतु तें मी आपल्याच शांतवृत्तीचें अनुकरण करून मुकाट्यानें सहन करण्यास झटेन ! परंतु हे उदार व शूर राजपुत्रा ! ह्या प्रेमाविष-यींच्या गोष्टी बोलण्याची ही वेळ नव्हे ! आपण यासमयीं येथें आलां आहां ह्यामुळें

आपणाबद्दल माझ्या मनास फार धास्ती वाटत आहे! आपण यावेळीं निःशंकपणें या व्याघ्राच्या जाळींत आला आहां, ह्यामुळें मोठाच अनर्थ ओढवेल असें माझी मनोदेवता मला सांगत आहे, ह्यासाठीं मी आपल्या पायां पडतें, आपण कृपा करून या क्षणीं राजवाड्याच्या बाहेर पडावें! **पर्वतेश्वराच्या** रानांतील तो प्रकार झाला, त्यावेळीं मी आपल्या मातोश्रींचें रक्षण व समाधान करावें ह्मणून आपण मला सांगितलें त्याप्रमाणें पाहिजे तर मीं त्यांचें समाधान करून आपण जिवंत आहां ही आनंद वार्ता त्यांस कळवीन! परंतु कृपा करून आपण मात्र या वाड्यांतून बाहेर पडण्यास क्षणमात्र विलंब लावूं नये!

**यश०**—हायहाय! हे उदार राजकन्ये! तुझें भाषण ऐकून माझ्या जिवास अनिवार ताप उत्पन्न होत आहे! परंतु काय करूं? माझा कांहीं इलाज चालत नाहीं! माझ्यानें हा वाडा सोडून कदापि बाहेर जाववणार नाहीं!

**गज०**—तें कां बरें?

**यश०**—राजकन्ये! तुला काय सांगूं! माझ्या मनांतील सर्व वृत्ति कशा खवळून गेल्या आहेत तें मी तुला मघां सांगितलेंच आहे! तुझ्या पित्याच्या अनन्वित आचरणामुळें माझे बाबा व आई यांची जी भयंकर स्थिति झाली, ती वारंवार मनांत येऊन माझें मनच मला आवरेनासें झालें आहे! माझ्या निरपराध पित्याचा ज्या दुष्टानें विनाकारण वध केला त्या दुष्टाचा सूड—

**गज०**— सूड? —काय ह्मटलें आपण? सूड? —हायहाय! हा शब्द ऐकून माझ्या अंतःकरणावर प्रत्यक्ष वज्रपातच झालासें मला वाटत आहे! आपलें नेहमीं सुहास्य वदन असावयाचें, परंतु ह्यावेळीं आपल्या मुखचर्येकडे पाहून मला अतिशय भय वाटत आहे! आपल्या नेत्रांतील तें शांत तेज आज कोणीकडे नाहींसें होऊन आपले नेत्र कावरेबावरे झाले आहेत! तसेंच आपण येथें रात्रींचे आलां आहां, व हा भयंकर वेशही धारण केला आहे, इत्यादि सर्व गोष्टींवरून माझा घात होणार असेंच मला वाटतें! हायहाय! हे उदार राजपुत्रा! दया करा! मी आपल्या पायां पडतें! आपला हेतु माझ्या पित्याचा घात करावयाचा आहे असें मला वाटतें!— महाराज! महाराज! मी आपणास हात जोडून विनंती करितें—आपण ही मनांत आणलेली गोष्ट करणें सोडून द्या!— ह्या गोष्टीपासून माझ्या जिवास किती क्लेश होतील हें आपण जाणतच आहां!—दया करा! जर मी यावेळीं स्तब्ध राहिलें तर मीं आपणास साह्य केलेंसें होऊन पितृहत्येचें पातक माझ्या माथीं पडेल याचा विचार करा!—

**यश०**— (आवेशानें) राजकन्ये! तुझें ह्मणणें आहे तरी काय? तुझ्यानें तुझ्या पित्याचा घात झालेला पहावत नसेल, तर मी सांगतों असें कर! याक्षणीं तूं मला आपल्या पित्याकडे घेऊन चल व त्यास मी **यशवंतराव** आहे. ह्मणून सांग! व माझा घात झालेला पाहून आपले डोळे निवीव!

**गज०**—देवा! देवा! मज हतभागिनीसारखें कधीं कोणावर तरी संकट पडलें असेल काय? —हायहाय? हे उदार राजपुत्रा!— कसें ही असलें तरी ते माझे बाबा—त्यांचा

घात झालेला माझ्यानें कसा बरें पहावेल? मझ्या पित्याच्या आचरणामुळें आपल्या मातापितरांस व आपणास अनिवार क्लेश व संकटें भोगावीं लागलीं हें सर्व खरें आहे, तथापि परमेश्वर करो आणि प्रत्यक्ष प्राणघातापेक्षां सौम्य, अशा उपायाची योजना करून आपल्या दुःखाचें परिमार्जन करण्याची आपणास बुद्धि देवो! आपण जी गोष्ट करावयाचें मनांत आणिलें आहे, ती गोष्ट घडली असतां चोंहीकडे मोठेंच अनर्थापात होतील यांत संशय नाहीं—यासाठीं, हे सौम्य व उदार राजपुत्रा! माझी आपणास एवढीच विनंती आहे कीं कृपा करून आपण मनांत आणलेली गोष्ट करणें सोडून देऊन एकदम या राजवाड्यांतून निघून जावें!

**यश०**—( गहिंवरतो. ) हरहर! राजकन्ये! एकून मी जावयाचे अगोदर आपल्या मातोश्रीचें दर्शन सुद्धां घेऊं नये असें तुझें ह्मणणें आहे? माझ्या मातोश्रीची दुःखकारक स्थिति मनांत येऊन माझ्या नेत्रांतून जे अश्रूंचे लोट येत आहेत त्यांची शेवटली धारा तिच्या चरणांवर पाडून तेवढ्यानेंच आपलें समाधान करून घेऊं नये असें तुला वाटतें? हायहाय!—

**गज०**—शाबास! उदार राजपुत्रा! शाबास! आपलें एवढेंच ह्मणणें असेल तर तेवढें करण्यास आपणास मी नाहीं ह्मणत नाहीं, परंतु आपण येथें फार वेळ रहावयाचें करूं नये! अरुणोदय झाला कीं तावडतोब येथून निघून जावें! त्याप्रमाणें न होईल तर निराशेच्या आधीन होऊन माझी काय स्थिति होईल माझ्यानें सांगवत नाहीं! प्रत्यक्ष पित्याच्या प्राणरक्षणासाठीं— देवा! देवा! ह्या गोष्टीचा माझ्यानें उच्चारही करवत नाहीं!—हे राजपुत्रा! आपण या ठिकाणीं राहिलां तर आपणांस मोठी भीति आहे, यासाठीं आपण निघून जावें हें बरें!

( निघून जाते. )

**यश०**—( आपणाशीं ) हायहाय! घात झाला! या राजकन्येचें भाषण ऐकून माझें मन अगदीं घोटाळ्यांत पडल्यासारखें झालें आहे! तर काय? मीं येथून निघून जावें? काय? भागूबाईप्रमाणें येथून पळून जाऊन माझीं मातापितरें व माझे सर्व स्नेही यांच्याशीं मीं बेइमानानें वागावें? धिक्कार असो! धिक्कार असो! ही गोष्ट माझ्या हातून कदापि होणें नाहीं! हें ह्रदया! स्थिर हो! तुला ही गोष्ट करावयाची विनाकारण भीति वाटत आहे! वास्तविक संकट सुईच्या अग्राप्रमाणें सूक्ष्म असतें, परंतु भीतीमुळें त्यास पर्वताचें महत्व आलेंसें वाटतें! कसेंही संकट प्राप्त झालें असतां धैर्याचेंच अवलंबन करणें शूरांस उचित आहे! असो! आतां मातोश्रीकडे जावें!—अरे! आतां प्रत्यक्ष मातोश्रीपुढें उभें राहून तिला ओळख द्यावयाची नाहीं, तेव्हां माझ्यानें पहावेल तरी कसें कांहीं समजत नाहीं! आतां एकेक पाऊल तिच्याजवळ जात चाललों आहें असें वाटून माझें ह्रदय जसें कांहीं आनंदसमुद्रांत उचंबळत आहे, तर ही स्थिति मी झांकूं तरी कशी?—देवा नारायणा! यावेळीं मला तूं धैर्य दे!—असो. **मालोजीनें** माझ्या मातोश्रीचा ह्मणून कोणता—तो महाल दाखविला नव्हे का? होय! तोच!

( निघून जातो. )

प्र० २.—राजसबाईचा महाल.

(राजसबाई सचिंत बसली आहे, व कोपऱ्यांत कोणी कुळंबीण उभी आहे.)

**राज०**—कायग सखू ! **मालोजी** त्या शूर पुरुषास मजकडे पाठवून देतों ह्मणून कबूल करून गेल्याला किती वेळ झाला बरें? अजून कां बरें तो पुरुष येत नाहीं ?

**सखू**—येत्याल बाईसाब ! इतक्यामंदीच येत्याल ! (महालाचें दार उघडून बाहेर पहाते इतक्यांत यशवंतराव तिच्या दृष्टीस पडतो, त्यास पाहून) अगा बया ! ह्यो पन कोन पुरुस हत येतोया? ह्येला बगूनशी माजा पन परान जसा डुगडुग करतोया ! **मालुजीनं** तर नसलना ह्येला पाटिवलं ?

**यश०**—(बाहेरून) रानीसाबांचा म्हाल ह्योच नव्हं का ?

**सखू**—व्हय. पण तुमाला त्येशीं का करायचं हाय ?

**यश०**—(बाहेरून) काय ? मला व्हय ?—जान् रानीसाबांस्नी सांग मी कुनी **येस्वंतरावा**चा स्वोबती हायन् मस्नी **मालुजीनं** हत पाटिवलंया !

**सखू**—जी. तुमी असच हत व्हा. मी बोहिर्ये बाईसाबांस्नी. (राजसबाईकडे येते.) बाईसाब ! त्ये **मालुजीनं** पाटिवलेल गिरस्त भाइर आल्याती !

**राज०**—त्यांना दे इकडे पाठवून, आणि तूं आतां चार घटका इकडे नको येऊं!

**सखू**—जी बाईसाब ! (यशवंतरावाकडे येते.) जा असच आंत. बाईसाब तुमास्नी व्हकारत्याती ! (यशवंतराव आंत येतो व सखू दार लोटून बाहेर निघून जाते.)

**यश०**—(आपणाशीं) हायहाय ! माझें हृदय कसें धडधडतें आहे व जरी प्रत्यक्ष मातृदर्शनाकरितां जात आहें, तरी तिच्याशीं बोलूं लागलों ह्मणजे माझी मुद्रा कदाचित् निराळी होईल, किंवा नेत्रांतून अश्रू वाहूं लागतील, व तेणेंकरून ती मला ओळखील याचें मला भय वाटत आहे ! देवा देवा ! आतां मी प्रत्यक्ष आपल्या मातोश्रीशीं कपटभाषण करणार याबद्दल क्षमा कर ! (पुढें जातो व आई दृष्टीस पडतांच किंचित् थांबल्यासारखा होऊन आपणाशीं) हरहर ! कायही ह्या दुष्टानें माझ्या आईची स्थिति केली आहे ! मी आतां तिच्याच समोर आहें हें पूर्वीपासूनच ठाऊक आहे, नाहींपेक्षां हिला माझ्यानें ओळखवलें नसतें खचित !—आः दुष्टा !—हरहर ! माझे प्रिय जनक जिवंत असून सिंहासनावर विराजमान असतां जी केवळ गृहलक्ष्मीच आहे काय असा भास होई तिचीच ही किती भयंकर स्थिति झाली आहे? केश विखुरलेले, डोळे खोल गेलेले, गाल बसलेले, मुखचर्या निस्तेज झालेली, हरहर ! नुसती हिची अशी मूर्ति पाहिल्याबरोबरच नेत्रापुढें अंधेरी येऊं पहात आहे ! आणि या सर्व स्थितीचें कारण एकटा हा दुष्ट !—आः दुष्टा अधमा ! थांब तुझ्या नरडीचा घोंट घेतों. (पुढें जाऊन राजसबाईस सलाम करितो.)

**राज०**—कोणरे बाबा तूं ? **मालोजी** मला तूं माझ्या प्रिय पुत्राचा स्नेही आहेस ह्मणून सांगत होता, तोच तूं काय ?

**यश०**—जी आईसाब ! मला **येसबा** ह्मनत्यात !

**राज०**—**येसबा** ! आज सात वर्षें झालीं, या बंदीशाळेंत मी राहून इतके दिवस काढिले, परंतु एकटा **मालोजी** व ती एक बिचारी **गजरा** यांशिवाय माझ्या पुत्राचें वर्तमान

सांगून माझें समाधान करावयास कोणी दुसरें नव्हतें. परंतु आज तूं प्रत्यक्ष माझ्या पुत्राची हकीकत सांगावयास आला आहेस, हे तुझे उपकार मी जन्मजन्मांतरींही विसरावयाची नाहीं! **येसबा**! प्रत्यक्ष सर्व प्राणिमात्रांचा कनवाळू जो परमेश्वर त्यानेंच मला सोडिल्यासारखें झालें आहे अशा स्थितींत तूं माझें समाधान करावयास आला आहेस हे तुझे मजवर महदुपकार झाले आहेत! असो. आतां मी विचारितें एवढें मला सांग, तूं माझा दुर्दैवी पुत्र मरतांना पाहिलास? त्यानें मरतांना माझी आठवण काढिली होती?

**यश०**—आईसाब! आपला पुत्र—(गहिंवरून नेत्रांतून अश्रु ढाळितो, व कांहीं वेळानें धैर्य धरून) आईसाब! माफ करा! आपली ही दशा बघूनशी दगडासबी दया यइल, मग माजी गोश्टी तर पुसूंच नका!

**राज०**—(गहिंवरून) हे उदार पुरुषा! तूं धन्य आहेस! आज इतक्या दिवसांत माझी ही स्थिति पाहून गहिंवरले असे प्राणी फार थोडे! तें असो. पण बोल, माझ्या पुत्राचें तूं काय ह्मणत होतास? माझा पुत्र मरतांना तूं पाहिलास?

**यश०**—आईसाब! **दौलतरावा**कडुनशी ह्यो मी आतांच आलों व त्येच्याच हुकमानं मी आपनाला सांगाया आलोंया कीं ह्ये डोळ खेरीज करूनशी दुसऱ्या कुनीबी त्येला मरतांना पायलं न्हाय!

**राज०**—हायहाय रे निर्दया दैवा! एकून माझ्या पुत्रानें मरतांना तरी माझ्या मांडीवर डोकें ठेऊन मरावें, व तें तरी मी डोळे भरून पहावें हें देखील तुला आवडलें नाहींना! हायहाय! दुष्टा नशिबा! अरे, मरावयाचे वेळीं तरी मी त्याला आलिंगन दिलें असतें, व त्याचे मरणकाळींचे दुःखोद्गार ह्रदयांत सांठवून ठेविले असते, पण तें देखील तुला मानवलें नाहींना? —**येसबा**! तूं तरी बाबा आतां मला सांग, माझा पुत्र मरतांना काय बोलला? व त्याची त्यावेळीं मुद्रा कशी झाली होती? बोल बोल! त्याचे त्या वेळचे शब्द मला यावेळीं लक्षावधि जगतांतील संपत्तीच्या पलीकडेस आहेत! बोल! तो मरतांना कांहीं बोललाका? मरते समयीं त्याचें मन कशावर गुंतलें होतेंका?

**यश०**—(नम्रपणें) आईसाब! बोलतों ह्येचा आपुन राग नका मानूं! असं समजा! आपल्या **येस्वंतरावां**नीं मरतांना मसनी असं बोहिलं कीं, जा तूं माज्या मातुसरीपायाप, आन त्येनां सांग कीं तुमी आजतल्लक लईच दुक काढलया, पन आतां त्ये संमदं इसरूनशी, तसंच माझ मेलल बाबा, आन् आतां परान सोडतोया त्यो मी, अशा दोगांस्नीबी इसरूनशी त्येवढ्या **दौलतरावाच्या** ह्मनन्यास हो ह्मनाच!

**राज०**—(त्वेषानें) दुष्टा! घातक्या! तूं खोटें बोलतोस! तूं कोणी तरी दुस्मान आहेस, व त्या चांडाळ **दौलतरावा**नें तुला माझा छळ करण्याकरितां पाठविलें आहे! चल निघ काळ तोंड्या इथून! मला तोंड दाखवूं नको! माझा पुत्र असें कधीं ह्मणणार नाहीं! आणि जर ह्मणाला असेल तर सत्त्यानास होवो त्याचा न् तो नरकांत पडो! मला त्याबद्दल तिळमात्रही वाईट वाटावयाचें नाहीं! परंतु तो असें कधीं ह्मणावयाचा नाहीं ही माझी पक्की खातरी आहे! माझा पुत्र उदार आहे! त्याच्या मनांत असली कुकल्पना कदापि याव-

याची न हीं ! —कां दुष्टा ! अजूनही तूं मज पुढें उभा आहेस? जात नाहींस? देवा! देवा! काय माझें नशीब हें, कीं त्या दुष्ट दौलतरावाच्या गुलामांनींही मजपुढें निर्लज्जपणें येऊन माझ्या दुःखावर डाग द्यावे ? हायहाय ? देवा! देवा !—

**यश०**—आईसाब ! आपनासनी लईच दुक झालया, पन आपन अंवळ शांत व्हा ! आपलं दुक आजूनबी दूर व्हईल ! (रडूं लागतो.)

**राज०**—मानभाव्या ! अरे तूं माझ्या दुःखावर डाग देऊन आतां कां रडतोस ? तूं कितीही रडलास तरी तुझें ह्मणणं ह्मणून मला खरं वाटावयाचें नाहीं !

**यश०**—आईसाहेब ! मी रडतों आहें खरा, परंतु मी इमानी आहें ! मी बाहेरून दिसतों तसा आंतून नाहीं ! मी निराळाच आहें !

**राज०**—तर मग तूं कोण आहेस ?

**यश०**—आईसाहेब ! माफ करा—माझ्यानें या वेळीं कांहीं जास्ती बोलवत नाहीं ! परंतु मी आपणांस एवढेंच सांगतों, कीं मी आपला व **यशवंतरावाचा** स्नेही आहें ! मी येथें आलों तो आपल्या दुःखावर डाग देण्याकरितां आलों नाहीं, तर उलटें आपल्या जिवाचें समाधान करण्याकरितां आलों आहें !—आईसाहेब ! माझ्या भाषणानें आपलें अंतःकरण उचंबळूं देऊं नका, परंतु मला वाटतें कदाचित् आपले प्रियपुत्र अद्यापिही जिवंत असतील !

**राज०**—काय ह्मणतोस ? माझा प्रिय पुत्र अद्यापिही जिवंत असेल ? होयना ? अरेरे ! पण मी हें काय वेड्यासारखें विचारितें ? माझ्या मनाची पण ही अशी काय विलक्षण स्थिति झाली आहे ? छे ! ही सर्व भ्रांतिच असली पाहिजे ! माझ्या पुत्राची राखही केव्हांच होऊन गेली, आतां तो कसचा जिवंत होतो? छे! माझा प्रिय पुत्र मेला हेंच खरें! देवा! देवा!

**यश०**— (मनांत) माया ही कांहीं विलक्षण आहे ! आतां हिच्याशीं बोलूं तरी कसें ? कांहीं समजत नाहीं ! मी जास्ती बोलेन तर ही मला खचित ओळखील !—हृदया ! स्थिर हो !— (उघडपणें) आईसाहेब ! आपणांस मी सांगतों, आपले पुत्र अद्यापि जिवंत आहेत! कारण ते मेल्याची बातमी बाहेर पसरल्यावर देखील या **कोंकणपट्टीं**तच मीं त्यांना प्रत्यक्ष पाहिलें !

**राज०**—हे उदार पुरुषा ! तूं आहेस तरी कोण?

**यश०**—आईसाहेब ! मी आपला असाच कोणी तरी आहें ! मला कोणी ना स्नेही, ना घर, ना दार ! फक्त माझे एकटे स्नेही काय ते **यशवंतराव** ! ते येथून सात वर्षांपूर्वी निघून गेले तेव्हां त्यांचे बरोबर मीहि बाहेर पडलों ! त्यांनीं अनेक प्रकारचीं दुःखें भोगिलीं व संकटांत व हालांत दिवस काढिले, त्याप्रमाणेंच मीहि त्यांच्याबरोबर राहून हालांत व संकटांत दिवस काढिले ! आपण पूर्वी ऐश्वर्याचा उपभोग घेत असतां त्यावेळीं आपली योग्यता पाहून मी आपणांस पूज्य मानीत होतों, व आतां आपण संकटस्थितींत असतांही आपली सद्गुणावरील भक्ति उलटी वृद्धिंगत झालेली पाहून तर आपणास अधिकच पूज्य मानीत आहें !—

**राज०**—ते सर्व खरें असेल ! परंतु मला अद्यापि तुझें ह्मणणें खरें वाटत नाहीं! तूं माझी दुःखावस्था पाहून खरेंच माझी थट्टा नको करूं ! बोल ! बोल ! माझा **यशवंत** बाळ अद्यापि खराचका जिवंत आहे ?

**यश०**—होय, आईसाहेब ! ईश्वरसाक्ष मीं आपणांस खोटें सांगितलें नाहीं !

**राज०**—देवा ! नारायणा ! धन्य आहेस ! आज पर्यंत मला स्वतःच्या दुःखाचें फार ओझें वाटत असे, परंतु माझा बाळ जर जिवंत आहे, तर मी तें दुःख खुशाल सहन करीन ! देवा ! माझा बाळ जिवंत असेल तर तुझे मजवर मोठे उपकार आहेत, त्यांची मी उतराई कशी होऊं ?—बरें, पण, माझ्या बाळास त्याच्या तीर्थरूपांच्या आणि माझ्या क्लेशांची आठवण आहेना ?

**यश०**—हें काय विचारावें आईसाहेब ! त्यांची व माझी नुकतीच इकडे यावयाचे पूर्वी गांठ पडली होती, त्यावेळीं त्यांनीं आपणांस सांगण्याकरितां एक निरोपही सांगितला !

**राज०**—( घाईनें ) काय ? निरोप ? बोल पाहूं कसला निरोप आहे तो ?

**यश०**—बोलतों मातोश्री !—आईसाहेब ! **यशवंतरावांचा** आपणांस असा निरोप आहे कीं, " माझ्या तीर्थरूपांना आणि आपणास जे अनन्वित हाल सोसावे लागले ते माझ्या हृदयास वज्रासारखे खिळून गेले आहेत. ते तेथून ह्मणून जावयाचे नाहींत, व त्यांचें मला क्षणमात्रही विस्मरण होणार नाहीं. आपले पुराणिकबावा **शिशुपालवधाचें** पुराण सांगत असतां असें सांगत कीं **श्रीकृष्णांनीं** त्याचे अपराधांची संख्या पूर्ण होई तोंपर्यंत वाट पाहिली आणि नंतर त्याचा वध करून पृथ्वीस सुखी केलें, तर मीही त्याचप्रमाणेंच **दौलतरावाचे** अन्याय मोजीत बसलों आहें, व त्याचा घात करण्याची संधि केव्हां येते ह्मणून वाट पहात राहिलों आहें. ती संधि येई तोंपर्यंत मात्र माझ्या अंतःकरणांतील क्रोधाग्नि रक्षेच्या आंत दडून राहिल्याप्रमाणें राहील, व शेवटीं या दुष्टाचा समूळ नाश केल्याखेरीज कदापि रहावयाचा नाहीं हें आपण पक्कें लक्षांत ठेवावें ! "

**राज०**—ईश्वरा ! तूं धन्य आहेस ! व माझ्या बाळाचा पाठीराखाही तूंच आहेस !

**यश०**—आईसाहेब ! आतां आज्ञा घेतों. ( तिला सलाम करितो- )

**राज०**—हे सत्पुरुषा !. तूं इतक्यांतच मला सोडून जाऊं नको ! माझ्या बाळाच्या तोंडचे हे शब्द ऐकून माझ्या जिवास जें कांहीं होतें आहे तें कांहीं मला सांगतां येत नाहीं! तूं माझ्या बाळाच्या संकटसमयींही नेहमीं त्याचे बरोबर रहात होतास, यावरून या वेळीं मी प्रत्यक्ष माझ्या बाळाचेंच मुख अवलोकन करीत आहें असें मला वाटतें ! यासाठीं क्षणभर तूं येथेंच रहा ! माझ्या मनांतून माझ्या बाळाशीं किती पण गोष्टी बोलावयाच्या होत्या ! परंतु उपाय नाहीं ! असो. त्याचें कल्याण करावें ह्मणून परमेश्वराची व आई **अंबेची** प्रार्थना करणें व त्याचे क्लेश मनांत येऊन शोक करीत बसणें एवढेंच कायतें मला उरलें आहे ! यासाठीं एवढी गोष्ट तूं माझ्या बाळाला कळीव ह्मणजे झालें !

**यश०**—मातोश्री ! आपण त्याविषयीं कांहीं काळजी वाहूं नये ! आपली या क्लेशांतून सुटका करण्याविषयीं आपल्या **यशवंतरावांचे** प्रयत्न सतत चालू असून ते आपली सुटका केल्यावांचून कदापि रहाणार नाहींत ! त्यांनीं मला इतकें मुद्दां आपणांस कळवावें ह्मणून मला सांगितलें होतें कीं, "अ-

द्यापिही आपली या क्लेशांतून मुक्तता होऊं शकेल! याविषयीं आपण चिंता वाहूं नये! परमेश्वराचे मनांतून कोणतीही गोष्ट करावयाची असली, तर ती कशी होते हें तो समजूं सुद्धां देत नाहीं! तो न्यायी असून निरपराध अनाथाचें रक्षण करण्यास अदृश्य रूपानें कोणाची तरी प्रेरणा करितोच करितो! यासाठीं तो आपलें कल्याण केल्याखेरीज कदापि रहावयाचा नाहीं हें आपण पक्कें समजावें! तथापि परमेश्वराची जर अशीच इच्छा असली कीं आपला नाशच व्हावा, तर निदान 'मारूं किंवा मरूं!' या निश्चयानेंच पुढें सरसावून त्या दुष्ट दौलतरावाच्या नाशार्थ यत्न करण्यास मी कदापि रहाणार नाहीं हें आपण पक्कें मनांत वागवावें!" आईसाहेब! आपले **बाळमहाराज** इतकें बोलले, आणि आतां ज्याप्रमाणें माझ्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या आहेत त्याप्रमाणें त्यावेळीं त्यांच्याही नेत्रांतून चालल्या होत्या!

**राज०**—हे **पांडव**सहाकारी भगवंता! माझ्या कोमल बाळाचें रक्षण तूंच कर! त्यास सांप्रत जीं संकटें व जे क्लेश सोसावे लागत आहेत, त्यांतून त्याचा पाठीराखा तूं होऊन त्याची मुक्ति कर, व त्यास या ठिकाणीं परत आणून त्याच्या राज्यपदावर त्याला बशीव एवढेंच तुजपाशीं माझें मागणें आहे!

**यश०**—बरें तर मातोश्री! आतां घेतों आज्ञा!

**राज०**—हे सत्पुरुषा! आतां तूं जा, परंतु मी बोललें यागोष्टी माझ्या बाळास मात्र कळविण्यास विसरूं नको हो!

**यश०**—आज्ञा. (तिच्या महालांतून बाहेर पडतो, व आपले मागें दार लावून घेतो.)

(पडदा पडतो.)

**प्रवेश ३.-स्थळपूर्ववत्. राजसबाईच्या महाला बाहेरील दिवाणखाना.**

(यशवंतराव येतो)

**यश०**—(आपणाशीं) हृदया! आतां तूं हवें तितकें खुशाल रुदन कर! अश्रूंनो! आतां तुमच्या संतत धारा खुशाल हव्या तितक्या वाहूं द्या! माझा अंतरात्मा ह्याळीं जसा कांहीं आनंदसमुद्रांत गटंगळ्याच खात आहे असें मला वाटतें! नेत्रांतून आनंदाश्रुतर खळतच नाहींत! अहाहा! मी आपल्या प्रिय मातोश्रीच्या दुःखाचें शांतवन करून तिच्या हृदयांत समाधान उत्पन्न केलें ह्यायोगानें मला जें कांहीं समाधान वाटतें आहे तें बोलूनही दाखवितां येत नाहीं! आणि तशांतून तिचे सद्गुण पूर्वीप्रमाणेंच अद्यापिही कायम आहेत हें पाहून तर मला विशेषच समाधान वाटतें! अहाहा! धन्य धन्य मी! मी इतकीं संकटें व भयें सोसून तिला भेटण्याकरितां या व्याघ्राच्या जाळींत आलों आहें त्यांचें आज सार्थक झालें! सद्गुणाचा महिमा कांहीं विलक्षण आहे! सद्गुणापासून प्राप्त होणाऱ्या आनंदास तर पारावारच नाहीं! फार काय सांगावें? एकादे वेळीं दुःख प्राप्त झालें तरी तें देखील आल्हादकारक होतें! व मनुष्याचा अंतरात्मा कितीही शोकावेशांत बुडाला असला तरी एकादे वेळीं तरी त्यास ब्रह्मानंदाचा अनुभव आल्यावांचून रहात नाहीं!

(मालोजी व हिंमतराव येतात.)

**दोघे**—महाराजांचा जयजयकार असो!

**यश०**—(त्यांस पाहून) या तुह्मीं! कसें काय? रात्र किती झाली आहे?

**हिंम०**—महाराज! मध्यरात्रीचा डंका पडण्याची वेळ होत आली आहे!

**मालो०**—महाराज! आपल्या नेत्रांतून अश्रु वाहताहेत याचें काय बरें कारण?

**यश०**—मालोजी! तुह्मीं समजलां नाहीं! मी आईस भेटून तिचें समाधान करून आतांच बाहेर पडलों! हे वीर पुरुष हो! माझ्या नेत्रांतून अश्रु चालले आहेत तथापि त्यांवरून माझ्या धैर्याची गाळण झाली आहे असें समजूं नका! माझें अंतःकरण मातोश्रींच्या दर्शनाचें पूर्वी दुःखानें व्याप्त झालें होतें तें आतां, या अश्रूंच्या योगानें पुनरपि शांतिसुखाचा अनुभव घेऊं लागलें आहे इतकेंच कायतें! मी आतां मातोश्रींचें समाधान केलें आहे, आतां प्रत्यक्ष मृत्यु जरी पुढें येऊन उभा राहिला तरी मी यत्किंचितूही डगणार नाहीं! बरें तें असो. पण गांवांतली कशी काय हकीकत आहे?

**हिंम०**—महाराज! सर्व तयारी आहे! महाराज! आपले सर्व साथी नेमलेली वेळ केव्हां होते ह्मणून अगदीं वाट पहात राहिले आहेत!

**यश०**—पण तिची कांहीं खूण ठरली आहेना?

**हिंम०**—होय, महाराज! मध्यरात्रीचा पहिला डंका पडला कीं सगळे लोक नागव्या तलवारीनिशीं उभे राहतील, व पुढें अर्ध घटकेनें दुसरा पडतो तो पडलाकीं लागलाच जिकडे तिकडे तोडातोडीस आरंभ होईल!

**यश०**—(आवेशानें) अहाहा! मध्यरात्रीचा डंका केव्हां पडतो आणि या दुष्ट **दौलतरावास** यथायोग्य शासन होऊन त्याच्या जुलमापासून ही बिचारी प्रजा केव्हां मुक्त होते असें मला झालें आहे! **हिंमतराव! मालोजी!** तुह्मां सगळ्या मंडळीच्या भरंवशावर मीं हें काम हातीं घेतलें आहे, यास्तव तें पार पाडणें हें तुमच्याकडे आहे! त्या दुष्ट **दौलतरावाची** कन्या **गजराबाई**, तिची माझी मघां गांठ पडली होती, तिनें मला ओळखिलें, व आपला हा बेत चालू आहे याबद्दल तिला बराच संशय आला आहेसें दिसतें!

**मालो०**—महाराज! आपण येथें राहिल्यास कदाचित् आपणास कांहीं दगा होईल याचें मला भय वाटतें! याकरितां आपण आह्मांबरोबर परत चलावें कसें! **गजराबाई** कदाचित् ही गोष्ट आपल्या बापास कळवील तर त्यापासून एकादेवेळीं मोठा अनर्थही होईल!

**यश०**—काय ह्मणतां? मी आपणाबरोबर निघून जाऊं? आणि आपल्या निराश्रित मातेस येथेंच ठेवूं? छिः! ही गोष्ट कदापि होणें नाहीं! त्या दुष्टाचा आज मध्यरात्रीं तिजवर बलात्कार करण्याचा विचार आहे, यासाठीं मी तर येथेंच राहून त्याच्या पाळतीवरच असणार! मरण्याचीच वेळ आली तर मी अगोदर मरेन, परतु माझ्या मातोश्रीच्या केंसास एवढा सुद्धां धक्का लागूं देणार नाहीं! त्या दुष्टाचा या राजवाड्यांत जेथें जेथें ह्मणून संचार होईल, तेथें तेथें मी त्यास नकळत त्याच्या मागोमाग राहून त्या दुष्टाचा तो भयंकर बेत दिसूं लागला, कीं त्याच्यापुढें छाती ठोकून उभा

राहीन आणि त्याची यथेच्छ पूजा करून त्याचा नाश करीन !

**हिंमतरा०**—महाराज ! धन्य धन्य ! आपली, ही उदार बुद्धि पाहून आपण सार्वभौम राजाच्याच पदास योग्य आहां यांत संशय नाहीं ! तथापि महाराज ! माझी आपणास एक प्रार्थना आहे ! ती ही कीं आपण येथें राहून आपल्या जिवास धोक्यांत घालूं नये! आपण धोक्यांत रहाण्यापेक्षां माझे प्राणही द्यावयास मी सिद्ध आहें ! मी मेल्यानें दुनया ओस पडणार नाहीं, परंतु आपल्यास कांहीं अपाय घडल्यास महाराज ! या सर्व आपल्या दीन प्रजा निराधार होतील ! यासाठीं कृपा करून आपण **मालोजी**बरोबर येथून निघून जावें ! मी एकटा येथें राहून आपल्या मातोश्रींचें संरक्षण करीन !

**यश०**—**हिंमतराव** ! तुह्मांस असें वाटतें काय, हा **यशवंतराव** महाप्रतापी **प्रतापसिंह** राजाचा पुत्र, अशा आणीबाणीच्या प्रसंगीं भागूबाईप्रमाणें शेंपूट लपवून मागें राहील? छिः! असें कदापि व्हावयाचें नाहीं तुह्मी खचित समजा, जर संकटप्रसंगीं मी मागें राहीन, तर मला ज्या राज्यासनावर बसविण्याच्या तुमचा विचार आहे त्या राज्यासनावर बसविण्याच्या उपयोगी मी नाहीं ! या सर्व राज्याचा सुखोपभोग घेण्यास जर मी पुढें, तर हरएक प्रकारच्या संकटप्रसंगींही पुढें असणें हेंच मला योग्य आहे ! यासाठीं तुह्मी या कामीं मला आग्रह बिलकूल करूं नका! मी अस्सा येथें उभा राहीन! ( बोटानें दाखवितो. ) आणि त्या दुष्टाचा समाचार घेईन ! या कामीं जर मी पडलों समजा, तर त्याबद्दल तुह्मी सूड मात्र घ्यावयास करूं नका ! बरें, मला सांगा तो दुष्ट या वेळीं काय करीत आहे !

**मालो०**—महाराज ! राजवाड्यांत मेजवानी चालली आहे तेथें यथेच्छ दारूचे पेले झोंकीत बसला आहे ?

**यश०**—फार चांगली गोष्ट ! बरें,आपल्या फौजेची व्यवस्था कसकशी ठेवण्यांत आली आहे ?

**हिंम०**—महाराज ! राजवाड्याच्या प्रत्येक दरवाज्याजवळ गुप्तपणें कित्येक लोक ठेविले आहेत, ते दारांतील चौकीदारांचा व पहारेकऱ्यांचा समाचार घेतील ! तेवढा घेतला ह्मणजे मग पुढें कांहीं अडचण पडणार नाहीं ! कारण वाड्यांत जे शिपाई प्यादे वगैरे आहेत ते हल्लींच्या उत्सवाच्या कारणानें अगदीं झिंगून खुशाल घोरत पडले आहेत. राजवाड्याकडे बाहेरून येण्या जाण्याच्या जेवढ्या वाटा आहेत तेवढ्या **मानाजी राव फांकडे** व त्यांचे शूर शिपाई हे रोखून आहेत, व त्यांस जर कोणी अडथळा करील तर त्याचा तेथल्या तेथें बळी पडेल! झालें ! बाहेरची व्यवस्था या प्रमाणें तर झालीच, आतां रहातांपैकीं आंतली व्यवस्था सांगावयाची राहिली, तीही थोडक्यांत सांगतों. **हिंमतराव** व **मी** आणि दुसरेही कित्येक आपल्या पक्षाचे शूर लोक ज्यांनीं मारूं किंवा मरूं असाच दृढ निश्चय केला आहे ते सर्व आंतच राहून दुसरा डंका पडल्याबरोबर एकदम पुढें येऊन थोरला दरवाजा खुला करूं ! मग काय ? एकदम तोंडातोंडी सुरू ! मग पाहीन तो दुष्ट **दौलतराव** माझ्या हातून कोठें जातो तें !

**यश०**—वाहवा ! वाहवा ! **हिंमतराव** ! मध्य

रात्र होण्याचा समय जवळ जवळ येत चालला, तसे माझे बाहु पहा कसे स्फुरण पावत आहेत ! परंतु माझ्या शूर मित्रांनों ! माझें तुह्मांपाशीं एक मागणें आहे, तें एवढेंच कीं, त्या दुष्ट **दौलतरावाचा** घात माझ्याच हातून झाला पाहिजे, याकरितां तुह्मांपैकीं कोणीही त्याचा घात करूं नये !

**मालो०**–महाराज ! बोलतों त्याची माफी असावी ! माझा संशय कदाचित् खोटाही असेल, पण आपणास बोलून दाखवितों. महाराज ! समजा त्या सुंदर **गजराबाईनें**–

**यश०–मालोजी** ! तुमचे संशय व्यर्थ आहेत ! तुह्मांला खचित सांगतों कीं, प्रत्यक्ष ती सुंदरी जरी माझ्या चरणांवर पडून हवी तितकी रडली, तरी त्या दुष्टाचा घात मी कधीं केल्याखेरीज रहावयाचा नाहीं ! आणखीं जर कदाचित् त्या दुष्टाचा घात माझ्या हातून न होतां तो दुसऱ्या कोणाचे हातून झाला तर परमेश्वरसाक्ष सांगतों त्या दुष्टाचा मीं पुरता सूड उगविला असें कदापि वाटावयाचें नाहीं ! त्या सुंदरीवर माझें अत्यंत प्रेम आहे ही गोष्ट खरी, तथापि या कामीं मी प्रेमासही एकीकडे झुगारून देईन !

**हिंमत०**–हे शूर व उदार राजपुत्रा ! हा आपला उत्साह व निश्चय पाहून आह्मांस फार समाधान वाटत आहे !

**यश०**–बरें, पण शहरांत जिकडे तिकडे सामसूम आहेना ?

**हिंम०**–आपण त्याविषयीं काळजी करूं नये ! शहरांत जिकडे तिकडे सामसूम झालें आहे ! रस्त्यांत एवढें हूं कीं चूं किंवा कांहीं एकादी हालचाल कोठें कांहीं नाहीं. जणो काय, थोडक्याच वेळांत प्रळयकाळच्या मेघगर्जना सुरू होणार, त्याचें सर्व लोकांस एकसमयावच्छेदेंकरून अगोदरच स्वप्न पडून ते भीतीनें त्या प्रळयांतून आपण चुकावें या हेतूनें दडूनच बसले आहेत !

**मालो०**–महाराज ! आजच्या रात्रीं जिकडे तिकडे कांहीं एक प्रकारची भयानक शांतता पसरली आहे, ती पाहून मला फार समाधान वाटत आहे ! ह्यावेळीं यावज्जीवमान सृष्टि स्तब्ध झालीसें वाटत आहे ! वारा अगदीं बंद पडला आहे –

**हिंम०**–होय ! होय ! नुकताच थोड्या वेळापूर्वीं मी समुद्रतीरानेंच असा इकडे आलों, त्या वेळीं समुद्राच्या लाटा देखील बंद पडल्याचा मला भास झाला ! काळोख तर इतका पडला होता कीं, डोळ्यांत बोट घातलें तरी एवढेंसुद्धां दिसत नव्हतें ! तसेंच, एवढा विस्तीर्ण आकाशमंडप, परंतु त्यांत एक नक्षत्र देखील कोठें दिसत नव्हतें !

**यश०**–होय होय ! पण **हिंमतराव** ! हें असें पूर्वेकडच्या बाजूस पहा ! हा अष्टमीचा मंदप्रभचंद्र आपल्या अर्ध्या कला झांकीत होत्साता एकाएकीं लालरक्तासारखा दिसूं लागत आहे, व त्याचे किरण ढगांआड जाऊन त्यांचा संहारच करण्यासाठीं जणों त्यांच्याशीं झगडत आहेत ! – (डंका वाजतो.) **मालोजी** ! हा आवाज बरें कोठून आला ?

**मालोजी**–महाराज ! हा मध्यरात्रींचा पहिला डंका !–

**हिंम०**–हीच ती खूण.– **मालोजी** ! चला चला ! आपली मंडळी बसली आहे, तेथें

मागील अंगचा चौक सैंपाकघर व कोठीखाना यांजकडे दिला होता, तेवढा चौक खेरीज करून बाकी बहुतेक इतर ठिकाणीं हांड्यांची व झुंबरांची गर्दीच दृष्टीस पडत असे. पुढील अंगणांत शिरल्याबरोबर डाव्या अंगास एक जिना लागे, त्या जिन्यानें चढून गेलें ह्मणजे त्या ठिकाणीं एक मोठा महाल असून, तेथील खुंट्यांस तरवारी, भाले, बरच्या, चिलखतें वगैरे शस्त्रें व आयुधें टांगिलेली दृष्टीस पडत असत. त्याचे पलीकडे **भद्रमणी**ची निजावयाची खोली एका अंगास, व दुसऱ्या अंगास **त्रिवेणी**चा महाल, हीं असून शिवाय इतर दुसऱ्याही खोल्या व महाल पुष्काळच होते. त्या सर्वांत एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्याकरितां वाटा राखल्या असत. त्या वाटा नेहमी कोणीही अपरिचित मनुष्याच्या दृष्टीस पडतील अशाच नेहमी असत असा कांहीं नेम नव्हता. कारण वाड्यांत जागोजाग चोरवाटा राखिल्या होत्या, त्या अशा कीं, त्यांच्या खाणाखुणा टाऊक असल्याशिवाय किंवा प्रत्यक्ष घराच्या भिंती फोडल्याशिवाय किंवा त्या पाडिल्याशिवाय त्या कोणास समजण्यासारख्या नव्हत्या. ह्यांतील बहुतेकांचें वर्णन पुढें येईलच, ह्याकरितां त्या सर्वांचें येथें वर्णन करण्याची जरूर नाहीं. असो. ह्या सर्व जागा **कार्तिकशंभु** ह्यास टाऊक होत्याच, व तो ज्या उद्देशानें अशा अवेळीं तेथें आला होता, त्याकडेच त्याचें एकसारखें लक्ष लागून गेलें होतें, यामुळें आंतील सर्व प्रकार व व्यवस्थाही त्याच्या नेत्रांपुढें स्पष्टपणें दिसतच होतीं. बाहेर **हयदक्ष** येण्याची वाट पहात असतां तो विचारांत अगदीं गुंग होऊन गेला होता, व त्या अंधाराच्या वेळीं त्या वाड्याचें भयंकर राक्षसी स्वरूप चोहींकडे पसरलेलें अवलोकन करून **भद्रमणी**ची संपत्ति व ऐश्वर्य ह्याविषयीं ही त्याच्या मनांत कल्पना येऊं लागल्या, व त्यांच्याच भरांत असता त्याच्या तोंडांतून अकल्पित पुढें लिहिलेले शब्द बाहेर पडले:— "खचित! **भद्रमणि अर्धशाल** जर आपल्या पक्षास मिळेल, किंवा त्याची कन्या **त्रिवेणी** हिच्याशीं माझा विवाह होऊन त्यायोगें **भद्रमणी**चें मला साहाय्य मिळेल, तर मी मनांत आणिलेला हेतु खचित तडीस जाईल! **त्रिवेणी** एकदा माझ्याशीं लग्न करावयाचें नाहीं ह्मणून बोलली होती खरी, तसेंच खुद्द **अर्धशाला**नें ही माझी मुलगी तुला द्यावयाची नाहीं ह्मणून ह्मटलें आहे, तथापि कांहीं चिंता नाहीं! या कामीं आमच्या **जरठकर्ण** जतीस मध्यें घातलें आहे, व त्यानें माझें काम खचित करून देतों ह्मणून मला आश्वासनही दिलें आहे! होय! खचित! **त्रिवेणी** माझी बायको झाल्याशिवाय माझा हेतु तडीस जावयाचा नाहीं. व ह्याकरितां तिच्याशीं मी लग्न लावणारच!"

वरील प्रकार वाचून **कार्तिकशंभु** कोण होता, व त्याच्या मनांत **त्रिवेणी**शीं विवाह करून कोणचा हेतु साध्य करावयाचा होता ह्याविषयीं वाचकांच्या मनांत कदाचित जिज्ञासा उत्पन्न होईल. ह्याकरितां प्रकृत स्थळीं त्याबद्दल थोडासा प्रस्ताव लिहिणें अवश्य वाटतें. **कार्तिकशंभु** ह्याचें जन्म मूळ **दक्षिणेंतच** झालें होतें. तथापि त्याला जेव्हांपासून ह्मणून आठवण होती, तेव्हांपासून त्याचे बरेच दिवस **गुजराथ, महाराष्ट्र** वगैरे प्रदेशांतच गेले होते. त्याच्या पूर्वींचा त्याचा इतिहास तूर्त कांहीं सांगतां येत नाहीं, परंतु ह्याठिकाणीं इतकें सांगणें अवश्य वाटतें, कीं तो लहान वयांत **गुज-**

**राथेंत** आपल्या सोंगड्यांशीं मिळून खेळत असे, त्यावेळीं ते सोंगडे त्यास निबाप्या ह्मणून त्याची थट्टा करीत असत, व तो चिडे. तो **गुजराथेंत** एका **भोगीलाल** नांवाच्या गृहस्थाजवळ रहात असे, व त्यास तो माझा बाप कोण ह्मणून विचारीत असे. परंतु त्याच्याकडून त्यास कांहीं उत्तर न मिळतां तो त्यास इतकेंच सांगत असे कीं "बाबारे ! तूं मूळचा **दक्षिणेंत** जन्मलेला, व तुझें वय एका वर्षाचें होतें तेव्हां तुला कोणींस आणून माझ्या बापाच्या हवालीं केलें, इतकें कायतें मला ठाऊक आहे, यापेक्षां कांहीं जास्त माहिती नाहीं !" ह्यामुळें आपण कोण आहों व आपलीं खरीं मातापितरें कोण ह्याबद्दल वास्तविक माहिती **कार्तिकशंभूस** नव्हती. त्याच्यावर **भोगीलालाचें** मोठें प्रेम असे, व त्यावेळीं चोंहीकडे धर्माच्या संबंधानें गडबड व खटपटी चालत असत, त्यांमध्यें कोणच्या ना कोणच्या प्रकारें **भोगीलाल** याचें अंग नाहीं असें कधीं घडत नसे. त्यामुळें तो **कार्तिकशंभूनेंही** आपणाप्रमाणेंच धर्माच्या खटपटींत पडावें एतद्विषयीं त्यास फार उपदेश करीत असे. तथापि त्याचे सोंगडे त्यास निबाप्या ह्मणून त्याची थट्टा करीत असत, त्यामुळें त्यास वारंवार चिड व त्रास वाटत असून त्याचें लक्ष सहसा धर्माच्या खटपटींकडे लागत नसे. **भोगीलाल** हा मोठा कडकडीत **बुद्ध**धर्मी असे, व त्याच्याच घरीं **कार्तिकशंभु** रहात व जेवीत खात असे, ह्यामुळेंच कायतो तो **बुद्ध**धर्मी इतकें ह्मणतां येत असे, तथापि वस्तुतः पहातां त्याचें लक्ष धर्माचे कामीं मुळींच नव्हतें असें ह्मटलें असतांही चालेल. तथापि लहानपणापासून पोरांशीं चिरडीस जाऊन मारामारी करण्यांतच त्याचा वेळ बहुतेक जाई, ह्या गोष्टीचा संस्कार त्याच्या मनावर दृढ झाला होता. त्यायोगानें त्याच्या मनांत एकदा कोणतीही गोष्ट भरली असतां आग्रहास पेटेल अशा प्रकारची त्याच्या मनाची स्थिति झाली होती. मात्र त्याच्या मनांत एक वेळ ती गोष्ट भरण्याचा कायतो अवकाश. **कार्तिकशंभूचें** वय तेरा चौदा वर्षांचें झालें त्या वेळीं **भोगीलाल** वारला. **भोगीलाल** हा फारसा श्रीमंत नव्हता, तथापि त्यानें आपला संसार बाताबेतानें चालवून बाकी बहुतेक पैसा धर्मसंबंधी खटपटींतच घालविला होता ह्यामुळें, व त्यास कांहीं मूलबाळ नव्हतें व बायकोही नुकतीच पांचसहा महिन्यांपूर्वीं निवर्तली होती ह्यामुळें, राहिलेला थोडा बहुत पैसा त्यानें मरतेसमयीं **कार्तिकशंभूचे** स्वाधीन केला. **भोगीलाल** जिवंत असतां त्याचे घरीं **बुद्ध**धर्मी लोकांचें येणें जाणें फार असे, व त्या प्रांतांतून धर्मासंबंधानें ज्या ज्या ह्मणून गोष्टी होत असत, त्यांतील बऱ्याच गोष्टींची मूळ घटना **भोगीलाल** याच्या घरींच होत असे. ह्यामुळें तो वारल्यानंतरही त्याचे **बुद्ध**धर्मी स्नेही **कार्तिकशंभूकडे** येत जात असत. **जरठकर्ण** जती हा मूळ या मंडळींतलाच. एके दिवशीं सहज कांहीं कारणानें **कार्तिकशंभूचे** घरीं ही मंडळी जमली असतां हा जतीही तेथें आला होता. त्या वेळीं बोलतां बोलतां **दक्षिण** प्रांतांत **हिंदु** लोक **जैनांवर** फार जुलूम करितात अशा गोष्टी निघाल्या; व **जरठकर्ण** हा त्या वेळच्या प्रसिद्ध वक्त्यांत मोडत असे, त्यानें तिखटमीठ लावून त्या जुलुमाचें वर्णन केलें. तें वर्णन ऐकून **कार्तिकशंभूच्या** ह्रदयास द्रव आला, व तेव्हांपासून त्याचें लक्ष धर्मसंबंधी गोष्टींकडे वळलें. तथापि त्यानें आपल्या मनाची स्थिति त्या वेळीं बाहेर न दाखवितां, मंडळी निघून

जाऊं लागली तेंव्हां **जरठकर्णा**स एकटयासच मार्गी राहून घेतलें, व ते दोघे एकटेच राहिल्यावर, त्या दोघांचें धर्मसंबंधानें बरेंच बोलणें चालणें झालें. **कार्तिकशंभू**च्या मनाचा कल काय होता हें वर सांगितलेंच आहे. त्यामुळें त्यानें **जरठकर्णा**चें भाषण समग्र लक्षपूर्वक ऐकून आपलें सर्व लक्ष धर्माच्या उन्नतीकडेच घालवावयाचें असा निश्चय केला, व तो त्यानें तेथल्या तेथेंच **जरठकर्ण**यास सांगितला. तेंव्हापासून **जरठकर्ण** व **कार्तिकशंभु** यांची परस्पर फार सलगी जमली. पुढें कांहीं दिवसांनंतर बोलतां बोलतां **कार्तिकशंभूनें** आपण मूळ **दक्षिणे**कडचे, व आपणास लहानपणींच कोणीं तिकडून या देशांत आणून **भोगीलाल** याच्या बापाचे स्वाधीन केलें, वगैरे हकीकत त्या जतीस कळविली, व आईबापांचा शोध लावण्याकरितां काय युक्ति करावी ह्मणून विचारिलें. त्याच सुमारास **दक्षिणेंत हिंदु** व **जैन** लोकांचा कांहीं मोठा तंटा उपस्थित होऊन इकडून तिकडे कांहीं धर्मोपदेशक पाठवावयाचें ठरलें, व त्यामध्यें **जरठकर्ण** जतीचेंही नांव होतें. तेंव्हां आपोआपच योग जमून आल्यासारखा होऊन त्यानें **कार्तिकशंभूस**ही "येत असलास तर चल मजबरोबर, ह्मणजे लागल्यास तुझ्याही आईबापांचा शोध करूं" ह्मणून ह्मटलें. ती गोष्ट **कार्तिकशंभूस** आवडली, व त्यानें **जरठकर्णा**च्या सल्यानें आपले लहानपणचे कपडे दागिने वगैरे जे घरांत होते ते, व घरांत थोडे बहुत कागदपत्र होते ते, एवढेंच सामान व शिवाय कांहीं प्रवासोपयोगी सामान, एवढें ठेवून बाकीच्या सर्व सामानाची व घरादाराची व्यवस्था करून निघण्याची तयारी केली, व दोघेहीजण आणखी कांहीं जतींसहवर्तमान **दक्षिण**देशांत आले. त्यावेळीं **दक्षिणेंत हिंदु**धर्मी व **जैन**धर्मी लोकांचे तंटे **चोल**देशांत जेवढे असत तेवढे दुसरे कोठेंही नसत, ह्यामुळें ही सर्व मंडळी त्याच देशांत राहिली. नंतर त्या ठिकाणीं निरनिराळ्या गांवीं विहारांतून वगैरे उपदेश करण्यांत त्यांचा बराच वेळ गेला. पुढें जातां जातां **पुनमल्ली** शहरीं या सर्व मंडळीचें प्रयाण झालें. तेंव्हां तें ठिकाण आलीकडील जिल्ह्याच्या ठाण्याप्रमाणें असल्यामुळें त्या ठिकाणीं सर्व प्रकारचे सरकारी कारखाने असत, ह्यामुळें **जैनांचे** व **हिंदूंचे** तंटे होऊन फिर्यादी होत, त्यांचा सर्व विचार पुस्तापास्त वगैरे काय जें होणें तें सर्व या शहरांतच होत असे, ह्यामुळें **बुद्ध**धर्मसंरक्षणार्थ जे जे कांहीं उपाय करावयाचे ते सर्व ह्या शहरांत राहून करावयाचा ह्या मंडळीनें निश्चय केला. **कार्तिकशंभु गुजराथ** प्रांतांतून इकडे यावयास निघाला, त्यावेळीं त्यास लिहितां वाचतां तितपतच येत होतें ह्यामुळें, त्याच्या बरोबर जे कागदपत्र होते, त्यांतील एकही त्यास वाचतां येत नसे. परंतु इकडे आल्यावर तो लिहावयास शिकला. तो स्वभावतः बुद्धीचा तीव्र होता यामुळें, त्यानें थोडक्याच दिवसांत "**णिव्वाणलसाअण***"नामक **जैन**धर्मी ग्रंथाचें अध्ययन करण्यास आरंभ केला. ह्या ग्रंथांत अनेक **जैन**जतींचीं व महंतांचीं चरित्रें फारच रसाळ वाणीनें वर्णिलीं असून प्रत्येकाचे शेवटीं "**धम्मलक्खण**†" ह्मणून एकेक भाग जोडिला असून त्याच्या वाचनानें **जैन**धर्माविषयीं **कार्तिकशंभू**ची भक्ति फारच दृढावली, ती इतकी कीं, धर्मरक्षणाचे कामीं प्राण गेले तरी चिंता नाहीं, परंतु धर्मरक्षण करावयाचें असाच त्याच्या मनानें निश्चय केला. व तेंव्हांपासून आप-

* 'निर्वाणरसायन.' † 'धर्मलक्षण' किंवा 'धर्मरक्षण.'

त्या धर्माचा उच्छेद करण्याविषयीं झटणारे जे **हिंदु** लोक, व त्यांतून विशेषेंकरून या उच्छेदाच्या कामीं मदत करणारे सरकारी अंमलदार, यांचा नाश कसा व्हावा या विचाराकडे त्याचें लक्ष लागलें. त्यानंतर त्या प्रांतांत जेवढे ह्मणून राजसत्तोच्छेदक विचार निघाले, त्या सर्वांत **कार्तिकशंभु** हा प्रमुखपणें वागला. एक दोन वेळां तर हे विचार अंमलांत येण्याचे पूर्वींच त्यांची खबर सरकारी अंमलदारांस कळून चोंहीकडे धराधरी सुरू झाली. त्यामध्यें **कार्तिकशंभु** सांपडावयाचाच, परंतु मोठ्या शरतीनें बचावला. एका खेपेला असाच एका प्रकरणांत तो सांपडला, पण त्यावेळीं व्हावा तसा पुरावा झाला नाहीं यामुळें तो दंडावरच सुटला, व एकदा तर स्वारींनीं तीन साडेतीन वर्षेंपर्यंत तुरुंगवासांतच काढिलीं, परंतु सरते शेवटीं त्याच्या स्नेह्यांनीं खटपट करून त्यास युक्तीनें तुरुंगांतून पळवून नेलें. त्या वेळेपासून **कार्तिकशंभूनें** फारसें प्रसिद्धपणें वागण्याचें टाकून दिलें, व रस्त्यांतून फिरणें तेंही दिवसां न फिरतां रात्रींच ! याप्रमाणें त्याचा क्रम चालला होता, तरी आंतून गुप्तपणें त्याचीं कारस्थानें चालू होतींच. त्यानें "**णिव्वाणलसाअणा**"चा ग्रंथ मोठ्या आस्थेनें व लक्षपूर्वक वाचिला होता, व त्यांतील बहुतेक हृदयद्रावक भाग त्यानें तोंडपाठ केले होते, ह्यामुळें त्यास वक्तृत्वशक्ति चांगल्याच प्रकारची आली होती; व धर्माच्या कामीं झटण्याचा त्याचा उल्हास, व आपलें जीवितही खर्च करण्याचा त्याचा निश्चय, या सर्व गोष्टी एक ठिकाणीं करून विचार करितां धर्मक्रांति व तीबरोबर राज्यक्रांति ह्या दोन्हीही गोष्टी साध्य करण्याकरितां झटणाऱ्या पुरुषाचे सर्व गुण याच्या अंगीं पूर्णपणें वास करीत होते यांत संशय नाहीं. धर्मसंरक्षणाच्या कामीं अनेक खटपटी करितां करितां त्याची बहुतेक होती नव्हती ती संपत्ति खलास झाली होती, ह्यास्तव आपणाप्रमाणेंच निर्धनत्वाच्या पंथास लागलेल्या लोकांशीं संगति करून पुनरपि कोणच्याही रीतीनें आपली स्थिति सुधारावी, व धर्मोन्नतिही करावी ह्याविषयीं त्यानें आपले विचार चालू केले. त्यावेळचा **चोलदेशचा** राजा गादीवर बसला, त्याचे अगोदर तो **हिंदु** व **जैन** या उभयतांशीं सारखेंच वर्तन करी. त्यामुळें त्यावेळच्या **जैन**लोकांस आतां आपणास त्रास होणार नाहीं ह्मणून मोठी आशा लागली होती. परंतु या आशेचा परिणाम शेवटीं मृगजळाप्रमाणें होईल ही गोष्ट **कार्तिकशंभूनेंच** प्रथमतः त्यांच्या निदर्शनास आणून दिली. व ह्यासाठीं राजाविरुद्ध शस्त्र उचलणें जरूर आहे असें तो प्रतिपादनही करूं लागला. परंतु **कार्तिकशंभूचें** हें भाषण ऐकून त्याप्रमाणें वागण्यापुरतीं लोकांचीं मनें अद्यापि तयार झालीं नव्हतीं, यामुळें त्यास त्याच्याच सारखे धर्माच्या कामांत दहावीस माथेफिरू लोक शिवाय करून अधिक कोणी लोक साह्य झाले नाहींत.

ह्याप्रमाणें **कार्तिकशंभूचा** बेत फसल्यावर त्यानें **महाराष्ट्रदेश**, **तैलंगण**, **गुजराथ** इत्यादि देशांतील राजे, ज्यांस अद्यापि **हिंदु**धर्माचा अभिमान होता, त्यांजकडून कांहीं मदत मिळावी ह्मणून संधानें बांधण्यास आरंभ केला. परंतु त्या उद्योगांतही त्याला यश आलें नाहीं. यामुळें शेवटीं निराश होऊन तो दुसरा प्रचंड व्यूह रचण्याच्या घाटास लागला. हा व्यूह काय होता व याचा परिणाम पुढें कसकसा झाला हा प्रकार पुढें यथास्थळीं सांगण्यांत येईलच. तथापि हा व्यूह त्याच्या मनांत फार दिवसांपूर्वीपासूनच आला

होता, परंतु त्यावेळीं तो इतर उद्योगांत गुंतला होता, व त्या उद्योगांत आपणास यश येईल असें त्यास वाटत होतें यामुळें हा व्यूह त्यानें आपणाशिवाय दुसऱ्या कोणास कळविला नव्हता. परंतु पुढें जेव्हां इतर सर्व प्रयत्न व्यर्थ अशी त्याची खातरी झाली, तेव्हां इतःपर दुसऱ्या कोणावर अवलंबून न रहातां आपण व आपले दहा वीस सोबती यांचे हातूनच कार्यभाग साधावयाचा त्यानें विचार केला. परंतु तो व्यूह वस्तुतः फार भयंकर असल्या कारणानें त्याला एकाएकीं कोणास कळविण्याचा धीर होईना. तथापि सरतेशेषटीं विचार करकरून व एकदा आपल्या मनाचा धडा करून त्यानें हा बेत आपल्या सोबत्यांपैकीं पांच असामींस कळविला, व तोही त्यांच्याकडून विहारांतील नग्न मूर्तींच्या पायांवर हात ठेववून व दुसऱ्याही आणाशपथा घेऊन नंतर कळविला. व ज्या अर्थीं हा व्यूह तडीस गेल्याबरोबर जिकडे तिकडे राज्यांत **जैन** लोकांचा बंडावा उठणें जरूर होतें, त्याअर्थीं त्यानें इतर **जैन** लोकांशीं बोलतां बोलतां अनेक प्रसंगीं त्यांस **जैन** धर्माच्या पुनरुज्जीवनार्थ कांहीं एका प्रचंड व्यूहाची घटना चालू आहे ह्मणून सूचनाही करून पाहिल्या. परंतु या सूचनांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण तो ज्या ज्या लोकांपाशीं या गोष्टीबद्दल बोले, त्यांच्या पैकीं बहुतेक लोकांकडून, " पीडा सोसणें हाच आपला धर्म होय, व त्याबद्दल सूड घेणें हें मानुषानर्ह कृत्य आपल्या भूतदयाधर्मास विरुद्ध आहे " असाच त्यास जबाब मिळे. वस्तुतः पहातां त्या वेळीं **हिंदु** लोकांपासून **जैन** लोकांस फारच पीडा होत असे यांत संशय नाहीं; आज काय कोणा **जैन** धर्मी लोकांस दशसहस्र दीनार दंड झाला, उद्यां काय कांहीं जतींस एकदम सुळावर चढविण्यांत आलें, परवां पहावें तों कांहीं **जैनांस** जिवंतपणींच जाळिलें, अशा प्रकारच्या गोष्टी प्रत्यक्ष सर्वांच्या डोळ्यांदेखत घडत असत, व त्यायोगानें बिचाऱ्या **जैनधर्मी** लोकांस अतिशय त्रास होत असे, तथापि तेवढा पत्करूनही बहुतेक **जैन** लोक राजभक्तीपासून व आपल्या भूतदयाधर्मापासून कधींही पराङ्मुख झाले नाहींत, तेव्हां अशा लोकांच्या मनाची थोरवी किती ह्मणून वर्णन करावी? आतां **कार्तिकशंभु**, **शिलादित्य** इत्यादि माथेफिरू लोक त्यांत नव्हते असे नाहीं, तथापि अशा प्रकारच्या लोकांची संख्या फारच थोडी होती. आतां ज्या दोन गृहस्थांचीं नांवें सांगितलीं, त्यांशिवाय दोन **जैन** जतीही **कार्तिकशंभूच्या** पक्षास मिळाले होते. एकाचें नांव **जरठकर्ण** व दुसऱ्याचें **गीर्णतत्त्व**, ह्यांबद्दल सविस्तर हकीकत पुढें येईलच. **चोलमंडल**, **महाराष्ट्र**, **गुजराथ** वगैरे प्रांतांतून ज्या मोठमोठ्या ठिकाणीं **जैनांचे** विहार किंवा मठ होते, त्या सर्व ठिकाणच्या जतींस **कार्तिकशंभूचा** भयंकर बेत जरी कळला नव्हता, तथापि एकंदरींत **हिंदु** राजांपासून **जैनांस** व विशेषतः **जैन** जतींस अतिशय त्रास भोगावा लागत असे, ह्यामुळें वेळ आली असतां आपणास या जतींपासून, व त्यांच्या योगानें इतर **जैन** लोकांकडून, मदत मिळेल अशी या दोघांही जतींस उमेद होती. **कार्तिकशंभूच्या** उपदेशाचा अद्यापपर्यंत जरी कोठें अनुकूल परिणाम झालेला दृष्टीस पडला नव्हता, तथापि स्वतःबद्दल महत्त्वाकांक्षा व आत्मकार्यापेक्षिता हीं फार जबर असल्यामुळें त्यांच्या भरांत त्याचा आपणास इतर लोकांपासून मदत मिळेल एतद्विषयींचा उत्साह मंदावला नव्हता. **शिलादित्याचा** प्रकार याहून निराळा

होता. तो जात्या शूर शिपाई असून त्यास **जैन** धर्माचा अभिमान अतिशय असे, व ह्या धर्माभिमानास्तवच कापता या पक्षास मिळाला होता. याचा उद्देश कोणत्याही रीतीनें आपलें स्वतःचें कल्याण करून घ्यावें असा मुळींच नव्हता. फार तर काय, तो प्रत्यक्ष आपल्या जिवाचीही परवा बाळगीत नव्हता. परंतु तो लहान असताच त्यास कोणी एका जतीनें असें सांगितलें होतें कीं, तुझ्या हातून **जैन**धर्माचें पुनरुद्धरण होईल; व त्याच्या मनाचा स्वाभाविक कल धर्मभोळेपणाकडे होता, यामुळें त्यास त्या जतीचें भाषण खरें वाटून खरोखरीच आपण आपल्या धर्माचा जीर्णोद्धार करूं शकूं असेंच वाटत असे, व तो आपल्या जिवाची पर्वा न धरितां धर्मसंरक्षणासाठीं **कार्तिकशंभू**च्या पक्षास मिळला ह्याचें वास्तवीक बीज हेंच होतें. असो.

**भद्रमणि धर्मशाल** हा **जैन** होता हें मागें सांगितलेंच आहे. तसेंच तो श्रीमंत होता हेंही मागें आलेंच आहे. **भद्रमणि** यास आपल्या धर्माचा फार अभिमान होता, तथापि तो **कार्तिकशंभु** किंवा **शिलादित्य** यांच्या धर्माभिमानाहून फार निराळ्या प्रकारचा होता. त्यास आपल्या धर्माची दुःस्थिति पाहून अत्यंत खेद होत असे, तथापि तेवढ्यामुळें प्रत्यक्ष राजद्रोह करणें हें त्यास आवडत नसे. आतां अप्रत्यक्षतः ह्मणजे सरकारी हुकुमांविरुद्ध **जैनां**चे जतीस आश्रय देणें इत्यादि राजद्रोहाचे प्रकार त्याच्या हातून अनेक वेळ घडले होते, तथापि ज्याअर्थी या राजद्रोहांसाठीं दंडाचीच शिक्षा होत असे, त्याअर्थी तो श्रीमान असे ह्यामुळें दंड भरण्यास किमपिही डगला नव्हता. हा प्रकार पाहून **कार्तिकशंभूनें, भद्रमणीनें** आपल्या पक्षास मिळावें एतद्विषयीं, आपल्याकडून झाला तितका यत्न करून पाहिला. परंतु तो सर्व निष्फळ झाला. तथापि **कार्तिकशंभू**ची त्यास वश करून घेण्याची उमेद खचली नाहीं. हा नुसत्या उपदेशानें कांहीं वळत नाहीं अशी जेव्हां **कार्तिकशंभू**ची खातरी झाली तेव्हां त्यानें निराळ्या प्रकारचा यत्न करण्यास आरंभ केला. **भद्रमणी**ची रूपवती कन्या **त्रिवेणी** हिच्याशीं आपला विवाह व्हावा एतद्विषयीं त्याचा उद्योग सुरू झाला. त्यानें **त्रिवेणी** अम्मणास द्यावी ह्मणून स्वतः **भद्रमणीशीं** बोलून व आणखीही इतर लोकांस मध्यस्थही घालून त्याचें मन वळविण्याविषयीं पुष्कळ खटपट केली. परतु तींतही त्यास कांहीं यश आलें नाहीं. **भद्रमणी**स जेव्हां जेव्हां कोणी ह्याबद्दल उपदेश करूं लागे, तेव्हां तेव्हां त्याच्याकडून त्यास "माझ्या मुलीच्या मनांत मुळींच विवाह करावयाचा नाहीं, व तिचा हेतु जोग* घ्यावयाचा आहे, ह्याकरितां ती

---

* 'जोग' ह्म. योग किंवा संन्यास. स्त्रियांनीं संन्यास घेण्याची आपल्या देशांत पूर्वी चाल असे. '**उत्तररामचरित**' नाटकांतील **आत्रेयी** तापसी हिनें प्रत्यक्ष संन्यास घेतल्याचें जरी कोठें लिहिलेलें आढळत नाहीं, तथापि ती विद्याभ्यासाकरितां **वाल्मीकि** ऋषीचा आश्रम सोडून **अगस्त्या**श्रमास आली, त्या वेळच्या तिच्या वयाच्या मानावरून ती संन्यासिनीच असावी असें अनुमान निघतें. '**अभिज्ञानशाकुंतल**' नाटकांत खुद्द **शकुंतले**विषयीं पुढील **दुष्यंतो**क्ति आहे हें संस्कृतज्ञ वाचकांस अवगत आहेच:—

वैखानसं किमनया व्रतमाप्रदानाद्
व्यापाररोधि मदनस्य निषेवितव्यम् ?

अर्थः–हिचें दान ( अर्थात् विवाह ) होईपर्यंत मदनाच्या व्यापाराचा निरोध करणारें असें वैखानस (=संन्यास) व्रत हिनें आचरावें काय? ह्या ठिकाणीं 'आप्रदानात्' ह्म. 'विवाह होईपर्यंत' असें पद घातलें आहे, तथापि **वैखानस** व्रताचा उद्देश "मदनाच्या

**कार्तिकशंभू**स द्यावयाची नाहीं " असाच जबाब मिळे. असें असे, तथापि त्याचा **कार्तिकशंभू**वर लोभ कमी असे असा प्रकार नव्हता. उलटा इतर लोकांपेक्षां **भद्रमणि कार्तिकशंभू**वर अधिकच लोभ करीत असे, व एंकादेवेळीं त्यास द्रव्याचीही मदत पाहिजे असल्यास ती मनापासून करी, ह्यामुळें जरी आपणास **त्रिवेणी** मिळावी एतद्विषयींचा **कार्तिकशंभू**चा हेतु **भद्रमणी**नें सिद्धीस जाऊं दिला नाहीं, तथापि **कार्तिकशंभु**ही त्याच्याशीं नम्रपणानेंच वर्तन करी, व नेहमीं त्याचे घरीं येत जात असे. पुढें पुढें मात्र आपणास **त्रिवेणी** द्यावयाची नाहीं असा **भद्रमणी**चा उद्देश त्यास पूर्णपणें समजला तेव्हां त्यानें याह्यात्कारीं लग्नाबद्दलच्या गोष्टी काढणें टाकून दिलें. तथापि तीस वरण्याविषयींची त्याची इच्छा ही त्याच्या मनांत कायमच राहिली.

सांप्रत आह्मी जी कथा सांगत आहों ती सुरू व्हावयाचे पूर्वीं तीन चार दिवस **पवित्रदीर्घिके**ची जत्रा व्हावयाची झाली, त्यावेळीं **गणितत्त्वयती**नें त्या ठिकाणीं **जैन** लोकांनीं जमावें अशाविषयीं उद्योग केला, व त्यानें पुष्कळ **जैन** लोकांकडून त्या ठिकाणीं यात्रोद्देशानें जमण्याचें कबूल करून घेतलें. **भद्रमणी**स हा उद्योग पसंत पडला नाहीं. तथापि त्याच्या **जैन** मित्रांपैकीं पुष्कळ मोठमोठ्या लोकांनीं त्यास अतिशय आग्रह केल्यामुळें सरतेशेवटीं त्यानें तेथें जाण्याचें कबूल केलें. ह्या जत्रेचे कारणानें त्या ठिकाणीं अनेक बायका पुरुषांचे मेळे जमत असत, त्यासंबंधानें **गणितत्त्व** जतीनें **त्रिवेणी**सही बरोबर घेऊन यावें ह्मणून **भद्रमणी**स सुचविलें. परंतु ही गोष्ट त्यानें कबूल केली नाहीं. ते दिवस फार अडचणीचे असून **जैन**लोकांवर कोणचेवेळीं काय प्रसंग येऊन गुदरेल याचा नेम नसे, ह्यामुळें आपल्या मुलीस घरीं एकटी ठेवून जाणें त्याच्या फार जिवावर आलें, परंतु निरुपायास्तव तो त्या जत्रेच्या मेळ्याबरोबर गेला. **भद्रमणि** निघून गेल्यावर दुसऱ्या दिवशीं पहिल्या प्रकरणांत वर्णिलेला शूलारोपणाचा प्रकार घडला. हा सर्व प्रकार, व **भद्रमणि** त्या मेळ्याबरोबर निघून गेला ही गोष्ट, **कार्तिकशंभू**स पूर्णपणें अवगत होती; व जरी ही गोष्ट आपणास ठाऊक नाहीं असेंच त्याणें **हयदक्षा**स भासविलें, तरी **भद्रमणि** घरांत नाहीं ही संधि पाहूनच त्यानें **त्रिवेणी**ची गांट घ्यावयाचा निश्चय केला होता, व त्याप्रमाणें तो **भद्रमणी**च्या घरीं आला.

ह्याप्रमाणें प्रस्तुतची कथा वाचकांच्या मनांत नीटपणें भरण्याकरितां आवश्यक अशा गोष्टी संक्षेपतः निवेदन केल्या. आतां प्रकृत गोष्टीकडे वळूं. **कार्तिकशंभु** हा अंधारांत त्या वाड्याची शोभा पहाण्यांत दंग झाला होता हें मागें सांगितलेंच आहे. तो त्या विचाराच्या नादांत बराच वेळ राहिल्यानंतर **हयदक्ष** एका चाकरानिशीं परत आला, व त्यानें **कार्तिकशंभू**स आपणास आंत

व्यापाराचा निरोध " व्हावा हा होय असें स्पष्टपणें ध्वनित केलें आहे. ह्यावरून जी कन्या "मदनाच्या व्यापाराचा निरोध" करूं शकेल तिनें विवाह केलाच पाहिजे असें आपले पूर्वींचे लोक समजत नसत असें अनुमान साहजिक निघतें. सांप्रतही आपल्या लोकांत जे **गोसावी** ह्मणून लोक असतात, त्यामध्यें **गोसाविणी** ही असतात, त्या बहुशः लग्न करीत नाहींत. हा **हिंदु** लोकांतील प्रकार झाला. **जैन** किंवा **बुद्ध** लोकांतही असाच प्रकार असे. '**मालविकाग्निमित्र**' नाटकांतील '**परिव्राजिका**' ही जोगीण होती. '**मालतीमाधव**' नाटकांतील पात्रांपैकीं **कामंदकी**, **बुद्धरक्षिता**, **अवलोकिता**, **सौदामिनी**, व **कपालकुंडला**, ह्या सर्वांनीं जोग घेतले असून त्यांचे मुळींच विवाह झाले नव्हते.

**त्रिवेणीताईनीं** बोलाविलें आहे ह्मणून सांगून खंदकावर फळ्या टाकल्या. तेव्हां **कार्तिकशंभू**नें आपला घोडा त्या दुसऱ्या चाकराच्या हवालीं करून आपण **हयदक्षाचे** मागून घरांत शिरला. आंत गेल्यावर पुढील चौकाच्या बाजूच्या जिन्यानें वरच्या दिवाणखान्यांत त्यास नेऊन, व तेथून **त्रिवेणी**च्या निजावयाच्या खोलीच्या बाजूनें आंत गेल्यावर, दुसरा एक दिवाणखाना लागला तेथें **हयदक्षानें** त्यास झोंपाळ्यावर बसावयास सांगितलें. त्याप्रमाणें **कार्तिकशंभु** तेथें बसल्यावर **हयदक्ष** परत **त्रिवेणी**च्या खोलीकडे तिला कळवावयास गेला. **त्रिवेणीनें** त्यास तूं जवळच आसपास कोठें तरी मोठ्यानें हांक मारली असतां ऐकूं येईल इतक्या अंतरावर अस ह्मणून सांगून त्यास निरोप दिला, व आपण **कार्तिकशंभु** ज्या महालांत बसला होता तेथें आली. तिला पाहिल्याबरोबर **कार्तिकशंभु** उठून उभा राहिला, तेव्हां तिनें त्यास सौम्यपणानेंच परंतु सलगी न दाखवितां "आपण उठण्याची तसदी घेण्याची गरज नाहीं" ह्मणून सांगितलें, व आपण त्याजपासून दूर उभी राहिली. **कार्तिकशंभूची** व **त्रिवेणीची** ह्यापूर्वी दोन वेळ गांठ पडली होती, व त्यावेळीं ती त्याच्याशीं बरीच मन मोकळें करून बोलली होती. ह्यामुळें ती ह्यावेळीं आपणास अपरिचित मनुष्याप्रमाणें वागविते हें पाहून त्यास आश्चर्य वाटलें. तथापि आपण अशा अवेळीं आलों, तेव्हां कशाकरितां आणि काय उद्देशानें आलों, हें तिला ठाऊक नाहीं ह्मणून ती आपणाशीं अशा रीतीनें वागत असेल ह्मणून त्यानें तर्क बांधिला. कसाही प्रकार असळा तरी तिची पूर्वीपेक्षां वृत्ति फारच बदलली आहे असें त्यास वाटलें. सुमारें एक वर्षापूर्वी जेव्हां त्यानें **त्रिवेणीस** प्रथमच पाहिलें, तेव्हां तिचें वय अजमासें चौदा वर्षांचें होतें, व त्यावेळीं तिचें मुख सदा सुहास्य असून वृत्तिही उत्साहभरित व आनंदी अशीच असे. परंतु सांप्रत तिची स्थिति अगदीं निराळी झालेली दिसली. तिच्या सौंदर्यांत पूर्वीपेक्षां कांहीं उणें न होतां उलटें तें वयाच्या मानानें अधिकच मनोहर वाटत होतें, तथापि तिच्या मुखावरील तो उत्साह, तें मधुर मंद हास्य, व ती आनंदाची वृत्ति हीं सर्व नाहींशीं होऊन ती संसारापासून विरक्त व उदास झालेली त्यास दिसली. तसेंच तिच्या नेत्रांतील पूर्वीची तरतरीतपणाची ती चमक जाऊन तिच्याबद्दल यावेळीं कांहीं एक प्रकारचें शांत तेज झळकत होतें. त्या देशांतील हवेच्या कारणानें ती कृष्णवर्णच होती तथापि त्या कृष्णवर्णांत श्यामवर्णाची झांक मिसळली असल्यामुळें ती सदास्पृहणीयच वाटत होती, व ज्याप्रमणें कांतिमान् सजल मेघावली दिसावी तशी ती दिसत होती. तिचे केश लांबसडक असून ती नुकतीच थेडयावेळापूर्वी न्हाली असल्याकारणानें पाठीवर मोकळेच सोडिले होते, व त्या न्हाण्याच्या योगानें तिच्या अंगीं जो तुळतुळीतपणा आला होता तो, व तिच्या शरीराची स्वाभाविक कृष्णश्यामता, हीं एकत्र होऊन प्रत्यक्ष मेघश्याम **विष्णूनें** सर्व जगतास मोह घालण्याकरितां हें आपलें मोहनी स्वरूप तर प्रकट केलें नसेलना असा भास झाल्यावांचून रहात नसे. **कार्तिकशंभु** हा **जैन** होता, तथापि तो बाळपणापासून अनेक देश हिंडला होता व अनेक धर्मांच्या लोकांशीं त्यास बोलण्या चालण्याचे वारंवार प्रसंग येत असत, त्यामुळें त्यास ह्यावेळची **त्रिवेणीची** ती सौंदर्याची व वृत्तीची ढब पाहून, ज्या धर्माच्या लोकांचा आपण द्वेष करितों त्याच धर्मातील लोकांच्या अधिदेवतेनें आपलें

**रति**–इडापीडा टळो, अमंगळ पळो! हे महाभागा! मज मंदभागिनीकरितां सर्व त्रैलोक्याचें केवळ मंगलच असे जे आपण त्या आपले अनिष्ट मनांत देखील आपण आणूं नये!

**सख्या**–हायहाय! धिक्कार असो! या महाभागाचा संताप वाढून त्याची अत्यंत निराशा होत आहे हें फार वाईट!

**विदू०**–मित्रा! तूं जिच्याकरितां इतका संताप पावत आहेस तिची पण स्थिति कशी काय आहे कांहीं समजत नाहीं!

**मन्म०**–मित्रा! मला अत्यंत ताप होत आहे ह्यावरूनच प्रियेलाही अतिशय त्रास होत असेल असें माझें अनुमान होतें.

**रति०**–(आपणाशीं) वाहवा! या प्रकृतिकोमल[१] महाभागानें बरोबर अनुमान केलें!

**सख्या**–काय? आर्या **वशिनी** हिनें आमची प्रियसखी त्रास पावत आहे हें महाभागास कळविलें नाहीं?

(इतक्यांत वशिनी येते.)

**वशिनी**–(आपणाशीं) भगवती **सर्वार्थसाधिका** हिनें मला अशी आज्ञा केली आहे कीं, वत्स **रतीच्या** विरहामुळें कुमार **मन्मथाचें** हृदय फार दुःखित झालें आहे याकरितां **रतीचें** त्याजवर प्रेम आहे ही वार्ता त्यास सांगून त्याचें समाधान कर, त्याप्रमाणें मी कोणाच्याही दृष्टीस न पडतां कुमाराच्या महालांत तर आलें. (पुढें पाहून) हा पहा कुमार आपल्या मस्कऱ्या स्नेह्यासहवर्तमान कांहीं गोष्टी बोलत बिछान्यावर बसला आहे. अहो, या विरहव्यथेमुळें याची काय हो स्थिति झाली आहे ही!

श्लोक.

आपांडु[१] क्षाम[२] झाली तनु; नयन तसे ओढुनी तांत[३] झाले;
मातश्चंद्रापरी. हें रुचिर वदनही निष्प्रभत्वासि[४] गेलें;
चिंतेनें ग्रस्त बुद्धी; अशिशिर[५] नयनांतूनि हे अश्रु येती;
तैसे निःश्वासरूपी पवनहि बहु हे उष्णतेलागिं घेती.
रोमांचघर्मयुत कांपतसे थरारा
याची तनू; गमत शून्यचि हा पसारा;
द्वेष्यांहि[६] मानि अतिरम्यहि हा पदार्थ;
हो मूर्च्छित क्षण; सचेतनही क्षणांत.

तर आतां याच्या दृष्टीस पडावें.

(असें ह्मणून जवळ जाते.)

**विदू०**–(पाहून) मित्रा! अंमळ शुद्धीवर ये कसा पाहूं! ही पहा आर्या **वशिनी** आली.

**मन्म०**–(हर्षानें) काय? भगवतीची प्रियशिष्या **वशिनी** आली? (उठून व हात जोडून) आर्ये! तुझें स्वागत असो. अशी बैस येथें!

(सर्व बसतात, व विदूषक धोतराच्या पदरानें चित्राची फळी झांकतो.)

**वशि०**–कुमाराचें कुशल आहेना?

**मन्म०**–यावेळीं आर्येच्या दर्शनानें कुशल आहे.

**सख्या**–(वशिनीस पाहून) वाहवा वाहवा! योग्यकालीं ज्याप्रमाणें वृष्टि व्हावी, त्याप्रमाणें योग्यकालीं आर्या **वशिनी** प्राप्त झाली!

**मन्म०**–आर्ये! तुझ्या आगमनानें पांगळ्याच्या घरच्या अंगणांत ही प्रत्यक्ष गंगालहरीच चालून आली ह्मणावयाची!

**वशि०**–कुमारा! मी तुझ्या स्नेह्यांतलीच आहें, यासाठीं परक्या माणसाशीं बोलण्याचीं आदरसत्काराचीं भाषणं मजशीं बोलणें हें मला नीट वाटत नाहीं!

**मन्म०**–आर्ये! माझा मंत्री **वसंत**, यानें केले-

---

१ कोमल स्वभावाचा.

१. किंचित् पांढुरकी, फिक्ट. २. रोड. ३. त्रासलेले. ४. प्रभारहितपणास. कांतिरहिततेस. ५. थंड नव्हेत असे, उष्ण. ६ द्वेषास योग्य.

ली विज्ञाप्ति तुला मान्य झाली ?

**वशि०**—नुसती मान्य झाली एवढेंच नव्हे, तर भगवतीच्या आज्ञेवरून मीं ती पारही पाडिली. कुमारा ! यावेळीं त्या महाभाग रतीची काय स्थिति झाली आहे ह्मणून सांगूं ?

श्लोक.

केला आपण तो न वा दिनविधी तीतें नसे ठाउकें;
लागे जें करण्या, करीत भलतें कांहीं तरी ती निकें;
कांहीं तीस विचारितांचि, दुसरें जाणोनि दे उत्तर;
मागावें तिस एक, देइ दुसरें; होई सदा विस्मर[1];
घाली कंचुकि अंगिं तीहि उलटी, ठावें नसे हें तिला;
घाली आभरणें स्थलींच भलत्या नेणोनि योग्य स्थला;
झालें लीन तुझ्याच ठायिं सुभगा ! तद्बित्त[2] सारें असे;
होई ताप तिला दुरंतचि, तरी तो सर्व सोशीतसे.

आणखी,

श्लोक.

ती प्रेमें एकचित्ता श्रवण करितसे त्वन्निबद्धा[2] कथातें;
तेणें सर्वांग होई पुलकित; करूनी स्तब्धही लोचनातें
पाहे सर्वत्र; मूर्ती दिसत तव; तव प्राप्तिसौख्यीं धृताशा[3],
लावण्यैकावशेषा[4] मृदुतनु धरिते चेतना निर्विकाशा[5].

**रति**—(आपणाशीं) भगवतीस माझी दया आली, ह्यामुळें मी धन्य आहें.

**मन्म०**—या तुझ्या भाषणावरून तुझ्या सखीचें मजवर प्रेम आहे असें मला वाटतें.

**वशि०**—कुमारा! तुजवर तिचें प्रेम आहे एवढेंच नव्हे, तर तुजसाठीं तिला अत्यंत त्रासही होत आहे !

श्लोक.

वापीच्या उदकांत पाय अपुला तन्वी जईं घालिते,
लागोनी शिजण्याप्रती रटरटां तत्काळ तें आटतें;
ती दृष्टी[1] अपुल्या जईं वनलताआगूनियां पाहते,
पानें तत्क्षणिं वाजुनी तडतडां जातात तीं शुष्कते[2];
निःश्वासवायु निघतां वदनांतुनी, तो
क्रीडामहीधरशिला[3] शतधा[4] करीतो;—
संताप याजपरिचा तिस फार हो; तो
आलिंगनाविण तुझ्या वद केंवि जातो?

सख्या तिला उपचार करूं लागल्या असतां ती त्यांस ह्मणते कीं,

श्लोक.

दावाग्नीच्या अहा कां मम तनुवरती मांडितां सेचनातें ?
कां मातें ताडितां हो फिरफिरुनि तुह्मीं आजि या वज्रघातें?
ढेंयालांहीं अंग माझें सकलहि तुह्मि हें वेष्टितां कासयातें[6] ?
कैशा हो खड्गधारांवरि[7] पहुडवितां निर्दयत्वेंचि मातें[8] ?
म्यां जावें मरूनी असेंचि तुमच्या चित्ताप्रती वाटतें,
हें आतां तुमचें मनोगत पुरें मी सर्वही जाणतें!—
वांचोनी अथवा मला न करणें कांहीं; असें पापिनी;
हूं ! वाटेल तुह्मां तसें तुह्मि करा ! शंका न आणा मनीं!

**मन्म०**—हाय हाय ! धिक्कार असो ! हिला तर पराकाष्ठेचा ताप झाला आहे ! ह्या कोमलांगीचे अवयव तर शिरीषपुष्पाप्रमाणें सुकुमार आहेत, तर अशा अवयवांनीं तिला हा ताप कसा सहन होईल हें मनांत येऊन मला फार तिची चिंता वाटत आहे !

**विदू०**—मित्रा ! तूं असा चिंतातुर होऊं नको ! आणखी कांहीं ऐकावयाचें राहिलें आहे तेवढें ऐकूं या !

**वशि०**—

श्लोक.

तूं येतोस असें मनीं समजुनी सामोरि ती येतसे;
बोले "या तुह्मि! चित्त उत्सुक तुह्मां आलिंगिण्यातें असे!";

१. विस्मरण. २. तुझ्याठायीं बांधलेल्या. तुझ्याविषयींच्या. ३ आशा धरली आहे जिनें अशी. ४. सौंदर्य मात्र शेष राहिलें आहे जिचें. ५. उत्साहरहित.

१. दृष्टीनें. २. शुष्कपणाप्रत जातात, वाळतात. ३. बागांतून क्रीडेकरितां जे कृतीचे डोंगर केले असतात त्यांच्या शिला. ४. शंभर तुकडे झालेल्या. ५. सर्पांहीं ६. कशाकरितां. ७. तरवारीच्या धारेच्या अंथरुणावर. ८. पाडितां, निजवितां.

वाके पाय धुवावयास हि तुझे; देई तुला आसन;
वारा घालि तुला; तुझ्याच विरहें कीं गांजिलें तन्मन.

**विदू०**—वाहवा ! वाहवा ! असें आहे तर आमचें नशीब खचित फळफळलें !

**मन्म०**—मित्रा !

श्लोक.

तन्वी असे मजवरी अतिमात्र रक्त,
जाणोनि हर्षजलधींत निमग्न चित्त
माझें, तरी विरहताप तिला असह्य
होई ह्मणोनि खचतें मन हें मदीय.

**सख्या**—प्रियसखी ! जें ऐकावयास पाहिजे होतें तें ऐकलेंस ना ? तसेंच जें पहावयास व जाणावयास पाहिजे होतें तें पाहिलेंस आणि जाणलेंसना ? आतां तरी आपलें मन स्थिर कर कशी !

**वशिनी**—कुमारा ! तुह्मां उभयतांचें एकमेकांवर इतकें प्रेम आहे तर तुमचा थोडक्याच दिवसांत समागमयोग अवश्य घडून येईल!

**मन्म०**—आर्ये ! हा आपला आशीर्वाद मी ग्रहण करितों.

**विदू०**—( पश्चिम दिशेकडे पाहून ) मित्रा ! माझी संध्येची वेळ झाली, ह्यासाठीं मला जाऊं दे !

**मन्म०**—काय ? संध्याकाळ झाला ? ( पाहून )

श्लोक.

तिचें माझ्या ठायीं निरतिशय हें प्रेम वसतें,
ह्मणोनी हर्षाब्धीमधिं मम अहा चित्त बुडतें !
तरी तीची ऐशी विरहजनिता दारूण मनीं
दशा येता, जाई सकल मम हें धैर्य खचुनी !

**विदू०**—मित्रा ! पहा पहा ! ह्या **प्रमद**वनांतल्या लीलाकमलसरोवरांत ह्या चक्रवाकमिथुनाची पहा काय स्थिति झाली आहे ती ! अरेरे ! ही स्थिति पहावत देखील नाहीं !

**मन्म०**—खरेंच !

श्लोक.

रक्तो[1] प्रेतीची दिसते पहा ही,
संरक्त[2] झाला शशचिन्ह[4] हाही;
व्हावा गमे हा अनुरूप योग
परस्परांचा सुहितोपभोग[5].

**विदू०**—( आपणाशीं ) **मन्मथ** हा प्रकार असाच पहात बसेल तर त्याला ह्यामुळें पुनरपि विरहव्यथा मात्र उत्पन्न होईल तर आतां हें पहाणें पुरे. ! ( उघडपणें ) मित्रा ! तुझी संध्येची वेळ झाली आहे, यास्तव इतर सर्व लोक तुझी वाट पहात असतील, तर आतां चल जाऊं कसे !

**मन्म०**—आर्ये ! मला पितृप्रसूची[6] सेवा करावयाची आहे, ह्यासाठीं मला तिकडे जाण्याची आज्ञा असावी !

**वशि०**—कुमारा ! खुशाल जा ! तुझे सर्व मनोरथ परिपूर्ण होतील !

( इतकें झाल्यावर विदूषकासहवर्तमान मन्मथ जातो. )

**वशि०**—( विदूषकाच्या मांडीवरून गळून पडलेली चित्राची फळी उचलून घेऊन आपणाशीं ) धान्य पेरण्याकरितां शेत नांगरीत असतां शेतकऱ्यास द्रव्याचा हांडा सांपडावा तसा हा प्रकार झाला ! कारण कुमाराच्या मनाचें समाधान करण्याकरितां मी येथें आलें असतां मला, माझी सखी **रती**, हिलाही सावध करण्याचा उपाय आढळला ! असो. तर आतां संध्याकाळ उलटून गेली आहे ह्यासाठीं ही चित्राची फळी **मयूरिके**च्या हातून सखीकडे पाठवून देतें ह्मणजे झालें! ( निघून जाते. )

---

१. लाल, पक्षीं प्रीतियुक्त. २. पश्चिम दिशा. ३. लाल, पक्षीं अनुरक्त. ४. चंद्र. ५. हितकारक उपभोग ज्यामध्यें आहेत असा योग ( गांठ, पक्षीं विवाह ). ६. बापाची आई, आजी. भगवती परदेवता.

**रति**—(पाहून) अग बाई! पण हें काय? हा महाभाग येथें दिसत नाहीं हें काय? (आश्चर्य पावून) काय? इतक्यांत वाडाही पण दिसेनासा झाला? हें काय, सख्यांनो!

**सख्या**—प्रियसखी! दुसरें काय असणार? तुझें समाधान करण्याकरितां भगवतीनें हा आपला प्रभाव[1] दाखविला!

**रति**—(डोळ्यांत पाणी आणून) काय? तर माझें लटकेंच समाधान करण्याचा हाउपाय एकून?

(मूर्च्छा येऊन धाडकन भुईवर पडते.)

**सख्या**—(नानाप्रकारचे शीतळ उपाय करून खेदानें) अग बाई! इतका वेळ झाला, ही अजूनही सावध होत नाहीं! आतां हिला सावध होण्याला काय बरें उपाय करावा? (चिंतायुक्त होतात.)

(मयूरिका येते.)

**मयू०**—(दीर्घांत) अहो बाई! आमच्या राजकन्येचा संताप ह्याच्या योगानें दूर होईल असें सांगून आर्या वशिनीनें हें माझ्या हातांत दिलें! (चित्राची फळी देते.)

**सख्या**—चेटी! शाबास! आपल्या धनिणीची सेवा ह्मणावें तें ह्याला! (रतीस उद्देशून) प्रियसखी! अगे! तुझें खरेंच समाधान करण्याचा हा उपाय प्राप्त झाला आहे पहा!

**रति**—(सावध होऊन) सख्यांनो! कोठें कोठें आहे तो महाभाग?

**सख्या**—प्रियसखी! येथें जवळच आहे! (असें ह्मणून चित्राची फळी दाखवितात.)

**रति**—(ती घेऊन पाहून) सख्यांनो! अगे! ही तर माझीच चित्राची फळी!

**सख्या**—होय! पण हिजवर पहिल्यापेक्षांही आणखी कांहीं अधिक आहे!

**रति**—तें काय बरें? (नीटपणें पाहून आपणाशीं) माझ्यापेक्षां माझी प्रतिकृति[1]च अधिक धन्य ह्मणावयाची, कारण ती त्या महाभागाच्या हस्तस्पर्शास पात्र झाली! (उघडपणें) सख्यांनो! येथें माझेंच चित्र काढिलें आहे!

**सख्या**—तूं व त्या महाभागानें एकमेकांचें उसनें फेडून टाकिलें हें ठीक झालें!

**रति**—(उत्कंठित होऊन मन्मथाच्या चित्राकडे पहात राहते.) ह्या आनंदाच्या भरांत माझ्या नेत्रांतून अश्रु येऊन तेच मला वैऱ्याप्रमाणें झाले आहेत हें काय?

**सख्या**—(रतीचें चित्र न्याहाळून पाहून) काय हो ह्या महाभागाचें यथास्थित हावभाव चित्रांत काढण्याविषयीं कुशलत्व, कीं, आमची प्रियसखी फुलें तोडीत होती, तशीच येथें अगदीं हुबेहूब काढिली आहे!

**रति**—(चित्रांतील मन्मथास निर्देशें) तूंच नाहीं का माझें ह्रदय चोरून नेलें होतेंस? आतां मला सांपडला आहेस माझ्या हातांत!

**सख्या**—(थट्टेनें) अशानें कां होईना? पण कशी तरी प्रियसखी सुखानें राहो ह्मणजे झालें!

**रति**—(चित्राची फळी आपल्या ह्रदयाशीं धरून अतिशय आनंदभरानें स्तब्ध होऊन राहते.)

(शारिका येते.)

**शारिका**—अहो बाई! आपल्या राजकन्येला फार संताप झाला आहे, हा वृत्तांत श्रवण करून आईसाहेबांची स्वारी इकडे येत आहे!

**रति**—(ऐकून गडबडीनें आपल्या अंगावरील शीतळ उपचाराचे पदार्थ टाकून देऊन) काय? स्वतः आईच इकडे येत आहे? सख्यांनो! हें नीट नाहीं! चला आपणच तिला सामोऱ्या जाऊं.

(सर्व जणी निघून जातात.)

---

१. सामर्थ्य.

१. चित्र.

आपणास गेलें पाहिजे ! आतां येथें क्षणभरसुद्धां वेळ घालवितां उपयोगी नाहीं ! तर चलाच आतां येथून !

**यश०**—हे शूर हो ! आतां तुह्मीं जातांच तर मला एकदा शेवटची कडकडून मिठी मारा!— (सर्व एकमेकांस भेटतात.) आपला सर्वांचा उत्साह पाहून आपण आजच्या या भयंकर प्रसंगीं यशस्वी होऊन येऊं, याविषयीं बेफिकीर असा. परंतु मी सांगतों एवढी गोष्ट मात्र कोणी विसरूं नका ! आतां चोहींकडे एकच प्रळय होऊन जाईल, तथापि अशा भयंकर प्रसंगींही तुह्मीं क्षमाधर्माचें विस्मरण पडूं देऊं नका ! आज आपण हातांत शस्त्र उचललें आहे तें कांहीं संहारच करण्याकरितां नाहीं, तर न्यायाचा झेंडा उभारण्याकरितां आहे. यासाठीं या कामीं कोणाही निरपराध प्राण्याचा घात करूं नये ! आपल्या सर्व शूर शिपायांस नीट बजावून सांगा कीं आपला हेतु धर्मयुद्धाचा आहे— वास्तव केवळ संहार करण्याच्याच पाठीस लागून विनाकारण क्रूरता कोणासही दाखवूं नका ! तसेंच लहान लहान बालकें, किंवा कोणी निरपराधी मनुष्यें यांचा संहार करूं नका !

**मालो०**—महाराज ! आपली आज्ञा आह्मांस शिरसा वंद्य आहे !

**यश०**—बरें तर या आतां !

**हिंमत०**—आज्ञा ! (यशवंतरावास सलाम करून मालोजी व हिंमतराव दोघे जातात.)

**यश०**—(खिडकींतून बाहेर पाहून) अहाहा ! नगरांत तर जिकडे तिकडे सामसूम दिसतें ! मात्र वाड्यावाहेर पाहऱ्यावरील लोक कायते जागे आहेत ! हरहर ! बिचारे उद्यां आपण अमुक गोष्ट करूं, तमुक गोष्ट करूं ह्मणून मनांत विचार करीत असतील, परंतु तोंपर्यंत ते कसचे जगतात ? असो. नशीब विचाऱ्यांचें ! सामोपचारानें ते ऐकतील तर ठीक, नाहीं तर बिचारे फुकट मरतील! परंतु इलाज काय ? बरें, आतां पहिला डंका तर वाजलाच, आणि दुसरा वाजावयास कायतो अर्ध्या घटकेचाच अवकाश राहिला आहे. इतक्या वेळांतच कायतो मला निश्चय केला पाहिजे ! एकदा चोहींकडे तोडातोड सुरू झाली ह्मणजे मग मन कदाचित् भ्रमिष्ट होऊं लागेल तर तसें होतां उपयोगी नाहीं ! मला दृढ निश्चयानेंच वागलें पाहिजे ! बिचाऱ्या निरपराध प्राण्यांची कत्तल उडविली असें न होतां ज्यांस शासन योग्य त्यांसच शासन झालें पाहिजे ! असो. तर आतां येथेंच कोठें तरी छपून बसल्यासारखें राहिलें पाहिजे ! हें एक शस्त्र तर माझ्या जवळ आहेच, पण ह्याशिवाय दुसरें ही कंबरेभोंवती आहेच ! ठीक आहे ! (खिडकींतून आकाशाकडे पाहून) हे मृगांकलोचना भगवंता ! आतां मी येथें दडून रहातों आहें खरा ! परंतु मी पापाचरणाकरितां दडून रहातों आहें असें नाहीं ! तूं सर्वसाक्षी आहेस ! तुला माझ्या मनांतील गोष्टी सर्व माहितच आहेत ! काय करावें ? अरेरे ! एकादें परचक्र जर मला सामील झालें असतें, तर असा चोरट्यासारखा घाला न घालितां उघडपणें रणशिंगांच्या मेघगर्जिताप्रमाणें गंभीर ध्वनींनीं या दुष्टास जागें करून लढाईकरितां पाचारण केलें असतें, परंतु तशी गोष्ट होणें नाहींच माझ्या नशिबीं, त्याला कोणाचा इलाज ? यासाठीं

आतां चोरून या वाड्यांतच राहून, सुस्थित मनुष्याच्या पायांखालून एकदम धरणीकंप होऊन ज्याप्रमाणें धरणी फाटून जावी, व त्यांत सर्वांचा नाश व्हावा, त्याप्रमाणें चोरछापा घालून या दुष्टाचा त्याच्या दुष्कर्माबद्दल मला सूड घेतला पाहिजे ! (निघून जातो.)

## अंक ४.

### प्र० १–राजवाड्यांत माजघराशेजारची एक खोली.

(गजराबाई येते.)

**गज०**–(दुःखावेगानें आपणाशीं) देवा ! देवा ! काय ही माझी स्थिति ! मला एकीकडे आड आणि एकीकडे विहीर असें झालें आहे ! हा प्रियजन–हा राजपुत्र **यशवंतराव**–येथें आला आहे ही गोष्ट बाबांस कळवावी तरी पंचाईत, न कळवावी तरी तिकडून प्रत्यक्ष पित्याचा प्राणनाश होण्याची भीति ! हाय हाय ! आतां मी काय करूं? एवढा वेळ मी आपल्या महालांत ह्याबद्दल विचार करीत पडलें होतें, इतक्यांत मला एकदम भयंकर स्वप्न पडलें त्यामुळें तर माझी छाती धडांधडां उडूं लागली आहे, व सर्वांग घामानें निथळत आहे तें काहीं केल्या थांबत नाहीं ! माझे बाबा तर उत्सवाच्या गर्दीत अगदीं दंग झाले असून एकसारखे दारूचे वाडगे झोंकण्यांत गुंतले आहेत, त्यांना इकडे बोलावण्यास मी **बहादरशिंगास** सांगितलें आहे, परंतु अजून ते इकडे येत नाहींत! तर काय मी आतां स्त्रीजातीची लाज टाकून देऊन ते मंडळींत बसले आहेत, तेथें जाऊन त्यांशीं बोलूं ? काय करावें ? माझें मस्तक तर आतां फिरूं लागून आतां घेरी येईलसें वाटत आहे ! देवा ! देवा ! (पडूं लागते इतक्यांत भिंतीवर हात टेंकून पुनरपि सावध होते.) (इतक्यांत बहादरशिंग येतो त्यास पाहून) कायहो ! बाबा कोठें आहेत ? ते नाहींत आले! त्यांना माझा निरोप तरी पुरता कळविलात का पण? माझ्या काळजांत कसें धस्स होऊन गेलें आहे ह्मणून तुह्मीं त्यांस सांगितलेंना ? बोला ! बोला लवकर ! माझ्यानें नीट उभेंसुद्धां रहावत नाहीं ! बोला ! बोला !

**बहा०**–बोलतों ताईसाहेब !–ताईसाहेब ! मी आपला निरोप महाराजांना कळविला, परंतु ते आपल्याच नादांत आहेत ! एकदा मध्यें हूं मात्र ह्मणाले ! परंतु–

**गज०**–काय नुसतें हूंच ह्मणाले ह्मणतां ? मग कां बरें अद्यापि ते इकडे येत नाहींत ! अग आई ! माझें काळीज तर अगदीं भयानें फाटल्यासारखें होऊन गेलें आहे ! छे ! कोण तें भयंकर स्वप्न ! अजून माझ्या डोळ्यांपुढें प्रत्यक्ष दिसतें आहे ! जा ! जा ! **बहादरशिंग** ! येथें उभे राहूं नका ! त्यांना आतांच्या आतां कसें तरी येथें घेऊन या ! जर तुह्मीं न याल तर ही **गजरा** जिवंत राहत नाहीं ह्मणूनही त्यांना सांगा ! चला चला !–

**बहादर०**–जातों ताईसाहेब !–पण–

**गज०**–काय ? पण ?–हायहाय ! तर काय आतां सर्व लज्जा एकीकडे ठेवून मलाच इतक्या मंडळींत गेलें पाहिजे ? हायहाय ! परंतु उपाय नाहींच ! गेलेंच पाहिजे ! चला **बहादरशिंग** ! मीच तुमच्या बरोबर येतें ! चला ! (दोघे जातात.)

### प्र० २.–राजवाड्यांतील माजघर.

( मेजवानी चालली आहे. दौलतराव इतर मंडळीसह दारू झोंकीत बसलेला दृष्टीस पडतो. )

**दौल०**–(तारवटलेला होऊन हातांत दारूनें भरलेला वाडगा घेऊन गातो. )

**पद.**

प्यारे तुह्मीं, दारू ही मनमोहिनी. ध्रु०.
भरुनि रुप्याचे थोर वाडगे, टाका झडकरि पिउनी. १
ह्या षड्रसयुत पक्कान्नांच्या, समर्थ ही पचनीं. २.
होय इजमुळें सुख तें नाहीं, अमृताच्या सेवनीं. ३
दुःख, शोक, संतापहि यांतें, विसरवि टावें जनीं. ४
दुस्तर चिंतार्णवीं बुडाल्या, हीच एक संजीवनी. ५
राज्यासन म्यां आजि मिळविलें, शंका न आणा मनीं. ६
निजशत्रूची भीतिहि इच्या, योगें जाई पळुनी. ७
**कैलासेश्वर शंभू** तोही, मग्न हिच्या प्राशनीं. ८
त्या **शंभूची शक्ती** भार्या, आमुची उपदेशिनी.९

( गात गात सर्व मंडळीसह दारू पितो, इतक्यांत उमळून येऊन ओकतो, तथापि पुनरपि चाकराकडे पाहून ) कांरे लुच्चा ! हरामखोरा ! माझ्या तोंडाकडे पहातोस ? चल ! ओत पाहूं हा वाडगा भरून दारू ! ( चाकर दारू ओतितो, ती घेऊन पुनरपि वाडगा तोंडास लावून आणखी गाऊं लागणार इतक्यांत गजराबाई येते. )

**गज०**–( आपणाशीं ) हरहर ! ह्या उत्सवाचे प्रसंगीं बाबांनीं आपली कायही भयंकर स्थिति करून घेतली आहे ! छे ! ह्या स्थितीपेक्षां पशूची स्थितिही बरी असेल ! आणि ही स्थिति करून घ्यावयाची ती तरी कशाकारितां ? माझे प्राणप्रिय–हायहाय !–माझे प्रिय यशवंतराव–यांच्या मृत्यूची बातमी समजली आहे, तिच्या आनंदप्रदर्शनार्थ !–धिक्कार असो ! बाबांची ही स्थिति पाहून मला ओकारी येऊन येथून निघूनही जावें असें वाटूं लागत आहे ! परंतु काय करूं ? मायेचा ओढा मला परत मागें ओढितो, व माझे बाबा अगदीं बिनधास्त बसले असतां त्यांस अगोदर सावध करावें ह्मणून मला जसा काय उपदेशच करितो ! हायहाय !–असो ! इलाज नाहीं ! मला जी गोष्ट बाबांस कळवावयाची आहे, ती कळविल्यावांचून गत्यंतर नाहीं ! ( दौलतरावाकडे पाहून आपणाशीं ) हाय हाय ! अशा स्थितींत बाबा असतां ते माझें ह्मणणें कसचें ऐकून घेघेतात ! धिक्कार असो ! धिक्कार असो ! त्या स्वप्नामुळें माझ्या काळजांत तर कसें धस्स झालें आहे व ही बाबांची स्थिति पाहून आतां तर जास्तीच होतें आहे ! आतां मला कांहीं सुचत नाहीं! काय करूं ? बाबांना हाक मारावी तरी ते इतक्या मंडळींत बसले असतांना तसें करणें हें योग्य नव्हे, व तशांतून त्यांना हाक मारलीच तरी ती ते ऐकून घेण्याची मारामारच ! ह्याकारितां हाक मारण्याची गोष्ट व्यर्थ आहे! तर आतां कसें बरें करावें?–बरें, बाबा दारू पिण्यांत अगदीं मग्न झाले आहेत त्यांच्याजवळ जाऊन त्यांना शपथ घालून त्यांना तसें उठवूं काय ? होय ! होय ! असें करणें हेंच योग्य आहे !–परंतु इतक्या मंडळींत मी जर त्यांच्या जवळ गेलें तर लोक मला हंसणार नाहींत काय ? हंसतील ! परंतु आतांचा प्रसंगच तसा आहे ! ह्यावेळीं लोक हंसतील ह्मणून काळजी

करीत बसलें असतां मोठा अनर्थ होण्याचा संभव आहे! याकरितां कांहीं चिंता नाहीं! जातेंच पुढें! (पुढें जाते, व दौलतराव नवीन दारूचा वाडगा उचलून तोंडास लावणार इतक्यांत त्याचा हात धरून) बाबा! बाबा! तुमच्या पायां पडतें! आपला हा वाडगा अंमळ एका अंगास ठेवा! मला थोडें बोलावयाचें आहे, तेवढें ऐकून घ्या!

**दौल**०—(दारूच्या अंमलांत रागानें) आं, माझा वाडगा कोण एका अंगास ठेवा ह्मणतें? हा मी अस्साच पिणार! (गजराबाईनें हात धरला असतांही तसाच वाडगा उचलावयास लागतो. इतक्यांत त्यांतली सर्व दारू खालीं सांडते, त्याबरोबर त्वेषास चढून) आः! हा माझा वाडगा कोणीं सांडला? त्याचें मी डोकेंच आतां ठेंचून टाकितों कसा! (इतक्यांत गजराबाईस पाहून) ही सटवी कोण? कायगे अवदसे! माझा वाडगा सांडणार तूंच काय? थांब तुला दाखवितों याचा तमाशा कसा काय आहे तो! वाडगा सांडतेस, नाहीं?

**ग**०—बाबा! अमळ शुद्धीवर येऊन मजकडे पहा तर खरे! मला तुह्मीं ओळखलें नाहीं काय! बाबा! मी तुमची **गजरा**!

**दौल**०—(संतापानें) काय कारटे? तूंच काय? माझी पोरगी तीच तूंच? कारटे! येथें इतक्या मंडळींत कशाला आलीस? जाऊन बसावयाचें होतें कीं नाहीं आपल्या खोलींत तरफडत? चल! नीघ येथून!

**गज**०—बाबा! पण माझें ह्मणणें तरी ऐकून घ्या तेवढें! बाबा! मला आपणाबद्दल फार भय वाटतें आहे! माझें काळीज पहा कसें धडाधड उडत आहे तें!

**दौल**०—(शुद्धीवर येऊन) काय ह्मणतेस कारटे? तुझें ह्मणणें मी ऐकून घेऊं? चल! जा येथून निघून! उद्यां सकाळीं ऐकेन तुझें काय ह्मणणें असेल तें! चल! निघ!

**गज**०—बाबा! तुमच्या पायां पडतें, माझें ह्मणणें आतांचे आतां ऐका! मला उद्यांचा भरंवसा वाटत नाहीं! आपली मेजवानी अंमळशी बंद राहूं द्या!

**दौल**०—हा दुष्टे! तूं आपल्या रडण्यानें माझ्या सर्व आनंदास विरजण घालणार काय? कारटे! हें पहा! हा तुझ्या मूर्खपणाचा परिणाम! तूं येऊन माझा हात धरावयाचे अगोदर हे सर्व लोक कसे उत्सवांत व आनंदांत गढून गेले होते! पण तूं येथें आलीस मात्र, त्यांचा सर्व उत्सव मागें पडला! कारटे! धिक्कार असो तुला! येथें येऊन माझ्या व यांच्या आनंदाचा विरस करण्यापेक्षां मेली असतीस तरी त्याचें मला फारसें दुःख वाटलें नसतें! कारटे! चल! निघ! जा आपल्या खोलींत जाऊन नीज! जा!

**गज**०—बाबा! तुह्मांला माझ्या गळ्याची शपथ आहे! माझें एकवेळ ह्मणणें ऐकून घ्या ह्मणजे मग मी मेलें तरी त्याबद्दल मी काडीमात्र देखील खेद मानणार नाहीं.

**दौल**०—सत्यानास होवो तुझा! कारटे! तूं अजून आपलें ह्मणणें सोडीत नाहींस! बोल बोल! कारटे! आटप झटझट! तुझ्यामुळें ह्या मंडळीचें दारू पिणेंही बंद पडलें आहे! हं! बोल!

**गज**०—बाबा! मला भय वाटतें!

**दौल**०—काय? तुला—तुलान् भय?

**गज**०—होय! बाबा! माफ करा! माझी ह्या-

वेळीं काय स्थिति झाली आहे ती एका ईश्वराखेरीज दुसऱ्यास नाहीं समजणार ! बाबा ! मी ईश्वरसाक्ष सांगतें ! भीतीनें माझें ह्रदय एकसारखें धडधडतें आहे !

**दौल०**—मूर्ख नाहीं तर ! पोरी! तुला झालें आहे तरी काय? तुझें डोकेंबिकें तर नाहींना फिरलें ?

**गज०**—होय, कांहीं ह्मणा! पण बाबा ! माझें ह्मणणं तेवढें ऐकून घ्या !

**दौल०**—फिरून आपलेंच ! बोल ! ऐकूं दे मला काय ह्मणतेस तें ?

**गज०**—बाबा ! कृपा करून आपण येथून उठून पलीकडल्या खोलींत चला ह्मणजे मी सर्व सांगतें !

**दौल०**—**गजरे** ! आजपर्यंत मी तुला शहाणी पोरगी समजत होतों, पण आतां तुझ्यासारखी गाढव कोणी नाहीं अशी माझी खातरी झाली आहे ! पोरी ! येथें आपलीच मंडळी असली आहे, येथें दुसरें कोणी नाहीं! बोल तुला काय बोलावयाचें असेल तें !

**गज०**—नाहीं ! बाबा! तुह्मीं मजकरितां उठाच! मी कांहीं तुह्मांस फार वेळ खोळंबून धरणार नाहीं!

**दौल०**—पोरी ! तूं तर मला अगदीं भंडावून सोडलेंस ! बरें, चल हा आलों !

( दोघें निघून जातात व पडदा पडतो. )

## प्र०२—स्थल पूर्ववत्—राजवाड्यांतील माजघराजवळील एक खोली.

( दौलतराव व गजराबाई येतात. )

**दौल०**—बोल पोरी ! तुला भय कसलें वाटतें?

**गज०**—बाबा ! मला भय वाटतें आहे खरें, परंतु तें माझ्या स्वतःच्या बद्दलचें नाहीं ! मला आपणांबद्दलचें भय वाटत आहे! मला आजची रात्र कशी उजाडेल याची काळजी पडली आहे ! बाबा ! आज रात्रीं काय होईल न् काय नाहीं, याचा मला नेम सांगतां येत नाहीं, यासाठीं तुह्मीं सावधगिरीनें जपून असावें हें बरें ! आपणास आज रात्रीं खचित भय आहेसें मला वाटतें, व जरी तें भय आतां प्रत्यक्ष दिसत नाहीं, तरी आणखी कांहीं वेळानें तरी तें उघड झाल्याखेरीज रहावयाचें नाहीं !

**दौल०**—ह्मणजे ? याचा अर्थ काय ? तूं हें काय वडबडत आहेस मला कांहीं समजत नाहीं! तुला असें वाटत असेल कीं, एकदा खरी भयाची गोष्ट मला समजली तर मी डगेन ह्मणून, परंतु तूं असें समज कीं हा **दौलतराव** प्रत्यक्ष **यमधर्मा**पुढेंही दंड ठोंकून लढाईस उभा रहाण्यास डगणारा नव्हे! बोल ! तुला काय समजलें असेल तें बोल! असें अर्धें अर्धें बोलणें उपयोगीं नाहीं !

**गज०**—बाबा ! कसें झालें तरी आपण माझे जनक व मी आपली कन्या, तेव्हां मीच एकादी गोष्ट आपणास सांगावयाची ह्मणजे लहान तोंडीं मोठा घांस घेतल्यासारखा होतो ! पण तसें झालें तरी तुह्मीं माझें समग्र ह्मणणं ऐकून घ्या ! आपणावर एकादें संकट गुदरलेलें माझ्यानें पहाववणार नाहीं ह्मणून मी सांगतें! बाबा ! नुकतीच सुमारें अर्धी एक घटका झाली असेल, मी आपल्या महालांत झोंप यावी ह्मणून पलंगावर पडलें होतें, व नुकता कोठें डोळ्यास डोळा लागूं लागला, इतक्यांत मला एकाएकीं एक भयंकर स्वप्न पडलें. मला वाटलें कीं, एक स्मशान आहे, व त्यांत राखेचा एक ढिगारा पडला आहे. चोंहोंकडे सर्व ठिकाणीं शांतता पसरली आहे. अशा वेळीं त्या राखेंतून एकाएकीं जिवंत झालेली **यशवंत**-

रावाची मूर्ति बाहेर पडल्याचा मला भास झाला! ती मूर्ति बाहेर पडल्याबरोबर तिनें एक तरवार का कायसेंसें शस्त्र एकदम सरकन उसपल्यासारखें केलें! मग काय चमत्कार झाला पहा! ती मूर्ति तशीच आकाशमार्गांत उड्डाण करून गेली ती एकदम या राजवाड्यावर येऊन उभी राहिली व तिनें आज्ञा केल्याबरोबर या राजवाड्याचें कौलार एकदम दुभंग होऊन त्या वाटेनें ती मूर्ति आंत शिरली! त्या वेळची त्या मूर्तीची मुद्रा अद्यापि माझ्या नेत्रांपुढें प्रत्यक्ष दिसत आहे! नेत्र लाल रक्तासारखे झालेले व भोंवया वांकड्या असून वर चढलेल्या, अशी ती मूर्ति दांत ओंठ खातच आपण आतां माजघरांत मेजवानीला बसले होतां तेथें गेली आणि आपण अगदीं गैरसावध असतां तिनें आपली तरवार एकदम आपल्या उरांत भोंसकल्याचा मला भास झाला!—

**दौल०**—पोरी! असल्या म्हाताऱ्या बायकांसारख्या भलत्यासलत्याच गप्पा मला सांगतांन तुला लाज नाहीं वाटत? चल, जा जाऊन निज आपल्या खोलींत!

**गज०**—पण बाबा! मी तुमच्या पायां पडतें! माझें सगळें ह्मणणें ऐकून तरी घ्यावयाचें होतें—

**दौल०**—बसबस! आतां एक शब्दही मी ऐकावयाचा नाहीं! तूं मला उगीच त्रास देऊन माझें पित्त नको खवळवूं!

**गज०**—हे दयाघना परमेश्वरा! माझी करुणा आतां तुलाच आलीच पाहिजे! देवा! देवा! आतां मी काय तरी करावें तें मला तूंच सांग!

(बहादरशिंग येतो.)

**दौल०**—(त्याजकडे पाहून) कां **बहादरशिंग**? तुह्मी पण असे घाबरल्यासारखे दिसतां याचें काय कारण? कां असे संशययुक्त मुद्रेनेंसे इकडे तिकडे पहातां! या पोरीनें तुह्मांलाही पण भुरळ नाहींना पाडली?

**बहा०**—महाराज! मी आतांच बाहेरच्या देवडीवरून आलों, तों त्या ठिकाणीं मला आपला शूर हवालदार **गुमानशिंग** भेटला. तो आतां नुकताच शहरांत गस्त घालून धापा टाकीतच आला, व त्याच्या सांगण्यांत **यशवंतराव** जिवंत असल्याची गांवांत दाट बातमी आहे!

**दौल०**—ज्या दुष्टानें ही खोटी बातमी मूळ बाहेर काढिली असेल, त्याची जिव्हा झडो!—छे—ही अगदींच गप्प आहे! असें कदापि व्हावयाचें नाहीं! बरें, पण तो आणखी काय बोलला?

**बहा०**—आणखी कांहीं बोलला नाहीं, पण तो एवढें मात्र ह्मणाला खरा, कीं ही बातमी गांवांत पसरल्यामुळें लोकांत बंडावा उठेल असा रंग आहे!

**गज०**—बाबा! दया करा!—

**दौल०**—पोरी! गप्प बस! मला या बातमींतलें एकसुद्धां अक्षर खरें वाटत नाहीं!—परंतु पोरी! तूं भिऱ्यासारखी उगीच घाबरली आहेस त्याच्या योगानें मलाही कसेंसेंच होऊं लागलें आहे!—काय? मी बायकांसारखा भिऊं लागलों काय? छत्! हें असें उपयोगीं नाहीं! ही बातमीच मुद्दल खोटी हेंच खरें!

**बहा०**—सरकार! आपलें ह्मणणें कदाचित् खरें असेल, परंतु गांवांत दाट बातमी पसरली आहे, ह्या गोष्टीचा अवश्य विचार केला पाहिजे!

**दौल**०—ही बातमी मूळ काढिली कोणीं ? त्या गुलामाचा अगोदर चांगला समाचार घेतला पाहिजे ! थांब गुलामा ! हा **दौलतराव** तुझा बाप होऊन लागला आहे! तुझीं मुळेंपाळें ह्मणून काढल्याशिवाय कधींही राहणार नाहीं!—तें असो! पण **बहादरशिंग**! जा अगोदर आणि पहाऱ्यावर दुप्पट असामी उभे असूं द्या ! तसेंच तो **अमरशिंगाचा** चाकर **येसबा**—तो कोठें असेल त्याचा शोध करून त्याला मजकडे घेऊन या! त्यानें पठाणाचा वेश घेतला आहे !

( बहादरशिंग जाऊं लागतो. )

**गज**०—**बहादरशिंग**! तुह्मीं जाऊं नका!—बाबा! मीं तुमच्या पायां पडतें ! तुह्मांला माझ्या गळ्याची शपथ आहे ! जर तुह्मांस आपल्या जिवाची परवा वाटत असेल तर तुह्मीं माझें ऐका ! आपल्या खोलींत जाऊन आपल्यासभोंवतीचा पहारा हलवूं नका ! तसेंच त्या **येसबा**ला आपल्या पुढें आणूं नका !

**दौल**०—काय त्याला पुढें आणूं नको ?—मी त्याला आणणारच ! जर तो खोटें बोलला असें सिद्ध होईल, व **यशवंतराव** अद्यापि मेला नसून जिवंतच असेल, तर त्याची चांगली खोड जिरविली पाहिजे, कीं कधीं देखिली होती कीं नव्हती !

**गज**०—बाबा ! दया करा ! दया करा !

**दौल**०—काय ? दया करा ! कोणावर दया ?

**गज**०—मजवर !—आपणावर!—त्याजवर !—सर्वांवर दया करा ! तुह्मांस वाटतें आहे कीं, मला वेड लागलें आहे व मी पाहिजे तसें बडबडतें आहे ! परंतु माझें स्वप्न अगदीं खरें आहे, त्यांत काडीभरही असत्य नाहीं !

**दौल**०—**गजरे** ! तुला खचितच वेड लागलें आहे असें मला वाटतें ! चल निघ ! जा आपल्या खोलींत जाऊन स्वस्थ नीज ! खबरदार आतां आणखी जास्ती बोलून माझें पित्त खवळविशील तर ! जा त्या **येसबा**ला इकडे पाठवून दे ! तो असाच कोठें तरी असेल! चल!—कां जातेस कीं नाहीं?

**गज**०—बाबा ! मी तुमच्या पायां पडतें ! हवें तर तुह्मांपुढें नाकही घासतें, परंतु तुह्मीं **येसबा**स भेटावयाचें करूं नका ! **यशवंतराव** मेला हेंच खचित, आणि तो जिवंत आहे ही उगीच गप्प आहे ! आणि आपणास आसपास भ्यावयाचेंही कांहीं कारण नाहीं ! किंवा कदाचित् जर कांहीं असलेंच तर त्याचा **येसबा**कडे कांहीं दोष नाहीं ! तो निरपराध आहे !

**दौल**०—मूर्ख नाहीं तर ! कारटे! तूं अजूनही जात नाहींस ? त्या गचाळ स्वप्नानें तुझें माथें फिरून गेलें आहे ! चल जा जाऊन आपल्या खोलींत निज, आणि सकाळीं हा सगळा दंगा जिकडे तिकडे शांत झाल्यावर मजकडे ये !—हं ! चल ! आतां आणीक बोलशील तर संभाळ !

**गज**०—तें खरें! पण बाबा! मी कांहीं तुमच्या वाइटाची गोष्ट तुह्मांस सांगत नाहीं!तुमच्या ब—

( दौलतराव तिजवर हात उगारतो त्यामुळें थांबून )

देवा ! देवा ! माझें नशीबच फुटकें ! देवा हें मीं काय केलें ? देवा ? माझ्या बाबांचें संरक्षण कर ! निरपराध प्राण्याचें संरक्षण करणाराही तूंच आहेस ! हाय हाय ! **गजरे** ! कांहीं जरी गोष्ट झाली, तरी तुझें नशीब फुटकें तें फुटकेंच ! हाय हाय!

( रडत रडत निघून जाते. )

**दौल**०—या पोरीच्या ह्मणण्याचा मला बरोबर

यश०—(आश्चर्यानें) आं ? काय ?—

दौल०—कां ? असा थांबतोससा ?—अरे हा गोंधळला आहे खचित ! कांरे लुच्चा ! तुला आश्चर्य कसचें वाटतें ? माझें ह्मणणें तुला समजलें कीं नाहीं !

यश०—जी ! ह्माराज ! मी सरकारच्या पायाचाच नोकरन् आपनास माजा संशे आला ह्मनूनशी मला आच्चीर वाटतं इक्तंच !

दौल०—ठीक आहे ! माझें ह्मणणें नीट ऐकून घे आणि मला सांग कीं, तूं दिसतोस तसाच आहेस कां दुसरा कोणी आहेस ? खोटें बोलशील तर पहा आपला विचार कर, येथल्या येथेंच तुला देहांतशिक्षा देईन ! कधीं सोडणार नाहीं ! तूं येथें आलास आणि **यशवंतरावास** आपल्या हातानें ठार मारलें ह्मणून मला खबर सांगितलीस, परंतु आतां खरें सांग, तो **यशवंतराव** अद्यापि जिवंत नाहीं काय ?

यश०—(आश्चर्यानें) **येस्वंतराव** जिता हाये ह्मंगतां ? ह्मजी ह्येचा काय अरुथ ? **येस्वंतराव** जिता हाये ह्मंगतां ?

दौल०—गुलामा ! माझेंच ह्मणणें फिरून बोलून दाखवितोस ? बोलतोस कीं नाहीं खरें, कां आतांच्या आतां करूं ठार ! (तरवार उपसतो.)

यश०—(धैर्यानें) जी ह्माराज ! ह्यो बंदा गुलाम हजर हाये ! ह्येला खुशाल मारा ! माजं ह्मननं आपनाला खोटं वाटतया ह्मनून आपुन ह्मंगतां त्येनंच माज्या काळजाला जनुं घराच पडलाया ! काय सांगावं ह्माराज ! माजी तरवार त्ये **येस्वंतरावाच्या** बरगडीमंदी इक्की शिरली व्हती न् त्येनं परान सोडला ! इक्त्याउपर सरकारासूनी माजं ह्मननं खोटं वाटत असल, तर ही माझी छेती मी उगडी करतोन् ह्येमंदी आपली तरवार खुशाल भोक्सा ! ह्मनत्येत न्हाईं खऱ्याला कसचं मरन ?

दौल०—हें असलें भागुबाईसारखें मारणें मी कदापि करणार नाहीं ! (तरवार परत म्यानांत घालितो.) तुझ्या बोलण्याचा निकाल आतां इतक्यांतच व्हावयाचा नाहीं ! रखवालदार! माझें ह्मणणें नीट ऐकून घ्या ! हा जिकडे जाईल तिकडे तुह्मीं ह्याच्या मागोमागच असा व जर हा तुमची नजर चुकवून तुमच्या हातून निसटून जाऊं लागेल तर तेथल्या तेथेंच याचे तुकडे करा! सोडूं नका!

यश०—जी ! माजं तुमाला व्हीवं असल तसं करा, मी त्येला न्हाईं ह्मनत न्हाईं ! पन माजा आपनास योक अरज हाये, त्यो इक्ताच कीं, जर कदीकाळीं तुमाला **येस्वंतराव** जिता हाये ह्मनून समजलं, किंव्वा त्ये सतूचं त्वांड आपुन पायलं तर तुमी माजा परान घेन्याला मागंफुडं नका करूं ! मी त्येला कबूल हाये !

दौल०—ठीक आहे!—हं चला आता ह्याला बाहेर घेऊन जा ! परंतु संभाळा ! येथेंच असे बाहेरल्या अंगाला असा ! मला कदाचित् तुह्मांला हाकबोक मारावी लागेल !

पहा०—जी ! (यशवंतरावासहित निघून जातात.)

दौल०—तिकडे कोण आहे ? **बहादरशिंग** ?

(बहादरशिंग येतो.)

बहा०—जी सरकार !

दौल०—**बहादरशिंग** ! पहाऱ्याची व्यवस्था बरोबर ठेवली ?

बहा०—सरकार ! आज्ञेप्रमाणें सर्व बंदोबस्त यथास्थित ठेवला आहे !

दौल०—फार! उत्तम! बरें **बहादरशिंग**! आतांच्या आतां तुह्मीं **राजसबाईकडे** जा, आणि

तिला मजकडे घेऊन या! (बहादरशींग जातो.)

**दौल०**—(आपणाशीं) काय ? माझा शत्रु तो दुष्ट **यशवंतराव** अद्यापि जिवंत असेल काय ? छे ! ह्या गुलामा **येसबा**च्या भाषणावरून तो प्रामाणिक असावा असें मला वाटतें, तथापि माझ्या मनास स्वस्थता वाटत नाहींशी झाली आहे ! याचें काय कारण असेल तें असो ! जर हा **येसबा** लबाड ठरून **यशवंतराव** अद्यापिही जिवंत असेल, तर मग काय ? माझ्या फजितीस तर अंतच नाहीं! एवढा वेळपर्यंत माझ्यासारखा सुखी कोणी नाहीं असें मी मानीत होतों, परंतु जर **यशवंतराव** जिवंत असेल तर माझ्यासारखा दुःखी प्राणी ह्या त्रिभुवनांतही दुसरा कोणी नाहीं असेंच ह्मणणें प्राप्त आहे ! माझें आज एवढें ऐश्वर्य आहे, परंतु तें काय पाण्याच्या बुडबुड्यासारखें आहे असेंच ह्मणावें लागेल ! तो बुडबुडा केव्हां फुटेल याचा कांहीं नेम नाहीं ! इतका वेळपर्यंत मी आपणास सार्वभौमराजा असेंच मानीत होतों, परंतु हा माझा शत्रु अद्यापिहि जिवंत असेल तर हें राज्य मला कसचें पचतें? हाय हाय! काय करावें ? आज माझा जीव थाऱ्यावर नाहीं!—ही मूर्ख **राजसबाई** जर मला वश होती, व तिच्याशीं माझा विवाह होता तर मग मला ह्या **यशवंतरावा**पासून कांहीं भिण्याचें कारण न राहतें ! परंतु काय करूं ! ही मूर्ख—हिच्या मनांत अद्यापि मी सांगितलेली गोष्ट नाहीं भरत, त्यामुळें माझा कांहीं इलाज चालत नाहीं!—असो ! कांहीं चिंता नाहीं ! जी गोष्ट युक्तीनें व मनमिळवणीच्या योगानें साध्य होत नाहीं, ती गोष्ट बळजोरीनेंच साधून घेणें भाग आहे !—आजच दोन प्रहरीं मी तिच्यावर बळजोरी करण्याच्या विचारांत होतों, परंतु त्यावेळीं तिचा तो आवेश व तें वीराप्रमाणें वर्तन हीं पाहून माझा जीव दबल्यासारखाच झाला होता, परंतु आतां तसें होऊं देता उपयोगीं नाहीं ! मोक्ष कीं मोक्ष तो एकदम कळलेला बरा ! मी **बहादरशिंगास राजसबाई**कडे पाठविलें आहे त्याप्रमाणें ती आली तर ठीकच आहे, नच येईल तर स्वतः तिच्या मंदिरांत जाऊन तिच्या पातिव्रत्याचा भंगच केला पाहिजे, त्याशिवाय इलाज नाहीं ! (पडद्याकडे पाहून) कोण आहेरे तेथें ? (एक शिपाई आंत येतो त्याजकडे पाहून) मागील चौकांत आपले उपाध्येबोवा कोठें असतील त्यांना आतांचे आतां घेऊन ये ! (शिपाई सलाम करून जातो व उपाध्ये बोवास घेऊन येतो.)

**दौल०**—(उपाध्यास) कां भटजी ! तुह्मांला कशाकरितां बोलाविलें समजलांत ?

**उपा०**—सरकार ! आपण सांगितल्याशिवाय आह्मांला कशानें कळणार ? आह्मीं सर्वज्ञ थोडेच आहोंत !

**दौल०**—गप्प बसा ! फार बडबड करूं नका! मी तुह्मांस बोलाविलें आहे एवढ्याचकरितां, मी करणार आहें **राजसबाई**शीं विवाह—

**उपा०**—(आश्चर्य पावून) काय ह्मटलें महाराज? **राजसबाई**शीं विवाह !

**दौल०**—गप्प बस भटुरड्या! फार बोलूं नको! तुला सांगतों तेवढें मुकाट्यानें ऐकून घे ! माझ्या बोलण्यांत मध्यें हूं कीं चूं करितां उपयोगीं नाहीं !

**उपा०**—(कांपत कांपत हात जोडून) जसें महाराजांच्या मनांत असेल तसें ! (खालीं मान घालून बसतो.)

दौल०—हं ! आतां ठीक बोललेत ! भटजी बोवा ! माझ्या मनांत **राजसबाईशीं** आतांच्या आतां विवाह करावयाचा आहे !

उपा०—( अधिक आश्चर्यानें ) कसें ह्मटलें महाराज ? आपण आतांच्या आतां विवाह लावणार? हें होईल तरी कसें ? आज विवाहाचा मुहूर्त मुळींच नाहीं ! पाहिजे असेल तर मी आपणास पंचांग आणून दाखवीन !

दौल०—बस बस ! तुमचीं पंचांगें नेऊन घाला चुलींत ! त्यांची मला जरूर नाहीं ! मी करणार आहें प्रीतिविवाह, त्या वेळीं तुह्मीं साक्षी असा ह्मणजे झालें ! मला तुमच्या मंत्रांबिंत्रांची कांहीं जरूर नाहीं ! मी तिच्याशीं आतांचे आतां विवाह करणार !

उपा०—आपण ह्मणतां तें सर्व खरें, पण आज कुयोग आहे, व हा कुयोग मृत्यु देणारा आहे, ह्यासाठीं आपण ही गोष्ट करावयाचें मनांत देखील आणूं नये !

दौल०—गुलामा ! थेरड्या ! तुला एकदा बजावूनना सांगितलें, मी कुयोग वगैरे कांहीं जाणत नाहीं ह्मणून ! मग उगीच बडबड फारशी लावतोस ? आणखी काय ह्मणतोस ? हा कुयोग मृत्यु देणारा आहे ह्मणून ? लुच्चा थेरड्या ! हा कुयोग या—या—**दौलतरावाला** मृत्यु देणार काय ? हरामखोरा ! माझें अन्न खाऊन माझ्याच विरुद्ध भाषण करितोस, ह्यास्तव हा कुयोग तुला मृत्यु देईल एवढें मात्र खरें! समजलास! फिरून असले शब्द बोलशील तर खबरदार ! संभाळ ! गांठ माझ्याशीं आहे ! फार बोललास तर येथल्या येथंच लोळवीन!

उपा०—( मनांतल्या मनांत चरफडत ) हा दुष्टा ! आज तूं या महासाध्वी **राजसबाईची** विटंबना करावयास सिद्ध झाला आहेस, व तशांतून मजसारख्या ब्राह्मणाची अवहेलना करावयास चुकला नाहींस, तर हा कुयोग तुला बाधणार हें खचित !—मघां मी सहज समुद्राकडे पहात बसलों होतों, त्यावेळीं मला कांहीं दुश्चिन्हें जाणवलीं, तीं कांहीं खोटीं नाहींत ! ( अंमळ शांत होऊन ) असो. त्याशीं आपणास काय करावयाचें आहे ? ज्याचें कर्म तो भोगील ! आपला धर्म त्यास समजुतीच्या दोन गोष्टी सांगावयाचा तो आपण केला! आतां कांहीं झालें तरी त्याचा आपणाकडे दोष नाहीं !

दौल०—कां भटुरड्या ! मीं ह्मटलें तें नीट समजलास ?

उपा०—( हात जोडून ) महाराज ! आपलें ह्मणणं बरोबर समजलों ! आपला एकदम झालेला निश्चय पाहून आश्चर्याच्या भरांत माझ्या मतीस भ्रंश झाला यांत संशय नाहीं ! मी आपल्या मनांत फिरून गणित करून पाहिलें त्यावरून मला वाटतें कीं, आतांचा हा योग फारच चांगलाआहे, वह्यावेळीं आपण जी गोष्ट करावयाचें मनांत आणिलें आहे, ती गोष्ट आपण अवश्य करावी, ह्मणजे तिच्या योगानें आपण शांत[१] व स्वस्थ[२] व्हाल यांत संशय नाहीं !

दौल०—हां ! आतां ठीक बोललास ! आतां कसा ताळ्यावर आलास !

( राजसबाई येते. )

---

१. 'शांत' शब्द श्लेषात्मक आहे व त्याचे अर्थ 'समाधानयुक्त,' पक्षी 'मृत.' २. 'स्वस्थ' हाही शब्द श्लिष्ट आहे. ह्याचा एक तर अर्थ स्पष्टच आहे. दुसरा अर्थ 'स्वर्गस्थ.'

**ताराबाई** बोलली " ती **चंद्रा** का **सुंद्रा** कोण ती मेली दिसण्यांत उंच, सुरेख, चांगल्या स्वभावाची ह्मणून तुह्मीं ह्मणत होतां तिची आहे का आठवण ? माझी पैठणी तिनेंच चोरिली ! अशा एकका दोन, मेल्या रांडा सगळ्या शंभरच्या शंभर पण अगदीं एक जातीच्या निघाल्या !— ह्मणून **मथुरे** ! तूं आपल्या शिक्षेची गोष्ट आतां बोललीस ती बोललीस, परंतु फिरून माझ्या पुढें बोलशील तर मला आवडायचें नाहीं. "—फिरून नवऱ्याकडे पाहून ह्मणाली " कां आहे का त्या तुमच्या **सुंदराबाई**ची आठवण ? तुह्मींच ना— "

नवरा बिचारा गरीब, त्याला बायको आपणावर फारच रागावली आहेसें वाटून कशी तरी तिची समजूत घालावी, या हेतूनें तो तिला बोललाः—" खचित माझ्यापेक्षां तुझीच परीक्षा खरी ! परंतु खरोखरी—"

" मला तुमचें ' परंतु ' कांहीं ऐकावयाची जरूर नाहीं! मी ह्मटलें तेंच खरं! "—**ताराबाई** पुनरपि मजकडे वळून ह्मणालीः—" चल जा आतां, आणि त्या **जनकूला**—माझ्या बाबीला नीट संभाळ ! खबरदार त्याला रडविशील तर! माझी छकुली रडली तर त्याचा जबाब मी तुला विचारीन ! तसेंच तुला माझी **चिमा** व माझा **मन्याबा** यांना देखील संभाळलें पाहिजे. त्यांना तूं अगदीं रडवितां उपयोगी नाहीं ! समजलीस ? माझीं एकून एक मुलें कशीं अगदीं राजबिंडीं गरीब शांत आहेत, तथापि त्यांना तू दटाविलेंस तर तीं तुझें ऐकावयाचें नाहींत! या कामीं त्यांनीं आपल्या आईचा कित्ता उचलला आहे—"

**ताराबाई**चें हें भाषण चाललें असतां **संभाजीरावास** हुंदका आला, परंतु तो आपल्या बायकोच्या लक्षांत न यावा यासाठीं त्यानें खोंकण्यांत झांकून नेला. इकडे **ताराबाई**चें चऱ्हाट चालू होतेंचः—" होय समजलीस ? या कामीं त्यांनीं आपल्या आईचा कित्ता उचलला आहे ! याकरितां तुला त्यांच्या नादानादानेंच वागलें पाहिजे ! आणखी हें बघ, तुला फिरून एकवेळ बजावून सांगतें, घरांत **राजाऊ** कुळंबीण आणि तूं अशा दोघी मात्र वरच्या तिसऱ्या मजल्यावरच्या माडीवर मुलें घेऊन असत जा, परंतु **राजाऊ** किंवा दुसरें बाहेरचें कोणी माणूस यांबरोबर पोकळ रिकामटेंकड्या गोष्टी सांगत बसूं नको, कारण तसें कुळंबिणी करूं लागल्या ह्मणजे पोरांची शिक्षा बिघडते. मुलांचे आंगरखे टोप्या नेहमी धुवून स्वच्छ ठेवीत जा, आणि मुलांना घाणेरड्यासाणेरड्या पायांनीं कोठें फिरूं देत जाऊं नको. संध्याकाळचा असा चार घटिका दिवस राहिला ह्मणजे पाहिजे तर त्या परसाच्या पलीकडच्या बागेंत मुलांना घेऊन जा, परंतु त्यांना ओल्या गवतांत वगैरे कोठें धांवूं देत जाऊं नको. तसेंच मुलें कदाचित् ते पडवळांचे व भोपळीचे वेल तुडवितील किंवा आणीक कांहीं मस्ती करूं लागतील तर त्यांस ती करून देऊं नको. मुलांचे आंगरखे टोप्या, व माझ्या **चिमा**च्या परकरचोळ्या नेहमी धुवून बासनांत नीट बांधून ठेवीत जा, व मुलांचें खाणें पिणें झाल्यावर क्षणभर कोठें वाटलें तर आपलें शिवणकाम करीत बस ! माझें कोठें पातळ, जुनेर अशीं कधीं कधीं शिवावीं लागतात, तीं मी तुजकडेच देत जाईन, तीं तूं मला जेव्हांच्या तेव्हांच शिवून दिलीं पाहिजेत. आतां तुला फार सांगत बसत नाहीं, तू जर चांगली उद्योग करशील तर तुला उद्योगाला कांहीं कमी व्हावया-

चें नाहीं.—बरें, पण हें समजलीसका ?—तुला इतकें काम केलेंच पाहिजे, व तेवढ्याबद्दल जेवून खाऊन वर्षाचे दहा रुपये देईन ह्मणून मीं **हणमंतरावास** सांगितलें आहे. परंतु तूं जर चांगली निघालीस, तर तुला दोन तीन वर्षांनीं साडे दहा अकरापर्यंत पगार द्यावयासही मी कमी करावयाची नाहीं. पण काम मात्र नीट केलें पाहिजे हो ! "

नवऱ्याच्यानें बोलल्यावांचून राहवेना. त्याला आपली बया कशी कजागमावशी आहे हें ठाऊक होतें, व मी कितीही जीव लावून आपलें काम केलें तरी तिच्या ह्मणून तें पसंतीस उतरावयाचें नाहीं हें त्यास माहित होतेंच. यासाठीं तो हलक्या स्वरानेंच परंतु ठांसून बोलला:—" समजलीसना **मथुरे** ! **नीट** ह्मणजे **अगदींच नीट**! "

हें नवऱ्याचें भाषण ऐकून **ताराबाईला** राग आवरेनासा झाला. इतका वेळ जो प्रकार वर्णन झाला, तो होत असतां तिचें कथलींतून मुरंबा काढून खाणें चाललेंच होतें, व हातही मुरंब्यानें अगदीं बरबटून गेले होते, तशा हातानेंच तिनें नवऱ्यास गालगुच्चा घेतला, व ह्मणाली " कां घालालका कधीं पुन्हां बायकाबायकांच्या बोलण्यामध्यें तोंड ? " हें बोलत असतां **संभाजीरावाचा** गाल चिमट्यांत धरून तिनें तो चांगला जोरानें दोनचारदा ओढला. "कां थांबेलकीं नाहीं आतां ही जिभली? चाकरमाणसांच्या देखत करालका फिरून कधीं असा माझा उपमर्द? "—इतकें ती बोलत आहे तों तिनें आपला हात हळू वर कानापाशीं नेऊन तो उपटला. तेव्हां मात्र नवऱ्याच्यानें उगें रहावलें नाहीं. बायकोनें आपली अशी बेअब्रू केलेली पाहून त्यास अतिशय राग आला, त्याबरोबर त्यानें आपल्या बायकोच्या तोंडांत अशी एक लगाविली, कीं तीबरोबर **ताराबाई** लागलीच मागें उलथून पडली, ती कथलीवर पडून ती लवंडली, व **ताराबाईचें** नवें लुगडें सर्व बरबटून गेलें. तरी तिकडे लक्ष न देतां तिनें पडल्यापडल्याच नवऱ्याला एक दोन लाथा हाणल्या. नवऱ्यानेंही तिच्या लाथा स्वस्थपणें सहन न करितां तिच्या कंबरेवर एक लाथ बऱ्याच जोरानें हाणली. तेव्हां मात्र **ताराबाईचा** इलाज खुंटलासा होऊन तिनें ओक्साबोक्सीं रडण्यास प्रारंभ केला. रडतां रडतां मध्येंच राहून राहून "अं—अं—माझ्या—माझ्या—कंबरेवर लाथ—अं—अं—मेले—मे—मेल्यांच्या—पायांना कि—अं—अं—किडे कां नाहीं पडले? अं—अं—मा—मा—माझी कंबर—अं—अं—थांबा—मला—उठू—उठूं—द्या तर खरी—अं—अं—उठू द्या तर खरी ह्म—अं—ह्मणजे पायांना—डा—डागच देतें कीं नाहीं पहा ! " इत्यादि प्रकारची तिची वडबड चाललीच होती. तथापि नवऱ्यानें ह्मणून तिकडे बिलकूल लक्ष दिलें नाहीं. तो बिचारा कांहीं वेळपर्यंत बायको रडत आरडत असतां तिच्याकडे मुकाट्यानें पहातच राहिला. इतक्यांत पुढल्या ओटीवर कोणी गृहस्थ त्याजकडे कांहीं कामासाठीं आले, तेव्हां तो तेथून निघून गेला. नवरा निघून गेल्यावर मात्र कांहीं वेळानें **ताराबाईचें** रडणें थांबलें. इतकावेळ हा प्रकार चालू असतां मी तेथेंच उभी होतें. परंतु हा प्रकार पाहून मला ताराबाईचा अगदींच वीट आला. तिचा हा कडक स्वभाव पाहून बिचाऱ्या **संभाजीरावाचें** हें मोठें पापच आहे असें मला वाटलें. हा प्रकार माझ्यानें पहावेना ह्मणून मी एक दोन वेळ तेथून परत माजघरांत जाऊं लागलें. परंतु ही गोष्ट **ताराबाईच्या** लक्षांत

येऊन तिनें "खबरदार! रांडे! कोठें चाललीस? माझी फजिती त्या वरच्या थेरडीला सांगायला नाहींका?—थांब—थांब—ख—" इत्यादि प्रकारें बडबडून मला जाऊं दिलें नाहीं. तेव्हां माझा नाइलाज होऊन मी आपली खालीं मान घालून कोपऱ्यांत भिंतीकडे तोंड करून उभी राहिलें. त्यावेळीं माझी पाठ ताराबाईकडे झाली असून तिला तिची फजिती झालेली पाहून मी हंसतें आहे असें वाटून तिनें फिरून मला खांडगळ्या शिव्या देण्यास आरंभ केला. त्या शिव्या इतक्या कांहीं अभद्र होत्या कीं त्यांचा माझ्यानें उच्चार देखील करवत नाहीं. असो. ह्या सगळ्या शिव्या ऐकून, व झालेला प्रकार प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहून मला मी या घरांत कोठची येऊन पडलें असें झालें. दुसरीकडे कोठें पोट जळत नाहीं ह्मणून मला येथें येऊन राहणें भाग पडलें ह्मणून वाटून माझ्या मनास जें कांहीं झालें तें मला सांगतां येत नाहीं. परंतु हे विचार माझ्या मनांत घोळत असतां मला एका गोष्टीबद्दल मात्र मोठा चमत्कार वाटला. ती गोष्ट ह्मणजे हीच कीं, माझ्या बाबांचे स्नेही **हणमंतराव मोरे** त्यांचा स्वभाव चांगला ह्मणून मला माहित होतें, तेव्हां त्यांना **संभाजीरावा**च्या घरची वास्तविक ह्मटलें ह्मणजे सर्व स्थिति माहित, असें असतां त्यांनींच मला हें घर कसें पाहून दिलें, याचा मला कांहीं उमज पडेना. असो. हा सर्व प्रकार मी प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिला, त्यांत विशेष सांगण्यासारखी गोष्ट ही होती कीं, **ताराबाई**चा नवरा जोंपर्यंत परसांत उभा होता, तोंपर्यंत तिचें मोठ्यामोठ्यानें रडणें आणि अं अं उं उं चाललें होतें, परंतु तो तेथून निघून ओटीवर गेला मात्र, लागलीच दहापांच क्षणांत तिचें रडणें थांबलें. माझी आई व बाबा हीं दोघें आपल्या घरीं असतां कधीं कधीं **वाईस रास्त्यां**च्या वाड्यांत बहुरूप्यांचे व **कर्नाटका**कडील दशावताराचे खेळ होत असत, त्या वेळीं तीं सोंगें जसे हावभाव करीत असत तशाच प्रकारचे कांहीं हावभाव माझी धनीन करीत असल्याचा मला भास झाला. ह्मणजे त्या हावभावांत खऱ्याचा अंश फार कमी व सोंगाची बतावणी फार असा प्रकार मला वाटल्यावांचून राहिला नाहीं. **संभाजीराव** निघून गेल्यावर **ताराबाईनें** त्याचें नांव घेण्याचें सोडलें, व माझ्याकडे वळून मजवर तोंडसुख घेण्यास आरंभ केला. तिनें पुष्कळच बडबड केली. परंतु ती समग्र सांगत बसण्यांत अर्थ नाहीं. तिचें तात्पर्य मिळून एवढेंच होतें कीं, 'आपणावर "तिकुडचें" अतिशय प्रेम आहे, व आपणास "पुरुष" कधीं मारहाण करीत नाहींत, परंतु मी आज घरांत आलें त्याचाच हा पायगुण! मी घरांत आलें हा एक नवीन अपशकुनच झाला व त्यामुळेंच आपणाला "घरांतून" हा मार बसला!' हें ती बोलत असतां तिचा मजवर खांडगळ्या शिव्यांचा भडिमार चाललाच होता. असो. इतका सगळा प्रकार झाल्यावर ती अंमळ शांत झाली व मला माडीवर मुलांकडे जा ह्मणून सांगितलें. इतकें झाल्यावर मीं आपल्या बरोबर आणिलेलें सामान माजघरांत टेविलें होतें तें घेऊन माडीवर गेलें. तेथें **राजाऊ** कुळंबीण मला भेटली. तिनें माझी उठावयाची बसावयाची जागा मला दाखवून नंतर खालीं मुलें परसांत आहेत त्यांस पाठवून देतें असें सांगून खालीं निघून गेली. तेव्हां मी तेथें एकटीच राहिलें असतां माझ्या मनांत माझ्या स्वतःच्या स्थितीबद्दल विचार येऊं लागले.

मला पहिल्या प्रथम, **हणमंतरावाची** व **ताराबा-ईची** पहिली ओळख होती तेव्हां वास्तविक ह्मणजे त्याला ही बया कोणच्या प्रकारची आहे हें ठाऊक असावें असें असतां समजूनउमजून त्यानें मला असल्या घरीं आणून कसें टेविलें, ह्याचा मोठा चमत्कार वाटला; परंतु इतक्यांत मला असें वाटूं लागलें कीं कदाचित् या कामीं **हणमंतरावाचा** कांहीं दोष नसावा. मला ह्या वेळेपूर्वी चाकरी ह्मणजे कशी असते ह्याचा अनुभव नव्हता, ह्यामुळें धनीन ह्मणजे अमुक अशा प्रकारची असते हें कांहीं ठाऊक नव्हतें. त्यामुळें कदाचित् जितक्या ह्मणून धनिनी तितक्या सगळ्या अशाच प्रकारच्या असतील असें मला वाटूं लागलें. एकदा असेंही माझ्या मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं कीं कदाचित् **हणमंतरावाच्या** देखत **ताराबाई** असा द्वाष्टपणा दाखवित नसेल, व त्यामुळें त्याला **ताराबाई** ही चांगली सज्जन बायको आहे असेंही वाटत असेल. कसेंही असो. परंतु त्या वेळीं मी या **त्राटिकाबाईच्या** तडाक्यांत सांपडलें ह्या गोष्टीबद्दल मला फार वाईट वाटलें यांत संशय नाहीं. मी या वाईट वाटण्याच्या नादांत आहें. इतक्यांत **राजाऊ** कुळंबीण त्या धाकट्या मुलांस घेऊन आली, व "**मथुरे** ! हीं आपलीं मुलें संभाळ!" असें मला सांगून मुकाट्यानें खालीं निघून गेली. तीं मुलें मजजवळ येऊन फार वेळ झाला नाहीं तोंच त्यांचें खरें स्वरूप बाहेर पडलें, व त्यावरून त्यांच्या आईनें मला अमुक रीतीनें वाग, तमुकरीतीनें वाग, ह्मणून जो लांबलचक उपदेश केला होता त्याप्रमाणें वागतां येणें फार मुष्किलीचें काम होय अशी माझी खातरी झाली. **जनकू**, ज्याला त्याची आई मोठ्या प्रेमानें "माझी छकुली" किंवा "माझी बाबी ती" ह्मणून ह्मणत असे, त्याचें वय सारें दोनच वर्षांचें होतें. तथापि त्याच्या सारखें रागीट, तिरसट, आणि हट्टी पोर सगळ्या त्रिभुवनांतही दुसरें कोठें असेलसें मला वाटत नाहीं. त्याच्या रागीट व हेकेखोर स्वभावाविषयीं फार सांगत बसत नाहीं, तथापि येथें इतकें सांगणें अवश्य वाटतें कीं, हें पोर एकादे वेळीं अनावर होऊन मला अगदीं भंडावून सोडी. एकादे वेळीं कांहीं कारण नसतांही तो इतका रडत ओरडत सुटे कीं त्याला ताळ नाहीं तंत्र नाहीं, आणि असा रडावयास लागला ह्मणून माझ्यावर इतका अगदीं तुटून पडे व मला मारीत सुटे कीं, त्याची ती बाललीला पाहून त्याच्या अंगांत भुताचाच संचार झाला आहे असें कोणासही वाटल्यावांचून रहावयाचें नाहीं. एक दोनप्रहरचें जेवण खेरीज करून बाकी सांज सकाळचीं मुलांचीं जेवणें माडीवरच होत असत, त्यावेळीं ही "बाबी" रागावली ह्मणजे ताटलीच फेंकून दे, पळीच फेंकून दे. पाणीच सांड, भातांत मातीच घाल, असें कांहीं तरी करून माझ्या जिवाचा पण अगदीं गोंधळ करून सोडी. एकादे वेळीं या "बाबीचा" जर मी मुका घेऊन तिला कुरवाळूं लागलें, तर ती माझ्या अंगास इतकी कांहीं चिकटे, व आपली मान माझ्या मानेवरून इतकी पाठीकडे सोडल्यासारखें करी, कीं आतां या पोराची मान खालीं मोडून गळूनच पडते कीं काय असेंही कधीं कधीं मला वाटल्याशिवाय रहात नसे. अशा वेळीं त्याला जरा कोठें एकादा धमकीचा शब्द बोललें कीं, **जनकूनें** एकदम उसळी मारलीच, आणि माझ्या झिंझोट्या धरून त्या ओढण्यास आणि मला चावण्यास आरंभ केलाच! आठचार दिवसांनीं या "बाबी"नें माझें लुगडें

किंवा चोळी कांहीं तरी फाडलें नाहीं असें सहसा होत नसे. या दंग्यांत **जनकू** आपलीही अंगरखा टोपी वरचेवर उसवून फाडी, ह्यासाटीं तो अंमळ कोठें रात्रा निजला ह्मणजे मी सुईदोरा घेऊन सगळें काम सोडून त्याचीच अंगरखा टोपी शिवावयास बसें, इतक्यांत च ही "छकुली" एकदम कोणी माणगोटीवर बसल्याप्रमाणें किंचाळत उटे, व याप्रमाणें छकुली मकुली एकदा उठली ह्मणजे तीस उगें करून थोपटून निजवितां निजवितां पुरे वाट होत असे. दिवसा जागेपणीं त्याला नेहमी बहुतेक अंगावरच बाळगावें लागे, व जरा कोठें उष्टीं काढावयासाठीं किंवा दुसरें कांहीं काम करावयासाठीं त्यास अंमळ खालीं टेविलें कीं त्यानें आरडाओरड सुरू केलीच, व त्याबरोबर पोर आतां प्राणच टाकितें आहे किंवा त्याचा कोणी जीवच घेतें आहे अशी भीति पडून घरांत सर्वांची पण काय झालें ह्मणून पहाण्याची अगदीं धांदल उडून जात असे. मग अशी जेथें स्थिति, तेथें माझें चोळीलुगडें शिवावयाचें किंवा तें धुवावयाचें इत्यादि गोष्टी करावयास कितीशी फुरसत सांपडत असेल याची कल्पना कोणासही सहज करतां येण्याजोगी आहे. असो; "बाबी" बद्दल आतां आणखी कांहीं जास्ती सांगत बसत नाहीं.

**मन्याबाचें** वय सुमारें साडे तीन वर्षांचें होतें. या पोरासारखें कंटाळवाणें व त्रासदायक पोर दुसरें कोठें असेंमला वाटत नाहीं. **जनकू**प्रमाणें याचा रडारडीचा फारसा त्रास नसे तरी मला याजपासून सुख ह्मणून कधीं लागलें नाहीं. हें पोर माझ्या समोर असलें ह्मणजे नेहमी कांहींना कांहीं तरी माकडचेष्टा करी, किंवा वेडींवाकडीं तोंडेंच करून **जनकू**ला भिववून टाकी, ह्मणजे इकडे झाली माझ्या जिवाची त्रेधातिरपीट ! एकादे वेळीं तर तो चवताळून माझ्या अंगावर तुटून पडून भलत्याच ठिकाणीं हात घाली, अशा वेळीं त्याला जर अंमळ चमकावलें तर खी खी खी हंसूं लागून माझ्या अंगावर तेलच ओती किंवा राखच फेंकून देई. खांडगाळ्या शिव्या आणि "रांडे, बटकुरे" इत्यादि अभद्र शब्द तर त्याच्या तोंडांत इतके भरले होते कीं त्याची सहावी पूजिली त्याच दिवशीं ते तो शिकला असें मला वाटतें. त्याची थोरली बहीण **चिमा** तिच्या अंगीं मन्याबाचे हे सर्व गुण ओतप्रोत भरले असून शिवाय आईचा अकरताळेपणाही यथेच्छ भरला होता.

असो. एकंदरींत हा प्रकार सदोदित चालू राहून त्यापासून माझ्या जिवास किती ताप होत असेल तो मला बोलून दाखवितां येत नाहीं. परंतु हा इतका ताप सोसूनही सगळें आटपत नसे. **जनकू** जरा कोठें किंचाळला कीं **ताराबाई** मी पोरांचा जीव घेतें किंवा काय करतें हें विचारण्याकरितां प्रत्येक खेपेला स्वतः दडदड वर धांवून येई, किंवा एकादेवेळीं कांहीं कामामुळें तिच्यानें येववलें नाहीं, तर तो निरोप दुसऱ्या कोणावरोबर तरी पाटवून देई, आणि त्यावेळीं जर मी सांगितलें कीं **जनकू** मला कांहीं केल्या आवरत नाहीं, तर ती माझ्यावरच शिव्यांचा भडिमार करी, किंवा मला निरोप सांगून पाटवी कीं, 'जर तुझ्यानें "माझ्या बाबीला" नीटपणें करतां येत नाहीं, तर मला तुझी कांहीं जरूर नाहीं, तूं आतांच्या आतां निघून जा कशी !' प्रत्यक्ष ती जवळ असतां शिव्यांचा भडिमार करी त्यावेळीं "आपल्या बाबी"चा अन्याय आहे किंवा नाहीं, किंवा "आपल्या छकुली" चे गुण कसे आहेत,

ह्याबद्दलचा तिच्या मनांत विचार कधींही येत नसे, व ती एकदा शिव्या देऊं लागली ह्मणजे मग तिच्या जिभेला हाड नाहीं अशा प्रकारें ती घटका घटका एकसारखी बडबड करीत सुटे. व बोले ती तरी इतकें खोंचून बोले कीं, तिचे ते वाग्बाण मींच ह्मणून सहन केले. आणीकशी असती तर केव्हांच आपल्या धनिनीच्या तोंडांत खाडदिशीं लगावून चाकरीवर लाथ मारून निघून गेली असती. परंतु तसा प्रकार मीं केला नाहीं. असो; ताराबाईच्या शिव्यांचा व दुर्भाषणांचा मासला थोडक्यांत या स्थळीं सांगतेः—

" मथुरे! ए गाढवी! तूं त्या पोराला करतेआहेस तरी काय? तुझ्या मनांत त्याचा जीव घ्यावयाचा आहे वाटतें! काय ह्मणतेस? नाहीं, बाईसाहेब? गप्प बस! तूं महाचोर—लबाड आहेस! तूं खोटें बोलतेस! तूं त्याला कोठें तरी दुखापत केली असशील ह्मणून तो इतका ओरडतो, एरवीं तो इतका कधीं ओरडावयाचा नाहीं! मला वाटतें तूं त्याला चिमटे घेतले आहेस, किंवा त्याला मार दिला आहेस किंवा कांहीं तरी केलें आहेस! काय ह्मणतेस? बाईसाहेब! त्याचा स्वभावच तसा, त्याला मी काय करूं? खबरदार रांडे! असें फिरून बोलशील तर! माझें बाळ साखरेसारखें गोड आहे मला पक्कें ठाऊक आहे! तूंच महाचोर, लबाड, ठक आहेस! तूं खोटें बोलतेस! काय? फिरून तेंच? कां बसतेस कीं नाहीं चिप? कां देऊं कंबरेवर एक लाथ? काय ह्मणतेस? त्यानें माझें लुगडें फाडलें ह्मणून? मग? गाढवी! सटवे! मसणे! तूं त्याचा जीव घ्यावयासच निघालीस तेव्हां तो लुगडें फाडील नाहीं तर का सोडील? गाढवी! तुझे डोळे फुटले कां कुठें खाईंत गेले? दिसत नाहीं का माझी बाई कशी ओक्साबोक्सीं रडते आहे ती!—उगी माझी बाबी ती! उगी! ठलूं नको अं माझी बाबी! ललूं नको अं? मी दुसी बाई आणून देईन अं आपल्या बाबीला? ललूं नको अं?—पाहिलेंस कां ए तुला डोळे आहेत कीं नाहींत? रांडे! निर्लज्ज नाहीं तर? चल जा येथून, मला तोंड दाखवूं नको! तुझ्यानें मुलें संभाळणें होत नाहीं! मला कांहीं तुझी जरूर नाहीं! तुला लहान मुलें आवडत नाहींत हेंच खरें! आणि ह्मणूनच तूं त्यांला अशी मारितेस! हें असलें उपयोगी नाहीं! थांब हा महिना तर संपूंदे ह्मणजे तुला घरांतूनच घालवून देतें ह्मणजे सर्व ठीक होईल! मग पाहीन तुला बाहेर चाकरी कशी मिळतेन् तूं तेथें कशी निभावतेसती! कां? मथे! तूं बरीच करनकरीपणा शिकली आहेस! कां रडायला काय झालं? मी कांहीं खोटें नाहीं बोललें? असो; झालें तें झालें, आतां तरी मुलांना नीट जपत जा! अशी मस्तवाल होऊं नको! उगी माझी बाबी तूं! ललूं लको अं बाबी?—उगी! मथुरे! मला वाटतें तूं मुलांना वेतानें किंवा कशानें तरी मारतेस! एरवीं मुलें कधीं इतकीं रडायचीं नाहींत! खचित! जर पोरांचे आंगरखे काढून पाहिले तर त्यांच्या आंगावर काळे निळे वळ उठून रगत देखील बाहेर पडलेलें दिसेल! काय? गाढवी! फिरून आपलेंच! काय ह्मणतेस? मी त्यांचे आंगरखे काढून पाहूं ह्मणजे त्यांच्या अंगावर वळ नाहीं, कांहीं नाहीं ह्मणून दिसेल? गप्प बस! मला तुझें बोलणें नको! मला पक्कें ठाऊक आहे माझ्या पोराच्या आंगावर इतकाले वळ उठले आहेत, परंतु माझ्यानें ते पाहवायचे

नाहींत ह्मणून मी नाहीं आंगरखा काढून पहात! काय ? काय ह्मणतेस ? माझ्यावर हा वळेंच आळ घालतां ह्मणून ? दांडगी कोठची ! बस-गप्प ! चाकर माणसांवर बळेंच आळ घालण्याचें मला कारण ? —मथुरे ! मी तुला निक्षून सांगतें, हें असलें मला कांहीं आवडायचें नाहीं ! तूं पोरांना मारलें बिरलेलें मला नाहीं खपायचें ! तूं ह्मणशील मी कांहीं तरी बोलून उगीच तुझ्या मनाला दुःख देतें आहे ! परंतु हें अगदींच खोटें ! चाकरांना कधींच त्रास होत नाहीं न होतां उपयोगीही नाहीं ! आतां गप्प बस ! खबरदार ! उलट उत्तर देशील तर आतांच्या आतां अशीच तुला घरांतून बाहेर घालवून देईन ! "

ह्या प्रकारचें लांबलचक कंटाळवाणें चऱ्हाट वळणें झाल्यानंतर ती मोठ्या आवेशानें मानेस हिसका देऊन तशीच सपाट्यानें खोलीबाहेर पडून आपल्या मागें दारबीर कांहीं लावून न घेतां पाय आपटीतच जिन्यांतून उतरून जाई, व कधीं कधीं तर अर्ध्या जिन्यांत असतांनाच तिला पुनरपि रागाची उसळी येऊन ती भलभलत्या प्रकारानें बडबड सुरू करी व ती परसांत जाई तोंपर्यंत तशीच चाले. परसांत गेल्यावर लागलीच आपल्या पाठीमागें माजघराचें दार इतक्या जोरानें ओढून घेई कीं, त्याच्या आवाजावरून तें दार मोडून पडलें कीं काय असाच भास झाल्यावांचून रहात नसे.

असो; येथपर्यंत सांगितलेल्या प्रकारावरून ह्या घरांत मला किती प्रकारें त्रास भोगावा लागत असेल ह्याची कल्पना बहुतेक सर्वांस होण्यासारखीच आहे. तथापि अद्यापि मी आपल्या सगळ्या त्रासाचें वर्णन केलें नाहीं. " बाबी "चें वय दोन वर्षांचें झालें होतें तरी त्यास अद्यापि चालतां येऊं लागलें नव्हतें, ह्यामुळें त्याला नेहमी अंगावरच बाळगावें लागत असे. परंतु एकादे वेळीं कांहीं कामामुळें जर त्यास खालीं ठेविलें तर " बाबी " नें एकदम मुसळाएवढा घसा काढिलाच, व तसें झालें ह्मणजे मागें सांगितल्याप्रमाणें त्राटिकाबाईची स्वारी वरती येऊन आरडाओरड व शिव्यांची वृष्टि हीं झालींच. बरें, इतका त्रास सोसून मुकाट्यानें राहीन ह्मटलें तरी तेवढ्यानें बाकीचा त्रास चुकला असें कधींही होत नसे. मुलांचे अंगरखे टोप्या, मुलीचा चोळी परकर, हीं नेहमीं मलाच धुवावीं लागत, तसेंच हीं सर्व वाळलीं ह्मणजे काढून बासनांत बांधण्याचें कामही माझ्याकडेच असे. वास्तविक ह्मटलें ह्मणजे हें काम माझें आणि राजाऊ कुळंबिणीचें असें दोघींचें असे. तथापि मी आल्यापासून ती कामाची बहुतेक टाळाटाळीच करी, यामुळें काम करण्यास व बोलून घ्यावयास नेहमी पुढें मीच अशी स्थिति होत असे. "बाबी" अंमळ निजली कीं मुलांचेच कपडे शिवण्यासवरण्यांत माझा बहुतेक वेळ जाई, तितकें काम करून नंतर वेळ सांपडला तर मग माझें स्वतःचें चोळीलुगडें शिवीत बसण्याची गोष्ट! परंतु तितकेंही करून चोळीलुगडें शिवीत बसावयाचें ह्मटलें ह्मणजे रात्रीं बराच वेळ दिवा ठेवावा लागत असे. एक दोन वेळ घरचा केर काढणाऱ्या गड्यानें रात्रीं बाहेर रस्त्यांतून जात येत असतां खिडकी उघडी असून आंत दिवा जळतांना पाहिला, त्यावरून ती गोष्ट त्यानें धनिनीस कळविली, त्याबरोबर तिच्या पायाची आग मस्तकास जाऊन तिनें माझ्यावर जी शिव्यांची वृष्टि केली तिच्यायोगानें मी पुढें आठ दिवस अजारीच पडलें होतें ! तिनें मला शिव्या

दिल्या त्या इतक्या अभद्र होत्या कीं त्या मला बोलून दाखवितां येत नाहींत, परंतु एकंदरींत धनिनी आपल्या चाकरमाणसांस किती वाईट शब्दांनीं ताडन करितात, ह्याचा आणखी एक मासला माझ्यानें सांगितल्यावांचून रहावत नाहीं. हा मासला सांगत असतां मला स्त्रीजातीची सहज लज्जा कांहीं अंशीं एका अंगास ठेवावी लागते हें खरें आहे, तथापि ज्याअर्थी या माझ्या आत्मवृत्तकथनाचा उद्देश सदुपदेश करून होईल तितकें अनीतिमार्गाचें उच्चाटन करावें असा आहे, त्याअर्थी तेवढा दोष पत्करूनही मी तो मासला सांगतेंच. रात्रीं माझ्या खोलींत दिवा बराच वेळ जळत रहातो हें माझ्या धनिनीला समजलें तेव्हां तिनें मला " तूं रात्रींच्या प्रहरीं रस्त्यावरील खिडकींतून बाहेरच्या माणसांस आंत घेऊन भलभलत्या गोष्टी करितेस!! " असा विनाकारण टोला द्यावयासही सोडिलें नाहीं!!! धनिनी किंवा धनी ह्यांनीं चाकरमाणसांस अशा प्रकारें वाग्बाणांनीं ताडन केल्याचा एक परिणाम चाकरमाणसांच्या मनास दुःख होतें हा तर आहेच, परंतु ह्याहीपेक्षां वाईट असा दुसरा एक परिणाम होतो तो असा कीं, चाकर माणसांस जी गोष्ट करण्याचें माहित नसतें किंवा त्यांच्या स्वप्नांतही नसतें, ती गोष्ट त्यांस नवीन सुचवूनच दिल्यासारखी होऊन चाकरमाणसांस एकादे वेळीं तशा प्रकारची गोष्ट करावी असें वाटण्याचाही संभव आहे. असो.

संध्याकाळीं वेळ फांवल्यास परसाच्या मागच्या बागेत मी मुलांना घेऊन जात असें, व त्या वेळीं त्यांनीं भोंपळीचे वेल वगैरे तुडवूं नयेत ह्मणून मी आपणाकडून होईल तितकी खटपट करण्यास चुकत नसें, तथापि बहुधा आठवड्यांतून दोनचार वेळां तरी, **मन्याबा** व **चिमा** हीं त्या वेलांवर धडपडून पडून त्यांच्या अंगास व तोंडास वेलीचीं तुसें लागल्याशिवाय रहात नसत, व तसें झालें ह्मणजे दोघांनींही एकच हलकल्लोळ सुरू करून मला चावावें, ओरबडावें, आईकडे रडत रडत धांवत जाऊन मी त्यांना बुध्या वेलांवर ढकललें ह्मणून सांगण्यास ही चुकूं नये, व तसें झालें ह्मणजे आमच्या धनिनीनें आपलें उजळलेलें वाक्शस्त्र माझ्या अंगावर आवेशानें फेंकावें, हे प्रकार झाल्याशिवाय रहातच नसत. त्यावेळीं मी माझा कांहीं अपराध नाहीं ह्मणून पुष्कळ जरी सांगितलें तरी त्यापासून कांहीं उपयोग होत नसे, व मजवर खांडगळ्या शिव्यांचा वर्षाव होऊन " तुला एकदम घरांतून घालवून देईन " ह्मणून वारंवार धमकी मिळे. असो. हा शिव्यांचा प्रकार माझ्या संबंधानें झाला. आतां खुद्द **ताराबाई**बद्दल एक थोडकासा प्रकार सांगून नंतर हा कंटाळवाणा भाग आटोपून घेतें. तो प्रकार असा. एकादे वेळीं अतिशय रागानें लाल बेफाम होऊन गेली असतां ती अशी बडबडूं व हातवारे करूं लागे कीं, ते पाहून पहिल्या पहिल्यानें हिला आतां वेडच लागलें असें मला वाटे. हे असे हातवारे ती करीत असतां एकाएकीं तिला काय वाटत असेल तें असो, ती एकदम रडण्यास सुरुवात करून आसपास जवळ असणाऱ्या मनुष्यांस आतां हिचें सर्वस्व गेलें, व जगांत ही अगदीं दीन अनाथ एकटी पडली आहे असें वाटवी. असला प्रकार वारंवार होत असे अशी जरी गोष्ट नाहीं, तरी महिना दोन महिन्यांनीं केव्हां तरी नजरेस पडल्यावांचून रहात नसे. असो. असा प्रकार कांहीं वेळ चालू असतां ती एकदम गप्प झाल्यासारखी होई, व तिला आप-

**राज०**—(आपणाशीं) काय चमत्कार असेल तो असो! माझ्या ह्या दुःखावस्थेंत मला काय सुखप्राप्ति होणार असेल ती असो! परंतु मघांपासून माझा डावा डोळा एकसारखा लवत आहे! कांहीं केल्या रहात नाहीं! देवा! म्यां ह्यातारीनें आतां सुखप्राप्तीची आशा करणें व्यर्थ नव्हे काय? देवा! या ह्यातारीचे प्राणपति यमसदनास गेले, माझ्या सतीगमनास त्या दुष्टानें विघ्न केलें, तेव्हांच माझ्या या जगांतील सर्व सुखांचा अंत झाला नाहीं काय? देवाधिदेवा! तेव्हांपासून हा कालपर्यंत मी मंदभागिनी एकसारखी दुःखांचाच अनुभव घेत नाहीं काय? देवा! माझा प्राणाप्रमाणें प्रिय असा पुत्र तोही त्या दुष्ट **दौलतरावानें** मारेकऱ्यांकडून मारविला तेव्हां आतां माझ्या जिवास समाधान उत्पन्न होऊन मला यत्किंचित् तरी सुख होणार तें कोठून?—(अंमळ थांबून आपणाशीं) बरें, पण मघाशीं त्या **येसबानें** अद्यापि माझा पुत्र जिवंत आहे ह्मणून नाहीं का सांगितलें? --होय! होय! हे दीनजनवत्सला **वैकुंठाधिपते**! मीच चुकून भलतें बोललें ह्याची क्षमा कर! मला या जगांत आतां सुखप्राप्तीची आशा राहिली नाहीं ह्मणून मीं ह्मटलें खरें, परंतु देवा! जर **येसबानें** सांगितल्याप्रमाणें माझा पुत्र खराच जिवंत असून मला येऊन भेटणार असला, तर मात्र अशा स्थितींतही अखंडानंदाचा अनुभव मला घडेल असेंच मला वाटतें!—तर काय? आज हे मला शुभ शकुन वाटत आहेत, ह्यांवरून मला माझा प्रियपुत्र भेटणार काय? असो. काय प्रकार होणार तो समजत नाहीं. परंतु आज माझ्या जिवास जो कांहीं उल्हास वाटत आहे त्याचें मला वर्णनही करितां येत नाहीं! आज मला ह्या दुष्ट **दौलतरावानें** बोलावणें पाठविलें आहे, व वास्तविक ह्मटलें ह्मणजे मी दुष्टाचें तोंडही कदापि पहावयाची नाहीं, असें असतां माझें हृदयच माझ्या जड देहास जणों पुढें लोटीत आहे! काय असेल तें असो! **नारायणा**! माझी काळजी तूंच वहा ह्मणजे झालें! (पुढें येते.)

**दौल०**—(राजसबाईस पाहून आपणाशीं) अहाहा! ही सुंदरी आज सात वर्षेपर्यंत एकसारखी क्लेशच अनुभवित आहे तथापि तिची मूर्ति माझ्या नेत्रांस किती आनंद देत आहे कांहीं सांगतां येत नाहीं! काय करावें? ही मूर्ख **राजसबाई**—हिचीं आजपर्यंत इतकीं आर्जवें केलीं, परंतु ही मला अद्यापि वश होत नाहीं! हायहाय! हिनें तर मला अगदीं वेडच लावून सोडलें आहे. मी ह्या सर्व **कोंकणपट्टीचा** सार्वभौम राजा, मला वाटलें तर ह्या सर्व देशांतील **रंभा, मेनका, तिलोत्तमा** इत्यादिकांसही मागें टाकणाऱ्या अशा सर्व अद्भुतरूपसुंदरी स्त्रिया मी आपल्या इच्छेच्या दासीही करून ठेवण्यास समर्थ आहें, परंतु काय सागावें, तशा सर्व अद्भुतरूप सुंदरी स्त्रियाही मला या **राजसबाईपुढें** कशा अगदीं तुच्छ वाटतात! आणि ही तर माझ्या वाऱ्यासही उभी राहत नाहीं! मी आज सात वर्षेपर्यंत हिच्या पायधरण्या करीत आहें, परंतु हिनें अद्यापि माझी डाळ ह्मणून शिजूं दिली नाहीं! काय करूं? ही बऱ्या बोलानें वश होत नाहीं, तर हिच्यावर एकदम बलात्कार करावा ह्मणून वारंवार मनांत येतें, परंतु

हिच्या नुसतें मुखाकडे पाहिलें कीं, धैर्यस्तंभास एकदम धक्का बसल्यासारखा होऊन माझें पाऊल माझ्या इच्छेविरुद्धच आपो-आप मागें जातें! हा चमत्कार नव्हे काय? अरे, नुकतेंच मीं **बहादुरशिंगास** हिला मजकडे बोलावून आणण्यास सांगितलें त्यावेळीं माझी खवळलेल्या सिंहाप्रमाणें जी उद्दाम वृत्ति झाली होती, ती हिच्या **दर्शनमात्रेंकरून** एका क्षणांत कोणीकडच्या कोणीकडे नाहींशी होऊन तिच्या चरणावर पुनरपि श्वानाप्रमाणें पडून आणीक एक वेळ हिचीं आर्जवें करण्यास माझें मन धांव घेतें आहे! कांहीं इलाज नाहीं!— असो. कांहीं चिंता नाहीं, आणखी एकवेळ तिची पायधरणी करून पहातों तेवढ्यानें काम झालें तर ठीकच, नाहीं तर आतां ही शेवटली वेळ, मी तिजवर बलात्कार केल्याशिवाय कदापि रहावयाचा नाहीं हाच निश्चय आहे! (आसनावरून उठून राजसबाईकडे येतो, व तिच्या चरणावर मस्तक ठेवून) हे सुंदरी! अशी क्रूर होऊं नको! एकवेळ या—या—दीनदासावर करच कृपा! अहाहा! प्राणप्रिये! ह्यावेळीं तुझ्याविषयीं मला काय वाटतें आहे तें मला बोलूनही दाखवितां येत नाहीं!

**राज०**—(रागानें पलीकडे सरून दुसरीकडे तोंड करून उभी रहाते.)

**दौल०**—(खालीं पडल्या पडल्याच)

## पद.

सुंदरी, सुखकर तूझें ध्यान. ध्रु०

अमित कष्ट हे पावलीस जरि, रम्यचि तूं तारिजाण. १

स्मरणें तुझिया प्रफुल्ल होतें, माझें चित्त ग्लान. २

दर्शनमात्रें तटतटती मम, अंगें न राही भान. ३

येउनि सत्वरि आलिंगुनि मज, दे अधरामृतपान. ४

तव रतिसौख्यापुढें तुच्छची, स्वर्गसुखाचा मान. ५

तमांतःकरणातें माझ्या, तुंचि एक शांतिनिधान. ६

अंकावरती आरोहूनी, शोभा त्यातें आण. ७

मत्सह राज्योपभोग घेईं, न मला इच्छा आन. ८

प्रेमरसीं तव मग्न करीं मज, देईं तुं हें मजदान. ९

तूं रति, मी स्मर, योग्य परस्पर. ये! न धरीं अभिमान. १०

तव सौख्याविण राज्यहि हें मज, वाटतसे सखि रान. ११

सुंदरी! अद्यापि तूं आपला अभिमान सोडीत नाहींस अं! सुंदरी! बोल बोल! हा पहा या सार्वभौम राजाची विनवणी ऐकण्याचा शेवटचा प्रसंग आहे, तर ह्यावेळीं तूं माझा अपमान करूं नको! मी कांहीं तुझ्या वाइटाची तुला गोष्ट सांगत नाहीं, चांगल्याचीच सांगतों, यासाठीं तूं यावेळीं हा आपला अभिमान सोडच! तूं मनांत समजत असशील कीं मी तुझी थट्टाच करितों आहें, वस्तुतः माझें तुझ्यावर प्रेम नाहीं, तर तं असें समजूं नको! प्राणप्रिये! तूं जर मला प्रेमालिंगन देण्यास कबूल होशील, तर मी आपणास अत्यंत भाग्यवान् समजेन, व जोंपर्यंत ह्मणून माझें जीवमान आहे तोंपर्यंत तुझ्या प्रेमांत लवमात्रही अंतर पडूं देणार नाहीं! ही गोष्ट—हा दीपांतील **अग्निनारायण** व हा परम पवित्र ब्राह्मण—यांच्या साक्षीनें तुजला निवेदन करितों आहें!

**उषा०**—(मनांत) दुष्टा! असली पापाची गोष्ट करावयास प्रवृत्त होऊन मजसारख्या ब्राह्मणाला साक्षी करितोस काय? धिक्कार असो तुला! तूं चांडाळ आहेस!

**राज०**—(शांतपणें) **दौलतराव** ! मला फिरून फिरून तेंच तेंच चावटपणाचें भाषण बोलतां येत नाहीं ! माझा कृतनिश्चय काय आहे तो मीं तुला एकवार कळविलाच आहे, त्यांत ह्मणून फरक बिलकुल व्हावयाचा नाहीं!

**दौल०**—**राजसबाई** ! तूं बुध्यां होऊन आपल्या पायांवर धोंडा पाडून घेते आहेस, तुला वेड तर नाहीं लागलें ?

**राज०**—होय ! मला वेड लागलें आहे ! आणि ह्मणूनच माझ्या निश्चयांत अंतर व्हावयाचें नाहीं!

**दौल०**—(रागानें) दुष्टे! तूं मला विनाकारण चिथावूं नको ! माझें यावेळीं कोपावेशानें मस्तक कसें अगदीं फिरून गेलें आहे, ह्यासाठीं मुकाट्यानें बऱ्या बोलानें तूं मला वश हो, नाहीं तर पहा ह्याचा फार वाईट परिणाम होईल !

**राज०**—होईल तर होवो विचारा ! माझा ह्मणून निश्चय ढळावयाचा नाहीं! **दौलतराव**! तुला असें वाटतें काय कीं ज्या दुष्ट अधमानें माझ्या प्राणप्रिय पतीचा घात केला, त्या दुष्ट अधमाशीं विवाह करण्यास मी कबूल होईन ?

**दौल०**—**राजसबाई** ! अजून तरी वेड टाकून दे, आणि अशी मूर्खासारखी वागूं नको ! मला तुझ्या मनांतला अखेर निकाल काय तो एकदा कळूं दे !

**राज०**—असें आहे तर सांगतें ऐक ! हे गोब्राह्मणप्रतिपालका **वैकुंठाधिपते नारायणा**! तसेंच अहो माझे छायारूपानें वास करणारे प्राणपती ! मी आपला कृतनिश्चय ह्या दुष्टास बोलून दाखवितें इकडे अवधान असावें !—या दुष्ट, अधम, विश्वासघाती, पातक्याबरोबर विवाह करण्यास मी कदापि राजी व्हावयाची नाहीं, परंतु जर झालेंच तर तुह्मीं त्या विवाहमंडपांतून आपलीं पवित्र अधिष्ठानें काढून टाकून त्या ठिकाणीं यमाच्या भयंकर दूतांची योजना करा, व त्यांजकडून या दुष्ट अधम पातक्यास व मज अधम नीच पातकिनीस बांधवून नरकाच्या खाईत लोटून द्या ! आह्मां उभयतांच्या अंगास विंचू लावून आह्मांस तप्त तैलाच्या कढईत उभें करून विषानें माखलेल्या व तीक्ष्णखड्गांनीं खचित अशा चाबकांनीं एकसारखा मार द्या! तसेंच ह्या दुष्ट अशुभ लग्नाच्या सोहळ्यास आरंभ झाला कीं, लागलीच प्रचंड विद्युत्पातानें आमच्या सर्व रंगाचा बेरंग करून टाका, किंवा गृध्र, काक इत्यादि पक्ष्यांच्या चोंचींनीं आमचे नेत्र फोडून आह्मांस अंधकारांत पाडून आह्मांस अक्षय नरकवासांतच राहूं द्या ! ! !

**दौल०**—(त्वेषानें) हें असलें ढोंग मजपुढें कांहीं चालावयाचें नाहीं !—कोण आहेत रे तिकडे चाकर ?—

(चाकर आंत येतात.)

**चाक०**—काय आज्ञा आहे महाराज ?

**दौल०**—अरे पहातां काय, ओढा हिला आणि माझ्या पुढें उभी करून धरा अंतरपाट न् काय ?

(चाकर तिला धरावयास येतात.)

**राज०**—अरे बाबांनो ! मी तुमच्या पायां पडतें, माझ्या अंगास हात लावूं नका ! देवा ! **नारायणा** ! अरे, या संकटसमयीं तरी माझी लज्जा रक्षण कर ! देवा! देवा ! ह्यावेळीं जर माझा प्रियपुत्र ह्या ठिकाणीं असता तर तो खचित माझें संरक्षण करिता!

हायहाय !—देवा ! घात झाला ! देवा ! देवा ! आतां मी काय करूं ?

( यशवंतराव महादजी व सठवाजीसहित येतो. )

**यश०**—सरकारांनीं मला बोहिलं ? मला **येस**-बाला बोहिलं व्हय सरकार? सरकार! बंद्या चाकराला का होकम हाये ?

**दौल०**—गुलामा ! तुला पुढें पुढें करायला कुणीं सांगितलें ? चल निघ येथून ! मी तुला नाहीं बोलाविलें !

**राज०**—हे दयाळू उदार गृहस्था ! कृपा करून मला या संकटांतून मुक्त कर ! देव तुझें कल्याण करील !

**यश०**—अव ह्यापरतापी सरकार ! हिला लईच दुक झालया, ह्मनशी हीप दया करा !—

**दौल०**—हरामखोरा ! तुला मध्यें तोंड घालवयास कोणीं सांगितलें? खबरदार अधिक बोलशील तर ! चल येथून एकदम निघून !

**यश०**—सरकार ! पायां पडतों ! आपनाला ह्या वगनशी जनुं भडभडतया! ( गुडघे टेकून त्याच्या पायां पडतो. )

**दौल०**—गुलामा ! आग लागो तुझ्या तोंडाला ! कां जातोस कीं नाहीं येथून निघून ?

**यश०**—जातों सरकार ! पन हिला माफ करा! ह्माराज! यवडं आपुन न्हाई न्हाई नका ह्मनूं! ( दौलतरावाचा शेला धरतो. )

**दौल०**—चल निघून येथून दुष्टा ! ( त्याला मुष्टिप्रहार करितो. )

**यश०**—हं हं ! तर मरच दुष्टा ! ( उठून तरवार उपसून दौलतरावास मारण्याच्या इराद्यानें हुगारतो, इतक्यांत दौलतराव त्याच्या हातांतून ती हिसकून घेतो. )

**दौल०**—अस्सं काय ? कायरे विश्वासघातक्या ! आतां सांपडलास कीं नाहीं माझ्या तावडींत? ( चाकर यशवंतरावास मारण्याकरितां तरवारी उपसतात, त्यांस ) हां ! खबरदार ! त्याला इतक्यांतच मारावयाचें नाहीं ! माझा सूड एवढ्यानेंच थांबावयाचा नाहीं, मी याचा याहूनही अधिक सूड घेईन ! कायरे विश्वासघातक्या हरामखोरा ! बोल, तूं खरोखरी कोण आहेस ?—जारे, हा अशानें कबूल व्हावयाचा नाहीं, जा, मिच्र्यांचा तोबरा करून आणून ह्याच्या नाकास लावा, व तो लोखंडाचा चिमटा आणून त्यांत याचें अंग चिमटून धरा ह्मणजे हा आत्तां कबूल होईल !

**यश०**—अरे जारे ! दुष्टा ! वृथा वल्गना कशास करितोस ? मी तुझ्या हातांत सांपडलों आहें त्या अर्थी तूं माझे हाल हाल करून माझा जीव घेशील हें मी पक्कें ओळखून आहें, परंतु अशानें मी कदापि बधावयाचा नाहीं हें पक्कें लक्षांत ठेव ! मी तर मरणारच, परंतु मरावयाचे अगोदर तुला एक गोष्ट सांगतों ती ऐकावयाची छाती असेल तर ऐक ! दुष्टा ! मी कोण आहें तूं ओळखलें नाहींस ?—हे नीच वेषा ! मी तुला असा झुगारून देतों ! ( वेष झुगारून देतो. ) दुष्टा! कृतघ्ना ! मी कोण आहें तुला सांगतों ऐक! ज्यानें तुज दुष्टास मारण्याकरितां आपली तरवार उसपली, व जो यावेळीं मेघगर्जनेपेक्षांही प्रचंडतर वाणीनें तुझ्या अंतरात्म्याचें विदारण करीत आहे. तो हा तुझा बाप होऊन लागलेला **यशवंतराव** आहे समज !

**राज०**—धन्य आहेस ! धन्य आहेस ! देवा ! नारायणा ! तूं धन्य आहेस ! माझा बाळच येथें आला काय ?

**यश०**—आई ! हा मी तुझाच बाळ, तुला संक-

. टांतून सोडविण्याकरितांच येथें आलों आहें!

( उभयता मायलेंकरें धावून एकमेकांस कडकडून मिठी मारितात. )

**दौल०**—( चाकरांस ) अरे! पाहतां काय? यांना अगोदर निराळीं करा!

( चाकर दोघांस निराळीं करितात. )

**यश०**—( दांत ओंठ खातच ) आः दुष्टांनो! क्रूरांनो!—

**दौल०**—अरे, पाहतां काय ह्याला पकडा अगोदर! ( चाकर त्यास पकडूं पहातात. )

**यश०**—खबरदार गुलामांनो! माझ्या अंगास हात लावाल तर! गुलामांनो! तुह्मीं कुणाच्या अंगाला हात लावितां? मी तुमचा राजा आहें! चला व्हा पाठीमागें, नाहीं तर तुमची येथल्या येथें दुर्दशा करून टाकलीच समजा! तो गुलाम—हरामखोर—विश्वासघाती—निर्दय—दुष्ट बसला आहे त्याला पकडा आणि आपल्या देशास या कुलाधमाच्या जुलुमापासून मुक्त करा!

**दौल०**—अहारे भित्र्यांनो! तुह्मीं ह्याच्या शब्दमात्रानें असे भागूबाईसारखे होतां काय?—पकडा! पहातां काय—ह्याला पकडा अगोदर, नाहीं तर पहा ह्याच तरवारीनें तुह्मांस येथल्या येथंच यमपुरी दाखवितों!

( चाकर यशवंतरावास धरितात. )

**यश०**—आई! अशी घाबरी होऊं नको! तूं या वेळीं माझ्या जिवास धीर दे!

**राज०**—देवा! एकून मी खराच आपला बाळ प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पहातें आहें काय? देवा! मी धन्य आहें!— परंतु देवा! मी आपल्या बाळास अशा स्थितींत पहावें काय? ( रडूं लागते. )

**यश०**—निर्दया! क्रूरा! माझ्या दीन मातोश्रीची अशी स्थिति पाहून तुझ्या हृदयास एवढा सुद्धां दयेचा पाझर सुटत नाहीं? दुष्टा! तूं नष्ट आहेस!

**दौल०**—( हर्षानें ) अहाहा! एकून मी खरा भाग्यवान् तो आत्तां आहें! आतां राजसबाई माझ्या तडाक्यांतून कशी सुटते ती पहातों! चलारे जा हिला आंत ओढून न्या!—कां आतां मीं झालों कीं नाहीं विजयी?

**यश०**—दौलतराव! ह्यावेळीं तूं विजयी झाला आहेस ह्यांत संशय नाहीं! हा हतभाग्य राजपुत्र—तुझा शत्रु—पहा तुझ्या पायां पडतो आहे! दौलतराव! माझें पायां पडून तुजपाशीं एक मागणें आहे तेवढें देण्यास तूं नाहीं ह्मणूं नको! हा पहा मी तुझ्या पुढें दंडवत घालितों! परंतु मी आपला प्राण वांचवावा ह्मणून तुजपाशीं मागत नाहीं! हा पहा मी येथें असाच निश्चेष्ट पडून रहातों! पाहिजे तर भोंसक आतांचे आतां तरवार आणि मला ठार मार! पाहिजे असेल तर माझे तिळातिळाएवढाले तुकडे करून काकादिकांस माझा बळि दे! परंतु एक—ह्या माझ्या मातोश्रीवर—ह्या निष्कलंक साध्वीवर दया करून तिच्या पातिव्रत्याचा भंग करूं नको!

**दौल०**—असें काय? कां आतां जिरली कीं नाहीं पुरती खाज?—आतां तुझा डौल गेला कां सगळा कोणीकडे निघून?—फार चांगलें! वाहवा! वाहवा! आज मी केवढा भाग्यवान्?—माझें भाग्य इतकें मोठें होईल हें माझ्या स्वप्नींही नव्हतें!—ठीक आहे! हरामखोरा! रहा तूं असाच पडून, आणि तुझ्या आईवर मी बलात्कार करूं लागलों असतां ती ओरडली ह्मणजे मग उठून उभा रहा!

**यश०**—अहारे! भागूबाई! अधमा! हेंच का

माझ्या गळ्याची शपथ आहे—माझी आई जी हल्लीं स्वर्ग लोकांत नांदत आहे तिच्याही गळ्याची तुह्मांला शपथ आहे—तुह्मीं आपला तेवढा हुकूम परत मागें घ्या !

**दौल०**—काय ह्मणतेस ? कारटे ! तूं कोणाबद्दल माझ्याशीं बोलत आहेस ?

**गज०**—बाबा ! दुसऱ्या कोणाबद्दल बोलत नाहीं ! आपण त्या शूर उदार भाग्यहीन राजपुत्रास मृत्यूची शिक्षा केली आहे, तेवढी आपण करूं नये एवढेंच माझें तुह्मांपाशीं मागणें आहे!!

**दौल०**—पोरी ! तो तर वांचण्याची आशाच नको ! तो मरतो आहे तो न्यायानेंच मरतो आहे ! मघांशी कारटे ! तुला स्वप्न पडलें होतें, तें बहुतेक अर्धें खरें दखील ठरलें ! कारण तुझ्या सांगण्याप्रमाणें त्यानें प्रकट होऊन माझ्या काळजांत शस्त्र भोंसकण्याचाही प्रयत्न केला !

**गज०**—बाबा ! समजा ! तुह्मांवर कांहीं संकट येऊन गुदरलें असतां त्या ठिकाणीं धैर्य धरून मी आपणाबद्दल आपले प्राण द्यावयास कबूल झालें, तर ती गोष्ट तुह्मांस आवडणार नाहीं काय ? बाबा ! तुह्मीं ह्या गोष्टीचा विचार करा! जे उदार मनाचे लोक आहेत ते अमुक मनुष्य आपला शत्रु आहे एवढ्याचसाठीं त्याचा द्वेष कदापि करीत नाहींत ! बाबा ! **यशवंतरावाचा** हेतु आपला जीव घ्यावयाचा नसून आपल्या दीन मातोश्रीचा बचाव करावा एवढाच होता !

**दौल०**—कारटे ! तूं खोटें बोलतेस ! तो माझ्या बेताआड आला ह्याबद्दल त्यास देहांतशिक्षाच योग्य आहे ! कारटे, तूं निर्लज्ज कोडगी आहेस! तुला लाज नाहीं वाटत ? अग ! प्रत्यक्ष ज्या दुष्टानें तुझ्या पित्याचे प्राण घेण्यासाटीं शस्त्र हुगारलें त्याचा बचाव करावयास पहातेस तव्हां तुझ्या मनांत मीच मरावें असेंच आहे नाहीं कारटे? कारटे! चल नीघ ! फिरून मला तोंड नको दाखवूं!

(तिला लाथ मारून पलीकडे पाडतो.)

**गज०**—बाबा ! मला तुह्मीं लाथा मारा किंवा पाहिजे तें करा, परंतु माझ्या प्राणप्रिय **यशवंतरावास** क्षमा केली असें तुमच्या तोंडून वचन घेतल्याशिवाय मी ह्मणून येथून जावयाची नाहीं !

**दौल०**—काय ? काय ह्मणतेस कारटे ? तुझा प्राणप्रिय **यशवंतराव** ? कारटे ! हें तूं काय बोललीस ?

**गज०**—बाबा ! मी कांहीं खोटें नाहीं बोललें ! त्याचे मजवर तसेच अगणित उपकार आहेत ! बाबा ! बाबा ! तुह्मींच विचार करा, जर त्या उदार राजपुत्रानें मध्यें पडून त्या चोरट्यांच्या हातून माझी सुटका केली नसती तर आज या तुमच्या कन्येची काय स्थिति झाली असती! बाबा! तुमच्या पायां पडतें ! कसेंही करा ! पण तुह्मीं त्या उदार राजपुत्राचे प्राण वांचवा ! बाबा! त्यानें माझ्या प्राणापेक्षांही प्रिय अशा पातिव्रत्याचें रक्षण केलें ह्या गोष्टीची आठवण असूं द्या !

**दौल०**—कारटे ! तुझ्या तोंडाला किडे पडोत ! कारटे ! तूं किती जरी बडबडलीस, आणि माझ्यापुढें बसून रडलीस आरडलीस, तरी एकवेळ दगडाला दया येईल, परंतु ह्या **दौलतरावाला** ह्मणून दया यावयाची नाहीं, हें पक्कें समज ! कारटे ! मी त्याचा आ-

तांच्या आतां जीव घेतों, म्हणजे त्यायोगानें तुलाही तुझ्या पापांबद्दल शिक्षा केलीसें होईल! चल निघ!

**गज०**—हाय हायरे उदार राजपुत्रा! हायहाय! प्राणनाथ! मी केवढी चांडाळीण, कीं आपणाबद्दल विनाकारण भीति मनांत बाळगून मी आपण होऊन आपल्या नाशास कारण झालें! हायहाय!—हे पित्या! तूं किती निर्दय आहेस? तुला माझी आणि त्या उदार राजपुत्राची अशी स्थिति पाहून लवमात्रही दया येत नाहींना?—हायहाय! धिक्कार असो! हायहायरे उदार राजपुत्रा! आतां तुझी काय स्थिति झाली असेल? मला वाटतें त्या दुष्टांनीं तुला तापलेल्या तेलाच्या कढईंत उभें केलें असून त्या वेदनेमुळें तूं आपले प्राणच टाकीत आहेस! हायहाय! देवा! देवा! आतां माझ्या प्राणप्रियाचे प्राण वांचविण्यास काय उपाय करूं? हरहर! सर्व गोष्टी व्यर्थ! असो. देवा! तुझी मर्जी! जें होणार असेल तें होवो! मी तर आतां मरतेंच! म्हणजे मेल्यावर तरी आम्हां उभयतांची गांठ पडेल!

(रडतरडत निघून जाते.)

**दौल०**—अरेरेरे—या वेळेस देहास कसे विंचू लागलेसे मला झालें आहे! अरे! मी एवढा सार्वभौम राजा, माझ्यापुढें शत्रु थरथर कांपतात, त्या माझ्यापेक्षां, अतिशय हलकीं सलकीं कामें करून निरंतर क्लेशांतच दिवस घालविणारा असा एकादा हुजऱ्याही अधिक सुखी असेल! काय करूं? अरे! ही प्रत्यक्ष माझ्या पोटची पोरगी—हिची आई लहानपणीं वारली तेव्हांपासून मीच तिला आईचे ठिकाणीं झालों, असें असतां तीच या वेळीं माझ्या जिवास क्लेश देणारी झाली काय? धिक्कार असो! धिक्कार असो! हरहर! मी व्यर्थ या राजसुखाला भुललों! आज सर्व राज्यांत माझा दरारा! सर्व लोक जसे कांहीं माझ्या आज्ञेंत! असें असतां आज ह्या वेळीं माझ्या जिवास शांति व समाधान देणारा एकही प्राणी नाहीं अं!—हायहाय!

(बहादरशिंग येतो.)

**दौल०**—कां बहादरशिंग, तुम्हांला मालोजी भेटला? कां तोही फिरला? माझें दैवच आज फिरलेंसें मला वाटत आहे! काय करूं?—

**बहा०**—महाराज! मालोजी घरांत कोठेंही नाहीं! महाराज! तो पळून गेला!

**दौल०**—(आश्चर्यानें) काय? मालोजी पळून गेला? एकूण माझी मनोदेवता कांहीं खोटी नाहीं!

**बहा०**—होय महाराज! मला आज कांहीं तरी दगा होईल असें खचित वाटतें! कारण नुकता एक घटकेच्या पूर्वीं मालोजी बाजूच्या दरवाज्यानें बाहेर पडला, व त्या वेळीं त्याच्या बरोबर कोणी एक अनोळखी मनुष्य होता, आणि दोघे वाड्यांतून बाहेर पडले त्या वेळीं मालोजीला 'दुष्टा! निर्दया! हीच तुझी आमची शेवटली भेट!' असें हळूच बोलतांना एका पहारेकऱ्यानें ऐकिलें!

**दौल०**—(रागानें) गुलामा! लुच्चा! तूं खोटें बोलतोस!

**बहा०**—(हात जोडून) हा बंदा गुलाम सरकार!—

**दौल०**—(त्वेषानें) काय बडबडतोस रे गुलामा? हरामखोरा! सरकार गुलाम काय रे?

**बहा०**—सरकार! शांत व्हावें, मी आपला बंदा गुलाम आहें! मी चरणापाशीं खोटी

विनंती नाहीं करीत! सरकार! पाहिजे असेल तर त्या पहारेकऱ्याला आणून विचारावें! **मालोजी** खरोखरीच बोलला "दुष्टा! निर्दया! हीच तुझी—"

**दौल०**—मूर्खा! त्या दुष्टाचे शब्द फिरून उच्चारून माझ्या जिवास दुःख देतोस कांहीं तुला लाज नाहीं वाटत?—हायहाय!—**बहादरशिंग**! काय करूं? जीव कसा अगदीं तळमळतो आहे! खचित! आज कांहीं तरी दगा होणार हें खचित! काय करूं हो? कांहीं सुचत नाहीं!

**बहा०**—सरकार! हा दगा न होऊं देण्याचा उपाय आपल्या हातांतच आहे!

**दौल०**—खरें बोललास! याच क्षणीं **यशवंतरावास** ठार मारावें हाच या वेळीं उपाय आहे!—ठीक आहे! बरें! त्याला मिर्च्यांची धुरी दिली?—हो! पण अगोदर त्याला खांबाशीं चांगलें आंवळून बांधलें आहेना?

**बहा०**—महाराज! ती सर्व तयारी यथास्थित आहे! त्याला धुरी दिली परंतु तो मी **यशवंतराव** आहें यापेक्षां अधिक कांहीं एक बोलत नाहीं! महाराज! **यशवंतरावास** चांगलें बंदोबस्तानें बांधलें आहे, व त्याचा वध करण्याविषयीं मांग आपण सांगितल्याप्रमाणें दुसरा डंका पडण्याची वाट पहात आहेत!

**दौल०**—ठीक आहे!—**बहादरशिंग**! चला मला एकवार त्या दुष्टाकडे घेऊन! तो दुष्ट अद्यापि माझा धिक्कार करितो आहे, यासाठीं एकवेळ त्याचें नाक कापून त्याच्या हातांत द्यावें असें मनांत आहे!—काय करूं हो? या **राजसबाईनें** मला तर अगदीं वेडच लाविलें आहे! यासाठीं मला वाटतें एकवेळ त्याच्याकडे जाऊन त्याला दोन समजुतीच्या गोष्टी सांगून मला **राजसबाई** वश होईल तर पहावें, नाहीं तर आतां त्याचा मृत्यु हा टळत नाहींच!

(दोघे निघून जातात.)

## प्रवेश २.—वाड्यांतील बंदीखाना.

(यशवंतराव उघडा बोडका खांबाशीं बांधिलेला असून दोन अंगास दोन मांग नागव्या तरवारीनिशीं उभे आहेत.)

**यश०**—बरें मित्रहो! मग तेवढी तरी गोष्ट कराच! माझें तुह्मांपाशीं दुसरें कांहीं मागणें नाहीं! मी मेल्यावर माझ्या देहाची हाल अपेष्टा न करितां माझें नीटपणें दहन करा ह्मणजे झालें!

**मांग**—(खुणेनें होय ह्मणून सुचवितात.)

**यश०**—बरें, रात्र किती झाली आहे?

**१ मांग**—आतां कशापाईं इच्यारतां? तुमचं आलया आतां भरत? बिसऱ्या डंक्याचा अंमल हाय?

**यश०**—फार उत्तम! मी तयार आहें!

(दौलतराव येतो.)

**दौल०**—हां, याला करा असा नीट माझ्यासमोर उभा! (मांग त्याला नीट उभा करितात.) अरे विश्वासघातक्या! विश्वासघात व कपट केल्याचा कसा दारुण परिणाम होतो तो पहा!—काय रे तूंच ना कबूल होतेंस, माझ्या शत्रूचें तोंड माझ्या दृष्टीस पडलें कीं मीं तुझा वध करावा ह्मणून?

**यश०**—होय दुष्टा! मग वाट कशाकरितां पहातोस? हा मी तयार आहें, कर माझा वध!

**दौल०**—असा उतावेळ होऊं नको! मी विचारितों याचा मला बरोबर जबाब दे! तूंच ना माझ्या उरांत भोसकण्याकरितां तरवार उसपली होतीस?

यश०—हो ! मींच उसपली होती ! आणखी मला अंमळ खुला तर कर ह्मणजे फिरून उसपीन ! कधीं सोडणार नाहीं !

दौल०—तूं अद्यापि बच्चा आहेस ! तुला यांतलें कांहीं कळत नाहीं ! तूंच पहा! मला मारण्याकरितां तूं तरवार उपसलीस, परंतु त्याचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं हें ब्रह्मदेवानेंच लिहून ठेविलें होतें !

यश०—दुष्टा! मला तुझें तें ब्रह्मज्ञान नको! एकाद्या गोष्टीविषयीं उमेद बाळगावी,साहस करावें, एवढेंच आपणा मानवांचे हातीं आहे!पुढें सिद्धि देणें न देणें ही गोष्ट परमेश्वराधीन आहे! यासाठीं अमुक गोष्ट साधली न साधली यांत मोठेंसें महत्व नाहीं! खरें महत्व ह्मटलें ह्मणजे साहस करण्यांतच आहे !

दौल०—यशवंतराव ! तूं हा आपला हट्ट सोडून दे ! असा वेडा होऊं नको ! तूं अद्यापि लहान बच्चा आहेस ! तूं हल्लीं आहेस कोठें याचा नीट विचार कर! अद्यापि तुझें वय राज्यसुख भोगण्याचें आहे इकडे नीट लक्ष पुरीव ! उगीच आपला प्राण धोक्यांत घालूं नको !

यश०—दुष्टा ! अधमा ! तुला असें वाटत आहे काय कीं मी मृत्यूस यत्किंचितही भिईन! जा ! दुष्टा ! मी असा तुझ्या लाघवी बोलण्यानें फसावयाचा नाहीं ! माझा प्राण तूं खुशाल घे! मी एवढें सुद्धां हूं कीं चूं करणार नाहीं ! तूं मनांत पक्कें समज, तूं दुष्टानें ज्या महाप्रतापी प्रतापसिंह राजाचा कपटानें वध केलास त्याचाच मी बच्चा आहें!

दौल०—यशवंतराव ! मला तसल्या गोष्टी ऐकावयास नकोत ! तुझी मला दया येते ह्मणून मी बोलतों ! पहा ! तूं माझें ह्मणणें मुकाट्यानें मान्य कर आणि तूं ह्या क्लेशांत दिवस काढित आहेस त्यांची समाप्ति होऊं दे! पहा ! तूं जर माझें ह्मणणें कबूल करणार नाहींस तर तुझ्या मृत्यूचा सूचक डंका आणखी दहापांच पळांतच वाजेल !

यश०—अरे जा ! अशा डंक्याला मी मोजितों! मूर्खा ! मृत्यूचें भय कोणाला ! तुजसारख्या पापी लोकांना ! प्रत्यक्ष रुद्रमूर्ति सर्व जगताचा संहार करावयास जरी पुढें येऊन उभी राहिली तरी हा यशवंतराव कदापि डगणार नाहीं हें तूं पक्कें समज ! मूर्खा ! माझा मृत्युकाळ समीप आला आहे, ह्यासाठीं आतां तूं आपलें तोंड काळें कर जा !

दौल०—मूर्खा ! भिकेची हांडी शिक्यास कधीं चढावयाची नाहीं ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं ! नशीब तुझें ! (दुसरा डंका वाजतो.) हं पहा ही तुझ्या मृत्यूची निशाणी! इतका वेळपर्यंत तुझ्याविषयीं मला दया वाटत होती, परंतु आतां कांहीं झालें तरी तुझा ह्मणून मी मुलाजा करणार नाहीं ! प्रत्यक्ष तुझी आई माझ्यापुढें येऊन जरी व्हावी तितकी रडली, ओरडली, किंवा तुला मीं सोडावें ह्मणून माझी व्हावी तितकी स्तुति केली तरी तुझी ह्मणून सुटका व्हावयाची नाहीं ! (मागाकडे पाहून) हं पहातां काय? लोळवा हिला येथल्या येथेंच !—हो पण अगोदर ह्याला नीट बांधून चांगला मशाली लावून भाजा, आणि याच्या मनांतील गुह्य गोष्टी अगोदर एकून एक झाडून समजून घ्या—आणि नंतर तुकडे ! (जातो.)

यश०—अरे वाट कशाची पहातां ! आटपा झटझट! तुह्मांला हुकुम झाला आहे त्याप्रमाणें

वागा!(मांग त्यास जोरानें आवळून बांधूं लागतात.) हायहाय! मूर्खांनो! मला मारावयास इतकी तयारी ती कशास पाहिजे! आणखी तुह्मी माझी हाल अपेष्टा करणार आहां, माझें सर्व अंग भाजणार आहां हें मी पक्कें ओळखतों! परंतु त्यांपासून तुह्मांस मी अमुक आहें यापलीकडे एवढीसुद्धां बातमी कळणार नाहीं! तुह्मांला पाहिजे असेल तर हा मी येथें असा ताठ उभा रहातों, घाला घाव न् करा तुकडे! पण अशी माझी बेअब्रू नका करूं!—हायहाय! मित्रांनो! कोण ही माझी दुर्दशा! धिक्कार असो! हायहाय!—मित्रहो! या ठिकाणीं माझी विटंबना होत आहे, ह्याबद्दलचा सूड तुह्मी केव्हां ध्याल तेव्हां खरें!

( मांग त्यास करकरून बांधितात. )

( गजराबाई येते. )

**गज०**—दुष्टांनो! हात आटोपा! हात आटोपा! तुह्मांला काय बांधायसवरायचें असेल किंवा धुऱ्या वगैरे द्यावयाच्या असतील त्या सर्व माझ्याकडे येऊं द्या! हायहाय! हे उदार राजपुत्रा! हायहाय! आतां आपणापुढें मी कोणच्या तोंडानें येऊं?—( मांगाकडे पाहून) अंमळ बाहेरल्या बाजूस उभे रहा! तुमच्या धन्याची कन्या मी, ती मी तुह्मांस आज्ञा करितें आहे!—चला! मग पाहिजे तर आंत या!

**मांग**—( आपआपसांत ) व्हय! ह्येला मशालीशीं भाजन्याचा होकम झालाया! चलचल! त्रिगिद्मान् मशाली प्येटवूनशी आनुं चल! ही दोग न्हाइनात का हत? कुट जात्यात? आपुन भाइरच हाऊं! ( बाहेर जातात. )

**गज०**—हायहाय! प्राणनाथ! मी आतां हें मुख आपणास कसें दाखवूं?

**यश०**—राजकन्ये! ह्यांत तुझ्याकडे काय दोष आहे? माझे सांप्रत जे हाल होत आहेत, व ज्या वेदना काढाव्या लागत आहेत, त्यांचें कारण तुझा पिता होय! त्याबद्दल तूं आपल्या मनास उगीच वाईट वाटूं देऊं नको! तूं निरपराध आहेस! प्राणप्रिये! तुझ्या पित्यानें कितीं जरी माझा छळ केला तरी त्याचा दोषी तो! तुजकडे त्यांतलें कांहीं नाहीं! प्राणप्रिये! तुजवरील माझ्या प्रीतींत अंतर ह्मणून बिलकूल पडलें नाहीं, व पडावयाचेंही नाहीं! प्रिये! ये! माझ्यानें पुढें हात करवत नाहीं, तथापि एकवार हा आतां शेवटलाच प्रसंग आहे, यासाटीं मला तूंच प्रेमालिंगन दे ह्मणजे त्यायोगानें मी आपणास धन्य समजेन!

**गज०**—हायहाय! हे उदार राजपुत्रा! ही आपली शेवटली भेट आहे यास्तव आतां मी आपणास प्राणनाथच ह्मणतें याची क्षमा करा! प्राणनाथ! आपण या दासीला जो इतका मान देत आहां त्या मानास ही दासी योग्य नाहीं! या वेळीं आपली जी हालअपेष्टा होते आहे तिचें कारण मीच आहें!

**यश०**—( आश्चर्यानें ) काय? काय ह्मटलेंस?

**गज०**—होय! प्राणनाथ! मी खोटें बोलत नाहीं! आपल्या हालअपेष्टेचें कारण मीच आहें! आपण येथें आल्यामुळें मी अगदीं भयाभीत होऊन गेलें व त्याच्या भरांत आपण येथें आहां ही गोष्ट माझ्या हातून फुटली! प्राणनाथ! या पातकाच्या क्षालनार्थ मी तर आतां प्राणच देण्याचा निश्चय केला आहे, परंतु माझी आपणास सरतेशेवटीं एक विनंती आहे, ती ही कीं

मी मरावयाचे अगोदर माझ्या अपराधांची आपण क्षमा करावी !

**यश०**—असें काय ? निर्लज्जे ! चल निघ येथून आपल्या बापाकडे ! मला इतःपर तोंडसुद्धां दाखवूं नको !

**गज०**—(त्याच्या पायां पडून) प्राणनाथ ! आपण सांगतां ही गोष्ट माझ्या हातून कदापि घडणार नाहीं ! प्राणनाथ ! मीं आपल्या पायांस मिठी घातली आहे ती कदापि सोडणार नाहीं ! आपणास वाटेल तर आपण मला लत्ताप्रहार करा, मला चिरडून टाकून माझा जीवही घ्या, मी त्याबद्दल एक ब्रसुद्धां तोंडांतून काढणार नाहीं ! मी जरी मेलें तरी मरतां मरतां आपलें कल्याण चिंतूनच मरेन !

**यश०**—(गहिंवरून) हायहाय ! प्राणप्रिये ! हे उदार राजकन्ये ! मी किती दुष्ट, किती पापी आहें कीं, रागाच्या आवेशांत सांपडून तुला संकटांत पाडलें एवढेंच नव्हे, तर तुला दुरुत्तरानें ताडनही केलें ! हायहाय !

**गज०**—(आनंदानें उठून) अहाहा ! प्राणप्रिया ! मी धन्य आहें, धन्य आहें !—एकून माझे सर्व अपराध आपण पोटांत घालून मला क्षमा केलीना ?

**यश०**—केली ! केली ! प्रिये ! त्या गोष्टीचा इतःपर उच्चारही करूं नको !

**गज०**—प्राणनाथ ! आपण मला क्षमा केली यामुळें मी आपणास अत्यंत धन्य समजतें ! प्राणनाथ ! माझ्या मूर्खपणामुळें आपला प्राणनाशच व्हावयाची वेळ आली आहे, असें असतांही आपण उदारपणानें माझे सर्व अपराध गिळून जाऊन मला क्षमा केली त्या क्षमेस मी पात्र खचित नव्हतें ! असो ! प्राणप्रिया ! ती गोष्ट एकवेळ होऊन चुकली ! आतां ती परत येणें नाहीं ! परंतु प्राणनाथ ! काय सांगूं ? आपली ही स्थिति पाहून मला फार दुःख होतें आहे, आणि त्यांतून आपण असे सद्गुणी असून मज अभागिनीस त्या तसल्या भयंकर प्रसंगांतून सोडविलें, असें असतांही मी दुष्ट कृतघ्न आपल्याच प्राणनाशास कारण झालें, हें स्मरून मला जें कांहीं होतें आहे तें कांहीं मला बोलून दाखवितां येत नाहीं ! हायहाय ! प्राणनाथ ! आतां याउपर माझ्यानें प्राणधारण करवणार नाहीं, यास्तव मज दीन अभाग्येची दया येऊन आपणच मला मारून टाका ह्मणजे मी आपणास धन्य समजेन !

**यश०**—(गहिंवरून) प्राणसखे ! नकोगे अशी दीनवाणी बोलूं ! आपणावर ईश्वरच कोपला त्यापुढें आपणा मानवांचा उपाय काय? उगी प्रिये ! उगी !—प्रिये ! आतां हें सर्व दुःख टाकून दे ! अशी प्राणांवर उदार होऊं नको ! तूं मजकरितां जिवंत राहून त्या माझ्या बिचाऱ्या निराश्रित निराधार मातोश्रीचें संरक्षण कर एवढें माझें तुजपाशीं मागणें आहे !

**गज०**—प्राणनाथ ! जशी आपली आज्ञा ! आपण सांगितल्याप्रमाणें आपल्या मातोश्रींचें मी रक्षण करीन, त्या कामीं माझे प्राण गेले तरी चिंता नाहीं ! हायहाय ! प्राणपती ! इतःपर ह्मणून मला या जगांत काडीमात्र सुख व्हावयाचें नाहीं, परंतु आपल्या परमपूज्य मातोश्रींचें रक्षण करावयाचें आहे, एवढ्यानेंच कायतें आतां मला समाधान वाटेल !

यश०—हायहाय! प्राणप्रिये! धिक्कार असो मला! तूं अशी सद्गुणी असून तुजवर मी व्यर्थ रागावलों! माझा राग मलाच आवरेनासा झाला! हरहर! प्राणसखे! मी खचित पापी आहें, मी तुला दुरुत्तरानें ताडन केलें, व त्यासाठीं मीच तुझी क्षमा मागतों! (हात बांधल्या बांधल्याच तिच्या पायांवर धाडकन पडतो. ती त्यास प्रेमालिंगन देऊन उठविते.)

यश०—(आनंदानें नेत्र मिटून) अहाहा! प्राणप्रिये! मी धन्य खरा, कारण कीं अशा मृतावस्थेंत असतां तुझें आलिंगनरूपी अमृतसेचन माझ्या देहांत पुनरपि जीवनकळाच जणों घालीत आहे!

(मांग मशाली पेटविलेल्या घेऊन आंत येतात.)

मांग—ताईसाब! आपुन ह्ये का मांडलया! ह्ये गुन्हेगाराची येळ भरलीया! ह्येला सोडा कीं! कार ये दळभ्या! आन् त्यो चिमटा आन् आन् ल्योका आन्!

गज०—दुष्टांनो! खबरदार तुम्ही पुढें याल तर! माझ्या प्राणप्रियास मी अशीच मिठी मारून राहीन! ती प्रत्यक्ष देवदैत्यांच्या हातूनही सुटावयाची नाहीं! (यशवंतरावास घट्ट मिठी घालिते) (उभयतांच्या नेत्रांतून अश्रुधारा चालतात.)

(इतक्यांत पडद्यांत गलबला होऊन तरवारीची चमक झडल्याचे आवाज ऐकूं येतात.)

१ मांग—(मोठ्यानें) अर! कोन हायरे तकड? का? का झालं का? दळभ्या! पघ तर खरा ह्यो कसचा गलबला हाय त्यो!

२ मांग—(घाबरून) त्ये नगरबा आपनाला! तूंच पघनास?

मांग—(यशवंतरावास पकडण्याकरितां त्याच्या अंगावर धांवून जातात.)

यश०—खबरदार दुष्टांनो! आतां या तर खरे पुढें, जरी या वेळीं मी असा परस्वाधीन झालों आहे तरी तुमच्या मस्तकावर अशी लाथ मारून तुह्मांला टेंचूनच टाकीन! कधीं चुकणार नाहीं!

(बहादरशिंग आंत येतो.)

बहा०—(घाबऱ्या घाबऱ्या) कायरे ए! ए— अरे आपले महाराज कुठें आहेत? वाड्यांत तर शत्रूचे लोक चोंहीकडून भरत चालले आहेत!

दोघे मांग—असं काय? चला व चला अगुदर आपल्या म्हाराजांचा स्वाध लावून त्येंचं रक्शण करूं! चला चला!

(बहादरशिंग व दोघे मांग मशाली टाकून निघून जातात.)

गज०—(आनंदानें) प्राणनाथ! ते मांग ह्या जळत्या मशाली येथेंच टाकून गेले हें फार चांगलें झालें! प्राणनाथ! आपणाला दुष्टांनीं दोरांनीं बळकट बांधिलें आहे, परंतु मशाली लावून दोर तोडून आपणास मुक्त करितें कांहीं काळजी करूं नये!

(तसें करूं लागते.)

यश०—(आवेशानें दांत ओंठ खाऊन) आः दुष्टा! मेलास! आतां तुझी भरली!

गज०—(घाबऱ्या घाबऱ्या पुढें होऊन) आपण कोणाविषयीं बो—बोललां? माझ्या बाबां—?

यश०—(आवेशानें) होय होय! त्याच्याचविषयीं! ज्या दुष्टानें प्रत्यक्ष माझ्या पित्याचा घात केला त्याच्याच—!

गज०—देवा! देवा! एकून माझ्या बाबांना ह्मणून क्षमा नाहींच ना व्हायची? हायहाय! तर काय एकून माझे बाबा आतां मरणारच ना?— (इतक्यांत पडद्यांत दौलतरावाचा 'मेलों! मेलों!' असा शब्द ऐकूं येतो तो ऐकून) हायहाय! प्राणनाथ! क्षमा करा! मला जाऊन बाबा मरावयाचे अगोदर त्यांस

एकदा डोळे भरून तरी पाहूं द्या!—(तरवारींची चमक झडल्याचा पुनरपि आवाज ऐकूं येतो.) अग बाई! हें काय? तरवारी घेऊन तिकडे रणच मांडलें आहे!—हायहाय! परमेश्वरा! तूं तरी माझ्या पित्याचें संरक्षण कर! हायहाय! हे निर्दय प्राणप्रिया! हायहाय! (निघून जाते.)

**यश०**—(अगदीं जखडला असता दांत ओठ खात आपणाशीं) आं! काय करूं रे? या दोरीनें माझे हात जखडले आहेत! कांहीं चालत नाहीं! अंगांत सामर्थ्य असतांही मी या वेळीं कसा अगदीं हतवीर्य झालों आहें!

**मालो०**—(बाहेरून) कायरे? आमचे **बाळमहाराज** कोठें आहेत तुला ठाउक आहे कारे?

**यश०**—(मोठ्यानें ओरडून) **मालोजी! मालोजी**! इकडे या इकडे! हें पहा कसें दुष्टांनीं मला अगदीं जखडून टाकिलें आहे तें! (दोरी तोडण्याकरितां ओढाताण करितो. दोरी तुटत नाहीं, इतक्यांत मालोजी इतर कांहीं लोकांसहवर्तमान येतो.)

**मालो०**—सरकार! परमेश्वरकृपेनें आपले सर्व मनोरथ पूर्ण होत आहेत!—परंतु हरहर! महाराज! आपली दुष्टांनीं काय अवस्था केली आहे ही!—अरे पहातां काय? तोडा तरवारीनें दोरी! (लोक यशवंतरावास खुला करितात.)

**यश०**—**मालोजी**! या वेळीं तुह्मीं मला प्रत्यक्ष जीवदान दिलें असेंच मी समजतों! या! अगोदर मला कडकडून मिठी मारा! (दोघे एकमेकांस मिठी मारितात.)

**मालो०**—(गहिंवरून) महाराज! आतां अधिक बोलावयास अवकाश नाहीं! परंतु आज आपल्या महाप्रतापी **प्रतापसिंह** महाराजांच्या ऐश्वर्याचे आपण धनी होणार हें निश्चित पाहून माझ्या जिवास अत्यंत उल्हास वाटत आहे! असो. महाराज! आतां घेतों आज्ञा!—(बरोबरच्या लोकांकडे पाहून) अरे! तूं—तूं, हे तुह्मीं पांचजण—सगळे **बाळमहाराजां**बरोबर असून यांचें रक्षण नीट करा समजलांत?—महाराज! ही आपल्या हातांत तरवार असूं द्या! हिचा सदुपयोग काय करावा हें आपणास सांगणें नलगेच!—चलारे चला! तो दुष्ट कोठें दडून बसला आहे त्याला अगोदर शोधून काढलें पाहिजे! चला असे या वाटेनें माझ्याबरोबर! महाराज! आपण या बाहेरच्या दालनांतच असावें! आह्मीं इतक्यांत आपणाकडे येतोंच!

**यश०**—आः दुष्टा! **दौलतरावा**! आतां पहातों तूं माझ्या क्रोधरूपी कल्पांतानलांत कसा दग्ध होत नाहींस तो! (सर्व निरनिराळ्या वाटांनीं जातात.)

## प्र० १. स्थल—राजवाड्यांतील एक दिवाणखाना.

(हिंमतराव, रणधीरशिंग, मानाजीराव फाकडे आपल्या अनुयायांसहवर्तमान, बहादरशिंग व इतर शत्रूंचा पाठलाग करीत येतात.)

**हिंमत०**—अरे काणरे आहे, चलहो अगोदर ती वाट आडवून धर! या लंडीचा मी असा या अंगानें समाचार घेतों!—चला! चला! (अनुयायी त्याप्रमाणें वागतात.)

**बहा०**—अरे बाबा! मी तुमच्या पायां पडतों! कृपा करून मला जीवदान द्या!

**रण०**—तुम कोन हो?

**बहा०**—अं—अं—मी असाच—इ—इथला—

**रण०**—(त्याची गचांडी धरून) क्यों? बोलता है क्या नहीं! अच्छा! बोले! क्या है तेरा नाम? तूं इधर क्या करता है! बोल!

**बहा०**—(घाबरून) —मी—मी—मला **बहादूर-शिंग** ह्म—ह्मणतात!

**रण०**—(उपहासानें त्याची पाठ थोपटून व पीळ घातलेल्या लांब मिशा हातानें ओढून) ओहोरे बहादर! बहोत बहोत अच्छा तुम बहादर हो! **बहादूर!** तुम तो अमकू मात्रा जानवर वैसा दीखता है. **अच्छा!** तुमकु सींग नहीं है, इसवास्ते तुम भीते हो?

**बहा०**—महाराज! तुमच्या पायां पडतों! मी बहादर नव्हे! ही मि—मिशीही उतरून देतों—पण—पण म—मला मारूं नका!

**रण०**—क्यौं बेवंडी तूं कोन है **रजपूत** है या कोन? जो तूं **रजपूत** है तो ऐसी औरतके माफक जानकी किसवास्ते परवा करता है? जान जान क्या चीज है!

**बहा०**—(त्यांच्या पायां पडून) अरे बाबा! नाहीं रे! नाहीं! मी मुळींच **रजपूत** नव्हे! मी आपला साधा **मालवणी** गडी आहें! लहानपणीं मी रडण्याच्या कामांत बहादर होतों, ह्मणून थट्टेनें आईबापांनीं माझें बहादरशिंग नांव पाडलें! दुसरं कांहीं नाहीं!

**हिंम०**—बोल अगोदर! तूं येथें काय करीत असतोस?

**बहा०**—मी **दौलतराव** महाराजांचा—

**रण०**—(दरडावून) क्या बोलता है? महाराज महाराज, किस्कू कहता है?

**बहा०**—नाहीं नाहीं! चुकलों! मी सांगाल तर आपले कानही उपटतों! पण तुह्मी असे मला दरडावूं नका! (थरथर कांपूं लागतो.)

**रण०**—(त्याची मानगोटी धरून) क्या बोलताय? तूं किसके कान उखाडता है? हमारे? क्या?

**बहा०**—नाहीं महाराज मी माझे कान उपटतों! अरेरे! माझा नकारे कोणीं जीव घेऊं! मी तुमच्या मुलालेकरासारखा आहें!

**रण०**—आच्छा! बहोत बात तुम मत् करो!

**हिंम०**—कायरे आमचे **बाळमहाराज** कोठें आहेत?

**बहा०**—ख—खरें पुसाल तर—म—मला ठा—ठा—ठाऊक नाहीं!

**रण०**—ओहो! तुम बोलतेहो के मैं औ हरामखोर **दौलतराव**का नोकर हूं, और तुमकु **जसवंतराव**का मकान किधर है मालुम नहीं पडता?—बडे ताजूबकी बात! बोलो बोलो!—क्यौं बोलता नहीं क्यौं?—बोलो, नहीं तो अब्बी काट देतां हूं!—

**बहा०**—**यशवंतराव** तुं—तुरुं—

**हिंम०**—काय? ह्मणतोस? बोल नीट! असा घाबरूं नको!

**बहा०**—मला तुह्मीं मारणार नाहीं तर सांगतों! **यशवंतराव** तुरुंगांत आहे!

**हिंम०**—काय! **बाळमहाराज** तुरुंगांत आहेत?

**बहा०**—होय! आणि त्यांचा तत्क्षणीं वध करावा ह्मणून म्—म् मीच **दौलतरावास** सल्ला दिली! त्याप्रमाणें ते यावेळीं मेलेही असतील! आतां—आतां—तुमच्या पायां पडतों! मला श—श—!

**हिंम०**—(दांत ओंठ खाऊन) कायरे ह्मणतोस? त्यांचा वध करावयाची सल्ला कोणी तू दिलीस? आणखी काय? ते मेलेही असतील ह्मणतोस?—हूं! आटपा! पहातां काय! याला येथल्या येथेंच देहांतशासन द्या!

**बहा०**—होय! माफ करा! (रडूं लागतो.) अग आई!—अरे बाबानों! माफ करा! फिरून नाहीं मी अशी सल्ला देणार!

**रण०**—अच्छा अच्छा! तुम अबी तो मर-

जाव ! पीछे वैसी सल्ला तुम मत् देओ ! अच्छा अच्छा !

( त्यास ठार मारितात. पडदा पडतो. )

**प्र० ४. स्थल—राजसबाईच्या महालाबाहेरील दिवाणखाना.**

( दौलतराव तोंड झांकलेला धावत धावत येतो. )

**दौल०**—काय करूं रे!—माझें राज्य तर सर्व गेलें आतां थोडक्याच वेळांत हे माझे प्राणही निघून जातील! हायहाय! असो. कांहीं चिंता नाहीं! या दुष्टा **यशवंत्यानें** माझा सर्वस्वी घात केला ! तो दुष्ट तुरुंगांतून पळून गेला ह्मणून मी आतांच ऐकिलें ! हें कसें झालें असेल तें असो!—कांहीं चिंता नाहीं! आतां आपण तर मरणारच, परंतु एक आतां अखेरचा सूड—( इतक्यांत बाहेर पावलें वाजलेलीं ऐकूं येतात तीं ऐकून ) अरे देवा ! आतां कोठें लपून बसेन ह्मटलें तरी जागा नाहीं ! त्या दुष्टांनीं बहुतेक वाडा तर घेरून टाकला आहे ! हायहाय ! ( लपण्याकरितां जागा पहातो इतक्यांत पावलें वाजावयाचीं राहतात. ) अरे! मी केवढा भित्रा ! हायहाय ! अरे ! मी आपणास आजपर्यंत मोठा प्रबळ समजत होतों. परंतु आज माझें सर्व धैर्य कोणीकडे निघून गेलें कांहीं समजत नाहीं ! बरें असें तर नसेलना ? मी आतां जी कांहीं गोष्ट करणार आहे ती परमेश्वरास न साहून त्यानें तर माझी शक्ति नसेलना हरण करून नेली ?—कसेंही असो ! हा **दौलतराव** या वेळीं शत्रूचा घात करावयास जरी असमर्थ झाला आहे, तरी त्याच्या अंगीं अबलेचा घात करण्याचें अद्यापि सामर्थ्य आहेच ! तें तर कोठें गेलें नाहीं ! ठीक आहे ! पाहून घेतां ! मनांत आहे तेवढा सूड घेऊन मरावें हें बरें !

( निघून जातो. )

**प्र० ५. स्थल—राजसबाईचा महाल.**

( राजसबाई बसली आहे. )

**राज०**—हायहाय ! देवा ! काय हा अनर्थ ? आज वाड्यांत काय गडबड चालली आहे कांहीं समजत नाहीं ! जिकडे कान द्यावा तिकडे कोणी तरी मनुष्य मरत असल्याच्या किंकाळ्या ऐकूं येत आहेत ! हायहाय ! देवा ! ह्या किंकाळ्या माझ्या प्रिय पुत्राच्या तर नाहींतना ?

( घाईघाईनें मालोजी आंत येतो. )

**मालो०**—आईसाहेब ! आपले पुत्र जिवंत आहेत, त्यांच्याविषयीं आपण कांहीं काळजी करूं नये ! आज वाड्यांत शत्रूची कत्तल चालली आहे ! पण आपण अशा घाबरूं नका ! आपण महालाचीं दारें बंद करून आंत खुशाल बसा !—आणखी कदाचित् तो दुष्ट **दौलतराव** आंत येऊं लागेल तर न डगतां मी देतों ही सुरी त्याच्या उरांत खुपसा ! (सुरी देतो. )—जातों! आपले **बाळमहाराज** खुशाल आहेत ! शत्रूचा नाश करून ते आतां आपल्या दर्शनास येतील !

( निघून जातो. )

**राज०**—देवा! मी आज स्वप्नांत तर नाहीं ना? हा काय प्रकार चालला आहे कांहींच उमज पडत नाहीं ! असो ! देवा नारायणा! माझ्या पुत्रास सुरक्षित राख ह्मणजे झालें ! दुसरें कांहीं माझें मागणें नाहीं! ( दारें लावूं लागते. इतक्यांत दौलतराव आंत घुसतो. )

**राज०**—कोण रे तूं ? कोण आहेस ?

**दौल०**—( स्वर बदलून ) बाईसाहेब ! मी—मी तो—माझें रक्षण करा !

**राज०**—पण तूं आहेस कोण ?

**दौल०**—मी असाच या वाड्यांत असतों ! मी आपल्या पायां पडतों, व आपण माझें रक्षण करावयाचें वचन द्याल तर मी कोण आहे तें सांगतों !

**राज०**—( दया येऊन ) अरे ! रक्षण करण्याचें माझ्याकडे काय आहे ? बोल ! तूं ह्मणतो आहेस तरी काय ?

**दौल०**—बाईसाहेब ? तें कांहीं नाहीं ! वचन द्याल तर सांगतों !

**राज०**—बरें, हें वचन दिलें !

**दौल०**—( तोंडावरील झांकण काढून ) दुष्टे ! तूं मला ओळखिलें नाहींस काय ? तूं माझ्या प्राणाचें रक्षण करण्याचें वचन दिलें आहेस, यास्तव तुला सांगतों हा तुझ्या मिथ्या पातिव्रत्याचा भंग करावयास आलेला **दौलतराव** आहे !

**राज०**—काय दुष्टा ! तूं तो अधम—पातकी—दुष्ट **दौलतराव** तोच ? माझ्या प्राणप्रियाचा विश्वासघातानें वध करणारा महापातकी तो तूंच ?

**दौल०**—होय ! होय ! तुला पाहिजे तें वडबड! मी त्याची मुळींच पर्वा करीत नाहीं ! तुझ्या दुष्ट कारट्यानें माझें सर्व राज्य हरण करून घेतलें, त्याचा सूड घेण्याकरितां मी यावेळीं तुझा जबरीनें उपभोग घेणार ! तुझ्या महालाच्या सर्व वाटा बंद आहेत, तूं आतां माझ्या कचाटींतून कशी सुटतेस ती पहातों ! ( तिला धरावयाकरितां पुढें जातो. )

**राज०**—( मागें सरून ) दुष्टा ! दूर उभा रहा ! तुझ्या अपवित्र स्पर्शानें माझा देह विटाळवूं नको ! ( दौलतराव धरावयास जातो. राजसबाई किंकाळ्या ठोकूं लागते )

**दौल०**—तूं आणखी जरी आरडलीस, तरी मी हा तुला अशीच येथें लोळविणार ! कां रहातेस कीं नाहीं गप्प ? चल ! आतांच्या आतां मी तुझा उपभोग घेणार ! बोल ! होतेस कीं नाहीं कबूल ?—बोल !

**राज०**—दुष्टा ! तुला मीं एक वेळ सांगितलेंच आहे कीं, जोंपर्यंत ह्मणून ह्या देहांत प्राण आहे तोंपर्यंत तुझ्या अपवित्र देहाचा या शरीरास विटाळ होऊं देणार नाहीं ! दुष्टा! दूर उभा रहा ! नाहीं तर पहा हीच सुरी आपल्या उरांत खुपसून तुझ्यापुढें प्राण देईन !

**दौल०**—( उपहासानें ) मूर्खे ! आजपर्यंत तुझ्या असल्या वल्गना मी पुष्कळ ऐकिल्या, व कदाचित् तूं आतां वळशील, अंमळशानें वळशील, असें समजून मीं तुझी उपेक्षाही केली. परंतु त्या सगळ्या गोष्टी आतां विसरून एकदम मला कबूल हो ! नाहीं तर पहा नांवाचा **दौलतराव** आहे, ह्मणेल तें करावयास कधीं चुकावयाचा नाहीं ! हं—कां होतेस कीं नाहीं कबूल ?—बोल बोल झटझट !

**राज०**—दुष्टा ! माझा निश्चय काय आहे तो तुला ठाऊक आहेच, त्यांत ह्मणून फरक व्हावयाचा नाहीं !

**दौल०**—असें काय ? तर दुष्टे ! ही पहा तुला लोळविलीच ! ( तिला धरावयास जातो, इतक्यांत राजसबाई आपणाला सुरी मारून घेऊन भूमीवर पडते. )

**दौल०**—( दांत ओंठ खाऊन ) अरेरे ! सर्वस्वी घात झाला ! या दुष्टेनें माझा मनोरथ ह्मणून जिवंतपणीं पूर्ण नाहींच होऊन दिला! असो. काय चिंता आहे ? ही मेली ह्मणून काय झालें ? ही नुकतीच मेली आहे, व

आतां मलाही या जगांत फार वेळ रहावयाची आशा नाहीं, यासाठीं मरावयाचे अगोदर हिचा उपभोग घ्यावाच ! काय होईल तें होवो ! उपभोग घेतल्यावर पुढें माझें कांहींही होवो ! ( इतक्यांत यशवंतराव त्याला न कळत आंत येऊन त्याला लाथ मारून खालीं पाडतो. दौलतराव मूर्छित होतो. )

**यश०**—( आई मेलेली पाहून शोकानें ) हायहाय ! गे जननी ! या दुष्टाच्या पायीं तुझी सरतेशेवटीं अशी अवस्था व्हावीना ? आई ! तूं मेल्यावर मला या जगांत जिवंत राहून तरी काय करावयाचें आहे ? आईग ! ह्या दुष्टानें तुला जे क्लेश दिले त्यांची समाप्ति करून तुझ्या जिवास शांति द्यावी म्हणून मी अनेक संकटें भोगून तुजकडे आलों, तो तुझी हीच स्थिति या नेत्रांनीं पहावी एवढ्याच करितां काय ? आईग! ह्या दुष्टाचा नाश करण्याची आशा मनांत धरून या ठिकाणीं आलें, तिचा परिणाम असा व्हावा काय ? हायहाय ! धिक्कार असो ! धिक्कार असो ! आईग ! आईग ! आतां तुजवांचून मी या जगांत वांचून काय करूं ? आईग ! हा बघ मी तुजपुढें दीनवाणा उभा आहे, तर मजशीं एकतरी शब्द बोल ! आई ! तूं मेल्यावर आतां मला माझा बाळ असें कोण बरें म्हणणार आहे ? आईग ! एकवेळ तूं उठून मला प्रेमालिंगन दे, प्रेमानें माझें चुंबन घेऊन एकवेळ माझ्या मस्तकाचें आघ्राण कर, आणि एकवेळ 'बाळा ! **यशवंता** ! !' असे अमृततुल्य शब्द माझ्या कानीं पडूं दे ! म्हणजे आई, मी आपणास कृतार्थ समजेन ! आणि लागलीच या तुझ्या चरणांपाशीं आपल्या प्राणांचा नाश करीन ! आईग ! आईग ! तुला तुझ्या बाळाची कांहींच करुणा येत नाहीं अं ! हायहाय ! गे आई ! आईग ! आईग ! ( तिच्या पायांवर मूर्छित पडतो. )

**दौल०**—( सावध होऊन खालीं पडल्यापडल्याच ) हा कोणरे दुष्ट माझ्या बेताआड आला ?—आं—काय हा दुष्ट **यशवंत्या**—माझा शत्रु—तोच येथें आला काय ?—अरेरेरेरे ! काय करूं ? हा दुष्ट ह्या अखेरच्या वेळीं देखील माझ्या बेताआड आला अं ! आः दुष्टा ! थांब तुला **यम**सदनास पाठवितों ! हा दुष्टा ! हा पह मेलास ! ( खडबडून उठतो. ) अरे ! हा दुष्ट तर आपल्या आईच्या पायांवर मूर्च्छित होऊन पडला आहे ! कांहीं चिंता नाहीं ! याची येथल्या येथेंच समाप्ति करावी !—आः मूर्खा ! माझा सर्वस्वी घात करणाऱ्या अधमा ! हा पहा मेलास ! ( त्यास मारण्याच्या हेतूनें त्याच्या अंगावर धांवून जातो. इतक्यांत यशवंतराव सावध होऊन खडबडून उठतो. )

**यश०**—आईग ! आतां नाहींचना तूं माझ्याशीं एक शब्दही बोलत ? आई ! तुला माझा इतक्यांतच कंटाळा आलाना ? आई !—

**दौल०**—( मोठ्यानें ओरडून ) दुष्टा ! असा विनाकारण आपणाशींच शोक करीत बसला आहेस, त्यापेक्षां एकदम आपला गळाच कांपून घेऊन या शोकांतून कां नाहीं मुक्त होत ?

**यश०**—( तें ऐकून ) आः दुष्टा ! तूं माझा उपहास करितोस काय ? तर मूर्खा ! अगोदर तुलाच तुझ्या पातकांचें प्रायश्चित्त देतों हें घे ! ( तरवार उपसून त्यास मारण्यास जातो. उभयतांचें युद्ध चालू होतें. )

( इतक्यांत गजराबाई येते. )

**गज०**—( घाई घाईनें ) अहो बावा ! बावा !—अहो **यशवंतराव** ! तुम्हीं मांडलें आहे

तरी काय? बाबा! दया करा! दया करा! प्राणनाथ! हात आटोपा! हात आटोपा! (यशवंतराव व दौलतराव एकमेकांशीं लढत असतां मध्यें घुसून दोघांस बाजूस लोटूं लागते.)

**दौल०**—(त्वेषानें) काय! काय! कारटे! मधें आलीस कां फिरून! थांब तुला न् तुझ्या प्राणनाथाला एकदमच **यम**सदनास पोंचवितों!

**गज०**—(दौलतरावाच्या कंबरेस मिठी घालून) बाबा! तुह्मी पाहिजे तर मला ठार मारा! परंतु या राजपुत्राशीं लढूं नका! (दौलतराव तिला लोटून देण्यास यत्न करितो. ती अधिक बळकट आवळून धरिते.)

**दौल०**—कारटे! सोडतेस कीं नाहीं! बोल! कां घेऊं तुझाच अगोदर जीव!

**गज०**—तुह्मांस वाटेल तसें करा! परंतु या राजपुत्राशीं लढूं नका!

**दौल०**—कारटे! तुला वाटतें मीच मात्र मरावें आणि या तुझ्या यारानें मात्र जिवंत रहावें! कारटे! मरच तर! (तिच्या उरांत तरवार भोंसकतो. ती खालीं पडते.)

**गज०**—हायहाय! हे पित्या! हे प्राण—! (मूर्छित होते.)

**यश०**—(त्वेषानें) आः दुष्टा! महापातक्या! अधमा! प्रत्यक्ष आपलीं मातापितरें, व आपला सखा बंधु, यांचा वध करून तेवढ्यानेंच तुझी तृप्ति झाली नाहीं ह्मणून दुष्टा! कन्यावधाचें हीं पातक आपल्या माथ्यावर चढवून घेतलेंस! दुष्टा! तूं नष्ट आहेस! तुझा प्राण घेण्यास मी निमित्त मात्र बस आहें, तूं आपल्या कर्मानेंच नष्ट झालास! (इतक्यांत राजसबाई किंचित् सावध होऊन कण्हूं लागते.)

**दौल०**—(मागें वळून) काय ही अद्यापि जिवंत आहे!—अरे रे! दुष्टा! तूं व्यर्थ मध्यें आलास, नाहीं तर केव्हांच ह्या जारिणीचा उपभोग घेऊन मी स्वस्थ बसलों असतों!

**यश०**—(अतिशय त्वेषानें) दुष्टा! जारिणी कोणास ह्मणतोस? मूर्खा! वृथा वल्गना पुरे कर! चल कांहीं सामर्थ्य असेल तर लढ माझ्याशीं, आणि वीराप्रमाणें तुला धारातीर्थी मरण येऊं दे! (दोघे लढतात, व दोघेही लढतां लढतां घायाळ होऊन पडतात.)

**राज०**—(कण्हत कण्हत) अं—अं—दुष्ट—**दौल—दौल**—अं—अं—माझा प्रिय पुत्र—अं—अं—अं—

**यश०**—(पडल्या पडल्याच) आः दुष्टा! काय ही माझ्या निष्कलंक मातेची दशा करून सोडिली आहेस!—आई! तूं अद्यापि जिवंत आहेस? आई! मला एकदा शेवटची मिठी मारूं दे! (उठूं लागतो तों धाडकन भुईवर पडतो. तथापि तसाच लोटत लोटत जाऊन आईच्या गळ्यास मिठी मारितो.) आई! आई! बोल! बोल! आईग! तुझे अमृततुल्य बोल मला एकवार ऐकूं दे! आई! आई! आईग! हा पहा दुष्ट **दौलतराव** तुझा शत्रु तुजपुढें मरून पडला आहे! आईग! पहा तर खरी! आईग!—

**राज०**—(वर हात करून) कोण? अं—अं—माझा—अं—बाळ—देवा! **नारा**—अं—धन्य!—अं—अं—बाळा! अं—**ग**!—अं—अं—**गजरा**! अं—

**गज०**—(सावध होऊन कण्हत कण्हत) आईसाहेब!—अं—मी—मी जवळच!—(मोठ्या प्रयत्नानें उठून राजसबाईच्या पायांशीं जाऊन धाडकन पडते.) आईसा—! आ—अं—अं—!

**राज०**—(खोल आवाजानें) बाळा!—अं—अं—या **गज**रेला—अं—अं—सं—अं—संभाळ! अं—अं—बाळा!—एकदा—अं—अं—मला घट्ट—मिठी—मारूं दे! अं—(दोघे घट्ट मिठी मारितात.)

**गज०**—(कष्टानें राजसबाईच्या व यशवंतरावाच्या पायास मिठी घालिते.) अं—अं—

**दौल०**—आः—दुष्टा ! अं—अं—मेलास ! (उठूं लागतो, पण उठवत नाहीं.) आंः—काय करूं ! अरेरेरेरे-!—घात—घात झाला!—आं—आंः— (दांतखिळ वाजूं लागते.) अरे—गेलों—गेलों—नरककुंडांत गेलों !—थांबा—यमदूत हो ! थांबा ! मला अशा अघोर या—या—यातना—न—नका देऊं ! तुमच्या पायां पडतों ! अरे रे ! तुह्मीं माझें कांहींच ऐकत नाहीं ! आणि मला निर्दयपणानें खालीं—खालीं नरकाचे खाईंत लोटितांना ! अरेरे!—लोटा ! लोटा ! मला अक्षय नरकयातना होऊंद्या!—आं—देवा ! देवा ! ती तप्ततेलाची कढई!—तो लोहशूळ—तो—तो—(किंकाळी ठोकतो.) देवा ! नको नको हा त्रास ! देवा ! क्षमा कर !—देवा ! देवा ! तुला माझी कांहींच दया येत नाहींना ! हायहाय ! हे साध्वी **राजसबाई** ! हे मातृवत्सला **यशवंतरावा** ! तुह्मीं तरी मला क्षमा करा ! माझी तुह्मांला तरी दया येऊं द्या !—हाय गे माझे लाडके **गजरे** ! **गजरे** ! तूं या वेळीं कोठेंगे आहेस ? **गजरे** ! **गजरे** !

**गज०**—(तें ऐकून धडपडून उठूं लागते, पण उठवत नाहीं.) बाबा ! बाबा! ही तुमची पातकी **गजरा**! मी—ये—येथेंच आहें !—बाबा—अं—अं—हालवत देखील नाहीं ! बाबा! बाबा !

**दौल०**—कोण ? **गजरे** ! तूं येथें आहेस काय ? हायहाय ! आणि तुझी अशी स्थिति होण्यास मीच कारण झालोंना ! हायहाय ! धिक्कार असो ! बाळे ! बाळे ! **गजरे** ! हायहाय ! रहा तूं तेथेंच पडून रहा ! मी पातकी—अघोर पातकी—मी दुष्ट—मी चांडाल आहे!—मला शिवून आपल्या पवित्र देहास विटाळ होऊं देऊं नको !—अरेरे ! मी केवढा चांडाळ ! केवढा पातकी ! **गजरे** ! **गजरे** ! त्या वेळीं मीं तुझें ह्मणणें ऐकिलें असतें तर फार चांगली गोष्ट होती ! असो! आतां बोलून शोक करून काय उपयोग? आतां मला केलेल्या कर्मांचा पश्चाताप वाटतो, पण काय? व्यर्थ!—**यशवंतराव** ! हे महासाध्वी **राजसबाई** ! तुह्मीं तरी माझ्या अपराधांची क्षमा केली असें ह्मणा ह्मणजे मी सुखानें देह ठेवीन !

**यश० व राज०**—**दौलतराव** ! क्षमा—क्षमा—केली ! जा !

**दौल०**—(आनंदानें) काय तुह्मीं उदारपणें माझ्या अपराधांची क्षमा करितां ? वाहवा ! वाहवा! मी धन्य आहे ! **यशवंतराव** ! मी तुझा अनन्वित छळ केला, मी मोठीं अघोर पातकें केलीं, ह्याबद्दलचें प्रायश्चित्त मीं काय घेऊं ? **यशवंतराव** ! एकवार माझ्या प्रियकन्येला तूं आपली ह्मण ! हे महासाध्वी **राजसबाई**! हिला तूं सून ह्मणून तिच्या तोंडावरून हात फिरीव, ह्मणजे माझा प्राण सुखानें जाईल ! (यशवंतराव, राजसबाई, व गजराबाई, वळकट एकमेकांस आलिंगन देतात.)

**यश०**—हायहायगे प्रिये ! मी—मी—तुला अशा स्थितींत पहावेंना ? आई ! आई ! ही आपली सून आपल्या पदरांत घे !

**राज०**—**गजरा**बाई ! येगबाई अंमळ पुढें आणि मिठी घाल ! (मिठ्या मारून सर्व जण धाडकन निश्चेष्ट होऊन पडतात.)

**दौल०**—धन्य ! धन्य ! (प्राण सोडितो.)

(इतक्यांत मालोजी आंत येतो.)

**मालो०**—(पाहून घाबरून) अरे ! काय हा अनर्थ ? महाराज ! महाराज ! **आईसाहेब** ! हायहाय !—महाराज ! महाराज ! मी

आपला दीनसेवक आपणापुढें उभा आहे, मजकडे एकवार अवलोकन करून मजशीं सुखाचे दोन शब्द तरी बोला ! त्या दुष्टानें आजपर्यंत आपणास व आपल्या मातोश्रींस अनिवार क्लेशांत ठेविलें, परंतु आज त्या क्लेशांचा अंत होऊन आपण आह्मां दीन प्रजांचे प्रभु व्हाल ह्मणून आह्मांस मोटी आशा होती, तिची आतांच निराशा करितां हें आपणास गोड वाटतें काय ? महाराज ! महाराज !-महाराज !—आईसाहेब ! आपण तरी आह्मांकडे कृपाकटाक्षानें अवलोकन करून आमचें शांतवन करा ! मातोश्री ! आपण इतके क्लेश सोसून शेवटपर्यंत निष्कलंक राहिलां, तेणेंकरून आह्मीं सर्वजण आपणास धन्य समजत होतों, व त्या दुष्ट अधम **दौलतरावाचा** उच्छेद करून आपणास सुख द्यावें ह्मणून आह्मीं त्यासाठींच कंबर बांधिली, परंतु आज तें सर्व व्यर्थ झालेंना ?—हायहाय ! महाराज ! महाराज !—आईसाहेब ! मातोश्री ! आपण जर आह्मां दीन लेंकरांच्या विनंतीकडे दुर्लक्ष करून आह्मांशीं भाषण न करितांच जाल, तर आह्मांस तरी इतःपर जगून काय कर्तव्य आहे ? महाराज ! आह्मीं सर्व येथल्या येथेंच आपल्या चरणापाशीं आपल्या प्राणांचा अंत करूं ! हरहर ! महाराज ! मातोश्री ! काय ही आपली स्थिति झाली आहे ? आपणास ह्या जखमा झाल्या आहेत त्यांतून केवढे हे रक्ताचे पाट चालले आहेत ?—आणि हा सर्व अनर्थ त्या एकट्या दुष्टामुळेंच झालाना ? हायहाय ! महाराज ! एक वेळ आह्मांकडे डोळे उघडून पहा आणि तो दुष्ट कोठें दडून बसला आहे तें आपणास ठाऊक असेल तर सांगा, ह्मणजे त्याचा गळा आतां चिरून टाकून त्याचा सूड घेतों !—अरेरे ! महाराज आह्मांकडे मुळींच पहात नाहींत, आमच्या मातोश्रींसही आमची एवढी सुद्धां कींव येत नाहीं. तर आतां त्यांच्याच चरणांपाशीं आपलें शिरकमळ अर्पण करून मरावें हें बरें ! ( अंमळ पुढें येतो. ) अरे ! पण हा काय प्रकार आहे ? इकडे अंधारांत आणखीही कोणी मरून पडलेलें दिसत आहे ? (दिवा पुढें करून) अरे काय? ही त्या दुष्टाची सद्गुणी कन्या **गजराबाई** ! तिचीही त्या दुष्टानें अशी अवस्था करून टाकिली काय ?—धिक्कार असो ! धिक्कार असो!—अहाहा ! राजकन्ये ! आपण केवढ्या अभाग्य, कीं जिवंत असेपर्यंत आपण ज्यांच्यावर इतकें प्रेम राखलें त्यांचा व आपला जिवंतपणीं नाहींच समागम झाला ! परंतु आपलें एक भाग्य मोठें कीं आपल्या हृदयवल्लभांचा व आपला मृत्युसमयीं तरी समागम झाला ! परंतु आह्मां पाप्यांच्या कपाळीं तेवढेंसुद्धां **ब्रह्मदेवानें** लिहिलें नाहीं ! असो. नशीब आमचें !—आजपर्यंत ज्यांच्यावर आशा ठेवून त्या दुष्टाची मीं कपटसेवा पत्करिली, तेच मज अभाग्याला सोडून गेले आतां वांचून तरी मला काय कर्तव्य आहे? आतां ह्या प्राणांचा अंत केल्याशिवाय परिणाम नाहीं ! ( इतक्यांत हिंमतराव व इतर मंडळी आंत येतात, त्यांस पाहून ) **हिंमतराव**! **मानाजीराव** ! गेलें हो गेलें ! सर्वांचा घात झाला ! त्या दुष्टानें पहा आपले **बाळमहाराज**, मातोश्री **राजसबाई**, व ह्या **गजराबाई** यांची काय अवस्था केली आहे ती!

अरेरे ! हिजकडे पहावत देखील नाहीं !
(सर्व शोक करूं लागतात.)

**हिंम०** व **माना०**—(कांहीं वेळानें) असो ! परमेश्वराची इच्छा! **मालोजी**! आतां झालेल्या गोष्टीबद्दल शोक करून काय कर्तव्य आहे? बोला ! बोला! तो दुष्ट अधम या वेळीं कोठें लपून बसला आहे बोला ! त्याचा—

**मालो०**—मलाही तीच पंचाईत पडली आहे ! तो दुष्ट माझ्या हातीं लागावा ह्मणून मी सर्व राजवाडाभर फिरलों, परंतु त्याचा कोठेंच थांग लागला नाहीं ! (इतक्यांत चपापल्यासारखा होऊन) अरे! पण तें पलीकडे अंधारांत आणखी कोणी पडलेलें दिसतें आहे! तो दुष्ट तर नसेलना? (पुढें होऊन दौलतरावास ओळखितो) आः दुष्टा ! भला सांपडलास ! आतां— (दांत ओंठ खाऊन त्यास मारण्याकरितां तरवार हुगारतो.) (इतक्यांत यशवंतराव कण्हूं लागतो. त्याबरोबर परत मागें वळून आनंदानें) महाराज ! आतां कण्हले तें आपणच ?— वाहवा! वाहवा! **हिंमतराव**! **मानाजीराव**! महाराज सावध होताहेतसें वाटतें ! अंमळ असा अंधार सोडा पाहूं ! (सर्व एका अंगास जवळ येतात.)

**हिंम०**—(आनंदानें) **मालोजीराव** ! आपणास परमेश्वरानें अद्यापि सोडलें नाहीं ! आपले **बाळमहाराज** जिवंत आहेत खचित ! (सर्वजण त्यास वारा घालूं लागतात.)

**माना०**—अरे ! येथें कोठें पाणी मिळेल तर बरें होईल! (इकडे तिकडे पाहूं लागतो.)

**यश०**—(अंमळ सावध होऊन कण्हत) कोण तें? **मालोजी**?—माझ्या नेत्रांपुढें अंधारी येऊन मला नीट ओळखतां येत नाहीं ! अंमळ असे खालीं वांका पाहूं ! (मालोजी वांकतो.) अं— आणखी ते कोण कोण दिसताहेत ?

**मालो०**—हे—**हिंमतराव** ! हे—**मानाजीराव** ! हे सर्व आपले शूर सरदार !

**यश०**—(आनंद झालासें दाखवितो व कण्हत कण्हत) हे सर्व शूर सरदारहो ! आतां मी तर मरतोंच, परंतु माझें शेवटचें ह्मणणें लक्षपूर्वक ऐका ! तुह्मां सर्वांच्या जिवावर मी आजपर्यंत दिवस काढिले. माझ्या प्रियजनांनींही अतोनात हाल सोशिले, त्या सर्वांचें चीज होऊन या हतभाग्य देशांत या डोळ्यांदेखत सर्व लोक पूर्वींप्रमाणें आनंदानें राहतील ह्मणून मोठी आशा होती. परंतु ती सफल होण्याचें माझ्या नशिबीं नाहीं ! परमेश्वराची इच्छा ! ही माझी प्रिय जननी, व ही माझी प्राणप्रिया—ह्या तुमच्या स्वामिणी होऊन त्यांचे आशीर्वाद तुह्मांस मिळावेत, परंतु ते देवाच्या इच्छेनें नाहीं मिळाले! असो. (राजसबाई व गजराबाईचें कण्हणें ऐकूं येतें, यशवंतराव उभयतांस प्रेमानें आलिंगन देऊन अश्रु ढाळितो. सर्वांच्या नेत्रांतून अश्रु चालतात.) वाहवा ! वाहवा ! मित्र हो ! या दोघींचे व माझे आपणा सर्वांस निरंतर आशीर्वाद आहेत ! **दौलतरावानें** आपणा सर्वांस दुःख दिलें, परंतु त्याबद्दल त्यास पश्चात्ताप होऊन मी त्यास त्याच्या सर्व अपराधांची क्षमा केली आहे, त्याच्यावर तुमचा राग नसावा! त्याला आतां मी आपला मित्र समजतों ! पहा बरें, तो जिवंत आहे कीं काय तें ! (सर्व त्याप्रमाणें करितात.)

**सर्व**—(डोळ्यांतून अश्रु आणून) काय महाराजांचें औदार्य हें ! महाराज ! आपला शत्रु जिवंत नाहीं !

**यश०**—(कण्हत कण्हत) बाबांनो ! आतां असें नका बोलूं ! मीचना तो माझा मित्र आहे ह्मणून ह्मटलें ? असो ! **मालोजी** ! **हिंमतराव**! **मानाजीराव**! **दौलतरावाला** पुढें आणून असा त्याच्या कन्येपाशीं ठेवा !

( सर्व त्याप्रमाणें करितात. ) आतां आह्मीं सर्व मरतों आहों, ह्यासाठीं आमचा उत्तर विधि नीटपणें उरकून आह्मां सर्वांच्या अस्थि **काशीस भागीरथी**जलांत टाकण्यास चुकूं नका ! मित्रहो ! तुह्मां सर्वांच्या दयेनें मी इतके दिवस जिवंत राहिलों, व आज माझ्या मातोश्रीचा आणि या प्रियेचा माझा समागम घडला, यास्तव आतां हें सर्व राज्य तुमच्या स्वाधीन करितों ! त्याची यथास्थित व्यवस्था करा !—**मालोजी**! तुह्मीं राज्यपद घ्या ! **मानाजीराव** ! आपण दिवाणगिरी पत्करा ! व **हिंमतराव** ! तुह्मीं सेनापति व्हा आणि सर्व राज्याचा बंदोबस्त करा !—आतां माझ्यानें जास्ती बोलवत नाहीं ! हीं पहा माझी बोटें गार पडूं लागलीं आहेत ! मित्र हो ! आतां दया लोभ ठेवा ! माझा शब्द आंत ओढूं लागला !—राम ! राम!—

**यश०, राज०** व **गज०**—( शेवटीं मोठ्यानें ) राम !

( पडदा पडतो. )

---

**समाप्त.**

## अंक ३.

(तदनंतर जागरणानें नेत्र ग्लान होऊन आस-नावर विचार करीत बसलेला वसंतक येतो.)

**वसं०**–(आपणाशीं) अहो! मंत्रीपणाचा अधिकार मात्र मोठा, वस्तुतः त्यांत सुख नाहीं! पहा,

श्लोक.

दाताही आश्रयाचा असुनि नृप, तयीं अल्प विश्वास नाहीं;
सेवा अंतःपुराची अवहित मतिनें ती करावी सदाही;
राजाने त्यापरी जे प्रणयि असाति त्यां सर्वदा मान द्यावा;
रंध्रैषी आपुले जे, व्यवसित अवघा मार्ग त्यांचा पहावा;
आश्वासावें भटांतें धरिति निजकरीं सर्वदा जे असींतें;
द्यावें लक्षा सुपूर्णा निजपरविषयोदंतही जाणण्यातें;
द्रव्याचा आय आणि व्यय सतत अहो मेळ त्यांचा पहावा;
सौख्याचा लाभ ऐशा स्थितिंत नचि कळेकेंविमंत्र्यास व्हावा!

(स्मरण झाल्यासारखें करून) नीतिशास्त्रवेत्त्या कवीनें जें ह्मटलें आहे तें अगदीं बरोबर आहे!

श्लोक.

तो राजा, व्यसनें त्यजूनि सकळें जो भूतळा शासितो;
तो मंत्री, हित भूप आणि जनता यांचेंहि जो साधितो;
तो सेनापति, जो भटां झटतसे साहाय्य द्याया रणीं;
जो जाणे प्रिय आणि युक्त वदण्या तोची सभासन्मणी.

तसेंच,

साक्या.

नेणे प्रभुशक्तीतें राजा; सचिव न नीती जाणे;
धिकारितिही सभ्य परस्पर उपकारातें करणें;
सेनानायक रणीं अरीतें जिंकाया असमर्थ;
स्मृतिशास्त्राचा प्राड्विवाकही बोलति सोडुनि अर्थ;
अधिकारीही कुलीन नसती; ऐशी ज्या राज्यांत
स्थिती, न येई रहावयाला सुज्ञा कधिंही त्यांत.

(विचार करून) एकदा नोकरी पत्करल्यावर मग ती पामून पुढे त्रासही होऊं लागला, तरी त्याबद्दल वाईट वाटून काय उपयोग*? ही गोष्ट तर अंगावर पडली आहे, यास्तव ती कशी तरी सोसली पाहिजे. कारण,

श्लोक.

सौधस्था असतां अधीं सहज जी दृग्गोचरा जाहली,
पाहायास विशेष नंतरि रती ती नंदनीं धावली;
तेव्हांपासुनियां तियेवरि दृढ प्रेमाप्रती ठेवुनी,
झालासे अतिमात्र विव्हल विभू पुष्पैकधन्वा मनीं!
होते प्राप्ति तिची कशी ह्मणवुनी चिंता मनीं वागवी;
तीवांचूनि न अल्प कार्यहि सुचे;–ऐशी स्थिती हे नवी
होऊनी, मजसारिखे बहु दृढप्रेमें सदोपासिते
जे का भक्त, न त्यांवरी प्रकटवी तो पूर्विच्या प्रीतितें!

असो! **भगवतीची** अंतेवासिनी जी **वशिनी** तिजकडून मला असें कळलें आहे कीं आमच्या **मन्मथ** महाराजांवर **रतीचें** अत्यंत प्रेम जडलें आहे! झालें तर, आतां या उभयतांचा समागम घडणें ही गोष्ट उपायसाध्य आहे यांत संशय नाहीं!

श्लोक.

होई उत्पलिनी त्यजूनि शशितें अन्यत्र आसक्त न,
तोही सोडुनि तीस अन्य विषयीं स्थापीत नाहीं मन,
वासंती सहकार, सूर्य नलिनी, हें जोडपें साजतें;
अन्योन्यानुगुण स्त्रिया नर जरी, दांपत्य तें शोभतें.

* ह्या ठिकाणीं मूळांत "गृहीतभृतेः किमनतिगताध्वनो विविधभारनिर्वेदेन" असा लेख आहे, त्याचा शब्दशः अर्थ नीट समजत नाहीं. आह्मी अजमासानें भाषांतर केलें आहे. 'अनतिगताध्वनः' यांतील 'अन्' या नकारार्थाचें स्वारस्य कांहींच कळत नाहीं. याकरितां तो शब्द भाषांतरांत अजीबात गाळला आहे.

१. अवधानयुक्त अशा (बुद्धीनें), अर्थात् सावधपणें. २. छिद्रें पाहूं इच्छिणारे. ३. 'व्यवसित मार्ग' ह्म. (आपले शत्रु) काय करितात तें ४ खड्गांस ५. आपल्या व शत्रूंच्या विषयाचा (=देशाची) उदंत (=बातमी). ६. जमा. ७. खर्च. ८. जनसमूह. ९ सभासदांत श्रेष्ठ, उत्तम सभासद. १०. न्यायाधीश.

१. गच्चीवर बसलेली. २. नंदनवनांत. ३ प्रभु. राजा. ४. पुष्प हेंच आहे एक धनुष्य ज्याचें असा, मदन. ५. सदा–उपासितें=सदा उपासना करणारे ह्म चाकर. ६. चंद्रविकासी कमल. ७. आम्रवृक्ष. ८. सूर्यविकासी कमल. ९ परस्परास योग्य. १०. दंपतीपणा, लग्नसंबंध. अर्थात् 'स्त्री पुरुष'.

तसेंच, भगवान् **विष्णूनें बृहस्पति** गुरूस **रती**च्या मातापितरांकडे पाठविलें होतें, त्याजपाशीं उभयतांनींही आपण आमच्या **कुसुमचाप** महाराजांस **रति** देण्यास इच्छितों ह्मणून कबूलही केलें आहे. परंतु मीं गुप्तपणें बातमी काढण्याकरितां जे दूत पाठविले होते, त्यांनीं तर मला प्रतिकूल वार्ता कथन केली आहे, ती अशी कीं **शंबरासुरा**करितां **रति** मागण्यासाठीं **परशुराम**-शिष्य **बाष्कल** तिच्या पित्याकडे गेला असतां त्यानें "बाबारे! आमच्या कुळांत कन्येला अभिमत अशाच वरास ती देण्याचा संप्रदाय आहे!" असें नकाराच्याच तोडीचें त्यास उत्तर दिल्यामुळें **बाष्कल** खजिल होऊनच परत गेला! ह्यासाठीं ज्याची माया दुस्तर, अशा **शंबर** दैत्यापासून या कामीं अडथळा घडेल हा विचार मनांत येऊन माझ्या जिवास समाधान नाहींसें झालें आहे! परंतु अवर्षण पडेल ह्मणून कृषिकर्म मुळींच कोणीं टाकून दिलें असें कधीं होत नाहीं, किंवा मधुमक्षिका येऊन मध खाऊं पहातील ह्मणून मध साठविणेंही कोणी टाकीत नाहीं, त्याच प्रकारची ही गोष्ट आहे! यासाठीं उदासीनपणा टाकून कोणतीही वस्तु मिळण्याविषयीं खटपट करावी ह्मणजे ती प्राप्त झाल्यावांचून राहत नाहीं!—सर्व लोकांमध्यें एकधनुर्धर असे जे आमचे स्वामी, त्यांना **शंबरा**चा पराभव सहज करतां येण्यासारखा आहे; परंतु दुसरें एक कार्य उत्पन्न झालें आहे, तें मात्र टाळतां येण्यासारखें नसून त्यापासून कांहीं तरी वाईट परिणाम होईल असें वाटत आहे! कारण **ब्रह्मदेवाच्या** वरेंकरून प्रबल झालेले जे **शूरपद्म**-प्रभृति असुर, त्यांनीं स्वर्गलोकावर हल्ला करून **देवेंद्रा**चा पराभव केला, यास्तव **बृहस्पती**च्या अनुमतानें, सर्व दुष्ट शत्रूंचा नाश करण्याविषयीं समर्थ होणारा जो **कार्तिकस्वामी** त्याची उत्पत्ति होण्याचा उपाय योजण्याचा **देवेंद्रानें** निश्चय केला आहे; व तो उपाय एवढाच आहे कीं, सांप्रत **हिमालय** पर्वतावर भगवान् **अंतकांतक**[1] तपश्चरण करीत आहे, व त्या **हिमालयाची** कन्या **पार्वती** ही त्याचें आराधन करीत आहे, तर त्या उभयतांचा संयोग व्हावा. हा संयोग करण्याचें काम आपला अनुजतनुज[2] ह्मणजे आमचे महाराज **मन्मथ** यांच्या हातून तडीस जाण्यासारखें आहे. यास्तव याबद्दलचा सर्व कार्यभार आमच्या महाराजांवर सोंपविण्याचा विचार करून आतांशीं **महेंद्र** त्यांचा फार आदरसत्कार करीत असतो. (विचार करितो, व भीतीनें अंगाचा थरकांप होऊन) परंतु,

श्लोक.

कंठीं दुःसह कालकूट धरि जो; यल्लोचनस्थानल[3]
दर्पांधांधकदाहहेतु[4]; चरणीं तो लीन लंकेश्वल[5];
क्रोधें नाशि यमा, पुरत्रय[6] तसें हासें; प्रभू यापरी
तेजस्वी जित केंवि होउ, धरि जो वेधात्रशीर्षा[7] करीं?

(विचार करून) धिक्कार असो. सर्व चाकरींत शिपाईगिरीची चाकरी फार वाईट! कारण पहा.

---

१. अंतक ह्म. यम, त्याचाही अंत करणारा, सांब. २. धाकट्या भावाचा (=विष्णूचा) पुत्र (=मदन). ३. ज्याच्या नेत्रांतील अग्नि. ४. दर्पानें ह्म. गर्वानें अंध झालेला जो अंधक (दैत्य विशेष) त्याच्या जळण्याचें कारण. ५. लंकेश्वर रावण. संस्कृतांत 'ल' आणि 'र' ह्यांचें सावर्ण्य आहे, ह्मणजे परस्परांचा परस्पराबद्दल उपयोग करितां येतो. ६. तीन पुरनामक दैत्य (त्रिपुर). ७. विधात्याचें ह्म. ब्रह्मदेवाचें मस्तक.

श्लोक.

कोताही तरुणी, सुशोभित असें सूत्तुंगही मंदिर,
चेतोहारि अपत्यही, धनदसा संपत्तिचा विस्तर,
देहाचीहि अरोगता, वपुहि तें लावण्यशाली महा,–
हीं सारीं असुनी क्षणांत न अशीं होतात शस्त्र्या अहा!

अथवा, मीच उगीच या अनिष्टाची शंका मनांत आणून काय उपयोग? परदेवतेचा प्रसाद हाच आमच्या स्वामींचें कल्याण करील! (चोंहीकडे पाहून) अरे! मी हा एकसारखा विचार करीत बसलों असतां रात्र जाऊन पहाट देखील झाली! पहा!

आर्या.

पाहुनियां स्वपतीचें प्रेम अहा वारुणीदिशेवरती,
रोषें जणुं हे रात्री त्यजि ताराहार मत्सरें परती!

आणखी,

श्लोक.

वाटे दूर झुगारिली पसरली पृथ्वी; दिशा जाहल्या
त्या विस्तीर्ण; जणो धरासरणि त्या प्रेग्यग्र कीं निर्मिल्या;
हा आला उदया रवी तइं जणों लोकांस चक्षू नवें
झालें प्राप्त; जुनें हि नूर्नं सृजिलें जाणों जगद्भूसवें.

यावेळीं मला असें वाटतें!

साक्या.

निद्रायोगें नेत्रतारका जड ऐशा दिसताती;
होउनि बुचडे सैल गळोनी स्कंधावरि पडताती;
स्तनावरूनी पदर खालती सरकुनियां पडताती;
ग्रंथि निऱ्यांच्या सईल होती; जृंभा वरिवरि येती;
झणझण वाजति रत्नभूषणें; उठावया दावीती
इच्छा ललना; परि सुरतेच्छा पतिच्या वाढविताती!

(आश्चर्ययुक्त होऊन)

श्लोक.

रात्रीं दुःस्थिति पावल्या त्यजुनियां कल्हारसंघाप्रती
गेले जे भ्रमरादि, ते परतुनी निर्लज्जते मागुती
येती. सांप्रत पाहुनी विकसलीं पद्में यथात्मोत्सव
त्यातें हे उपभोगिती;–जन खरा संपत्तिचा बांधव!

तर आतां मीही आपला संध्याविधि आटोपून स्वामींची सेवा करण्याच्या वेळेची वाट पहात बसतों!

(असें म्हणून आंत शिरतो.)

(तदनंतर कंचुकी प्रवेश करितो.)

**कंचु०**–(उद्विग्न होऊन आपणाशीं) परपिंड भक्षण करून उपजीवन करणारांस धिक्कार असो!

श्लोक.

ठेवावें निजवश्य इंद्रियगणा; कीजे मनःसंयम;
निद्रा भक्षण अल्प; चित्त न बहू भोगावरी; हा क्रम
राखावा चिरकाल; संशय असो अंतःपुरीं मोणना;
हीं सारीं घडतां निवृत्ति बरवी वाटे कुणाच्या मना!

(निंदेनें) अथवा पोट जाळण्याकरितां रात्रंदिवस लोळणाऱ्या कुत्र्याप्रमाणें क्षणभर जो मला हा लटका उपदेश सुचत आहे तो पुरे! असो! आतां स्वामींच्या आज्ञेप्रमाणें वागावें! (पुढें पाहून) हें वसंतक अमात्याचें घर! (आंत शिरून चोंहीकडे दृष्टि फेंकून) अहो! आमच्या प्रधानजींचा केवढा हो हा अधिकार तरी!

श्लोक.

येथें बैसति सभ्य; राजपुरुषाधिष्ठान येथें असे;
सेनानीहि इथें; इथेंहि शतशा हे दूत गोळा कसे;
येती चिंतुनि कार्य अन्य जन तीं हें व्याप्त बाह्यांगण;
साम्राज्या धरि भूवरी सचिव हा श्वेतातपत्राविण!

(कोणाकडून अडथळा न होतां आंत वसंतक होता त्याजवळ जाऊन त्यास मुजरा करून) प्रधानजी! आमच्या महाराजांस देवेंद्रानें

---

१. फारच उंच. २. मनोहर. ३. कुबेरासारिखा ४. पश्चिम. ५. पृथ्वीवरील रस्ते. ६–७. नवीन. ८. उत्पन्न केलें. ९. कमळाचा समूहास.

१. आपणास वाटेल त्या रीतीनें, यथेच्छ. २. श्वासोच्छ्वास टाकण्यास. ३ मोक्षपद. या श्लोकांतील सर्व भाग द्व्यर्थी आहे. म्हणजे एक अर्थ कंचुकीच्या सेवेच्या स्थितीकडे, व दुसरा योगसाधनानें साध्य होणाऱ्या मोक्षसुखाकडे लागतो ४. सेनापति. ५. तिहीं, त्यांनीं. ६. शुभ्रवर्ण राजछत्राशिवाय.

पाचारण केलें आहे, ह्मास्तव ते आपल्या दर्शनाची इच्छा करीत आहेत !

**वसं०**—फार उत्तम ! हा मी सिद्ध होऊन तुझीच वाट पहात होतों ! (असें बोलून कंचुकी सहवर्तमान निघून जातो.)

(हा शुद्ध विष्कंभक झाला.)

(तदनंतर वसंतक प्रधान व कांहीं थोडे सेवक इतरांसहवर्तमान मन्मथ येतो.)

**मन्म०**—(आपणाशीं) कल्याणें हीं आपणास ज्या वेळीं पाहिजे असतात त्या वेळीं कदापि प्राप्त होत नाहींत ! कारण मी आणि **रति** या उभयतांचें परस्परांवर प्रेम आहे हें ऐकून गुरुजनांनीं उभयतांचा विवाह थोडक्याच दिवसांत करून टाकावयाचा निश्चय केला असतांही, मध्येंच हें देवकार्य उत्पन्न झालें, आणि हें तर अवश्य केलें पाहिजे ! ह्मामुळें,

श्लोक.

एकीकडे आदर हे धन्याचे,
दुजीकडे हे गुण मत्प्रियेचे,
दोहींकडे ओढिति दोन मातें —
दोल्यापरी चित्त मदीय होतें !

(खिन्न होऊन) असो ! या हतभाग्य **मन्मथाला** असाच निरंतर ताप होत राहिला तर राहो बिचारा; परंतु माझ्याकरितां त्या सुंदरीला मात्र अत्यंत दुःख होईल ही गोष्ट मनांत येऊन माझा संताप अतिशयच वाढत आहे !

श्लोक.

सोसायास समर्थ होइल मृगी दावानलातें कशी ?
वासंती अथवा प्रचंड चपलावन्हीप्रती ते तशी ?
किंवा कैरविणी निदाघरविचें तीव्रोष्ण सोसावया?
सोसू केंवि मुहूर्तही विरहजा तापास ती माझिया ?

१. झोपाळ्याप्रमाणें. २. चपला (वीज), तिचा अग्नि. ३ कमलिनी. ४. उष्णकाळच्या सूर्याचें.

(विचार करून) अथवा परतंत्र पुरुषानें सुखाचा अभिलाष तरी कशाकरितां धरावा ? (उघडपणें) प्रधानजी ! आमच्या **इंद्र** तातांनीं आपला मनोदय मला काल रात्रींच कळविला असें असून त्यांनीं आज सकाळींच माझें स्मरण कशाकरितां केलें असावें बरें ?

**वसंतक**—महाराज ! समर्थांनीं आपल्या कर्तव्यास वेळ लावूं नये, ह्मणजे अर्थ सिद्धि निश्चित घडते !—परंतु हें काम तर फार कठीण आहे, व एकादे वेळीं अनर्थही ओढवण्याचा संभव आहे, असें असून या कामीं भगवान् **सहस्राक्षांनीं** आपलीच योजना केली आहे, यामध्यें त्यांची आपल्याच कार्यावर मात्र दृष्टि दिसून येते!

**मन्म०**—प्रधानजी ! आपण असें नका ह्मणूं !

आर्या.

उक्त अनुक्त कसेंही, साध्य असो कीं असाध्य, भृत्यानें
योग्यायोग्य विचार त्यजुनि नृपतिकार्य कार्य नेमानें.

आणखी पहा,

श्लोक.

दे वायूहुनिही जवी हय असे, उन्मत्त दंती महा;
दे नाना उपभोग; देउनि धना चिंतेस नाशी अहा !
दे संमानहि ज्यापुढें अधिकतें कांहींच ना राहतें;
त्या स्वामीस्तव हे तनूहि त्यजिणें अत्यल्पसें वाटतें.

**वसं०**—(नम्रतेनें) महाराजानीं यथायोग्य भाषण केलें !

**मन्म०**—(इकडे तिकडे फिरून) हें **महेंद्राचें** मंदिर ! आतां आंत जावें ! (असें ह्मणून वसंतकासह आंत प्रवेश करितो.)

**वसं०**—(इंद्रसभा अवलोकन करून अत्यंत विस्मयानें आपणाशीं)

१ करण्यास योग्य (आहे), अर्थात् तें त्यानें करावें २. वेगवान्.

# अतिपीडचरित नाटक.

## अंक १.

### प्र० १.—राजवाड्यांतील दरबाराच्या बाहेरील चौक.

(कांतिवर्मा, चंडवर्मा व मरुत्सेन येतात.)

**कांति०**—काय हो ? पण हें कसें ? आपल्या महाराजांची **खलदर्शना**पेक्षां **सुदर्शनावर** अधिक ममता होती असं मी समजत होतों, परंतु तसा कांहीं प्रकार दिसत नाहीं !

**चंड०**—आह्मींही. पण असेंच समजत होतों ! परंतु आतां राज्याची वाटणी होतांना आपले महाराज या दोघां मांडलिकांतून अधिक कोणाला समजतील कांहीं सांगतां येत नाहीं ! दोघांचीं बाहेरचीं नांवें मात्र निराळीं, परंतु गुण व संपत्ति उभयतांचींही सारखींच आहेत असें वाटतें ! यामुळें ही वाटणी कशी काय होणार कांहीं समजत नाहीं !

**कांति०**—असो, समजेल काय होईल तें ! बरें, पण हे कोण ? आपले चिरंजीवच नव्हेत का ?

**चंड०**—( डोळे मिचकावीत ) होय. अशांतलाच कांहीं प्रकार खरा ! हा माझाच पुत्र, व आजपर्यंत ह्याचें पालनपोषणही मींच केलें, परंतु हा काळपर्यंत ह्याला आपला पुत्र असें उघडपणें कबूल करणें ह्मणजे मला कसेंसेंच वाटे ! पुष्कळ वेळां मनांत येई, याला उघडपणें मांडीवर घ्यावें, परंतु लोकलज्जेस्तव फिरून फिरून मन मागें घेई ! परंतु ती लज्जा आतां चट सारी सोडून द्यावयाचेंच मीं मनात आणिलें आहे ! तुह्मांला सांगावयास कांहीं अडचण नाहीं ! खरें पुसाल तर हा माझा लेकवळा आहे. मला ह्याशिवाय आणखी निराळा औरस पुत्रही आहे. व तो वयानें यापेक्षां कांहीं दोन तीन वर्षांनीं मोठा असेल ! परंतु असें आहे ह्मणून माझी याच्यावर कमी प्रीति आहे असें नाहीं ! **गुलाम** सातां महिन्यांचाच बाहेर पडला ! तरी त्याचा कांहीं विचार नाही! याची आई फार सुरेख होती, आणि माझें तिच्यावर प्रेमही अतोनात होतें. ह्मणून याच्याकरितां नाहीं तरी तिच्याकरितां तरी मी आतां ह्याला आपला ह्मणणार ! कां **मरुत्सेन** ! हे गृहस्थ कोण, ओळखलेस ?

**मरु०**—नाहीं बाबा !

**चंड०**—( लाडानें ) गुलामा ! मला इतक्यांतच लागलास कां उघडपणें बाबा बाबा ह्मणून हाका मारायला ? तें असो. बरें, पण, यांचें नांव **कांतिवर्मे** ! हे **प्रमलेश्वर**चे सरदार, यांचा आमचा लहानपणापासून ऋणानुबंध आहे !

**मरु०**—( कांतिवर्म्यास ) मी आपला सेवक सदा सेवेंत तत्पर आहें!

**कांति०**—वा: ! **चंडवर्मजी** ! आपले चिरंजीव चतुर आणि मृदुभाषीही आहेत ! कां **मरुत्सेनराव** ! आतां आमची ओळख विसरूं नका बरें?

**मरु०**—( किंचित् हंसून नम्रपणें ) माझा परामर्श घेणें आपणाकडेच आहे !

**चंड०**—हा दहा वर्षांचा झाल्यावर आज आठ नऊ वर्षें बाहेरच होता, आणखी आतांही हा फिरून बाहेर लौकरच जाईल !

( इतक्यात आतून भालदाराची ललकारी ऐकू येते. )

**( राजाधिराज सिंधुदेशाधिपति अतिपीडराज महाराज ! )**

**चंड०**—हां, दरबारांत महाराजांची स्वारी येऊन बसली वाटतें ! चला चला ! ( सर्व जातात. )

---

### प्र० २.—अतिपीड राजाचा दरबार.

( अतिपीड राजा सिंहासनावर बसला आहे, डाव्या अंगास खलदर्शन व सुदर्शन हे मांडलिक राजे आसनावर बसले आहेत. उजव्या अंगास राजाच्या तीन कन्या शशिकला, चंद्रानना व मृगांकमाला तोंडावरून बुरखे घेऊन बसल्या आहेत. दोन्ही बाजूंस प्रधान, सेनापति, कांतिवर्मा, चंडवर्मा वगैरे सरदार मंडळी बसली आहे. राजा हास्यमुख करून सर्वांचे मुजरे व नमस्कार घेतो, व नंतर )

**अति०**—चंडवर्मन् ! तुम्हीं **सौराष्ट्राधिपति राजवाहनराज** व **मगधाधीश सुखापीड** यांस सामोरे जाऊन उभयतांस सत्कारपूर्वक येथें घेऊन या! ( चंडवर्मा नमस्कार करून जातो.) प्रधानजी ! आजचा हा दरबार भरविण्याचें कारण पूर्वींच सर्वांस थोडें बहुत जाहिर करण्यांत आलें आहे, यासाठीं आतां एकवार तें समग्र बोलून दाखवावें असें मनांत आहे. याबद्दल तुमचा कसा काय अभिप्राय आहे ?

**प्रधा०**—( नम्रतेनें ) महाराजांचा विचार यथायोग्यच आहे.

**अति०**—हे माझ्या प्रियकन्यकांनो ! हे सर्व शूर सरदारहो ! तसेच आमचे प्रिय मांडलिक **खलदर्शन** आणि **सुदर्शन**हो! तुम्हीं सर्वजण माझें भाषण लक्षपूर्वक ऐका ! या सिंधुदेशावर आज चाळीस वर्षेंपर्यंत मीं एकछत्री राज्य केलें ! नानाप्रकारच्या राजविलासांचा उपभोग घेतला ! व यथाशास्त्र यथान्याय प्रजापालनही केलें ! अगणित संपत्तीचें अर्जन करून सर्व देशांत पण आबादानी करून सोडिली आहे ! माझी कोणची एक इच्छा पूर्ण व्हावयाची राहिली असा प्रकार नाहीं. तथापि मनांत एक इच्छा होती ती हीच कीं, आपणास एकवार तरी पोटीं पुत्रसंतान व्हावें, परंतु परमेश्वराचे इच्छेनें तेवढी इच्छा मात्र सफळ झाली नाहीं ! ही इच्छा पूर्ण व्हावी म्हणून मीं तीन वेळ विवाह करून पाहिलें, परंतु तें सर्व व्यर्थच गेलें ! असो. पुत्रसुख अनुभविण्याचें माझ्या नशिबींच विधीनें लेखन केलें नाहीं, तथापि त्याच्याच दयेंकरून माझ्या प्रिय महिषींच्या उदरीं अनुक्रमें ह्या सद्गुणसंपन्न कन्यका मला प्राप्त झाल्या आहेत ! माझी ज्येष्ठ महिषी **प्रमति**, इच्या उदरीं ही मला **शशिकला** कन्या झाली, माझी मध्यमा प्रिया **वसुमती** हिच्या उदरीं ह्या **चंद्राननेचें** जनन झालें, व माझी कनिष्ठ पत्नी **सुमति** ह्या **मृगांकमालेस** प्रसवली. दुर्दैवानें माझ्या तिघी प्रियांचा अकालींच अंत झाला ! तेव्हांपासून या माझ्या प्रियकन्यांस मींच मातृस्थानीं होऊन त्यांचें आजपर्यंत यथास्थित संगोपन केलें ! आतां या तिघीही उपवर झाल्या आहेत, याकरितां आतां यांस अनुरूप पतींच्या स्वाधीन करून आपण कृतार्थ व्हावें असा विचार मीं मनांत आणिला आहे; व शिवाय मी आतां वयानें फार नाहीं तरी साठीच्या जवळ जवळ आलों आहें,

व पोटीं पुत्रसंतान नाहीं व आतां होण्याची आशाही नाहीं, यासाठीं आपल्या उत्तमगुण जामातांसच आपलें सर्व राज्य कन्यावरण-कालीं अर्पण करावें व आतां आपण आपले म्हातारपणाचे दिवस सुखानें **हरिहरि** म्हणण्यांत काढावे असा माझा दृढ संकल्प आहे! माझ्या तिघां जामातांनीं पुढें मागें कोणच्याही कारणावरून आपआपसांत भांडण काढूं नये एतदर्थ या माझ्या राज्याच्या मी होऊन आज वाटण्या करून देणार! माझ्या अफाट राज्याचें हें चित्र मीं हातांत धरिलें आहे! **खलदर्शन**राव! आपणास ही माझी कन्या **शशिकला** व हा **पंचगांग** प्रदेशापैकीं उत्तर भाग देण्याचा माझा विचार आहे. तसेंच **सुदर्शन**राव! ह्या **सिंधु**प्रांताचा हा मध्य प्रदेश तुम्हांला या **चंद्राननें**बरोबर अर्पण करण्याचा माझा उद्देश आहे. रहातांपैकीं ही माझी कनिष्ठ कन्या **मृगांकमाला** राहिली, तिजकरितां **सौराष्ट्रा**धिपति **राजवाहन** व **मगधाधीश सुखापीड** या उभयतांच्या मागण्या येऊन पडल्या आहेत, तेव्हां या दोघांपैकीं कोणा तरी एकास **मृगांकमाला** अर्पण करून तिच्या पतीला हा येथून येथपर्यंत **सिंधु**मुखाजवळचा प्रदेश देण्याचा माझा मानस आहे! आतांपर्यंत माझ्या तिन्ही कन्यांचें मजवर सारखेंच प्रेम आहे असें मी समजतों आहें, तथापि या वेळीं या सर्वांच्या प्रेमाची परीक्षा करून जिचें जसें मजवर अधिक किंवा कमी प्रेम आहेसें मला वाटेल, त्याप्रमाणें तिच्या वाटणीस अधिक किंवा कमी प्रदेश घालण्याचें मीं मनांत आणिलें आहे! असो. आतां मीं सर्वांच्या प्रेमाची परीक्षाच घेतों!—हं हे माझे ज्येष्ठ कन्ये **शशिकले**! उठ उभी रहा, आणि तुझें मजवर किती प्रेम आहे तें मला उघडपणें बोलून दाखीव!

**शशि०**—बाबा! माझें तुम्हांवर जें प्रेम आहे तें मला शब्दांनीं पुरतें बोलूनही दाखवितां येईलसें मला वाटत नाहीं. फार काय सांगूं? या जगांत जेवढ्या म्हणून उत्तम उत्तम वस्तु आहेत त्या सर्वांपेक्षां आपण मला अधिक प्रिय आहां! मी इतकी सुंदर आहें, तथापि माझें आपणावर जितकें प्रेम आहे, तितकें माझ्या सौंदर्यावरही नाहीं! या जगांत जेवढें म्हणून सुवर्ण आहे, किंवा जेवढ्या म्हणून हिरे, पांच, पुष्कराज इत्यादिक रत्नांच्या खाणी आहेत, तेवढ्या सर्व जरी मला कोणीं दिल्या आणि मला आपणांवर प्रेम करूं नको म्हणून सांगितलें, तरी मी त्या सर्वांसही लाथ मारीन! मी कशाची ही पर्वा करणार नाहीं!

**मृगां०**—(आपणाशीं) शिव शिव! **मृगांकमाले!** तूं मात्र अधन्य खरी! तुझ्यानें आपलें प्रेम तिखट मीठ लावून वर्णन करणें होणार नाहीं! यास्तव तूं अशीच स्तब्ध रहा! दुसरें काय?

**अति०**—(आनंदानें) वाहवा! वाहवा! **शशिकले**! तूं धन्य आहेस! **खलदर्शन**राव! उठा ही आपली वधू संभाळा! हा आतां दाखविलेला प्रदेश तुम्हांला व तुमच्या हिजपासून होणाऱ्या प्रसूतीला मी अक्षय देतों हा घ्या!—बरें आतां माझे लाडके **चंद्रानने**! तूं उभी रहा, आणि तुझें मजवर किती प्रेम आहे तें बोलून दाखीव पाहूं!

**चंद्रा०**—बाबा! अक्का बोलली तेंच माझें अ-

क्षरशः ह्मणणें आहे! तथापि तिच्यापेक्षां मला जास्ती तें इतकेंच सांगावयाचें आहे कीं, ती नुसतें सुवर्ण आणि रत्नें यांजबद्दलच बोलली, परंतु आपणावर माझें अत्यंत प्रेम आहे यामुळें माझ्या जिवाला जो कांहीं आल्हाद होत आहे तो माझ्यानें बोलूनही दाखवितां येत नाहीं! बाबा! मला आपणावर निष्कपट प्रेम करावें यापेक्षां दुसरीं सुखें ह्मणजे काय हें माहित देखील नाहीं! व जरी असलें तरी तीं सर्व सुखें मी विषतुल्यच मानितें!

**मृगां०**—(आपणाशीं) झालें तर! **मृगांकमाले**! तुझ्या नशिबाची परीक्षा झाली! असो. कांहींही होवो, माझ्या बहिणींप्रमाणें माझ्या-नें वरपांगीं बोलणें व्हावयाचें नाहीं! तथापि या दोघींपेक्षांही माझें प्रेम अधिक आहे हेंच खरें!

**अति०**—(अधिक आनंदानें) वाहवा वाहवा! मी केवढा भाग्यवान् कीं माझ्या प्रियकन्यांचें मजवर इतकें प्रेम आहे! वाहवा!—**चंद्रानने**! फार चांगलें भाषण केलेंस! **सुदर्शन**राव! ही घ्या आपली वधू आणि आपल्या वाटणीचा प्रदेश! **खलदर्शन**रावाला जेवढा प्रदेश दिला आहे त्यापेक्षां हा कमी समजूं नका हो! या दोहोंचा विस्तारही तेवढाच असून संपत्तीच्या मानानेंही दोन्ही सारखेच आहेत! बरं, बाळे **मृगांकमाले**! आतां तूंच मात्र बोलावयाची राहिली आहेस, तर तेवढी बोल आणि या ह्मातार्‍याच्या जिवाला ब्रह्मानंदसुखाचा अनुभव घडूं दे ह्मणजे झालें! तसेंच, सर्वांत तूं माझी अधिक आवडती कन्या आहेस, याकरितां तुझ्या वांट्याला हा अधिक सुखसंपत्तीनें भरलेला प्रदेश घालावयाचें माझ्या मनांत आहे. याकरितां बोल पाहूं तुझें मजवर किती प्रेम आहे तें?

**मृगां०**—बाबा! मी काय बोलूं? मला कांहीं बोलतां येत नाहीं!

**अति०**—काय? तुला बोलतां येत नाहीं?

**मृगां०**—नाहीं बाबा!

**अति०**—तूं जर कांहींच बोलणार नाहींस तर तुला मजकडून कांहीं मिळावयाचें नाहीं! नीट विचार कर!

**मृगां०**—केला बाबा! माझें नशीबच फुटकें, त्याला मी काय करूं? अक्का आणि ताई यांच्यासारखें मला माझें प्रेम कांहीं बोलून दाखवितां येत नाहीं! माझें प्रेम आपणावर जितकें असावें तितकें आहे! एक रतिभर देखील कमी किंवा अधिक नाहीं!

**अति०**—ह्मणजे! **मृगांकमाले**! याचा काय अर्थ? नीट विचार करून बोल, नाहीं तर पहा विनाकारण आपलें नुकसान करून घेशील!

**मृगां०**—बाबा! झालें नुकसान तर त्यापुढें माझा उपाय नाहीं! आपण माझे जनक, आपण मला लहानाची थोर केलें, आपण मजवर प्रेम ठेविलें, या सर्व गोष्टींबद्दल आपणावर जेवढें असावें तेवढें माझें प्रेम आहे! आपण सांगितल्याप्रमाणें वागावें, आपणावर प्रेम ठेवावें, आणि आपणाला सर्वांहून अधिक मान द्यावा हें माझें कर्तव्य कर्म आहे त्याप्रमाणें मी वागतेंच आहें! अक्का आणि ताई आपणावरच आपलें सर्व प्रेम आहे ह्मणतात, मग त्यांना पति ते कशाला पाहिजेत? त्यांच्या प्रमाणें माझ्यानें वागणें कदापि व्हावयाचें नाहीं! नशिबानें माझें ज्या कोणाशींही लग्न होईल, त्या-

# उपोद्घात.

हें नाटक मूळ इंग्रजींत **जान ब्राऊन** नामक कवीनें "**बार्बारोसा**" नामक नाटक रचिलें आहे त्याच्या आधारानें महाराष्ट्र भाषेंत तयार केलें आहे. या नाटकांत वर्णिलेला प्रकार मूळ **आफ्रिकेंतील आल्जीर्स** देशांत घडून आला आहे, परंतु तो प्रकार बऱ्याच अंशानें या देशांत घडूं शकणाऱ्या गोष्टींशीं जमतो, यास्तव मूळच्या पात्रांचीं नांवें बदलून हा सर्व प्रकार याच देशांत घडून आला असें दाखविणें अधिक सोईचें व वाचकांसही विशेष प्रिय होईल असें वाटून ह्या नाटकास हें प्रस्तुतचें स्वरूप देण्यांत आलें आहे. ह्यावरून प्रस्तुत नाटकांत वर्णन केलेली कथा वस्तुतः इतिहासबद्ध नाहीं हें तर उघडच होत आहे, तथापि हें नाटक महाराष्ट्र भाषेंत तयार होत असतां ज्या विशेष काळावर व स्थळावर कटाक्ष ठेविला आहे त्यांबद्दल कांहीं थोडा मजकूर लिहिणें अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें. प्रस्तुतच्या नाटकांत **दौलतराव** हा सर्व **कोंकण**पट्टीचा राजा असें कल्पिलें आहे, व त्याच्या राज्याचें राजधानी शहर समुद्रकांठीं **सुवर्णपुर** ह्मणून होतें असें मानिलें आहे. **सुवर्णपुर** ह्मणजे प्रस्तुत ज्यास आपण **सुवर्णदुर्ग** ह्मणतों त्याच्याच आसपास असणारें एक शहर होय. **दौलतरावानें काटक** लोकांवर स्वारी केली ह्मणून पुस्तकांत सांगितलें आहे ते **काटक** लोक **सह्याद्रीच्या** दऱ्याखोऱ्यांतून व डोंगरांच्या गुहांतून वगैरे राहिलेले अद्यापिही सांपडतात. तसेंच **दौलतराव** ज्या राज्याचा आपण मालक आहों असें ह्मणत असे त्याचा खरा मालक **यशवंतराव**, हा दक्षिणेंत **कर्नाटकच्या मुसलमानी** राज्यांत मदत मागण्याकरितां गेला होता अशी बातमी आल्याचें लिहिलें आहे, ह्यावरून ह्या नाटकांत वर्णिलेली कथा **कर्नाटकांत मुसलमानी** अंमल बसल्यानंतर घडून आली असावी असें साहजिक अनुमान निघण्याजोगें आहे. शिवाय **दौलतरावानें** आपणास अनेक प्रसंगीं **कोंकण** प्रांताचा सार्वभौम राजा असें ह्मटलें आहे; परंतु जर कधींकाळीं सर्व **कोंकण**पट्टीवर सर्वत्र एकछत्री राज्य होतें असें कल्पिलें, तर ती एकछत्रिता या प्रांतांत **पोर्तुगीज** लोकांचा प्रवेश झाला तेव्हां मोडली हें इतिहाससिद्ध आहे. ह्यास्तव **कर्नाटक** प्रांतांत **मुसलमानी** अंमल बसला, व **पोर्तुगीज** लोकांचा या देशांत प्रवेश झाला, ह्या दोन गोष्टींच्या दरम्यान या नाटकांत वर्णिलेली कथा घडली असावी असें सिद्ध होतें. आतां या दोन गोष्टी केव्हां कशा घडल्या हें इतिहासज्ञांस अवगत आहेच, ह्यास्तव त्यांचा प्रस्तुत स्थळीं उल्लेख करणें अवश्य नाहीं. तसेंच ह्या गोष्टींचा विशेष उल्लेख न करण्याचें दुसरें एक कारण आहे तें असें कीं, वस्तुतः ह्या नाटकांत वर्णिलेली कथा ह्या देशांत घडल्यापैकीं नाहीं, ह्यास्तव वर दिग्दर्शित केलेल्या कालनिर्णयापेक्षां अधिक सूक्ष्म रीतीनें कालनिर्णय करीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. साधारण दृष्टया पहातां, प्रस्तुत नाटकांत वर्णिलेल्या आचारविचारांचें यथावत् ज्ञान होण्यास वर सांगितलेला स्थूलकालनिर्णयच बस होणार आहे. नाटकांत **यशवंतरावाची** माता **राजसबाई** ही **कमळगडच्या धनगराची** कन्या होती असें ह्मटलें आहे;

परंतु प्रस्तुतच्या **होळकर** सरकारच्या राज्याच्या मूळाकडे लक्ष दिलें असतां, हा वर्णिलेला प्रकार विसंगत वाटणार नाहीं, एवढेंच नव्हे तर **दौलतराव** व **यशवंतराव** हे उभयतांही **धनगर** जातींतच उत्पन्न झाले होते असें सर्वांच्या सहज लक्षांत येईल. **कोंकण** प्रांतांत ताडांचीं व माडांचीं झाडें फार, ह्यामुळें तेथील लोकांत दारू पिण्याचा प्रचार फार ही गोष्ट सर्वांस अनुभवसिद्धच आहे. ही दारू ह्मणजे आलीकडील **ब्रांडी**मातेच्या तोडीचीच होती असें मानणें जरूर नाहीं. तथापि ताडीचे वगैरे रस गाळून त्यांपासून तयार केलेलें बरेंच मादक अशा साधारण प्रकारच्या मद्याच्या तोडीची ती असे एवढें मानिलें असतां बस होणार आहे. आलीकडे सर्वत्र कलालांच्या वगैरे दुकानांतून कांचेचे पेले, बाटल्या इत्यादि नजरेस पडतात, परंतु हें नाटक ज्या कालास अनुलक्षून रचिलें आहे, त्या कालीं कांचेच्या पेल्यांच्या ऐवजीं धातुपात्रांचीच योजना होत असे असें ध्वनित केलें आहे. आतां श्रीमंत असतील ते रुप्याचे प्याले घेतील व गरीब असतील ते हलक्याशा धातुपात्रांचा उपयोग करितील एवढेंच काय तें. असो. ह्या प्रांतांत हल्लींप्रमाणें **शाक्त** मार्गाचा प्रसार होता असेंही सूचित करून मद्यपानापासून मनुष्याची जी पशुवत् अवस्था होते तिचें ही प्रसंगोपात्त अल्प निरूपण केलें आहे. तशीच आणखीही एक पूर्वींची चाल या ग्रंथांत सुचविण्यांत आली आहे, ती ही कीं, ह्या देशांत राजकुळांतून वगैरे पाट किंवा पुनर्विवाह होत असत. असो.

येथपर्यंत या नाटकांत वर्णन केलेल्या काळास, स्थळास, व रीतीभातींस अनुसरून लेख आटपला. आतां खुद्द कथेच्या स्वरूपाबद्दल लिहूं. मूळ नाटकांत ह्या कथेचा शेवट गोड झाला आहे, ह्मणजे '**बार्बारोसा** (**दौलतराव**)' व तदनुयायी एवढेच मात्र मेले असून '**सेलिम** (**यशवंतराव**)', '**आथमन्** (**मालोजी**)', '**सादी** (**हिंमतराव**)', '**झफिरा** (**राजसबाई**)', '**आयरीनी** (**गजराबाई**)' वगैरे पात्रें सर्व जिवंत राहिलीं आहेत, व **सेलिम** हा राज्यासनावर बसून पुढें त्याचा आणि **आयरीनी**चा विवाह होणार आहे इतकें सुचविलें आहे; परंतु प्रस्तुत नाटकांत अगदीं विसदृश प्रकाराचें अनुसरण केलें आहे. ह्या नाटकांत वर सांगितलेल्या पात्रांपैकीं **आथमन्** (**मालोजी**) व **सादी** (**हिंमतराव**) हीं पात्रें मात्र जगूं दिलीं आहेत, व बाकीचीं प्रधानत्वेंकरून वर्तणारीं सर्व पात्रें मृत्युमुखांत पडल्याचें सांगितलें आहे. नाटकग्रंथ वाचीत असतां वाचकांस व प्रेक्षकांस **यशवंतराव**, **राजसबाई**, व **गजराबाई** या पात्रांबद्दल विशेष चटका लागून अखेर ह्या सर्वांचें कल्याण व्हावें असेंच सर्वांस वाटतें, व तसें वाटणें कांहीं अंशीं साहजिकही आहे, ह्या दृष्टीनें पहातां सकृद्दर्शनीं ह्या नाटकांतील कथा लोकांस कदाचित् रुचणार नाहीं असें होण्याचा संभव आहे. परंतु वाचक किंवा प्रेक्षक जर अंमळ ह्या गोष्टीबद्दल सूक्ष्म दृष्टीनें विचार करून पाहतील, तर त्यांस या नाटकांत वर्णिलेला प्रकार अगदीं स्वाभाविक वाटेल.

या जगांत ज्याप्रमाणें कांहीं गोष्टी आपणास घडाव्या असें वाटत असतें त्याप्रमाणें त्या नेहमी घडतातच असें होत नाहीं, यामुळें असत्याचा नाश व सद्गुणाचा नेहमी जय होतो असें आपल्या प्रत्ययास येत नाहीं, तथापि "सद्गुण हेंच सद्गुणाचें बक्षीस" ही जी साधूक्ति आहे तिजकडे लक्ष दिलें असतां इहलोकींचा

आपला क्षणिक संबंध तुटल्यावर नंतर आपल्या सद्गुणांच्या न्यूनाधिक्यमानानें सद्गुणांबद्दल बक्षीस मिळावयाचें रहात नाहीं, या सर्वलोकगृहीत तत्त्वांतील सत्यतेनेंच सर्वकाळीं सर्व लोकांच्या मनाचें समाधान आजपर्यंत होत आलें आहे व अद्यापिहि होत आहे. तेव्हां पारलौकिक सुखाकडे दृष्टि फेंकिली असतां या जगांतच आपणास सद्गुणाबद्दलचें बक्षीस मिळालें नाहीं ह्मणून तेवढ्यानेंच विचारवान् पुरुष कदापि खिन्न होत नाहींत, व या जगांत आपणावर जरी पर्वतप्राय संकटें कोसळलीं, व त्यांयोगें आपले प्राणही नष्ट झाले किंवा होऊं लागले, तरी त्यांचा परमेश्वराच्या न्यायीपणावर पूर्णपणें हवाला असतोच असतो. ह्यास्तव आपणास जरी **यशवंतराव, राजसबाई** व **गजराबाई** इत्यादिकांचें ऐहिक कल्याण व्हावें असें फार फार वाटत असूनही तें आपल्या प्रत्यक्ष निदर्शनास आलें नाहीं, तरी एवढ्याबद्दलच वाचकांनीं किंवा प्रेक्षकांनीं तादृश खिन्न होण्याचें कारण नाहीं. परंतु हा सर्व पारलौकिक विचार एकीकडे ठेवून केवळ ऐहिक लोकव्यवहाराकडेच नजर देतांही सद्गुणाचें व दुर्गुणाचें फळ मिळावयाचें त्याप्रमाणें ज्याचें त्यास मिळालेंच आहे असें अंमळ सूक्ष्म विचारांतीं सर्वांच्या नजरेस आल्यावांचून रहावयाचें नाहीं. या नाटकांतील नायक **दौलतराव,** त्याच्या अनन्वित दुष्कर्माप्रमाणें त्यास जें फळ मिळणें वास्तविक दृष्ट्या इष्ट आहे तें फळ त्याला मरावयाचे अगोदरच मिळालेंच आहे. कारण **दौलतरावानें** जिवंत असतां ज्या अनन्वित पातकांचें, कीं ज्यांच्या पुढें पंचमहापातकेंही आपली मान वांकविण्यास रहावयाचीं नाहींत त्यांचें, आचरण केलें, त्या पातकांचें फळ त्याच्या अंतर्यामाची निरंतरची व्यग्रता व शांतिरहितता ह्या दोन गोष्टींमध्येंच प्रगट झालें आहे. व यासाठीं अशा प्रकारचा मनुष्य प्रत्यक्ष मरून जाण्यापेक्षां जीवंत राहूनच जर प्रत्यक्ष अंतरात्म्याच्या संबंधानें निरंतर या जगांत यमयातनांचा अनुभव घेत असतांना आपल्या दृष्टीस पडतो आहे, तर त्यांतच दुष्कर्माचा अपजय व तद्विरोधानें सद्गुणाचा जय झाला असें ह्मणण्यास बिलकुल प्रत्यवाय नाहीं. **यशवंतरावाच्या** पित्याचा दुष्ट **दौलतरावानें** घात केल्यावर **यशवंतरावास** अरण्यवासादिक अघोर संकटें भोगावीं लागलीं, तथापि ज्या वेळीं तो परत येऊन आपल्या मातोश्रीस भेटला व त्यानें तिच्या जिवाचें समाधान केलें, त्यावेळीं त्याचा " अंतरात्मा जसा कांहीं आनंदसमुद्रांत गटंगळ्याच " खाऊं लागला, व त्या वेळीं त्यानें सद्गुणाच्या महिम्याविषयीं जो स्वोद्गार प्रकट केला, त्यावरूनच प्रत्यक्ष दुःखावस्थेंतही सद्गुणाचें फळ मिळतें असें सिद्ध होत नाहीं काय ? " सद्गुणाचा महिमा कांहीं " विलक्षण आहे ! सद्गुणापासून प्राप्त होणाऱ्या " आनंदास तर पारावार नाहीं ! फार काय " सांगावें? एकादे वेळीं दुःख प्राप्त झालें तरी तें " देखील आल्हादकारक होतें ! व मनुष्याचा " अंतरात्मा कितीही शोकावेशांत बुडाला अ" सला तरी एकादे वेळीं तरी त्यास ब्रह्मानंदाचा " अनुभव आल्यावांचून रहात नाहीं ! " ही **यशवंतरावाची** स्वोक्ति ( अंक ३ प्र. ३ पृ ४१ पहा ) आहे; तसेंच ( अंक ३ प्र. ५ पृ. ६० यामध्यें ) **राजसबाईवर दौलतराव** जुलूम करूं लागणार अशा संकटसमयीं तिला **यशवंतराव** जिवंत असल्याचें समजलें त्यावेळीं तिनें " देवा ! **नारायणा** ! तूं धन्य आहेस ! " असें ह्मटलें आहे; व पुढें ज्यावेळीं तिनें **दौलतरावाची** अखेरची निराशा केली, त्यावेळीं " आजपर्यंत

" आह्मीं उभयतांनीं ज्या निश्चयानें दिवस व
' ढिले, तोच आमचा निश्चय निरंतर चालेल
अशी तिची उक्ति (पृ. ६२ पहा) आहे; तसें
(पृ. ३४) **यशवंतराव** व आपण या उभ
तांचें परस्परप्रेम निष्फळ होणार ह्मणून ज
**गजराबाई**ला अत्यंत दुःख वाटतें आहे, तरी
**यशवंतरावा**च्या "शांत वृत्तीचें अनुकरण करू
मुकाट्यानें सहन करण्यास " ह्मटण्याचा ति
निश्चय आहे, व **यशवंतरावास** ति
" पित्याच्या आचरणामुळें .... अनिवार क्ले
" व संकटें भोगावीं लागलीं हें सर्व खरें आ
" तथापि परमेश्वर करो आणि प्रत्यक्ष प्राणघ
" तापेक्षां सौम्य अशा उपायाची योजना कर
" आपल्या दुःखाचें परिमार्जन करण्याची
**यशवंतरावास** बुद्धि देवो अशी (पृ. ३५
तिची प्रार्थना आहे; ह्या सर्व गोष्टींवरून ध
पुरुषांच्या चित्ताची सार्वकालीन निर्विकारि
व तज्जन्य ब्रह्मानंदसुखावाप्ति हीं किती
वर्णनीय आहेत? व अशा तऱ्हेच्या ब्रह्मानंदसु
पुढें प्रत्यक्ष लौकिक प्रकारानें वाऱ्हलावाऱ्हली
लग्न इत्यादि गोष्टी होऊन त्यांपासून होण
सुख हें किती अल्प आहे ह्याची कल्पना क
णासही सहज करिता येईल. तेव्हां ह्या दृष्टी
पहातां **यशवंतराव** व **गजराबाई** हीं उभय
जिवंत राहून त्यांचा विवाहसंबंध घडून आ
नाहीं ह्यामुळें यत्किंचित्‌ही निराशा मानण्या
कारण नाहीं. परंतु हा सर्व अध्यात्मिक विचार झा
ला, आतां केवळ लौकिक दृष्टीनेंच विचार करू
पाहूं लागलें असतांही वाचकांच्या किंवा श्रो
त्यांच्या इच्छेनुरूप या नाटककथेचा अं
होणें कितपत साहजिक आहे ह्याबद्दल यत्किं
चित् विचार करणें इष्ट वाटतें.

ह्या नाटकांत **राजसबाई** व **गजराबाई** दोन स्त्रीपात्रें प्रधान आहेत; त्यांपैकीं **राजसबाई यशवंतरावा**ची आई, हिला **दौलतरावा**च्या त्रासांतून आपण मुक्त होऊन आपला पुत्र गादीवर बसावा असें साहजिक रीतीनें वाटणार आहे, व ह्या दृष्टीनें पहातां या नाटककथेचा शेवट वाचकांच्या इच्छेनुरूप होण्यास कांहीं प्रत्यवाय नसावा. परंतु हा विचार **गजराबाई**च्या संबंधानें चालण्यासारखा नाहीं. **गजराबाई**चें प्रेम **यशवंतरावा**वर आहे ह्यास्तव **राजसबाई**प्रमाणेंच तिलाही **यशवंतरावा**चें कल्याण व्हावें असें वाटणें अगदीं साहजिक आहे, व त्याप्रमाणें तिला वाटलेंही आहे; परंतु **राजसबाई** ज्याप्रमाणें **दौलतरावा**चा द्वेष करिते त्याप्रमाणें आपणही द्वेष करणें **गजराबाई**चे हातून होणें शक्य नाहीं. ह्यास्तव **यशवंतरावास** राज्यप्राप्ति होऊन आपला त्याच्याशीं विवाह व्हावा हें जरी तिला अत्यंत इष्ट होतें, तथापि तिला " प्रत्यक्ष पित्याच्या प्राणघाताहून सौम्य अशा उपायानें " च जर ही गोष्ट साध्य होण्यासारखी असती तर ती पाहिजे होती, एऱ्हवीं प्रत्यक्ष आपला प्राणनाश झाला तरी चिंता नाहीं, परंतु पित्याचा व त्याबरोबर आपला हृदयवल्लभ **यशवंतराव** ह्याचाही प्राण वांचवावयाचा, असाच तिचा संकल्प होता. परंतु हा संकल्प सिद्धीस जाण्यास **यशवंतरावा**कडून जबरदस्त अडचण होती. **दौलतरावा**नें **यशवंतरावास** व त्याच्या मातापितरांस जीं दुःखें दिलीं त्या मानानें पाहतां **यशवंतरावा**च्याच हातानें **दौलतराव** मेल्याशिवाय पूर्वीच्या दुःखांबद्दलचा त्यानें सूड पुरता उगविलासें होत नाहीं, ह्यास्तव तशा प्रकारचा सूड घेणें तर अवश्य, आणखी तो प्रकार **गजराबाई**स तर मुळींच संमत होत नाहीं, तेव्हां जरी कदाचित् एकट्या **दौलतरा-**

वासच मारून बाकीच्या सर्वांस जगूं दिलें असतें, तरी देखील **गजराबाई**च्या जिवास सुखसमाधान मिळण्याचा संशयच होता; व तिच्या जिवास सुखसमाधान मिळण्याचाच जर संशय, तर **राजसबाई** व **यशवंतराव** यांच्या जिवास सुखसमाधान तें कोठून होणार ? एतावता वाचक ज्या उद्देशानें **राजसबाई, गजराबाई** व **यशवंतराव** हीं जिवंत रहावीं असें इच्छितात तो उद्देश पूर्णपणें सिद्धीस जाणेंच दूरापास्त आहे. व हा विचार मनांत आणूनच आह्मीं प्रस्तुत नाटककथेचा शेवट सर्व प्रधान पात्रांच्या मृत्युद्वाराच केला आहे. अशा तऱ्हेचा शेवट करण्याचा आमचा दुसराही आणखी एक उद्देश आहे. **इंग्लिश** भाषेंत ज्याप्रमाणें "ट्राजेडी" अथवा करुणरसपर्यवसायी नाटकें आहेत त्याप्रमाणें **संस्कृतांत** किंवा **महाराष्ट्र** भाषेंत नाहींत. आपल्या भाषेंत नाटकादिकांचा शेवट पाहिला ह्मणजे नेहमी सुखपर्यवसायीच असतो. परंतु ज्या कोणास **इंग्लिश** भाषेंतील करुणरसपर्यवसायी नाटकांचा यत्किंचितूही आस्वाद मिळाला असेल त्यांस त्या नाटकांचें वाचन किंवा प्रेक्षण समाप्त झाल्यानंतरही पुष्कळ वेळ जो ह्रदयावर परिणाम उर्वरित असतो तो परिणाम हर्षपर्यवसायी नाटकांच्या वाचनापासून किंवा प्रेक्षणापासून होत नाहीं, हें अवगत असेलच. ह्मास्तव एकादा सदुपदेश हर्षपर्यवसायी नाटकांपासून जितका वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या ह्रदयावर बिंबेल त्यापेक्षां शतपटीनें तो करुणरसपर्यवसायी नाटकापासून बिंबण्याचा संभव आहे. व ह्या उद्देशानेंही आह्मीं प्रस्तुतच्या नाटक ग्रंथास सांप्रतचें स्वरूप दिलें आहे. असतु.

प्रस्तुतचें नाटक मूळ ज्या **इंग्लिश** नाटकाच्या अधारें रचिल्याचें मागें सांगितलें आहे, त्यांतील कथान्ताच्या प्रकाराहून आमच्या पुस्तकांतील कथान्तप्रकार विसदृश आहे हें आतांपर्यंत लिहिलेल्या हकीकतीवरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. तथापि ह्या पुस्तकांची मूळ **इंग्लिश** नाटकाहून विसदृशता नुसती कथान्तापुरतीच आहे असें कोणीं समजूं नये. प्रस्तुत नाटकास **मूळ इंग्रजी** नाटक फक्त आधारापुरतेंच घेतलें आहे, व आरंभीं आरंभीं मात्र रचना बहुतेक मूळाबरहुकुम आहे. परंतु जसजसा नाटककथेचा विस्तार होत गेला, तसतसे मूळाहून विसदृश रचनाप्रकार होत गेले, ह्यामुळें कित्येक ठिकाणीं प्रवेशांचे प्रवेशही प्रस्तुत पुस्तकांत अगदींच निराळे व नवे करून घालावे लागले. एकंदरींत हें पुस्तक करीत असतां आमचा उद्देश भाषांतर ह्मणून करण्याचा नसून, जेणेंकरून हें पुस्तक महाराष्ट्र जनांच्या रुचीस अभिमत होऊन, त्यापासून जो उपयोग करून घेणें इष्ट आहे तो त्यांस करून घेतां यावा, अशा उद्देशानेंच हें पुस्तक तयार केलें आहे. ह्मास्तव मूळाहून प्रस्तुत नाटकाची विसदृशता प्रवेशरचनेंतच आहे असें नसून पात्रांचे आचारविचार व भाषणपद्धति यांतही आहे असें वाचकांच्या सहज लक्षांत येईल. आतां ही विसदृशता कोणच्या ठिकाणीं कसकशी व कितींकिती आहे हें, आमचे **इंग्लिशज्ञ** वाचक जर हें व मळचें अशीं पुस्तकें परस्परांशीं ताडून पहातील, तर त्यांच्या सहज लक्षांत येईल. तथापि आमच्या **महाराष्ट्र** भाषा मात्र जाणणाऱ्या वाचकांस समजण्याकरितां तिचें यत्किंचित् स्वरूप येथें लिहिणें अवश्य वाटते. साधारणतः विसदृश स्थळें हीं सर्व ग्रंथभर पसरलीं आहेत, ह्मास्तव त्या सर्वांचा उल्लेख येथें न करितां

प्रस्तुत पुस्तकांत मूळांत नसूनही अगदीं नवे नच करून घातलेले प्रकार मात्र वाचकां कळविलें असतां बस होणार आहे. नवी प्रकार करून घातले ते येणेंप्रमाणें:—**दौलतरावाची प्रतापसिंहाच्या** घरीं येण्याच्या पूर्वीचें हकीकत (पृ. १–२); **गजराबाईचें** प्रथम आत्मगत भाषण (पृ. ९) व तिनें **पर्वतेश्वराच्या** जंगलांतील चोरट्यांबद्दलची सांगितलेली हकीकत (पृ. ११–१२); **राजसबाईचें** आत्मगत भाषण (पृ. १३) व तिने आपणास वश व्हावें म्हणून **दौलतरावानें** केलेली तिची विनवणी पद (पृ. १७–१८); **यशवंतरावास** मारल्याबद्दल **येसबानें** सांगितलेली खोटी हकीकत (पृ. २३); **यशवंतराव** व **गजराबाई** यांच्या परस्पर प्रेमाचीं वगैरे भाषणें (पृ. ३० पासून ३४); **यशवंतरावानें** सात वर्षे वियोग झाल्यानंतर आपल्या मातोश्रीस **प्रथमच** पाहिलें त्या वेळचे त्याचे दुःखोद्गार (पृ. ३७); अंक ४ प्र. १ यांतील **गजराबाईचें** आत्मगत भाषण (पृ. ४६); मेजवानींत मद्यपानाचा प्रकार व **दौलतरावाची** पशुवत् अवस्था व तिजसंबंधानें **गजराबाईचा** दुःखोद्गार वगैरे (पृ. ४७ पासून ४९); **यशवंतराव राजसबाईच्या** महालाच्या बाहेरल्या अंगास निजल्याचा **प्रकार** (पृ. ५२-५३) **दौलतरावाचें** पहिलें अनुतापयुक्त भाषण (पृ. ५३); **दौलतरावाचें** उपाध्यायापाशीं भाषण झाल्याचा प्रकार (पृ. ५५–५६); **राजसबाईचें** शेवटलें आत्मगत भाषण व **दौलतरावाची** तिनें आपणास वश व्हावें म्हणून पुनरपि विनवणी पद वगैरे (पृ. ५७–५८); व **बहादरशिंगाच्या** मृत्यूच्या प्रकारापासून नाटकसमाप्ति होईपर्यंत सर्व भाग (पृ. ७१ पासून ८०). असो.

येथपर्यंत या नाटकाच्या उपोद्घातादाखल जो मजकूर लिहिणें आह्मांस इष्ट वाटलें तो लिहिला. आतां खुद्द वाचकांस विनंतीदाखल थोड्या चार ओळी लिहून हा लेख आटोपतों.

प्रस्तुत आह्मीं जो उद्देश मनांत धरून हे नाटकादि ग्रंथ करण्याचा उद्योग आरंभिला आहे, तो उद्देश या पुस्तकाच्या पहिल्या अंकांत लिहिलेल्या उपोद्घातांत व प्रत्येक अंकाच्या मलपृष्ठावर देण्यांत आलाच आहे; व ह्या पुस्तकांत जे नाटकादिकांचे ग्रंथ आह्मांकडून छापून प्रसिद्ध करण्यांत येतील ते निरंतर त्या उद्देशास अनुसरूनच असतील. आजपर्यंत 'नेटिव ओपिनियन', 'सुबोध पत्रिका' व 'विविधज्ञानविस्तार' शिवाय करून आमच्या पुस्तकावर दुसऱ्या कोठेंही अभिप्राय छापून प्रकट झाल्याचें आमच्या पाहण्यांत नाहीं. परंतु या पुस्तकांत छापत असलेलीं चार प्रकरणें आजपर्यंत अपुरतींच असत ह्यामुळें, साधारणतः पुस्तक करण्याचे उद्देश व पुस्तकांतील भाषासरणि, ह्यांशिवाय इतर रीतीनें पुस्तकपरीक्षा यथावत् होण्यास सवड नव्हती; ह्याकरितां कदाचित् ह्या पुस्तकाबद्दल अभिप्राय फारसे प्रगट झाले नसतील असें आह्मांस वाटतें. सांप्रत आह्मीं आरंभिलेल्या चार प्रकरणांपैकीं एक प्रकरण '**दौलतराव** नाटक' हें समाप्त झालें आहे, ह्यास्तव त्यांतील गुणावगुणांबद्दल अनुकूल किंवा विरुद्ध अभिप्राय छापून प्रसिद्ध होण्यास आतां कोणताही प्रत्यवाय राहिला नाहीं. ह्यास्तव सर्व प्रसिद्ध वर्तमानपत्रकर्ते, मासिक पुस्तककर्ते, व इतर वाचकजन यांनीं आपणास वाटतील त्या प्रकारचे अनुकूल किंवा प्रतिकूल अभिप्राय मेहेरबानीनें छापून प्रसिद्ध करावे, किंवा वाटल्यास ते खुद्द आह्मांकडेही लिहून पाठवावे, अशी आमची त्यांस सविनय विनंती

आहे. आमचें पुस्तक पूर्णदशेस आलें आहे असें आह्मीं बिलकूल समजत नाहीं, व आमच्या कृतींत सहस्रशः दोष सुज्ञ वाचकांच्या लक्षांत सहज येण्यासारखे असतील हेंही आह्मीं प्रांजळ बुद्धीनें कबूल करितों; ह्यास्तव आमच्या पुस्तकाबद्दल किंवा पुस्तकांतील कोणच्याही भागाबद्दल आपले अभिप्राय जर कोणीही आह्मांकडे मेहेरबानीनें लिहून कळवितील, तर सवडीप्रमाणें, वाचकांची आह्मांवर इतराजी न व्हावी यासाठीं निराळ्या खर्चानें, ते आह्मीं छापून आमचे पुस्तकांत वेळोवेळीं प्रसिद्ध करीत जाऊं, व त्यामध्यें आह्मांस घेण्यासारखे जे कांहीं विचार किंवा सूचना असतील त्या सर्वांचें आह्मीं परमादरपूर्वक ग्रहण करूं. विशेषतः जे नाटकग्रंथ आह्मीं करण्याचें अंगावर घेतलें आहे, ते सर्व ग्रंथ रंगभूमीवर प्रयोगरूपें अभिनीत व्हावे अशी आमची पूर्ण इच्छा आहे, ह्यासाठीं नाटकग्रंथांत प्रयोगाचे संबंधानें जर काहीं अडचणी येण्यासारख्या वाचकांच्या लक्षांत आल्या तर त्या त्यांनीं खुशाल आह्मांस कळवाव्या ह्मणजे त्या यथाशक्ति सुधारण्यास, व पुनरपि इतर नाटकांतून तशा अडचणी न याव्या एतद्विषयीं यत्न करण्यास, आह्मांकडून बिलकूल आळस होणार नाहीं.

वर्चस्व आपणास दाखवून आपला दोष आपल्यां पदरांत घालण्याकरितां तर ह्या अनुपमेय श्यामसुंदरीच्या रूपानें आपणापुढें आविर्भवन नसेलना केलें असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं, व ह्यामुळें ती ह्यावेळीं त्याच्या दृष्टीस पडतांच त्याची उद्दाम अंतःकरणवृत्ति कांहीं क्षणपर्यंत दबल्यासारखीच झाली. तिच्या शरीराचा बांधा ठेंगणा नमून वाटोळा होता. हात गोंडस व पाय लहान असून सर्व शरीराच्या बांध्यास शोभतील असेच होते. ती एक शुभ्र पातळ पायघोळ नेसली होती, व अंगांत तिनें चोळीही साधीच घातली होती. अंगावर दागिने मुळींच नव्हते ह्मटलें असतांही चालेल. मात्र गळ्यांत एक शुद्ध स्फटिकांचा हार घातला होता, व दिवाणखान्यांतील दिव्यांच्या योगानें त्यांचें जें तेज बाहेर पसरलें होतें, तेंही शांतप्रभ असेंच होतें. कपाळ उंच, डोळे विशाळ कमलाप्रमाणें असून तेजस्वी, नासिका चांफेकळीपेक्षांही सरळ, व ओष्ठ विद्रुमाच्या रक्तिम्यासही लाजविणारे, असें त्या वेळचें तिचें स्वरूप पाहून **कार्तिकशंभु** कांहीं वेळपर्यंत आश्चर्यानें अगदीं थक्क होऊन गेला. व आपण येथें आलों होतों कोणच्या उद्देशानें व करणार होतों काय ह्याचेंही त्यास प्रथमतः भान राहिलें नाहीं. त्याची याप्रमाणें स्थिति झाली असतां **त्रिवेणीनें** आपल्या वृत्तींत एवढासुद्धां फरक होऊं दिला नाहीं. ती शांतपणानें त्याच्या पुढें उभी होती, व तोंडांतून एक शब्दही न काढितां ती **कार्तिकशंभूच्या** बोलण्याचीच वाट पहात आहे असें वाटत होतें.

**कार्तिकशंभूचें** वय सुमारें पस्तीस वर्षांचें होतें; व जन्मल्यापासून तों आजपर्यंत त्याचें बहुतेक आयुष्य हाल व कष्ट सोसण्यांत गेलें होतें, तथापि तो जातीचाच प्रकृतीनें सदृढ होता, यामुळें त्याच्या चेहऱ्यांत त्याच्या वयाच्या मानानें जेवढा व्हावा त्यापेक्षां फारसा अधिक फेर झाला नव्हता. तो केवळ **मदन**मूर्ति होता असें जरी ह्मणतां येणार नाहीं, तथापि एकंदरींत तो चांगला देखणा होता यांत संशय नाहीं, व त्याच्या मुद्रेवरूनच तो मोठा शूर शिपाई आहे असें वाटत असे. ह्यास्तव त्यास कोण्याही बाह्यस्वरूपावरून भुलून जाणाऱ्या स्त्रीनें पाहिलें तर तिच्या मनांत तो सहज भरावा अशा प्रकारचा तो मनुष्य होता. त्याच्या चेहेऱ्याची ठेवण अगदींच वाटोळी नसून अंमळ उभट होती, व त्याच्या गालांची व हनवटीची ठेवण साधारणतः शंखाप्रमाणें निमुळती होती, व नेत्रही पाणीदार होते, ह्यामुळें नुसतें त्याजकडे पाहिलें कीं कोणासही त्याजकडे पहात रहावें असेंच वाटे. याचें कारण काय असेल तें असो, परंतु हें वाटणें त्याच्याशीं विशेष ओळखदेळख झाल्यावरही कमी होत नसे. त्यानें मिशा फार मोठ्या राखिल्या नव्हत्या, तथापि त्याचा वरचा ओंठ झांकून जाईल इतक्या त्या लांब होत्या. तो नेहेमी शिपाईबाण्यानेंच रहात असे, ह्यास्तव त्यानें डोकीस शिपाईगिरीच पागोटें घातलें होतें. अंगांत साधारण गुळखीदार कुडतें घातलें असून त्याचा खालचा भाग कंबरबंधानें आवळून टाकिला होता. पायांत किनखापी जुना मांडचोळणा अंगाशीं घट्ट बसे असा घातला होता. त्याचीं नेहमी वापरावयाचीं शस्त्रें ह्मटलीं ह्मणजे एक तरवार व एक जंबिया इतकींच असत, परंतु एकादे वेळीं जरूर पडली असतां तो भाल्याचा व बरचीचाही उपयोग करी. तो घोड्यावर बसणारा मोठा पटाईत असून अतिशय चलाख असे, यामुळें एकादे वेळीं शत्रूचे

लोक पाठीशीं लकटून धांवत असतां त्यांचे वार चुकवून त्यांच्या हातून निसटून जाण्याचे कामीं तो फार तरबेज होता. तसेंच त्याच्या छातीच्या विस्तारापेक्षां दुपटीनें मोठी अशी ढाल तो नेहमी आपल्या अंगावर बाळगीत असे, व जरी त्याच्याशीं अपरिचित मनुष्याला ती ढाल पाहून ती याला वापरतां येण्याजोगी नाहीं असेंच वाटत असे, तरी तिच्या योगानें **कार्तिकशंभूस** अडचण झाली असें कधींही घडत नसे. प्रस्तुत प्रसंगीं त्यानें हातांत ढालतरवार घेतली होती, व कंबरेस कंबरबंधांत जंबिया खोंविला होता. तरवार व जंबिया हीं दोन्ही शस्त्रें म्यानांतच खोंविलीं असून म्यानाच्या बाहेरल्या अंगास कांहीं चमत्कारिक तऱ्हेनें मोराचीं पिसें चिकटविलीं होतीं. व **कार्तिकशंभूचा** हात किंवा दुसरा एकदा अवयव अंमळ हलला कीं तेणेंकरून तीं मोराचीं पिसेंही हलून त्यांच्यावर दिव्यांचा प्रकाश पडला असतां क्षणभर त्याच्या अंगाभोंवतीं तशा उजेडांतही काजवेच चमकत उडत आहेत काय असा भास होऊन कोणासही आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नसे. असो.

**त्रिवेणीस** पाहिल्याबरोबर **कार्तिकशंभु** आश्चर्यानें तटस्थ झाला व तो आतां बोलेल अंमळशानें बोलेल ह्मणून **त्रिवेणी** वाट पहात उभी राहिली होती हें नुकतेंच सांगितलें आहे. ही स्थिति सुमारें अर्धा घटिका होत आली तरी तशीच चालू होती. **कार्तिकशंभु** आश्चर्ययुक्त मुद्रेनें व पापणीही लवूं न देतां एकसारखा तिच्याचकडे पहात राहिला. त्याच्या तोंडानें एक अक्षरही निघेना. तेव्हां मात्र **त्रिवेणी** पुढें लिहिल्याप्रमाणें बोलली:—"कां **कार्तिकशंभू** ! तुह्मीं कांहीं जरूरीच्या कामाकरितां आलां ह्मणून **हयदक्ष** मला सांगत होता, मग बोलत कां नाहीं ? तुह्मीं इतक्या अपरात्रीं अवेळीं आलां असें इतकें जरूरीचें काम तें काय होतें ?"

हें तिचें भाषण ऐकून अगदीं स्वप्नस्थितींतून एकाएकीं उचकून जागें व्हावें त्याप्रमाणें **कार्तिकशंभूची** स्थिति होऊन तो जागेवरून उठला व बोलूं लागला:—"अं—काय ह्मटलेंस? हो ! मी जरूरीच्या कामाकरितां आलों होतों. परंतु हे अद्भुतरूपसुंदरी ! तुझ्या या मोहनी स्वरूपाच्या दर्शनमात्रेंकरून मला मोहच पडल्यासारखा होऊन माझी अशी स्थिति झाली होती ! माफ कर !"

"**कार्तिकशंभू** ! जी योग्यता माझ्या अंगीं मुळींच नाहीं तिच्याकरितां तुमच्या मनांत माझा स्तुतिपाठच गावयाचा असला तर तुह्मीं आतांच्या आतां येथून निघून जावें हें बरें ! असलें बोलणें माझ्या नाहीं कामास यायचें!" असें **त्रिवेणी** बोलली.

**कार्तिकशंभु** बोलतो:—"नाहीं नाहीं ! चुकलों ! **त्रिवेणी** ! तुझें मन दुखवावें असा माझा मुळींच उद्देश नव्हता. परंतु तुला काय सांगूं? काय चमत्कार असेल तो असो. माझ्या तोंडांतून हे शब्द मला न कळतच बाहेर पडले ! परंतु माझ्या शब्दांनीं तुझें मन दुखवलेंसें वाटतें, यास्तव मी पुनरपि हे शब्द मुखांतून बाहेर न पडण्याविषयीं झटेन ! असो. **त्रिवेणी** ! मी **भद्रमणीस** देण्याकरितां लखोटा पाठविला होता तो जर तूं फोडून पाहिला असशील, तर मी येथें आलों कशाकरितां हें सांगण्याची जरूर पडणार नाहीं !"

"मी तुमचा लखोटा वाचला नाहीं ! हा घ्या पाहिजे असेल तर जसाच्या तसाच आपला लखोटा !" असें ह्मणून तिनें आपल्या हातांत

असलेला न फोडलेला तो लखोटा त्याच्यापुढें झोंपाळ्यावर टाकून दिला आणि ह्मणालीः– "मी कांहीं मोठी मुत्सद्दी नव्हें ती एकाद्या अवघड कामीं मसलत देऊं शकेन! आणखी माझ्या बाबांच्या मनांत एकादी गोष्ट मला कळवावयाची नसेल, ती गोष्ट मला कळाय-लाही नको!"

**कार्तिकशंभु** उभा होता त्याच्याच मागें भिंतीला एक मोठा आरसा टांगलेला दिसत होता त्याकडे संशययुक्त मुद्रेनें पाहून तो हळूच ह्मणालाः–" बरें, पण आपण कांहीं बोललों तर आडून विडून कोणी ऐकणार तर नाहीं ना?"

"तुमच्या मनांत ज्याच्या विषयीं संशय येईल असें कोणी ऐकणार नाहीं! " **त्रिवेणी** शांतपणें ह्मणाली.

" हूं! एकून मी ह्मटलें तेंच खरें! **जरठकर्ण** जती त्या आरशाच्या पलीकडे आहे असेंचना?"

**त्रिवेणीनें** किंचित् हास्यमुख करून खुणेनें होय ह्मणून सुचविलें.

**कार्तिकशंभु** बोलतोः–" ठीक आहे! त्याला येऊं दे बाहेर! मी जें कांहीं आतां बोलणार आहे त्यांत **भद्रमणि** व **जरठकर्ण** या दोघांचाही संबंध आहे. यासाठीं मिळेल तर **जरठकर्ण** जतीचीही मसलत मला अवश्य पाहिजे आहे!"

इतक्यांत " ही घे, उपासका!" असें बोलत कोणी एक वृद्ध पुरुष तें आरशाचें दार उघडून बाहेर पडला. त्याचा पेहेराव **जैन**जतीचा असून त्यानें आपल्या कंबरेभोंवती पायघोळ धोतर गुंडाळलें होतें. डोकीचे केंस अगदीं पांढरे असून तें बरेच दिवस विंचरले नसल्या कारणानें चिकट झालेले व अस्ताव्यस्त असे पाठीवर लोळत होते. अंगावर पांढरें सफेत वस्त्र गुंडाळून घेतलें असून उजवा हात मात्र उघडा होता. व त्यांत बरेंच लांब असें मोराचें पीस होतें. असा तो जती बाहेर पडला त्या वेळीं त्याचे उद्गार ऐकून **कार्तिकशंभु** त्याकडे पाहूं लागला, तों त्या आरशाच्या आड किंचित् अंधार असून त्यांत वरच्या मजल्यावर जाण्याकरितां जिना दिसत होता. तो जती वयानें चाळीस पंचेचाळीस वर्षांचा होता, तथापि त्या देशांत सर्वत्र धर्मसंबंधी चलविचल असे ह्यामुळें कोणाच्याही मनास स्वस्थता ह्मणून नसे, ह्या कारणानें तो जती वास्तविक होता त्यापेक्षांही ह्मातारा दिसत होता. तो बाहेर आल्याबरोबर **कार्तिकशंभूनें** पुढें होऊन त्याच्या पायांवर मस्तक ठेविलें, व जतीनेंही आपला लांब व रोड झालेला हस्त मोराच्या पिसासहित त्याच्या डोकीवर ठेवून गंभीर खोल आवाजानें " **अर्हत्** उपासकांचें कल्याण करो!" ह्मणून आशीर्वाद दिला, व **कार्तिकशंभूनें** तो नम्रतापूर्वक ग्रहण केल्यानंतर जतीनें त्यास विचारिलें:–**कार्तिकशंभू**! तूं स्वधर्मसंरक्षकांत अग्रगण्य आहेस, व मी आपल्या **अर्हद्गुरूचा** अतिनम्र सेवक आहें, तर, तुला या अतिनम्र **अर्हदु**पासकाला काय विचारावयाचें असेल तें विचार!"

हा प्रश्न ऐकून **कार्तिकशंभूनें** **हयदक्षास** सांगितलेला मजकूरच पुनरपि बोलून दाखविला, व शेवटीं इतकें मात्र अधिक सांगितलें कीं, " तो कोतवाल शूलारोपणाच्या वेळीं आपल्या चाकरास जे कांहीं शब्द बोलला, त्यांवरून दिवाण **साहेबांकडून** **भद्रमणीस** तावडतोब

१. बुद्ध धर्मी लोकांस 'उपासक' किंवा 'श्रावक' या नांवानें हाक मारण्याची पूर्वी चाल असे.

कैद करण्याचा हुकूम सुटला आहे असें मला समजलें!"

हें ऐकून **त्रिवेणी** भयानें थरथर कापूं लागली आणि ह्मणाली:—"काय? माझ्या बाबांना कैद? ती कशाकरितां बरें? त्यांच्यावर असा आरोप तरी काय टेविला आहे?"

"राजद्रोह! निवळ राजद्रोह!—**त्रिवेणी**! तुला काय सांगूं? आलीकडे ह्या जुलमी क्रूर राजानें जें नवीन शासन[1] केलें आहे, त्यांत आपल्या पवित्र **अर्हता**च्या उपासक जतींस जे कोणी आश्रय देतील त्यांस पकडून चौकशीअंतीं त्यांच्यावर गुन्हा शाबीत झाल्यास त्यांस सात दिवसपर्यंत अगदीं अन्नपाण्याशिवाय अंधारकोठडींत कोंडून टेवावें, व आठव्या दिवशीं बाहेर काढून त्याच्या डोळ्यांदेखत कोणा तरी **जैन** जतीचा वध करावा, व नंतर त्यास सुळावर चढवावें ह्मणून लिहिलें आहे, त्याप्रमाणें **भद्रमणी**नें **जैन**जतीस आश्रय दिला आहे ह्या संशयाबद्दल त्याचीही तीच अवस्था करावी असा त्या दुष्टाचा इरादा आहे!"

हें ऐकून **जरठकर्ण** व **त्रिवेणी** या उभयतांनीं आकाशाकडे नेत्र करून आर्तवाणीनें एकदम "**अर्हत्! अर्हत्!**" असा उद्गार काढला. नेत्रांतून अश्रु दाटून उभयतांचींही तोंडें खरकन उतरून गेलीं, व दोघेंही धाडकन मूर्छा येऊन खालीं पडलींच असतीं, परंतु **कार्तिकशंभू**नें पुढें होऊन दोघांसही सांवरून धरिलें, व कांहीं वेळानें तीं अंमळ सावध झाल्यावर त्यांस सोडून तो पुढें बोलला:—"आणखी त्या कोतवालाच्या वगैरे बोलण्यावरून **भद्रमणी**ला धरणें यावयाचें तें आजचे आज रात्रीं येणार ह्मणून मला समजलें आहे!"

हे **कार्तिकशंभू**च्या तोंडचे शब्द ऐकून **त्रिवेणी**च्या जिवांत जीव आला व ती मोठ्या आवेशानें बोलली:—"धन्य! धन्य! **अर्हद्गुरु** धन्य आहे! येऊं द्या ते मेले आले तर! बाबा कांहीं घरांत नाहींत, तेव्हां त्या मेल्यांना येऊन कांहीं नक्की व्हावयाचा नाहीं! येतील तसे परत जातील!" इतकें बोलून ती **जरठकर्ण** जतीकडे वळली आणि तोंड पुनरपि गोरेंमोरें होऊन ती त्यास ह्मणाली:—"पण **भदंत**[1]जी! तुमची आतां वाट काय होईल? आतां उपाय तरी काय करावा बाई? आणखी बाबा घरांत नाहींत तेव्हां आह्मीं बायका माणसांनीं काय तरी करावें?"

"तें मला कांहीं सुचत नाहीं! त्या **सर्वज्ञ**[2] **सुगता**[3]ला मात्र सर्व माहित!—तें असो. पण **त्रिवेणी**! हा **कार्तिकशंभु** माझ्यापेक्षां अधिक शहाणा व विचारी आहे, व आपल्या पवित्र धर्माचें संरक्षणही ह्याचेच हातून होणार आहे, यासाटीं या बिकट प्रसंगीं काय करावें हें त्यालाच विचार, ह्मणजे ह्या सर्व संकटांतून पार पडण्याची तो कांहीं तरी युक्ति काढील यांत संशय नाहीं. ह्याच्यावर याच्या पूर्वीं असे अनेक वेळां प्रसंग आले होते, व त्यांतून तो अगदीं अलग सुटून गेला आहे, यासाटीं मला वाटतें, या वेळीं तोच तुझें रक्षण करूं शकेल!—आतां माझ्याविषयीं विचारिलेंस, त्यास माझी वाट खुली आहे, मी या वाड्यांतून आत्तांच्या आतां बाहेर पडणार! माझ्या जिवाचें कांहीं झालें ह्मणून चिंता नाहीं; परंतु मला इतकेंच वाईट वाटतें कीं, ज्यांनीं उदारपणानें मला आश्रय

१. 'शासन' ह्मणजे सरकारी कायदा किंवा आज्ञापत्र.

१. बुद्ध जती किंवा संन्यासी ह्यांस 'भदंत' किंवा 'क्षपणक' अशी पूर्वीं संज्ञा असे. २-३ 'सर्वज्ञ' आणि 'सुगत' हीं बुद्धाचींच नांवें आहेत. 'सुगत' ह्याचा अक्षरशः अर्थ 'सदाचरणी.'

दिला, व आजपर्यंत अगदीं घरच्या माणसांप्रमाणें मजवर ममता केली, त्यांच्यावर मज अभाग्यामुळें आज हा नाहक प्रसंग येऊन गुदरला आहे ! **अर्हन्** ! **अर्हन्** !"

**त्रिवेणी** ह्मणालीः—"तें कांहीं असो. परंतु **भदंतजी** ! मी तुमच्या पायां पडतें ! तुह्मीं कांहीं येथून जाण्याचें करूं नये !"

"**बुद्धोपासिके** !" **जरठकर्ण** गंभीर वाणीनें बोललाः—"**बुद्धोपासिके** ! जन्मल्यापासून तों हा कालपर्यंत ज्या **शाक्यसिंहा**[1]ची मीं दीक्षा धारण केली आहे, त्याच्याच कृपेनें आजपर्यंत या असद्धर्मी क्रूर मानवाधमांनीं माझे छळ केलेले मीं आजपर्यंत मुकाट्यानें सहन केले ! त्याचप्रमाणें आतां आणखी जरी त्या दुष्टांनीं माझे कितीही छळ केले तरी ते मुकाट्यानें सहन करीन ! वत्से ! मला आतां या जगांत फार दिवस जगावयाचें नाहीं ! मी हळू हळू निर्वाणपदवीला[2] जात चाललों आहें. ह्यास्तव त्या **सुगता**च्या कृपेनें माझें या जगांत आणखी जितके दिवस वास्तव्य होईल, तितक्या दिवसांत त्यानें प्रणीत केलेल्या शांतिधर्माचें मी दृढपणें अवलंबन करून त्या धर्मभ्रष्टांस आमच्या या पवित्र धर्माची योग्यता कळावी एतदर्थ झटल्याशिवाय कदापि रहाणार नाहीं ! वत्से ! आजपर्यंत ज्याप्रमाणें आमच्या या धर्मापैकीं अनेक **महंत** जती या दुष्टांनीं निजविले त्याप्रमाणें ते मलाही निजवितील, त्याची मला मुळींच परवा वाटत नाहीं ! मला कितीही त्रास भोगावा लागला तरी तो मी निमुटपणें भोगीन. परंतु माझ्यामुळें विनाकारण दुसऱ्या अनपराधी लोकांस कदापि त्रास पोचूं देणार नाहीं ! वत्से ! माझें तुजवर प्रत्यक्ष पोटच्या कन्येप्रमाणें प्रेम आहे; तसेंच तुझा पिता, ज्यानें आजपर्यंत माझें उदारपणें संरक्षण केलें, त्यास मी प्रत्यक्ष आपला बंधुच समजतों; याकरितां तुह्मां उभयतांवर माझ्या एकट्यामुळें एकादें संकट गुदरलेलें माझ्यानें पहावणार नाहीं ! यास्तव वत्से ! या कामीं तूं मला अडथळा करूं नको ! मला जाऊं दे ! **अर्हत्प्रभु** तुझें कल्याण करो ! हा मी चाललों!"

**कार्तिकशंभु** ह्मणतोः—**भदंतजी** ! आपण असें साहस करूं नये ! आपण येथून बाहेर पडाल तर आपण जो प्रसंग **भद्रमणी**वर न यावा ह्मणून झटतां आहां तो प्रसंग त्याजवर तावडतोब कोसळण्याचा संभव आहे ! समजा तुह्मीं आतां बाहेर पडलां, आणि त्या दुष्ट असद्धर्मी लोकांचे दूत यावेळीं बाहेर फिरत आहेत त्यांच्या हातीं सांपडलां, तर तेवढ्यानें **भद्रमणी**बद्दल जो कांहीं त्यांना संशय आला आहे तो जाऊं शकेल असें मला वाटत नाहीं. कदाचित् इतकें मात्र होईल कीं ते दुष्ट या वाड्यांत येऊन घरांत नित्रीं चाकरमाणसें वगैरे आहेत त्यांस मारहाण वगैरे करून हरतऱ्हेनें तुह्मीं या वाड्यांतून बाहेर पडलां ही गोष्ट त्यांच्यापासून कबूल करून घेतल्याशिवाय कदापि रहावयाचे नाहींत! याकरितां मी सांगतों तसें ऐका! तुह्मीं मघां ज्या ठिकाणीं होतां त्या ठिकाणींच दडून रहा ! तो कोतवाल झाडा घ्यावयास खुशाल येऊं द्या ! मी खात्रीनें सांगतों तुह्मीं त्या ठिकाणीं राहिलां तर त्याला तुमच्याबद्दल एवढासुद्धां संशय यावयाचा नाहीं."

"बाबा! बाबा!" **त्रिवेणी** बोलली, "तुह्मीं खचित जाण्याचें करूं नका! **कार्तिकशंभु** खरें

---

१. हेंही बुद्धाचेंच नांव. २. आपण हिंदु लोक ज्यास 'मोक्ष' ह्मणतों, त्यास जैन किंवा बुद्ध लोक 'निर्वाण' ह्मणतात. हा निर्वाणमोक्ष ज्ञानाधिक्यापासून प्राप्त होतो अशी त्या लोकांची समजूत आहे.

बोलतात! ह्या आमच्या वाड्यांत दडून रहाण्याची गुप्त ठिकाणें पुष्कळ आहेत हें तुह्मांला ठाऊक आहेच! त्या मेल्यांना वाड्यांत येऊन पाहिजे तितका दंगा करूं द्या, तुमचा ह्मणून त्यांना शोध लागावयाचा नाहीं हें पक्कें समजा!"

**जरठकर्ण** जती **कार्तिकशंभू**कडे वळून त्यास ह्मणतोः—"बरें आहे. तूं ह्मणतोस तसें कां होईना! तूं माझ्या स्वतःबद्दलची मुळींच पंचाईत करूं नको! माझें कांहींही होवो, परंतु त्यायोगानें दुसऱ्या कोणास विनाकारण त्रास न पोंचावा ह्मणजे झालें! तसें होत असेल तर तूं सांगशील त्याच्या बाहेर कांहीं मी नाहीं!"

"ठीक आहे!" **कार्तिकशंभु** उत्तर करितोः—"माझें ह्मणणें मीं तुह्मांला कळविलेंच आहे! तुह्मीं मघां होतां तेथेंच रहा ह्मणजे झालें!"

हा प्रकार होत आहे, इतक्यांत एकाएकीं **त्रिवेणी**च्या मनांत दुसरी एक नवीनच भीतीची आकांक्षा आली, तीबरोबर घाबरून तिचें तोंड गोरेंमोरें होऊन ती ह्मणालीः—"तें सगळें खरें! परंतु कदाचित् त्या दुष्टांला माझे बाबा **चसतरु** गांवीं आहेत असें कळलें, आणि ते त्यांचा तेथें पाठलाग करीत गेले, तर मग त्यांची कशी स्थिति होईल?"

**कार्तिकशंभु** उत्तर करितोः—"होय! असें खरें! यास्तव त्यांना अगोदर सूचना देण्याकरितां आतांच्या आतां कोणी तरी जरूर तिकडे गेलाच पाहिजे!"

"तर मग तेवढें काम तुह्मीं स्वतःच करा! तुह्मीं स्वतःच बाबांकडे जाऊन त्यांना तेवढी सूचना द्या!" **त्रिवेणी** काकुळतवाणी त्याला ह्मणाली.

**कार्तिकशंभु** उत्तर करितोः—"अहाहा! **त्रिवेणी**! तुझ्याकरितां पाहिजे तें करावयास मी सिद्ध आहें! फार काय सांगूं? तुजकरितां प्रत्यक्ष हे प्राणही द्यावयाचे पडले तरी ते देण्याला मी मागेंपुढें करावयाचा नाहीं!"

"तर मग तुह्मीं मीं सांगितलेली गोष्ट करालच असेंच मी समजावेंना? **कार्तिकशंभू**! तुह्मीं एवढी गोष्ट कराल, तर तुमचे मजवर महत् उपकार होतील, ते मी कदापि विसरणार नाहीं! बरें, मग कसें काय? तुह्मीं तेवढें काम मजकरितां करितांना?"

"**त्रिवेणी**! तूं सांगितलेलें मी काय नाहीं करणार! तूं सांगतेस तर हा मी जातों! परंतु या **भदंतर्जी**बद्दल मला किंचित् भीति वाटते आहे, यास्तव उद्यां सकाळपर्यंत मी येथेंच राहीन तर बरें असें मला वाटतें!"

"तें सर्व खरें! परंतु या कामीं उशीर झाला तर तिकडे माझ्या बाबांची काय अवस्था होईल? तुह्मीं कसेंही करा, परंतु सूर्योदयाचे अगोदर **चसतरु** गांव गांठाच!"

"तूं सांगतेस त्याप्रमाणेंच मी वागेन ह्याविषयीं तूं अगदीं बिनधास्त अस! तुझीच जर आज्ञा होते आहे, तर प्रत्यक्ष वायूसही मी मागें टाकण्यास कधीं चुकावयाचा नाहीं हें तूं पक्कें समज!"

इतकें बोलणें झाल्यावर तो तिच्या आज्ञेप्रमाणें जाण्याकरितां ह्मणून दरवाज्याकडे वळला, तथापि त्याचें मनच कांहीं त्याला जावें असें सांगेना. ह्यास्तव तो दरवाज्यापर्यंत जाऊन एकदम मागें वळून एका क्षणांत **त्रिवेणी**च्या पायां पडून ह्मणालाः—"**त्रिवेणी**! माफ कर! अशा बिकट प्रसंगींही मी आणखी एकवेळ प्रेमाचा उद्गार तुजपुढें काढितों त्याबद्दल मला

क्षमा कर! तुझी मूर्ति अंतःकरणांतून दूर झाली असें मला आजपर्यंत वाटत होतें, परंतु तुला काय चमत्कार सांगूं? तुला आतां पाहिल्याबरोबर तुझी मूर्ति पुनरपि माझ्या अंतःकरणांत जागृत झाली आहे, आणखी पूर्वीपेक्षांही आतां माझें तुजवर अधिकच प्रेम बसलें आहेसें मला वाटत आहे!"

हा प्रकार पाहून **त्रिवेणीस** राग येऊन ती ह्मणाली:–"**कार्तिकशंभू**! तुह्मांला उठावयाचें आहे कीं नाहीं बोला! तुह्मी मुकाट्यानें उठा कसे!"

**कार्तिकशंभु** किंचित् खजिल झाल्यासारखा होऊन उठला, आणि एकदम तिचा हात धरावयास त्यानें आपला हात पुढें केला. परंतु ती अंमळ मागें सरून त्यापासून किंचित् दूर उभी राहिली. तथापि एवढ्यानें दम न सोडितां **कार्तिकशंभु** बोलला:–"**त्रिवेणी**! मी तुझ्या पायां पडतों! तूं माझें ह्मणणें एकवार ऐकून घे! हल्लींचे दिवस कसे आले आहेत ह्याचा विचार कर! हल्लींच्या आपल्या पवित्र धर्माच्या उपासकांच्या स्थितीकडे नीट लक्ष दे! आमच्या **अर्हत्** प्रभूच्या सेवकांवर आज आपण जिवंत आहों परंतु उद्यां आपलें काय होणार याचा नेम नाहीं असा प्रसंग येऊन गुदरला आहे, हें तूंच पहातेस आहेस! **त्रिवेणी**! तूं समजुतदार आहेस! तुला ह्मणजे मी कोणतीही गोष्ट सांगितली पाहिजे असा प्रकार नाहीं! तथापि सांगतों. या अशा भयंकर प्रसंगीं तुझें रक्षण करणारा व तुजसाठीं आपले प्राणही खर्चण्यास तयार असा तुला कोणी तरी पाहिजे आहे, ह्यासाठीं ह्मणतों!"

**त्रिवेणी** त्यास उत्तर करिते:–"**कार्तिकशंभू**! तुह्मी मजविषयीं धास्ती सोडा! माझा निश्चय कधींच होऊन चुकला आहे! तुह्मी ह्मणतां ह्याप्रमाणें आपल्या ह्या धर्माची स्थिति झालेली मला कबूल आहे, परंतु माझा विचार मुळींच जोग घेऊन या संसारपाशांतून मुक्त होण्याचा आहे!"

"तें सर्व खरें आहे, परंतु **त्रिवेणी**! माझ्या ह्मणण्याचा तूं पूर्णपणें विचार कर! माझ्या गळ्याशपथ मी तुला खचित सांगतों, कीं जर तूं माझी होशील, तर त्यायोगानें एकंदर या सर्व **अर्हत्** प्रभूच्या सेवकांचें कल्याण होणार आहे!"

"तें कसें काय बरें?" **त्रिवेणी** विचारिते.

**कार्तिकशंभु** गंभीर वाणीनें उत्तर करितो:–"**त्रिवेणी**! ऐक! माझा एकेक शब्द तूं नीटपणें ऐकून घे! या आपल्या सद्धर्मोपासकांचें कल्याण होणें अगर न होणें ही गोष्ट तुझ्या एकटीच्या स्वाधीन आहे!"

"काय? माझ्या स्वाधीन?" **त्रिवेणी** आश्चर्य पावून ह्मणते.

**कार्तिकशंभु** उत्तर करितो:–"होय! होय! तुझ्याच स्वाधीन! या असद्धर्मी लोकांच्या त्रासांपासून **अर्हत्**प्रभूच्या उपासकांची मुक्ति व्हावी एतदर्थ एका प्रचंड व्यूहाची घटना झाली आहे, व त्या व्यूहाप्रमाणें जें कांहीं करावयाचें तें थोडक्याच दिवसांत केलेलेंही तुझ्या नजरेस पडेल!"

**कार्तिकशंभूच्या** तोंडचे हे शेवटले शब्द ऐकल्यावरोबर त्या जतीच्या अंगांत एकदम आवेश चढल्यासारखा होऊन तो मोठ्या मोठ्यानें हातवारे करून बोलूं लागला:–"होय! होय! त्या दुष्टांचा समूळ नाश होण्याची आतां वेळ जवळ आली आहे! **अर्हत्**प्रभूच्या भक्तांना आजपर्यंत जीं संकटें भोगावीं लागलीं

त्यांचा थोडक्याच दिवसांनीं अंत होईल! आणि सर्व बुद्धोपासक लोक पुनरपि निश्चस्तपणें आपल्या शांतिधर्माच्या आचरणानें आनंद-सुखाचा अनुभव घेऊं लागण्यास आतां फार दिवस लागावयाचे नाहींत! जो दीन हतभाग्य देश आज या दुष्ट असद्धर्मी लोकांनीं व्यापून टाकिला आहे, त्यांतून या दुष्टांचें बीजही नाहींसें होऊन जाऊन जिकडे तिकडे अर्हत्प्रभूचे सेवक आनंदानें नांदूं लागतील व ज्या विहा-रांचा या दुष्टांनीं सांप्रत उच्छेद मांडिला आहे त्या सर्वांचा पुनरपि जीर्णोद्धार होईल! ज्या कोणास आमच्या या पवित्र धर्माची पूर्वी अ-शोक राजाचे वेळीं योग्यता केवढी होती हें ठाऊक असेल त्यांस हें वर्तमान कळल्याबरोबर ते एकदम अशोक होऊन त्याचे नेत्र आनंदा-श्रूंनीं भरून जातील, आणि चोंहीकडे पुनरपि सद्धर्माचरण वाढेल! एकाद्या प्रचंड अग्नीची धूमशिखा ज्याप्रमाणें गगनमंडलास चुंबीत अ-सतांही कांहीं वेळानें नाहींशी होऊन जाते, त्या-प्रमाणें सांप्रत चोहींकडे पसरलेलें सद्धर्माविषयींचें अज्ञान कोणीकडच्या कोणीकडे नाहींसें होऊन जाईल, व तें होतें किंवा नाहीं ह्याचीही अल्पकाळांतच कोणास आठवणही नाहींशी होईल! एकाद्या प्रचंड इमारतीस आग लागली असतां ज्याप्रमाणें एकदम धडाका उसळून सर्व इमारत धडाधड कोसळून पडते, त्याप्रमाणेंच या असद्धर्मी लोकांची एकदम स्थिति होऊन जाईल!—अहाहा! अशा प्रसंगीं हे दुष्ट असद्धर्मी लोकांनो! तुह्मांला कितीही अनुताप झाला तरी तो सर्व निष्फळ होऊन त्या सर्व शक्तिमान् अर्हत्प्रभूच्या रोपानेंच तुमच्या अंगाच्या पण अगदीं चिंधड्या उडून जातील! प्रळयकाळ-ची मेघगर्जना होत असतां ज्याप्रमाणें भयंकर आवाज होऊन सर्व दिशा नादावून जातात, त्याप्रमाणें अर्हत्प्रभु कोपायमान होऊन आपल्या मेघगर्जनेप्रमाणें गंभीर वाणीनें तुह्मां दुष्टांस भिववून टाकून, ज्या तुह्मीं दुष्टांनीं त्याच्या पवित्र धर्माचा उच्छेद करण्याविषयीं यत्न करून त्या सुगताची विनाकारण निंदा करून आपण असुगत बनलां, त्या तुमचे तो खरोखरीच असु गत करून टाकील, कधीं सोडणार नाहीं!"

त्या जतीचें हें आवेशाचें भाषण समग्र ऐ-कून घेऊन कार्तिकशंभूनें एकदम "नमो बुद्धाय!" ह्मणून उद्गार काढिला, व पुढें बो-ललाः—"वाहवा! वाहवा! भदंतजी! तुह्मीं तर या वेळीं अगदीं केवळ भविष्यच कथन केलें ह्मणावयाचें!"

जती शांतपणानें उत्तर करितोः—"असें तर खरें! परंतु यांत माझ्या पदरचें कांहीं नाहीं! मी आतां जें बोललों तें आपल्या गणितत्त्व जतीनें आपल्या नवीन ग्रंथांत लिहिलें आहे त्यावरूनच बोललों!"

"होय. आणि आतां तुह्मीं जें भाषण केलें त्यातील गूढ अर्थ तुह्मांला ठाऊक आहेच!"

"होय! होय! अरे, ठाऊक आहे ह्मणून काय विचारितोस? तो 'धूमशिखा,' 'धडाका,' 'घर कोसळून पडणें,' 'चिंधड्या,' 'मेघगर्जना' इत्यादि शब्दांवरून अगदीं उघडपणें समज-ण्यासारखा आहे!"

१. 'असुगत' हा शब्द श्लिष्ट आहे. त्याचा पदशः अर्थ 'सुगत नव्हे तो' 'सुगत' ह्म. 'बुद्ध,' पक्षीं 'स-द्धर्माचरणी.' अर्थात् 'असुगत' ह्मणजे 'असद्धर्मी,' 'पापी.' २. 'असु' ह्मणजे 'प्राण' 'गत' ह्म. 'गेले-ले'. 'असुगत' आणि 'असु गत' ह्या ठिकाणीं जो शब्दचमत्कार आहे, तशा प्रकारचे चमत्कार पूर्वी पंडित जनांस फार प्रिय असत. अद्यापिही अशा चम-त्कारास चहाणारे शास्त्री मंडळांत पुष्कळ सांपडतील! वरही 'अशोक' या शब्दाविषयीं असाच चमत्कार आहे.

च्यावर माझें प्रेम हें असावयाचेंच ! तसेंच त्याजबद्दलची चिंता वागवावयाची व त्याच्याशीं जीं माझीं कर्तव्य कर्मे आहेत तीं करावयाचीं यांत काडीमात्र अंतर पडावयाचें नाहीं ! खचित, जर माझें आपणा एकट्यांवरच सगळें प्रेम असेल, तर मी अक्का आणि ताई यांच्याप्रमाणे लग्न कदापि करणार नाहीं !

**अति०**–पोरी ! तुझें बोलणें मीं ऐकिलें, परंतु हें अगदीं अंतःकरणापासून बोललीस ?

**मृगां०**–होय बाबा !

**अति०**–काय ? पोरी ! इतक्या वयांतन् तूं इतकी निर्दय, अं ?

**मृगां०**–तसें नव्हे बाबा ! पण मी अगदीं खरें खरें तेवढें बोललें !

**अति०**–असें काय ? तर कारटे ! तूं आपला खरेपणाच घेऊन बैस ! तुला माझ्यापासून एक फुटकी कवडीही मिळावयाची नाहीं ! आः दुष्टे ! कृतघ्ने ! मी ईश्वरसाक्ष सांगतों, आजपर्यंत तूं माझी पोरगी होतीस, परंतु इतःपर तूं माझी नव्हेस आणि मीही तुझा कोणी नव्हे ! चल निघ ! कारटे ! आपलें तोंड काळें करून येथून चालती हो !

**कांतिवर्मा**–सरकार !–आपण काय करित आहां याचा नीट विचार करा !–

**अति०–कांतिवर्मन्** ! आपण गप्प बसावें !–या कारटीला मी अघोर शासन करणार त्यांत आणखी आपण पडूं नये ! माझ्या तिन्ही कन्यांतून या कृतघ्न कारटीवरच माझें अतिशय प्रेम होतें, आणि या माझ्या म्हातारपणांत सर्वकाळ हिच्याच समागमें हरिहरि म्हणत बसण्याचा मीं विचार केला होता !–चल निघ कारटे ! तोंड काळें कर !–(दांत ओंठ खात) आः–दुष्टे ! तूं माझ्या प्रेमाची अशी दशा करून टाकिलीस, आतां मला मृत्यु येईल त्या वेळेस मात्र या जिवाला सुख होईल !–आः–अरे ! कोण आहेरे तिकडे ? जा न् **राजवाहन** आणि **सुखापीड** यांना सामोरे जाऊन इकडे घेऊन या !–बरें **खलदर्शनराव** ! **सुदर्शनराव** ! हा दक्षिणेकडचा प्रदेश या कारटीला मी देणार होतों, तो आतां तुह्मीं दोघे मिळून आपल्याकडेच घ्या ! ही दुष्ट पोरगी आपलेंच घेऊन बसली आहे, याकरितां तिची अशीच दशा होऊं द्या ! आतां या प्रदेशावर तुह्मीं दोघे समाइकीनें राज्य करा ! आतां या राज्यांतील सर्व संपत्ति व वैभव तुमचें ! मी नांवाचा मात्र राजा असेन, परंतु राज्यांतील जमाबंदी, अमकें तमकें, सगळें तुमच्याचकडे !–एक मात्र–मी एक महिना **शशिकले**कडे व एक महिना **चंद्राननेकडे**, याप्रमाणें पाळीपाळीनें रहात जाईन ! तसेंच, माझा इतमाम म्हणजे शंभर स्वार आणखी कांहीं किरकोळ चाकर मनुष्यें इतकीं आपलीं नेहमीं मजबरोबर असावयाचींच, त्या सर्वांचा खर्च तुह्मांकडूनच चालला पाहिजे ! झालें ? ठरलें ! ही पहा माझी तरवार आणि ही राज्याची मोहोर हिला दोघेही जण आपआपले हात लावा म्हणजे झालें !

**कांति०–अतिपीडराज** ! आपण आजपर्यंत आमचे अधिपति होतां, आणि मी आपणास सार्वभौम राजाचा मान देत गेलों; पुत्रानें आपल्या पित्यावर ज्या प्रकारचें प्रेम ठेवावें त्याप्रकारचें माझें आपणावर प्रेम होतें; आपण माझे स्वामी, याकरितां जिकडे जिकडे आपण गेलां तिकडे तिकडे आपणा-

मागून मी जात होतों, व आसनीं, भोजनीं, शयनीं आपलेंच कल्याण सदासर्वकाळ चिंतीत होतों, या सर्व गोष्टी लक्षांत आणून महाराज! माझी—( मृगांकमालेकडे पाहून खेदानें ) एक विनंती आपण मान्य करावीच !

**अति०**—खबरदार आतां आणखी अधिक बोलाल तर! हें माझें क्रोधधनु आकर्ण ओढिलें आहे, यापासून एकादा बाण सुटला तर फुकट मराल मात्र ! याकरितां या बाणाच्या मार्गांतून एकीकडे व्हा कसे !

**कांति०**—कांहीं चिंता नाहीं ! महाराज ! मी मेलों तरी चिंता नाहीं ! आपल्या बाणानें हें माझें ह्रदय विंधिलें तरी मी त्याला भीत नाहीं ! महाराज ! आपणाला खचितच वेड लागलें आहे यास्तव या प्रसंगीं मीं उद्धटपणा पत्करला तरी चिंता नाहीं ! महाराज ! आपल्या वयाला साठी होत आली आहे. आपणाला असें वाटतें काय कीं राजा एक आपल्या सेवकांकडून तोंडपुजा झालेली मोठ्या समाधानानें ऐकतो, ह्मणून जो खरा स्वामिभक्त आहे तो खरें बोलायला भिईल ? राजाच्या हातून एकादी वावगी गोष्ट घडूं लागली, तर ती घडूं नये एतद्विषयीं राजास सुचविणें हेंच खऱ्या स्वामिभक्तीचें लक्षण आहे ! यासाठीं महाराज ! आपण आपल्या या कन्येस शिक्षा करावयाचा जो विचार केला आहे तो एका बाजूस ठेवा, आणि नीट पुरता विचार करून असल्या वेडेपणांत पडूं नका! मी आपणास खचित सांगतों, पाहिजे तर मी त्याबद्दल स्वतःच्या प्राणांचीही पैज लावितों, आपली ही जी कनिष्ठ कन्या आहे तिचें प्रेम आपल्या बहिणींपेक्षां आपणावर कमी नाहीं!—महाराज ! एकाद्याला आपल्या मनांत जें कांहीं होत असतें तें बोलून दाखवितां आलें नाहीं तर त्याला मुळींच काळीज नाहीं असें ह्मणणें कदापि योग्य होणार नाहीं !

**अति०**—कांतिवर्मन् ! खबरदार आतां अधिक बोलाल तर प्राणांस मुकाल !

**कांति०**—मुकलों ह्मणून चिंता नाहीं ! महाराज! ज्या वेळेस आपली सेवा पत्करली त्याच वेळेस हे प्राण आपणास अर्पण केले! ते गेले तरी आपल्या शत्रूंशीं लढण्यांत किंवा आपणावर संकट आलें असतां त्याचें निवारण करण्यांतच जातील ! त्यांबद्दल मला खेद वाटणार नाहीं !—महाराज ! मी आपणास आपल्याच बऱ्याची गोष्ट सांगतों आहें !

**अति०**—दुष्टा ! चल निघ येथून चालता हो ! मला तोंड दाखवूं नको !

**कांति०**—राजा ! नीट विचार कर ! या वेळीं तुझे स्वतःचे नेत्र अगदीं अंधक झाले आहेत यामुळें तुला बरोबर दिसत नाहीं असेंच ह्मटलें पाहिजे ! याकरितां मलाच आपल्या उपनेत्रांदाखल जवळ राहूं दे कसा !—

**अति०**—( दांत ओंठ खात ) आः—आतां मात्र—खचित—खचित—देवाशपथ—

**कांति०**—राजा! मीही देवाची शपथ घेऊन तुला सांगतों कीं या वेळीं तुझी शपथ अगदीं व्यर्थ आहे ! हें तुझें करणें देवास मुळींच संमत नाहीं !

**अति०**—हा दुष्टा ! कृतघ्ना ! आतां मात्र तूं मेलास खचित !

( तरवार उपसावयास हात घालितो. )

**खल० व मुद०**—मामा ! आपण शांत व्हावें ! असें क्रोधाविष्ट होऊं नये !

**कांति०**—राजा ! थांबलास कां ? हा मी तुझ्या समोरच उभा आहें, पाहिजे तर खुशाल प्राण घे ! एकादा रोगी रोगाच्या भरांत असतां आपल्या वैद्याचाच जीव घेतो त्याप्रमाणें तूंही माझा जीव घे!—राजा !—राजा! सावधहो !—सावधहो!—पहा—मी सांगतों हें नीट ध्यानांत घे, आणि तूं आपल्या कन्येस जी शिक्षा करीत आहेत ती करूं नको, यांतच तुझें कल्याण आहे !

**अति०**—अहारे दुष्टा अधमा ! कृतघ्ना ! चांडाळा! तूं स्वामिभक्तीचा इतका डौल दाखवितोस तर ऐकच ! मी आजपर्यंत जी जी ह्मणून प्रतिज्ञा केली तिजपासून पराङ्मुख झालों असें कधींही घडलें नाहीं, असें असतां आजच तूं निर्लज्जाप्रमाणें मला प्रतिज्ञाभ्रष्ट करावयास पहात आहेस, तर ही गोष्ट माझ्यानें बिलकुल सहन होणार नाहीं ! दुष्टा ! ऐक !—तुला आजपासून पांच दिवसांची मुदत देतों, इतक्या अवकाशांत तूं आपलें गांठोडें गुंडाळून माझ्या राज्यांतून निघून चालता हो ! तसें जर न करिशील आणि सहाव्या दिवशीं किंवा पुढें केव्हांही तूं आमच्या या राज्यांत कोठेंही आढळशील, तर तुला तत्काळ मृत्यूचीच शिक्षा करण्यांत येईल हें खूप समज!—अहाहा !—आः—मी प्रत्यक्ष सूर्यनारायणाची शपथ घेऊन सांगतों, मी आतां बोललों यांतलें एक अक्षरही अन्यथा होणार नाहीं !

**कांति०**—राजा ! ज्यापेक्षां तुझीच अशी इच्छा आहे त्यापेक्षां ती मी मोठ्या आनंदानें मान्य करितों ! हा देश सोडून मी आजचे आज देखील निघून चालता होतों !—(मृगांकमालेकडे पाहून) हे हतभाग्य राजकन्ये! हे सद्गुणी **मृगांकमाले** ! तूं सत्यमार्गाचेंच आचरण करीत आहेस, यासाठीं परमेश्वर खचित तुझें कल्याण केल्याखेरीज रहावयाचा नाहीं ! बरें असो ! मी येतों !—(शशिकला व चंद्रानना यांजकडे पाहून) बरें तुह्मीं ! तुह्मीं बोलण्यांत तर राजावर आपलें अतिशय प्रेम आहे ह्मणून दाखविलें, तर त्याप्रमाणें तुमच्या हातून करणी मात्र होऊं द्या!—चाललों महाराज! चाललों !—हे सर्व सरदार मानकरी हो !—हे माझे सर्वांना शेवटले रामराम ! परमेश्वराच्या न्यायीपणावर हवाला ठेवून आमची स्वारी चालली आतां दुसरीकडची हवा घेण्याला !—रामराम ! रामराम !—(निघून जातो.)

(पडद्यांत भालदाराची आरोळी ऐकूं येते.)

राजाधिराज **सौराष्ट्राधिपति राजवाहनराज** महाराज !

(फिरून दुसरी भालदाराची आरोळी ऐकूं येते)

राजाधिराज **विदर्भदेशाधिपति सुखापीडराज** महाराज !

(चंडवर्मा राजवाहन आणि सुखापीड यांस घेऊन येतो.)

**चंड०**—महाराज ! हे **सौराष्ट्राधिपति राजवाहनराज**, आणि हे **विदर्भदेशाचे** स्वामी **सुखापीडराज** !

**अति०**—(सिंहासनावरून उठून) यावें ! या आसनांवर विराजमान व्हावें !

(सर्व यथोचित स्थळीं बसतात.)

**अति०**—**सुखापीडराज** ! आमच्या कन्येकरितां या **राजवाहनराजांनीं** मागणी घातली आहे, त्याप्रमाणें आपलीही मागणी पडली आहे ! आमचे मनांत पूर्वीं हिला **राजवाहनराजांस** द्यावयाचें होतें, परंतु अगोदर आपली मागणी आली, यासाठीं आपल्याशींच मी प्रथमतः बोलतों ! ही **मृगांक**-

**माला** !–हिला जर आपल्या मनांत आपली वधू करून घ्यावयाचें असेल, तर अगदीं कमींत कमी असें आपण किती आंदण मागाल तें मला कळवा, नाहीं तर आपली मागणी तेवढी परत घ्या !

**सुखा०–अतिपीड**महाराज !, मी जो इतक्या लांबून आपल्या येथें आलों तो आपली कन्या बरोबर घेतल्याशिवाय परत जाण्याकरितां आलों नाहीं ! याकरितां आपली मागणी मी परत तर घेणार नाहींच ! आतां आपण आंदणाची गोष्ट विचारिली त्याअर्थीं मी ह्मणजे कांहीं जास्ती आपणापाशीं मागतों असा प्रकार नाहीं ! जेवढा प्रदेश आपल्या कन्येस द्यावयाचा आपण संकल्प केला आहे, तेवढ्यापेक्षां मी कांहीं अधिक मागत नाहीं ! आणि तेवढ्यापेक्षां आपल्या हातून कमी देणें होणारही नाहीं अशी माझी खातरी आहे !

**अति०–सुखापीड**राज ! आपण ह्मणतां ही गोष्ट खरी. परंतु मीं संकल्प केला त्या वेळीं तिजवर माझें अतिशय प्रेम होतें यामुळें मीं तसा संकल्प केला होता ! परंतु आतां त्याचें कांहीं राहिलें नाहीं ! पूर्वीपेक्षां आतां तिची किंमत उतरली आहे ! याकरितां मी ह्मणतों हें आपणास मान्य असेल तर हिला मीं आपणास देण्यास सिद्ध आहें ! ही आतां जशी दिसते आहे, तशीची तशी आपणास पाहिजे असेल तर घ्या, नाहीं तर हिचा नाद मुळींच सोडून द्या ! आतां हिजवर माझें मुळींच प्रेम राहिलें नाहीं, एवढेंच नव्हे, तर हिचा मी सदोदित द्वेषच करणार, यासाठीं सांगितलें ह्यापेक्षां अधिक एक एवढेंसुद्धां मिळणार नाहीं ! सांगा, याबद्दल आपला कसा काय विचार आहे तो !

**सुखा०**–आपल्या ह्मणण्यावर मला कांहीं उत्तर सुचत नाहीं !

**अति०**–फिरून सांगतों, नीट ऐका ! ही पोरगी परम दुर्गुणी निघाली आहे, व यासाठीं ती माझ्या निरंतरच्या द्वेषासच पात्र झाली आहे, आणि ह्मणूनच हिचें परमेश्वरानें कदापि कल्याण करूं नये एतदर्थ मी सदासर्वकाळ चिंतन करीतच बसणार ! तर बोला, असली ही पोरगी तुह्मांला पाहिजे आहे काय ?

**सुखा०**–आपलें असेंच जर ह्मणणें असेल तर मला हिची मुळींच जरूर नाहीं ! राजाची मुलगी आणि आंदणावांचून कधीं कोणीं पत्करिली आहे ?–महाराज ! आपली मुलगी आह्मांस मुळींच नको !

**अति०**–फार उत्तम ! हिची सर्व संपत्ति काय ती मीं आपणास सांगितली, यासाठीं आपण आतां हिजविषयीं नाद सोडून द्या !–एक निकाल झाला !–बरें **राजवाहन**राज ! आपलें माझ्या कन्येवर अत्यंत प्रेम बसलें आहे हें मी जाणतों, परतु जिच्याविषयीं माझ्या मनांत द्वेष तिच्याशीं आपण विवाह करूं नये असें मला वाटतें !–या दुष्टेला आपली कन्या ह्मणवून घेण्याचीही मला लाज वाटते, यासाठीं आपणाला सांगतों, आपण आपलें हिजवरचें प्रेम काढून टाकून तें दुसऱ्या कोणा तरी सद्गुणी रूपवतीवर ठेवा, आणि हिचें नांवही सोडून द्या !

**राज०–अतिपीड**महाराज ! आजपर्यंत जिच्यावर आपलें अत्यंत प्रेम होतें, जिच्या सद्गुणांविषयीं आपण सदोदित वाखाणणीच

करीत असां, व आपल्या वृद्धापकाळीं ही आपणास सुख देईल ह्मणून जिच्याविषयीं आपणास मोठी आशा होती, अशी ही सर्वोत्तम आणि प्रियतम आपली कन्या हिजवर आपला एकदम कोप व्हावा व त्या कोपाच्या भरांत आपल्या पूर्वींच्या प्रेमरूपी वृक्षास मूळासकट धक्का बसावा ही परम आश्चर्याची गोष्ट आहे! महाराज! आपल्या कन्येच्या हातून अशी कोणती वाईट गोष्ट घडली आहे, कीं जिच्या योगानें आपलें तिजवरील पूर्वींचें सर्व प्रेम कोणीकडच्या कोणीकडे नाहींसें होऊन गेलें? महाराज! आतां जो प्रकार मीं आपल्या डोळ्यांनीं पाहिला त्यावरून मला तर असें वाटतें, कीं एक—हिच्या हातून कांहीं तरी अतिशय निंद्य अघोर असें पातक घडलें असावें, किंवा दुसरें आपण जें हिच्यावर अत्यंत प्रेम करीत होतों ह्मणून सांगतां तें तरी मिथ्या असावें! महाराज, बोलतों याची क्षमा असावी, परंतु काय असेल तें असो, हिच्या हातून आपला इतका रोष होण्याजोगें कांहीं पातक घडलें असावें असें माझ्या कांहीं बुद्धीला वाटत नाहीं! प्रत्यक्ष परमेश्वरानेंच अवतार घेऊन जर कांहीं अद्भुत लीलेच्या योगानें तसें वाटावयास लाविलें तर कोणास ठाऊक, परंतु नुसत्या तर्कज्ञानानेंच जर कोणी तें सिद्ध करूं लागेल तर तेवढ्यानें आपली कांहीं खात्री व्हावयाची नाहीं!

**अति०**—राजवाहनराज! मी आपणास खचित सांगतों या दुष्टेच्या हातून आपण ह्मणतां असेंच अत्यंत निंद्य अघोर पातक घडलें आहे!—

**मृगां०**—बाबा! मला कांहीं दुसऱ्याप्रमाणें वर एक बोलावें आणि आंतून मनांत दुसरेंच कांहीं असावें असें करितां येत नाहीं! मनांत गोष्ट भलतीच असून वर मात्र दुसऱ्यास गोड वाटेल असें बोलावें, व आंतून करणी कसाबाची करावयास मागें पुढें पाहूं नये असें माझ्या हातून कधीं होणार नाहीं! याकरितां बाबा! मी तुमच्या पायां पडतें, कृपा करून माझी एवढी विनंती ऐका! माझ्यावर आपण इतका रोष केला आहे खरा, परंतु मीं कांहीं कोणाचा घातपात केला नाहीं, किंवा कोणाचें नुकसान केलें नाहीं, किंवा माझ्या हातून कुलीन कन्येस अयोग्य असें कांहीं आचरणही घडलें नाहीं, हें तुह्मीं जाणतच आहां, याकरितां तेवढें एकवार उघडपणें बोलून दाखवा! आपणावर माझें जें प्रेम आहे तें मला उघडपणें बोलून दाखवितां येत नाहीं, व तें दाखवितां आलें नाहीं, किंवा मनांत नसतांही वरवर गोड वाटण्याजोगें बोलणें मला साधलें नाहीं—देव करो आणि मला तें कधीं न साधो!—तरी माझें मन तो एक सर्वांतर्यामी सूर्यनारायण जाणतोच आहे!

**अति०**—दुष्टे! कृतघ्ने! तुझ्यानें माझें मनोधारण होत नाहीं, यापेक्षां तूं मुळींच जन्मास आली नसतीस तरी फार चांगलें झालें असतें!

**राज०**—हं! वाहवा!—एकून आपला जो हिजवर इतका रोष झाला आहे त्याचें एवढेंच कारण काय? वाहवा! महाराज! प्रेम वरून वरून मात्र अघळपघळ पुष्कळ बोलून दाखविलें, तरी तें आंतून असतेंच असा नियम आहे काय? एकाद्याच्या मनांत अत्यंत प्रेम

असतांही तें त्यास बाहेरून दाखवितां येत नाहीं असें सहस्रशः घडतें! यास्तव तें दाखविण्यांत आणि न दाखविण्यांत दोहोंतही कांहीं अर्थ नाहीं!—प्रेम तें प्रेम!—असो. **मुखापीड**राज! आपण ज्ञातेच आहां, आपणास ह्मणजे मीं सांगावें असा कांहीं प्रकार नाहीं. तथापि सांगतों, आपण या महाराजांच्या कन्येचा अंगीकार करावा! नुसतें एक दोन बोटें राज्य मिळालें तरच मात्र प्रेम ठेवावयाचें, नाहीं तर त्याची वार्ताही नाहीं, याचें नांव खरें प्रेम नव्हे! **सुखापीड**राज! आपणाला हिजशिवाय निराळें आंदण कांहीं मिळालें नाहीं ह्मणून आपण चिंता करणें योग्य नव्हे! तिचे सद्गुण हेंच तिच्याबरोबरचें आंदण आहे!

**सुखा०—राजवाहन**राज! आपण स्वस्थ असावें! आपलें हें तें ह्मणणें कांहीं मला कळत नाहीं!—**अतिपीड**महाराज! आपण संकल्प केला होता तेवढा प्रदेश मला आंदण द्या, कीं या क्षणीं मी आपल्या कन्येचा अंगीकार करितों! नाहीं तर मला कांहीं तिची जरूर नाहीं!

**अति०**—तें कांहीं नाहीं! मी हिला एक फुटकी कवडीही देणार नाहीं! मीं एकवार निश्चय केला तो केलाच!

**सुखा०**—नशीब बिचारीचें! तिचा बापापरी बाप गेला, आणि नवऱ्यापरी नवरा गेला! **मृगांकमाले**! तूं आतां अशीच स्वस्थ रहा!

**मृगां०**—महाराज! आपण मजविषयीं काळजी करूं नये! संपत्ति मिळणें हेंच ज्याचें प्रेम, त्याच्याशीं मी कदापि विवाह करणार नाहीं!

**राज०**—धन्य! धन्य! **मृगांकमाले**! तूं धन्य आहेस! तुझी सर्व संपत्ति नष्ट झाली, तेवढ्यानेंच तूं अत्यंत भाग्यवती आहेस! तुझा सर्वांनीं त्याग केला यामुळेंच तूं माझ्या स्वीकारास योग्य आहेस! सर्व जन तुझा तिरस्कार करितात, त्यायोगानेंच माझें तुजवर अत्यंत प्रेम बसत आहे! तूं कांहीं चिंता करूं नको, तूं आणि तुझे सद्गुण, ज्यांची खरी पारख कोणासही झाली नाहीं, त्यांची मला पारख झाली आहे, यास्तव मीच तुझा अंगीकार करितों!—अहाहा! परमेश्वरा! हा केवढा चमत्कार, कीं जी सर्वांच्या धिक्कारास पात्र झाली तिजवरच माझें अकृत्रिम प्रेम दृढ होऊन मी तिला आपली गृहलक्ष्मी करीत आहें!—**अतिपीड** महाराज! ही आपली सद्गुणी कन्या, जिला आपण कांहींच आंदण न देतां वाऱ्यावर टाकून देत आहां तीच इतःपर आमची धर्मपत्नी व **सौराष्ट्र**देशाची अधिस्वामिणी झाली असें समजा! हिच्यापुढें एकट्या **मगध** देशांतील तर काय, परंतु या वसुंधरेंतील सर्व रत्नांसही मी तुच्छ मानितों! प्राणप्रिये **मृगांकमाले**! आतां तूं मजसमागमें चल! सर्व जण तुझा तिरस्कारच करितात, तथापि तूं एकवार सर्वांचा निरोप घे! तुझें आज नुकसान झालें आहे, तथापि सद्गुणाचा कैवारी प्रभु आहे तो तुला कधीं कमी पडूं द्यावयाचा नाहीं!

**अति०—सौराष्ट्रा**धिपते! आपली मर्जीच आहे तर आपण हिचा स्वीकार करा! असली दुष्ट पोरगी मला मुळींच झाली नाहीं, न इतःपर या दुष्टेचें मी मुखावलोकनही करणार नाहीं! आपण ही कपाळकरंटी घेऊन खुशाल चालते व्हावें! आपण मला

नमस्कारही करण्याचें कारण नाहीं, मी ह्मणून कांहीं आपणाला आशीर्वाद द्याव-याचा नाहीं किंवा आपलें कल्याण चिंतावयाचा नाहीं !—चला सुखापीडराज ! उशीर होत चालला !—खलदर्शनराव ! सुदर्शनराव ! चला आतां आपल्या विवाह-मंडपाचीच सिद्धता करावयाची !—भालदार पुकार !

**भालदार**—( पडद्यांतून ) कचेरी बरखास्त !

( राजवाहन, मृगांकमाला, शशिकला व चंद्रानना ह्यांशिवाय सर्व जातात. )

**राज०**—प्रिये! ह्या आपल्या भगिनींचा निरोप घे! आपण येथून आत्तांच्या आतां निघून जाणार!

**मृगां०**—अक्का ! ताई! आतां मी येतें बरें! आतां तुमचें आणि माझें पुनरपि दर्शन होणार नाहीं ! मी आतां बाबांनाही मुकलें ! आतां त्यांच्या वृद्धापकाळीं त्यांचें संगोपन नीट करा ह्मणजे झालें ! तुमच्या प्रकृति निराळ्या, तुमचे स्वभाव निराळे, तथापि मी आपली तुमची वेडी बहीण ह्मणून मला मेलें बोलल्यावांचून राहवत नाहीं ! तुह्मीं बाबांची खरोखरीच हेळसांड करूं नका ! तुह्मीं बाबांवर आपलें प्रेम आहे ह्मणून बोलून दाखविलें, परंतु तें प्रेम खरोखरीच प्रत्ययास आणून द्या ह्मणजे झालें! बाबांचा मजवर राग झाला आहे त्यापुढें माझा नाइलाज आहे, नाहीं तर कांहीं त्यांना तुमच्यापाशीं राहूं दिलें नसतें !—

**चंद्रा०**—पुरे पुरे ! तूं कांहीं नको आह्मांला शिकवायला ! आह्मीं कशा नाहीं कशा तरी तुझ्यापेक्षां दोन तीन वर्षांनीं मोठ्या आहों! तूंच कायती एकटी शाहणी आहेस असा कांहीं डौल नको मारायला ! तुझ्या शहाणपणाची पुरती परीक्षा झाली आहे !

**शशि०**—पुरे पुरे ! तूं मोठी शहाणी आहेस आहे ठाऊक ! जा आतां आपल्या शहाणपणाचे काय दिवे लावायचे असतील ते नवऱ्याच्या घरीं लाव ! रस्त्यांत एकादें भिकारडें थंडीनें कुडकुडत पडलें असतां त्याची दया येऊन त्याला एकादें कोणी आपल्या घरीं निवाऱ्याला घेऊन जातें, त्यांतलीच तुझी गोष्ट झाली आहे! याकरितां आतां काय शहाणपणाचे तारे तुटायचे असतील ते तिकडेच तुटूं दे! आह्मांलाच कांहीं नकोत ते दाखवायला ! आह्मांला ठाऊक आहेस तूं किती शहाणी आहेस ती ! अंगीं शहाणपण असतें तर अशी कां दशा करून घेतली असतीस ?

**मृगां०**—बरें बाई ! तुह्मांला हवें तसें कां बोलाना ? मारत्याचा बाई हात धरवतो, पण बोलत्याचें तोंड का कुणाला धरितां येतें ? तुह्मीं इतका वेळपर्यंत डौल तर खूप मारला आहे, पण त्याप्रमाणें कृति मात्र घडूं द्या !—तुमचा हा वरकांतीपणा जाईल केव्हां तरी झडून, तो कांहीं असाच सदोदित रहायचा नाहीं ! आपल्या अंगचा दुर्गुण कितीही झांकला, तरी अखेर भ्रमाचा भोपळा फुटून फजिती ही व्हायचीच ! असो ! येतें मी ! देव तुह्मांला चांगली बुद्धि देवो ह्मणजे झालें !

**राज०**—बरें प्रिये, चल आतां ! ( राजवाहन व मृगांकमाला निघून जातात. )

**शशि०**—गेली एकदाची ! बरी सगळ्या मुलखाची खट गेली !—बरें ताई ! आतां आपणा दोघींचीही लौकरच लग्नें होतील, पण आपल्याला एव्हांपासून पुढचा विचार

केला पाहिजे !—मला तुझ्यापाशीं किती किती गोष्टी बोलायच्या आहेत !

**चंद्रा०**—होय अक्का ! मलाही पण तुझ्यापाशीं पुष्कळ पुष्कळ बोलायचें आहे!—अक्का! आतां आपलीं लग्नें झालीं ह्मणजे तूं आपल्या घरीं जाशील, तेव्हां बाबाही तुझ्याच बरोबर जातील,—

**शशि०**—होय ! आणखी एका महिन्यानें तुझ्याकडे रहायला येतील !

**चंद्रा०**—अक्का ! पाहिलेमना बाबांचे घटके घटकेला कसे नवे नवे रंग होतात ते! हेंच पहा, त्याचें आपणा दोघींपेक्षांही **मृगांकमालेवरच** अधिक प्रेम होतें, पण तें चट सगळें एकीकडे राहून, कारण तें काय न् तेवढ्याकरितां तिचें इतकें नुकसान केलें यांत कांहीं तरी अक्कल आहे का ?

**शशि०**—अग, आतां त्यांची साठी भरत आली आहे तेव्हां आतां आणखी त्यांची अशीच अक्कल जात जाईल! पण खरेंच जर विचारशील किनई, बाबांना स्वतः आपण काय करतों आहों आणि कशासाठीं याचा कधींच पण उमज पडत नाहीं !

**चंद्रा०**—तूं ह्मणतेस असेंच ! ते आपल्याकडून मोठ्या दक्षतेनें वागायला जातात पण त्यांत कांहीं तरी असेंच वेड्या वेड्यासारखें करितात !—अक्का ! खरेंच किनई, मला तर वाटतें बाबा आपल्यापाशीं राहिले तर आपल्याला कांहीं सुखानें राहूं द्यावयाचे नाहींत!

**शशि०**—हो ! घटकेंत हेंच पाहिजे ह्मणतील, घटकेंत तेंच नको ह्मणून फेंकून देतील, फिरून कांहीं तरी नवाच रंग काढितील, उगीच भलता न् सलता हट्ट घेऊन रागावतील, हें मला तर कांहीं बाई आवडायचें नाहीं!

**चंद्रा०**—हें पण बाई मला ही नाहीं खपायचें! पाहिलेंसना त्यांनीं रागाच्या सपाट्यांत **कांतिवर्म्याची** कोण अवस्था केली ती !

**शशि०**—होय बाई ! आणखी त्यांनीं **राजवाहनराजांना** जा ह्मटलें तें तरी कसें ह्मटलें हें तूं पाहिलेंसच !—बरें तें आतां सगळें राहूं दे मेलें! आतां आपल्याला आपला पुढचा विचार पाहिला पाहिजे ! मी तर बाई असाच बेत केला आहे कीं बाबा जर अशाच प्रकारानें आपल्याला त्रास द्यायला लागले, तर मी कांहीं तो मुकाट्यानें नाहीं सहन करून घ्यायची !

**चंद्रा०**—होय अक्का, मलाही पण असेंच वाटतें! बरें चल आपण याबद्दल आणखी विचार करीत बसूं !

**शशि०**—होय ! न करून कसें चालतें! विचार तर केलाच पाहिजे आणि तो तरी ताबडतोब एक घाव न् दोन तुकडे अशांतलाच पाहिजे ! चल जाऊं कशी !

( दोघी जातात. )

..... ...

### प्र० ३ स्थळः—उदास दुर्गांतील चंडवर्म्याच्या वाड्यांतील दिवाणखाना.

( हातांत पत्र घेऊन मदनसेन येतो. )

**मद०**—( पत्र वाचीत वाचीत ) कसें कसें बरें? नीट फिरून वाचून पाहूं द्या, नाहीं तर करायला जाईन एक आणि होईल भलतेंच ! तसें होतां उपयोगी नाहीं ! निशाण मारावयाचें तें कसें अगदीं नेमानेंच अचुक लागलें पाहिजे ! हं ! ( पत्र वाचूं लागतो. ) "चिरंजीव राजश्री हं—हं—अनेक आशीर्वाद."—हें ठीकच आहे, पण—पण हा पुढचा मजकूर बरीक नीट वाचला पाहिजे. ( फिरून

"आणखी हा बेत तुह्मांला मनापासून आवडतो?" कार्तिकशंभु उत्कंठापूर्वक विचारितो

"तें कांहीं माझ्यानें सांगवत नाहीं! *किदं नाणुमणिस्सं, किं उण किदं पेक्खिस्सं!"

त्या जतीचें हें भाषण ऐकून कार्तिकशंभूच्या मनास अस्वस्थता उत्पन्न झाल्यासारखी होऊन तो त्यास विचारितोः—"बरें तें कांहीं असो! परंतु ही गोष्ट तुमच्या हातून फुटणार नाहीं हें तरी खचितना पण?"

"अरे! खचित ह्मणून काय विचारितोस? अगदींच खचित! ज्यावेळेस त्या—" जती शांत मुद्रेनें कांहीं खूण करून ह्मणतो "त्या ठिकाणीं आपणा सर्वांनीं अर्हत्प्रभूच्या पायांवर हात ठेवून आणाशपथा वाहिल्या त्या वेळींच हा व्यूह कोणीं बाहेर उच्चारूंही नये ह्मणून ठरलें आहे, मग त्याबद्दल आतां भीति बाळगण्याचें काय कारण?"

कार्तिकशंभु उत्तर करितोः—"तसें नव्हे! परंतु यांहीपेक्षां मोठमोठ्या आणाशपथा वाहिल्या असूनही त्या लोकांनीं राजकारणाकरितां एकीकडे झुगारून दिलेल्या तुह्मांस ठाऊक आहेतच ह्मणून मला किंचित् संशय वाटला!"

"तें खरें! परंतु आपल्या तीर्थंकार[१] जेतिवरिउजांनीं नवीन वट आज्ञा फिरविली आहे तींत त्यांनीं अशा तऱ्हेचे मजकूर असले तरी ते बाहेर बोलणें योग्य नाहीं ह्मणून साफ लिहिलें आहे, आणि तशांतून आपल्या अनंतदल जतीनें जो नुकताच ग्रंथ तयार केला आहे त्यांत देखील त्यानें अशाच प्रकारचा उल्लेख केला आहे! आणखी त्यानें इतकें सुद्धां ह्मटलें आहे कीं, कांहीं एकादी गुप्त गोष्ट, जी पार पडली असतां असद्धर्मी लोकांच्या राजाच्या, प्रधानमंडळाच्या किंवा त्याच्या इतर अनुचरांच्या प्राणासही धक्का पोंचेल, अशी गोष्टही जर कोणीं अर्हत्प्रभूच्या पायांवर हात ठेववून घेऊन व त्याचीच आण घेववून दुसऱ्या कोणास सांगितली, तर ती तशा महत्वाची असतांही त्यानें सांगूं नये, व सांगितली तर अर्हत्प्रभु त्याचें कधीं बरें करणार नाहीं! '*अलिहन्तो तस्स णासं करिस्सदि ण संसए'!"

जरठकर्ण जतीचें हें भाषण चालू असतां कार्तिकशंभु एकसारखा त्याच्याकडे दचकल्यासारख्या मुद्रेनें पहात होता, व मध्यें मध्यें तर जतीच्या तोंडास हात लावून त्याचें बोलणें थांबवावें अशा बेतानें तो एकदोन पावलें पुढेंही सरला होता. परंतु इतक्यांत आपल्या या आचरणानें त्रिवेणीच्या मनांत नसता संशय उत्पन्न होईल हा विचार मनांत येऊन तो जागच्या जागींच स्थिर राहिला. तथापि या स्थितींत त्याच्यानें फार वेळ उगें रहावेना, याकरितां जरठकर्णाचें वरील भाषण होत आहे, इतक्यांतच त्यानें त्यास एकदम "थांबा" असें सांगितलें. इकडे हा प्रकार चालू असतां त्यांतलें एक अक्षरही त्रिवेणीस नीटपणें समजलें नाहीं. तथापि ते जतीचें भाषण चालत असतां ती आश्चर्यानें थक्क होऊन मुकाट्यानें तें ऐकतच राहिली, व कार्तिकशंभूनें जतीस थांबविल्यावर मात्र ती बोललीः—"तुमचें काय ह्मणणें असेल तें असो! परंतु तुमचा जो कांहीं व्यूह असेल तो सिद्धीस जाणार तरी कोणाच्या हातून?"

* 'कृतं नानुमंस्ये, किं पुनः कृतं प्रेक्षिष्ये' ह्म. केलेलें मला आवडणार नाहीं, परंतु केलेलें पाहीन. बुद्ध किंवा जैन यांच्या शांतिधर्माचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे. हिंदुलोकांचा सूड उगविणें त्यांस जरूर वाटतें, परंतु तसें करणें चांगलें असें ते बिलकुल समजत नाहींत.

१. तीर्थंकार यतिवर्य ह्म. बुद्ध लोकांचे धर्मगुरू. जसे आपल्या लोकांचे शंकराचार्य, मध्वाचार्य इ.

* 'अर्हत् तस्य नाशं करिष्यति न संशयः' ह्म. अर्हत त्याचा नाश करील यांत संशय नाहीं.

"काय ह्मणतेस ? कोणाच्या ? माझ्या !" **कार्तिकशंभु** उत्तर करितो. "परंतु **त्रिवेणी** ! एक–तो व्यूह सिद्धीस जावा यासाठीं माझें धैर्य गळूं न देतां मला उत्साह देणें ही गोष्ट मात्र तुझ्याचकडे आहे !"

"वाहवा ! **कार्तिकशंभु** ! तुह्मी तर अगदी कोड्यांतच बोलूं लागला जसे ! मला तुमचें ह्मणणें समजलें नाहीं !"

"नसेल समजलें, परंतु तूं या **जरठकर्ण** जतीस विचार ह्मणजे पाहिजे तर तेच तुझी खातरी करतील कीं, जर तूं माझी झालीस तर हा व्यूह एवढा प्रचंड, परंतु हा माझ्या हातून हटकून सिद्धीस जाईल ! त्यांत कधीं अंतर पडणार नाहीं !"

जती बोलतोः–"वत्से! **त्रिवेणी! कार्तिकशंभु** बोलतो यांत कांहीं अन्यथा नाहीं !"

"तें काय असेल तें असो ! मला त्यांत मुळींच उमज पडत नाहीं, आणि तो मला पडायलाही नको ! परंतु तुह्मीं उभयतांही जें कांहीं आतां बोललां तें घटकाभर खरें आहे असें जरी ह्मटलें, तरी मला एक गोष्ट आपणास सांगावयाची आहे, ती हीच कीं आपल्या पवित्र **अर्हद्धर्माचें** कल्याण व्हावें एतदर्थ पाहिजे तर मी आपले प्राणही खर्चण्यास डगावयाची नाहीं. परंतु माझ्यानें कांहीं **कार्तिकशंभूच्या** ह्मणण्यास रुकार देववत नाहीं ! एवढेंच नव्हे, परंतु," हें बोलत असतां ती लाजून खालीं पाहूं लागली व तिनें पदरानें आपलें तोंड झांकलें व तशा स्थितींतच ती पुढें बोलली:–"जर मला सर्व गोष्ट उघडून सांगितली पाहिजेच तर मी आपणांस सांगतेंच कीं, माझें मन **कार्तिकशंभूवर** नसून दुसरीकडेच गुंतलें आहे; व जरी त्या पुरुषाचा व माझा कधीं विवाहयोग जमून येईल असें मला वाटत नाहीं, तरी मी त्याच्या करितां जोगच घेण्याचा विचार केला आहे. तो ह्मणून कांहीं फिरावयाचा नाहीं !"

"झालें ! तिनें काय द्यायचा तो जबाब दिला ! आतां तुला काय विचार करायचा असेल तो कर !" असें जती **कार्तिकशंभूस** ह्मणाला.

**त्रिवेणीचें** भाषण ऐकून **कार्तिकशंभु** निराश आणि खजिल झाला, व तशा स्थितींतच तो **त्रिवेणीस** बोललाः–"**त्रिवेणी** ! मर्जी तुझी ! बरें, तुझ्या आज्ञेप्रमाणें हा चाललों मी तुझ्या पित्याकडे !"

"**कार्तिकशंभू** ! बाबांना मी फार फार पुसलें आहे ह्मणून सांगा ! तुह्मीं यावेळीं जे मजवर उपकार करीत आहां ते मी कधीं विसरणार नाहीं !" **त्रिवेणी** ह्मणाली.

यावर **कार्तिकशंभूनें** कांहीं उत्तर न देतां **जरठकर्ण** जतीस उद्देशूनच ह्मटलें:–"बरें, **भदंतजी** ! मी आतां येतों. परंतु तुह्मी मात्र खूप सावधगिरीनें असा !"

"तूं मजविषयीं अगदीं बेफिकीर अस ! मी आतां या आरशाच्या आड जाऊन लपून राहूनच तुझें कल्याण करावें ह्मणून अर्हत्प्रार्थना करीत बसेन !"

इतकें झाल्यावर **कार्तिकशंभूनें जरठकर्णास** नमस्कार केला व जतीनेंही त्याला नेहमीप्रमाणें आशीर्वाद दिल्यावर तो तेथून निघून गेला. खालीं आला तों त्याचा घोडा चाकरांनीं आंत आणला होताच, त्यावर बसून तो फळ्यांवरून खंदकाचे पलीकडे गेल्यावर त्यानें घोडा भरधांव काढिला, व तो कांहीं वेळानें दिसेनासा झाला. मागें चाकरांनींही खंदकावरील फळ्या काढून घेऊन

दारें बिरें बंद करून घेतल्यावर निदान बाहेरून तरी जिकडे तिकडे सामसूम झालेंसें वाटूं लागलें.

## प्रकरण ४.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें **कार्तिकशंभु** निघून गेल्यावर **त्रिवेणी** व जती दोघेंही होतीं त्या ठिकाणींच राहिलीं, व त्यांनीं **हयदक्षास** बोलावून आणून त्यास आज रात्रीं कदाचित् सरकारांतून झाडा येईल ह्मणन सांगितलें. तेंव्हां एकाद्या कैद्याची न्यायाधीशापुढें चौकशी होऊन न्यायाधीशानें त्यास फांशीची शिक्षा सांगितली असतां जशी त्याची स्थिति होते, तशीच **हयदक्षा**ची ही बातमी ऐकून स्थिति झाली. तो भयानें थरथर कांपूं लागला, व तोंड खरकन उतरून जाऊन त्याचे ते पांढरे केंस त्याच्या अंगावर एकदम उभे राहिल्यासारखे झाले. तो घाबऱ्या घाबऱ्या मुद्रेनेंच चोंहीकडे पाहूं लागला. ती त्याची स्थिति पाहून **त्रिवेणी**ला आपण याला भयांत घातलें नसतें तर बरें असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं, व ती त्यास ह्मणाली:–"**हयदक्षा** ! तुझी अशी काय स्थिति झाली आहे ही ? अरे अंमळ शांत तरी होशील कीं नाहीं ? मला आपली सहज बातमी उडत उडतच लागली, ती ह्मणजे हटकून खरीच ठरेल असें कशावरून ? कदाचित् झाडा मुळींच येणार नाहीं, आणि तशांतून आलाच तरी त्यापासून कांहीं भ्यायला नको इतकें ! अरे पहा मी बायको असून मी देखील भीत नाहीं !"

**त्रिवेणी** इतकें बोलली तरी **हयदक्षा**च्या मनांतली भीति कांहीं निघाली नाहीं. तो थरथर कांपतच होता, व तशा स्थितींतच तोंडांतून अक्षर नीट निघतें आहे नाहीं अशा प्रकारेंच बोलूं लागला, "काय ह्मणतां ताईसाहेब ! भ्यायला नको ! ताईसाहेब ! तुह्मीं हे हरामखोर दुष्ट लोक अपरात्रीं एकाद्याच्या घराचा झाडा घेऊं लागले ह्मणजे काय अनर्थ उडवून देतात तो पाहिलाच नाहीं असें मला वाटतें. नाहीं तर कांहीं तुह्मीं अशा बोलतांना ! तुह्मांला काय सांगूं ताईसाहेब ! ते दुष्ट यायचे झाले ह्मणजे जशी एकादी दरवडेखोरांची टोळी यावी त्याप्रमाणें येऊन घरांचीं दारेंही फोडून आंत शिरतात, आणि दरवडेखोरांच्याही हातून होणार नाहींत इतके ते घरांतील माणसांचे हाल करितात ! ताईसाहेब ! तुह्मांला काय सांगूं ! त्या दुष्टांना सभ्यपणाचें नांवही ठाऊक नाहीं ! त्यांना बायका, पोरें, पुरुष चट सर्व सारखेंच ! अमुक एक ठिकाणीं जाऊं नये हा प्रतिबंध त्यांच्यापुढें कांहीं चालत नाहीं ! त्यांना वाटेल तिकडे ते घुसतात ! दार आंतून बंद केलें असलें तरी ते तें फोडून आंत शिरतात ! आपणा लोकांचे देव देंव्हारे कांहीं पहात नाहींत ! त्यांना जो मनुष्य सांपडायला पाहिजे तो त्यांना न सांपडला तर ते काय पाहिजे तें करतात ! हवें तेथें थुंकतात, वाटेंत सांपडेल तो जिन्नस तुडवून त्याची पण अगदीं नासधूस करून टाकतात ! तसेंच तोंडानें अभद्र ह्मणजे इतके कांहीं बोलतात कीं त्यांचे ते शब्द या कानानें तर कांहीं ऐकायची सोय रहात नाहीं ! ताईसाहेब ! काय सांगूं तुह्मांला ? तुमच्या सारख्यांना देखील ते मन मानेल तसें वागविण्याला कधीं कमी करीत नाहींत ! ती **सोहागूरची नंदिकेश्वरीबाई**–तिच्या घरांत हे दुष्ट असेच मध्यरात्रीं शिरले, न् त्यांनीं तेथें जो कांहीं दंगा केला त्यामुळें ती बिचारी भिऊन

जाऊन पटदिशीं मेली! **पादपमूर**ची ती **चंडांबा-बाई**—ती तर ह्या दुष्टांचा दंगा होऊं लागला तशी एकदम घेरी येऊनच पडली, ती किती ह्मणतात ते—हो—दोन का तीन दिवसांनीं सा-वध झाली ! अशा एक का दोन गोष्टी ! आणि ताईसाहेब ! तुह्मीं ह्मणतां कांहीं भ्यायचें कारण नाहीं ! **अर्हन्** करो आणि तुह्मांला या दुष्टांच्या येण्याचा अनुभव कधीं न घडो ह्मणजे झालें ! "

हें **हयदक्षा**चें भाषण ऐकून **त्रिवेणी**ही त्याच्या प्रमाणेंच भिऊन गेली, तथापि तिनें आपलें भिणें बाहेर न दाखवितां मनांतल्या मनांतच आवरून धरिलें, आणि ह्मणाली:—" तें खरें ! पण **हयदक्षा** ! आलाच तसा प्रसंग तर असें भिऱ्याप्रमाणें रडून किंवा वाईट वाटून घेऊन कांहीं उपयोग का होणार आहे ? वारा वाहील तशी पाठ केली पाहिजे ! आणि सर्व उपासकजनांच्या कल्याणाची काळजी वाळगणारा जो **अर्हत्**प्रभु त्याच्यावरच हवाला ठेवून आलेलें संकट निवारण्याच्या तजविजीस लागलें पाहिजे !—समजलास ? याकरितां तूं असें कर, आतां खालीं जा, आणि दारेंबिरें सर्व नित्याप्रमाणें बंद करून ठेवच, पण उगीच ही खबर दुसऱ्या चाकरमाणसांना सांगून त्यांना भिववूं नकोहो ! "

जती बोलतो:—" **त्रिवेणी** ! या वेळस तूं ह्मणतेस असेंच केलें पाहिजे! आपण कदाचित् त्या चोरांना आंत येऊं द्यावयाचें नाहीं ह्मणून खालीं मारामारी करण्याची तयारी केली, तर त्यायोगें विनाकारण संशय मात्र उत्पन्न होणार आहे ! यासाटीं त्या दुष्टांना मुकाट्यानेंच आंत येऊं द्यावें हें बरें ! "

हा इतका प्रकार होत आहे तों **हयदक्षा**च्या मनांतील भीतिहि बरीच कमी झाली होती ही गोष्ट **त्रिवेणी**च्या लक्षांत येऊन तिनें त्यास विचारिलें:—" बरें, **हयदक्षा** ! तुला कसें काय वाटतें ? खालीं इतकीं चाकरमाणसें आहेत, त्यांना जर ते दुष्ट येऊन विचारूं लागले तर त्यांपैकीं कोणी ही बातमी फोडणार तर नाहींत ? "

" बहुशः फोडणार नाहींतसें मला वाटतें ! परंतु त्याचा काय नेम सांगावा ? हे दुष्ट आले ह्मणजे अशी कांहीं भीति घालितात, व अशी कांहीं बडबड करितात, कीं ती ऐकून समोर असलेल्या मनुष्यानें गर्भगळितच व्हावें ! ताईसाहेब ! फार काय सांगूं ? जर कदाचित् मीच त्यांच्या हातांत सांपडलों तर माझ्यानें ही गोष्ट फुटणार नाहीं असा माझ्या हातून देखील निश्चय सांगणें होणार नाहीं !" इतकें बोलून तो त्या आरशाकडे आणि जतीकडे पाहून बोलला "तुह्मीं त्या आरशा आड खचित दडून राहूं नका ! तुह्मीं तेथें राहिलां असतां ते दुष्ट लोक तुह्मांला खचित शोधून काढितील ! "

त्याचें हें भाषण ऐकून जतीचें मन **अस्वस्थ** होऊन तो विचारूं लागला:—" इथें जर नाहीं तर मी दडूं तरी कोठें ? "

**हयदक्ष** उत्तर करितो:—" या वाड्यांत तुह्मांला लपायसारख्या पुष्कळ जागा आहेत, पण ते गुलाम दुष्ट आलीकडे इतके कावेबाज व हुशार झाले आहेत कीं त्यांना असल्या वाड्यांतल्या बहुतेक मक्ख्या कळून चुकल्या आहेत! आणि ह्मणून अमक्या एक ठिकाणीं तुह्मीं राहिलां असतां चिंता नाहीं असें माझ्यानें तर कांहीं खात्रीनें सांगवणार नाहीं! याकरितां तुह्मीं कसें अगदीं टपून असा, आणि एकादे वेळीं कांहीं

आलाच तसा भ्यायचा प्रसंग, तर **त्रिवेणी** ताईच्या निजायच्या महालाच्या बाहेरल्या अंगानें जी वाट जाते तिच्या शेवटल्याच्या आलीकडल्या खोलींत मी तुह्मांला घेऊन जाईन. त्या खोलींतल्या भिंतींतच कांहीं करामतीनें लोकांस संशय कधींही न येई अशा तऱ्हेनें दार बसविलें आहे. ती जागा आमचे धनी साहेब आणि मी यांशिवाय तिसऱ्या कोणास बिलकुल माहित नाहीं. ह्या दारानें आंत उतरलें ह्मणजे एक अंधारी वाट लागते ती बाहेरल्या खंदकाच्या खालून जाऊन पलीकडल्या अंगाला लांब एका घरांत बाहेर पडते. असो. ही जी वाट सांगितली त्या वाटेंत एक खुबी आहे ती जरूर पडल्यास मी तुह्मांला सांगेन. ती खुबी कळली आणि तुह्मीं त्याप्रमाणें काय करायचें तें केलें ह्मणजे त्या अंगानें तुमच्या पाठीस लागून कोणालाही येतां येणार नाहीं !"

"बरें तूं ह्मणतोस असेंच!" जती बोलतो. "भल्या माणसा ! तूं विश्वासुक आहेस हें मीं जाणतों, याकरितां तूं सांगशील त्याला मी कबूल आहें! मी तर असा या ठिकाणींच सारी रात्र **अर्हताची** उपासना करीतच जागत बसेन !"

**त्रिवेणी** बोलली:–'कांहीं चिंता नाहीं ! **भदंतजी** ! मीही तुमच्या बरोबर येथेंच राहून **अर्हताची** उपासना करीन !"

जती बोलतो:–"मुली ! तुझी मर्जीच जर असेल तर तूंही मजसमागमें राहून उपासना करच! परंतु तूं जागत राहून आपली झोंप विनाकारण बुडवावीस हें मला कांहीं नीट नाहीं वाटत!"

"तसें नव्हे बाबा ! यांत काय आहे? आणखी मी जरी जाऊन पलंगावर पडलें तरी मला झोंप थोडकीच येणार आहे!" इतकें बोलून ती **हयदक्षास** उद्देशून ह्मणाली:–"बरें **हयदक्षा**! तूं आतां जा, सावधगिरीनें राहून जरा बाहेर खसबस झालें कीं आह्मांला इथें सुचवायला मात्र विसरूं नको !"

"ठीक आहे!" इतकें बोलून **हयदक्ष** निघून चालता झाला. हा प्रकार झाल्यावर चांगला एक प्रहराचा सुमार झाला, आसपास हिंदु देवळांतून वगैरे मध्यरात्रीचे गजर ऐकूं येऊं लागले, तरी **त्रिवेणी** आणि **जरठकर्ण** दोघेंही बहुशः मुकाट्यानें **अर्हताची** प्रार्थना करीतच बसलीं होतीं, परंतु त्यांस भय वाटण्याजोगा असा प्रकार कांहीं कोठें घडून आला नाहीं. मधून मधून दोघें एकमेकांशीं बोलत, फिरून प्रार्थना करावयास लागत, असा क्रम चाललाच होता. होतां होतां मध्यरात्रीचा गजर खळावयाचा सुमार झाला, तरी वाड्यांत कोठें हां कीं चूं, कीं कोठें एवढा तेवढा गलबला, कांहीं प्रकार घडला नाहीं. परंतु मध्यरात्रीचा चौघडा खळला मात्र, त्याबरोबर खिडकीच्या खालच्या अंगाला लांकडाचा अडसर करकरत सरलेला एकदम ऐकूं आला. मग काय विचारावें? तो आवाज ऐकल्याबरोबर तो जती एकदम फिका पडला, आणि कावऱ्या बावऱ्या मुद्रेनें **त्रिवेणी**कडे पाहूं लागला. **त्रिवेणी**लाही मनांतून किंचित् भीति वाटली, तथापि ती मनांतल्या मनांतच ठेवून ती एक अक्षरही बोलली नाहीं, परंतु लागलीच जतीला तेथेंच स्थिर रहा ह्मणून खूण करून तेथलीच एक मेणबत्ती घेऊन ती **हयदक्षास** पहावयास बाहेर गेली. तिनें खालीं इकडे तिकडे पुष्कळ पाहिलें, पण **हयदक्ष** कांहीं कोठें दृष्टीस पडला नाहीं. सरते शेवटीं तिनें त्याच्या नांवानें दोन चार वेळां हाकाही मारल्या, परंतु एकीचाही जबाब आला नाहीं.

असा जेव्हां प्रकार झाला तेव्हां मात्र ती

झाली आणि आल्या वाटेनें परत माडीवर जाऊं लागणार इतक्यांत शेजारच्या एका खोलींत कांहीं लोक बोलत असल्याचा तिला भास झाला. त्याबरोबर तिनें हातची मेणबत्ती मालवून टाकून अंधारांतच ती त्या खोलीच्या दाराजवळ गेली. त्या वेळीं दार किलकिलें उघडें होतें, त्यांतून आंतल्या लोकांचे आपल्याकडे लक्ष न पोंचावें अशा रीतीनें ती आंतला प्रकार पहात व ऐकत राहिली, तों दहा पांचांवर हत्यारबंद शिपाई आंत असलेले तिच्या दृष्टीस पडले. त्यांपैकीं दोघां चौघांच्या हातांत कंदील असून त्यांचा उजेड तीन अंगानें न पडतां फक्त एकाच अंगानें पडला होता व त्या उजेडांत बाकी शिपाई सभोंवती उभे असून मध्यें **हयदक्ष** उभा असलेला तिच्या दृष्टीस पडला. ते शिपाई आपआपसांत बोलत असतां त्यांच्या बोलण्यावरून तिनें असें ताडलें कीं, त्या लोकांनीं येतांना आपल्या बरोबर फळ्या आणिल्या असून ते त्या खंदकावर आडव्या टाकून बागेंत शिरले, व तेथें राहून त्यांनीं आसपास त्या वाड्याची सर्व ठेवण वगैरे लक्षांत आणिली, आणि नंतर कोणाच्या दृष्टीस न पडतां परसाकडील एक दार फोडून आंत शिरून आंत **हयदक्ष** निजला होता त्यास पकडलें. त्यांपैकींच एकजण त्यांत मुख्य असून त्याच्या पोशाखावरून, व बाकीचे शिपाई त्यानें सांगितलेलें निमूटपणें ऐकत यावरून, तोच कोतवाल असावा असा **त्रिवेणीनें** तर्क बांधिला. या कोतवालानें प्रथमतः **हयदक्षास** इकडून तिकडून चांगले दोन तीन बुदके मारिले, आणि इकडचे तिकडचे प्रश्न विचारूं लागला. परंतु त्यांपैकीं एकाचेंही उत्तर न देतां **हयदक्ष** एकसारखा "मला ठाऊक नाहीं" असें नुसती मान मात्र हलवून सुचवीत होता. तेव्हां मात्र ते शिपाई चवताळले, आणि त्यांनीं आह्मीं तुला ठार मारूं, यंव करूं, त्यंव करूं, ह्मणून खूप दम भरला व लाथाबुक्याही मारिल्या. परंतु त्याचा मानेनें एकसारखा नन्नाचाच पाढा चालला होता. हा प्रकार बराच वेळ चालला, आणि त्यापासून कांहींच उपयोग होत नाहीं असें पाहून, सरतेशेवटीं कोतवाल दांतओंठ चावून बोलला:—"कांहीं चिंता नाहीं! हा हरामखोर कांहींच बोलत नाहीं, पण चला याला घेऊन आणखी दुसरीकडे आणखी शोध करूं! तो दुष्ट जती या घरांतच कोठें तरी लपला आहे असें मला खात्रीनें समजलें आहे! चला आणखी दुसरीं चाकरमाणसें पुष्कळ आहेत त्यांपैकीं कोणी नाहीं कोणी तरी आपल्या माराला भिऊन कबूल झाल्याशिवाय रहाणार नाहीं! आणखी दुसरें-आज रात्रीं बाकींची सर्व कामें बाजूला ठेवून या सगळ्या वाड्याचा कोपरा न् कोपरा धुंडायचा आणि घरांतील एकूनएक माणसांना विचारपूसही करावयाचीच यांत कांहीं कमी व्हायचें नाहीं!—अरे! पण—वाहवा! हीं पहा चाकरमाणसें इकडेच आलीं!"

तो कोतवाल याप्रमाणें बोलत आहे तों घरांतील कांहीं बायका व दुसरीं चाकरमाणसें ह्यांच्या कानीं तो गलबला पडून तीं भिऊन कोठें तरी दडण्याच्या हेतूनें त्या खोलींत घुसलीं, परंतु इतक्यांत त्यांच्या दृष्टीस ते तरवारी वगैरे घेतलेले शिपाई पडल्याबरोबर तीं भिऊन आल्या वाटेनें परत जाणार इतक्यांत त्या शिपायांनीं त्यांना पकडून अडकवून धरिलें. मग काय विचारावें? त्या बायकांनीं एकदम जो कांहीं गोंधळ करून

सोडला त्याचें वर्णनही करणें कठिण आहे. त्या बायका शिपायांच्या कचाटयांत सांपडल्या असतां मोठ्यानें किंकाळ्या ठोकून "धांवा! सोडवा!" ह्मणून ओरडावयास लागल्या, व त्या दुष्टांच्या हातून सुटून जाण्याकरितां आपणाकडून होईल तितकी झटपट त्यांनीं केली परंतु ती सर्व व्यर्थ झाली. त्या बायांनीं त्या शिपायांची हवीतितकी विनवणी केली, परंतु ती सर्व वायां गेली. सरते शेवटीं कोतवालानें त्यांस दरडावून गप्प रहाण्यास सांगून, खिशांतून एक कागद बाहेर काढला. त्यावर राजाचा शिक्का मोर्तब असून त्यांतून त्यानें पुढें लिहिलेला मजकूर त्यांस वांचून दाखविलाः—"तुह्मांस कळावें कीं **जरठकर्ण** जती, धर्म **जैन**, मूळ वस्ती **गुजराथ** प्रांत, हल्लीं वस्ती **पुनमल्ली**, ह्या मनुष्यास तुमचा आश्रय मिळून तो लपून राहिल्याचें कळून आलें असून तें शाबीत करण्याजोगा पुरावाही तयार आहे. करितां त्याचें लपून बसण्याचें ठिकाण जो कोणी दाखवील त्यास गुन्हा माफ होऊन शिवाय सरकारांतून इनामही देण्यांत येईल; परंतु जो कोणी त्यास छपावून ठेवील अगर तो छपून राहिलेलें ठाऊक असून तिकडे कानाडोळा करील, त्यास सरकारांतून दंड करण्यांत येईल, किंवा कैद अगर तीहूनही जबर शिक्षा करण्यांत येईल." येणेंप्रमाणें मजकूर वाचून झाल्यावर त्यानें प्रत्येक माणसास निरनिराळें विचारिलें, व त्यांकडून आपणास पाहिजे असलेली माहिती कळावी ह्मणून त्यांस चिमटे घेतले व अनेक प्रकारच्या दहशतीही घातल्या, परंतु त्या व्यर्थ जाऊन त्यांस मारूनही कांहीं कोणच्याच प्रकारची माहिती ह्मणून मिळाली नाहीं.

हा प्रकार चालू असतां इकडे **त्रिवेणी**च्या मनाची जी कांहीं स्थिति झाली ती बोलून सोय नाहीं. तिची छाती दडदड वाजूं लागून अंगास दरदरावून घामही आला. कोतवाल वगैरेंच्या भाषणावरून त्यांपैकीं कोणी वर गेले नाहीं—अशी तिची खातरी होती, यामुळें **हयदक्ष** व इतर चाकरमाणसें ज्यांस **जरठकर्ण** जती लपून बसलेली जागा ठाऊक होती त्यांच्या जबान्या चालल्या होत्या त्या ऐकण्याकडेच तिचें सर्व लक्ष लागलें होतें, इतक्यांत त्या खोलींतूनच वर जाण्यासाठीं एक जिना होता, त्या जिन्यानें कांहीं दोन तीन शिपाई दडदड वर जातांना तिला ऐकूं आले, तेव्हां मात्र ती अतिशय घाबरून गेली. घाबरण्याचें कारण मिळून इतकेंच होतें कीं त्या जिन्यांतून व **त्रिवेणी** ज्या खोलीच्या बाहेरच्या अंगास उभी होती तिच्या जवळच्या जिन्यांतून मधल्या दिवाणखान्यांत वाट जात असे, व त्या दिवाणखान्यांतून जरी सभोंवती पुष्कळ खोल्या लागत, तरी त्या खोल्यांपैकींच एकींत **जरठकर्ण** जती असल्यामुळें ते शिपाई चुकून जर त्याच खोलींत गेले तर मात्र मोठी पंचाईत होण्याची भीति होती. शिवाय तो जती ज्या खोलींत होता त्या खोलींत जावयास त्या दिवाणखान्याशिवाय दुसऱ्या जरी वाटा नव्हत्या असें नाहीं, तरी त्या या वाटेपेक्षां अंमळ लांबच्या असल्यामुळें हे शिपाई लोक तेथें जाऊन पोंचावयाचे अगोदर आपण जाऊन पोंचावयाजोग्या नव्हत्या. अशा प्रसंगीं आपणच त्वरेनें पुढें जाऊन **जरठकर्णा**स गांठून तेथून पळवून लावणें हेंच अत्यंत आवश्यक होतें, परंतु मूळ त्या ठिकाणीं जाण्यास जवळची वाट दिवाणखान्यांतून असल्यामुळें तिचा नाइलाज झाल्यासारखा झाला. अशा स्थितींत ती क्षण अर्ध क्षण आहे इतक्यांत

तिच्या मनांत कांहीं कल्पना आली तेव्हां मात्र तिच्या जिवांत जीव आला. ती कल्पना ह्मणजे एवढीच होती कीं, कोतवाल आपल्या शिपायांसहवर्तमान त्या खालच्या खोलींत असतां त्यानें आपल्या शिपायांस वर जाण्यास हुकूम वगैरे केल्याचें तिच्या कानीं पडलें नव्हतें, व त्याचें एकसारखें चाकरमाणसांच्या जबान्या घेण्याचें काम चाललें होतें, यावरून वर जे शिपाई गेले ते केवळ धराधरीच्या उद्देशानें नसून लुटीच्याच उद्देशानें गेले असावे असा तिनें तर्क बांधिला. व यावरून कदाचित् वर जाऊन त्या शिपायास नकळतही **जरठकर्णा**च्या खोलींत जातां येईल असें तिला वाटूं लागलें. तथापि याबद्दल तिची खात्री होईना, परंतु एकवार मनाचा हिय्या करून दिवाणखान्याच्या दरवाज्यापर्यंत तरी बाहेरच्याच जिन्यानें जाण्याचा तिनें निश्चय केला. हा निश्चय करून ती वर चढून पहाते तों दिवाणखान्यांत दोन तीन शिपाई असून ते कोणी कांहीं कोणी कांहीं असे जिन्नस गोळा करून आपले खिसे भरण्याच्याच नादांत असलेले तिच्या दृष्टीस पडले. त्या वेळीं सुदैवानें त्या सर्वांच्याही पाठी **जरठकर्णा**च्या खोलीकडे होत्या. त्यामुळें ही संधि बरी आहे असें पाहून ती हलकेच पाय न वाजवितां **जरठकर्णा**च्या खोलींत शिरण्याच्या आरशाजवळ गेली इतक्यांत पाठीमागें खसबस झाल्याचा भास होऊन ती भिऊन मागें पाहूं लागली, पण वास्तविक भिण्याचें कांहींच कारण नसून ते शिपाई आपल्याच नादांत असलेले तिच्या दृष्टीस पडले. इतकें झाल्यावर ती आंत गेली, पण पहाते तों त्या ठिकाणीं **जरठकर्ण** मुळींच नसून शेजारच्या खोलीचें द्वार मात्र उघडें होतें. तेव्हां कदाचित् तो त्या वाटेनें आंत गेला असेल असें वाटून ती त्या खोलींत शिरून मागें दार लावून घेऊं लागली, इतक्यांत दिवाणखान्यांत कोतवालसुद्धां सर्व लोक जमून आपल्या तरवारींच्या म्यानांच्या टोकांनीं दिवाणखान्याच्या भिंती ठोठाऊं लागले. या गडबडींत एका शिपायाची तरवार चुकून **जरठकर्णा**च्या खोलींत येण्याच्या आरशाच्या दारावर नेमकी कळीच्याच ठिकाणीं लागून तें दार आंतल्या अंगाला उघडूं लागलें, त्याबरोबर त्या शिपायांनीं वगैरे आनंदाच्या टाळ्या पिटून "भली सांपडली! आतां लंडी आमच्या हातून कशी सुटते पाहूं" ह्मणून एकदम गजर केला, व लागलेच आंत घुसले. इतक्या धांदलींत **त्रिवेणी**नें मधलें दार तें आंत शिरावयाचे आंतच लावून घेतलं होतें, व ते शिपाई आंत घुसल्यावर त्या ठिकाणीं त्यांच्या दृष्टीस कोणीही पडलें नाहीं. मात्र तेथें पलंगावर एक स्मरणीची माळ व एक लहानसें मोराचें पीस एवढींच काय तीं त्यांस सांपडलीं. त्याबरोबर तो कोतवाल चरफडत व दांत-ओंठ खात पुढील शब्द बोलतांना तिनें ऐकिलेः—"बरें बरें! कांहीं चिंता नाहीं! लंडी या वाड्यांत आहे हें तर खचित आहे, याकरितां इला आज घेतल्याशिवाय बाहेर पडायचें नाहीं हाच निश्चय! चला! तो दुष्ट कदाचित् त्या दरवाजांतून बाहेर निघून गेला असेल!" कोतवालच्या तोंडचे हे शब्द ऐकल्याबरोबर ते सर्व शिपाई ज्या दारानें **त्रिवेणी** बाहेर पडली होती त्याच दाराकडे येऊं लागले तशी **त्रिवेणी**नें बाहेरल्या अंगानें कडी लावून घेतली, आणि आपण चालती झाली. मागें तें दार उघडेना सबब त्या शिपायांचा दारावर लाथा मारण्याचा वगैरे क्रम चाललाच होता, तथापि तिकडे लक्ष न देतां ती तडक चालती

ण केलेल्या कृतीबद्दल लाज वाटल्यासारखी होऊन क्षण दोन क्षणपर्यंत अगदीं गोंधळल्यासारखीही होई.

असो; येथपर्यंत सांगितलेला सर्व प्रकार मनांत आणिला असतां मी **ताराबाई**च्या घरीं राहत होतें ती किती सुखांत हें कोणासही सांगण्याची जरूर नाहीं. मेलें क्षणभर देखील जिवाला सुखसमाधान नाहीं अशी माझी रात्रंदिवस स्थिति असे. मग अशा स्थितींत दोन घटका सुखानें झोंप तरी कोठून येणार ? **ताराबाई**च्या अतिशय जाचामुळें मी दिवसें दिवस खंगत चाललें असें माझें मलाही वाटूं लागलें. परंतु असें झालें ह्मणून उपाय काय ? पोट तर कसें तरी जाळलेंच पाहिजे, व तें जाळण्याला दुसरा कोणताही उपाय नव्हता, यासाठीं **तुकारामा**नें अभंगांत सांगितल्याप्रमाणें उगें राहून जें जें होईल तें तें मुकाट्यानें मी सोशीतच होतें. वारंवार मनांत येई कीं या **त्राटिकाबाई**चा हा जाच सोशीत राहण्यापेक्षां एकदम घरांतून बाहेर पडावें व दुसरीकडे कोठें तरी चाकरी मिळाली तर पहावी, परंतु लागलीच डोळ्यांपुढें दुसरा विचार उभा राही, कीं मी आज जर अशीच बाहेर पडलें तर जाऊन उभें रहावें तरी कोणाच्या दारांत ? हा विचार मनांत आला कीं लागलीच माझी कंबर अगदीं खचल्यासारखी होऊन मला कसेंसेंच वाटूं लागे, व त्या वेळीं माझ्या मनाची काय जी विलक्षण स्थिति होई तिचें मला वर्णनही करितां येत नाहीं ! असो. या **त्राटिकाबाई**चा घरांत मला एकटीलाच जाच असे असाच केवळ प्रकार नव्हता. तिचा जन्मस्वभावच तो पडला, तेव्हां ती माझ्याप्रमाणें इतर चाकरमाणसांसही त्रास देई, व घरांतून एकदम बाहेर घालवून देईन ह्मणून त्यांस धमकीही देई. तथापि किती झालें तरी तीं माणसें दुसऱ्या अनेक ठिकाणीं वागलीं सवरलेलीं होतीं, यामुळें या चाकरीवर लाथ मारिली तर दुसरी चाकरी पहातां येईल अशी त्यांची स्थिति असे, व यामुळें तीं या **त्राटिकाबाई**स माझ्या इतकीं वचकून नसत. परंतु माझी स्थिति त्यांच्याहून भिन्न पडली, त्यामुळें माझा अगदीं नाइलाज झाल्यासारखा होता. व अशा स्थितींत एकादे वेळीं **बाईस हणमंतरावांस** पत्र लिहावें व त्यांना आपली सर्व स्थिति कळवावी ह्मणून देखील मनांत येई, व त्याप्रमाणें पत्र लिहिण्याकरितां **ताराबाईस** न समजूं देतां मीं **संभाजीरावां**कडून दोन चारदा कागद शाईही मागून घेतली. परंतु काय कारण असेल तें असो, दोन्ही चारी वेळां माझ्यानें पत्र ह्मणून कांहीं लिहवलें नाहीं. असो; अशा स्थितींत आज लिहीन, उद्यां लिहीन, असें करितां करितां पांच सहा महिनेही लोटले, तथापि माझ्या हातून एक दोन बोटें चिठ्ठीही लिहून पाठविण्याचें जमलें नाहीं, व मी आपली सदा घोरांतच राहिलें ! मधें मधें मात्र कधीं कधीं **गोविंदा** व **कृष्णा** यांजकडून पत्रं किंवा निरोप येत, किंवा **लिंबाहून यमुने**कडून निरोप येई, तेव्हां मात्र कांहीं वेळपर्यंत माझ्या जिवाला कांहीं थोडें समाधान ह्मणून मिळे **कृष्णा**कडून पत्रें येत त्यांत बराच लांब मजकूर लिहिलेला असे. परंतु **गोविंदा**च्या पत्रांत मात्र मजकूर अगदीं थोडा असून शिवाय कशी तरी वेंठ काढून टाकण्याची ह्मणूनच तो एकादे वेळीं पत्र लिहीत असे असाच त्याच्या लिहिण्यावरून भास झाल्यावांचून राहत नसे. असो.

अशा स्थितींत मोठ्या दुःखानें दिवस काढीत असतां पांच सहा महिने लोटून पुढें

**चैत्र वैशाखाचे** दिवस आले. त्या सुमारास एके दिवशीं संध्याकाळीं असा तिसरा प्रहर उलटून गेला असून "माझी बाबी," **मन्यावा** आणि **चिमा** हीं तिघेंही जण यथेच्छ जेवून झोपीं गेलीं होतीं. व त्या दिवशीं मला नित्यापेक्षां विशेष थकल्यासारखें वाटून मीही त्यांना पुढें घेऊन लवंडलें होतें. इतक्यांत खालीं परसांत **हणमंतराव वाईहून** आले आहेत, व ते **संभाजीराव** आणि **ताराबाई** यांच्याशीं बोलत बसले असून त्यांनीं मला खालीं बोलाविलें आहे, ह्मणून एक चाकर वर सांगत आला. त्या चाकराचें तें ह्मणणें ऐकल्याबरोबर मला एकदम जो कांहीं हर्ष झाला त्याचें वर्णनही करतां येणार नाहीं. माझ्या नेत्रांतून आनंदाश्रु गळूं लागून मी त्या स्थितींतच लागलीच ताडकन उठून उभी राहिलें, व क्षणभर माझा सर्व थकवा कोणीकडच्या कोणीकडे नाहींसा झाल्याचाही भास झाला. मुलें निजलींच होतीं याकरितां त्या चाकरास अंमळ मुलांकडे लक्ष असूं दे ह्मणून सांगून मी लागलीच खालीं परसांत गेलें, तों तेथें **ताराबाई** व **संभाजीराव** यांशीं **हणमंतराव** बोलत बसलेले दृष्टीस पडले. मी यावयाचे पूर्वीं त्यांचें काय बोलणें चाललें होतें तें मला ठाऊक नाहीं, परंतु मी परसांत आल्याबरोबर मला एका गोष्टीचें फारच आश्चर्य वाटलें. ती गोष्ट हीच कीं ज्या माझ्या **त्राटिकाबाई** धनिनीचें तोंड सदा रागेजलेलें व कपाळास आंठ्या पडल्यामुळें भेसुर दिसत असे, तीच **हणमंतरावांशीं** बोलत असतां अगदीं हंसतमुख झाली असून तिच्या त्या वेळच्या तोंडावरून ही ह्मणजे **त्राटिकाबाई** असेल अशी कोणाच्याही मनांत कल्पना येण्याजोगी नव्हती! फार कशाला, त्यावेळीं खालीं उतरल्याबरोबर **ताराबाईचें** तें तोंड व त्या वेळची तिची शांत व सौम्य मुद्रा हीं पाहून खुद्द मलाही क्षणभर ही कोणी तरी नवीच बाई असावी असा भास झाला; व पुढें दहा पांच क्षण मध्यें जाऊन जेव्हां हीच आपली धनीन अशी माझी खातरी झाली तेव्हां मात्र मला अत्यंत आश्चर्य वाटलें. असो. माझी अशी स्थिति झालेली **ताराबाईनें** पाहिली, तथापि तिकडे बिलकुल लक्ष न देतां ती **हणमंतरावांस** ह्मणालीः—"हं! ही **मथुरा** आली!" नंतर मजकडे किंचित् वळून मोठ्या ममताळूपणानें ती बोलूं लागलीः— "ये मुली अशी पुढें! घाबरूं नको! हे गृहस्थ तूं ओळखले नाहींस वाटतें? अग, हे **वाईचे हणमंतराव**! यांचे तुजवर मोठे उपकार आहेत समजलीस? ये अशी पुढें! ह्यांना तुला पाहून फार दिवस झाले ह्मणून हे तुला मुद्दाम भेटण्याकरितां आले आहेत! तूं आतां भेटलीस आतां त्यांना बरें वाटतें! तूं आमच्या इथें मोठ्या आनंदानें रहातेस, न् तुझी माझ्या छकुली मकुलीवर फार प्रीति आहे, न् तूं त्याला चांगल्या रीतीनें खेळवितेस सवरतेस, तसेंच तुला आमच्या येथें खायला प्यायला कोणच्याही रीतीनें पंचाईत नाहीं ह्मणून आपली हिकडली तिकडली सगळी हकीकत सांगत होतें,—"

हें माझ्या धनिनीचें वृथा आत्मस्तुतीचें चऱ्हाट आणखी किती वेळ चाललें असतें माझ्यानें कांहीं सांगवत नाहीं. तथापि **हणमंतराव** तें संपेपर्यंत वाट न पहातां मध्येंच बोललेः—"तं खरें, पण ही मागें जशी दिसत होती तशी आतां दिसत नाहीं!—कायग **मथू**! तूं आतां पहिल्यापेक्षां उंच झाली आहेस, तरी पण अगदीं वाळत चालल्यासारखी दिसतेस! आणखी मागें तुझ्या तोंडावर जी थोडी बहुत

टवटवी दिसत असे ती आतां अगदीं नाहींशी झाली आहे !—"

इतक्यांत **ताराबाई** हंसत हंसत बोलली:— "हं! त्यांत मेलें काय आहे? लहान मुली वाढीला लागल्या ह्मणजे अशाच खरकतात! " हें ती बोलत असतां तिचें जें हंसतमुख झालें होतें तें पाहून माझी खातरीच झाली कीं **ताराबाई**-च्या असल्या बाह्य वृत्तीवरून ती फारच सज्जन बायको आहे असें **हणमंतरावांस** वाटलें असल्यास त्याचें काडीमात्र नवल मानण्याचें कारण नाहीं.

**ताराबाईचें** वरील भाषण ऐकून **हणमंतराव** ह्मणाले:—" हो, तसें ही होऊं शकेल खरें !— असो. **मथुरे** ! तूं येथें अगदीं सुखांत येऊन पडली आहेस हें पाहून मला फार फार समाधान वाटतें. तुझा भाऊ **कृष्णा** हा फारच चांगला निपजला आहे. तो आमच्या फार उपयोगीं पडतो, व त्याच्या इतक्या वयांतही तो आपल्या कामांत नेहमी कसा अगदीं खबरदार असता."

**कृष्णाबद्दलची** ही हकीकत ऐकून मला अतिशय समाधान वाटलें, व माझी स्वतःची स्थिति वाईट असल्यामुळें जरी ह्रद्रोगानें माझें तोंड अगदीं खरकलें होतें तरी **हणमंतरावांचें** भाषण ऐकून तें एकदम उजळल्याचा मला भास झाला, व माझ्या नेत्रांतून आनंदाश्रुही वाहूं लागले. तशा स्थितींतच मी **लिंबास** माझ्या बहिणींचें कसें काय आहे ह्मणून **हणमंतरावास** प्रश्न केला.

"त्या दोघींचेंही नीट सर्वोत्कृष्ट आहे. **यमुना** आतां बरीच मोठी दिसू लागली आहे, व **जनी** ही जरी कांहीं थोडी वाढलीच आहे तरी तिचें तें बाळसें अद्यापि कायमच आहे. **यमुना** अंमळ जरा एककली आणि ढोली आहे. तिला आपण लोकांच्या घरीं रहातों ह्याकरितां त्यांच्या बातावेतानेंच घ्यावें हें अजून कळत नाहीं! असो. कसेंही असलें तरी अजून ती बच्चाच आहे. अंमळ मोठी झाली ह्मणजे तिचा हा स्वभाव राहीलच अशांतला कांहीं प्रकार नाहीं.—"

"बरें पण **गोविंदाचें** कसें काय ?" मी मध्येंच विचारलें, व हें ऐकल्याबरोबर **हणमंत-रावाचें** तोंड किंचित् काळवंडल्यासारखें झालें, तें पाहून माझ्या काळजांत एकदम धस्स झालें. माझ्या मनाची अशी स्थिति झालेली पाहून ती होण्याचें कारण आपली स्वतःची मुद्राच होय हें **हणमंतरावांच्या** लक्षांत येऊन ते बोलूं लागले:—" अं ! काय ह्मणालीस ? **गोविंदाचें** होय?—**गोविंदा** कांहीं वाईट ह्मणण्यासारखा नाहीं न् तो अजूनही कदाचित् निवटेल! परंतु **मथुरे!** तूं एक गोष्ट कर ! **गोविंदाला** एक पत्र लिही आणि त्यांत असें ह्मण कीं मी—ह्मणजे मी अं?—तुझी वर्तणुक नीट नाहीं ह्मणून ह्मणत होतों, किंवा पाहिजे तर असें लिही कीं, हल्लीं तुला प्यादांमध्यें नोकरी मिळाली आहे, परंतु तुझ्या वरचा नाईक तुझ्याविषयीं कुरकुरत असतो असें मला— ह्मणजे तुला, समजलीस ?—समजलें आहे ! असो. तूं हा मजकूर लिहीच. **मथुरे** ! तुझ्या आईबापांना मी फार दिवसांपासून ओळखतों. आणि तीं तुह्मां मुलांना चांगली शिक्षा लागावी ह्मणून नेहमी झटत होतीं, यासाठीं आपलें मला वाटतें तुह्मीं सर्वांनीं चांगलें निपजावें, चांगल्या रीतीनें वागावें, आणि आपणाला चार चौघांत वागण्याचा प्रसंग येतो यासाठीं नेकीनें वागून आपल्या अब्रूचा जेणेंकरून बचाव होईल ती गोष्ट करावयास चुकूं नये ! **मथुरे** ! तुह्मां बाकीच्या मुलांबद्दल मला धास्ती वाटत नाहीं,

परंतु खरेंच पुसशील तर मला **गोविंदाचीच** मात्र काळजी वाटते! यासाठीं मीं सांगितला तेवढा मजकूर लिही हो!"

**हणमंतरावांचें** हें भाषण ऐकून मला अतिशय वाईट वाटलें, व **गोविंदा** कदाचित् वाईट निघेल ही गोष्ट मनांत येऊन मला अतिशय खेदही झाला. तसेंच **हणमंतरावांसारख्या** चांगल्या सभ्य मनुष्यासही त्याचें वर्तन वाईट वाटलें तेव्हां **गोविंदाच्या** हातून कदाचित् कांहीं मोठी अगळीकही झाली असेल असें माझ्या मनांत आल्याशिवाय राहिलें नाहीं, व तशा स्थितींतच मी असतां **हणमंतरावांच्या** शेवटल्या भाषणानंतर बोललें:–"होय. मी लिहीन पत्र; परंतु **गोविंदाच्या** हातून कांहीं एकादी वाईट व भलती सलती तर गोष्ट नाहींना झाली?"

**हणमंतराव** उत्तर करितातः–"नाहीं! त्यानें अजून कांहीं तशांतली गोष्ट केली असें मीं ह्मटलें नाहीं, परंतु आलीकडे त्याला सहवास फार वाईट लागला आहे, यामुळें त्याच्या हातून एकादी वाईट गोष्ट केव्हां घडून येईल आणि केव्हां नाहीं याचा नेम सांगतां येत नाहीं. तो आलीकडे आपल्या वाड्यांतल्या कामावरही नीट दररोज जात नाहीं न् **भद्रेश्वराच्या** वाटेंतल्या पिठ्यांतही केव्हां केव्हां चोरून जातो, जुवाही खेळतो. याकरितां तूं त्याला चांगलें खरमरीत पत्र लिही, आणि अजून जोंपर्यंत त्याला फारसा वाईट छंद लागला नाहीं तोंपर्यंतच त्यानें हा नाद सोडून द्यावा ह्मणून त्याला तुझ्याकडून होईल तितका उपदेश करावयास चुकूं नको, समजलीस?"

"तेवढें काम **मथुरा** चांगलें करील अशी माझी खात्री आहे!" **ताराबाई** मध्येंच बोलूं लागली. "आणखी मी खात्रीनें सांगतें कीं **मथुरेचा** उपदेश ऐकून घेऊन तिचा भाऊ खचितच आपले वाईट ढंग टाकून देईल!"

**संभाजीराव** बोलले:–"होय होय! खचित! **मथुरा** चांगलाच उपदेश करील यांत संशय नाहीं! ती बाहेरून रूपानें जशी चांगली आहे तशीच आंतूनही गुणानें चांगली आहे-यांत संशय नाहीं!"

हें **संभाजीरावांचें** भाषण ऐकून मला लाजल्यासारखें होऊन मी अंमळ गोंधळलें, परंतु तसल्या गोंधळांतही **ताराबाईकडे** पाहिलें तों ती एकीकडे आपल्या नवऱ्याकडे वळून त्याजकडे क्रोधदृष्टीनेंच पहात असतां माझ्या दृष्टीस पडली. परंतु ती स्थिति **हणमंतरावांच्या** लक्षांत येऊं नये ह्मणून ती त्याकडे वळून पुनरपि पहिल्याप्रमाणें हंसतमुख करून नवऱ्याला उद्देशूनच प्रेमशब्दांनीं बोललीः–"हें असें काय बरें बोलावें? **मथुरेला** आतां अंमळ अंमळ कळायला लागलें आहे. तिला गडे आपण असें लाजवूं नये!" नंतर **हणमंतरावास** उद्देशून ती बोललीः–"आमच्या इथला स्वभाव किनई भारी गमत्या, नेहमी कांहीं तरी हंसायचें, बोलायचें, हा आपला जन्मस्वभावच पडल्यासारखा झाला आहे!–अग पण हें काय? कानामागें ढेंकूण चढलासा वाटतो!" इतकें बोलून तिनें झटकन **हणमंतरावांच्या** लक्षांत न येई अशा रीतीनें नवऱ्याच्या कानामागें हात नेऊन माझ्या देखत त्याच्या कानास चिमटा घेतला, त्यामुळें नवरा बिचारा किंचित् विवळल्यासारखा झाला, परंतु ती गोष्ट **हणमंतरावांच्या** लक्षांत न यावी एतदर्थ त्यानें ती ढेंकूण बळकट चावला अशांतच घालविली.

इतकें झाल्यावर आणखी थोडा वेळ सर्वांचें

भाषण झाल्यावर **हणमंतराव** जावयास उठले, तेव्हां **ताराबाईनें** थोडासा मुरंबा आणून एवढा तरी खाऊन जा ह्मणून त्यास ह्मटलें, व ते जरी कशाला कशाला ह्मणून दोन तीन वेळां ह्मणाले तरी तिनें हंसत हंसत आग्रह करून त्यांच्याकडून तेवढा खावविलाच. व हातबित धुवून. नंतर **हणमंतराव** बाहेर जातांना फिरून मजकडे पाहून ममतेनें "तेवढें पत्र मात्र ल्याहायला विसरूं नको अं!" ह्मणून सांगून निघून गेले. नंतर मी वर जाऊन पहातें तों तिकडे "माझ्या बाबी"नें रडून आकांत मांडिला होता. **मन्याबा** व **चिमा** हीं दोघेंही मी खालीं आल्यावर लौकरच उठलीं होतीं, व त्यांनीं **बाबी**लाही उठवून इकडे तिकडे फरफटीत ओढण्यास आरंभ केला होता. मी खालीं गेलें त्या वेळीं ज्या चाकरास उभें रहावयास सांगितलें होतें तो माझ्या मागें केव्हांच खालीं निघून गेला होता, व त्याचे मागून **राजाऊ**ही वर येऊन मुलांच्या शेजारीं स्वस्थ घोरत पडली होती. इकडे पोरानें रडून रडून जीव टाकण्याची वेळ आणिली तरी तिचें आपलें घोरणें चालूच होतें. असो. मी आल्यावर **बाबीला** त्या दोघां मुलांच्या हातून सोडवून खांद्यावर टाकिलें, व तिला उगी उगी ह्मणतां ह्मणतां चांगली उगी करावयास दोन घटिकावर वेळ होऊन गेली. मग **राजाऊ**ला जागें करून अंमळ अर्धी एक घटका तिचीं आर्जवें केलीं तेव्हां तिनें तीं तिन्ही मुलें संभाळावयाचें कबूल केलें, व मला **गोविंदाला** पत्र लिहावयाचें होतें ह्मणून मी **संभाजीरावा**पाशीं कागद शाई मागावयाकरितां खालीं उतरलें. इतक्यांत माजघरचें दार किलकिलें उघडें असून **ताराबाईचें संभाजीरावां**शीं पुढील निष्ठुर व कर्कश भाषण माझ्या कानीं पडलें:—"अं—कसें—कसें—तुह्मांला ती रांडवी कारटी देखणी वाटली अं—?थांबा! असल्या पोरींकडे कशा नजरेनें पहावें तें तुह्मांला चांगलें शिकविलें पाहिजे! हं—अस्सें—" हें बोलत असतां तिनें बहुतकरून आपल्या नवऱ्यास गालगुच्चा घेतला असावा असें मला वाटतें. "आतां फिरून त्या **मथी**कडे अशा डोळ्यांनीं पहा तर खरें, आणि तिला देखणी तर ह्मणा ह्मणजे सांडसानें हे डोळेच काढून टाकितें कीं नाहीं पहा!—आणखी काय ह्मटलेंत ती धांडगी पोर चांगल्या गुणाची, नाहीं का?—थांबा आतां हा महिना संपूं द्या कसा ह्मणजे तिला घरांतूनच घालवून देतें कीं नाहीं पहा!"

**संभाजीराव** कांपत कांपत आर्जवानें ह्मणाले:—"पण—पण—मी तुझ्या पायां पडतों—तूं असा भलताच अर्थ करूं नको! खरेंच पुसशील तर ती मला आमच्या **चिमा**सारखीच वाटते! आणखी ती बाहेरून चांगली आहे तशीच आंतूनही गुणांनीं चांगली आहे ह्मणून मीं आपलें तसें ह्मटलें!—पण फार कशाला? तूंच नाहीं का **हणमंतरावां**देखत तिला चांगली ह्मटलेंस? मग मा—"

"मीं पाहिजे तें ह्मटलें, पण तुह्मांला तिच्याबद्दल इतकें बोलायला सांगितलें होतें कोणीं!" माझी धनीन किंकाळतच बोलली. "**हणमंतराव** आपल्या ओळखीचा, फारां दिवसांनीं इकडे आलेला, तेव्हां त्याच्या देखत चाकरांवर आपण ममता करितों हें दाखविलेंच पाहिजे! पण त्यांत तुह्मीं काय ह्मणून तोंड घातलें? बरें असो. ही एकवेळ तुह्मांला गप करितें, पण फिरून नाहीं गप व्हायची ध्यानांत असूं द्या नीट—समजलांत? दुसऱ्याच्या तोंडावर मी चाकर लोकांवर अशीच ममता करितें ह्मणून दाख-

वितें, परंतु तुमच्या सारखी मी कुणाला आपली चिमा नाहीं ह्मणावयाची ! चाकर माणसें तितकीं द्वाड, त्या सर्वांचा मी मनापासून द्वेषच करितें !"

नवरा ह्मणतो:-" बरें, बरें, तूं वाटेल त्याचा द्वेष कर त्याबद्दल माझें कांहीं एक अक्षरसुद्धां ह्मणणें नाहीं.—परंतु माझें एक ह्मणणें मात्र कसें तरी ऐकच! तें हें कीं बाहेरच्या लोकांदेखत तूं मजवर अंमळ कमी प्रेम दाखवीत जा, ह्मणजे तरी ते गेल्यावर तूं मजवर अंमळ अधिक प्रेम ठेविशील ! "

बायको उत्तर करितेः-" कां ! आतां आणखी ! रहातां कीं नाहीं गप्प ? "

इतकें बोलणें ऐकिल्यावर माझ्यानें कांहीं तेथें उभें राहवेना, एवढेंच नव्हे, तर मी इतका वेळ तेथें उभी राहिलें ह्याबद्दल माझेंच मन मला खाऊं लागलें ! असो. इतकें झाल्यावर मग मला संभाजीरावांपाशीं जाऊन कागद वगैरे मागणें कसचें सुचतें? मी मागें एक इतकीसुद्धां न वळतां तशीच तडक वर निघून गेलें, व त्या दिवशीं माझा पत्र लिहिण्याचा बेत तसाच राहून सरते शेवटीं दुसऱ्या दिवशीं माझें पत्र लिहिण्याचें जमलें, व संभाजीरावांचा कोणी चाकर त्याच सुमारास वाईस कांहीं कामाकरितां जावयाचा होता त्याजबरोबर, त्याला आमच्या घरचा पत्ता नीट सांगून, तें गोविंदाकडे रवाना केलें.

## प्रकरण ५.

मागील प्रकरणांत सांगिलेली हकीकत घडून आल्यानंतर आणखी पुढें सात आठ महिने लोटले. इतक्या अवकाशांत मला माझ्या धनिनीपासून जो त्रास भोगावा लागत असे, व सदासर्वकाळ काळजींत व धास्तींतच रहावें लागे ह्मणून सांगितलें, त्यांत काडीमात्रही अंतर पडलें नाहीं. ताराबाईपासून आठ पंधरा दिवसांची सवड मागून घेऊन वाईस गोविंदा आणि कृष्णा यांस भेटून यावें, तसेंच लिंबास माझ्या दोघी बहिणी होत्या त्यांस एकवार आपल्या डोळ्यांनीं पहावें ह्मणून वारंवार मनांत येई, परंतु माझ्या धनिनीच्या रागीट स्वभावामुळें व तिच्या त्या फणफणण्यामुळें तिजजवळ याबद्दलचा एक चकारशब्दही काढण्यास मला धीर होत नसे. यामुळें माझे भाऊ व बहिणी यांचा माझा वियोग होऊन एक वर्ष अधिकही लोटलें, तथापि त्यांच्या दर्शनाचा योग ह्मणून कांहीं जमून आला नाहीं. एकदा मात्र असाच कोणी एक बाहेर गांवचा पाहुणा आला होता, व त्याच्या देखत ताराबाई मोठ्या आनंदितपणानें वागत असे, अशा वेळीं तिला मीं एकदा या गोष्टीबद्दल विचारिलें, तेव्हां कसें काय झालें असेल तें असो. तिनें महिना दोन महिन्यांनीं तुला आठ पंधरा दिवसपर्यंत घरीं जाऊं देईन ह्मणून मला सांगितलें होतें; व कदाचित् हें त्या पाहुण्याच्या देखत सांगितलें होतें, सबब त्यांत कांहीं अर्थ नसेल असें ह्मणावें, तर हें तिनें मला सांगितल्यावर आठ चार दिवसांनीं तो पाहुणा निघून गेल्यावरही तिनें त्याबद्दल एक अक्षरही तोंडांतून काढिलें नाहीं ! असो; इतक्या अवकाशांत गोविंदाकडून माझ्या पत्राला उत्तर आलें होतें. या उत्तरावरून जरी तो आलीकडे अगदीं वाईट निपजला आहे असें वाटण्यासारखें कांहीं नव्हतें तरी एकंदरींत त्याचें मजवर पूर्वीइतकेंही प्रेम नसावें असा मला भास झाला त्याच्या पत्राचें तात्पर्य इतकेंच होतें कीं रास्त्यांच्या वाड्यांतला नाईक ह्याचा

स्वभाव फार खाष्ट असून आपण कितीही मन लावून काम केलें तरी तें त्याच्या ह्मणून पसंतीस उतरतच नाहीं, व **हणमंतराव** हे आपले अंमळ तऱ्हेवाईक व एककल्ली आहेत, यामुळें एकादी गोष्ट, जींत वास्तविक कांहीं वाईट नाहीं, ती केली असतां देखील त्यांस आपलें वाईट वाटतें !. या पत्रांत त्यानें खुद्द मला उद्देशून पुढें लिहिलेला मजकूर लिहिला होताः—
" कसें झालें तरी तुझ्या वडील भावाचें नातें
" माझ्याकडे. तुला मला उपदेश करण्याचा अ-
" धिकार नाहीं. करितां फिरून असा उपदेश
" न लिहिणें. आतां मी आपलेकडून चांगलेच
" रीतीनें वागतों आहें, आणि तुलाच कायती
" एकटीला बाबांच्या अब्रूची काळजी न् मला
" नाहीं असें समजूं नयेस. करितां फिरून
" मजला असें न लिहिणें. कळावें हे आशीर्वाद."

असो. वर सांगितल्याप्रमाणें **ताराबाईच्या** येथें मी येऊन राहिल्याला एका वर्षावर दिवस लोटून गेले. असा पौषाचा महिना सरण्याचा सुमार होता, त्या वेळेस एके दिवशीं तिसरा प्रहर उलटून गेल्यावर मी एकट्या **जनकूलाच** बरोबर घेऊन परसांतील बागेंत गेलें होतें. थोरलीं दोघेंही मुलें घरांतच राहिलीं होतीं. कां तें मात्र कांहीं या वेळीं बरोबर आठवत नाहीं. हे दिवस थंडीचे होते तथापि माझ्या अंगावर एक चौघडी होती, व **जनकूलाही** चांगलें गुरगटून घेतलें होतें यामुळें थंडी फार ह्मणण्यासारखी वाजत नव्हती. बागेंत गेल्यावर तिच्या आवाराला लागूनच **संभाजीरावांनीं** नुकतींच एक दोन महिन्यांपूर्वीं शेतें खरेदी केलीं होतीं, त्यांत एकादे वेळीं मी मुलांना घेऊन जात असें, त्याप्रमाणें त्याही दिवशीं मी **जनकूला** घेऊन तेथें गेलें **जनकूचें** वय मी या घरीं आलें तेव्हां दोन वर्षांचें होतें, तें या सुमारास तिसरें संपून चवथें वर्ष लागलें इतक्या बेतांत होतें. **जनकू**-एवढ्या मुलानें वास्तविक ह्मटलें तर वर्ष दोन वर्षांपूर्वींच चालूं लागावें, परंतु लहानपणापासून त्याला नेहमीं कोणी तरी घेण्याचीच संवय लागली होती, ह्यामुळें चालण्याच्या कामांत तो अगदीं मागसलाच होता. तो नुकता कोठें दोन तीन महिन्यांपूर्वीं चालूं लागला होता. त्याच्या पायांत जोडा होता, व त्याचा हात धरूनच मी चालत होतें; तथापि अंमळ कोठें त्याचा हात सोडला तरी त्याला एकट्यालाही चालतां येण्यास कठिण वाटण्याजोगें नव्हतें, यामुळें त्याचा हात सोडून सहज आपल्या मनांत आपल्याच स्थितीविषयीं विचार करावयास मला फावलें. या विचाराच्या नादांतच हळूहळू आह्मीं चाललों होतों, इतक्यांत शेताच्या कुंपणास लागून पलीकडल्या अंगास आंब्याचें झाड होतें त्याशीं टेंकून कोणी मनुष्य बसलेला माझ्या दृष्टीस पडला. त्याच्या चेहेऱ्यावरून तो बराच लांबून चालून आल्या कारणानें अगदीं थकून गेला असें सहज वाटत असे. त्याच्या डोकीला पागोट्याची चुंबळ असून अंगांत फाटकी मळलेली बंडी घातली होती, व तो थंडीनेंही किंचित् कांकडला असावा असें मला भासलें. तो झाडाशीं टेंकून हातपाय पोटाशीं घेऊन बसला होता, व एक मळका फाटलेला पंचा नेसला होता. पहिल्या प्रथम त्याचें तोंड मजकडे नव्हतें, परंतु इतक्यांत त्याला कोणी जवळ येत असल्याची चाहुल कळून त्यानें सहज मजकडे वळून पाहिलें, तों तो मनुष्य दुसरा कोणी नसून प्रत्यक्ष माझा भाऊ **गोविंदाच** होता असें मला समजलें.

बाबा आणि आई जिवंत होतीं त्यावेळीं आह्मीं मुलांनीं अगदां स्वच्छपणानें रहावें ह्मणून तीं फार खबरदारी घेत असत, त्यामुळें आह्मां सर्वांस लहानपणापासून तीच शिक्षा लागली होती. यास्तव यावेळीं **गोविंदानें** असला घाणेरडा पोषाक केलेला पाहून मला अतिशय वाईट वाटलें, व **हणमंतरावांनीं गोविंदाच्या** वर्तनाबद्दल मला जो मजकूर सांगितला होता तो एकदम माझ्या डोळ्यापुढें दिसूं लागला व त्या स्थितींतच "**गोविंदा** ! तूंच का हा ?" असा दुःखोद्गार माझ्या तोंडांतून बाहेर पडला, त्याबरोबर **गोविंदा** झटकन उठून उभा राहिला आणि "हं–हं-कोण–ताई–तूंच का ती?" असें बोलला. या त्याच्या बोलण्यांत वास्तविक दांडगेपणाचा कांहीं प्रकार नव्हता, तथापि मागें घरीं असतांना ज्याप्रमाणें तो मजशीं ममतेनें भाषण करीत असे त्यापेक्षां याचें हें बोलणें मला कांहीं निराळ्या तऱ्हेचें भासलें. मी तो कुंपणापाशीं उभा होता त्याचे जवळ गेलें तों मला त्याच्या तोंडाची एकदम वसकन दारूची घाण आली, व त्याची त्या वेळची पाहणी ही पूर्वींच्या पाहणीपेक्षां बदलली होती. तीवरून स्वारींनीं अलीकडे दारूवर बराच सपाटा धरिला आहेसें मला वाटून मला एकाएकी अनावर रडें कोसळलें, व तशी रडत असतांच मीं त्याला विचारिलें:–"**गोविंदा!** हें रे काय? तुझी अशी स्थिति पण कशानें झाली? तुला झालें आहे तरी काय ? तूं वाईहून केव्हांसा निघालास, आणखी असा तूं गेला होतास तरी कोठें ?"

माझ्या डोळ्यांतून आसवें गळत होतीं तरी त्यांजकडे बिलकूल लक्ष न देतां तो आपल्याच नादांत चैनीनें हंसत हंसत बोलला:–"कोण ? मी होय? हं:–मी असा चैनीनेंच इकडे आलों! आमचा तो–थेरडा नाईक–त्याला, मला तुला भेटायला जायचें आहे ह्मणून सांगून एक दिवसाची सुटी मागून घेतलीन् तुलाच भेटायला ह्मणून सहज इकडे आलों ! तूं तर काय अगदीं इकडे रमलीच आहेस जशी ! तुला आठ चार दिवस तिकडे येऊन जायला देखील फांवत नाहीं !"

मीं ह्मटलें:–"इथें आजपर्यंत घरांत अडचणच होती त्यामुळें माझें यायचें कांहीं जमलें नाहीं, परंतु माझ्या धनिनींनें मला लौकरच आठ पंधरा दिवसांच्या फुरसतीनें तिकडे येऊं द्यायचें कबूल केलें आहे !–पण–दादा ! तूं हें नाहीं मला सांगितलेंस? तूं अलीकडे असा काय दिसूं लागला आहेस हा ? तुझ्या तोंडावरून तर तूं रात्रभर कोठें तरी जागत होतास असेंच मला वाटतें !"

"अं:–आग लाव तोंडाला ! त्या तोंडाकडे काय दोष आहे? तो थेरडा नाईक पगार देखील वेळच्या वेळेस देववीत नाहीं न् इथें आमची होते खाण्यापिण्याची पंचाईत ! मग त्या तोंडानें वाईट दिसूं नये तर कां शंख करावा ? वाहवा ! तूं आपली भलीच दिसतेस !"

हें **गोविंदाचें** दांडगेपणाचें भाषण ऐकून मला फार आश्चर्य वाटलें, व त्याच्या एकंदर मुद्रेवरून व आचरणावरून त्याच्यानें एकदम थेट आमच्या घरीं येववलें नाहीं याचें कांहीं तरी निराळें बीज असावें असा मला संशय आला, व मीं त्यास विचारिलें:–"तें असो ! पण दादा! तूं असा या कुंपणाशीं टेंकून तरी कितीसा वेळ बसला होतास ?"

"छे:–कितीसा कुठला ?–नुकताच कोठें टेंकून बसलों होतों, आणखी पुढें कसें करावें

श्लोक.

हे गंधर्वपती, समस्त सुरही येथें पहा बैसती;
हे पितर्षि, फणींद्र भूपति तसे हे या स्थलीं शोभती;
रंभाद्या सुतनू इथेंहि करिती नृत्यास दिव्यांगना;
याहीं देवसभा अहा अधिकसा दे हर्ष माझ्या मना.

(पुढें पाहून) हा पहा भगवान् **महेंद्र**, सर्व देव आपआपल्या अधिकाराप्रमाणें सेवा करीत असून, **बृहस्पति** गुरुशीं भाषण करीत आसनावर बसला आहे! अहो! याचें केवढें हो हें महाभाग्य!

साक्या.

स्वर्गामाजी, मर्त्यजनांच्या तेंवी भुवनामाजी,
किंवा अहिभुवनींही ज्याच्या सर्व शासना राजी;
चिंतन करित्या दीन जनांची इच्छा पूर्ण करीती
चिंतामणि, सुरधेनू, कल्पद्रुम ते ज्याच्या हातीं;
अश्वमेधशत पूर्ण न होतां साध्य न हो पद ज्याचें;
वेदहि ज्याची कीर्ति वर्णिती, भाग्य असें कोणाचें?

(तदनंतर वर सांगितल्या प्रकारचा महेंद्र यथाविभव परिवारासहवर्तमान येतो)

**महेंद्र**—(आपणाकडे मन्मथ येतांना पाहून बृहस्पतीस) भगवन्!

आर्या.

या वत्साचा शतशः म्यां नयनीं पाहिला पराक्रम तो
तरि पाठवितां यातें गिरिशावरि खेद मन्मना गमतो.
कारण ज्या कार्यास्तव मी यातें प्रेरण्यास उद्युक्त,
तें कार्य करायाला कोणीही सुरगुरो! नसे शक्त.

**बृह०**—आपल्या अनुजपुत्रावर प्रीति असल्यामुळें आपण हें भाषण करीत आहां, हें **महेंद्रास** योग्यच आहे! परंतु, तो भगवान् पुरारातिं[1] शंकर दुरासद[4] हें तर खरेंच, तथापि याचा हा उत्साह पाहून कार्याची सिद्धि याच्या हातून निश्चित होणार असेंच मला वाटतें! याकरितां आपण स्वस्थ असावें!

**वसं०**—(पाहून गडबडीनें) महाराज! हें पहा! **देवेंद्राचीं** नेत्रें स्वभावतःच न मिटणारीं असूनही त्यांतील तारका उच्च स्थिरावल्या आहेत, व अशा सहस्र नेत्रांनींच आपलें पानच करीत आहे जणों अशा रीतीनें हा आपणाकडे पहात आहे!

**मन्म०**—(त्वरेनें जवळ जाऊन बृहस्पति व महेंद्र यांस प्रणाम करितो. वसंतकही त्याचप्रमाणें करितो.)

**दोघे**—(स्नेहयुक्त मानानें) तुम्हां उभयतांचा विजय असो!

**मन्म०**—(महेंद्रानें दाखविलेल्या आसनावर बसून बृहस्पतीप्रत) भगवन्! ज्या वीरश्रेष्ठांच्या भूलीलेचे स्वर्ग, मृत्यु आणि पाताळ हे तिन्ही लोक किंकर झाले आहेत, ज्यांनीं उन्मत्त झालेल्या **जंभ, नमुचि, विरोचन, पुलोम, बळ, वृत्र,** इत्यादि शत्रुगणांस आपल्या प्रचंडपराक्रमी[1] अशा तेजोरूप अग्नींत शलभाप्रमाणें दग्ध करून टाकिलें आहे, असे आमचे **कुलिशायुध**[2] तात महापराक्रमी असूनही, त्यांच्या कोटिशः सेवकांच्या मालिकेंत अगदीं शेवटली कोटि पावलेल्या या दासाचें किंनिमित्त स्मरण करण्यांत आलें बरें?

**बृह०**—(संतोष पावून) वाहवा! वाहवा! कुमारा! आपल्या ज्येष्ठ ताताच्या समोर तूं इतक्या अतिशय विनयानें बोलत आहेस हें योग्यच आहे, परंतु तुला एक सांगतों.

श्लोक.

याचें गृहस्थपण शोभविण्या जयंतें[3]
आणी शची[4] क्षेम तसाचिहि वैजयंत[6];

---

१. पितर आणि ऋषि २. पाताळांत. ३. पुरांचा म्ह पुरनामक दैत्यांचा अराति (शत्रु). ४. पराभव करण्यास कठिण.

१. प्रचंड आहे पराक्रम ज्याचा असा (अग्नि). २. इंद्र कुलिश म्हणजे वज्र तेंच ज्याचें आयुध. ३. इंद्राचा पुत्र. ४. इद्राणी. ५. समर्थ. ६. इंद्राचें घर.

त्रैलोक्यराज्यविभवा परि याचियाही
रक्षावया तुजविणें क्षम अन्य नाहीं.

आणखी पहा.

श्लोक.

ज्याठायीं चक्र चाले नचि; पितृपतिचा दंडही व्यर्थ होई;
दंभोळीचा वृषाच्या सकल विफलतेलागुनी दंभ जाई;
पाशाचा पाशिच्याही अनुभव न जयीं; कार्य दुःसाध्य ऐसें
पाहूनी आत्मचित्तीं सुरपतिहि न का खिन्न होऊन बैसे?

परंतु, पहा, तूंच

आर्या.

सोडूनि एक दोनचि कुसुममय शरां, असाध्यही कर्म
साधूनि, शत्रुगर्वा खंडुनि देशील वासवा शर्म.

**मन्म०**–(लाजल्यासारखें करून ह्मणतो.) प्रभु जे आहेत ते आपल्या सेवकांस मोठेपणा देण्यास समर्थच आहेत, परंतु

श्लोक.

योग्यत्वें समें आपुल्याशिं असती त्यांपाशिं जें राहिलें
द्याया गौरव, सेवकांसि अपुल्या तें कर्म आज्ञापिलें;
होईना जरि सेवकांकडुनियां तें कर्म सिद्धार्थसें,
तें लज्जाकर, सर्वनिंद्यहि तरी होणार नाहीं कसें ?

**महेंद्र**–वत्सा! हें सकल लोकांचें कल्याण करणारें कार्य दुसऱ्या कोणाच्याही हातून साध्य होण्यासारखें नाहीं. एवढ्याकरितां सांप्रत तुजवरील सर्व प्रेम एकीकडे टेवून तुझीच या कामीं मी योजना करीत आहें.

**मन्म०**–(नम्रतेनें) हे तात ! स्वामींचा अधिकारच असा आहे कीं त्यांनीं आपल्या सेवकांस वाटेल ती आज्ञा करावी. यासाठीं

श्लोक.

सोडूनी आत्मबाणांप्रति आजि कवण्या दृप्त शत्रूसि मारूं
कोण्यावा तापसाच्या विषयतरूतीं आजि चित्तीं प्रचारूं
कीटापासूनि पद्मोद्भव विधिवरिही सर्व माझे शरव्यें.
आज्ञा व्हावी. त्वरेनें भवदुदित करूं कोणतें कार्य भव्य ?

**महेंद्र**–वत्सा ! शंकर आणि पार्वती यांस जें अपत्य उत्पन्न होईल, त्याच्या हातून शूरपद्मादिक सकल देवशत्रूंचा नाश होणार ह्मणून मी ऐकितों, यासाठीं ज्या ह्मणून उपायानें तीं सर्व जगाचीं मातापितरें एकमेकांचा क्षणभरही वियोग सहन न होई अशा रीतीनें परस्परसंयुक्त होतील तो उपाय कर !

**मन्म०**–हे तात ! वृक्षलता ती काय, आणि मधुमक्षिका ती काय, परंतु त्या उभयतांचा ही संयोग घडून आणविणारा मी आपला सेवक आहें, त्या मजपुढें हें कार्य ह्मणजे कांहींच नाहीं ! कारण, स्त्रीपुरुष एकदा दोघें एक ठिकाणीं आलीं कीं त्यांची गांठ पडलीच ह्मणून समजावी !

**महेंद्र**–वत्सा ! तुझा प्रभावच तसा आहे यांत संशय नाहीं. तथापि त्या भगवान् निटिलेक्षणाचें तेज दुःसह आहे यास्तव आपला सावधगिरीनें अस ह्मणजे झालें.

**मन्म०**–जशी तातांची आज्ञा !

**बृह०**–हे कुमारा ! तुझ्या विजयप्रस्थानास हें धनुर्लग्न फार उत्तम आहे.

**मन्म०**–(उल्हासानें) भगवन् ! हा मी तयारच आहें ! (असें बोलून उठतो.)

**महेंद्र**–(आपल्या अंगावरील दिव्य भूषणें व वस्त्रें उतरून तीं त्यास मोठ्या सन्मानपूर्वक देऊन)

आर्या.

जाई, सुरकार्यातें साधीं, पंथा तुला शिवद होवो,
तुज गेल्यावर तेथें मंगल तीं सर्वमंगळा देवो.

---

१. यमाचा. २. वज्राचा. ३. इंद्राच्या ४. वरुणाच्या. ५. इंद्रास. ६. आनंद. ७. दर्पयुक्त. गर्व पावलेल्या. ८. स्त्रिया इत्यादिकांच्या उपभोगाविषयीं मनाचें चंचळपणा. ९. चालवूं, शिरवूं, उत्पन्न करूं ?

१. कमळापासून उत्पन्न झालेला (ब्रह्मदेव) २. बाणाचे विषय. ३. तुह्मीं सांगितलेलें. ४. शंकर आणि पार्वती. ५. निटिल ह्मा. कपाळ, त्या ठिकाणीं ईक्षण ह्मा. नेत्र असणारा असा शंकर. ६ पार्वतीचें नांव.

**मन्म०**–( प्रणाम करून वसंतासहवर्तमान निघून जातो. )

**महें०**–भगवन् ! असल्या कामावर मी वत्साची योजना केली खरी, परंतु माझा अनुज **उपेंद्र** प्रस्तुत येथें नाहीं, आणि त्याला हा वृत्तांत अगोदर कळविलाही नाहीं, आतां त्याला उत्तर तरी काय बरें द्यावें ?

**बृह०**–हे **महेंद्रा** ! हें कार्य सर्व त्रिभुवनांचेंही कल्याण करणारें आहे, यास्तव तें भगवान् **उपेंद्रा**लाही प्रियच आहे! आणि राजांचा धर्म ह्मटला ह्मणजे असाच कीं त्यांनीं ममता ही टाकिलीच पाहिजे !

आर्या.

भृत्य असो,सचिव असो, भ्राता कीं भ्रातृपुत्र,निजतनय;
जो योग्य जया कार्या, त्या तेथें योजिणेंचि होय नय.

( इतक्यांत पडद्यापलीकडे मोठा कलकलाट होतो. )

**बृह०**–( ऐकून ) देवेंद्रा ! तूर्य[1], काहली[2], शंख, दुंदुभि यांच्या नादांशीं मिश्र झालेला हा कलकलाट ऐकूं येत आहे, यावरून कुमाराची सेना विजयप्रयाण करण्यास सिद्ध झाली असें मला वाटतें.

**महें०**–कोण आहेरे तिकडे?

**दौवारिक**[3]–( प्रवेश करून ) महाराज ! हा मी आहें !

**महें०**–अरे! जासूद आणि हेर यांना माझी आज्ञा कळीव कीं, वत्स **मन्मथ** निघाला ह्मणजे घटकेघटकेला त्याच्याकडची बातमी घेऊन येत जा.

**दौवा०**–आज्ञा. ( असें ह्मणून जातो, आणि एका मुहूर्तानंतर दोघा जासुदांसहित परत येऊन ) महाराज ! कुमारामागोमाग जे बातमी आणणारे लोक पाठविले होते, त्यांतून हे दोघेजण आले आहेत. ( जासूद वंदन करितात. )

**महें०**–**दौवारिका**! जा तूं आपलें काम कर जा! ( दौवारिक जातो. )

**वाच०**–( जासुदांस )कुमाराच्या प्रस्थानाचा वृत्तांत जसा पाहिला तसा बोला पाहूं !

१ **जासू०**–( हात जोडून ) महाराजांचें अवधान असावें. महाराज ! आपली आज्ञा घेऊन कुमाराची स्वारी जी बाहेर पडली, ती पुनरपि घरीं देखील न जातां, किंवा आपल्या मागोमाग येणाऱ्या सैन्याची वाट देखील न पहातां, एकदम आपल्या कीरा[1]सनावर बसून नगराबाहेरच पडली. त्या वेळीं मंत्री **वसंत** यानें दृष्टीनें खूण केल्याबरोबर वेत्रपाणि[2] जिकडे तिकडे धावत जाऊन त्यांनीं सैन्यांतील लोकांस चला चला ह्मणून घाई केल्यामुळें अंगांत कवच चढविलें आहे नाहीं असेंच सर्व सैन्य त्या ठिकाणीं प्राप्त झालें. त्यावेळीं,

श्लोक.

मदामोदीं[3] ज्यांच्या अति भुलुनि, सर्वांहि करिती
द्विरेफांचे[4] संघ[5] भ्रमण दिशि, ऐसे गजपति;
जयांची वायूच्याहुनि सुचपला धावनकृति[6],
तुरंगांच्या ऐशा अमितहि तशा सुंदर तति[7];
शतांगां[8] उंचुंगां[9] वरि करुनि आरोहण, अहा !
करांमाजी खड्गा चमकविति ऐसे भट महा;
अशांच्या योगानें सकल धरणी, सर्वहि दिशा,
तशी ही द्यौ[10] सारी, मिळुनि दिसल्या छन्न[11]चि अशा.

**महेंद्र**–जेवढे ह्मणून मोठे मोठे राजे आहेत, त्या सर्वांनाही हें साधारणच आहे, यासाठीं तें असूं दे. परंतु वत्सा **मन्मथास** जो जयप्राप्ति

१ सनया. २. मंगलवाद्यविशेष. ३. द्वारपाल.

१. कीर ह्मणजे राघू. हेंच मदनाचें वाहन. २. छडीदार, भालदार. ३. हत्तींच्या गंडस्थळांतील दानोदकाचा वास. ४ भ्रमराचे. ५. समुदाय. ६. धावन ह्म. धांवणें. ७. समुदाय. ८. रथ. ९. उंच. १०. स्वर्ग लोक. ११. आच्छादित.

व्हावयाची तिचें मूलहेतुभूत जें सर्वांपुढें जाणारें सैन्य, त्याची तयारी कशी आहे ती सांग पाहूं !

२ जा०–ऐकावें, महाराज !

श्लोक.

मलयपवन आधीं लागला वाहण्याला;
विधुहि मधुऋतूच्या यामिनीचा उदेला;
शुक, पिक, अलि, बर्हीं, हंस, देवांगनाही,
सरमसचि निघाली एकदा संहती ही.

महेंद्र–भगवन् ! यानें बरोबर ताडलें !

बृह०–बावांनो ! यांचेंच विस्तारेंकरून वर्णन करा पाहूं !

१ जा०–आज्ञा.

श्लोक.

आलिंगी नवमालिका; श्रमजलालागीं युव्यांच्या हरी;
भृंगीतें शिकवी कला अविकला संगीतकाची बरी;
चौलीमस्तकिंचा प्रमुग्धबकुलस्रग्गंध अंगीं जया;
श्रीखंडाचलवायु तो करि अधीं आरंभ वाहावया.

बृह०–कुमाराचा नासिरवीर तो हा.

महेंद्र–बरें, पुढें?

२ जा०–महाराज ! पुढं

श्लोक.

प्रासादीं सुखकर सौधमध्यि निद्रा
लावीती मनि गमण्या प्रसन्नचंद्रा;
वाहोनि सुखकर वायु, कामुकांतीं
औत्सुक्या उपजाविती वसंतराती.

१ जा०–महाराज !

श्लोक.

यत्पीयूषास पीती सकल सुर, तसा वाढवी सागरातें,
जोमानीकामिनींच्याआणिकुमुदिनिंच्या लोपवी मानतें,
नाशी जो ध्वांत मंत्रेंकरुनिजणु, नभःपल्वलींचा मराळ,
दे नेत्रानंद लोकां, द्विजपति उगवे पौर्णिमेचा विशाळ.

बृह०–हा वसंताचा जिवलग मित्र होय.

महेंद्र–बरें, मग पुढें ?

२ जा०–निवेदन करितों महाराज !

आर्या.

पक्ष हरितवर्ण, तशी प्रवालनिभ चंचु, मंजुला वाणी
प्रमदांपरि, यांयोगें कीरतती प्रमद जनमनीं आणी.

१ जा०–तसेंच, महाराज !

साक्या.

कुरुविंदांच्या परी जयांची पाटलवर्णा दृष्टि,
प्रफुल्लनीलोत्पलश्यामला यत्तनु करि जनतुष्टि,
सहकाराचे कोमल पल्लव भक्षण करुनि जयांचें
चित्त होउनी प्रफुल्ल झालें उत्कंठितही साचें,
अशा कोकिला श्रवणमनोहर मोठ्या पंचम तानें
लागति सर्वत्र कुहूंकुहुरवा काढूं स्वच्छंदानें.

बृह०–हा कुहूकुहू शब्द ह्मटला ह्मणजे कामुकजनचित्तरूप हरिणास ओढून घेणारें किरातांचें गायनच आहे यांत संशय नाहीं !

महेंद्र–बरें, तदनंतर काय झालें ?

२ जा०–तदनंतर महाराज !

आर्या.

मधुरसपानें मत्ता, गुंजारव मधुर आणि मृदु करिती;
वाढवित्या मन्मथबलसामग्री भ्रमरि चहुंकडे फिरती.

१ जा०–तसेंच,

श्लोक.

कांतीनें जिततात केरळवधूकेशांचिया कांतिला
ऐसे जे निजबर्ह ते उभवुनी त्यांहींच जाणो बेला,
वारायास्तव आतपास रविच्या, देताति छत्राप्रती,
मोरांच्या भ्रमुं लागल्या चहुंकडे पंक्ती, न त्यांतें मिती.

१ वसंत ऋतूच्या. २. मोर. ३. समुदाय. ४. तरुणजनांच्या. ५. चौली ह्म. चोल देशांतील स्त्रिया. ६. सुंदर बकुलाच्या माळेचा (गजऱ्याचा) गंध. ७. श्रीखंड ह्म. चंदन त्याचा पर्वत ह्म. मलयाचल. ८. नासीर ह्म. नासिकास्थानभूत. अर्थात् सर्वांच्या पुढचा, प्रमुख. ९. कामुकजनांच्या अंतःकरणांत. १० ज्याच्या अमृतास. ११. अभिमानास.

१. अंधकार २. आकाश हेंच कोणी सरोवर. ३. राजहंस. ४. चंद्र. ५. राघूंचा समुदाय. ६. आनंद. ७. नागरमोथा (मुस्ता). ८. श्वेतताम्रवर्ण. ९. कुहुकुहु असा शब्द. १०. भिल्लाचे. ११. केरळ देशांतील स्त्रिया. १२. आपले पिसारे. १३. सैन्यास.

माना उंच करूनि मोर मग ज्या केकारवा काढिती
ते जैसे जयकाहलीरव[१] तसे ऐकोनियां भासती.
त्या नादेंकरुनी निरोधुनि तदा आशांचिया[२] मंडळा
मोरांचा अतिमुग्ध चाल धरुनी संघात[३] संचारला.

**बृह०**—ब्रह्मदेवाच्या सृष्टीपैकीं मयूर हे सर्व वैचित्र्याची समष्टिच[४] होत यांत संशय नाहीं!

**महें०**—बरें मग?

**२ जा०**—महाराज!

श्लोक.

पक्षांहीं प्रकटीति चारुचामरांची
शोभा जे; पद आणि चंचु लाल ज्यांची;
जे देष्टे[५] गतिविषयीं युवस्त्रियांचे,
ते झाले मग पुढतीहि हंस साचे.

**१ जा०**—

श्लोक.

जी मोडी कुशिकात्मजव्रत[६] तसें तें तीक्ष्ण ती मेनका,
केलें दास पुरूरव्याप्रति जिनें ते उर्वशी आणिका,
लंकेशाप्रति शापदान घडण्या जी हेतु रंभा अशी,
मोडीती उपसुंदसुंदमनिंच्या स्थैर्या दुजी[७] ते तशी.

या व तशा आणखीही इतर अप्सरा यांनीं नृत्य करण्यास आरंभ केला, त्या वेळीं,

साक्या.

लटलट हालति कर्णकुंडलें; आकुल हार मण्यांचे;
लागति झणझण् वाजुं कंकणें, छुमछुम् नूपुर साचे;
कटीभोंवतीं तशिच मेखला खालीं वरती नाचे;
नितंब लुडलुड् हलति; चालले हलणें तेंहि कुचाचें;
परस्परांचे मणियुत बाहू एकामेकांवरती
अपटति; नयनें आणिक वसनें गरगर भंवती फिरती;
ऐशा परिचें नृत्य तयां सुरकांतांहीं मांडियलें,
तेणें संयमशीलहि मुनिचें हृदय सर्वथा हरिलें.

**बृह०**—कुमाराचीं हीं अस्त्रें कधीं वाया जाणारीं नव्हेत!

१. जयवाद्यांचे शब्द. २. दिशांच्या. ३. समुदाय. ४. एकीकरण. ५. उपदेश करणारे. ६. विश्वामित्र. ७. दुसरी (तिलोत्तमा.)

**महें०**—(आनंदानें) बरें, यावेळीं कुमार कोणच्या ठिकाणीं आहे?

**२ जा०**—महाराज! भगवान् शंकराचा आश्रम दोन कोशांवर राहिला असतांच कुमारानें आज्ञा केल्यावरून आम्हीं दोघे परत आलों.

**बृह०**—(उभयतांस विडे देववून) अरे! जा तुम्हीं आतां विश्रांति घ्या! (जासूद प्रणाम करून निघून जातात.)

**महें०**—भगवन्! शंकराच्या आश्रमाजवळ वत्स गेला हें ऐकून, काय कारण असेल तें असो, माझ्या जिवास स्वस्थ वाटत नाहीं!

**बृह०**—देवेंद्रा! जेथें ममता आहे तेथें असा प्रकार असावयाचाच. असें आहे तथापि भगवान् भूतपतीचा आश्रम भय वाटण्याचें कारण आहे यांत संशय नाहीं.

(इतक्यात पडदा एकीकडे करून प्रतीहार येतो.)

**प्रती०**—महाराज! इकडे पहावा काय चमत्कार झाला आहे तो!

श्लोक.

सिंधूचें शोषितोजो उदक;गिरिशिला पार फोडूनि टाकी;
जाळी वृक्षां समस्तां क्षितिवरि;नभहें सर्वही फाडितो कीं;
चंड ज्वाला जयाच्या जळुनि चटचटां रोधितातीं त्वरेनें
ब्रह्मांडा; अग्नि ऐसा दिसत पसरला द्रव्यदाच्या[२] दिशेनें.

**महें०**—(शंकायुक्त होऊन) भगवन्! या अग्नीच्या या अतिशय धगीवरून हा शंकराच्या[१] नेत्रांतून निघालेलाच अग्नि असावा असें वाटतें. तर आतां यापुढें माझ्या वत्साची काय अवस्था होईल बरं? (कष्टी होतो.)

**बृह०**—देवेंद्रा! अरे, आपल्याच मनांत भलते भलते वितर्क आणून असा वेड्यासारिखा काय होतोस? या दीर्घायू वत्साचीं सामुद्रिक लक्षणें मीं स्वतः पाहिलीं आहेत, असें

१. शंकर. २. कुबेराची दिशा (ईशान्य.)

असून त्याचें कांहीं वाईट होईल ही शंका तरी कोठून यावी ?

( पडद्यांत आकाशमार्गानें संचार करणाऱ्या सिद्धाचा शब्द ऐकूं येतो. )

अहो ! भगवती **सर्वार्थसाधिकेची मन्मथाचें** चोंहीकडून कल्याण करण्याविषयीं तर शिकस्तच झाली ! कारण,

श्लोक.

पाहोनी आत्तचापा[1] धृतशर मदना शंकर क्रुद्ध झाला,
वेगें बाहेरि तेव्हां हुतवह नयनांतूनि त्याच्या निघाला.

( इतकें अर्धें बोलणें ऐकूनच. )

**महें०**—( उद्वेगानें ) भगवन् ! आतां याच्यापुढें आणखी हा काय बोलेल कोण जाणें ! मी तर त्याचें इतकेंच भाषण ऐकून वेड्यासारखा झालों आहें !

**बृह०—महेंद्रा !** आपलें ज्याचे ठायीं प्रेम असतें त्याच्या विषयीं मनांत नेहमीं अनिष्टाची शंका येते, यासाठीं ही शंका तूं सोडून दे. कल्याणसाधनाची वेळ आली म्हणजे ती नुसत्या एक दोन वाक्यांवरूनही शुभ सुचविते.

( पुनः पडद्यांत शब्द ऐकूं येतो. )

पीयूषेशों तदा ती अवचित उभके; शांत लीलेंकरून
त्या अग्नीतें करी;तें परतुनि नयनामाजि तो होय लीन!

**बृह०—महेंद्रा !** बाबा, आतां तरी तुझ्या मनाला विश्वास येऊं दे !

**महें०**—( अतिशय हर्ष पावून ) भगवन् ! हें सिद्धाचें वचन आहे, तें कदापि अन्यथा होणार नाहीं. परंतु इतका वेळ मध्यें गेला असूनही अद्यापि कुमाराकडून चेर[3] कां बरें आले नाहींत ?

**बृह०**—( प्रश्नाचीं अक्षरें मोजून ) **महेंद्रा !** चर अगदीं संनिधच आले समज.

( तदनंतर दोन चर येतात. )

**१ चर**—कुमार **मन्मथाच्या** विजयें करून,

**२ चर**—**देवेंद्राची** वृद्धि असो !

**१ चर**—महाराज ! **वसंत** प्रधानजींनीं भगवान् **बृहस्पति** गुरूंस देण्याकरितां हें पत्र लिहून दिलें आहे. ( असें ह्मणून लखोटा पुढें ठेवून एका अंगास जाऊन उभा रहातो. )

**महें०**—( बृहस्पतीकडे पहातो. )

**बृह०**—( लखोटा घेऊन तो उघडून पत्र वाचितो. )

"स्वस्ति, सकल देवांच्या मस्तकांवरील
"रत्नसमूहांच्या किरणजालानें सुशोभित-
"चरण झालेल्या गुरुचरणांस शिष्य वसं-
"ताचे भूमीपर्यंत भाळ लववून नमस्कार
"विज्ञापना विशेष. इकडील सर्व कुशल
"असे. आपलेकडील वृत्तांत आह्मांकडे
"निरोपानें कळविण्यांत यावा. लिहावयास
"कारण कीं, आमचे सैन्याचा तळ **हिमा-**
"**लयपर्वताच्या** पायथ्याशीं पडला येथवर
"वृत्तांत गुरुचरणांस दोघां जासुदांकडून
"कळला असेलच. आतां पुढील वृत्तांत ये-
"णंप्रमाणें:—तदनंतर सायंकाळ झाल्यावर
"चकोरदंपत्यास यथेच्छ अलंकारदानेंक-
"रून संतुष्ट करण्याविषयीं स्वर्णकारच अ-
"शा आपल्या चंद्रिकापूराच्या[1] योगानें दि-
"गंतरांस भरून टाकणारा, व आपल्या
"मित्राचें साह्याय्य करण्याविषयीं निरलस
"असा चंद्र उदित झाला. सदा सर्वकाळ
"प्रफुल्ल रहाणारे जे संतानक, हरिचंदन,
"मंदारक, इत्यादिक वृंदारकवृक्षवृंद[2] त्यांच्या
"सुगंधाच्या उत्कृष्ट साराचें चौर्य करण्यावि-
"षयीं कुशल, असा **मलयाचलावरील** वा-

१. धनुष्य घेतलेला. २. अमृताची स्वामिणी सर्वार्थसाधिकादेवी. ३. जासूद.

१. चांदण्याचा झोंत. २. देवांच्या वृक्षांचा ( कल्पवृक्षांचा ) समुदाय.

॥ श्री ॥

नाट्यकथार्णव मासिक पुस्तकांत छापत असलेलें

# दौलतराव नाटक.

हें पुस्तक


## शंकर मोरो रानडे बी. ए.


ह्यांनीं मूळ इंग्लिश ग्रंथाधारें केलें,

तें


मुंबईंत

"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापिलें.



(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.)



शके १८०१.

सन १८७९ इ०.

वाचूं लागतो.) "आपले बाबा"—हं—हं—(पुटपुटत वाचतो.)—"त्यांच्या जमिनी"—हं—हं—(पुनरपि पुटपुटतो.) "हे आशीर्वाद." (हर्षानें) वाहवा! ठीक आहे! शेण भुईवर पडलें असतां तें माती घेऊनच निघतें, त्याप्रमाणें हें पत्र माझ्या बापाच्या हातीं पडलें असतां खचित आपला गुण करील! अंः—अंः—(मिशास पीळ भरीत) आणि त्यानें कां बरें गुण न करावा? तें लिहिणारा मी—त्या माझ्या गुणांकडे दुर्लक्ष करून लोक मला लेंकवळाच ह्मणतात व मला ह्या मधुकररावापेक्षां हलका समजतात, त्यामुळें मला जर राग येतो, आणि मी आपल्या गुणांचे प्रताप बाहेर गाजविण्याचा यत्न करितों, तर ह्या पत्रांनंही आपला गुणप्रताप बाहेर गाजविण्यास मागें पुढें काय ह्मणून पहावें? मी लेंकवळा ह्मणून माझ्या बापाच्या संपत्तीपैकीं माझ्या वाटणीला हिस्सा कमी, आणि हे आमचे मधुकरराव—हे कोण ह्मणे आपल्या आईचे आणि बापाचे औरस—हे मात्र माझ्यापेक्षां अधिक हिस्सा उपटणार अं!—यंवरे न्याय आणि यंवरे वाटणी! माझ्या आईचा माझ्या बापाशीं विवाहसंबंध झाला नाहीं ह्मणून त्याबद्दल प्रायश्चित्त कोणीं मीं भोगावें अं! तें कां—कां वरें? मधुकररावाच्या आईनें माझ्या आईपेक्षां आपल्या नवऱ्याला दोन अमृताचे घोट जास्ती पाजिले आहेत असें कांहीं झालें आहे काय? जर नाहीं तर त्याबद्दल कमीपणा माझ्याकडे काय ह्मणून? अंः—अंः—काय ह्मणून? मी लेंकवळा ह्मणून मला पुरुषत्व नाहीं, किंवा मी कुरूप आहें, किंवा माझ्या अंगीं कांहींच गुण नाहींत, असा प्रकार आहे काय? बरें नाहीं तर—तर मग—हा—हा भेद काय ह्मणून? मला कमी आणि या मधुकराला जास्ती असा प्रकार कां? कशाकरितां? छेः—हें आपल्याला कधीं नाहीं पसंत होणार! मधुकरा! तूं माझा वडील भाऊ, आणि तशांतून काय ह्मणे औरस ह्मणून जास्ती वाटणी उपटूं पहाणार, पण मी ती तुला थोडकीच पचूं देणार आहें! तूं मधुकर तेव्हां तुझ्या कपाळीं ब्रह्मदेवानें मधुकरीच लिहिली आहे, आणि त्यानें नसेल लिहिली तर त्याचें लिहिणें खोडून मीच त्या ठिकाणीं मधुकरी लिहिणार! खूप समजून अस! हा—हा—हा! (खदखद हंसत मिशास पीळ भरितो व इकडे तिकडे फिरून पुढें पाहून) हां—हें आमचें थेरडें कुतरें आलें, याच्यापुढें आपल्या कामासाठीं आतां हें असें नव्हे असें वागलें पाहिजे! (उदासीन मुद्रेनें पत्र वाचीत आहेसें दाखवितो.)

(इतक्यांत चंडवर्मा येतो.)

**चंड०**—हा काय अनर्थ होणार आहे कांहीं कळत नाहीं! कांतिवर्म्यास हद्दपार केलें! सौराष्ट्रदेशचा राजा निघून जाऊं लागला त्याचा इतका काडीभर देखील मानमरातब राखला नाहीं! लग्नाचे सोहाळे कसे बसे तरी आटोपून घेऊन वऱ्हाडाची एकदोन दिवसांतच जिकडची तिकडे व्यवस्था आटोपून घेऊन खलदर्शन व शशिकला आपल्या राज्यांत निघून गेलीं, त्यांचे मागोमाग आमचे महाराजही निघून गेले! त्यांनीं आपली राजसत्ता एकीकडे टाकून देऊन राजाचें नांव मात्र शिलक ठेविलें आहे! आणि सर्व गोष्टी करण्यापूर्वीं तिळमात्रही विचार केल्याशिवायच त्या एकदम त्यांनीं

करूनही सोडल्या !–असो–हा कोण मरुत्सेन ! कायरे मरुत्सेना ! तें पत्र कस वाचतोस ? त्यांत कांहीं कमजास्ती मजकू आहे वाटतें ?

मरु०–आं–मला हाक कोणीं मारिली (घाई घाईनें पत्र खिशांत घालितो.) कोण बाबा? बाबा ! मी आपल्या सेवेंत हज आहें ! आज्ञा व्हावी !

चंड०–आज्ञाबिज्ञा कांहीं नाहीं ! पण तूं का वाचीत होतास?

मरु०–कोण ? मी? बाबा ! मी कांहीं वाजवी नव्हतों !

चंड०–मीं वाजविण्याची नाहीं गोष्ट तु विचारिली ! तुझ्या हातांत तें पत्र कस होतें ?

मरु०–पत्र ? छे–तें–अं–तें कांहीं नाहीं. आ लें उगीच कांहीं तरी होतें !

चंड०–तर मग तें वाचीत असतां तूं उद मुद्रा काय ह्मणून केली होतीस ? आ मी तुला हाक मारल्याबरोबर घाई घा तें पत्र खिशांतसें घातलेंस ?

मरु०–छे बाबा ! तुह्मीं ह्मणतां तशांतलें कां नव्हतें ! त्यांत मजकूर बिचकूर कां नव्हता !

चंड०–तूं आज काय गोंधळांत पडला आहे कांहीं समजत नाहीं, किंवा आमच्या राज ची हकीकत तशी झाल्यापासून मीच धळांत पडलों आहे कीं काय याचा मल उमज पडत नाहीं !–पण आतां मला न सांग, जर त्या पत्रांत कांहीं मजकूर नव्ह ह्मणतोस, तर मग पत्र खिशांत घालण्या इतकी घाईशी केलीस ? आणखी दुसरें, त्य कांहीं मजकूर नाहीं तर त्यांत चोर ठेवण्यासारखें काय असणार ? चल–आण पाहूं तें पत्र इकडे ! त्यांत मजकूर नाहीं ह्मणतोस तर मला आरशीवांचूनही कागद पहातां येईल !

मरु०–बाबा ! माफ करा ! हें पत्र मधुकर-दादाकडून मजकडे आलें आहे, तें अजून मीं पुरतेंसें वाचलें नाहीं ! जेवढें वांचलें आहे तेवढ्यावरून तें कांहीं तुह्मीं वाचण्यासारखें नाहीं असें मला वाटतें !

चंड०–मरुत्सेना ! आज फार बडबडशी लागली आहेस ? चल आण तें पत्र हिकडे !

मरु०–बाबा ! मला दोहोंकडून पंचाईत झाली आहे ! पत्र द्यावें तरी पंचाईत, न द्यावें तरी पंचाईत ! बाबा ! तुह्मीं पत्र वाचण्याच्या भरीस पडूं नका !

चंड०–चल तोंड आटप ! आण तें पत्र ! मी वाचणारच !

मरु०–(पत्र देऊन) पण बाबा ! यांतला मजकूर खरा असेलसें मला वाटत नाहीं ! बहुशः त्यानें माझें मन पहाण्याकरितांच हें लिहिलें असावें वाटतें !

चंड०–समजलों !–(पत्र उघडून) अरे ! पण यावर ह्या कायरे मुंग्यांच्या रांगाच दिसताहेत! येथें आरशी लावण्याचीच पाळी आली! मरुत्सेना ! ही घे आरशी आणि जरा पूस पाहूं ! (मरुत्सेनानें आरशी पुसल्यावर ती लावून पत्र वाचतो) "चिरंजीव राजश्री मरु-
"त्सेनराव याशि प्रति मधुकरराव उदास-
"दुर्गकर अनेक आशीर्वाद उपरि आज
"तागाईत सर्व क्षेम असों विशेष. आपले बाबा
"आतां ह्मातारे झाले आहेत, तथापि घर-
"दार, सर्व संपत्ति व सर्व इतमाम यांचा तेच
"उपभोग घेतात. तुह्मीं आणि मी आतां

"मोठे झालों आह्मीं तथापि आपणास
"त्यांचा व्हावा तसा उपभोग घडत नाहीं.
"बावा ह्मातारे होऊन आज खपतील उद्यां
"खपतील अशावर मी आजपर्यंत उगाच
"राहिलों, पण ते लौकर खपण्याचें दिसत
"नाहीं व त्यांच्या जमिनी ते मेल्याशिवाय
"आपल्या हातीं लागणेचें धोरण मजला वाटत
"नाहीं. बावा ह्मातारे ह्मणून त्यांचे सांग-
"णेंप्रमाणें चालणेचें मजला कठिण पडतें,
"व असे स्थितींत राहणेंपेक्षां मरणेंही बरें.
"पण मरून जाऊन संपत्तीचा उपभोग होणें
"नाहीं. ऐशीयास माझे मनांतून तुह्मांशीं
"बहुत बोलावयाचें आहे. बाबांनीं ह्माता-
"रपणीं आपलें सर्व आहे नाहीं तें आमचे
"स्वाधीन करून आह्मीं ठेवूं तसें रहावें,
"किंवा पाहिजे तर मरून जावें हें मजला
"बरें वाटतें. करितां तुह्मीं मजला बागांत
"जरूर भेटणेचें करणें. बावा निजलेले
"राहून मीच त्यांना जागे करीं तोंवर ते
"तसेच गाफीलपणें निजतील तर त्यांत
"तुमचें आणि माझें दोघांचेंही कार्य होईल.
"पत्र फार जपून वाचणें. सुज्ञास विशेष
"लिहिणें नको. भेटी अंतीं अधिक सांग-
"णेंचें तें सांगेन. कळावें. हे आशीर्वाद."—
(दांत ओंठ खात रागानें) आः दुष्टा! हराम-
खोरा! माझे प्राण घेण्याची मसलत चा-
विली आहेस नाहीं? दुष्टा! अधमा! तूं
जागा करीपर्यंत मी गाफीलपणें निजलों
पाहिजे, नाहीं?—आः—अर्—र्—र्—आः—
कृतघ्ना! तूं माझाच कारटा **मधुकऱ्या** काय?
नीचा! मज ह्मातार्‍याचा जीव घ्यावा ही
गोष्ट तुझ्या मनांत आली तरी कशी, आणि
तुझ्या हातून हें घातकी पत्र लिहवलें तरी
कसें?—आः—**मरुत्सेना**! बोल, हें पत्र तुजकडे
केव्हां आलें? तें आणून दिलें कोणीं?

**मरु०**—(नम्रतेनें) मला देखील तेंच गूढ पडलें आहे. तें पत्र मला आणून दिलें नाहीं कोणीं, परंतु माझ्या निजायच्या खोलीच्या बारींत तें मला सांपडलें!

**चंड०**—असें काय? बरें, हें तुझ्या भावाचेंच अक्षर तूं ओळखतोस?

**मरु०**—बाबा! पत्रांत चांगला मजकूर असता, तर मीं हें अक्षर त्याचेंच ह्मणून एकदम सांगितलें असतें; पण हा प्रकार भलताच पडला त्यामुळें हें त्याचें नसलें ह्मणजे मला पुरे आहे!

**चंड०**—हें अक्षर मी—मी पक्कें ओळखतों! हें त्या चांडाळाचेंच अक्षर आहे! आः—

**मरु०**—बाबा! हें अक्षर दादाच्या हातचें ही गोष्ट खरी, परंतु ह्यांतील मजकुराप्रमाणेंच त्याचें मन असेल असें मला वाटत नाहीं!

**चंड०**—वास्तविक ह्मणशील तर असें मलाही वाटत नाहीं, पण काय असेल तें असो.— आः दुष्टा!—बरें तर, या कामीं बोलतां बोलतां त्यानें तुझा अंत पाहिला होता असें कधीं घडलें होतें?

**मरु०**—छे, तसें कधीं घडलें नाहीं; परंतु तो एवढें मात्र मजशीं पुष्कळ वेळ प्रतिपादन करीत असे कीं, बाप ह्मातारा आणि मुलगे ज्वानींत आले ह्मणजे बापानें आपली सर्व मालमत्ता मुलांच्या स्वाधीन करावी आणि आपण ते ठेवतील तसें रहावें!

**चंड०**—आः—दुष्ट—दुष्ट—चांडाळ—आः—त्यानें पत्रांत देखील हाच मजकूर लिहिला आहे!— आः—चांडाळा! नीचा! अधमा! तूं शुद्ध नरपशु आहेस! पशूहूनही तूं अधिक पशु

आहेस ! आः—मरुत्सेना ! जा—अगोदर जा—आणि त्या चांडाळाला आतांच्या आता पकडून कैद करून आण ! बोल, तो दुष्ट यावेळीं कोठेंसा आहे ?—

**मरु०**—तें मला बरोबर माहित नाहीं. पण मला वाटतें आपण रागाऊन अशी उगीच घाई करूं नये ! दादा आतां दिसतो इतका खरोखरीच दुष्ट असेलसें मला तर वाटत नाहीं, मग खरं काय असेल तें असो ! पण मला वाटतें, तुह्मीं आतां असें करा, मी तुह्मांला सांगतों याप्रमाणें तुह्मीं वागा ! कदाचित् उगीच घाई केल्यानें एकादा भलताच प्रकार झाला तर त्यांत तुमच्या आणि त्याच्याही अब्रूची खराबी होणार आहे आणि तो प्रामाणिकपणानें वागत असतांही त्याचें उगीच मन दुखविलेंसें होणार आहे मला तर वाटतें कीं त्याचा हें लिहिण्यांत दुसरा कांहीं उद्देश नसून तो फक्त माझें आपणांविषयीं कसें काय मन आहे एवढेंच पहाणार आहे !

**चंड०**—एकून तुला असें वाटतें तर ?—

**मरु०**—होय. आणखी तुह्मांला नीट वाटेल तर मी तुह्मांला अशा ठिकाणीं नेऊन बसवीन कीं त्या ठिकाणाहून तुह्मांला त्याचें आणि आणि माझें दोघांचेंही ह्मणणें ऐकूं येईल तें एकदा तुह्मीं स्वतः ऐकिलें, ह्मणजे मग तुह्मांस काय करणें योग्य वाटेल तें करा ! हा योग तुमची इच्छा असेल तर आजच्या आज संध्याकाळापूर्वीच जमवून आणीन !

**चंड०**—खचित, तो इतका दुष्ट नसेल—

**मरु०**—नाहींच. त्याला जर कोणी दुष्ट ह्मणूं लागेल तर आपले कान [illegible] ऐकावयाचे नाहींत.

**चंड०**—मी तरी असेंच ह्मणतों. आणखी दुसरें—परमेश्वराचे घरीं न्याय तर आहे कीं नाहीं? मी त्याच्यावर इतकें जिवाअधिक प्रेम ठेवितों हें त्याला समजत नाहीं काय ? मग ?—असें होईल तरी कसें ?—पण—पण—आः—काय करूं?—मधुकरा !—मरुत्सेन ! जा—जा, तो कोठें असेल त्याला शोधून काढ आणि हरयुक्ति करून त्याच्या मनांतील भाव मला नीट त्वरित समजे अशी युक्ति कर! चल चल ! ही गोष्ट तूं पाहिजे तशी कर—पण करच ! या गोष्टीचा पक्का शोध लागलाच पाहिजे ! तट् कीं फट् असें व्हावयाचें झालें तरी त्याबद्दल मला आपलें मन दृढ केलें पाहिजे ! माझी खातरी ही झालीच पाहिजे, व ती होण्याकरितां मला मी सरदार असूनही चोरट्यासारखें लपून बसावयाचें पडलें तरी चिंता नाहीं !

**मरु०**—बाबा ! हा मी आतांच चाललों ! तो कोठें असेल त्याला शोधून काढून साधेल त्याप्रमाणें त्याच्या मनांत काय असेल तें काढून घेऊन मी तुह्मांला तावडतोब कळवीन.

**चंड०**—अरेरे ! हा काय भयंकर प्रसंग तरी ! काय तरी अनर्थ हे ! तरीच ! परवांच या राज्यांत शेंडे नक्षत्र दिसलें त्याचाच हा गुण ! त्याच्या योगानें अशा गोष्टी व्हावयाच्याच ! प्रेमबंधनें शिथिल होऊन तुटावयाचींच ! भावाभावांमध्यें व पितापुत्रांमध्यें वितुष्ट हें यावयाचेंच ! राज्यांत चोंहीकडे लढाया, बंडावे, मारामाऱ्या, हाणाहाणी या टळावयाच्या ह्मणून नाहींत ! हेंच पहाना ! मी आणि हा कारटा यांमध्यें वितुष्ट पडायचीच ही वेळ आली आहे कीं नाहीं !

आमच्या राजानें आपल्या कन्येचा त्याग केला, पुत्र पित्यावर उठला आहे या गोष्टी घडल्या आहेत कीं नाहींत? आणखी आतां मी तरी प्रत्यक्ष आपल्या पोटच्या पोरावर शस्त्र धरणार आहेच कीं नाहीं? अरेरे! या राज्यांत आजपर्यंत आमचे दिवस मोठ्या आनंदांत गेले, पण आतां सगळा मनुच बदलला! आतां मरेपर्यंत आमचें नशीब फुटकेंच रहाणार!-**मरुत्सेना**! हं-त्याचा नीट शोध कर! सावधगिरीनें वाग! त्यांत तुझें कल्याणच होईल! आः-हें शेंडे नक्षत्र-अरेरेरे! यानेंच **कांतिवर्म्याचा** कांहीं अपराध नसतां त्याची अशी स्थिति करून टाकिली! हें आश्चर्य नव्हे काय?-हं-मी आतां जातों. तेवढें तूं करच! (जातो.)

**मरु०**-(आपणाशीं) खुशाल जा, पाहिजे तर **यम**लोकासही जा मला चालेल! किती वेडेपणा हा! कांहीं एकादी गोष्ट आपल्या अजमासाबाहेर घडली कीं तीबद्दल अपराध त्या शेंडे नक्षत्राचा! वाः रे वाः! कः केन संबंधः!-आपलींच कर्में दुष्ट, त्यांशीं आणि सूर्य, चंद्र, शनि, राहु, केतु, यांच्याशीं काय संबंध? ते कोण आणि आपण कोण?-बरें असो. आहे तें ठीकच आहे! घटकाभर संबंध आहे असें झालें तरी त्यापासून माझें नुकसान थोडकेंच होणार आहे! हा माझा भाऊ **मधुकर**-(मधुकर येत आहे हें पाहून) अरे हा काय चमत्कार! याचें नांव मीं काढिल्याबरोबर हा आपला आलाच! ठीक आहे! आतां ही स्वारी आहेन् मी आहें! मी तर आपली मुद्रा खिन्न आणि उदास करून उभा रहातों, जसें काय कोणाला वाटेल या गृहस्थाचें सर्वस्व जाऊन हा सप्त जन्म हालच काढितो आहे! व याला वेडच लागलें आहे!-(त्याप्रमाणें उभा राहून मधुकरास ऐकूं येईल अशा रीतीनें) हरहर! हा शेंडे नक्षत्राचाच गुण खरा!

**मधु०**-अरे! हा कोण **मरुत्सेन**! भाऊ! अरे, तूं असा उदासवाणासा दिसतोस? तूं विचार कसला करतो आहेस?

**मरु०**-कोण, दादा?-दादा! मला कांहीं विचारिलेंस होय?

**मधु०**-होय! पण तूं विचार कसला करतो आहेस?

**मरु०**-विचार? तसें नव्हे-हें शेंडे नक्षत्र उगवलें आहे कीं नाहीं तें मोठ्या अनर्थाचें मूळ होणार ह्मणून मी जोशाच्या तोंडानें ऐकिलें आहे ह्मणून आपला सहज विचार करीत होतों.

**मधु०**-वाः रे भाऊ! सगळीं कामें टाकून तुला हा उद्योग कोणीं सांगितला?

**मरु०**-उद्योग? अशांतलीच कांहीं गोष्ट नाहीं, पण आतांशा जोशीबोवाच्या सांगण्याप्रमाणें अनर्थ मात्र होऊं लागले आहेत खरे! राजानें आपल्या कन्येचा त्याग केला, **कांतिवर्म्या**ला हद्दपार केलें, **राजवाहनराजा**चा द्वेष संपादिला, या सर्व गोष्टी झाल्याच कीं नाहींत? पिता आपल्याच अपत्याविषयीं मनांत द्वेषबुद्धि वागवूं लागला आहे कीं नाहीं? झालें तर-तेव्हां हा शेंडे नक्षत्राचाच गुण नको का ह्मणायला?

**मधु०**-(हंसून) वाः तूं तर प्रत्यक्ष जोशीबोवांचा गुरु बनलास!

**मरु०**-मला हें कांहीं समजत नाहीं! पण हीं

पित्याच्या आणि अपत्याच्या द्वेषाची गोष्ट माझ्या मनांत मघांपासून एकसारखी घोळते आहे!–बरें तें राहूं दे सगळें! तुझी आणि बाबांची गांठ केव्हांशी बरें पडली होती?

**मधु०**–कां बरें? रात्रीं निजायच्या अगोदर पडली होती.

**मरु०**–पण बाबांचें आणि तुझें कांहीं बोलणें चालणें झालें होतें?

**मधु०**–हातुत्याचे! काल तर अर्धा एक प्रहरभर मी त्यांच्याशींच बोलत बसलों होतों.

**मरु०**–असशील, पण ज्या वेळेस तुह्मीं आपआपल्या खोलींत निजावयास गेलां त्यावेळीं बाबांच्या मनांत तुझ्याविषयीं कांहीं वेडावाकडा प्रकार तर नव्हताना? किंवा त्यांच्या मुद्रेवरून किंवा कृतीवरून ते तुझ्यावर रागावले आहेत असा कांहीं प्रकार वाटला नाहींना?

**मधु०**–तूं ह्मणतोस तसा मुळींच कांहीं प्रकार झाला नाहीं!

**मरु०**–खरें, पण नीट आठवण कर, कदाचित् तुला विस्मृति पडली असेल तर नीट विचार करून पहा, कदाचित् कांहीं एकादा भलताच शब्द तुझ्या तोंडांतून निघून गेला असेल, किंवा बाबांना न आवडणारें असें कांहीं तुझ्या हातून आचरण झालें असेल! तें कांहीं असो, परंतु बाबांची वृत्ति तुझ्याविषयीं रागाची दिसते! यासाठीं मी सांगतों असें कर. कांहीं थोडा वेळपर्यंत तूं त्यांची गांठ न घेतां असाच इकडे तिकडे कोणीकडे तरी रहा, तोंपर्यंत बाबांचा रागही कमी होईल. तसें न करितां जर बाबांची गांठ घ्यायचें करशील तर कदाचित् तुझ्या प्राणांनाही दगा पोंचेल याचें मला मोठें भय वाटतें!

**मधु०**–अरे! हा काय प्रकार सांगतोस तूं? खचित कोणीं तरी दुष्टानें मधें बिब्बा घातला आहे!

**मरु०**–होय, मलाही पण असेंच वाटतें, पण कसेंही असलें तरी त्यांचा राग कमी होईपर्यंत तूं त्यांला भेटायचें करूं नयेस हें मला बरें वाटतें. तुझी मर्जी असेल तर तूं माझ्या खोलींत कांहीं वेळ लपून रहा. मी येथेंच उभा राहून बाबांचें बोलणें तुला ऐकूं येईल अशी कांहीं तरी युक्ति करितों. ही घे किल्ली. खोलींतून बाहेर बिलकुल पडूं नको, आणि तशांतून पडलासच तर हत्यारबंद मात्र अस!

**मधु०**–(आश्चर्यानें) हत्यारबंद! भाऊ! हें तूं काय ह्मणतो आहेस?

**मरु०**–दादा! मी तुझ्या बऱ्याचीच गोष्ट सांगतों आहें. यासाठीं तूं माझें मुकाट्यानें ऐकून त्याप्रमाणें वाग! मी तुला कांहीं खोटें सांगून फसवीत नाहीं. मीं जें प्रत्यक्ष पाहिलें, व या कानांनीं ऐकिलें तेंच तुला सांगतों आहे. परंतु हें बघ–तूं त्याबद्दल उगाच घाबरून आपल्या मनाला दुःख वाटून घेऊं नको. बरें चल चल जा आतां लपून रहा कसा.

**मधु०**–हा काय चमत्कार असेल तो असो. याचा मला कांहींच उमज पडत नाहीं. बरें हा चाललोंच. पण तूं मात्र बाबांच्या कडला मजकूर मला कळवावयास विसरूं नको हो.

**मरु०**–असें कोठें झालें आहे? बाबांच्या मनांतली गोष्ट खडान् खडा समजावून घेऊन

. ती तुला कळविल्याशिवाय कदापि रहाव-याचा नाहीं हें तूं पक्कें समजून रहा. (मधुकर निघून जातो.) वाहवा! जोडा तर खूपच जमला! बाबा तर बोलून चालून सांबाचेच अवतार, आणि आमचे दादा हे तर त्याच्या पुढचे दादाच! दोघेही खासे भोळे भावार्थी! (मोठ्यानें खूप हंसतो.) ठीक आहे! आतां आमचें जुगणार खचित! मधुकरराव! आतां संभाळून अस, नाहीं तर तुमचा आतां येथून घसरगुंडा झाल्या-वांचून रहाणार नाहीं!

(निघून जातो.)

**प्र० ४ स्थल—खलदर्शनरावाचा वाडा.**

(शशिकला आणि कमलिनी येतात.)

**शशि०**—कसें कसें ह्मणतेस? माझ्या बाबांच्या खुषमस्कऱ्याला तुझ्या नवऱ्यानें बडबड करूं नको ह्मणून सांगितलें इतक्याबद्दल बाबांनीं त्याला मार दिला!

**कम०**—होय, बाईसाहेब, असेंच!

**शशि०**—असें काय? हें तर मी कध्धीं कध्धीं नाहीं सहन करून घ्यायची! हा कोण मेला त्रास! बाबांनीं तर आलीकडे जसा कांहीं ताळच सोडला आहे! नित्य मेला कांहीं ना कांहीं तरी नवा प्रकार दृष्टीस पडतो! एकादे वेळ अशी कांहीं भलतीच गोष्ट करून बसतात, कीं तिच्यामुळें आमची मेली सगळ्यांची फजिती होते! त्यांनीं आपल्या बरोबर ते इतके खंडीचे भाराभर नोकर लोक जवळ बाळगिले आहेत त्यांचा वाड्यांत सदा गलबला आणि सदा त्रास आहेच! मेले लट्ठे सगळा दिवस आणि सगळी रात्र हवे तसे दारू पिऊन उन्मत्त होतात आणि दंगा करितात पण त्याबद्दल त्यांना बोलण्याची मात्र भीति! जरा बोललें कीं बाबा एक एक डोळा पण एवढा करितात! मेलें मनुष्य आहे, होतेच आहे एकादी चूक त्याच्या हातून, पण तेवढीसुद्धां बाबांना सहन नाहीं होत! हा पण कोण मेला चमत्कार! खरेंच कमळे! आतां किनई, मीं तर बाई बेतच केला आहे, बाबा काय पाहिजे तें करोत, त्यांचें ह्मणून ऐकायचें नाहीं! तूंही माझ्या सारखीच वागत जा आणि आपल्या नव-ऱ्यालाही तसेंच सांगून ठेव! समजलीस? बाबा आतां शिकारीहून परत येतील, ते आले ह्मणज त्यांनीं विचारिलें तर बेलाशक मी आजारी आहें ह्मणून सांग! तसेंच ते आले ह्मणजे त्यांचे समोर तुझाच नवरा असेल त्याला बाबांनीं कांहीं काम सांगितलेलें ऐक-त जाऊं नको ह्मणून सांग! समजलीस? तूं त्याची कांहीं काळजी करूं नको, त्या-पासून कांहीं कमजास्ती गोष्ट झाली तर तिचा जबाब माझ्याकडे लागला!

**कम०**—जी बाई साहेब! ते पहा तुमचे बाबा शिकारीहून परत येतांना दिसत आहेत!

(आंतून शिंगाचा आवाज ऐकूं येतो.)

**शशि०**—येऊंदे आले तर! मी नाहीं त्यांची काळजी करीत! तूं, तुझा नवरा, आणि बा-कीचे चाकर, यांना मी असेंच सांगून ठेवितें कीं तुह्मीं ह्मणून बाबांचें ह्मणणें ऐकत जा-ऊं नका! ऐकिल्या न ऐकिल्यासारखें करून काम हें नकाच करीत जाऊं! मी हें इत-कें जें करवितें तें कांहीं उगीच नाहीं! बाबांचें कोणीं ऐकूं नये आणि बाबांनीं त्याबद्दल मला विचारावें हेंच मला पाहिजे

आहे! बाबा रागावून पाहिजे तर येथून जातील, तरी मी कांहीं त्यांना रहा ह्मणून ह्मणायची नाहीं! येऊन जाऊन जाणार कोठें त्या **चंद्राननेकडे**ना! कांहीं चिंता नाहीं! या कामीं तिचें आणि माझें कसें काय वागायचें हें पूर्वींच ठरलें आहे. तेंथेही ती माझ्या प्रमाणेंच बाबांची पूजा करील! कधीं सोडणार नाहीं!

**कम०**—तें खरें, पण बाई साहेब! जर महाराजांना आपण दोघींनींही सोडिलें, तर त्यांच्या या वयांत त्यांनीं कुठें बरें जावें?

**शशि०**—पाहिजे तिकडे जावें, त्याची मी काय ह्मणून पंचाईत करूं! पाहिजे तर त्यांनीं **सिंधू**च्या पात्रांत जीव द्यावा, किंवा पाहिजे असेल तर समुद्रतीरीं जाऊन पाण्यांत उडी टाकून मरून जावें, त्याची काळजी मी नाहीं करीत बसायची?

**कम०**—मलाही आपणाप्रमाणेंच वाटतें, पण फिरून आपलें मला वाटतें, कसें झालें तरी आपण त्यांची कन्या, तव्हां असा—

**शशि०**—**कमळे**! तूं आज फारशी वेदांतांत शिरलीस? तूं कशी आहेस अन् तुझी आपल्या बापावर कितपत प्रीति होती हें सगळें मला ठाऊक आहे. पण तें असूं दे मेलं, खरेंच पुनशील किनई तर मला देखील ह्मातार्‍यानें विनाकारण हाल काढावेसे वाटत नाहीं, पण त्यांची तर्‍हाच चमत्कारिक! ती कांहीं मला खपायची नाहीं! आतां त्यांची साठी भरत आली, त्यांनीं आपलें राज्यही जिकडचें तिकडे देऊन टाकिलें, आतां त्यांना उगीच रिकामी पंचाईत करायला सांगितली आहे कोणीं? त्यांनीं अजूनही आपला राजेपणा विसरूं नये हा चमत्कार नव्हे का? माणसें ह्मातारीं झाली ह्मणजे त्यांनीं पोरांप्रमाणें सांगितलेलें निमूटपणें ऐकावें, दुसरीं माणसें घालतील तें खावें आणि आपलें पडून रहावें, पण ह्या ह्मातार्‍याला हें कोठें समजतें? राज्यविज्य सर्व देऊन टाकिलें तरी त्याला सगळ्या मुलखाचा उपद्व्याप कोठें सुटतो आहे!—बरें तुला सांगितलें तें तूं नीट समजलीस? जा जाऊन आपल्या नवर्‍यालाही नीट समजावून सांग!

**कम०**—जी बाईसाहेब!

**शशि०**—आणखी हें बघ, बाबांच्या बरोबरचीं चाकरमाणसें आहेत किनई, त्यांच्याशीं सुद्धां असेंच वागायचें ह्मणून सांग, त्यांना कांहीं हवें नको असलें तरी त्याकडे कोणींही लक्ष देऊं नये ह्मणून त्याला आपलें सांगून ठेव! याचा परिणाम असा झालाच पाहिजे त्याला इलाज नाहीं! बाबांनीं मजवर रागावावें, आणि मला काय त्यांना सांगायचें आहे तें सांगायची वेळ यावी हेंच मला पाहिजे आहे!—बरें जा तूं आतां, आणखी एकदा तुझ्या नवर्‍याला इकडे पाठवून दे.

**कम०**—जी. (जाते आणि अश्वसेनास पाठवून देते.)

**शशि०**—ये असा. तुला कां बोलाविलें आहे समजलास?

**अश्व०**—नाहीं बाईसाहेब!

**शशि०**—पण तुझ्या बायकोनें तुला कांहीं सांगितलें नाहीं?

**अश्व०**—कांहीं थोडें सांगितलें! राजेसाहेब आणि त्यांच्या पदरचे चाकर ह्यांच्याशीं फारसा संबंध ठेवायचा नाहींन् त्यांचें कांहीं ऐकायचें नाहीं ह्मणून ती मला सांगत होती!

काय करावें ह्मणून सहज विचारांत होतों. आणखी दुसरें, मला आपलें सहज वाटलें कीं, तूं या वेळेस कदाचित् घरांत नसून अशीच कोठें तरी बागांत किंवा शेतांत फिरत असशील, आणखी मीच होऊन त्या थोरल्या वाड्यांत तेथें तुझा शोध करीत येण्यापेक्षां तुझी आणि माझी अशीच एका अंगाला गांठ पडलेली तुला बरी वाटेल, ह्मणून आपला सहज इथेंच बसणार होतों. पण हें बघ—आणखी एक—त्या वाड्यांतच आंत अंगरख्यांना सोनेरी गुळख्या लटकाविलेले, मोठीं अक्कडबाज पागोटीं घातलेले आणि मिशांना खालून वरून तूप लोणी खूप चोळून चोळून अगेराव बनलेले शिपाई प्यादे पुष्कळ असतील तेव्हां त्याच्या तेथें असल्या घाणेरड्या पोशाखानें जाणें ह्मणजे मला कसेंसेंच वाटलें!"

**गोविंदा** आतां सांगितल्या प्रकारानें बोलत असतां मला त्याच्या पहाण्याची, व बोलण्या चालण्याची तऱ्हाच कांहीं चमत्कारिक भासली, त्यावरून **गोविंदाच्या** येण्याचा उद्देश केवळ चांगल्याच प्रकारचा होता असें मला वाटेना. तथापि मीं त्यास तसें वाटूं न देतां त्यास ह्मटलें:—"सगळं खरें, पण **गोविंदा**! तूं अजून मला **कृष्णाचें**, आणखी **यमुना** आणि **जनी** यांचें कसें काय आहे तें नाहीं सांगितलेंस!"

"कोण **कृष्णाचें**, होय! वाः तो तर गाजी खूप चैनींत आहे, पण एक महिना झाला तो कांहीं कारण नसतां मजवर उगीच रागावला होता, तेव्हां पासून मी त्याच्याकडे कसा तो मुळींच गेलों नाहीं. ती **लिंबची** थेरडी कार्तिक स्नानाकरितां दोन महिने झाले **वाईस** आली होती, तेव्हां **यमुनानू जनी** दोघी तिजबरोबर आल्या होत्या. **यमुना** तर काय आतां हळूहळू मोठ्या बायकांतच शिरूं पहाते आहे जशी, आणखी फुसफुसते तरी किती कीं कांहीं बोलायची सोय नाहीं. **जनी**ही खूप गबदूल झाली आहे—"

"तें सर्व खरें, पण **गोविंदा**! त्यांना तेथें राहून करमतें तरी ना! ती **उमाबाई** मोठी भली बायको आहे ह्मणून मी ऐकितें तेव्हां ती त्यांना कोणच्याही प्रकारानें कमी करणार नाहीं—"

"अक्का! झालें तर!" **गोविंदा** उत्तर करितो. "अग. त्या दोघींना खायला प्यायला यथास्थित मिळतें, कांहीं कुठें घरांत उचलाचाचल करायची नसते मग न करमायला काय झालें?—पण तें असूं दे—अक्का! आपण इथें अशींच बोलत राहिलों आहों हें मला नीट वाटत नाहीं. तर हें बघ तूं मला अशीच मागल्या दारानें परसांत किंवा सैंपाकघरांत घेऊन चल. पण तसें कशाला? तेथें पुष्कळ माणसें वापरत सवरत असतील तेथें असल्या घाणेरड्या पोशाकानिशीं जाणें ह्मणजे मला कसेंसेंच वाटतें. याकरितां असें कर, तूं मला आपल्या निजायच्या बसायच्या खोलींत घेऊन चल, ह्मणजे तिथें आपण चार घटका स्वस्थ गप्पा इकडल्या तिकडल्या ठोकीत बसूं!"

**गोविंदाचें** भाषण ऐकून मला फार वाईट वाटलें, व तशा स्थितींतच मीं त्याला बोललें:—"दादा! हें तूं ह्मणतो आहेस तरी काय? तूं किनई खरेंच पुसशील तर मला कसासाच दिसतोस! आणखी तूं आपल्याला मागच्या दारानें चोरून छपून आंत घेऊन जावें ह्मणतोस हें तरी तुला बरें वाटतें कारे? चांगलें साकसुरतपणें पुढच्या दाराशीं येऊन मी कोठें आहें ह्मणून विचारायला तुला इतकें लाजायलाच नको कांहीं! चल येत असलास तर आपण

दोघेंही पुढल्या दारानेंच चाकरमाणसें बसायसवरायची जागा आहे तेथें जाऊं ! "

" नको नको ! आतां नको ! " **गोविंदा** उत्तर करितो. " मी आलों असतों, पण माझा मलाच मी घाणेरडा वाटतों ! पण काय ग ? तुझा धनी मोठा श्रीमंत दिसतो ! मोठं थोरलें सैंपाकघर, चाकरमाणसांना बसायसवरायला निराळी जागा, वाः त्याचा मोठाच लाट आहे एकून ! "

" आहेच, पण त्यांत काय मोठेंसें आहे ? " मीं ह्मटलें.

" अग, तसं नव्हे. पण आपलं मला सहज वाटलें. आणखी काय ग, तिथें आचारी पाणक्यांना खायप्यायची पण खूप चंगळ असेल नाहीं बरें ? "

" अरे होय, माझा धनी श्रीमान्च आहे, तेव्हां यांत आश्चर्य तें कशाचें ? "

" अग, आश्चर्याची गोष्ट नाहीं मी तुला विचारीत, पण तो मोठाच श्रीमान् असेल नाहीं बरें ? नाहीं–आपलें सहज विचारितों! "

" होय. श्रीमान् तर खराच. "

" तेव्हां त्याचा जेवणाखाणाचा बेतही मोठ्याच मिजाशीचा असेल ! जेवायला रुप्याचें ताट, रुप्याच्या वाट्या, पाणी प्यायला रुप्याचीं भांडीं हीं असतीलच! तसेंच तुझ्या धनिणीचाही बडेजाव दागदागिने हें तें पुष्कळच असेल नाहीं बरें ? "

" होय, त्यांना काय कमी आहे ! "

" तसेंच काय ग अक्का ! इतक्या थाटाला चाकरमाणसेंही पांच पंचवीस असतील नाहीं बरें ? "

" छे, इतकीं कुठलीं ? चौघे पुरुष चाकर, आणखी आह्मीं दोघी मोलकरणी, एवढींच काय तीं चाकरमाणसें. बाकीचीं सगळीं खाशीं माणसें, दोघें नवरा बायको आणखी तीन लहान मुलें. "

" मुदपाकावर कोणी निराळाच मनुष्य ठेविला असेल नाहीं ? "

" होय. त्यांतलाच एकजण आहे ! "

" खरें विचारशील किनई, अक्का ! ही मुदपाकावरील असामी मला जर मिळेल तर ती मला हल्लींच्या प्याद्यांतल्या नोकरीपेक्षां फार बरी वाटेल. दोन वेळां यजमानाच्या जेवणाखाणाची तब्वेत राखून भांडीं ताटें वाट्या गोळा करून जिकडच्या तिकडे ठेविलीं कीं मग दुसरा त्रास नाहीं ! "

" दादा ! एकून तुला हल्लींची असामी आवडत नाहीं अं? दादा ! तुला काय सांगूं? मी येथें असतां मला सर्वांपेक्षां तुझीच अधिक काळजी वाटते. तुला देवाशपथ सांगतें, तें पत्र मीं तुला लिहिलें त्यावेळीं माझ्या मनाची काय स्थिति झाली होती ती त्यालाच मात्र ठाऊक ! "

**गोविंदा** उत्तर करितोः–" समजलों . पण तुझें पत्र आल्यावर मी तुला नाहीं बरें उलट पत्र लिहिलें ? आणखी त्यांत मी नीट रीतीनें वागेन ह्मणून नव्हतें बरें लिहिलें ? "

हें बोलत असतां त्याचें सर्व लक्ष माझ्या धन्याच्या घराकडेच एकसारखें लागलें असून तो पहिलें बोलणें एकीकडे टाकून देऊन बोलूं लागलाः–" पण खरेंच पुसशील किनई, अक्का ! तुझ्या यजमानाचें घर पाहूनच मला मोठा आनंद वाटतो ! खरोखरीच, घराची ठेवण तर पहा येथून कशी सुबक दिसते आहे ती ! ती तीन खिडक्यांची माडी इथून दिसते आहे तींत मोठा पलंग टाकिला असून त्याच्यावर मच्छरदानी टाकिली आहे, तीच तुझ्या यजमानाची आणि यजमानिणिची निजण्याची जागा असेल नाहीं?"

"दादा! आतां तर तूं अगदीं भलतें भलतेंच बोलूं लागलास! दादा! तुझी आणि माझी आज किती दिवसांनीं गांठ पडली, तेव्हां आपणाला एकमेकांशीं किती किती बोलायचें आहे, पण तूं तें सगळें एकीकडेच टाकून देऊन आपला कायसेंसेंच भलतेंन सलतेंच बोलूं लागलास!"

**गोविंदा** झटदिशी उत्तर करितोः—"अग तसें नव्हे. तूं माझ्या बोलण्याचा आपला भलताच अर्थ करूं लागलीस! अग, तूं इथें रहातेस तेव्हां तुला धनी चांगला मिळावा, धन्यानें तुझें कल्याण करावें, धन्यानें व धनिणीनें आनंदांत राहून चाकर माणसांनाही सुख द्यावें असें वाटून मीं सहज तुला ही गोष्ट विचारली! यांत मी भलतें सलतें तें काय बरें बोललों!"

**गोविंदाचे** हे शब्द ऐकून माझ्या चित्तास एकाएकीं जो आनंद झाला तो बोलूनही दाखवितां येणें कठीण. त्याला माझ्या कल्याणाची काळजी वाटते हें ऐकून त्या वेळीं माझ्या नेत्रांतून एकसारखे प्रेमाश्रु वाहूं लागले, व कंठ दाटून आला. तशा स्थितींतच माझें मला भान न राहून मी त्याच्या गळ्याला मिठी घातली, व तशीच कांहीं वेळपर्यंत तेथें उभी होतें. कांहीं वेळानें शुद्धीवर आल्यावर मीं त्याला ह्मटलें:—"दादा! मी तुला वाईट शब्दांनीं बोललें, पण त्याचा राग नको अं मानूं!" तूं काय पाहिजे तें विचार, आतां कांहीं मी तुझ्यावर रागावायची नाहीं."

तो उत्तर करितोः—"अंः—अग त्यांत रागावायचें तें काय आहे? आणखी मी तुला हें विचारलें तें तरी सहजच. वास्तविक ह्मटलें ह्मणजे मला तुझा यजमान आणि यजमानीण हीं कोठें निजतात, आणि काय करितात हें विचारण्याची कांहीं जरूर नाहीं! पण आपली गोष्ट सहज ओघालाच आली तेव्हां विचारितों. कसें काय? मीं तर्क केला तोच खरा नव्हे का?"

मीं ह्मटलें:—"तूं तर्क केलास तोच खरा, आणखी त्या माडीपलीकडे तो सोपा दिसतो त्याच्या वरच्या तिसऱ्या मजल्यावर माझी आणि मुलांची निजण्याची जागा आहे. मुलांचीं सकाळचीं आणि मधल्या वेळचीं जेवणेंही तेथेंच होतात!"

**गोविंदा** बोलतोः—"अक्का! तुला निजायला जागा तर मोठी छान मिळाली आहे, पण काय ग, ही अगदीं एका अंगालाच नाहीं का तुला वाटत? अशी जागा असली ह्मणजे तेथें चोरट्या बिरट्यांचें यायचें मोठें भय असायचें, पण घरांत तरवारी बंदुका, वगैरे सर्व बंदोबस्त असेलच, नाहीं बर!"

मीं ह्मटलें:—"मी आज या घरांत इतके दिवस आहें, पण तूं ह्मणतोस असलीं हत्यारें एक दिवस सुद्धां माझ्या नजरेला पडलीं नाहींत. आणखी इतक्या दिवसांत आसपास कोठें एकही चोरी झालेली कांहीं कोणाच्या ऐकण्यांत नाहीं. तेव्हां इतक्या बंदोबस्ताचें वास्तविक ह्मटलें तर कांहींच कारण नाहीं. आपला साधारण बंदोबस्त असतो एवढच काय तें."

"तें ठीक आहे, पण मी आपला तुला ह्मणून सांगतों तूं आपल्या खोलीचीं दारें लावूनच निजत जाशील तीं बरी. तुझे धनी व धनीन यांचें सोनें नाणें, दागदागिने सगळे त्यांच्या निजायच्या खोलींत असायचे तेव्हां तीं दोघें तर बंदोबस्तानें निजत असतीलच!"

त्याचें तें भाषण ऐकून मला **त्राटिकाबाईचें** स्मरण होऊन किंचित् हंसूं आलें, व मीं **गोविंदास** उत्तर केलें:—"भलतेंच! माझ्या धनि-

नीच्या खोलीला तर रात्रभर मुळीं कडी देखील नसते. कारण रात्रींचा हा **जनकू** एकाद वेळ किंचाळत सुटला कीं माझी धनीन एकदम आरडा ओरडा करीतच काय झालें ह्मणून पहायला येते, पण त्या वेळीं कडी कोयंडा किंवा कोठें एकादा अडसर वाजलेला कांहीं ऐकूं येत नाहीं."

"नसेल येत." **गोविंदा** मध्येंच बोलला:—"मला त्याची कांहीं पंचाईत नाहीं, पण मीं आपलें तुला ह्मणून सांगितलें. आपली जपून असत जा ह्मणजे झालें. तुला दुसरें काय सांगायचें आहे? बरं असो.—हो. पण तुला एक गोष्ट सांगायची राहिली आहे. ती हीच कीं तूं अशी माझ्याविषयीं विनाकारण काळजी वहात नको जाऊं! मी कांहीं वाईट गोष्ट करायचा नाहीं, आणि वाईट कधींही निघायचा नाहीं."

**गोविंदा**चे हे शब्द ऐकून मला भय वाटलें, आणि मी त्याला बोललें:—"ह्मणजे? दादा! हें तूं काय बोलतोस? अरे आपल्या आईबापांची आपल्याला तशीच शिक्षा होती, असें असून आपण कधीं तरी वाईट निघूं अशी गोष्ट तुझ्या मनांत आली होती काय? दादा!" मी प्रेमानें त्याचा हात आपल्या हातांत धरून बोलूं लागलें. "दादा! नीट विचार कर, अब्रू ही कांचेसारखी आहे, ती एकदा फुटली कीं जन्माची फुटली ह्मणून समजावें!"

"होय ग होय!" **गोविंदा**च्या तोंडांतून उद्गार निघतो. "होय ग होय! अक्का! तूं तरी बरीच पंडित झाली आहेस! मी मागच्या एकादशीला **विष्णू**च्या देवळांत कथेला गेलों होतों, तिथें तो **मोरया गोंसावी** देखील हें असेंच बोलत होता!"

**गोविंदा**चे हे शब्द ऐकून माझ्या जिवाला अत्यंत समाधान वाटलें, कारण त्यांच्याबद्दल **हणमंतरावां**च्या तोंडून जरी वाईटच गोष्टी माझ्या ऐकण्यांत आल्या होत्या, तरी ते अद्यापिही नीट ताळ्यावर येण्याची आशा त्याच्या भाषणावरून उत्पन्न झाली, आणि मीं ह्मटलें:—"एकून दादा! तुझें देवळांत कथेला वगैरे जाणें अजून खरेंचना नाहीं सुटलें!"

"अग, खरेंच ह्मणून काय विचारितेस? माझ्याबद्दल लोक भलभलत्याच बातम्या उठवितात, पण तुला खचित सांगतों मी कांहीं तितका वाईट नाहीं. तूं मला पत्र पाठविलेंस त्यांत तो थेरडा नाईक न् तो **हणमंतराव**—"

मीं मध्येंच ह्मटलें:—"दादा! तूं शुद्धीवर आहेस का पण? अरे, **हणमंतराव** आणि नाईक हे दोघे ही आपणापेक्षां थोर आहेत, तेव्हां त्यांना आपण अहो जाहोच करीत जावें, त्यांच्या विषयीं असें दांडगेपणीं बोलत जाऊं नये."

**गोविंदा** धिक्कार केल्यासारख्या शब्दानें उत्तर करितो—"कसें कसें ह्मटलेंस? ह्मातारे नाईक आणि ते **हणमंतराव** असेंचना! बरें बरें!" इतकें बोलून तो पुनरपि आपला स्वर बदलून शांतपणानें बोलूं लागला. "अक्का! तुला खरेंच सांगतों, एकाद्याबद्दल कांहीं वाईट साईट मजकूर कसा तेव्हांच पिकवितां येतो, पण तूंच विचार कर, तो थेरडा नाईक पगारसुद्धां वेळेवर देववीत नाहीं. आज देववीन, उद्यां देववीन असेंच नेहमीं करीत असतो. त्यामुळें आमचा सगळ्यांचा जीव कसा अगदीं संतापल्यासारखा होतो. मग काय? कसें तरी मनाचें समाधान करून घेण्याकरितां आमच्या बरोबरीचे सगळे लोक कुठें तरी जाऊन बसायचा काढितात वेत, आणि मग हा आला, तो आला, असें होतां होतां सहज दहापांच असामी मिळून आह्मीं

जातों कलालाच्या दुकानांत, आणखी तेथें असलोंच ह्मणजे मग सहज आपले प्रहर दोन प्रहर ही तेथेंच जातात इतकेंच काय तें ! त्यांत काय मोठेंसें आहे ? "

हे त्याचे शब्द ऐकून मला फार वाईट वाटलें, आणि तो खरोखरीच वाईट संगतीस लागला हें मनांत येऊन मला रडेंही कोसळलें. तशा स्थितींतच मीं त्याला ह्मटलें:—" तें सगळें असूं दे, पण दादा ! तूं मला शपथ वाहून सांग मी आजपासून तिकडे जाणार नाहीं ह्मणून. अरे, आपले बाबा एवढे मोठे झाले होते, पण त्यांनीं एक दिवस तरी कसा तो दारूला स्पर्श केलेला आठवतो का ? आणखी हें तूंच काय करायला लागलाहेस ?" इतकें बोलून मी आपले डोळे पुसून त्याच्या तोंडाकडे पाहून स्फुंदत स्फुंदतच बोललें:— " आणखी हें बघ दादा ! आज देखील तूं दारू बरीच झोंकली आहेस ! "

**गोविंदा** उत्तर करितो:—" वाहवा ग अक्का! आज तूं बरीच उपदेश करायला लागलीस ! अग ! आज मी इतका लांबून वाट चालून आलों, आणि तो देखील अशा थंडींत. तेव्हां आपले सहज दोन चार पेले गेले असतील घशाखालीं, त्यांत ग काय मोठेंसें आहे? पण तें सगळें असूं दे. अक्का ! तुझा उपदेश खरोखरीच चांगला आहे, आणखी मी खरोखरीच तुझें ह्मणणें ऐकून घेईन ! "

" काय ? " मीं आश्चर्यानें ह्मटलें:—" नुसतें ऐकूनच घेशील ? आणखी त्याप्रमाणें वागणार नाहींस ?"

" अग, तसें तव्हे ग ! तूं भलत्याचा भलताच अर्थ करितेस ! तूं सांगितल्याप्रमाणेंच मी वागत जाईन समजलीस ? " इतकें बोलून त्यानें एकदम दचकल्यासारखें करून ह्मटलें. " अग, पण आतां हा आवाज कोठून ऐकूं आला? कोणाचा तरी कुतरा भोंकलासें वाटतें !" इतकें बोलून तो लक्ष देऊन ऐकूं लागला.

मीं आश्चर्यानें ह्मटलें:—" काय ? कुतरा भोंकला ? मग मला नाहीं कुठें ऐकायला आला तो ! "

**गोविंदा** झटदिशी उत्तर करितो:—" तुला नसेल आला, पण मला तर आला ! अक्का, तूं कांहीं ह्मण पण तुमच्याच घरांत मोठा दांडगा कुतरा भोंकल्याचा मला भास झाला ! "

" छेः—हें तर अगदींच खोटें ! आमच्या घरांतच काय पण आमच्या या सगळ्या आळींत तुला एकसुद्धां कुतरा आढळायचा नाहीं. मात्र महिना पंधरा दिवस झाले, आमच्याच येथें एक पाहुणा आला होता त्याच्या बरोबर एक मोटा कुतरा होता, पण त्याला इथून गेल्याला आज किती दिवस झाले ! "

" असतील !—बरें अक्का ! आतां मी जातों. मला आतां येथून चारपांच कोस मजल काढावयाची आहे, तर आतां इथें फार वेळ राहून उपयोग नाहीं. वाईस जाऊन पोंहचायला कशी ह्मटली तरी चार पांच घटका रात्र होईल, तितक्या सुमाराला मी परत येतों ह्मणून नाइकांना सांगून आलों होतों तेव्हां त्याप्रमाणें मला गेलेंच पाहिजे ! "

" एकून दादा ! तुला माझें ह्मणणें आवडलें आणि तूं त्याप्रमाणें वागणार ना? " मीं आनंदानें ह्मटलें.

" हो हो ! वागणार ह्मणून काय विचारितेस ? वागणारच ! महिन्या पंधरा दिवसांनीं तूंच तिकडे ये ह्मणजे लोकच तुला सांगूं लागतील कीं मी आतांचा **गोविंदा** नाहीं !

बरें चल चल, आतां मी येतों."

इतकें झाल्यावर मीं त्याला नमस्कार केला, आणि त्याच दिवशीं माझा गेल्या वर्षाचा पगार माझ्या हातीं पडला होता, त्यांतले दोन रुपये मीं त्याला दिले आणि तो निघून गेला. आमचें हें भाषण चालू असतां चांगली घटका दीड घटका झाली होती. व थंडीही साधारण जास्ती वाजूं लागल्यामुळें **जनकू** झोंपाळल्यासारखा होऊन किरकिर करूं लागला होता, तेव्हां त्याला कडेवर उचलून घेऊन मी त्वरेनें परत घराकडे यायला निघालें. घरीं आल्याबरोबर वरच्या माडीवर माझी धनीन मोठ्या रागानें कायसेंसें बोलत असतांना मला ऐकूं आलें. परंतु मी तिकडे बिलकुल लक्ष न देता परसांतल्या जिन्यानें आपल्या खोलीकडे जाऊं लागलें. इतक्यांत वरून एक चाकर दडदड खालीं उतरत आला व त्यानें मुलाला वर निजविल्यावर मला धनिनीनं आपल्या खोलींत बोलाविलें आहे ह्मणून निरोप सांगितला. हा निरोप ऐकिल्याबरोबर मीं ताडिलें कीं आमच्या धनिनीनें मीं आपल्या भावाशीं शेतांत बोलत असतां पाहिलें असावें, व त्यामुळेंच तिच्या जिवाचा तडफडाट झाला असावा. परंतु त्याबद्दल माझ्या मनाला बिलकूल धास्ती वाटली नाहीं, कारण मला भेटला तो भलताच कोणी नसून प्रत्यक्ष माझा भाऊच होता. तेव्हां तसें सांगितलें ह्मणजे मग धनीन कांहीं मजवर रागावायची नाहीं असें मला वाटत होतें. असो. मी खोलींत गेल्यावर **जनकू**ला आंथरुणावर निजवून त्याला पांघरूण वगैरे घातलें, आणि तशीच **संभाजीरावा**च्या बसायउठायच्या खोलींतच **ताराबाई** बसली होती तिकडे गेलें. तेथें पहातें तों **ताराबाई** झोंपाळ्यावर खुशाल एकटी ताठ्यानें बसलेली दृष्टीस पडली, व बिचारा **संभाजीराव** खालीं भुईवर गरीबासारखा हात पाय जोडून बसला होता. त्या वेळीं **ताराबाईची** मुद्रा खूपच कडक झालेली मला दिसली व जशी काय ती मुद्रा मी आंत येतांच मला दिसावी ह्मणून तिनें अगोदरपासूनच बुध्या करून ठेविली होती असेंही मला वाटल्यावांचून राहिलें नाहीं. असो. मीं आंत शिरल्याबरोबर माझ्या धनिनीनें मला दरडावून खोलीचें दार लावून घे ह्मणून सांगितलें, व मी त्याप्रमाणें केल्यावर तिनें आपली झोंपाळ्यावर पडलेली डोळ्यांची आरशी उचलून घेऊन मला ह्मटलें:—"ही पाहिलीसका आरशी? ही डोळ्याला लावली ह्मणजे लांबचा अंधुक पदार्थ असला तरी साफ दिसतो. त्या पलीकडल्या शेतांत **आंब्याच्या** झाडापर्यंत देखील ह्याची दृष्टि पोंचते, समजलीस?"

**ताराबाई**चें हें नुसतेंच बोलणें ऐकिलें असतें तर मला त्याचें फारसें वाईट वाटलें नसतें. परंतु 'आंब्याच्या' हा शब्द ठांसून बोलल्यावरून ती बुध्या मी आपल्या भावाशीं बोलत असतां पहात बसली होती हें पाहून मला फार वाईट वाटलें, व तिचा रागही आला, परंतु तो दाखवून उपयोग व्हावयाचा नाहीं ह्मणून मीं तो बाहेर दाखविला नाहीं. तसेंच, वस्तुतः मीं कांहीं अपराध केला होता असा जरी प्रकार नव्हता तरी जी गोष्ट कोणास कळविण्याचें माझ्या मनांत नव्हतें ती तिला समजल्यामुळें मला लाजही वाटली, व मी खालीं पाहूं लागलें.

मी लाजलेली पाहून **ताराबाई**ला आपण बाजू जिंकिली असें वाटून मोठा आनंद झाला, व त्याच्या भरांत मोठ्यानें टाळ्या पिटून ती

आपल्या नवऱ्यास ह्मणालीः—" कां मीं सांगितलें होतें तें आतां ठरलें कीं नाहीं खरं ! मला ठाऊकच तें, सगळ्या रांडा एथून तेथपर्यंत अगदीं एकसारख्याच असायच्या, मग हिनेंच कां तसें नसावें ? कां तुह्मींच ना हिचा कैवार घेऊन ह्मणत होतां ही कांहीं अशांतली नाहीं ह्मणून? मग आतां झाली कीं नाहीं खातरी?—ही रांडवी दुसऱ्या-:"

**संभाजीराव** गरीबपणानें बोलले:—" तूं ह्मणतेस तें खरें. पण मी कधीं— "

" हां, फार बोलूं नका. तुह्मांला मी पक्की ओळखून आहें. " इतकें बोलून ती मजकडे वळून रागानें लाल होऊन बोललीः—" काय ग रांडवी ! आतां कां अशी लाजतेस ? मघाशीं तो कोण तुझा नवरा का भडवा कोण तो घेऊन त्या आंब्याच्या झाडाखालीं काय करीत होतीस, तेव्हां बरी नाहीं लाज वाटली, आणि आतांच काय ती सगळ्या मुलखाची लाज तुला आली आहे ! सटवे ! असल्या भलत्यानूसलत्या गोष्टी करायला तुला लाज नाहीं वाटत ? आणि अशानें तूं त्या माझ्या बाबीला एव्हांपासून बिघडविणार, नाहीं ?— " पुढें नवऱ्यास उद्देशून ती बोलली " हें पहा ! या रांडवीची डाळ तुह्मींच सगळी नासून टाकली आहे, आणि तुह्मींच हिला मुलांना शेतांतून हिंडवून आणीत जा ह्मणून सांगितलें आहे ! आतां, घ्या, हीं आपलीं पोरें इच्या संगतीला लागून बिघडतात कीं नाहीं पहा ! "

तिचें बोलणें ऐकून नवरा बिचारा गोंधळल्यासारखा झाला व त्याला पुढें काय बोलावें हें सुचेना. तथापि सरते शेवटीं तो मोठ्या प्रयत्नानें पुढील शब्द बोलला:—" कसें कसें ह्मटलेंस ? कोण बिघडतील ह्मटलेंस ! हिच्या संगतीनें आपलीं एवढींशीं मुलें का बिघडतील ! हा आपला जनकू का बिघडेल ह्मणतेस? "

" हो हो ! जनकू बिघडेल ! त्याच्या देखत ही रांडवी परक्या पुरुषाच्या गळ्याला मिठ्या घालून चुब् चुब् करायला नाहीं चुकत तेव्हां एव्हांपासून आपलीं धाकटीं मुलें असल्या गोष्टी शिकल्याशिवाय का सोडतील ? "

**ताराबाईचे** हे शेवटचे शब्द ऐकून मात्र मला अतिशय राग आला, व तशा स्थितींतही मला रडूं कोसळलें, व मीं बोललें:—" पण—पण— ऐकून तरी घ्याल कीं नाहीं—तो माझा थोरला भाऊ **गोविंदा** मला भेटायला आला होता ! "

माझें भाषण ऐकून **संभाजीरावांस** जो आनंद झाला तो कांहीं बोलून दाखवितां येणार नाहीं. माझें उत्तर ऐकिल्याबरोबर त्यांचा खिन्न झालेला चेहरा एकदम उजळल्यासारखा होऊन त्यांनीं आनंदाच्या टाळ्या पिटल्या, व त्या इतक्या कीं त्या ऐकूनच **ताराबाई** इतकी तापट परंतु तिच्यानेंही क्षणभर आपल्या नवऱ्यास थांबवलें नाहीं. **संभाजीरावांस** इतका आनंद होण्याचें कारण मिळून इतकेंच होतें कीं आजपर्यंत मी त्यांच्या घरीं असतां माझ्या हातून ह्मणून कांहीं वाईट वर्तन झालेलें त्यांच्या नजरेस पडलें नव्हतें; व त्यामुळें जेव्हां जेव्हां ह्मणून त्यांस मजविषयीं आपल्या बायकोशीं बोलण्याचा प्रसंग येई, तेव्हां नेहमीं ते आपणाकडून होईल तितकें करून तिच्याशीं माझा पक्ष घेऊनच बोलत असत. परंतु **ताराबाईच्या** तापटपणापुढें त्यांचें कांहीं चालत नसे. असो. मी खोलींत आलें त्यावेळीं त्यांची मुद्रा खिन्न झाली होती व तिचें कारण मी आपल्या भावाशीं बोलत असतां **ताराबाईनें** त्यांची भलतीच समजूत घालून दिली होती, व त्यामुळें हें माझें

उत्तर ऐकून त्यांची आपल्या बायकोनें समजाविलें तशी मी नसून पहिल्याप्रमाणेंच सद्गुणी आहे अशी खातरी झाली, आणि ते मोठ्या आनंदानें ह्मणाले:—" हां हां—असं काय ? वाहवा वाहवा ! "

**संभाजीरावांना** इतका आनंद झालेला **ताराबाईस** रुचला नाहीं, व तिनें त्यांत एकदम विष रहा ह्मणून सांगितलें, आणि माझ्याकडे पाहूं लागली, त्यावेळीं माझाही राग मला आवरेनासा होऊन मी आवेशानें बोललें:— " मी देवाशपथ खोटें नाहीं बोललें ! मी येथें रहायला आलें त्यावेळीं तुह्मींच नव्हतें का मला बजावून सांगितलें कीं मला कोणाला भेटायचें झालें तर मीं बाहेर जावें, परंतु माझ्या मागें लागून कोणी घरांत येतां उपयोगी नाहीं ह्मणून ? मग मी तरी कशी त्याला येथें आणूं ? तरी पण मीं दादाला एकदा घरांत चल ह्मणून ह्मटलें होतें ! "

मी इतकें बोललें तरी **ताराबाईचा** राग कांहीं शांत झाला नाहीं. ती चरफडून हात पाय हापटूं लागली, व त्याबरोबर झोंपाळ्याला धक्का बसून तोही करकर वाजूं लागला. ती आवेशानें हातवारे करून कांहीं बोलूं लागणार इतक्यांत **संभाजीराव** बोलले:—" आतां कां बरें असा उगीच चडफडाट करितेस ? मीं ह्मटलें नाहीं **मथुरा** गरीब मुलगी आहे, तिच्या हातून कधीं कांहीं वाईट साईट गोष्ट व्हायची नाहीं !— "

मी निर्दोष असल्याविषयीं **संभाजीरावांची** जशी खातरी झाली तशी **ताराबाईचीही** खातरी झाली नाहीं असा जरी प्रकार नव्हता तरी तिला आपण मला जाणून बुजून दोष लाविला हें तोंडानें उघडपणें -बोलून दाखवेना. ह्मणून ती **संभाजीराव** बोलत असतां रागानें मध्येंच ह्मणाली:—" कसें कसें ह्मटलेंत ? मला फिरून ऐकूं द्या पाहूं ! "

नवरा उत्तर करितो:—" अग, तूं अशी उगीच रागावतेस कां बरें ? **मथुरा** गरीब आहे तिच्या हातून कधीं वाईट साईट गोष्ट व्हायची नाहीं ! "

" हो हो ! वाईट गोष्ट व्हायला कांहीं हातच नाहीं लागत, ती गालांनींन् ओंठांनीं देखील होते! असल्या रांडा मेल्यांची सगळीं ढोंगें मला ठाऊक आहेत ! या रांडा पाहिजे तशी कुकर्मे करतात आणि मागाहून गांवभर सांगत फिरतात अमकाना तो माझा भाऊ, काका, मामा असें ह्मणत. आपला कोणी तरी होता ! आहे काय त्यांत? वेळ पडली ह्मणजे असल्या रांडांचा पाहिजे तो भाऊ होतो, मामा होतो, काका होतो ! त्यांच्याबद्दल माझी ह्मणून कांहीं खातरी व्हायची नाहीं!—"असें बोलून किंचित् शांत झालीसें करून ह्मणते—"बरें असो. झाली ती गोष्ट बरीच झाली ! **मथुरे**! एकवेळ मीं तुला गय करितें, पण फिरून मात्र असले ढंग माझ्या नाहीं अं कामाला यायचे ! "

तिचें बोलणें ऐकून माझ्यानें उगें राहवेना. माझा कांहीं अपराध नसतां तिनें उगीच्या उगीच गय केलेली पाहून मला वाईट वाटलें. व मी आवेशानेंच ह्मणालें:—" पण—पण—माझ्या हातून झालं आहे तरी काय ? मला भेटून इतके दिवस झाले ह्मणून मला मुद्दाम भेटायला माझा थोरला भाऊ इकडे आला होता. तुह्मांला खोटें वाटत असेल तर तुह्मीं आपली खातरी करून घ्या, त्याला कांहीं फार वेळ लागायचा नाहीं!"

" होय ! माझा खेट्टर अडला आहे तुझ्याबद्दल खात्री करून घ्यायला ! " माझी धनीन फणकाऱ्यानेंच मान उडवीत बोलली !

**शशि०**—होयच. बरें, पण हें बघ, आतांच्या आतां तूं आपली भाकरी बिकरीची सर्व तजवीज लावून घे आणि मी एक पत्र लिहून देतें तेवढें ताईकडे नेऊन पोंचीव. खबरदार पत्र कोठें हरविशील किंवा कांहीं करशील ! समजलास ?

**अश्व०**—जी बाईसाहेब ! असें कोठें झालें आहे ? हा मी आतांच्या आतांच निघावयाची तयारी करितों !

**शशि०**—जा. मीही पत्र लिहून ठेवितें. जायच्या वेळेस मी वरच्या महालांत असेन तिथें ये समजलास !

**अश्व०**—जी बाईसाहेब !

(दोघें जातात.)

## प्रवेश ५. स्थळ—खलदर्शनाच्या वाड्याबाहेरील रस्ता.

(कांतिवर्मा वेश पालटलेला येतो.)

**कांति०**—(आपणाशीं) आतां ह्या वेशाआड खरा **कांतिवर्मा** आहे असं कोण बरें ह्मणेल ? दुःखानें व काळजीनें मी इतका कृश झालों आहें कीं माझा मलाच मी ओळखतां येण्याची पंचाईत ! तशांतूनही नवीन लावलेली दाढी व या नव्या मिशा ! या बेमालूम लावण्याची युक्ति मला मागें एका फकिरानें सांगितली होती! आतां मला कोण ओळखूं शकणार आहे ? हजारों ठिकाणीं ठिगळें जोडून चित्रविचित्र केलेला हा अंगरखा मी अंगांत घातला आहे. व याला कधींधुणें न मिळाल्याकारणानें हा अतिशय मळून गेला आहे, तेव्हां याच्या योगानें मी **प्रमलेश्वर**चा सरदार आज खरोखरीच **प्रमलेश्वर** ह्मणजे अतिशय मळलेला देवच बनलों आहें यांत संशय नाहीं ! हः हः— तेव्हां झालें येथपर्यंत सर्व ठीकच जमलें आहे यांत संशय नाहीं ! राजानें मला हद्दपार करण्याचे पूर्वी माझें नांव **कांतिवर्मा** होतें, तें बदलून मीं आतां आपलें नांव **वांतिकर्मा** ठेविलें आहे, तें, ही माझी स्थिति पाहून, यथार्थ नाहीं असें कोण ह्मणणार आहे? आज एकसारखा सहा सात दिवस पोटभर अन्नपाणी मिळाल्याशिवाय अरण्यांत फिरतों आहें, व रानांत किंवा समुद्राच्या तीरीं जें कांहीं सजीव निर्जीव भक्ष्य मिळेल तें बेलाशक खातों आहें. त्यायोगानें खाल्लेलें न पचून राहून राहून **वांति** होणें हें जसें कांहीं माझें **कर्म**च झालें आहे, तेव्हां आतां मी खचितच **वांतिकर्मा** झालों आहें !— हः हः हः—(खूप मोठ्यानें हंसतो.) वाहवा वाहवा ! **कांतिवर्मा—वांतिकर्मा,—वांतिकर्मा—कांतिवर्मा**—खाशी पण सांगड जमली आहे ! (फिरून हंसतो)—अरे ! पण—आज मी इतका चेकाळलों आहें हा काय ? आमच्या **अतिपीड** राजानें मला हद्दपार केलें आहे ही गोष्ट खरी, व त्यामुळें मला आजपर्यंत अनेक संकटें भोगावीं लागलीं व पुढें भोगावीं लागतील हें ही खरें, तथापि राजाच्या थोरल्या दोन्ही कन्या **शशिकला** व **चंद्रानना** यांचे अप्पलपोटे स्वभाव मला लहानपणापासून माहित आहेत, त्यामुळें आज माझी जी स्थिति झाली आहे, तीच स्थिति कदाचित् त्यालाही प्राप्त होण्याचा संभव आहे. याकरितां राजानें मला केलेले सर्व अपकार विसरून मी अशा स्थितींत असतांही त्याच्या उपयोगी पडेन! राजानें माझा अपमान केलेला माझ्या स्वामिभक्तीच्या आड

कदापि येणार नाहीं हेंच खचित! आतां मी या राजाच्या पदरीं कांहीं तरी मिषानें रहाणार याकरितां मला आतां आपला स्वाभाविक बोलण्याचा स्वर मात्र विसरलें पाहिजे! असो. कांहीं चिंता नाहीं!

(इतक्यांत शिंगाचा आवाज ऐकूं येऊन त्यानंतर अतिपीड राजा आपल्या पदरच्या लोकांनिशीं शिकारीहून येतो.)

**अति०**—(बरोबरच्या एका सरदारास) कसें काय हो? आज शिकार कांहीं मनाजोगती मिळाली नाहीं! आज सगळ्या जंगलांत आपण इतके फिरलों, पण आपणास काय तीं हीं भिकारडीं दोन जनावरें सांपडलीं! असो. चिंता नाहीं! तुह्मी लौकर पुढें चला, आणि मला श्रमानें फार भूक लागली आहे याकरितां आतांच्या आतां या जनावरांचें मांस शिजवून जेवणाची तयारी करण्यास सांगा!

(सरदार कांहीं चाकरांनिशीं जातो.)

**कांति०**—(राजास पाहून आपणाशीं) राजाची स्वारी बाहेर पडली आहे हें एक बरेंच आहे, आतां आपण पुढें जाऊन याच्या दृष्टीस पडावें. (पुढें येतो.)

**अति०**—(त्यास पाहून) अरे! हा कोणी ब्रह्मदेवाच्या सृष्टींतील विचित्रच पुतळा दिसतो आहे, हा कोण आहे याची चौकशी केली पाहिजे—कायरे ए! तूं कोण आहेस?

**कांति०**—(ऐकल्यासारखें करून) कोण मी! मी माणूस आहें!

**अति०**—मूर्खा! तूं माणूस आहेस हें तर दिसतेंच आहे, मी कोठें ह्मणतों आहें तूं गाढव आहेस ह्मणून!—तूं धंदा काय करतोस! तूं येथें आमच्या समोर कशाकरितां आलास? तुझें मजशीं कांहीं काम आहे?

**कांति०**—धंदा? कसें ह्मटलें आपण? धंदा? माझा धंदा, होय? धंदा पुसाल तर मी पुष्कळच धंदे करितों, परंतु खरें पुसाल तर मी धंदा मुळींच करीत नाहीं!

**अति०**—वाहवा रे वाहवा! या तुझ्या ह्मणण्याचा रे काय अर्थ समजावा?

**कांति०**—अर्थ? अर्थ, होय? जो होईल तो समजावा! मी दिसतों आहें असा आहें. मी आंतून एक आणि बाहेरून एक असा नाहीं! आपल्याला हें तें कांहीं समजत नाहीं, पण जर आपल्याला कोणी कांहीं काम सांगितलें तर तें इमानानें करावें एवढें समजतें! मनुष्य प्रामाणिक असेल तरच मात्र त्याच्यावर प्रीति करावी, मनुष्य शहाणा असून थोडकें बोलणारा असेल तरच त्याशीं बोलावें, लोक आपणाला जीबद्दल वाईट ह्मणतील ती गोष्ट करूं नये, अगदीं इलाज चालत नाहींसा झाला तरच मारामारी करावी, एवढ्या काय त्या गोष्टी मला कळतात! यापेक्षां मला हें कीं तें कांहीं कळत नाहीं!

**अति०**—वाः, तुझा धंदा काय आहे ह्मणून विचारलें, त्याचें हें उत्तर काय रे, मूर्खा?—हं—असा वेडेपणा करीत बसूं नको. बोल तूं खरोखरीच कोण आहेस? व तुझी अशी स्थिति कां?

**कांति०**—वास्तविक पुसाल, तर माझ्यासारखा प्रामाणिक मनुष्य तुह्मांला दुसरा मिळणार नाहीं. झालें, आतां माझी अशी स्थिति कां ह्मणाल तर त्याचें कारण थोडकेंच आहे. माझें दुर्दैव! आमचा राजा बिचारा जसा अभागी तसा मीही अभागी झालों आहें!

**अति०**—(हंसून) वाः रे वाः! तुझा राजा जितका

अभागी आहे तितकाच जर तूं त्याची प्रजा असून अभागी, तर तूं मोठाच अभागी ह्मटलें पाहिजे !—बरें असूं दे. तुझें ह्मणणें काय आहे ?

**कांति०**—मला नोकरी पाहिजे.

**अति०**—तूं कोणाची नोकरी करशील ?

**कांति०**—आपण सांगाल तर आपली नोकरी करीन.

**अति०**—अरे, मलारे नोकरांला काय कमी ? बरें पण, तूं मी कोण आहें हें ओळखतोस ?

**कांति०**—नाहीं, महाराज! परंतु आपल्या मुखावरच कांहीं एक दिसतें आहे, तें पाहूनच आपणाला माझे धनी ह्मणावें अशी माझ्या माझ्या मनाची वृत्ति होते आहे !

**अति०**—ह्मणजे ? हें मोठेंच विचित्र ! कायरे गुलामा, माझ्या मुखावर रे तुला काय दिसतें आहे ?

**कांति०**—दुसरें तिसरें कांहीं नाहीं. अधिकाराचें तेज.

**अति०**—ठीक आहे. कांहीं चिंता नाहीं. पण तूं माझी कोणती नोकरी बजाविशील ?

**कांति०**—आपण सांगाल ती. प्रामाणिकपणानें राहून आपणास आपल्या हिताच्या मसलती सांगेन. कोठ चिट्ठीचपाटी घेऊन जावयाचें पडलें तर ती घेऊन जाईन, मग पायीं धांवायचें पडो, किंवा घोड्यावरून जायचें पडो. उगीच एकादी गोष्ट तिला तिखट मीठ लावून सांगणें मात्र माझ्या हातून होणार नाहीं. कोणचेंही काम सांगितलें तरी तें काळजीनें आणि ताबडतोब करीत जाईन, त्यांत कमी व्हायचें नाहीं.

**अति०**—कांहीं चिंता नाहीं. बरें पण तुझें वय किती आहे ?

**कांति०**—वय पुसाल तर मी फार तरणा नाहीं न् फार ह्मातारा नाहीं. एकाद्या तरुण स्त्रीनें चांगलें गायलें तर तेवढ्यानेंच तिजवर मन बसावयासारखा कांहीं मी तरणा नाहीं, किंवा तिचे गुण कसेही असोत तिच्याबद्दल लाळच घोंटीत बसावयाचें इतका कांहीं मी ह्मातारा नाहीं. माझ्या वयाला सुमारें चाळीस पंचेचाळीस वर्षें झालीं असतील.

**अति०**—ठीक आहे. तुझें बोलणें ऐकून निदान मनाला करमणूक होईलसें वाटतें, याकरितां तूं मजजवळच अस. आतां जेवायचें लौकरच होईल, त्यावेळीं यथेच्छ खा पी, तोंपर्यंत माझें आतां तुजवर मन बसलेलें कायम राहील तर मी तुला आपणाजवळ कायमचा बाळगीन.—चला. उशीर होत चालला. चला वाड्यांत शिरूं.(सर्वजण वाड्यांत शिरतात.) अरे, तिकडे कोण आहेरे चाकर ? अरे जेवायची तयारी झाली कारे ? (एका चाकराकडे पाहून ह्मणतो.) अरे, माझा खुषमस्कऱ्या आज कोठें दिसत नाहीं. जा त्याला बोलावून आण.

**चाकर**—जी. (निघून जातो.)

(अश्वसेन येतो.)

**अति०**—काय रे, माझी बया यावेळीं कुठें आहे? ए हरामखोरा !—

**अश्व०**—आपण महाराज !—(निघून जातो.)

**अति०**—अरे, या मूर्खाला वेडबिड तर नाहींना लागलें ? हा काय बरें ह्मणत होता ? (एका सरदारास) जा, त्या हरामखोराला इकडे घेऊन या. (सरदार जातो.) अरे, झालें कारे जेवण ? ए—अरे, सगळ्यांचच कान फुटले वाटतें ! अरे, माझा खुषमस्कऱ्यारे कुठं आहे ?—ए—

(सरदार परत येतो.)

**अति०**—अहो, हें काय ? तुह्मी एकटेचसे आलां ? तो हरामखोर कोठें आहे ?

**सरदार**—महाराज ! तो **शशिकला** बाईसाहेब आजारी आहेत ह्मणून ह्मणत होता.

**अति०**—मीं तुह्मांला तें नाहीं विचारिलें ! पण त्या हरामखोराला इकडे हांक मारिली असून तो कां बरें नाहीं आला ?

**सरदा०**—तें कांहीं असो. परंतु त्यानें माझ्या हातून निसटून जाऊन मला दांडगेपणींच उत्तर केलें कीं मी साफ येत नाहीं!

**अति०**—काय ? काय ? मी साफ येत नाहीं असें तो ह्मणाला काय ?

**सर०**—असें तर खरें. पण काय असेल तें असो, कदाचित् मी चुकत असेन, पण आपलें माझ्या बुद्धीला वाटतें कीं, अलीकडे कांहीं दिवस आपल्या पदवीला व मोठेजावीला योग्य असा आपला मान रहात नाहीं. नुसते चाकर लोकच आपला अपमान व आपली हेळसांड करितात एवढेंच नव्हे, तर प्रत्यक्ष **शशिकला**बाई व आपले जांवई-बोवा हे सुद्धां आपला मान ठेवावा त्याप्रमाणें ठेवीत नाहींत !

**अति०**—हं—हं—एकून तुह्मांला असें वाटतें ?

**सर०**—सरकार ! कदाचित् माझी चूक झाली असेल तर मला माफी असावी. प्रत्यक्ष मला जें दिसलें व वाटलें तें मी आपणास मोकळ्या मनानें कळविलें ! आपला असा अपमान झालेला पाहून उगेंच रहाणें या दासाचे हातून होईना !

**अति०**—तुह्मी वाजवी बोललां. तुह्मी ह्मणतां हाच प्रकार अलीकडे कांहीं दिवस मलाही अनुभवास आल्यासारखा वाटत आहे, परंतु मी त्याकडे तादृश लक्ष पुरविलें नाहीं. कारण फिरून फिरून माझ्या मनांत असा विचार येई कीं, वास्तविक या कामीं त्यां-च्या कांहीं अपराध नसून निरुद्योगितेमुळें मला लोकांचे नसतेच दोष दिसत अस-तील. परंतु आतां तुह्मींही ही गोष्ट बोलून दाखविली, आतां याची मी पुरती चौकशी करीन ! पण हा काय चमत्कार ? अलीकडे चार पांच दिवस माझा खुषमस्कऱ्या माझ्या फारसा नजरेस पडत नाहीं, याचें काय बरें बीज ?

**सर०**—सरकार ! काय असेल तें असो. **मृगां-कमाला** बाईसाहेब **सौराष्ट्रास** निघून गेल्या दिवसापासून तो जसा कांहीं झुरणीसच लागला आहे !

**अति०**—हां—आतां त्याबद्दल फिरून गोष्ट ह्मणून काढूं नका ! ही गोष्ट माझ्याही ध्यानांत आहे. बरें, आतां तुह्मी जा, आणि **शशिक-लेला** मला कांहीं तिच्याशीं बोलायचें आहे ह्मणून कळवा ! (सरदार जातो.) बरें, तूं रे ए— (दुसऱ्या चाकराकडे पाहून) माझ्या खुषमस्क-ऱ्याला इकडे घेऊन ये. (चाकर जातो. इत-क्यांत अश्वसेन फिरून येतो त्याजकडे पाहून) अहो अहो तुह्मी श्रीमंत ! अहो, जरा असे इकडे या पाहूं !—आपण मी कोण आहें ओळखतां ?

**अश्व०**—ओळखतों ह्मणजे ? मी आपणाला ओ-ळखूनच आहें !

**अति०**—असें काय ? तर बोला बोला पाहूं मी कोण आहें ?

**अश्व०**—आपण आमच्या बाईसाहेबांचे बाप आहां !

**अति०**—कसें कसें ? तुमच्या बाईसाहेबांचा बाप मी अं ? गुलामा ! मी तुझ्या धनीसाहे-

बांचा गुलामच असेन, नाहीं ? लुच्चा–गुलाम–पाजी–हरामखोर !

**अश्व०**–आपण कांहीं ह्मणा, मी यांतला मुळींच कांहीं नव्हे. आपण–

**अति०**–हरामखोरा ! आणखी माझ्याशीं रूबरू बोलतोस, लाज नाहीं वाटत ? (त्याच्या थोबाडींत देतो.)

**अश्व०**–तुह्मीं मला मारतां, पण विचार करा कीं ? मी हें असलें कध्धीं कध्धीं सोसून घ्यायचा नाहीं !

**कांति०**–आणखी अशी पाठीवर लाथ पण कधीं खाणार नाहीं, असेंचना ? (पाठीवर लाथ मारून खालीं पाडतो.)

**अति०**–(कांतिवर्म्यास) शाबास ! तूं माझी या वेळीं चाकरी बजाविली आहेस याकरितां तुझ्यावर मी प्रेम करीन !

**कांति०**–कांरे ए हरामखोर ! उठून चालता होतोस कीं नाहीं अगोदर ! हरामखोरा ! तुला कोणाशीं कसें वागावें हें शिकवितों ये! खबरदार ! इथें याउपर आतां एक क्षणभर रहा तर खरा, कीं पुन्हां कंबरेवर दुसरी लाथ बसलीच समज ! (अश्वसेनास बाहेर घालवून देतो.)

**अति०**–वाहवा! वाहवा! अरे, तुझें नांव गांव मला समजलें नाहीं, तथापि मी तुला आपल्याचाकरीस ठेवितों. हें घे तुला बक्षीस !

(कांतिवर्म्यास कांहीं बक्षीस देतो.)

(खुषमस्कऱ्या येतो.)

**खुष०**–अरे, ये, मींही तुला आपल्या चाकरीस ठेवितों ! ही घे माझी मूर्खाची टोपी तुला बक्षीस ! (ती कांतिवर्म्यास देऊं लागतो.)

**अति०**–क्योंजी रंगेल ! तुझें उजाडलें का एकदाचें ?

**खुष०**–हां जी ! माझें एकट्याचेंचसें काय, सगळ्यांचेंच उजाड झालें. ज्या वेळीं तूं आपलें सर्वस्व देऊन टाकून आपणाला उजाड करून घेतलेंस, त्याच वेळेस आह्मां सर्वांचेंही उजाड झालें.–(कांतिवर्म्यास) अरे, तूं पण माझा गडी, ही घेच माझी मूर्खाची टोपी कसा !

**कांति०**–ती कशाकरितां बरें ? मी का तुझ्यासारखा मूर्ख आहें ?

**खुष०**–तुला मूर्ख नाहीं ह्मणतो कोण ? ज्याला आतां गांवातलें एक कुतरें सुद्धां विचारीत नाहींसें झालें आहे, त्याचाच पक्ष ज्या वेळीं तूं उचललास, त्याच वेळीं तूं मूर्ख ठरलास. वारा वाहील तशी पाठ जर तुझ्यानें करवत नाहीं, तर तुला थोडक्याच वेळानें थंडींत कुडकुडत बसण्याची पाळी येईल. ह्मणून सांगतों, तूं आपला ही माझी मूर्खाची टोपी घे. (हांसून उपरोधानें) गृहस्था ! या वेडे पिरानें आपल्या दोन पोरींना हद्दपार केलें, आणि तिसरीवर मनांत नसतांही डोंगराएवढे उपकार करून ठेवले, ह्याकरितां आपला ह्मणतों ही मूर्खाची टोपी तुजजवळ असूं दे. कसें काय ? आमच्या वेड्यापिराचें काय ह्मणणें आहे ?–अरेरे ! मला जर दोन पोरी असत्या, आणि जवळ दोन मूर्खांच्या टोप्या असत्या, तर केवढी मौज झाली असती !

**अति०**–मौज ? ती रे कशी !

**खुष०**–अरे, मौज ह्मणजे ? उघडच आहे. माझ्याजवळ असतें नसतें सर्व मीं आपल्या मुलींना देऊन टाकून त्या दोन टोप्या तरी निदान शिलक ठेविल्या असत्या! क्योंबे वेडे पीर ! आतां तुह्मीं एक माझी टोपी तर घ्याच, आणि दुसरी नाहीं ह्मणून आपल्या

पोरींजवळ भीक मागायला जा.

**अति०**—आज तोंड फार सैल सोडिलें आहेस, पण संभाळ. हा चाबूक पाहिलास?

**खुष०**—आपल्या स्वारीचें ह्मणणें समजलें. आणा, येऊंद्या चाबूक. जो खरें कोणी बोलेल त्याच्या कपाळीं चाबुकाशिवाय दुसरें काय असणार? राजश्री! आपण तर आतां हातांत बांगड्या घातल्या आहेत, व हल्लीं अबला त्याच प्रबला होऊन बसल्या आहेत, तेव्हां हा सर्व प्रकार ठीकच आहे!

**अति०**-गुलामा! हें तुझें चऱ्हाट संपतें आहे कीं नाहीं?

**खुष०**-राजश्री! तुह्मी, आह्मी, आणखी आमचें हें चऱ्हाट, सगळीं बरोबरच संपतील. बरें पण ए-ए-वेडेपीर ए-तुला एक धेडगुजरी गाणें शिकवूं का?

**अति०**—हं, ऐकूं दे तर खरा अगोदर.

**खुष०**-ऐक बर! अगदीं नीट—नीट-लक्षपूर्वक ऐक समजलास?

**अति०**—अरे होय. फाजिलपणा पुरे कर. बोल तर खरा—अरे, कोणरे आहे तो?-मूक!—

**खुष०**-एक होता राजा—आपला अंमळ तुझ्यासारखाच अविचारी होता—आणखी तुझें देव भलें करो, एक होता कवि—समजलास? त्या कवीनें राजाला केला उपदेश.

**पद.**

अलबत् मनमे खलबत् करना, गलबत् डुबवा नहिं देना;
आपकी बाजू आपज रखिये. विस्वास् किस्पर् नहिं रखना. ध्रु०
हशो रे तारा पासे, उस्से ओछे वैसे बताना;
आवे जावे मनकूं ठावें,अख्खा कभ्भी नहिं बोलना;
लोगो आपकूं आपे, आपण तेकरतां कम्ती देना;
थोडा चलिये, घोडाउप्पर जादा सवार भी होना १
मनमें मालूम होगा इस्से जनमें जादा सिखाना;
पैज करोगे, बहोत् बडी पण पैज कभूं नहिं लगाना;
वैसी रीतें वो जगतीमां न गती करते वोहि जना—
कहत कबीराय् रायन्—होती यातना नाना. २

**अति०**—वाहवा वाहवा! ही भाषारे कोणती, आणि एवढा जाडा कवि त्याचें नांवरे काय?

**खुष०**—अरे, भाषा ह्मणून काय विचारतोस? ती बोलून चालून धेडगुजरी! आणखी या जाड्या कवीचें नांव पुसशील तर—पण—आपण नाहीं बोवा तें सांगणार!

**अति०**—तें कां बरें? त्याच्या नांवाची इतकी चोरीशी?

**खुष०**—नाहीं, चोरीच अशांतलें कांहीं नाहीं, पण—नकोच तें—छेः-!

**अति०**-कां सांगतोस कीं नाहीं बोल! कां—
(चाबूक उगारतो.)

**खुष०**—हां तेवढें मात्र तुमच्याकरितांच राखून ठेवा. तुह्मांला या जाड्याभरड्या कवीचें नांव पाहिजे होय! तें सांगितलें असतें, पण उगीच तुमच्या तोंडाला पाणी सुटेल!

**अति०**—कांहीं चिंता नाहीं. सुटूं दे पाणी सुटलें तर!

**खुष०**—ऐकाच तर. या जाड्याभरड्या कवीचें नांव **कडबुळ्या** कवि. याची कविता ह्मणजे अठरा धान्यांचें कडबुळें, आणि शब्दही हवे तसे आंत भरलेले, ह्मणून कविता जाडी भरडी, आणि कविही त्यामुळेंच जाडाभरडा! कां तुह्मांला जाड्या भरड्याचें कडबुळें पाहिजे का?

**अति०**—असल्या कडबुळ्यांत रे काय?

**खुष०**—काय आहे तें यांतच आहे ! आपलें आपणच गमावून बसलां, आतां मोठ मोठ्या पक्वान्नांची आशा सोडाच. तुमच्या कपाळीं आतां कडूबुळींच आहेत, तीं तरी पण सदोदित मिळालीं ह्मणजे तुमचें मोठेंच नशीब !

**अति०**—हें तुझें ह्मणणें मला कांहीं समजत नाहीं!

**खुष०**—समजेल. थोडा अवकाश आहे.

**अति०**—तूं खरोखरी कडूबोल्या मूर्ख आहेस!

**खुष०**—हो. बरें आठवलें ! राजश्री ! गोडबोल्या मूर्ख आणि कडूबोल्या मूर्ख यांतला भेद तुह्मांला शिकायला पाहिजे ?

**अति०**—जर आपण आमचे गुरु आह्मांस शिकवाल तर !

**खुष०**—काय ? आह्मीं तुमचें गुरूं काय ? राजश्री ! आपण माणसासरखे माणुस असून आपल्याच अक्कलेची नक्कल करून टाकिली, आतां आपणच गुरूं बनलां आहां!

**अति०**—बरें तें असो. पण तो भेद ?

**खुष०**—ऐका सांगतों.

**अभंग.**

आपुलें सर्वस्व आपुल्या जावयांस
जेणें द्यावयास सांगितलें, १
आणा त्याला येथें, उभे करा ऐसें,
जवळि त्या तैसें आपण रहा. २
कोण गोडबोल्या, कडूबोल्या कोण,
निर्णय आपण, होय याचा. ३
पहिला उपदेष्टा, दुसरे आपण,
निश्चय हा पण कवि बोले.

**अति०**—काय रे काय ह्मणतोस ? मी मूर्ख काय रे ?

**खुष०**—होय महाराज ! माफ करा ! मूर्ख ही एक पदवी आहे. आपणाला दुसऱ्या पदव्या होत्या पण आपण त्या देऊन बसलां, आतां उपजत पदवी तेवढी मात्र राहिली आहे !

**कांति०**—महाराज ! हा मनुष्य अगदींच मूर्खशिरोमणि दिसत नाहीं !

**खुष०**—नाहींच. पण त्याचें कारण कोठें तुला ठाऊक आहे ! माझ्या मनांतून मी मूर्खशिरोमणिच असावें, परंतु हे आमचे राजे व इतर सरदार हे कोठें मला तसें होऊं देतात ! त्यांची आपली मजवर तान आहेच! बरें पण ए—अहो वेडेपीर ! तुह्मीं आह्मीं गडी, होय ना ?

**अति०**—होय.

**खुष०**—पण मी तुमचा गडी, कीं तुह्मीं माझे गडी ?

**अति०**—दोहींतलें कांहीं तरी एक.

**खुष०**—तसें नव्हे, आतां तुमच्या पदरीं गडी चाकरमाणसें रहायची गोष्ट तुह्मीं हळू हळू विसरा ! बरें असो. तुह्मीं आह्मीं गडी न् तुह्मीं माझे गडी, तर मला एक कोंबडीचें अंडें द्या पाहूं, ह्मणजे मी तुह्मांला दोन मुगुट करून देतों.

**अति०**—ते कसे रे ?

**खुष०**—कसे ह्मणजे असे. अंडें मधोमध फोडीन, आंतला गिर जाईन खाऊन, ह्मणजे दोन कवचें रहातील ते दोन मुगट! गृहस्था ! ज्या वेळेस तू आपला मुगुट काढून तो दोघांस अर्धा अर्धा देऊन टाकिलास, तेव्हांच तुझ्या अकलेची परीक्षा झाली. तुझा सोन्याचा मुगुट गेला, आणि आतां या अंड्याचे मुगुट जसे वरून गुळगुळीत, तसें तुझें हें टक्कल पडलेलें गुळगुळीत डोकेंच तुला मुगुटाच्या ठिकाणीं झालें आहे ! गृहस्था ! टक्कल पडलें ह्मणजे अक्कल जाते ह्मणतात

त्याचा मला पुरता अनुभव आला. मी ह्मणतों याबद्दल जर मला कोणी मूर्ख ह्मणेल तर त्याला अगोदर चाबकाचाच मार मिळाला पाहिजे. कारण आतां सगळेच येथून तेथपर्यंत मूर्ख बनले आहेत. गड्या ! ऐकिलेंस ? एक होता शूर कवि, त्यानें ह्मटलें आहे:—

पद.*

शहॉनें आनिक मूरख व्हूत पूरवीं द्रानें (जी जी)
शब्दांचा ठ्ठाणण्यांचा मार त्यां दोनें (जी जी जी)
आतां त्येचं कारन न्हाई न्हाईलं पनें (जी जी)
समद्यांची पन् योक आतां लागुली दावेंन.
(जी जी जी)

अति०—वाः रे व: ! आज तुला कविता फारशा सुचूं लागल्या ! या कविता सगळ्या बहुधा तुझ्या या डोक्यांतूनच निघालेल्या असाव्यात !

खुष०—असतील ! कशाला ? आहेत ! तथापि खरें पुसशील तर मी असल्या कविता करायला लागून दिवस झाले थोडेच. जेव्हां तूं आपला बापपणा टाकून देऊन आपल्या मुलींनाच आईपणा दिलास तेव्हांपासून या कवितांचा आरंभ ! तूं हा आईपणा दिलास त्या वेळची गंमत तुला सांगतों ऐक. राजा झाला दिवाणा, अकलेवांचून शहाणा, पाहून अशी तुझी दशा, मानवल्या त्या कर्कशा. हर्षे नाचूं लागल्या, टिंग्या बडवितां भागल्या. मात्र आह्मां लोकांचा, झाला आरंभ शोकाचा.—बरें पण राजेसाहेब ! माझ्या मनांत खोटें बोलायला शिकायचें आहे, याकरितां मला एक पंतोजी ठेवून द्या.

अति०—खबरदार गुलामा ! खोटें बोलशील तर चाबकाखालीं मार खाशील !

खुष०—मार खाशील ! ह्मणजे ब्वा खाशी. !आपण व आपल्या पोरी यांची अवलादच कांहीं विलक्षण ! आपल्या पोरींच्या समोरी, खरें बोलण्याची चोरी. आपल्या समोर लटका, पाठीवर लाख फटका. खरं बोला खोटं बोला, इकडुन् तिकडुन दिलाच टोला. तोंड बांधून ठेविलं ह्मणा, तरी घेऊनियां वाहणा, आमच्या गालांवरती हणा, कां तर मार खाणारा शाहणा.—बोवा ! असला शहाणा तुलाच लखलाभ होवो, असला शहाणा होण्यापेक्षां मी मूर्ख, गाढव, बैल काय पाहिजे तें होईन, परंतु एक—**अतिपीड**-राजासारखा खुळा मात्र नाहीं होणार! स्वारी! आपण आपल्या अकलेचे दोन तुकडे करून दोहींकडे फेंकले न् मधें कांहीं राहूं दिलें नाहीं. आतां हा पाहिलाका अकलेचा एका अंगचा तुकडा आला ! हा अक्कलकाढा* खरा !

(शशिकला येते.)

अति०—बये, आलीसका एकदाची ! ये अशी ! अग, पण हें काय ? तुझी मुद्रा अशी कशाकरितां ? मला वाटतें तूं आलीकडे बरीच रागांतच असतेस ! फणकाऱ्यांतच असतेस जशी !

खुष०—मी ह्मणत होतों तें हेंच ! हिच्या रागावण्याची किंवा फणकाऱ्याची परवा करावयाची नाहीं, अशी जेव्हां तुझी स्थिति होती, तेव्हां सर्व ठीक होतें ! पण आतां बरीक तुझी पुरी फजिती ! गृहस्था ! या वेळीं तुझ्या पेक्षां मी तरी बरा, कारण मी

---

* हें पद ह्मणतांना ज्याच्या डोकीवर ˘ अशी खूण आहे तें लघु अक्षर, व ज्याच्या डोकीवर – अशी खूण आहे तीं गुरु अक्षरें समजावीं.

* वनस्पति विशेष, पक्षीं अक्कल काढणारा, दुसऱ्यास मूर्ख करणारा.

परपिंडोपजीवी मूर्ख तरी आहे, तूं तो देखील धड नाहींस! ( शशिकलेकडे पाहून ) तुह्मीं बोलायलाच नको! तुह्मीं मी गप्प रहावें ह्मणून मला खुणेनें दाबलें तें समजलें! आतां मी आपल तोंडच टाकतों बांधून! ( ओंठ आवळून ) ऊम्—ऊम्—खाशी! खाशी! ( गात गात)

पद.

तेल गेलें, तूप गेलें, धुपाटणं हातीं राहिलें!
तेंही जायची वेळ आली, मागं पुढं नाहीं पाहिलें!
बाबा जैसें कर्म केलें, तैसें आजी फळ आलें.
ज्याचें त्यानें अहित केलें, यांत कोणाचें काय गेलें?

( राजाकडे बोट दाखवून ) **शशिकला** बाईसाहेब! ही घ्या तुमची शेंग, हिच्यांत दाणा मात्र राहिला नाहीं, नुसतें फोलपट मात्र उरलें आहे! घ्या घ्या!

**शशि०**—कां मेल्या! फार बडबडशी लाविली आहेस! आतां आणखी मजपुढें तोंड करून बोल तर खरा कीं मेल्या! तुझ्या जिभेला डागच देवविते!—( बापाकडे वळून ) हें पाहिलेंत का, हा तुमचा खुषमस्कऱ्या—याच्या तोंडावर नक्षत्रच पडलें आहे जसें. हा मेला काय पाहिजेल तसलें अभद्र बडबडतो कीं तें या कानांनीं कांहीं ऐकवत नाहीं! याला बडबड पुरे कर ह्मणावं तर तुह्मींच त्याला असली बडबड करण्याकरितांच आपल्या पदरीं ठेविलें आहे. हा—तसेच तुमच्या बरोबरचे हे दुसरे लोक—मेले सगळे पण एकसारखे उंडे पोळच माजले आहेत जसे, त्यांचीं क्षणोक्षणीं कांहींना कांहीं तरी धिंगामस्ती आणि भांडणं आहेतच! दिवसा रात्रीं जेव्हां पहावें तेव्हां यांचा आरडा ओरडा आणि गलबला चाललेला ऐकतांना माझे तर बाई कान किटले- या दांडग्यांचा हा दंगा मी येथें आल्या दिवसापासून पहातें आहे, व आज बोलेन उद्यां बोलेन ह्मणून आजपर्यंत वाट पण पाहिली. मला मेलें वाटत होतें कीं ही गोष्ट तुह्मांला कळविली ह्मणजे तुह्मीं हिचा बंदोबस्त कराल! पण आलीकडे पहातें तो तुमचेंच चिन्ह मला कांहीं निराळेंच दिसूं लागलें आहे. तुह्मांलाच या मेल्यांची दांडगाई मनापासून आवडते, आणखी तुह्मींच त्यांना ती करायला उत्तेजनही देतां, असें आलीकडे मला वाटूं लागलें आहे. याकरितां तुह्मांलाच एकवार सांगतें तुह्मीं याचा लौकर बंदोबस्त करा, नाहीं तर फार जड जाईल!

**खुष०**—ओहो! खाशी! खाशी! भले गब्रू! खाशी! सर्पिणीला लहानपणापासून दूध पाजून वाढविलें, त्याचा हा परिणाम झाला! नीटच!

**अति०**—( आश्चर्यानें ) काय काय? ही कोण माझीच कन्या बोलते आहे काय?

**शशि०**—बाबा! तुह्मांला जर आपलें सर्व यथास्थित व्हायला पाहिजे असलें, तर तुह्मीं हे ह्मातारपणचे सगळे ढंग टाकून दऊन मी सांगेन त्याप्रमाणें नीट वागत जा. त्यांतच तुमचें कल्याण आहे!

**खुष०**—हीहीहीही—बहोत—बहोत खाशी! आजपर्यंत घोडा गाडीला ओढीत असे, पण आतां गाडीच घोड्याला ओढूं लागली! चकूचक्! टूफूरुइ! टूफूरुइ!—

**अति०**—( अधिक आश्चर्यानें ) अरे! येथें कोणी मला ओळखणारे आहेत काय? हा बोलतो आहे तो **अतिपीड** राजाच आहे? हा कोण **अतिपीड** राजाच चालतो आहे काय?

जर ह्याला **अतिपींड** ह्मणावें तर याचे डोळे कोठें आहेत ? खचित खचित, ही कांहीं तरी भ्रांति असेल, किंवा निद्रेमुळें त्याचीं इंद्रियें थंड गार पडत असतील!— अरे! हा काय चमत्कार! मी जागा होतोंसें वाटतें! छेः—पण हें कांहीं भलतेंच आहे! अरे येथें कोणी मी कोण आहें हें सांगूं शकेल?

**खुष०**—तूं **अतिपींड** राजाची सावली आहेस!

**अति०**—हां तराच! नाहीं तर मी जर खराच **अतिपींड** राजा असून माझी बुद्धि व ज्ञान हीं त्याजप्रमाणेंच असतीं तर माझ्या पोटीं असल्या कारट्या उपजल्या हें मला कधीं खरें वाटलें नसतें.

**खुष०**—कांहीं असो. असल्याच कारट्या पण तुझ्या हातांत करट्या देतील! याकरितां तूं त्यांच्याच बेतानें चालशील तो बरा!

**शशि०**—कांरे मेल्या! तुझी बडबड संपत नाहीं कां अजून?

**अति०**—अहो! तुह्मीं बाईसाहेब! अहो! तुह्मीं कोणी मोठ्या रूपवती भाग्यवती आहां असें वाटतें! तर तुमचें नांव एकवार कळूं द्या पाहूं!

**शशि०**—झालें? मी एवढा वेळ ह्मणत होतें तें हेंच. तुमची साठी भरत आली तशी तुमची अक्कल जात चालली ह्मणून मीं ह्मटलें तें कांहीं खोटें नाहीं! तुह्मीं आलीकडे असेच कायसे वेड्यासारखे बडबडतां! बाबा! तुह्मीं एक वेळ माझें ह्मणणें नीट ऐकून घ्या! तुह्मीं आतां झालां आहां ह्यातारे, सर्वांनीं तुह्मांला मान दिला पाहिजे. याकरितां तुह्मीं असे वेडे चाळे करून परिणाम लागायचा नाहीं! हे तुमच्या बरोबरचे सरदार, मानकरी—शंभरचे शंभर—उगीच मेली खोगीरभरती पाहिजे कशाला? बरें, ते तरी चांगले, शांत, सुधे असावे, तेंही नाहीं! नेहमी मेले अचावचा बडबडतात, तऱ्हेतऱ्हेचीं वेडीं वाकडीं गाणीं गातात, आणि आपल्याबरोबर माझ्या पण चाकरांना बिघडवितात! हे मेले लड्ढे घरांत असले ह्मणजे या आमच्या वाड्याला राजवाड्याची पण मेली एवढी तरी कळा असते का? मेलें जिकडे पहावें तिकडे एकसारखी कचकाचन् जसा काय उघडा बाजारच वाटतो! या बाजारांत एकसारखें रहायचें याची माझी मला देखील लाज वाटूं लागली आहे, याकरितां आजपर्यंत झाली गोष्ट ती झाली, पण ती यापुढें झाली तर कांहीं मला खपायची नाहीं! तुह्मीं बऱ्या बोलानें यांतल्या कांहीं लोकांना रजा देऊन टाका, नाहीं तर मीच आपण होऊन त्यांना देईन घरांतून घालवून! बरें, लोक जवळ ठेवाल ते देखील तुमच्यासारखे ह्मातारे न् तुमची आणि आपली योग्यता ओळखून असतील असेच असले पाहिजेत!

**अति०**—(संतापानें) आः काय करूं रे!—अरे! कोण आहे रे तिकडे? आतांच्या आतां घोड्यांवर खोगीर ठेवा! आतां जेवण नाहीं कीं खाण नाहीं मी असाच निघून चालता होणार!—कारटे! हा मी चाललों, याउपर मी ह्मणून तुला त्रास द्यायला रहात नाहीं! तूं एक अशी दुष्ट निघालीस तरी माझी **चंद्रानना** कांहीं तुजसारखा माझा छळ करायची नाहीं! कारटे! खचित, तूं माझ्या पोटची नाहींस!—

**शशि०**—तुह्मीं पाहिजे तितके बडबडलां तरी त्याची कांहीं मला लाज नाहीं! मी तुम-

च्या पोटची नसलें तर त्याची तुझांलाच लाज ! पण तें असो. तुझीं माझ्या चाकरमाणसांना मारतां, तुमच्या बरोबरचा हा बाजार त्यांचा कांहींच मान ठेवीत नाहीं, हें बाई मला कांहीं खपायचें नाहीं !

(खलदर्शन आत येतो.)

**अति०**—हाय हाय ! आतां पश्चाताप होऊन फळ काय? असो. नशीब!—(खलदर्शनरावास) यावें, राजेसाहेब ! आपण आलेत काय ? बोला ! तुमचेंही असेंच ह्मणणें आहे किंवा कसें ? कां—बोलत कां नाहींत!—अरे ! कोण आहेरे ? घोडे करा तयार ! काढा बाहेर !—हायहाय ! कोण हा कृतघ्नपणा! आणि तो तरी प्रत्यक्ष या पोटच्या कारटीचा! हाय हाय ! धिक्कार असो !

**खल०**—महाराज ! आपण अंमळ शांत व्हावें कसें !

**अति०**—आः दुष्टे ! नष्टे ! तूं भ्रष्ट आहेस ! तूं खोटें बोलतेस ! माझे लोक तेवढे एकून एक सत्वस्थ, गुणी आणि प्रामाणिक आहेत! त्यांच्या हातून तूं ह्मणतेस अशी गोष्ट कधीं होणार नाहीं ! ते माझ्या नांवाला कदापि कलंक येऊं देणार नाहींत माझी पक्की खातरी आहे ! अरेरे ! देवा ! हा कोण दुष्टपणा! यापुढें माझ्या **मृगांकमाले**चा दोष किती अल्प होता! हायहाय! धिक्कार असो! धिक्कार असो! एवढयाशा अल्प अपराधाबद्दल मीं तिजवर केवढा कोप केला ! मी आपला सर्व मायापाश तोडून तिचा किती तरी द्वेष करूं लागलों ! हायहाय ! हा—**अतिपींड** ! **अतिपींड** !—काय करूं रे ? माझें नशीबच खोटें! त्या वेळीं माझी अक्कल सर्व कोठें गेली होती? (कपाळावर हात जोरानें आपटून घेतो. )अरेरे! हा मी चाललों ! चला, सेवकहो, तुह्मींही चला !

**खल०**—महाराज ! तुझांला इतकें वाईट वाटण्याचें कारण मला कळलें नाहीं! महाराज! मी निरपराधी आहें !

**अति०**—असाल !—हायहाय ! हे भूमि माते ! तूं तरी माझें ह्मणणें ऐक ! हे भगवंता **सूर्यनारायणा** ! तूंही माझें ह्मणणें ऐक ! हे देवाधिदेवा **चतुरानना**! या दुष्ट कारटीच्या पोटीं संतति व्हायचें जरकरितां तूं हिच्या कपाळीं लिहिलें असशील, तर तें पुसून टाक ! हिला संतति ह्मणून होऊं देऊं नको! हिला अशीच वांझ मरूं दे ! हिचीं संततिपोषणाचीं इंद्रियें सर्व शोषून टाकून त्यांची आंतल्या आंत राख रांगोळी करून टाक ! ह्मणजे तरी या दुष्टेच्या जिवास पोराचें सुख लागणार नाहीं !—तसें जर न होईल, आणि हिला पोरें होणारच, तर निदान तीं सदा किरकिर करणारीं, डोकींत राख घालून घेणारीं, व मायेफिरू अशीं कर ! कीं त्यांच्यापासून या दुष्टेला क्षणभरही सुख प्राप्त होऊं नये ! ही कारटी तरुण आहे तिला आतांच्या आतां थेरडी जख्ख करून टाक व अंगावर चोंहीकडे सुरकुत्या पडूं दे ! या दुष्टेच्या नेत्रांतून अखंड जलधारा वाहूं दे, आणि हिजकडे किंवा हिच्या पोरांकडे कोणीं पाहिलें, तर त्यांची कींव न येतां सर्वजण हिची फजिती व उपहास करितील असें कर ! इतक्या सगळ्या गोष्टी कशाकरितां ह्मणशील तर, प्रत्यक्ष पोटचा गोळाच जर कृतघ्नपणानें वर्तन करूं लागला, तर त्याचें दुःख प्रत्यक्ष सर्पदंशाच्या वेदनांपेक्षांही अनंत पटीनीं अधिक असतें

हें हिला पूर्णपणें कळून आलें पाहिजे !– चल दुष्टे ! मी इतःपर तुझें तोंडसुद्धां पहायेचा नाहीं!–(संतापानें निघून चालता होतो.)

**खल०**–प्राणप्रिये ! हा काय प्रकार आहे याचा मला कांहींच उमज पडत नाहीं ! हें आहे तरी काय ?

**शशि०**–आपण या कामीं आपल्या जिवाला उगीच दुखवून घेऊं नका ! त्या थेरड्याचा स्वभावच आहे असा, याकरितां त्याला शिक्षा ही झालीच पाहिजे !

( अतिपीड परत येतो. )

**अति०**–काय काय ? एका सपाट्याबरोबर एकदम पन्नास लोक कमी ? आणि तेंही एका पंधरवड्याच्या आंत ?

**खल०**–महाराज! काय झालें आहे तरी काय ?

**अति०**–सांगतों ऐका ! (शशिकलेकडे पाहून) दुष्टे ! नीचे ! मी एवढा धारिष्टाचा पुरुषासारखा पुरुष असून माझ्याही अंतःकरणास क्षोभ उत्पन्न करणारें तुझें हें वर्तन पाहून मला अत्यंत लाज वाटते आहे; तसेंच माझ्या नेत्रांतून हें उष्ण अश्रुजळ यावेळीं निघत आहे, तें निघावयास कारणही तूंच झाली आहेस, यामुळें माझ्या जिवास अनिवार संताप उत्पन्न झाला आहे !–दुष्टे ! परमेश्वर तुझें कधीं कधीं बरें करणार नाहीं ! हा माझा शाप तुझ्याठायीं ह्रद्रोग उत्पन्न करून तुझ्या जिवास कधीं कधीं समाधान वाटू देणार नाहीं! हाय हाय ! माझ्या या वृद्धपणीं मला अशी स्थिति भोगावी लागावी काय ?–हे मूर्ख नेत्रांनो ! याउपर तुह्मीं या गोष्टीचें स्मरण होऊन अश्रु तर ढाळा, कीं तुह्मांला फोडून टाकून तुह्मांतील अश्रुजळानें धरणी मातेस सचैल स्नान घातलेंच समजा!–अरेरे! एकून हा अतिपीड राजा आज खरोखरीच अति-पीड झाला काय ?–असो. काय चिंता आहे ? एवढ्यानेंच कांहीं झालें नाहीं ! ही एक कारटी अशी निर्दय दुष्ट निघाली, तरी अद्यापि माझी दुसरी बया आहे, तिची मात्र मजवर खरी खरी ममता आहे, व ती मला कदापि त्रास देणार नाहीं याविषयीं माझी खात्री आहे !–आः दुष्टे ! माझ्या चंद्राननेला तुझें हें अमानुष क्रूर वर्तन समजेल तर ती आपल्या नखाग्रांनीं तुझें हें राक्षसी तोंड विदारून टाकण्यास कदापि चुकावयाची नाहीं ! आः निर्लज्जे ! क्रूरे! तुला वाटत असेल कीं हा ह्मातारा कांहीं तरी बडबडतो आहे, याच्या हातून आपलें कांहीं वांकडें होणार नाहीं ! परंतु याचा अनुभव तुला लौकरच आल्यावांचून कदापि रहावयाचा नाहीं!–आः–दुष्टे!

( कांतिवर्मा व सेवक यांसहवर्तमान निघून जातो. )

**शशि०**–कां पाहिलेंना या थेरड्याचें हें वर्तन ?

**खल०**–प्रिये ! तुजवर माझें अत्यंत प्रेम आहे, तरी पण–

**शशि०**–आपणाला यांतलें कांहीं समजत नाहीं! आपण स्वस्थ असावें !–कोण आहे रे तिकडे? **अश्वसेन** !–( खुषमस्कऱ्याकडे पाहून ) हरामखोरा ! या सगळ्या अनर्थाचें मूळ तूंच आहेस ! तर चल हो आपल्या थेरड्या धन्यामागून चालता !

**खुष०**–

**पद.**

वेड्या पिरा, वेड्या पिरा, वाट माझी पहा जरा, ध्रु०
अशी कपटी तुझी पोर, महाघातकी दुष्ट चोर,
आहे मोठी हरामखोर, जाणों राक्षसीच थोर १.
इच्या गळ्याभोंवती दोरी, बांधुनियां मोठ्या जोरीं,

आपुलीया रे समोरी, फांशीं द्यावी अगोदरी.२

( निघून जातो. )

**शशि०**—या ह्यातार्‍याला कांहीं मी वाईट गोष्ट सांगत नव्हतें! याला आपल्याजवळ इतके शेंभर सरदार मानकरी तें कशाला पाहिजेत? हे मेले दांडगे आपल्या या राजवाड्यांत तरवारी उसपलेले सदा तयार रहाणार, अंमळ कोठें खसबस झाली, कीं मेलें एवढं-सें कुठें भांडण झालें, कीं यांच्या तरवारी आपल्या उसपलेल्या! तर अशांना घरांत ठेवून घेऊन परिणाम लागावा कसा? ने-हमीं मेली यांची दहशतच बाळगायची कीं नाहीं?—अरे—कोण तो? **अश्वसेन**!

**खल०**—तूं ह्मणतेस तें मी समजलों, परंतु तूं वाजवीहून उगीच अधिक भितेस असें मला वाटतें!

**शशि०**—पण तितकें तरी काय ह्मणून भ्यावें? हा घोर मेला नेहमीं जिवाला लागून रहायचा, तो मुळींच नाहींसा केलेला काय वाईट? तेव्हां मीं केलें तें सगळें नीटच केलें! मला ह्या थेरड्याचा असला स्वभाव पहिल्यापासूनच ठाऊक होता, ह्मणून याब-द्दल मी आपल्या बहिणीला पत्रही लिहिलें आहे. आतां पहातें ती या थेरड्याला नू त्याच्या बरोबरच्या या बाजाराला आपल्या जवळ कशी टिकूं देते ती! (इतक्यांत अ-श्वसेन येतो.) कायरे, मीं आपल्या महालांत ताईला पत्र लिहून ठेविलें होतें तें तुला मिळालें का?

**अश्व०**—जी बाईसाहेब!

**शशि०**—ठीक आहे. चल आतां बरोबर कोणी तरी सोबतीला घेऊन घोड्यावर बसू-न चालता हो! मला कशाबद्दल इतकें भय वाटतें आहे, तें ताईला नीट समजावून सांग, आणि ती कांहीं संशयबिंशय काढील, तर ते दूर होण्यासारखें तुला वाटेल तें सांगायला कमी करूं नको! हं चल चल—परत मात्र लौकर येहो!

**अश्व०**—येतों सरकार! (सलाम करून जाऊं लागतो.)

**खल०**—अरे! थांब जरा जाऊं नको!

**शशि०**—हा असला ढिलेपणा उपयोगीं नाहीं!—जारे तूं आपला चालताहो कसा!—(अश्वसेन जातो.) हें पाहिलें का? हा तुमचा ढिले-पणा आणि मऊपणा या ठिकाणीं काय बरें कामाचा? तुह्मांला यापासून कांहीं पुरुषार्थ वाटत असेल, पण तो चांगला नाहीं! मी कांहीं त्याला वाईट ह्मणतें असें नाहीं, पण त्याबद्दल लोक तुह्मांला भोळे **सांब** मात्र ह्मणतात!

**खल०**—तुझी या कामीं काय समजूत असेल ती असो. परंतु करायला जावें बऱ्याकरितां आणि व्हावें काहीं तरी भलतेंच, असें मात्र न होवो ह्मणजे झालें!

**शशि०**—तुह्मांला त्याबद्दल काळजी कां?—

**खल०**—बरें बरें, काय होईल तें पडेलच दृष्टीस!

(पडदा पडतो.)

## प्र० ६. स्थल—राजवाड्यांतील दुसरा दिवाणखाना.

(अतिपीड, कांतिवर्मा आणि खुषमस्कऱ्या येतात.)

**अति०**—अरे, तूं हीं पत्रें घेऊन पुढें **चंडवर्म्या**-ला नेऊन दे. तसेंच हें माझी बया **चंद्रा-नना** हिला पत्र दे, आणखी ती तें वाचून तुला जेवढें कांहीं विचारील, तेवढ्याचाच तिला जबाब दे. अधिक मजकूर तिला

बिलकुल कळवूं नको! पहा, हें काम कसें अगदीं तातडतोबीनें झालें पाहिजे. नाहीं तर मी अगोदर पुढें जाऊन पोंहचेन आणि मागून तूं येशील. असें मात्र होतां कामा नये.

**कांति०**—सरकार! आपलें हें काम अगोदर करीन तेंव्हांच कशीतरी झोंप घेईन! तोंपर्यंत या डोळ्यांना झोंप ह्मणजे काय हें समजणार सुद्धां नाहीं!

(पत्रें घेऊन निघून जातो.)

**खुष०**—काय रे गड्या, देवानें एक मोठा शहाणपणा केला कीं त्यानें माणसांची अक्कल त्यांच्या टांचेंत ठेविली नाहीं. तशी जर ठेविली असती, तर ती चालतां चालतां एकादेवेळीं झिजून नाहींशी देखील व्हायची! होय, असेंचना!

**अति०**—होय, असें खरें!

**खुष०**—असें आहे, तर मग कांहीं चिंता नाहीं. गड्या, आतां तूं हवा तितका हिंड, तुझी अक्कल कांहीं जायची नाहीं!

**अति०**—(भ्रांतिवट मुद्रा करून हंसतो.)

**खुष०**—गड्या! तुझ्या एका मुलीचा तर तुला अनुभव आलाच, आतां दुसऱ्या मुलीचा चांगलाच अनुभव येईल! हा **सूर्य** आणि हा **जयद्रथ** व्हायला फार अवकाश नको.

**अति०**—छेः, तूं कांहीं तरी भलतेंच बोलतोस! माझी **चंद्रानना** असें कधीं करायची नाहीं!

**खुष०**—ती तसें न करो, व तुझ्या तोंडांत साखर पडो ह्मणजे झालें. ती तुझी **चंद्रानना**, आणि ही तुझी **शशिकला** नव्हती का? त्या बिचाऱ्या **मृगांकमालेचें** मात्र तुझ्यावर प्रेम नाहींसें तुला वाटलें, व तुजवर खरें प्रेम काय तें या दोघींचें अशी तुझी समजूत झाली; तिचा अर्धा उलगडा तर झालाच, आतां. अर्धा काय तो व्हायचा राहिला आहे!—बरें पण ए—ए—गड्या! माणसाचें हें नाक—हें चेहऱ्याच्या मधोमध कां असतें तुला ठाऊक आहे?

**अति०**—अंहं:—

**खुष०**—नाहीं तर मी सांगतों कां तें. नाकाच्या दोन्ही बाजूंला एक एक डोळा रहायला पाहिजे ह्मणून नाक दोहींच्या मधें! तूं ह्मणशील असें कशाला, तर त्याचें कारण मिळून इतकेंच कीं, जी गोष्ट नुसत्या वासानेंच कळण्याजोगी नसते, ती प्रत्यक्ष डोळ्यांनीं चांगली नीटपणें पहातां यावी!

**अति०**—हरहर! मीं मोठी वाईट गोष्ट केली! त्या—

**खुष०**—गड्या! समुद्रांतले शिंपींतले किडे शिंपा कशा करितात, तुला ठाऊक आहे का?

**अति०**—नाहीं बोवा.

**खुष०**—मलाही पण ठाऊक नाहीं, पण गोगलगाईला घर कशासाठीं लागतें तेवढें वरीक मला ठाऊक आहे.

**अति०**—तें काय रे?

**खुष०**—अरे, उघडच आहे, तिला ह्मणून डोकें खुपसायला जागा ही पाहिजेच. ती जर सारेंच आपल्या मुलींना देऊन बसली, तर तिच्या शिंगांची कशी व्यवस्था व्हावी?

**अति०**—गड्या! तुझें ह्मणणें अक्षरशः खरें आहे. आजपासून मी आपला पूर्वींचा स्वभाव विसरून जाणार हेंच खचित!—हरहर! या दुष्ट कारटीवर माझें केवढें प्रेम? आणि त्याची सरते शेवटीं अशी दशा? धिक्कार असो! अरे—माझे घोडे तयार झाले कारे?—

**खुष०**—होतील, इतक्यांत होतील. त्यांना तयार करायला तुझीं गाढवें पुढं गेलींच आहेत. याचें कारण काय समजलास का ? आकाशांतले सप्तर्षि हे सातच आहेत हैं.

**अति०**—ह्मणजे आठ नाहींत असेंचना ?

**खुष०**—वाहवा वाहवा ! आतां बरीक तूं माझ्यासारखाच विसंगत बोलूं लागलास !

**अति०**—काय ? विसंगत ?—एकून ही दुष्ट कारटीं मला वेड लावणार काय ?—आः दुष्टे! कृतघ्न! तुला मिळालेलें राज्य तुला कसें पचतें तें पहातों ! आः—

**खुष०**—गड्या ! तूं जर माझा खुषमस्कऱ्या असतास, तर तूं इतक्यांतच ज्ञातारा झालास एवढ्याबद्दल तुला अगोदर जेरबंदांनीं पण खूप बडविलें असतें.

**अति०**—तें रे कशासाठीं ?

**खुष०**—अरे भल्या माणसा ! माणसानें अगोदर शहाणें व्हावें, आणि मग ज्ञातारें व्हावें एवढ्यासाठीं. त्याप्रमाणें तूं झाला नाहास ह्मणून तुला मार!

**अति०**—देवा ! देवा ! दया कर ! मला वेड लागूं देऊं नको ! मला आहे असाच राहूं दे! (इतक्यांत एक चाकर येतो त्यास पाहून) अरे कायरे, घोडे तयार झाले कारे ?

**चाक०**—व्हय सरकार !

**अति०**—गड्या, चल निघ! (सर्व निघून जातात.)

---

## अंक २.

### प्र० १. उदासदुर्गांतील मरुत्सेनाच्या खोलीसमोरील जागा.

(मरुत्सेन व एक सरदार समोरासमोर बाहेर पडतात.)

**मरु०**—ओहो ! विकर्णरावजी ! कसें काय ? आज कोणीकडे स्वारी !

**विक०**—नाहीं, सहज आपल्या तीर्थरूपांना निरोप सांगायचा होता ह्मणून आलों होतों. आज रात्रींच्या रात्रींच आपले नवीन राजे **सुदर्शन**राव हे आपल्या नवोढा वधूसह वर्तमान आपल्या येथें येणार आहेत.

**मरु०**—हें कसें काय बरें प्रकरण ?

**विक०**—तें आपल्याला बोवा कांहीं माहित नाहीं. बरें पण, खालीं बाहेर गांवांत कांहीं नवीन बातमी पिकत चालली आहे ती तुह्मीं ऐकिली असेलच. ती खरीच असेल असें खातरीनें सांगतां येत नाहीं, परंतु निदान अफवा तरी निघाली आहे खचित !

**मरु०**—तुह्मीं ह्मणतां यांतलें मला एक अक्षरसुद्धां माहित नाहीं. मी आज तीन दिवस अंमळ अजारीच होतों, यामुळें किल्ल्याच्या खालीं कसा तो मुळींच उतरलों नाहीं.

**विक०**—हं— **खलदर्शनराव** व **सुदर्शनराव**—या उभयतां मांडलिकांमध्यें—हं आतां मांडलिक कसचे ह्मणा, आतां हे राजेच झाले आहेत—पण त्यांमध्यें लढाई होणार ह्मणून खबर एकून तुह्मीं ऐकिलीच नाहीं ह्मणतां?

**मरु०**—मुळींच नाहीं.

**विक०**—असो. ऐकाल हळू हळू ! बरें! मी येतों, रामराम!

(निघून जातो.)

**मरु०**—**सुदर्शन**राजा आजच्या आज रात्रीं येथें येणार काय ? ठीक आहे !—नुसतें ठीक एवढेंच नव्हे, सर्वोत्कृष्ट आहे ! या स्वारीचें येणं माझ्या आपोआप पथ्यावरच पडतें आहे. **मधुकर**रावाला आज चार दिवस झाले, मींच लपवून ठेविलें आहे, आणखी बाबांनीं तर त्याला पकडण्याकरितां रखवालदार व शिपाई चोंहीकडे पाठविले आहेत ! येथपर्यंत सर्व ठकिच झालें, परंतु

आतां मात्र जरा नाजुक काम करायची वेळ आली आहे ! त्याप्रमाणें वागलें हें पाहिजेच ! असल्या झटपट उद्योगांशिवाय कोणाला संपत्ति मिळाली आहे ? झालें तर. (आसपासचा कानोसा घेऊन) येथें या वेळीं दुसरें कोणी दिसत नाहीं हें सध्यांबरेंच आहे! (खोलीच्या दाराजवळ जाऊन हलक्या स्वरानें) भाऊ ! भाऊ ! दादा ! शू—खालीं इकडे ये अगोदर पाहू. (मधुकरराव येतो त्यास हलक्याच स्वरानें) दादा ! बाबा तेथें बसले आहेत पाळतीवर दडून, याकरितां यावेळीं तूं या इकडच्या वाटेनें येथून अजीबात पळून जाशील तो बरा. तूं अमुक ठिकाणीं दडून बसला आहेस हीसुद्धां बातमी त्यांना कोणीं दुष्टानें कळविलीसें दिसतें ! ही वेळ तुला पळून जायला मोटी सोईची पडेल. याकरितां तूं आतांच्या आतां पळून जा कसा! तूं कांहीं कोणापाशीं **सुदर्शन**रावाविरुद्ध बोलला होतास ? आठवण कर. **सुदर्शन** राजा स्वतः आतांच्या आतां रात्रीं आपल्या नवीन वधूसहवर्तमान आपल्या येथें येणार आहे ! ह्मणून तुला विचारितों कीं, नीट आठवणकर, कदाचित् चुकून एकादे वेळीं तुझ्या तोंडांतून त्याच्या विषयीं वाईट साईट शब्द निघाले असतील.

**मधु०**—छेः एक अक्षरसुद्धां नाहीं.

**मरु०**—नसेल. बरं पण हो—बाबांचीं पावलें ऐकूं येतात ! याकारितां यावेळीं माफ कर. लोकव्यवहाराकारितां तरी निदान मला आपलें शस्त्र तुजवर उचललें पाहिजे. यासाठीं तूं आपलें शस्त्र उसप आणि आपला बचाव करीत आहेस असें दाखीव! अस्सें! आतां मी मोठ्यानें ओरडतां बर कां ?—दुष्टा! मुकाट्यानें शरण ये, चल तुला बाबाकडे नेतों, तूं काय समजला आहेस ? अरे तिकडे कोण आहे रे ? मशा ी इकडे आणा रे ! मशाली ! (हलक्या स्वरानें) दादा ! हीं पळून जायला संधि बरी आहे, तर पळून जा कसा—(फिरून मोठ्यानें) अरे, कोण रे ए ! मशाली आणा !—(फिरून हलूच) हं जाच. (मधुकरराव निघून जातो.) या वेळीं माझ्या अंगावर जर कोठें रक्त निघालेलं दिसेल तर मी या बैलोबाला पकडायला पुष्कळ झटपटलों असें खचित सगळ्यांना वाटेल! (आपल्या दंडावर जखम करून घेतो.) ठीक आहे. वास्तविक झटलं ह्मणजे यांत कांहीं मोठेंसें नाहीं. मी पुष्कळ दारू पिणारे बहादर असे पाहिले आहेत कीं ते केवळ गमती गमतींतच यापेक्षांही मोठ मोठ्या जखमा आपल्या अंगावर करून घेतात.—बाबा! अहो बाबा! अरे ! थांबवा थांबवा त्याला ! पकडा अरे पकडा अरे, कोणीच जवळ नाहींत कायरे ए— (खूप मोठ्यानें ओरडतो.)

(चंद्रवर्मा व हातांत मशाली घेऊन चाकर येतात.)

**चंड०**—कायरे **मरुत्सेना** ! तो दुष्ट आहे कोठें?

**मरु०**—बाबा ! तो या ठिकाणीं असा अंधारांत तरवार उपसून उभा होता, आणखी त्याच्या कृतीवरून तो खचित तुमच्या येण्याचीच वाट पहात होता.

**चंड०**—पण तो आहे कोठें ?

**मरु०**—बाबा ! हें पहा माझ्या हातांतून रक्त वहांत आहे !

**चंड०**—सारें खरें, पण, **मरुत्सेना** ! तो दुष्ट कोठें आहे बोल पाहूं ?

**मरु०**—बाबा ! तो दुष्ट असा या वाटेनें गेला ! त्यानें आपल्याकडून—

झाली. बरीच लांब गेली तरी **जरठकर्णाची** गांठ नाहीं तेव्हां आतां जावें तरी कोणीकडे अशा बुचकळ्यांत ती पडली असतां कांहींचें सुचेनासें होऊन सरते शेवटीं तिनें आपल्या निजावयाचे खोलींत जाण्याचा विचार केला. त्याप्रमाणें ती अंधारांतूनच आपल्या खोलीपर्यंत गेली, आणि आतां दार उघडून आंत शिरणार इतक्यांत कोणी पुरुषानें आपला हात धरल्याचा तिला भास झाला. त्याबरोबर भीतीमुळें तोंडांतून किंकाळी बाहेर पडणार परंतु ती मोठ्या संकटानें दाबून ती त्या पुरुषाच्या हातून सुटण्याविषयीं झटपट करूं लागली. इतक्यांत "भिऊं नको! तो मी आहें!" असें **जरठकर्ण** जतीनें तिच्या कानांत सांगितलें.

"धन्य धन्य! **अर्हत्** प्रभु धन्य आहे!" ती आनंदानें ह्मणाली. "**भदंत**जी! एकून तुह्मीं खुशाल आहांना? बरें पण, तुह्मीं त्या खोलींतून इकडे कोणीकडे आलां?"

**जरठकर्ण** उत्तर करितोः—"मी होय? मघां **हयदक्षा**नें तुझ्या खोलीच्या बाजूला कोठेंशी चोरवाट आहे ह्मणून सांगितलें होतें, तिचा शोध करायला ह्मणून इकडे आलों. पण अखेर तिचा पत्ता लागला नाहीं तो नाहींच! बरें, पण, **हयदक्ष** आपणाकडे कसा बरें नाहीं आला?"

"त्याला त्या दुष्टांनीं कैद केलें आहे!"

"हाय हाय! तर मग एकून सर्वच मसलत फसली! काय ग **त्रिवेणी**! पण—पण—तुला ती चोरवाट नाहीं का ठा—ठाऊक?" **जरठकर्णा**नें घाबरून विचारिलें.

ती उत्तर करिते—"नाहीं बाबा! ती वाट आहे हें देखील मला तुमच्या बरोबरच आज समजलें! बरें पण तुह्मीं माझ्या खोलींत चला कसे! तींत येण्याची त्या दुष्टांची छाती नाहीं व्हायची!"

जती निराश होऊन बोलतोः—"तें काय असेल तें माझ्यानें नाहीं सांगवणार! पण हे धर्मघाती दुष्ट आपल्या **अर्हत्**प्रभूच्या मूर्तिसुद्धां फोडायला कमी नाहीं करीत, त्यांना तूं ह्मणतेस इतका विचार असेलसें मला नाहीं वाटत!"

इतक्यांत समोर लांब बाजूला एकदम दार फोडून पाडल्याचा आवाज ऐकूं येऊन लागलाच त्याबरोबर दिव्यांचा प्रकाशही दिसूं लागला, तो पाहून **त्रिवेणी** घाई घाईनें त्यास बोललीः—"हां—ते दुष्ट आले पहा. तुह्मीं इथून अगोदर आंत चला कसे!"

तीं दोघें जण आंत शिरून त्यांनीं आपले मागें दाराला आंतून कडी लावून कुलूपही लावून घेतलें. इकडे खोलीच्या बाहेरल्या अंधारांतील वाटेंत कोतवाल आपल्या शिपायांसहवर्तमान पेटविलेल्या मशालींनिशीं येऊन त्यानें ओळीनेंच एकेक खोलीचा झाडा घेण्यास आरंभ केला. वाड्यांत कोणच्या ठिकाणीं काय आहे ह्याची माहिती अगोदर त्याला कोणीं सांगितली असो, किंवा **जैनां**च्या घरांचे झाडे घेण्याचे त्यास वारंवार प्रसंग येत यामुळें त्यास अशा ठिकाणच्या सर्व मक्ख्या चांगल्या माहित असतील यामुळें असो, तो प्रत्येक खोलींत जाऊन अगदीं नेमकी करावयाची त्या ठिकाणींच चौकशी करीत होता. एका खोलीच्या भिंतींत त्याला एक लांकडी चोरजिना सांपडला तो त्यानें आपल्या शिपायांकडून फोडून पाडविला. दुसऱ्या एका खोलींत चांदीनें मढविलेला एक मोठा कोनाडा होता त्यांत चांदीच्याच सिंहासनावर **अर्हता**ची नग्नमूर्ति ध्यानस्थ असून

तिच्या आसपास ठिकठिकाणीं पूजेचें साहित्य ठेवलें होतें, त्या सगळ्याची नासधूस करून टाकून ती मूर्ति व तो पाट हीं त्यानें आपणासमक्ष फोडविलीं, व काय जी चांदी त्या घाईच्या वेळांत हातीं पडली ती त्यानें त्यांतीलच एका शिपायाच्या स्वाधीन केली. याप्रमाणें प्रत्येक खोलींत कांहींना कांहीं तरी दंगा करीत व नासधूस करीत त्यानें **त्रिवेणी**च्या खोलीपर्यंत सर्व खोल्यांचा झाडा घेतला. अखेर **त्रिवेणी**च्या खोलीपाशीं येऊन तिचें दार ठोठावूं लागला, तों आंतून कडी असल्याचें त्यास समजून तें तो मोठ्या मोठ्यानेंच खडखडावूं लागला.

"बाहेर कोण आहे तें ?" **त्रिवेणी** आंतून विचारिते.

"मी सरकारी अंमलदार आहें. सरकारी कामाकरितां आलों आहें. हं—दार उघड !" कोतवाल बाहेरून उत्तर देतो.

"ही माझी निजायची खोली आहे. हिचें दार मी कांहीं उघडायची नाहीं !"

कोतवाल बाहेरून दरडावून बोलतो:—ही तुझी निजायची खोली असो कीं कशाची असो, मी तें कांहीं समजत नाहीं ! पोरी ! कां उघडते आहेस कीं नाहीं बऱ्या बोलानें दार, कां दार फोडून टाकूं बोल !"

"मेल्या ! तुझा सत्यानास होवो ! मेल्या ! तूं इतका मस्तवाल होऊन पोरी ह्मणून कुणालारे हाक मारितोस ? मेल्या ! मी **भद्रमणि अर्धशालां**ची कन्या आहें हें तुला ठाऊक नाहीं वाटतें !"

ह्या तिच्या रागाच्या भाषणाकडे लक्ष न देतां कोतवाल दरडावूनच उत्तर करितो:—"बस बस ! तोंड आटप! मला सगळें माहित आहे. पण उघडतेस कीं नाहीं दार ? मी राजेसाहेबांच्याच हुकुमानें येथें आलों आहें. तुझ्या बापाला पकडून नेण्याविषयींचा सरकारी हुकूम मजपाशीं आहे. परंतु **भद्रमणि** घरीं नाहीं यामुळें माझा नाइलाज झाला आहे, नाहीं तर तो आणि तुझ्या खोलींत दडून बसल्याचा मला संशय वाटतो आहे तो जती अशा दोघांच्याही एकदमच मुसक्या बांधून त्यांना रात्रींची तुरुंगाची हवा कशी काय असते ती दाखविली असती ! हं—पहा—मी—राजकार्याकरितां येथें आलों असतां तूं मला अडथळा करिते आहेस याचा तुला जबाब द्यावा लागेल, यासाठीं एकदम दार उघड कशी !"

कोतवाल इतकें बोलला परंतु आंतून हूं कीं चूं कांहीं जबाब आला नाहीं, तेव्हां चवताळून त्यानें एकदम आपल्या शिपायांस दरवाजा फोडण्यास हुकूम केला. शिपायांनींही दार ताबडतोब फोडलें, आणि ते सर्वजण आंत जाऊन पहातात तों तेथें कोणी नाहीं. तेव्हां कोतवालानें आपल्या हातांत मशाल घेऊन इकडे तिकडे शोधण्यास आरंभ केला, शोधितां शोधितां त्यास **त्रिवेणी**च्या पलंगावरच्या सरपोसावर भिंतीच्या अंगाला लहान मोठीं धुळीचीं पावलें उमटलेलीं दृष्टीस पडून त्यानें त्या ठिकाणीं दार असावें ह्मणून तर्क केला, व शिपायांकडून पलंग एका अंगास काढवून पहातां पहातां त्यास एक ठेंगणेंसें व सहज कोणाच्याही दृष्टीस न पडण्याजोगें असें चिंचोळें दार सांपडलें. तें त्यानें ठोठावून पहातां आंतून कडी लावून घेतल्याचें त्यास समजून त्यानें तें स्वतःच फोडिलें, व आंत शिरून भिंतीच्याच बाजूनें एक अरुंद वाट होती त्या वाटेनें दहावीस पावलें गेला. तों पुनरपि दुसरें एक दार लागलें. त्या दाराला-

ही बाहेरून कडी लावून घेतली होती. कोतवाल तेंही दार फोडून आंत शिरला, आणि पहातो तों ती एक मध्यमशी खोली असून तिला खिडक्या वगैरे कांहीं नव्हत्या, व वरून पाटणीच्या ठिकाणीं एक भोंक राखिलें असून त्यांतून चंद्रप्रकाशाचा मोठा झोंत आंत आला होता. कोतवाल तेथें येऊन सभोंवती इकडे तिकडे पहातो तों त्यास पाहिजे होता तोच गृहस्थ त्याच्या आयताच दृष्टीस पडला. त्याबरोबर अत्यानंदाच्या मोठ्यानें टाळ्या पिटून तो ओरडून बोलला:—"कसें कायरे **जरठकर्ण्या** ! तूं जैनांचा जती आणि राजद्रोही आहेस याकारितां आतां तुला बांधतों पहा गुलामा !" असें ह्मणून त्यानें मोठ्यानें आपल्या लोकांस आंत या ह्मणून हाक मारिली.

इकडे कोतवाल आंत आलेला पाहून व त्या खोलींतून पळून जाण्यास दुसरा मार्ग नाहीं हें जाणून, **त्रिवेणीनें** निराश होऊन **जरठकर्णाला** बळकट धरिलें, व कोतवालास "तुह्मीं कृपा करून ह्यांना पकडूं नका" ह्मणून ह्मटलें. परंतु **जरठकर्ण** शांत वृत्ति धारण करून ते लोक धरावयास येत असतां त्यांस कोणत्याही प्रकारें अडथळा न करितां मोराचें पीस आपल्या हातांत घेऊन त्याजकडे एकसारखा ध्यानस्थ मुद्रेनें पाहूं लागला.

"हं—पोरी ! तूं ह्याला सोडतेस कीं ना. हीं!" असें बोलून एकदम **जरठकर्णाची** गचांडी धरून कोतवाल त्याला पुढें लोटूं लागला व **त्रिवेणीस** उद्देशून बोलला:—"पोरी ! तूं आपणाला धन्य समज! मी याला एकट्यालाच कैद करून नेतों आहें, नाहीं तर याच्याबरोबर तुलाही कैद करून नेलें असतें !"

**त्रिवेणी** काकुळतीस येऊन बोलूं लागली:—कोतवाल ! कोतवाल ! तुमच्या पायां पडतें, हीं मला कैद करून न्या, परंतु यांना सोडा ! वढी तुह्मीं मजवर दया कराच !"

जती शांत परंतु दुःखी मुद्रेनें तिच्याकडे पाहून ह्मणतो:—"**त्रिवेणी**! तूं असा विनाकारण आक्रोश करूं नको ! हे लोक पाषाणहृदयी, यांच्यापुढें तुझा आक्रोश व्यर्थ आहे! या दुष्टांना दया कशी ती माहित नाहीं !"

कोतवाल मोठ्यानें हांसून जतीस उपरोधपूर्वक बोलतो:—"कां **जरठकर्णजी** ! आतां असें काय ? एवढा वेळ तुह्मांला येथली हवा बरी वाटली, आतां चला कांहीं वेळ तुरुंगांतली हवा तर पहा, ह्मणजे कांहीं वेळानें त्या **रत्नाकर** जतीला आज सकाळीं जें उंचस्थान मिळालें होतें, तें तुह्मांलाही मिळेल ! स्वारी ! चला लौकर ! आतां सुळावरील पोळी ह्मणतात ती मी तुह्मांला दाखवितों !"

"धांवा ! धांवा !" **त्रिवेणी** मोठ्या मोठ्यानें किंकाळ्या ठोकूं लागली.

कोतवाल हंसत हंसत बोलतो:—"पोरी ! आतां किती जरी कंठशोष केलास तरी तो व्यर्थ ! घरांतल्या एकूनएक चाकरांस कैद करून ठेविलें आहे ! आतां खाशी मदत येईल!"

कोतवालाच्या तोंडून हे शब्द बाहेर पडले मात्र, इतक्यात बाजूची भिंत दुभंग झाल्यासारखी होऊन एक दार उघडलें, व त्यांतून शिलादित्य, त्याच्या मागून **वसुभद्राचार्य**, व त्याच्या मागून आणखी कोणी एक जण, असे तीन पुरुष त्वरेनें बाहेर पडले, व त्या सर्वांनीं आपलीं शस्त्रें कोतवालावर उसपलीं.

## प्रकरण ५.

मागील प्रकरणांत सांगितलेले लोक अकस्मात् एकाएकीं बाहेर पडलेले पाहून कोतवाल

व त्याच्या बरोबरचे शिपाई एकदम भीतीनें दबून गेल्यासारखे झाले; व कोतवालानें **जरठकर्णा**ची गचांडी धरली होती, परंतु अशी स्थिति झाल्यामुळें कोतवालाचे हात अगदीं लुले पडल्यासारखेच झाले. या स्थितींतून ते लोक सावध होताहेत नाहींत, इतक्यांत **वसुभद्राचार्यानें त्रिवेणीस** उचलून आल्या वाटेनें निसटून जाऊन **जरठकर्णा**सही आपल्या मागून चला म्हणून म्हटलें. त्याप्रमाणें **जरठकर्ण** जाण्याच्या तयारींत होता, इतक्यांत कोतवालाच्या एका शिपायानें **जरठकर्णा**चें धोतर धरून त्याला जोरानें मागें ओढलें. परंतु इतक्यांत **शिलादित्यानें** त्वरा करून त्या शिपायाच्या हातून त्याला सोडविलें, आणि शिपायास खालीं पाडून व जती आणि दुसरा शिपाई यांच्यामध्यें आपण उभा राहून **जरठकर्णास** पळून जाण्यास वाट व सवड करून दिली. **जरठकर्णा**नें त्याप्रमाणें केल्यावर **शिलादित्य** आपल्या दोन्ही हातांत दोन लांब नागव्या तरवारी घेतलेला असा त्या दाराच्या तोंडाशीं नेटानें उभा राहिला, व शत्रु कांहीं गडबड करूं लागतील तर त्यांस तेथल्या तेथेंच लोळविण्याच्या तयारीनें तो जती वगैरेंस मोठ्यानें ओरडून बोलला:—" पळा पळा ! खोळंबाल तर प्राणांस मुकाल, याकरितां चला पुढें चालते व्हा कसे! तुह्मीं मजकरितां वाट बिलकुल पाहूं नका ! मी याच्यापेक्षां अधिक भयंकर अशा हजारों प्रसंगांत सांपडलों असतां कधीं डगलों नाहीं, याकरितां तुह्मीं माझी नका काळजी करूं ! अरे, फिरून सांगतांना चला चला ह्मणून ! तुह्मीं येथून अगदीं पार अशा बिनधोक ठिकाणीं जाऊन पोंचेपर्यंत मी येथेंच उभा राहून या दुष्टांना एक बोटभरही पुढें सरकूं देत नाहीं, काळजी करूं नका ! पळा पळा ! "

हा झालेला प्रकार पाहून इकडे कोतवालाची निराशा होऊन त्याच्या पायांची आग मस्तकापर्यंत गेली व तो मोठ्यानें ओरडून हातपाय आपटीतच आपल्या अनुयायांस ह्मणाला:—" अरे, पहातां काय चला आतांच्या आतां त्या चोरट्यांच्या मागें लागा! वाटेंत हा राजापराधी बेरड तुह्मांस त्रास देऊं लागेल तर त्याला तेथल्या तेथेंच कापून टाका ! त्याला दया बिलकुल दाखवूं नका ! हां—चला चला !— "

कोतवाल इतक्या मोठ्यानें ओरडला, परंतु **शिलादित्याचा** तो आवेश व ती क्रोधाविष्ट मुद्रा हीं पाहून ते शिपाई अगदीं गर्भगळित होऊन गेले. शिवाय त्यांच्यापाशीं हत्यारें होतीं तीं असावीं तितकीं लांब नव्हतीं यामुळें ते **शिलादित्याच्या** अंगावर धांवून जावयास भिऊं लागले, व यामुळें ते कोतवालाचा हुकूम एका अंगास ठेवून जागच्या जागींच उभे राहिले.

" कांरे गुलामांनो ! असे भागुबाईसारखे स्तब्ध राहतां तुह्मांला लाज नाहीं वाटत ! चला ह्मणतोंना ! गुलामांनो! या बेरडाला तुह्मीं जिवंत सोडूं नका ! पहातां काय याला येथल्या येथेंच लोळवा ! " कोतवाल शिपायांस बोलतो.

**शिलादित्य** हांसून बोलतो:—" अरे जारे, काय छाती लागली आहे या लंडींची कीं एक पाऊल तरी पुढें येतील ! "

" काय गुलामांनो ! तुह्मीं माझा हुकूम ऐकत नाहीं ? " कोतवाल रागानें लाल होऊन बोलतो:—" दुष्टांनो ! आपण ज्याच्या शोधाकरितां येथें आलों, तो मनुष्य आपल्या हातांत सांपडला असतां तुमच्याच भित्रेपणामुळें तो माझ्या हातून निसटून जाणार काय ? गुलामांनो!

मी सांगतों याप्रमाणें आतांच्या आतां तुह्मीं त्या चोरट्यांच्या मागोमाग जा, नाहीं तर पहा दिवाण साहेबांपुढें तुह्मां सगळ्यांना नेऊन तुह्मांला जबरदस्त दंड भोगावयास लावीन कदापि सोडणार नाहीं ! तुह्मींच दुष्टांनीं **जरठकर्ण** जतीस पळून जाण्याचे कामीं मदत केली असें सांगून तुमची पण ऐशी दशा करून टाकीन कीं कधीं देखिली होती कीं नव्हती!–काय गुलामांनो ! तुह्मीं इतके जण असून या एकट्याला असे भागुबाईसारखे भितां ?"

त्या शिपायांपैकीं एकजण शिपाई सर्वांच्या पुढें उभा होता तो गयावया तोंड करून उत्तर करितोः– "पण कोतवालसाहेब ! आमच्या हातीं हे धाकटे जंबिये आहेत, त्यांचें याच्या या लांब तरवारींपुढें कांहीं चालणार नाहीं !"

**शिलादित्य** बोलतोः–" नाहींच चालणार! आणि हें तुमचं ह्मणणें खरें करून दाखविण्याचें तुह्मीं मला भाग न पाडाल तर त्यांतच तुमचें कल्याण आहे !" इतकें बोलून तो आवेशानें कोतवालाकडे डोळे वटारून पाहूं लागला, व त्या वेळची त्याची ती भयंकर मुद्रा पाहून एवढा कोतवाल, पण त्याच्यानें वर मान करून तिजकडे फिरून पहावेना. तो दबल्या-सारखा होऊन खालीं पाहूं लागला असतां **शिलादित्य** त्यास उद्देशून ह्मणालाः–" कोत-वाल ! तुह्मीं सर्वजण येथून मुकाट्यानें निघून जावें हेंच मला बरें दिसतें, कारण तुह्मीं माझें ह्मणणें न ऐकून जर कांहीं कमजास्ती कराल तर फुकट प्राणांस मात्र मुकाल ! तुमचा प्राण घेणें मला आवडत नाहीं, तथापि तो घेण्याचें तुह्मीं मला भाग पाडाल, तर त्या दुर्दैवी **अंमे**चा प्राण घेतल्याबद्दलचें हें तुह्मांला प्रायश्चित घड-लें असेंच मी समजेन !"

**शिलादित्याचे** हे शब्द ऐकून कोतवाल दचकल्यासारखा होऊन एकदम वर पाहूं लागून आश्चर्यानें बोललाः–"काय? तरीच! मीं तुला ओळखिलें असें मला मघांच वाटलें! एकून खोटीं नाटीं भविष्यें सांगणाऱ्या त्या थेरडीला आज सकाळीं पाण्यांतून बाहेर काढणारा **महाराष्ट्री** शिपाई तो तूंच काय ? असें !"

**शिलादित्य** उत्तर करितोः–" तें असो. पण मी इतके श्रम घेतल्यासारखी ती बिचारी जगली नाहीं ! ती अखेर कण्हत कण्हत मरा-यची ती मेलीच !"

कोतवाल त्याचा उपहास केल्यासारख्या शब्दानें बोलतोः–" हो हो ! तें सगळें मला ठाऊक आहे ! मी इकडे यावयाचे पूर्वीं तिच्या गुहेंत गेलों असतां ती माझ्या दृष्टीस पडली. व मीं तुरुंगांतील कैदी पुरावयाच्या त्या **मनचरु** गांवाबाहेरच्या मसणवटींत तिला भिठाशिवायच पुरून टाकण्याचा हुकूमही केला!"

हें ऐकून **शिलादित्याची** मुद्रा एकदम उग्र दिसूं लागली, व तो बोललाः–" काय करूं ? या वेळीं तुझा मीं येथल्या येथेंच अंत केला असता, परंतु काय असेल तें असो, तुला आतांच मार-ण्याविषयीं माझी मनदेवता कांहीं मला सांगत नाहीं. नाहीं तर रावसाहेब! आपल्या स्वारीलाही त्या **अंमे**च्या शेजारींच गाडून टाकिलें असतें!"

" अरे जा रे ! पहातोंच तर मग तूं मला कसा गाडतोस तो." इतकें बोलून त्यानें जव-ळच्या एका शिपायाच्या हातचा जंबिया हिस-कावून घेतला व **शिलादित्याच्या** पोटांत भोसकण्याच्या इराद्यानें पुढें सरसावून तो मो-ठ्यानें ओरडून बोललाः–"दुष्टा! आपलीं शस्त्रें खालीं टाकून शरण ये, नाहीं तर हा पहा मेलास !"

**शिलादित्यानें** आपली तरवार त्याच्या समोर धरून उत्तर केलें:—"खबरदार ! ये तर पुढें खरा, कीं तुझा पोटाळाच यावेळीं बाहेर काढितों !"

**शिलादित्याचे** हे शब्द न जुमानतां कोतवाल पुढें सरसावूंच लागला. इतक्यांत सर्वांत पुढें असलेल्या शिपायानें कोतवालाच्या अंगरख्याचा पदर धरून त्यास मागें ओढिलें आणि ह्मणाला:—"कोतवाल साहेब ! तुह्मीं माझें ऐकाच आणि आपला प्राण उगीच धोक्यांत नका घालूं ! हा दुष्ट यावेळीं खरोखरच बेरडासारखा दिसतो आहे, व हा आपला प्राण खचित घेईल याची मला मोठी भीति वाटते आहे !"

इतक्यांत दुसरा शिपाई मध्येंच बोलला:—"थांबा हीं पावलें ऐकूं येत आहेत, यावरून आपले बाकीचे लोक सगळे इकडे आले खचित !"

"असें काय ? तर आतां हा मी चाललोंच." असें बोलून **शिलादित्य** त्वरेनें त्या दाराआड जाऊन दार बंद झालें, व ती भिंत पूर्ववत् दिसूं लागली.

कोतवाल चवताळल्यासारखा होऊन ह्मणतो:—"अरेरे ! ह्या दुष्टानें सरतेशेवटीं सर्वच घोटाळा करून टाकिला ! असो. काय चिंता आहे ? याला पकडल्याशिवाय हा बहादर कधीं रहावयाचा नाहीं ! अरे पहातां काय ? पाडा भिंतन् काय !"

कोतवालाचा हुकूम झाल्याबरोबर ते सर्व शिपाई धांवून त्यांनीं त्या दाराच्या ठिकाणीं लाथ मारिली, तों ती जागा दगडाची किंवा मातीविटांची नसून लांकडाचीच आहे असें त्यांच्या लक्षांत आलें, तसेंच भिंतीला लाथ मारिली असतां गुदमरल्यासारखा आंतून आवाज निघाला, त्यावरून ती लांकडी भिंत बऱ्याच जाडीची आहे असेंही त्यांस समजलें. त्या शिपायांनीं लाथांवर लाथा मारण्याचा व आपले जंबिये लांकडांत भोसकण्याचा पण सपाटा चालविला, तथापि त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. पुढें कांहीं वेळानें दुसरे शिपाई लोक आंत आले त्यांच्यापाशीं घरें फोडण्याचीं हत्यारें, वाकस, किकरें वगैरे होतीं तीं आल्यावर मात्र तें दार त्यांनीं त्वरेनें फोडिलें. तें झाल्याबरोबर कोतवालानें आपल्या बरोबरच्या सर्व शिपाई लोकांस आपणामागून येण्यास सांगून तो त्या वाटेनें आंत घुसला. ती वाट चिंचोळी असून कोतवाल व त्याचे लोक हे आंत बरेच लांब गेल्यावर घराचें छप्पर इतकें उतरतें लागूं लागलें कीं त्यांवर दोन तीन असामींचीं डोकींही हापटून त्यांस टेंगळेंही आलीं. हें पाहून ते सर्व लोक ओणवे होऊन पुढें चालूं लागले. या रीतीनें जातां जातां आडव्या तिडव्या वाटेनें ते बरेच पांच पन्नास पावलें लांब गेले, तों त्यांच्या समोर एक खूप भक्कम जाडें दगडी दार कांहीं गूढ कृतीच्या योगानें वरून खालीं उतरून पडलेलें दृष्टीस पडलें. तथापि या दाराला कडी कोयंड्यांचा कांहीं मागमूसही दिसत नव्हता, व तें वरून उतरलेलें दार खालच्या चौकटींत इतकें नेमकें येऊन बसलें होतें कीं, त्या दोहोंच्यामध्यें एका केंसाइतकीसुद्धां फट कीं चिर दिसत नव्हती. या दाराकडे कोतवालानें क्षण दोन क्षणपर्यंत लक्षपूर्वक रेखून पाहून त्याची खातरी झाली कीं, त्याला त्याच्या जागेवरून हालविण्याचा कितीही उद्योग केला तरी तो व्यर्थ जाणार आहे. यामुळें आपल्या मनांतच चरफडूं लागून सरते शेवटीं

त्यानें आपल्या लोकांस परत चला ह्मणून हुकूम केला.

तो ह्मणालाः—"हे चोरटे ज्या वाटेनें पळून गेले त्या वाटेच्या धोरणावरून पहातां ती बागेंतून गेली असावी असें वाटतें, व कदाचित् ती खंदकाच्या पलीकडल्या बाजूसही जाऊन उमटेल! याकरितां जर त्वरा केली तर आपण अद्यापि यांना पकडूं शकूं असें मला वाटतें!"

आतां आपण कोतवाल व त्याचे शिपाई यांस तूर्त येथेंच सोडून **शिलादित्याच्या** मागून जाऊं. **शिलादित्य** हा नुकतेंच सांगितलेल्या दगडी दाराच्या जागेपलीकडे जाऊन पोंचल्यावर त्यानें आसपास एक लोखंडाची कडी होती ती चांचपून शोधून काढिली, व ती आपणाकडे खालीं ओढल्याबरोबर तें दार एवढें मोठें परंतु लागलीच आपल्या मूळच्या जाग्यावर येऊन पडलें. त्यानंतर अंधारांतूनच तो मोठ्या खबरदारीनें चांपचीत चांपचीत पुढें चालला. जातां जातां त्याच्या पायांला शिडीचें वरचें टोंक लागलें. तेव्हां तो त्या शिडीनेंच हळू हळू बेतानें खालीं उतरला. तेथील जमिनींत पाणी नेहमी मुरत असल्याकारणानें ती अगदीं दलदलित झाली असून तेथली हवा अगदीं दमट झाली होती. **शिलादित्य** खालीं उतरून गेल्यावर त्यानें कदाचित् शत्रूचे लोक मागें लागून येतील तर त्यांस खालीं उतरून येतां येऊं नये या उद्देशानें ती शिडी काढून घेतली. नंतर पुढें सुमारें दीडशें पावणे दोनशें हातपर्यंत चालून गेल्यावर त्याच्या पायांला एक उभासा दगडी जिना लागला. त्या जिन्याच्या वरल्या अंगास छपरांत कांहीं बारकीं बारकीं भोंकें राखलीं असून त्यांतून थोडेसे चंद्रकिरण आंत आल्याकारणानें जिन्यावर किंचित् अस्पष्ट असा उजेड पडला होता. असो. तो जिना वर चढून आल्यावर एक उघडेंच भुईसपाट चापाचें दार होतें त्यांतून **शिलादित्य** खंदकाच्या पश्चिमेच्या अंगच्या एका लहानशा घरांतील एका खोलींत बाहेर पडला. त्या ठिकाणीं येऊन पहातो तों तेथें **जरठकर्ण** वगैरे सगळीं माणसें बसलीं होतीं. त्यांना पाहून मोठ्या अचंब्यांत व बुचकळ्यांत पडल्यासारखा होऊन तो त्यांस निंदायुक्त वाणीनें बोललाः—"अरे, हें काय? तुह्मीं अजूनही येथेंच राहिलां आहां हें कसें? तुह्मांला येथून निसटून लांब दुसरीकडे कोठें जातां यावें, एवढ्याकरितां मी शत्रूंच्या दाढेंत स्वतः शिरून राहिलों होतों, तो एवढ्याचकरितां वाटतें?"

**वसुभद्राचार्य** उत्तर करितोः—"या वेळीं **त्रिवेणी** भीतीमुळें अगदीं गळून गेली आहे. तिच्यानें एक पाऊलही पुढें जाववत नाहीं. आणि तशांतून मी **जरठकर्ण**जींस पुष्कळ सांगून पाहिलें कीं तुह्मीं इला सोडून जा, कांहीं चिंता नाहीं, परंतु ते कांहीं माझें ह्मणणें ऐकत नाहींत!"

जती बोलतोः—"तुह्मीं कांहीं ह्मणा, परंतु माझें कांहीं होवो, त्याची मी फिकीर करणार नाहीं. माझ्या नशिबाळाच अखेरपर्यंत हाल लिहून राहिले आहेत, तेव्हां त्यांतच माझा केव्हां तरी अंत होईल. परंतु **भद्रमणीनें** माझ्या स्वाधीन करून ठेवलेल्या या वत्से **त्रिवेणीला** अशा स्थितींत सोडून जाणें माझ्या हातून कदापि व्हावयाचें नाहीं, व मी तिला सोडून कधीं जाणार नाहीं."

इकडे **त्रिवेणी** इतका वेळपर्यंत भीतीनें व

श्रमांमुळें अगदीं विकल होऊन पडली होती, ती हे शब्द ऐकून बोलली:—"बाबा! मी तुमच्या पायां पडतें, तुह्मीं माझ्याबद्दल कांहीं चिंता करूं नका. मी कांहीं अशीच फार वेळ रहायची नाहीं. ते मेले दुष्ट वाड्यांतून निघून जात तोंपर्यंत **वसुभद्राचार्य** हे मजजवळ रहातील, आणि ते दुष्ट गेले ह्मणजे मग मी परत वाड्यांत जाईन !

**वसुभद्राचार्य** बोलतो:—"**त्रिवेणी** ! तूं मला वाटेल ती आज्ञा कर, मी तीप्रमाणे वागण्यास सिद्ध आहें. तुझ्या तोंडांतून बाहेर अक्षर पडण्याचा मात्र अवकाश, त्याप्रमाणें वागण्यास मजकडून एक पळाइतका देखील विलंब होणार नाहीं !"

जती **त्रिवेणी**कडे वळून ह्मणतो:—"अरेरे ! **कार्तिकशंभु** ह्मणत होता त्याप्रमाणें सकाळ होस्तोपर्यंत तूं त्याला आपणाजवळ राहूं दिलें असतेंस तर फार चांगली गोष्ट झाली असती!"

हे शब्द ऐकून **शिलादित्य** आश्चर्ययुक्त मुद्रेनें विचारितो:—"काय ? **कार्तिकशंभु** येथें आला होता ह्मणतां ?"

**जरठकर्ण** ह्मणतो:—"होय. आज रात्रीं सरसरकारी कामदार आमच्या घराचा झाडा घेण्याकरितां व **भद्रमणीं**ना पकडून नेण्याकरितां येणार ह्मणून आह्मांला सुचवायला ह्मणून तो आला होता."

**शिलादित्य** घाई घाईनें विचारितो:—"बरें पण तो आतां कोठें आहे ?"

जती उत्तर करितो:—"तो यावेळीं **त्रिवेणी**च्या सांगण्यावरून तिच्या बापाला पुढील संकटाची सूचना देण्याकरितां घाई घाईनें **चसतरु** गांवच्या वाटेवर आहे."

**शिलादित्य** आपल्याशींच पुटपुटतो:—"हें तर मोठेंच आश्चर्य ! **कार्तिकशंभु** येथें, आणि मला ठाऊक नाहीं ! वा:, चमत्कार आहे !"

जती **शिलादित्या**कडे पाहून डोळे मिचकावीत खुणेनें त्याच्या कानांत सांगतो:—"अरे, तसें नव्हे! त्याचा येथें येण्याचा उद्देश कांहीं—हं—निराळाच होता !"

**शिलादित्य**ही त्याच्या कानांत हळूच उत्तर करितो:—"होय! **भदंतजी**! मलाही पण असेंच वाटतें !"

वरील शब्द ऐकून **वसुभद्राचार्यां**चें अंत:करण एकदम खवळल्यासारखें होऊन तो सप्रेम आणि मृदु शब्दांनीं **त्रिवेणी**स ह्मणाला:—"**त्रिवेणी!** काय असेल तें असो, भूत असो कीं पिशाच असो. कोणी तरी या वेळीं माझ्या कानाशीं येऊन इत:पर माझें आयुष्य सुखांत जाणार किंवा दु:खांत जाणार याबद्दलचा निकाल आतां याक्षणीं होणार ह्मणून सांगत आहे. या प्रसंगीं ज्या कांहीं एका अचिंतितपूर्व प्रकारानें तुझी व माझी या स्थळीं गांठ पडली आहे, व तसेंच ज्या दैवाच्या किंवा कशाच्या तरी बळानें ह्मण, परंतु या प्रसंगांतून तुझें रक्षण करणें माझ्याकडेच आल्यासारखें झालें आहे, त्या दोहोंच्या योगानें माझ्या जिवास पूर्वी अननुभूत असा धीर येऊन, या वेळीं आज कैक वर्षेंपर्यंत तुजविषयीं माझ्या मनांत जी प्रेमबुद्धि ठसली आहे ती तुला मी कळवीत आहें याची तूं मला क्षमा कर ! **त्रिवेणी** ! तुला काय सांगूं ? तुझ्या ह्या सौंदर्यास व तुझ्या सद्गुणांस वश होऊन माझ्या या निराश हृदयाची आजपर्यंत जी स्थिति झाली होती, तिचें वाणीनें वर्णन होणेंही अशक्य ! वारंवार तुझ्या या सर्वांगसुंदर मूर्तीची आठवण हृदयांत उत्पन्न होई, परंतु लोकव्यवहाराकडे लक्ष देतां, मजपेक्षां तुझ्या पित्याची

" यु वाहूं लागला. कोकिलांचीं मनें उत्सुक
" होऊन त्या सकळ प्रपंचाचेंही विस्मरण
" पाडणारें असें पंचमस्वरनिबद्ध गायन
" करूं लागल्या. निरंतर स्रव पावणाऱ्या
" मकरंदाचें सेवन करून भ्रमर मधुर गुं-
" जारव करूं लागले. भ्रूलता उंच करून
" अपांगविभ्रमलीला दर्शविणाऱ्या; मधुर कि-
" शलयाप्रमाणें मंदहास्य करणाऱ्या; चाल-
" तांना ज्यांच्या कर्णांतील वारंवार हालणाऱ्या
" तानवडांतील मण्यांची कांति गंडमंडला-
" वर विराजमान होत आहे; अंगावरील पदर
" किंचित् एके बाजूस सरकल्यामुळें ज्यांचे
" स्तन स्पष्टपणें दृग्गोचर होऊन त्या
" स्तनांवरील मौक्तिकहार इकडे तिकडे
" झोंके खात आहे, व तेणें करून ज्यांच्या
" अंगविक्षेपांचें आविष्करण होत आहे;
" मोठ्यानें नाद करणाऱ्या ज्या सुवर्ण
" कंकणांच्या श्रेणि, त्यांच्याहूनही अधिक
" मोठ्यानें शब्द करणाऱ्या अशा ज्यांच्या
" नितंबांवरील कंचरपट्टयांतील किंकिणींचे
" घणघण शब्द होत आहेत; ज्यांच्या
" पायांतील नूपुराचा मंजुल छुम्छुम् असा
" शब्द निघत आहे; आणि ज्यांनीं मधुर
" नृत्य गायन आरंभिलें आहे, अशा अप्स-
" रांचा समुदाय, आपल्या स्फुटव्यक्त अशा
" प्रेमहास्यकुपितादिक विलासांच्या योगानें,
" शांति हेंच ज्यांचें धन अशा आकिंचन
" मुनिजनांचींही अंतःकरणें विव्हल करू-
" न टाकिता झाला. याप्रमाणें सर्व तयारी
" होऊन सर्वत्र यमनियमादिक क्रियांचे
" परिश्रम नाहींसे करून टाकीत होत्सातां
" कुमार **मन्मथानें** भगवान् **शंकराच्या**
" आश्रमांत प्रवेश केला त्यावेळीं—"

**महें**०—(इतकें अर्धेंच वाचणें होत आहे तोंच) भग-
वन्! त राहूं द्या! **शंकराच्या** कोपानलाची
शांति झाली याच्या पुढचा मजकूर वाचा पाहूं.

**बृह**०—(त्याप्रमाणें वाचतो.) " तदनंतर हे भगवन्!

श्लोक.

" हा चंद्रचूड[1] मजला नयनाग्नियोगें[2]
" जिकावयास करूं उद्यम[3] काय लागे ?
" रोषें अशा स्मरभटें नगजाकटाक्ष[4]
" प्रेरोनियां जितियला निटिलस्थिताक्ष[5]. "

**महें**०—(आनंदानें) वत्सानें **शंकराच्या** कृतीचा
प्रतीकार योग्यच केला! बरें पुढें ?

**बृह**०—" तदनंतर हे भगवन्! ती **हिमालया-**
" ची कन्या जवळच होती, तिचे ठायीं
" **शंकराचें** अत्यंत प्रेम जडून, त्याच्या
" निरोपावरून **उमेचा** विवाह लावण्याक-
" रितां **वसिष्ठादिक** श्रेष्ठमुनि प्राप्त झाले.
" **गिरिराजानें** त्यांचा आदर सत्कार करू-
" न मोठ्या थाटानें त्या सर्वांस **औषधि-**
" **प्रस्थ** नगरास नेऊन यथाशास्त्र विवाह-
" विधि आटोपिला. तदनंतर **शंकराची**
" स्वारी आपलें रहावयाचें ठिकाण जो
" **कैलास**, त्या ठिकाणीं येऊन राहिली;
" व एकांतवासांत विलासोपभोगांचा अनु-
" भव घेऊं लागली असतां, **अंतकांतक**
" **शंकरास** कुमारानें केलेली ही आपली
" सेवा फार आवडली. व सांप्रत वर्तमान
" ऐकण्यांत आहे तें असें कीं,

साक्या.

" गिरिवरतनयाप्रत्यंगातें पंचदशीं नेत्राहीं
" उत्कंठेनें पाहे शिव परि न पवे तृप्ती कांहीं;

---

१ चंद्रमौलि (सांब). २. नेत्रांतील तेजानें. ३. उद्योग. ४. नगजा=पार्वती. ५. निटिल=कपाल, त्या ठिकाणीं स्थित आहे अक्षि=नेत्र ज्याचें असा सांब.

" देई नूतन कोमल ऐशा गिरिजावक्षोजातें
" शंकर अपुल्या दहा भुजाहीं दृढतम परिरंभातें;
" सदयपणें अतिहर्षभरेंही अपुल्या पंच मुखांनीं
" श्रीशिवमूर्ती मग्न जाहली गिरितनयाधरपानीं;
" ऐशा परिनें मृत्युंजयविभु, आणिक शैलसुता ती
" परस्परांशीं विहार करिती हृष्ट मनें एकांतीं.

" तसेंच, पार्वतीची प्रियसखी विजया हि-
" ला मध्यस्थ घालून भक्तजन पार्वतीची
" अशी विनंती करीत आहेत कीं,

श्लोक.

" यावत् अंत कुणाप्रतीहि न तुझीं देणें अनुज्ञेप्रती;
" येतां संनिध कोणिही, न बघणें त्याच्याकडे निश्चिती;
" कोणी वंदन आपणा जरि करी, ना संभ्रमा पावणें;
" कोणी आर्जविता,प्रसाद न तुझीं त्यालागुनी दावणें;
" ज्याच्या मौळिवरी सुधांशु वसतो ऐसा प्रभू शंकर;
" तो युष्मत्पति; त्यावरि रसभरें व्हावें तुझीं निर्भर,
" कां कीं या जगतीतळीं तनुभृतीं ज्या मांडिल्या प्रार्थना,
" तद्भंगें जन खेद पावति, कळो त्या शंकराच्या मना.

" एतावता आपल्या अनुग्रहामुळें या प्रकारें-
" करून कुमारानें आपली आज्ञा पार पाडून
" विजय संपादन केला, ही वार्ता कळवून
" देवेंद्राचें अभिनंदन करावें. याशिवाय
" कुमार मन्मथानें सांगितलेला अवशिष्ट
" वृत्तांत जासुदाकडून आपणास कळेल.
" कळावें हे विज्ञप्ति."

**महें०**—(आनंदाश्रूंनीं नेत्र भरून रोमांचयुक्त होत्साता) वाहवा! आमचें प्रिय झालें! आमचें प्रिय झालें!

**बृह०**—(जासुदांस) बरें बाबांनो! तोंडीं निरोप काय कळवावयाचा आहे तो कळवा पाहूं.

**१ जा०**—महाराज! कुमाराची अशी विज्ञापना आहे कीं, आपली आज्ञा होईल तोंपर्यंत पितृष्वसा जी पार्वती तिच्या संनिध राहून नंतर तातचरणारविंदांकडे येईन.

**२ जा०**—महाराज! इकडे येण्याविषयीं कुमाराची आज्ञा होऊन आह्मीं उभयतां **कैलासाहून** परतल्यानंतर **औषधिप्रस्थ** नगराच्या बाहेरल्या **प्रमदवनांतील** वृक्षच्छायेखालीं विश्रांति घेत बसलों असतां आणखी ही एक प्रिय वार्ता आमचे कानीं पडली.

**महें०**—(उत्सुक होऊन) ती कोणची बोला पाहूं?

**२ जा०**—महाराज! आह्मीं बसलों होतों त्या वेळीं **हिमालयपत्नी मेनाबाई**, यांच्या पदरच्या कोणी दोन दासी त्या ठिकाणीं जवळच असून त्या विश्वासानें एकीमेकींशीं गुजगोष्टी करीत होत्या. त्यांपैकीं एकजण ह्मणतेः—'अग गडे! या दिवसांत कीं नाहीं, आमच्या राजकन्येला डोहाळे लागले आहेत, याकरितां तिला हे आंबे, हा जांब,हा खजूर, हीं डाळिंबें, नेऊन देण्यासारखीं आहेत असें मला वाटतें.' त्यावर दुसरी विचारितेः—'काय ग खरंच का आपली राजकन्या गरोदर झाली?' त्यावर पहिली उत्तर करितेः—'अग होयच. यांत काय संशय?काल कीं नाहीं बाई, **विजयेकडून** आपल्या बाईसाहेबांकडे निरोप कळविण्याकरितां एक चेटी आली होती, तिनें आपल्या राजकन्येच्या डोहाळ्यांच्या लक्षणांचें वर्णन केलें तें असेंः—

साकी.

दुर्बळ फिक्कट तोंड जाहलें; स्थूळ स्तन बहु झाले;
त्यांच्या अग्रांवरी निळेपण आहे बाई आलें;
कटिभागानें कृशता त्यजिली; अंगावरचीं सारीं
टाकी काढोनियां भूषणें बाळा तुमची गौरी.'

१. पार्वतीचे स्तन. २. आलिंगन. ३. हर्षाच्या भरांत. ४. देहधारी, अर्थात् प्राणी.

१. बापाची बहीण, आत.

**महें०**—वाहवा वाहवा ! हें तर आमचें अधिकच प्रिय झालें ! ( बक्षिसें देऊन जासुदांस निरोप देतो. )

**जासू०**—महाराजांचा जयजयकार असो.

( निघून जातात. )

**महें०**—भगवन् ! हें वर्तमान **वसंता**ला कळलें नाहीं काय ?

**बृह०**—देवेंद्रा ! मोठ्यांच्या अंतःपुरांतील वृत्तांत कळणें प्रायशः कठीण पडतें. हा वृत्तांत अगोदर **पार्वती**च्या माहेरीं कळला, त्यानं-तर दासी दासी बोलत असतां तो या जासु-दांना कळला, यांत संशय मानण्याचें कारण नाहीं.

**दौवारिक**—( प्रवेश करून ) महाराज ! **कुबेरा**-कडून आनंदाची वार्ता कळविण्याकरितां कोणी पुरुष आला आहे.

**महें०**—अरें, मग त्याला आंत कां येऊं दिलें नाहीं?

( दौवारिक बाहेर जाऊन त्या पुरुषास पाठवून देतो. )

**पुरु०**—( वंदन करून ) महाराज ! **शंकरा**चे प्रियमित्र आमचे **कुबेर**महाराज यांचा आ-पणास असा आनंदाचा निरोप आहे कीं,—

**महें०**—बोल बोल पाहूं.

**पुरु०**—

श्लोक.

"आस्यें[१] ज्यास सहा, तशी भुजतती बारा जयाची असे,
जो एकाहि दिनीं वयास धरिता सोळा समांच्या[२] दिसे,
जो दुर्वृत्त रिपूंप्रती क्षम असे युद्धांत जिंकावया,—
स्कंदाख्या तनया शिवा प्रसवली, उग्रौजे[३] अंगीं तया.

तसेंच,

श्लोक.

तो स्वीयीं षण्मुखांनीं जनकजननिंचा चुंबितो षण्मुखातें;
हर्षें बारा भुजांनीं कवळिति पितरें, तेवढ्यांनींच त्यातें
देई आलिंगनातें परतुनि; बसुनी अर्धनारीनटाच्या[१]
एका मांडीवरी त्यासुखवि; दिसतिया बालळीला विभूच्या.

अशा त्या वीरास **विष्णुपुत्र** जो **मदन** त्यानें तत्क्षणींच देवांच्या सैनापत्याचा अभिषेक केला. यास्तव आजपासून तुह्मांला शत्रूंपा-सून शंका मानण्याचें कारणही राहिलें नाहीं. "

**महें०**—( आनंदानें ) भगवन् ! मंगलवाद्यांचे गजर होऊं द्या, त्याचप्रमाणें अप्सरांनाही नृत्यास आरंभ करूं द्या.

( बृहस्पति त्याप्रमाणें आज्ञा करितो; सर्व सभा-सद महेंद्रापुढें रत्नांच्या भेटी आणून ठेवितात, व महेंद्र त्या पुरुषास अलंकार आणि वस्त्रें देऊन निरोप देतो. )

( इतक्यांत पडद्यांत शब्द होतो. )

अनर्थ झाला ! अनर्थ झाला !

**महें०**—भगवन् ! हें काय आहे याचा शोध आणवावा.

**प्रतीहार**—( पडद्यांतून अर्धाच बाहेर येऊन ) महा-राज ! देवांचा सेनापति **कार्तिकेय**, ह्याचें जनन झालें याबद्दलच्या आनंदोत्सवांत सर्व पौरजन निमग्न झाले असतां, **राग**महारा-जांची कन्या **रति** ही गच्चीवर पलंगावर निजली असतांच कोणीकडे दिसेनाशी झाली, यामुळें त्यांच्या घरांतील सर्व जन दुःखाकुल होऊन शोक करीत आहेत त्यां-चा हा गलबला आहे !

**महें०**—( त्वरेनें ) भगवन् ! आह्मांस अपकीर्ति-कारक अशी ही गोष्ट कशी बरें झाली? या आपल्या **अमरावती**मध्यें असें साहस करणारा कोण असावा बरें ? वत्से **रती**च्या

---

१. तोंडें. २. वर्षांच्या. ३. उग्र-ओज( =साम-र्थ्य. )

१. सांब आणि पार्वती यांच्या. हीं दोघें एकमेकां-च्या अर्धांगीं वास करितात हें प्रसिद्धच आहे.

मातापितरांनीं तिला कुमार मन्मथास देऊं केलें होतें, आतां कुमार परत आला असतां आपण काय बरें करावें ? आणि ह्या कन्या चोरून नेणारा अधम ह्याचें नांव तरी आपणास कसें बरें कळेल ?

**बृह०**–देवेंद्रा! माझा असा तर्क होतो कीं, रतिप्राप्त्यर्थ शंबरासुर कुमाराशीं प्रतिस्पर्धा करीत होता, तेव्हां त्यानेंच संधि राखून हें कर्म केलें असावें !

**महें०**–(क्रोधानें) आः–या असुराधमानें हे माझ्या मस्तकावर आपले पायच ठेविले! (उठून आवेशानें इकडे तिकडे फिरतो व प्रतीहारास) अरे, तूं जाऊन अधिकाऱ्यांस सैन्याची तयारी करण्यास सांग! भगवन्! आपण माझ्या मित्रा रागाचें समाधान करावें! हा मी इतक्यांत,

श्लोक.

छेदाया गिरि[१]पक्षसंहति असे धारा जयाची चणी,
वृत्राच्या रुधिरेंकरूनि घडली ज्याची महाधारणा,
त्या वज्रें रणिं शंबरास वधुनी त्यापासुनीयां रति
आणोनी परतोनि, अर्पुनि मुदा देतोंचि रागाप्रती.

**बृह०**–देवेंद्रा! तुझ्या पराक्रमापुढें याची ती काय कथा? परंतु शंबराचा स्वतः वध करीन अशी कुमारानेंच प्रतिज्ञा केली आहे, यास्तव या यशाचें भोजन त्यानेंच व्हावें हें बरें!

**महें०**–कांहीं चिंता नाहीं! भगवन्! हा मी जाऊन त्या आपल्या शत्रूचें त्याच्यामागें राज्य हरण करितों!

(सर्व निघून जातात.)

१. पर्वतांच्या पंखांचा समुदाय. प्राचीनकाळीं पर्वतांना पंख होते अशी समजूत आहे. २. समर्थ. ३. आनंद. ४. रागास, रतीच्या पित्यास. ५. पात्र (यशाचा उपभोक्ता.)

## अंक ४.

(तदनंतर राग, मुदिता, रतीच्या दोघी सख्या, आणि पुरोहित येतात.)

**राग**–(दुःखानें)

श्लोक.

ज्या लागीं मान देती सकलहि भुवनीं ऐशिया सत्कुळांत
जन्मोनी, विष्णुपुत्रीं अनुरति धरिली त्वां असे हें सुयुक्त,
वत्से! त्वीयां गुणांनीं हरिशि जनमनें सर्वही, गर्व त्यां वा,
त्या तूझी जाहली हे अनुचित गति ते शक्त बोलों न वाचा!

हाय हाय !

साक्या.

हवि अर्पाया स्रुचा असे जी योग्या यज्ञामाजी,
दुष्टे शुनकें हाय! उचलुनी तीतें नेलें आजी!
उत्तम उत्तम मणी गुंफुनी रचिला जोका हार,
त्यालागोनी अतिचंचल कपि उचलुनि गेला दूर!
किंवा जींचे अति भीतीनें कातर लोचन झाले,
त्या हरिणीतें दुष्ट वृकानें दूर पळवुनी नेलें!
तैशा रीती हाय हाय गे वत्से! त्या अधमानें
हरण करूनी तुजला कैसें नेलें दितिपुत्रानें!

**मुदिता**–(नेत्रांतून अश्रु टाकून) हाय हाय गे वत्से! आतां तुझा मुखचंद्र मी कोठें पाहूं ? (स्मरलेंसें करून)

साक्या.

बाळे! असतां तूं मम गर्भीं जे मज दोहद झाले;
प्रसूतिकाळीं जयां व्यथांतें वत्से! म्यां अनुभविलें;
बाळपणापासुनि म्यां तुजला वाढवितां प्रेमानें
लाड तुझे जे बाइ चिमुकले! पुरवियले हौसेनें;
तैशी बाळपणीं मुलि! तूझी अत्यद्भुत जी क्रीडा;–
स्मरण तयांचें हाय! उपजवी असह्य चित्तीं पीडा!

**दोघी सख्या**–(आक्रोशानें)

(अंजनी) गीत.

शृंगारीयेला कुंजर, त्यावर चढवियली अंबार,
वधूसवें तींत वर, बसतां वरातीं,

१. मदन. २. प्रीति. ३. पळी. ४. दैत्यानें.

चंड०—अरे, पहातां काय, चला त्या दुष्टाला पकडा !—(कांहीं चाकर जातात.) कायरे काय ह्मटलेंस ? त्यानें आपल्याकडून काय ह्मटलेंस ?

मरु०—त्यानें आपणाकडून मी तुमचा वध करावा ह्मणून मला पुष्कळ सांगून पाहिलें, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मीं त्याला पुष्कळ परीनें सांगितलें कीं, बाबारे, मातापितरांचा वध करणें हें फार मोठें पातक आहे. लहानपणापासून त्यांनीं आपलें संगोपन करून आपणाला लहानाचें मोठें केलें असतें, यास्तव आपण त्यांच्याच जिवावर उठणें हें मोठें अधमपणाचें कृत्य आहे. आपण त्यांचीं लेंकरें, तेव्हां निरंतर त्यांच्या आज्ञेंत राहून त्यांचें कल्याण चिंतिणें हाच आपला धर्म. अशा पुष्कळ प्रकारांनीं मीं त्याला समजावून सांगितलें, तथापि त्याचें आपलें येरे माझ्या मागल्या तें ह्मणून अखेरपर्यंत सुटलें नाहीं. आपल्या उपदेशापासून माझें मन वळत नाहीं अशी जेव्हां त्याची खातरी झाली, तेव्हां त्यानें मला न कळत एकदम माझ्या अंगावर वार केला. त्यावेळीं मात्र माझ्यानें उगेंच राहवलें नाहीं. मीं आपली तरवार उपसून त्याला पकडण्याकरितां त्याच्या अंगावर चालून जाऊं लागलों, इतक्यांत मी अंगावर जातों, त्यामुळें ह्मणा, किंवा मी मोठ्यानें "धांवा धांवा," ह्मणून आरडाओरडा केला त्यामुळें ह्मणा, कसें काय झालें असेल तें असो, तो येथून एकदम सूं निसटून पळून गेला!

चंड०—कांहीं चिंता नाहीं ! पहातों आतां तो दुष्ट माझ्या राज्यांतून कसा पार जातो तें ! लेंडी कोठें नाहीं। कोठें तरी सांपडल्याशिवाय रहायची नाहीं ! आपल्या सुदर्शनराजाची स्वारी आज रात्रींच आपल्या येथें यायची आहे, ती आली ह्मणजे त्यांच्या हुकुमानेंच मी अशी दवंडी पिटवीन कीं, जो कोणी मनुष्य या दुष्ट कारट्याला पकडून आणून आमचे स्वाधीन करील त्याला मोठें इनाम मिळेल, आणि जर कोणी त्याला आपले घरांत किंवा कोठें छपवून ठेवील तर त्यास देहांत शासनच करण्यांत येईल !

मरु०—बाबा ! जेव्हां मीं ही गोष्ट करूं नको ह्मणून त्याला सांगूनही त्याचा कांहीं उपयोग न होतां त्याचा आपला वध करण्याचा निश्चयच दिसला, तेव्हां मी कोणीकडचा बोललों कोणास ठाऊक, मीं त्याला ह्मटलें, "फार गमजा करशील तर मी ही गोष्ट बाबांना कळवीन." त्यावर तो काय मला ह्मणतो:—"जारे भिकारड्या! "किती केलें तरी तूं रांडेच्या पोटचा, "तुला विचारतो कोण ? चोरा ! तूं किती "जरी हव्या तितक्या गप्पा सांगितल्यास, "तरी तुझें ह्मणणें कधीं कोणाला खरें "वाटायचें नाहीं. एवढेंच नव्हे, तर मीच "उलटा उघडपणें सगळ्यांना सांगत फिरेन कीं यानेंच माझ्या अक्षरासारखें अक्षर "लिहून बनावट पत्र तयार केलें, आणखी "ही सगळी लबाडी मसलत याचीच "आहे. बाबांच्या पाठीमागें मला जी "वाटणी मिळणार ती मला न मिळतां "आपणालाच मिळावी या उद्देशानेंच यानें "हें सर्व कुभांड मजवर रचिलें आहे. याप्रमाण सांगितलें असतां एकादें लहान "पोर देखील एकदम 'असें खरें' ह्मणून "ह्मटल्याशिवाय रहायचें नाहीं !"

**चंड०**—आः दुष्टा! नष्टा! हा बेरड आपण स्वतः पत्र लिहून सवरून फिरून तें आपण लिहिलें नाहीं ह्मणणार काय? खचित, खचित—हा बेरड कारटा माझ्या पोटचा नव्हे हेंच खचित!—(इतक्यांत पडद्यांत शिंगें व तुताऱ्या वाजलेल्या ऐकूं येतात.) अरे! ही **सुदर्शन** राजाची स्वारी जवळच आली! यांच्या येण्याचा उद्देश काय असावा कांहीं समजत नाहीं! असो. समजेल! मी आतां आपल्या राज्यांतून बाहेर जायच्या सर्व वाटा बंद करून टाकितों. त्या दुष्टाची चेहरेपट्टी गांवोगांवीं मुखत्यारकारांकडे रवाना करून त्याला पकडण्याची तजवीज करवितों! तसेंच या गोष्टीला **सुदर्शन** रावाची ही संमति मिळेल! असो. **मरुत्सेन**! तूं लेंकवळा असलास तरी माझ्या पोटचा खराच, यामुळें तुजवर माझें पहिल्यापासून प्रेम होतेंच, परंतु आजचें तुझें हें वर्तन पाहून माझें तुजवर अधिकच प्रेम बसत आहे. यासाठीं इतःपर तुझी योग्यता वाढवून माझ्यामागें माझी सर्व संपत्ति तुलाच मिळेल अशी मी योजना करितों. —काय?—पितृहत्या?—आः दुष्टा!—**मरुत्सेना**! आतां राजेसाहेबांची स्वारी येऊन दाखल होईल, चल त्यांना सामोरे जाऊं.

(सर्व निघून जातात.)

---

## प्र. २. स्थळ—उदासदुर्गांतील एक दिवाणखाना.

(सुदर्शनराव व चंद्रानना पलंगावर बसलीं आहेत.)

**सुद०**—प्राणप्रिये, आज **चंडवर्मजीं**नीं आपणास पाचारण केलें नसतां आपण होऊनच त्यांच्या घरीं वस्तीला आलों, आपलीं जेवणें खाणें सर्व झालीं, परंतु अद्यापि तूं मला ती गोष्ट सांगितली नाहींस हें काय बरें?

**चंद्रा०**—होय, पण मी सांगणारच होतें! मेलें ह्मटलें जेवण नुकतेंच झालें आहे, तर अगोदर एवढा विडा तरी करून देईन नि मग सांगेन! पण बाई आपली सर्व गोष्टींची घाईच जिकडून तिकडून!

**सुद०**—बरें, तुला वाटेल तेव्हां सांग. मग तर झालें कीं नाहीं? पण काय ग सखे, मघांतो बाहेरचा द्वारपाळ **मधुकर**रावाबद्दल कांहीं भलताच मजकूर दुसऱ्या एकाजवळ सांगत होता, तो सहजगत्या माझ्या कानावर पडला. प्राणप्रिये! तुला ती सगळी हकीकत कळली का?

**चंद्रा०**—होय बाई, मी खालीं पाटावर जेवीत बसलें होतें, तेव्हां माझ्या दासीनें ती मला येऊन कळविली.

**सुद०**—प्रिये! आज आपण **चंडवर्म्या**च्या घरीं येऊन राहिलों आहों, तेव्हां त्याच्याशीं किंवा या वाड्यांतील खाशामाणसांशीं आड पडदा ठेवण्याची कांहीं जरूर नाहीं असें मला वाटतें, याकरितां **चंडवर्मा** व त्याचा धाकटा पुत्र **मरुत्सेन** यांना इकडे बोलावून आणून त्यांचें समाधान करावें हें मला योग्य दिसतें. प्राणप्रिये! तुला कसें बरें वाटतें?

**चंद्रा०**—(लाजल्यासारखें करून) हें काय बाई विचारणें तरी? इकडून जें ह्मणणं होईल त्याच्या बाहेर का मी आहें?

**सुद०**—बरें तर. (मोठ्यानें हाका मारितो.) बाहेर कोण आहे? (दासी आंत येते.) अग आतांच्या आतां **चंडवर्म्या**कडे जा, आणि

त्यांना आणि **मरुत्सेनराव** या दोघांनाही मी बोलावितों ह्मणून सांग.

**दासी०**—जी. (मुजरा करून निघून जाते.)

**सुद०**—कां झालाका विडा तयार एकदाचा ! आणा इकडे. द्या माझ्या हातांत.

**चंद्रा०**—(हंसून) मी वरी देईन ! तोंडांत—

(चंडवर्मा व मरुत्सेन आंत येतात)

**चंद्रा०**—(विडा न देतां अंमळ दूर उभी राहते.)

**सुद०**—यावें **चंडवर्मजी** ! मघां आह्मीं आलों ते अगदीं मोठ्या गडबडीनें, आणि तशांतून वाटेच्या श्रमांमुळें पोटांत लागली होती भूक, त्यामुळें तुमच्याशीं फार बोललों सवरलों नाहीं. असो. पण, **चंडवर्मजी** ! मी येथें आल्यावर आपल्या **मधुकररावां**विषयीं कांहीं चमत्कारिकच प्रकार ऐकिला !

**चंद्रा०**—खरेंच बाई, हें जर खरें असलें तर असल्या माणसांना जगूं पण देतां उपयोगी नाहीं ! **चंडवर्मजी** ! यांत खरें आहे तरी काय ?

**चंड०**—(ऊर बडवून) बाई साहेब! काय सांगूं हो! मज ह्मातान्याचें हृदय फुटलें हो फुटलें ! त्या कारट्यानें माझाच कांहो जीव घ्यायचा बेत केला होता ! हाय हाय !—

**सुद०**—कसें कसें ! **मधुकररावानें** न् तुमचा जीव घ्यायचा बेत केला ?

**चंड०**—सरकार ! मी सांगतों यांत काडीमात्र खोटें नाहीं ! ही गोष्ट लोकांना सांगायला देखील मला लाज वाटते ! पण काय करूं हो ?

**चंद्रा०**-**चंडवर्मजी** ! असा अत्यंत शोक करून काय बरें उपयोग होणार आहे ? बरें पण मी पुसतें हें खरें का मला सांगा पाहूं ? माझ्या बावांजवळ ते मेले सगळ्या मुलखाचे दांडगे सरदार मानकरी आहेत त्यांची तुमच्या **मधुकररावाला** कधीं संगत होती ?

**चंड०**—बाईसाहेब ! तें कांहीं मला माहीत नाहीं ! पण अरेरे ! कोण हा अधमपणा ! धिक्कार असो ! धिक्कार असो !

**मरु०**—बाई साहेब ! आपण ह्मणतां त्याप्रमाणें दादाला संगत होती खरी !

**चंद्रा०**—तरीच तो इतका बिघडला ! **चंडवर्मजी** ! मी खात्रीनें सांगतें, त्या मेल्यांनींच तुमच्या मुलाला चिथावून दिलें आहे ! तुह्मीं नाहींसे झालां ह्मणजे तुमच्या मागें तुमची संपत्ति यथेच्छ लुटून फस्त करावी हा आहे त्या मेल्यांचा बेत ! आजच अक्काकडचें मला एक पत्र आलें. त्यांत या मेल्यांच्या सगळ्या याच कृति लिहिल्या आहेत, आणखी त्यांचा बेत इतक्यांतच तिकडून निघून माझ्या घरीं रहायला यायचा आहे, याकारितां ते आले असतां त्यांना रहायला जागा द्यावी लागेल, यासाठीं मींच मुळीं बाहेर जाऊन रहावें असें देखील अक्काच्या पत्रांत आहे-(नवऱ्याकडे पाहून) ऐकिलेंका ? मी मघां सांगेन ह्मणून ह्मटलें होतें तें हेंच ! आणि आपण घरून निघून इकडे आलों तीं एवढ्यासाठींच !

**सुद०**—योग्य. आतां समजलों. ही गोष्ट मला अगोदर कळती, तर मीही असेंच केलें असतें ! असो. कसं काय ? **मरुत्सेन** ! **चंडवर्मजींचे** प्राण आज तुह्मीं वांचविले ह्मणून मी ऐकितों हें खरेंच ?

**मरु०**—हें काय विचारावें ? सरकार ! मी जर असें न करीन, तर बाबांच्या पोटीं येऊन काय उपयोग !

नव्हे ? हरामखोरा ! तुला आपल्या राजाचा मान कसा ठेवावा हें कळत नाहीं अं:! चल ! उसप तरवार ! गुलामा ! तुला येथेंच कापून टाकितों, तूं काय समजला आहेस ?

अश्व०—( मोठ्यानें ओरडतो. ) अरे ! धांवा ! धांवा ! मेलों ! मेलों ! खून ! खून !

कांति०—गुलामा ! ओरडतोस फिरून ! उसप तरवार ! असा नीट माझ्यापुढें उभा रहा ! लुच्चा ! पाजी ! हरामखोर !—
( त्याला खूप बडवितो. )

अश्व०—धांवा ! धांवा ! अरे, मेलों ! मेलों ! खून ! खून !

( मरुत्सेन नागव्या तरवारीनिशीं येतो. त्याच्या मागून सुदर्शनराव, चंद्रानना, चंडवर्मा, व चाकर त्वरेनें येतात. )

मरु०—अरे ! हा दंगा कसला मांडला आहेरे ! चला! अगोदर एकामेकांपासून दूर व्हा कसे!
( कांतिवर्मा व अश्वसेन यांस वेगळे करितो. )

कांति०—कां आतां आपली स्वारी आली वाटतें! यावें! तुमच्या ओंठांतून दूध पिळतों! यावें !

चंड०—काय ? नागव्या तरवारी ! अरे, हा दंगा रे कसला मांडला आहे येथें ?

सुद०—खबरदार गुलामांनो! आतां कांहीं दंगा कराल तर ! आतां फिरून हात तर उचला कीं, लागलीच हात उचलणाराला देहांतशासनच करितों ! बोला ! हा दंगा कशाकरितां ? तुह्मी कोण आहांत ?

चंद्रा०—अक्का आणखी बावा यांच्याकडून पत्रें घेऊन आलेले जासूद.

सुद०—बोला ! तुमची मारामारी व्हायचें काय कारण ?

अश्व०—सरकार ! मी बेदम झालों आहें. माझ्यानें बोलवत सुद्धां नाहीं !

कांति०—आपल्या अंगीं कुवत नसतां गुलामा ! असल्या खटपटींत पडतोस त्याचें हेंच फळ ! पाजी ! हरामखोर! गंडिया !—गुलामा ! तुला पाहून तुझ्या बापालासुद्धां लाज वाटली असेल ! तुला शिंप्यानें घडविलें चोरा !

सुद०—तूं कोणी चमत्कारिक प्राणी दिसतोस. शिंप्यानें घडविलें ह्मणजे याचा रे काय अर्थ?

कांति०—अर्थ उघडच आहे, याला घडवायला पाथरवट किंवा एकादा चितारी बसला असता, तर बारान् बारा चोवीस वर्षे श्रम करूनही त्याला असला हा पुतळा बनविता आला नसता !

सुद०—फाजिलपणा पुरे कर ! बोल, तुमचें हें भांडण मूळ निघालें कसें ?

अश्व०—सरकार ! हा थेरडा दुष्ट—याच्या पांढुरक्या दाढीकडे लक्ष देऊन मीं याला जगूं दिलें. नाहीं तर—

कांति०—गद्धा गंडिया अदमी ! काय बोलतोस रे ? महाराज ! आपण जर मला परवानगी द्याल, तर, या गुलामाला आतांच्या आतां उखळांत कुटून याच्या रक्तानें पायखान्याना आंतून रंग देतों !—पाजी हरामखोर !—पांढुरक्या या दाढीकडे लक्ष देऊन मला जगूं दिलेंस, नाहीं ?

सुद०—कायरे ए पशू ! तुझ्यानें गप्प नाहीं का रहावत ? तुला कोणापुढें काय बोलावें हें समजत नाहीं ?

कांति०—समजतें ! पण रागाच्या आवेशांत त्याचें भान रहातें आहे कोणाला!

सुद०—तुला रागावायचें काय कारण ?

कांति०—ज्यांच्या अंगीं प्रामाणिकपणा नाहीं, अशांच्या हातीं तरवार पाहिली कीं त्याची

मला मोठी चिरड आहे. या हरामखोरासारखे तोंडपुजे हंसतमुख सोदे घरांत असले, कीं यांचा घरांत नेहमी घुशीसारखा धंदा चालला असतो. इथें पोखर, तिथें पोखर, हें पाड, तें पाड हें सदा चाललें असतें. त्यांच्या धन्यांच्या मनांत वास्तविक किती जरी राग आला असला तरी तो नाहींसा करून दुसरीकडे मात्र आगीला तेल पोचवायचा यांचा धंदा! एकादे वेळीं तसें कांहीं साधण्यासारखं नसलें, तर बरं पहायचें नाहीं, वाईट पहायचें नाहीं, कुतऱ्याप्रमाणें चालले धन्यामागून!—कायरे ए गुलामा! तुझ्या या पांडुरोगी तोंडाला किडे पडतील! मादरचोदा! माझें बोलणें ऐकून हंसतोस कारे! चोरा! मी कोणी तमासगीर लागलों असेन, नाहीं?—पाजी माणूस! किल्ल्याच्या खालीं तर चल, कीं तुझ्या बरगड्याच मोडून टाकितों!

**सुद०**—कायरे, तूं दिवाणा अद्मी तर नाहींस?

**चंद्र०**—अरे, तुमचें भांडण व्हायचें कारण काय, तें बोल पाहूं?

**कांति०**—मांजराच्या न् उंदराच्या, मुंगसाच्या न् सापाच्या भांडणाला कोठें कारण का लागत असतें? माझ्या पुढें असला हरामखोर पाजी कोणी आला कीं माझें भांडण हें व्हायचेंच!

**सुद०**—पण तूं याला हरामखोर पाजी ह्मणतोस असा यानें अपराध तरी काय केला आहे?

**कांति०**—अपराध?—याचें तोंडच मला आवडत नाहीं!

**सुद०**—हा मोठाच चमत्कार! एकून तुला माझें किंवा माझ्या प्रियेचें, किंवा चंद्रमौंजींचें कोणाचें तोंड आवडलें नाहीं, तर तूं आह्मांशींही भांडूं लागणार ह्मणायचा!

**कांति०**—मला हें तें कांहीं समजत नाहीं. माझा आपला सरळ एकमार्गी कारखाना. मला आडवें तिडवें कांहीं माहित नाहीं. एक धोपट मार्ग मात्र ठाऊक. परंतु मी चांगल्या स्थितींत होतों, तेव्हां याक्षणीं मला जेवढीं तोंडें दिसताहेत, त्यांपेक्षां मीं चांगलीं तोंडें पाहिलीं आहेत!

**सुद०**—वाः रे वाः—हा कोणी विलक्षणच मनुष्य दिसतो! याला एकादे वेळीं तूं फार चांगला साधा मनुष्य आहेस असें कोणीं ह्मटलें असेल, तेवढ्यावरच स्वारी हरभऱ्याच्या झाडावर चढली आहे न् दुसरें काय? वाः रे वाः! केवढा पण प्रामाणिक! असल्या गुलामांचें बोलणें नेहमी पण दुटप्पी असतें. भलतें सलतें वाईट हें बोलायचेंच, तें जर कोणाला आवडलें, तर त्यानें आपल्या मनांत समजावें कीं हा मला खुष करण्याकरितांच बोलत आहे. बरें न आवडलें, तरी या गुलामांचें आपलें ह्मणणें कायमच आहे. काय तर आह्मीं आपले साधे गृहस्थ! आह्मांला आड पडदा कांहीं ठाऊक नाहीं!—पण वास्तविक जर पाहिलें तर हे असले गुलाम एकाद्या हांजी हांजी करणाऱ्या कपटी मुत्सद्यापेक्षांही अधिक कपटी ह्मटले पाहिजेत!

**कांति०**—फार उत्तम! अहो! राजाधिराज राजेंद्र श्रीमंत राजवृषभ नृपशार्दूल सरकार! आपली योग्यता किती ह्मणून वर्णन करावी! आपल्या अग्निनारायणाप्रमाणें प्रखर तेजापुढें सूर्याचें तेजही पण अगदीं फिक्कट पडतें! आपल्या भव्य गंभीर चरणसंचारापुढें क्षुद्र मदमत्त हस्तीही थरथर कापूं लागतात!—

**मुद**०—वा: रे चोरा! आतां पहा हा गुलाम कसें बोलूं लागला आहे ! गुलामा ! हें तूं काय बोलतो आहेस ?

**कांति**०—हें होय ? माझें साधें बोलणें तुह्मांला आवडत नाहीं, ह्मणून तुह्मांला आवडण्याकरितां असें बोलतों, दुसरें कांहीं नाहीं!—गृहस्था ! तुला खात्रीनें सांगतों. तूं कांहीं ह्मण, मी पहिल्यापासून आहें तसाच प्रामाणिक आहे! मी कांहीं गुलाम नाहीं ! ज्याचे शब्द खरे समजून तूं मला चोर गुलाम ह्मटलेंस, तोच अट्टल चोर आणि अट्टल गुलाम आहे. त्याच्यासारखा हो ह्मणून जरी तूं माझ्या हजारदा पायां पडलास, तरी मी कांहीं वळायचा नाहीं !

**मुद**०—बरें, यानें तुझा अपराध तरी काय केला होता ?

**अश्व**०—सरकार ! कांहीं नाहीं ! एकदा असें झालें, **अतिपीडानें**—

**कांति**०—तुझ्या बापानें गुलामा ! तुला **अतिपीड**राजानें ह्मणतां येत नाहीं, नव्हे ?

**मुद**०—दुष्टा ! खबरदार मध्यें तोंड घालशील तर—हं—तुझें बोलणें चालूं दे.

**अश्व**०—**अतिपीडानें** मला कायसेंसें सांगितलें, कीं कसें काय झालें असेल तें असो, त्याचें ह्मणणें मला समजलें नाहीं, आणखी माझें ह्मणणें त्याला समजलें नाहीं, त्यामुळें मला उगीच्या उगीच **अतिपीडानें** बडविलें, त्या वेळेस हा दुष्ट जवळ होता त्यानें राजाची मर्जी मजवर खप्पा झालीसें पाहून माझ्या पाठीवर दोन चार लाथा विनाकारण मारल्या. मी राजानें मला मारलें पण एक शब्द सुद्धां बोललों नाहीं, असें असतां त्यावेळीं यानें मला लाथांनीं मारलें, आणखीही तोच द्वेष मनांत धरून यानें आतांही मला बडविलें !

**कांति**०—वा: जी वा:—आतां मात्र हा सगळाच मूर्खांचा बाजार जमला आहे खरा !

**मुद**०—(रागानें) अरे, कोणरे आहे तिकडे ? अरे खोडा इकडे आणा कसे. या गुलामाला नीट बोलायला येत नाहीं, तें त्याला चांगलें शिकवायला पाहिजे !

**कांति**०—**सुदर्शनराव**! तुझा यत्न व्यर्थ आहे. आतां माझ्या उतारवयाला आरंभ झाला आहे आतां तूं किती जरी खटपट केलीस तरी शिकणें ह्मणून माझ्या हातून व्हायचें नाहीं! हल्लीं आहे हा माझा जन्मस्वभावच झाला आहे, त्यापुढें कांहीं कोणाचा उपाय चालायचा नाहीं. याकरितां तुला सांगतों, तूं या खटपटींत पडूं नको ! आणखी तशांतून मी कांहीं तुझी प्रजा नव्हें, मी चाकर आहें **अतिपीड**राजाचा! याचा नीट विचार कर! तूं मला खोड्यांत घालतो आहेस खरा, पण हा माझा अपमान नव्हे, हा प्रत्यक्ष **अतिपीड** राजाचाच अपमान होतो आहे असें समज !

**मुद**०—अरे ! खोडे आणिले कारे ?—काय पाहिजेल तें होवो, मी या गुलामाला दोन प्रहरपर्यंत खोड्यांत अडकावून टेवणारच !

**चंद्रा**०—काय ? एवढेंच ? असें नाहीं, याला रात्रीपर्यंत खोड्यांतच टेवलें पाहिजे, आणखी तीही रात्र ह्मणजे उद्यां सकाळीं उजाडेपर्यंतची !

**कांति**०—कसें कसें ह्मटलें बाईसाहेब ? आपल्या वडिलांच्या घरचा जर मी कुतरा असतों, तर तुह्मी मला इतक्या वाईट रीतीनें वागविलें नसतं !

योग्यता अधिक, व तशांतून मी **ब्राह्मण**धर्मी आणि तूं **अर्हद्**धर्मी, यामुळें तुझा व माझा विवाह होण्याची माझ्या मनाला आजपर्यंत आशा ही वाटलीच नाहीं ! तथापि, आजचा हा अघटित प्रसंग, तसेंच तुझ्या परम पूज्य पित्यावर जी संकटस्थिति कोसळूं पहात आहे ती, व या स्थितीमुळें स्वतः तुझ्यावर जीं अनावर संकटें गुदरण्याचा संभव आहे तीं,—या सर्वांचा विचार करून पहातां, माझ्या मनांत पुनरपि धीर उत्पन्न होत आहे. कदाचित् माझें हें ह्मणणें तुला आवडणार नाहीं, तथापि **त्रिवेणी** ! जर तूं माझें तुजवर किती प्रेम आहे हें मनांत आणशील, तर मला खचित वाटतें, तुझें माझे ठायीं प्रेम बसेल. यासाठीं **त्रिवेणी** ! तूं मजशीं विवाह करून तुजवर येणाऱ्या सर्व संकटांचा परिहार करण्याचें सामर्थ्य मला द्यावेंस एवढीच माझी तुला विनंती आहे ! "

हे शब्द ऐकून **त्रिवेणीनें** कांहीं जबाब दिला नाहीं, तथापि तशा अस्पष्ट उजेडांतही ती लाजून खालीं पाहूं लागली. हें पाहून त्या तरुण व्यापाऱ्यानें तिला ह्मटलें.— " **त्रिवेणी** ! तूं मला अशी बुचकळ्यांत राहूं देऊं नको. तुला काय जबाब देणें असेल तो मला आतांच्या आतां दे कशी ! "

**जरठकर्ण** मध्येंच बोलतोः—" त्याचा जबाब मीच तुला देतों. तो हाच कीं **त्रिवेणीचें** तुझ्याशीं कदापि लग्न व्हायचें नाहीं. "

हें ऐकून **वसुभद्राचार्य** रागावून बोललाः— **भदंतजी** ! या कामांत आपण बोलूं नये. याबद्दलचा जबाब मला **त्रिवेणीनें** स्वतःच दिला पाहिजे. "

जती बोलतोः—" या ठिकाणीं **त्रिवेणीला** मीच बापाच्या ठिकाणीं आहे, आणखी तिच्या बापाचा काय निश्चय आहे तो मीं तुला

---

१. वसुभद्राचार्यांचें हें ह्मणणें वाचकांस कांहींसें चमत्कारिक वाटेल यांत संशय नाहीं. तथापि आज मितीला आपले लोकांत विवाहाचे संबंधानें व जातिभेदाचे संबंधानें जी स्थिति आहे, तीहून प्राचीनकाळीं फारच भिन्न स्थिति होती ही गोष्ट शास्त्र व इतिहास या दोहोंवरूनही सिद्ध आहे. सांप्रत ज्या प्रकारचा भेद हिंदु व जैन या दोन धर्मांच्या लोकांमध्यें आपण मानितों त्या प्रकारचा भेद पूर्वी मानीत नसत, व सांप्रत या उभय लोकांमध्यें जी अन्नादिव्यवहारास अडचण आहे ती अडचण पूर्वी नव्हती. पूर्वी चांगल्या चांगल्या उत्तम हिंदुधर्मी लोकांच्या घरांतून जैन अथवा बुद्ध धर्मी लोकांचा यथेच्छ संचार होऊं शकत असे. कालिदासकृत 'मालविकाग्निमित्र' नाटकांत जी परिव्राजिका आहे ती हिंदुधर्मी होती, तथापि ती बाह्यतः बुद्धधर्माचें आचरण करीत असून तिचा अग्निमित्र राजाच्या गृहींच वास झाला आहे. 'मालतीमाधव' नाटकांत कामंदकी आदिकरून ज्या बुद्ध संन्यासिणी आहेत त्यांचा हिंदुधर्मी भूरिवसु अमात्याच्या घरीं यथेच्छ संचार होत असे, एवढेंच नाहीं, तर, कामंदकी भूरिवसूची कन्या मालती हिला लहानपणीं 'जेऊं' ही घालीत असे, व हिंदु लोकांच्या देवळांतून देवीच्या मंदिरांत शुभकार्यांमध्यें देखील तिचा संचार झालेला सर्वांस अवगत आहेच. 'मुद्राराक्षस' नाटकांतील क्षपणक हा वस्तुतः ब्राह्मण असून बुद्ध संन्याशाच्या रूपानें नाटकांतील ब्राह्मणनायक जो राक्षस त्याच्या घरीं वास्तव्य करीत असे. या सर्व गोष्टींचा विचार मनांत आणिला असतां हिंदु व जैन हे धर्ममतसंबंधानें मात्र निराळे, तथापि, वस्तुतः इतर सर्व प्रकारांनीं आपणास एकच मानीत असत असें दिसतें. आलीकडे आलीकडे शैव व वैष्णव या दोन मतांच्या संबंधानें असंख्य तंटे झाले, तथापि परस्परमतांच्या वधूवरांचे विवाह झालेले आज मितीला दृष्टीस पडतात, त्याप्रमाणें प्राचीन काळींही विवाह झालेले दृष्टीस पडत. आतां इतकें खरें कीं शैव व वैष्णव मातापितरें हट्टासच पेटलीं तर मात्र तीं दुराग्रहामुळें अशा विवाहांस सांप्रत ज्याप्रमाणें कबूल

काळविलाच आहे. तुला पाहिजे असेल तर तूं खुशाल **त्रिवेणी**ला विचार. ती तुला हाच जबाब देईल."

**वसुभद्राचार्य त्रिवेणी**स विचारितोः–"**त्रिवेणी**! एकून तुझ्या पित्याच्या मनांत तुझा माझ्याशीं विवाह नच व्हावा असें आहे काय?"

हे शब्द ऐकून **त्रिवेणी** मुखावाटे दीर्घ-श्वासोच्छ्वास टाकून लुगड्याच्या पदरानें आपले डोळे पुसूं लागली.

"हाय हाय! तर मग एकून माझी आशा पूर्ण होण्याचा कांहींच संभव नाहीं अँ?" **वसुभद्राचार्य** दुःखी होऊन ह्मणतो.

**त्रिवेणी** पुनरपि उसासा टाकून उत्तर करितेः–"असें खरें. ज्याप्रमाणें तुमच्या आशेचा भंग झाला आहे, त्याप्रमाणें मला सतत सुख मिळण्याच्या आशेचाही भंग झाला आहे! मी जिवंत असून या संसाराला व या जगाला मुकल्यासारखीच आहें!"

"तें कसें बरें?" तो विचारितो.

ती उत्तर करितेः–"मीं जोग घेऊन या संसारपाशांतून मुक्त होण्याचा निश्चय केला आहे!"

हे शब्द ऐकण्याबरोबर **वसुभद्राचार्या**स त्याचें मनच आंवरेनासें होऊन तो तिच्यापुढें गुडघे टेंकून पडला, व तिचा हात आपल्या हातांत धरून तिला ह्मणालाः–"**त्रिवेणी**! तूं करते आहेस काय याचा नीट विचार केलास? एकदा जोग घेतल्यावर तुला परत संसारांत येतां यावयाचें नाहीं याचा पुरता विचार कर. असा वेडेपणा करूं नको."

इतक्यांत जती त्यास दरडावून बोलतोः–"**वसुभद्राचार्य**! तुह्मीं मुकाट्यानें उठा कसे! तुह्मीं कितीही पायधरण्या केल्या तरी त्या सगळ्या व्यर्थ आहेत. आपल्या कन्येचा तुजसा-

होत नाहींत त्याप्रमाणें पूर्वीही होत नव्हतीं. परंतु हा प्रकार केवळ दुराग्रहाचा, यास्तव याचें विशेष महत्त्व मानितां येत नाहीं. हाच प्रकार प्राचीन काळीं असे. व हें कथानक ज्या काळास अनुलक्षून लिहिण्यांत येत आहे, त्याकाळीं जैन व हिंदु या उभयधर्मी लोकांचे अतोनात तंटे सुरू असल्यामुळें अशा प्रकारचे विवाह प्रायशः कमीच होत असत. व वसुभद्राचार्यास त्रिवेणीप्राप्तीविषयीं जी निराशा वाटत असे तिचें वस्तुतः हेंच बीज होतें. त्या वेळचे ब्राह्मण लोक जैन लोकांस कांहींसे शूद्रांच्या कोटींत गणीत, व जैन लोक हिंदु लोकांशीं बोलत असतां त्यांस 'श्रावक,' 'उपासक,' 'बुद्धोपासक,' इत्यादि बुद्धधर्माच्या नांवानें हाक मारीत असत, व हिंदु लोकही जैन लोकांनीं आपणास बुद्धोपासक ह्मटलें असतां चिडत नसत. पहिल्या प्रकारचीं अनेक उदाहरणें 'मृच्छकटिक' व 'मुद्राराक्षस' या नाटकांत सांपडतील, व दुसऱ्या प्रकारचें ठळठळीत उदाहरण 'मृच्छकटिक' नाटकांतील ८ व्या अंकांत पुढें लिहिल्या ठिकाणीं दृष्टीस पडेलः–

विटः–बुद्धोपासक इति भवंतं स्तौति.

(अर्थ) विट–बुद्धोपासक अशी तो तुह्मी 'स्तुति' करतो.

असो. एतावता हिंदु व जैन हे वस्तुतः एकच असून हिंदूंतील ब्राह्मण लोक फार तर त्यांस शूद्रांत गणीत असत हें उघड आहे, व यामुळें ब्राह्मणाचा शूद्रजातीय स्त्रीशीं विवाह होण्यास फारसा प्रत्यवाय नसे. मनुशास्त्राची या देशांत संस्थिति झाल्यापासून या देशांत ब्राह्मणाचा शूद्रीशीं विवाह झालेला शास्त्रसंमत मानण्यांत येत असे. 'मृच्छकटिक' नाटकांतील नायक चारुदत्त ब्राह्मण याचा, जिचें कुळी वेश्येची असल्यामुळें जिची शूद्रांतच गणना होत असे, अशा वसंतसेना नामक नायिकेशीं उज्जयिनीच्या आर्यक राजानें विवाह लावून दिल्याचें लिहिलें आहे. तसेंच त्याच नाटकांत शर्विलक चोर हा ब्राह्मण असून त्याचा वसंतसेनेची दासी मदनिका इजशीं विवाह झाल्याचें कवीनें वर्णिलें आहे, व वसंतसेना आणि मदनिका या उभयतांसही 'वधू' असाच शब्द लागला आहे.

रख्या पाखंडी असद्धर्मी मनुष्याशीं विवाह लावून देण्यास **भद्रमणि** कदापि राजी व्हावयाचा नाहीं. याकरितां त्याच्या नांवानेंच मी तुला सांगतों कीं इतःपर तूं इच्याशीं लग्नाची ह्मणून गोष्ट काढितां उपयोगी नाहीं."

"बरें माझें नशीब! उठतों!" असें ह्मणून **वसुभद्राचार्य** मोठ्या दुःखानें उसासा टाकून उभा राहिला. "हा प्रकार इकडे चालत असतां **शिलादित्य** आपल्या मनांत कांहीं विचार करीत असून त्या विचाराच्या नादांतच होता, तो या वेळीं बोलला:—"आतां या ठिकाणीं आपण गमतों आहों हें नीट नव्हे. **भदंतजी**! तुह्मीं मजबरोबर चला! तुमचा बचाव करण्याचें काम माझ्याकडे लागलें. पण या **त्रिवेणीची** वाट काय बरें लावावी! तिला या ठिकाणीं ठेवून जातां तर उपयोगी नाहीं, आणि ती जर परत आपल्या वाड्यांत जाईल तर तेथेंही तिला सुरक्षित रहातां यावयाचें नाहीं."

"ते मेले सगळे एकून एक वाडा सोडून गेल्याशिवाय मी नाहींच परत घरीं जावयाची!" **त्रिवेणी** बोलली.

**शिलादित्य** उत्तर करितो:—"आणखी ते दुष्ट वाड्यांतून केव्हां निघून जातील आणि केव्हां नाहीं याचा कांहीं नेम सांगतां येत नाहीं. ते एकाद्या घरांत शिरल्यावर त्यांना पाहिजे तो मनुष्य तेथें न सांपडला, तर ते महिना महिना दोन दोन महिने सुद्धां तें घर सोडून जात नाहींत!"

हें ऐकून **त्रिवेणी** विरस होऊन ह्मणते:— "अग आई! आतां माझी वाट काय होईल!"

**वसुभद्राचार्य** तीस ह्मणतो:—"**त्रिवेणी**! तुझी इच्छा असेल तर माझें सर्व घर तुझ्या ताब्यांत देतों. तूं तेथें कोणासही न समजतां पाहिजे तितके दिवस रहा!"

**जरठकर्ण** बोलतो:—"**वसुभद्राचार्य**! तुह्मीं उदारपणें **त्रिवेणीला** आपल्या घरीं आश्रय द्यावयाचें बोलतां खरें, व त्याबद्दल तुमचे **त्रिवेणी**वर मोठे उपकार आहेत, परंतु वाजवी रीतीनें **त्रिवेणीला** तुमच्या घरीं रहाणें आवडणार नाहीं, आणि आवडूंही नये!"

**त्रिवेणी** ह्मणते:—"असें खरें!"

**शिलादित्य** विचारतो:—"बरें **त्रिवेणी**! तुझी इच्छा असेल तर तूं मज बरोबर चल, मी तुझें रक्षण करीन!"

**त्रिवेणी**बद्दल **जरठकर्ण** जतीच उत्तर करितो:—"ही **गोष्ट त्रिवेणी** संतोषानें कबूल करील." इतकें बोलून तो **त्रिवेणी**कडे वळून तिला ह्मणाला:—"**त्रिवेणी** तूं, मी, आतां सगळे यांच्या बरोबर एकाद्या सुरक्षित ठिकाणीं जाऊन राहूं, आणि त्या ठिकाणीं तुझा पिता येऊन आपल्याला मिळेल, आणि हल्लींचें हें संकट जिकडचें तिकडे नाहींसें होई तोंपर्यंत आपण सर्व जण त्या ठिकाणीं राहूं."

**शिलादित्य** बोलतो:—"असल्या जागा या **पुनमल्ली** प्रांतांत आणखी **कांचीपुर** प्रांतांत मला पुष्कळ ठाऊक आहेत. चला यापैकीं कोठल्या तरी एका जागीं मी तुह्मांला नेऊन पोंचवितों."

"फार उत्तम." **वसुभद्राचार्य** बोलतो:— 'माझे घोडे या घराच्या दक्षिणेच्या अंगास चिंचेच्या झाडाखालीं बांधलेले आहेत. मी चाकराला सांगतों ह्मणजे तो ते सर्व दाराशीं आणून उभे करील." इतकें बोलून तो आपल्या चाकराकडे वळून त्यानें त्यास कसें काय करावयाचें तें सांगून निरोप दिला. नंतर तो **त्रिवेणी**कडे वळून ह्मणाला:—"आज सकाळीं

कोतवाल तुमच्या घराचा झाडा घेण्याकरितां येणार हें मला सहजगत्या कळलें होतें. याकरितां मध्यरात्र खळण्याच्या कांहींसा अगोदर मी घोड्यावर बसून तिकडे येत होतों. मी दरवाज्याच्या पुढल्या खंदकाशीं येऊन पोंचलों, इतक्यांत " **शिलादित्या**कडे बोट दाखवून ह्मणतो:–' हे गृहस्थ माझ्यापुढें येऊन त्यांनीं माझ्या घोड्याचा लगाम धरून मला मी **भद्रमणी**चा मित्र किंवा शत्रु यांपैकीं कोण आहे ह्मणून विचारिलें. तेव्हां मीं मित्रच आहे ह्मणून उत्तर दिलें, आणि मला हा प्रश्न विचारण्याचें कारण काय ह्मणून विचारलें. तेव्हां खंदकावर फळ्या आडव्या टाकून पुष्कळ हत्यारबंद लोक आंत शिरले आहेत, आणखी या वेळीं ते बागेत आहेत ह्मणून यांनीं मला सांगितलें. ही बातमी ऐकून मला भय वाटलें, एवढेंच नव्हे, तर मी जी कांहीं आशा मनांत धरून आलों होतों तिचीही पूर्ण निराशा झाली. कारण, हे शिपाई लोक एकाद्या घरांत शिरावयाचें असलें, ह्मणजे बहुधा उशीरां, ह्मणजे ज्यावेळीं घरांत एकसुद्धां मनुष्य जागें असण्याचा संभव नाहीं अशा वेळीं, घरावर हल्ला कारितात हें मला ठाऊक होतें, आणि यामुळें मी या शिपायांच्या अगोदर येऊन पोंचून तुझी वाड्यांतून सुटका करीन असें मला वाटत होतें. अशी माझी निराशा झाली तेव्हां मी येण्याला उशीर झाला ह्मणून आपल्याशीं चरफडूं लागून पुढें काय करावें या विचारांत पडलों, इतक्यांत हे गृहस्थ माझ्या जवळ आलेले पाहून माझा चाकर घोड्यावरून मागून येत होता तो त्वरेनें पुढें आला. आणि त्यानें खंदकाच्या खालून वाड्यांत जातां येण्याची एक वाट आपणाला माहित आहे ह्मणून मला सांगितलें. हें ऐकून मी घोड्याखालीं उतरून आपला घोडा एका झाडाला बांधला, आणि आपल्या चाकराला मला एकदम त्या वाटेनें आंत पोंचीव ह्मणून ह्मटलें. इतक्यामध्यें हे गृहस्थ– यांची माझी पूर्वींची ओळख नाहीं–परंतु यांनीं आपलें नांव **शिलादित्य** ह्मणून सांगून, शिवाय आपण कडकडीत **जैनधर्मी** व **जरठकर्ण** जतीचे स्नेही आहों ह्मणून सांगितलें, आणि अतिशय उत्कंठाभरित वाणीनें त्यांनीं मजबरोबर आपणालाही त्या वाटेनें आंत येऊं द्यावें ह्मणून मला ह्मटलें; व त्यांचें तें तसलें उत्कंठेचें भाषण ऐकून मींही एकदम त्यांच्या ह्मणण्याला रुकार दिला. नंतर आह्मीं सर्वजण या घरांत आलों, आणखी घोडे बाहेर चिंचेच्या झाडाखालीं बांधून नंतर कांहीं वेळ इकडे तिकडे शोध केल्यावर आह्मांला तें चापाचें दार सांपडलें. खालीं जमिनीच्या पोटांतल्या वाटेनें जात असतां आमच्यापाशीं दिवे वगैरे कांहीं नव्हतें त्यामुळें आमचा सुमारें चार घटिका फुकट वेळ गेला. इतका वेळपर्यंत आह्मीं त्या दगडी दाराच्या लोखंडी कडीचाच शोध करीत होतों, ती चांचपतां चांचपतां अखेर एकदाची सांपडली. इतका वेळ व्यर्थ गेल्यानें आमचे श्रम फुकट गेले असें आह्मांस वाटूं लागले, इतक्यांत त्या लांकडी भिंतीशीं पोंचतां तोंच तुझ्या किंकाळ्या आमच्या कानीं पडल्या. त्यांबरोबर त्या कळेच्या ठिकाणीं हात लाविला आणि भिंत दुभागून बाहेर पडलों. याच्या पुढचें तुला सर्व ठाऊक आहेच."

हें भाषण ऐकून **त्रिवेणी** पूर्ण कृतज्ञतासूचक शब्दांनीं बोलली:–"आणखी तें मी कधीं विसरायची नाहीं."

हा इतका प्रकार होतो आहे तों बा-

माझ्या धनिनीचें हें तोऱ्याचें व धिक्काराचें भाषण ऐकून व तिला दुसऱ्या माणसाच्या अब्रूची चाड कांहींच वाटत नाहीं असें पाहून मला फार वाईट वाटलें; परंतु तिच्या पुढें बोलण्याची पंचाईत. कारण बोलायला जावें तर दररोज दोन वेळ कसें तरी पोट जाळायला जागा आहे तीही नाहींशी होणार, यासाठीं तिचें तसलें अपमानाचें भाषण मीं मुकाट्यानें ऐकून घेतलें. तिचें तें निष्ठुरपणाचें भाषण ऐकून माझ्या डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा चालल्या, व मधूनमधून स्फुंदतस्फुंदत रडणें चाललेंच होतें. हें पाहून जसें कांहीं हें भांडण मींच उकरून काढिलें, आणि मी रडतें हा माझाच अपराध आहे अशा रीतीनें नाटिकाबाई रागावून मला ह्मणाली:—"मथुरे ! आतां कां बरें ? तुला मी एकदा सांगितलंना ? कीं ही वेळ मी गय करितें, पुढें मात्र असें करूं नको ! तुला यापरतें अधिक तें काय पाहिजे? तुला मी बोललें याचें वाईट वाटत असेल पण ध्यानांत ठेव, तुला माझ्यासारखी मायाळू धनीन दुसरी मिळायची नाहीं. आणीकशी असती तर तिनें तुला केव्हांच घराबाहेर काढून लावलें असतें. मीच ह्मणून तुला इतके दिवस संभाळून घेतलें. बरं तें असो. झालें तें झालें. आतां आपलें रडणें आटप कशी ! मला या असल्या खोट्या मानभावी रडण्याची मोठी चिरड आहे ! समजलीस ?"

ताराबाईचें याप्रमाणें चऱ्हाट चालू होतें, इतक्यांत तिचा नवरा सौम्य रीतीनें मध्यें बोलूं लागला:—"असें काय बरें करतेस ? मथुरा बिचारी गरीब, तिनें—"

त्याबरोबर ताराबाई अधिक संतापून बोलली:—"हां—खबरदार अधिक बोलाल तर ! मी आहे नि माझी कुळंबीण आहे, आह्मीं पाहिजे तशा बोलत बसूं. त्यांत तुह्मांला तोंड घालायची काय जरूर ? तुह्मीं ओटीवर गड्यां-माणसांना बोलतां सवरतां त्यावेळीं मीं कधीं मधें तोंड घातलेलें आठवतें आहे का ? मेलें तुह्मांला ज्यांत त्यांत गुरासारखें तोंड घालण्याची सवयच लागली आहे जशी !—का ग ए! पोरी, तुला इतकं सांगितलें तरी तुझं रडणें अजून नाहीं थांबत? चल निघ कशी ! जा ! वरती जाऊन एकदम आपल्या कामाला लाग! निघ!"

नाटिकाबाईचें हें दुष्टपणाचें भाषण ऐकून तिला परत उत्तर द्यावयाचें तितक्यांतल्या तितक्यांत हजारदा माझ्या मनांत आलें असेल, परंतु उपाय काय ? राहून राहून माझ्या मनांत पुनरपि असा विचार उत्पन्न होई कीं, जर मी आज ताराबाईशीं भांडून निघून गेलें तर लागलीच मला दुसऱ्याचा उंबरठा चढण्याशिवाय दुसरा उपाय नाहीं. पण असा उंबरठा आहे कोठें ? हा विचार मनांत येऊन मी रडते शेवटीं मनांतल्या मनांत चुरमुरे खातच मी तेथून निघून जाण्याकरितां दाराकडे वळलें, व दार उघडून बाहेर पडून तें परत पुरतें लोटतें आहे नाहीं इतक्यांत माझ्या धनिनीचे नवऱ्यास उद्देशून बोललेले पुढील शब्द माझ्या कानीं पडले:—"कसं—कसें ? तुमचे हे थेरडेपणाचे चाळे अजून सुटत नाहींत ? नू तुह्मांला त्या कारटीचा पक्ष घेऊन माझ्याशीं भांडायला पाहिजे, नाहीं ?—खबरदार फिरून—"

याच्या पुढले शब्द माझ्या कानीं पडले नाहींत, कारण याच क्षणीं माझ्या मागें दार पुरें लागलें होतें. तथापि जेवढे शब्द मीं ऐकिले, तेवढ्यांवरून माझे धनी खरोखरी मनाचे कोमल आहेत, व त्यांना माझी मनापासून

कीव येते, आणि तेवढ्याकरितां या नाटिका-बाईकडून त्यांना अपरिमित जाच होतो, हें मनांत येऊन मला अतिशय दुःख वाटलें.

## प्रकरण ६.

मागील प्रकरणांत सांगितलेला प्रकार घडून सुमारें दोन किंवा तीन महिने लोटल्यावर एके दिवशीं आह्मां सर्वांचा वनभोजनास जाण्याचा बेत ठरून, आह्मी सर्वजण गांवापासून सुमारें अर्ध्या कोसावर **संभाजीरावांनीं** नुकतीच एक बाग खरेदी केली होती तिकडे गेलों. त्या बागेंत लहानसा साधा असा एक बंगला बांधला होता, त्यांत सर्व सामानसुमान जेथल्या तेथें लावून ठेवण्याच्या कामाकडे बाकीचीं चाकर माणसें गुंतलीं होतीं. मी **चिमाला** पुढें घेऊन तिची वेणीफणी करीत बसलें. **संभाजीरावांच्या** कोणा स्नेह्याची एक बाग त्या बागेपासून जवळच होती ती पहाण्याकरितां ते निघून गेले, व **ताराबाई** एका पालावर हाय-हुश्श करीत हातपाय ताठवून ढेल देऊन बसली. याप्रमाणें कांहीं वेळ लोटल्यावर असा सुमारें दहा बारा घटका दिवस आला होता, बागेचा पुढचा दरवाजा उघडा असून त्याचे आसपास चाकरमाणसें कामकाज करीत वावरत होतीं, इतक्यांत एक फेरीवाला व त्याचे पाठीमागें दोन मोठालीं ओझीं घेतलेले दोन मजूर असे रस्त्यानें जात होते, व तो फेरीवाला बागेंत कोणी स्वारी उतरली आहे अशा तर्कानें "गोकाकी सामान—केळी जांभूळ आंबा फणस द्राक्षें वांगीं सामान—पेरू नारिंग पपनस भोपळा भेंडिया सामान" असें मोठ्यानें ओरडला. तें ऐकून **ताराबाईनें** चाकराकरवीं त्या फेरीवाल्याला आंत बोलाविलें, त्याप्रमाणें तो आपल्या बरोबरच्या दोघां मजुरांसुद्धां बागेंत येऊन बंगल्याच्या जोत्या वरतीं ओझीं उतरून घेऊन बसला. **ताराबाईला** आपण श्रीमंत आहों असें सांगत फिरण्याची मोठी हौस, व त्यामुळें ती आपली श्रीमंती लोकांच्या डोळ्यांत पूर्णपणें भरावी एतदर्थ नेहमीं दागिन्यांनीं ओथंबलेली असून लुगडीं चोळ्याही मोठमोठ्या किमतीच्या वापरीत असे, व जरी ते दागिने व त्या लुगडीं-चोळ्या तिच्या रूपास नीटशा शोभत नसत, तरी तेवढ्यांवरून निदान ती संपन्न आहे असा कोणाचाही ग्रह झाल्यावांचून रहात नसे. तो फेरीवाला आंत येऊन बसल्यावर तें जिकडे तिकडे सामान पडलेलें पाहून, व **ताराबाईचा** तो दागिन्यांचा व लुगड्याचोळीचा थाट पाहून बिचारा अगदीं भांबावल्यासारखा झाला, व त्याला या ठिकाणीं आपलें बरेंच सामान खपेल अशी आशाही उत्पन्न झाली. तो आल्याबरोबर **ताराबाईनें** त्याला तूं कोठें असतोस, काय उद्योग करितोस वगैरे इकडचे तिकडचे प्रश्न करूनच अगोदर बेजार करून सोडलें. नंतर बराच वेळ झाल्यानंतर "तुझें सामान दाखीव, मला पुष्कळ सामान खरेदी करावयाचें आहे" ह्मणून त्याला सांगितलें, तेव्हां त्या फेरीवाल्याला हुषारी येऊन त्यानें तीं दोन्हीं ओझीं सोडलीं. सोडल्यावर एक एक जिन्नस हातीं घेऊन तो फडक्यानें पुसून सवरून **ताराबाईपुढें** ठेवी, व **ताराबाई** ही तो जिन्नस इकडून तिकडून फिरवून फिरवून त्याकडे नीट रेखून पाहून तो चांगला आहे किंवा वाईट आहे हें सांगे. प्रत्येक जिनसाबद्दल याप्रमाणें सांगत असतां त्या बिचाऱ्या फेरीवाल्याचा चांगला चार घटिका वेळ मोड-

ला; परंतु तितक्या वेळांत जेवढे जिन्नस ताराबाईनें पाहिले, त्यांपैकीं बरेच जिन्नस चांगले आहेत व आपणास आवडतात असें बोलून दाखविलें होतें, त्यामुळें त्या फेरीवाल्यास इतका वेळ गेल्याचें वाईट न वाटतां त्याच्या तोंडावर अधिक अधिक हुषारीच चढत होती. ताराबाईचा सहवास मला पुष्कळ दिवस असल्याकारणानें या सर्व प्रकाराचा अखेर शेवट कोणच्या प्रकारचा होणार हें मला अगोदरच कळून चुकलें होतें. त्यामुळें तसला शेवट आपल्या दृष्टीसमोर व्हावा, व आपणास त्याविषयीं एक चकारशब्दही बोलतां येऊं नये, याबद्दल मला कसेंसेंच वाटूं लागलें, परंतु नाइलाजास्तव मीं तिकडे फारसें लक्ष न दिल्यासारखेंच केलें. असो; वर सांगितलेल्या प्रकारांत आणखी एक वाईट वाटण्यासारखी गोष्ट होती ती अशी कीं, ते जिन्नस एक एक निरखून पहात असतां ताराबाई मन्याबाला, चिमाबाईला आणि "माझ्या धाबी" ला जवळ बोलावून मोठ्या ममतेनें त्यांना "तुह्मांला हा जिन्नस हवा का, तो जिन्नस हवा का" ह्मणून विचारीत असे, व तीं मुलेंही जो जिन्नस पहात तो जिन्नस हवाच ह्मणत, व कांहीं वेळ हातांत घेऊन दुसरा जिन्नस दाखवायला आणला कीं, पहिला जिन्नस धाडकन खालीं टाकून देत. परंतु आपले हे सर्व जिन्नस या ठिकाणीं खपणारच अशा उमेदीनें फेरीवाला तिकडे लक्ष न देतां मुकाट्यानें एक एक जिन्नस दाखवीतच गेला. याप्रमाणें पांच सहा घटका लोटल्यावर इकडे जेवणाची तयारी होत आल्याची वरदी आली, तेव्हां ताराबाईनें तें सर्व सामान फेरीवाल्याकडे लोटून आह्मीं अमकीं व अमक्या ठिकाणीं रहातों, वगैरे गोष्टी मोठ्या दिमाखानें सांगून असलें सामान आह्मीं पुष्कळ खरेदी केलें आहे. याकरितां तूर्तच याची आह्मांला जरूर नाहीं, परंतु दोंचहूं वर्षांनीं जरूर लागल्यास तुला अगोदर सांगून पाठवूं ह्मणून त्याला निरोप दिला. तो ऐकल्याबरोबर त्या फेरीवाल्याची सगळी हिंमत खचल्यासारखी होऊन त्याचें तोंड एकदम गोरेंमोरें झालें. तो व्यापारी तर खराच, परंतु त्याची प्रकृति स्वभावतः तापट नव्हती, यामुळें तो बिचारा गरीबपणानेंच ह्मणाला:– "बाईसाहेब ! मी एवढावेळ मोठ्या आशेवर होतों, आणि मला आपण असाच जायला सांगतां ? माझा वेळ अगदीं नाहीं तरी जवळ जवळ एक प्रहरभर लोटला, याकरितां कांहीं तरी सामान घ्या ! असें करूं नका !"

ताराबाईनें त्याचें हें बोलणें समग्र ऐकून रागावून तोऱ्यानें त्याला उत्तर दिलें:–" होय. अगदीं माझ्यावर उपकारच केला असशील जसा कांहीं? उन्हाच्या वेळेस तुलाच सावलींत विसावा पाहिजे होता, ह्मणून तूं आंत आलास. माझा खेट्टर अडला आहे असलें भिकारडें एकदा पाहून टाकिलेलें समान घ्यायला ! चल एकदम निघून चालता हो कसा !"

ताराबाई इतकें बोलली तरी तो फेरीवाला रागावल्याचें चिन्ह न दाखवितां शांतपणानें बोलला:–" तें खरें, पण बाईसाहेब मी आपण होऊन कांहीं आंत आलों नाहीं. तुमच्या चाकरानेंच मला आंत बोलाविलें ह्मणून मी आलों ! तर हें बघा, उगीच माझी गरीबाची निराशा करूं नका !"

" होय तर ! माझा अडला आहे खेट्टर ! तुला माझ्या चाकरानें बोलावलें खरें, पण तूं अगोदर माझ्या बागेशीं ओरडलास काय ह्मणून?

तुला उगीच ओरडायला सांगितलें होतें कोणीं? जा त्याबद्दल तुला हीच शिक्षा पाहिजे!"

इतकें झालें तरी तो फेरीवाला संथपणानेंच बोलला:—"बाईसाहेब! तुमचें बोलणें मी आतां समजलों! तुह्मीं माझी गरीबाची उगीच थट्टा करूं नका! तुह्मांला आई अंबेची शपथ आहे, मला अजून पुढल्या गांवीं गेलें पाहिजे, तर तुह्मांला काय सामान घ्यायचें असेल, तें कृपा करून लौकर घ्या आणि मला गरीबाला एकदा मोकळें करा!"

"कारे, तूं फार चटोरपणाला लाविला आहेस? तुला एकदा सांगितलेलें नीट समजत नाहीं वाटतें? तूं बऱ्या बोलानें निघून जाणार का तुला चाकरांकडून बाहेर घालवून दिलें पाहिजे?"

"बाईसाहेब! आपण थोर लोक आहां, आपल्याशीं दंडेली करीत बसण्याची माझी योग्यता नाहीं. हा मी तुह्मीं घालवून द्यावयाच्या पूर्वींच जातों. तुह्मांला हवें असलें तर माझें सामान घ्या अगर न घ्या, पण तुह्मीं माझा वेळ मोडला, इतक्या वेळांत गांवांत फिरलों असतों, तर मला गरीबाला चार सहा आणे कमाई तरी झाली असती, तेवढी तरी माझी बुडवूं नका. निदान यांतले रुपयाभऱ्याचे तरी जिन्नस घ्या ह्मणजे मी कांहीं अधिक मागत नाहीं!

"तें कांहीं व्हायचें नाहीं. तूं आपले जिन्नस मुकाट्यानें गोळा कर आणि चालता हो! तुझ्या मजुरांना त्यांचें ओझें झालें असेल, तर पाहिजे तर माझे ह्मणून सगळे जिन्नस मी ठेवून घेईन, पण त्यांबद्दल एक कवडीही देणार नाहीं एवढें मात्र पक्कें समज! मी नांवाची ताराबाई आहे!"

इतका प्रकार झाला तेव्हां मात्र तो फेरीवाला संतापला आणि ह्मणाला:—"तूं कोणी अस, ताराबाई कीं फाराबाई, तुझ्या अकलेची परीक्षा झाली! तूं मला गरीबाला विनाकारण इतका वेळ छळलेस, याबद्दल देव तुझ्या हातांत करट्याच देईल?

"मेल्या तुझा सत्यानास होवो! मेल्या! तोंड आटप आणि एकदां काळें करून जा कसा!,'

"जातों, पण पक्कें ध्यानांत ठेव हा जोतीबा, तानबा पांड्याचा बच्चा आहे, हा तुझें तोंड पुरतें काळें केल्याशिवाय कधीं रहायचा नाहीं!" इतकें बोलून तो एक एक जिन्नस उचलून परत आपल्या मजुरांच्या पाटींत भरूं लागला. भरतां भरतां त्याला त्यांतले एक दोन जिन्नस कमी आल्याचा संशय आला, ह्मणून त्यानें फिरून ते सगळे जिन्नस बाहेर काढून आणखी एकदा मोजले, तों खरोखरीच त्यांतले दोन आंबे कमी आले ते पाहून तो ताराबाईस बोलला:—"बाई, तूं मोठीच इमानी दिसतेस, माझे जिन्नस पाहतां पाहतां दोन आंबे कोणीकडे नाहींसे केलेस?"

"कोणीं मीं? मेल्या! मी कोणी चोर असेन नाहीं?"

"चोर नाहीं चोराची काकी! बऱ्या बोलानें माझे आंबे दे, नाहीं तर फार जड जाईल! खूप ध्यानांत ठेव! मी इतका वेळ दम धरला, पण आतां—"

याप्रमाणें उभयतांचें बोलणें चाललें आहे तों संभाजीराव बाहेरून परत आले. ते आल्याबरोबर ताराबाईनें आपलें शस्त्र त्यांच्यावर उगारलें. ती त्यांस ह्मणाली:—"कां, झाली का वेळ परत यायची? इतका वेळ कोणीकडे तोंड दडवून ठेविलें होतें? घरीं परत यायची देखील मेली

शुद्ध नाहीं ! पण ऐकिलें का—तुमच्या अंगी जर कांहीं पुरुषपणा असेल तर या मेल्याला अगोदर येथून घालवून द्या ! या मेल्यानें मला मघांपासून भंडावून सोडिलें आहे ! मेला येथून जा ह्मटल्यानेंही जात नाहीं !"

बिचारा संभाजीराव बायकोच्या ह्मणण्या वर कांहीं उत्तर न करितां त्या फेरीवाल्याकडे वळून त्याला विचारितोः—"कांरे, बाबा, तू इथे कां ? तुला मघांच ना जायला सांगितलें ?"

'होय, पण या बाईनें माझीं फळें चोरून लपवून ठेविलीं आहेत तेवढीं देववा ह्मणजे जातों ! उगीचच्या उगीच माझी प्रहरभर खोटी केली न् सामान कांहीं विकत घेतलें नाहीं तें नाहींच ! आणखी उलटे दोन आंबे चोरून लपवून ठेविले हा वरती उपकार ! महाराज ! माझे जिन्नस तेवढे मला द्या ह्मणजे मी चालता होतों. आज सकाळीं निजून उठल्याबरोबर कोणा रांडे बोडकीचें तोंड पाहिलें होतें कोणाला ठाऊक, त्यामुळें माझा सगळा दिवस व्यर्थ गेला! आज भोवानीच्या प्रहरीं पहिल्यानेंच या बाईची गांठ कोणीकडून पडली कोणाला ठाऊक, पहिल्यानेंच नाट लागला!—कां बया, आंबे चोरून सवरून आणखी हंसतेस, तुला कांहीं शरम नाहीं वाटत ? देतेस कीं नाहीं माझे आंबे परत ?"

ताराबाई उत्तर करितेः—"कांरे मेल्या ! अजून तुझें तोंड थांबत नाहीं? तुला वाटतें, आमच्या घरांत असले जिन्नस मुळींच नाहींत आणखी तुझ्याच काय ते एकटयाच्या जवळ आहेत, नाहीं?—मेल्या! घे आपले डोळे फोडून एकदाचे! हे पहा माझ्या घरचे हे दोन जिन्नस मी बरोबर आणिले आहेत !" असें बोलून तिनें आपल्या ओंच्यांतून दोन आंबे काढले, आणखी ते दाखवून ह्मणालीः—"कां दिसतें आहे का नाहीं ? मेल्या ! तुझ्याजवळच्या एवढ्या जिन्नसांत हे जिन्नस आहेत तरी का ?"

फेरीवाला उपरोधानें हांसून बोललाः—"बया, तुझ्यासारख्या माल चोरून ठेवणाऱ्या मिळाल्या ह्मणजे माल जवळ रहावा कसा !"

फेरीवाल्याचें हें भाषण ऐकून ताराबाई रजील झाल्यासारखी झाली, आणि तिनें त्यावर शिव्यांचा भडिमार करण्यास आरंभ केला. फेरीवाल्यानेंही मग परत शिव्या देण्यास कमी केलें नाहीं; परंतु त्या सगळ्या शिव्या मी येथें विनाकारण सांगत बसत नाहीं. हा शिव्यांचा झगडा एक घटकाभर जवळ जवळ एकसारखा चालला. तो प्रकार पाहून संभाजीरावांस फार वाईट वाटलें, परंतु बिचाऱ्याला मध्यें बोलण्याची धास्ती. कारण परक्या माणसाच्या देखत कमजास्ती बोलायला जावें, तर त्याच्याच देखत आपल्या बायकोच्या हातून आपली बेअब्रू करून घ्यायची पाळी येणार ! असो. शेवटीं उभयतांचा तंटा होतां होतां त्यांनीं ताराबाईस न कळत फेरीवाल्याच्या हातांत एक रुपया टाकून त्याला मुकाटयानें निघून जाण्याविषयीं खूण केली. तेव्हां मात्र तंटा आपोआपच विजायची वेळ आली. त्या फेरीवाल्याला आपला वेळ पुष्कळ गेला खरा, परंतु आपलें बहुतेक सामान आपणाजवळच राहून हा रुपया हातीं आला हें पाहून संतोष वाटून त्यानें आपलें तोंड आटोपून बागेच्या दाराची वाट धरली. नवऱ्यानें फेरीवाल्याला एक रुपया दिला हें ताराबाईच्या लक्षांत नसल्यामुळें फेरीवाला ते आंबे घेतल्याशिवायच गेला, आणि आपण त्याची भली खरडपट्टी काढली याबद्दल तिला उलटी फुशारकीच वाटूं लागली, आणि

ती बोलली:—“कां पाहिलें का ? तुह्मी पुरुषासारखे पुरुष ह्मणवितां, पण तुमच्यानें कांहीं त्या फेरीवाल्याला बागेच्या बाहेर ह्मणून घालवून देववलें नाहीं! आणखी मी बोलून चालून बायको असून मीं नुसत्या आपल्या तोंडाच्या जोरावरच पहा त्याला कसें बाहेर घालवून दिलें ! अहाहा ! दिवे ओवाळावेत ! समजली अक्कल ! उद्यांपासून तुह्मीं घाला हातांत बांगड्या आणखी मीच घरांत पुरुष होऊन बसतें!”

नवरा गरीबपणानें उत्तर करितो:—“तूं ह्मणतेस तसेंच खरें ! तूं पुरुष आणि मी बायको, झालें ? एवढ्यानें होईल का तुझ्या मनाचें समाधान !”

“हो, होईल ह्मणजे ? झालेंच पाहिजे !”

इतका प्रकार झाल्यावर बागेंत चाकरमाणसें आपआपलीं कामें करीत होतीं, त्यांचीच कायती गडबड, पण त्याशिवाय दुसरीकडे बिलकूल हां कीं हूं कांहींच नव्हतें. **ताराबाई** एका अंगाला जाऊन मुकाट्यानें कोपऱ्यांत त्या चोरून ठेवलेल्या आंब्यांकडे पहात बसली व **संभाजीराव** बिचारे अत्यंत खजील होऊन कांहीं न बोलतां दूर जाऊन दुसऱ्या अंगास बसले. बागेंत येऊन पुष्कळच वेळ झाला, इतक्या अवकाशांत मुलांचें खाणें बेतापुरतें आटोपून तीं खुशाल पाल पसरलें होतें त्यावरच घोरत पडलीं होतीं, त्यामुळें माझी अंमळ हातसोडवणूक झाल्यासारखी होऊन मला सहज **ताराबाई** व **संभाजीराव** यांच्याकडे पहाण्यास फावलें. **ताराबाई** तर फुकटच्या फाकट जिन्नस मिळाला या आनंदांत गर्क होऊन बसली होती, पण बिचारे **संभाजीराव** मात्र तोंड धोत्रांत लपवून डोळे पुशीत होते, व मधें मधें कोणास ऐकूं न यावें यासाठीं दाबूनच हुंदके देत होते. त्यांची बायको द्वाष्ट व कजागस्वभावाशी असल्यामुळें तिच्यापासून त्यांना स्वतःला व चाकरमाणसांना अत्यंत त्रास होत असे खरा, तथापि तो फक्त तिच्या तापट स्वभावामुळेंच, असें समजून त्याकडे त्यांचें फारसें लक्ष नसे, परंतु आपली बायको लहानसान चोऱ्या करायलाही कमी करीत नाहीं, व बाहेरच्या लोकांसमोर आपली अब्रू संभाळणें या गोष्टीकडे तिचें बिलकूल लक्ष नाहीं, ही गोष्ट लक्षांत येऊन बिचाऱ्यास पराकाष्ठेचें वाईट वाटलें. मधें मधें तोंडावरील धोतर काढून ते सहज वर पहात. त्या वेळीं त्यांचें तोंड व डोळे हीं अगदीं निस्तेज झालीं असून त्यांवर प्रेतकळाच आली आहे काय असाही क्षणभर भास झाल्यावांचून रहात नसे, असो. हा प्रकार घटका दोन घटका चालल्यानंतर सैंपाक सर्व तयार असल्याची वरदी आली. तेव्हां मात्र आह्मीं सर्वजण अंग धुण्याच्या तयारीला लागलों. बागेंत केळीच्या बेटाखालीं एक दगडी चबुत्रा होता त्यावर **संभाजीराव** स्नान करावयास बसले. दुसरीकडे पेरूच्या झाडांची गर्दी होती, त्यांचे आड **ताराबाई** आणि मी अंग धुवावयास बसलों. आमचीं अंगधुणीं आटपल्यावर धुतलेलीं लुगडीं चोळ्या नेसून आह्मीं परत जेवावयाच्या जागीं आलों, तों त्या ठिकाणीं पाठीशीं टेकावयास पाट असून पाटावर बसून **संभाजीराव** आचमनें करीत बसले होते, व त्यांच्या उजव्या बाजूस पालावरतीच आंथरुणाला टेंकून दुसरे एक गृहस्थ बसले होते. या दुसऱ्या गृहस्थाचें वय अजमासें तेवीस चोवीस वर्षांचें होतें. त्याचा बांधा उंचट असून तो दिसण्यांत ही फार सुरेख होता. डोळे मोठे, आणि भुवळें काळीं भोर असून मिशा मोठ्या ऐटबाज

खलल्या होत्या, व त्यांच्या बाजूस कल्ले राखले असून ते अद्यापि ह्मणण्यासारखे जरी वाढले नव्हते, तरी ते एकंदरींत त्याच्या चेहेऱ्यास फारच शोभा आणीत होते. असो.

आह्मीं परत आलों, व पुढें सैंपाक झाला होता त्या खोलीकडे जाऊं लागलों, तों **संभाजीरावानें** आपल्या बायकोस हाक मारून तिला ह्मटलें:-"अग-ए-हे गृहस्थ फारां दिवसांनीं आले आहेत, यांना ओळखलेंसका? हे ----- च्या पागेवर मुख्य अधिकारी आहेत. यांचें नांव **ज्ञानराव घाडगे.** मी आंघोळीला बसलों असतांना घोड्यावर बसून **बाईस** चालले होते, त्यांना मीं हाक मारल्यावरून हे आपल्या येथें आले आहेत."

**ताराबाई** नवऱ्याला आंतून फार त्रास देत असे, परंतु कोणी मोठा पाहुणा वगैरे घरीं आला तर त्याच्या देखत फारच शांतपणानें व सौम्यपणानें वागत असे, व त्या पाहुण्याचें आदर आतिथ्य यथास्थित ठेवून त्याला आपणासारखी चांगल्या स्वभावाची दुसरी बायकोच नाहीं असें वाटवीत असे ह्मणून मागें सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें तिनें आपल्या नवऱ्याचें आतां सांगितलेलें भाषण ऐकून लागलेंच हास्यमुखानें त्या गृहस्थाकडे पाहून ह्मटलें:-"कोण **ज्ञानराव घाडगे**? आमचे **कुडाळकर** देशमुख?-कां आज इकडे कोणीकडे स्वारी चालली होती! आज फारां दिवसांनीं गांठ पडली! आमच्या **उमाबाईच्या** लग्नांत तुह्मांला पाहिलें होतें, तेव्हां तुह्मांला कुठें नुकत्या मिशा येऊं लागल्या होत्या, होय असेंचना?

"होय. मलाही असेंच आठवतेसें वाटतें, पण कांहीं पक्की आठवण नाहीं!"

"ऐकिलेंस का"-**संभाजीराव** आपल्या बायकोकडे पाहून ह्मणाले:-"हे आपणाला आठवण नाहीं ह्मणतात, पण नेहमी फौजेंत लढायांचे प्रसंग, तेव्हां अंगावर जखमांचे आठ वण झाले आहेत, तेव्हां इकडली आठवण कुठली?" याप्रमाणें वेंडेवाकडें तोंडांतून कसें तरी वाक्य बोलून गेल्यावर त्यांचें त्यांनाच आपण मोठ्या पंडितासारखी कोटि केली असें वाटून ते मोठ्यानें खदखदां हंसूं लागले.

तें पाहून **ताराबाईनें** त्या **गृहस्थांस** ह्मटलें:-"आमच्या इथला किनई बाई भारी गमत्या स्वभाव! अशीच नेहमी कांहीं ना कांहीं तरी मौज करीत असायचें!" हें बोलत असतां तिनें आपल्या नवऱ्याकडेही वळून पाहिलें, परंतु तें अशा तऱ्हेनें कीं, ज्याला तिचा फारसा अनुभव नाहीं त्याला असें वाटावें कीं ही आपल्या नवऱ्याकडे मोठ्या प्रेमानेंच अवलोकन करीत आहे, परंतु नेहमीच्या राबत्यांतल्या मनुष्यांला त्याचा निराळाच अर्थ वाटावा! तो असा कीं, "खबरदार! नीट बेतानें वागा आणि लोक तुह्मांला मूर्ख ह्मणतील याकरितां जपून असा!"

**ताराबाईचें** वरील भाषण ऐकून **ज्ञानराव घाडगे** ह्मणाले:-"**संभाजीरावांचा** हा गमत्या स्वभाव मला फार दिवसांपासून ठाऊक आहे, आणि त्यामुळें आज त्यांची पुन्हां गांठ पडली याबद्दल मी मोठा संतोष मानितों. त्यांनींच आज आह्मांला आग्रह करून येथेंच जेवायला ठेवून घेतलें आहे, व आठचार दिवशीं खुद्द **पांचवड्च्या** वाड्यांतही कांहीं दिवसपर्यंत रहायला बोलाविलें आहे."

हें ऐकून **ताराबाईनें** आपणास अतिशय आनंद झालासें दाखवून ह्मटलें:-"फार चांगलें. मीही पण आतां हेंच ह्मणणार होतें.-खरें, पण

तुह्मीं केव्हां आमच्या घरीं यायचें करणार ?"

**संभाजीराव** ह्मणालेः—"तुमची रजा खलास व्हायच्यापूर्वींच हा बेत होऊं द्या, ह्मणजे बरें पडेल."

**जानराव** ह्मणतातः—"माझ्याकडून कांहीं ना नाहीं. आपली मर्जी असेल त्यावेळीं मी यायला कबूल आहे."

इकडे घरांत जेवणाची तयारी झाली होती. याकरितां मुलांना जागीं करून आंत नेण्याकरितां ह्मणून **जानराव** ज्या पालावर बसले होते त्या पालावर मी आलें, व **मन्याबा** आणि **च्चिमा** यांना जागीं करून **जनकूला** जागें करूं लागलें, इतक्यांत त्या मुलांकडे आणि **ताराबाईकडे** मोठ्या सानंदाश्चर्यमुद्रेनें पाहून **जानराव** ह्मणालेः—"एकून हीं तिन्हीं मुलें तुमचींच, होय ना? वाहवा वाहवा! आजपर्यंत मीं पुष्कळ मुलें पाहिलीं, पण अशीं सुस्वरूप मुलें कोठेंही पाहिलीं नाहींत! हा सगळ्यांत धाकटा, होयना? याचें नांव काय बरें?"

"**जनकू**!" **ताराबाई** उत्तर करिते.

**जानराव ताराबाईच्या** भाषणापासून आपणास मोठा आनंद झालासें दाखवून **जनकूस** लाडालाडानें ह्मणालेः—"कोण **जनकू**, होय? चकूचकू—चकूचकू—लबाडा! तूं मला ओळखतोस? अरे हंसलारे हंसलारे हंसला—चकूचकू—चकूचकू!" असें बोलून त्यांनीं त्याच्या गालावरून हात फिरविला.

हा प्रकार पाहून **ताराबाईचा** आनंद गगनांत मावेना. खरोखरीं पाहिलें तर त्या तिन्हीं ही पोरांसारखीं कुरूप आणि घाणेरडीं पोरें दुसरीं थोडकींच सांपडतील, तथापि तसल्यांचाही तीं मोठीं सुस्वरूप ह्मणून तिला मोठा डौल वाटत असे, यामुळें **जानरावांनीं** आपल्या मुलाला सुस्वरूप ह्मटलें आणि त्याचे लाडही केले, याकरितां त्याला आतां कोठें ठेवूं आणि काय करूं असें तिला झालें, आणखी ती त्या आनंदाच्याच भरांत बोललीः—"पण खरेंच सांगा **जानराव**! तुह्मांला कसें वाटतें माझा **जनकू** अगदीं थेट इकुडच्या सारखाच आहे, नाहीं बरें?"

**ताराबाईचें** हें भाषण चालू असतां **जानराव** माझ्याकडे तोंड करून पहात होते, व जरी त्यांची दृष्टि **जनकूकडे** आहे असें वाटण्याजोगें होतें, तरी वस्तुतः ते विस्मयाच्या मुद्रेनें माझ्याकडेच पहात होते, त्यायोगानें मला तर बाई अगदीं लाजल्यासारखें झालें. इतक्यांत **ताराबाईचा** हा आतां सांगितलेला प्रश्न ऐकून ते बोललेः—"वाहवा! वाहवा! मुलगा पण अगदीं थेट **संभाजीरावां**सारखा आहे!—होय नारे **जनकू** तूं अगदीं थेट आपल्या बाबांसारखा आहेस नाहीं बरें?" असें बोलून त्यांनीं मुलाला कुरवाळायला ह्मणून हात पुढें केला, परंतु कुरवाळणें एका अंगास राहून त्यांनीं माझ्या हाताला धक्का दिला.

त्याबरोबर मी त्यांच्या हाताला हिसका देऊन वेगानें एका अंगास सरकलें, त्याबरोबर **जनकूला** धक्का बसून त्यानें किंचाळण्यास आरंभ केला, तें पहिल्याबरोबर **जानरावांचें** तोंड एकदम उतरल्यासारखें होऊन ते बोललेः—"काय? काय झालें? धक्का लागला, होय? नाय—नाय! असें रागावूं नये, रडूं नये, चकूचकू"

**जानरावांच्या** या बोलण्याचा अर्थ **संभाजीराव** व **ताराबाई** यांच्या मनांत सरळच आला, परंतु मला तो तत्काळ विपरीत भासून मला